**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग – दोन**

**गुरुवार, दिनांक २४ ऑक्टोबर, २०२४ / कार्तिक २, शके १९४६**

**१००. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक १२ जुलै, २०२४ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रात एकूण ३२५ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक १२ जुलै, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. आता १७४ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित १५१ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : २४ ऑक्टोबर, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :-**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
३. संगणक कक्ष (Website)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

सामान्य प्रशासन विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१०९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री विजय वडेट्टीवार, श्री अस्लम शेख, डॉ. देवराव होळी, श्री, विनोद निकोले, श्री. राजेश पाटील, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.बाळासाहेब थोरात, श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १०९ पुढीलप्रमाणे आहे:-

"सन २०२३ मध्ये आदिवासी उमेदवारांकरिता पेसा कायद्यानुसार विविध विभागाच्या १७ संवर्गामधील भरतीची जाहिराती प्रसिध्द करण्यात येणे, त्या जाहिरातीमध्ये पेसा व नॉन पेसा या दोन्ही संवर्गाची पदे रिक्त असणे, काही विभागाच्या परिक्षा झाल्या तर काहींच्या परिक्षासुध्दा अद्याप घेण्यात आलेल्या नसणे, तलाठी, वनरक्षक, शिक्षक व आरोग्यसेवक या पदांची पेसा भरतीचे सर्व प्रक्रिया पार पडली असूनही पेसा उमेदवारांची अंतिम निवडसूची व नियुक्ती आदेशाचा प्रश्न अद्याप सुटलेला नसणे, पेसा उमेदवारांना वगळून त्या जागी नॉन-पेसा उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येत असल्यामुळे पेसा उमेदवारांवर अन्याय होत असणे, जिल्हा परिषदेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पेसा भरतीचे चित्र यापेक्षा विदारक असणे, माहे ऑक्टोबर, २०२३ ला पशुधन पर्यवेक्षकेची परिक्षा घेण्यात येऊनही आजतागायत त्याचा निकाल जाहीर न करणे, अद्याप निकाल जाहीर न झाल्याने उमेदवार नैराश्याच्या गर्तेत ओढले जाणे, जिल्हा परिषदेंतर्गत पेसा भरतीतील आरोग्यसेवक, ग्रामसेवक यांच्या परिक्षाही अद्याप घेण्यात न येणे, यातच पेसा उमेदवारांचे भरतीचे वेळापत्रक प्रसिध्द न करता केवळ नॉन पेसा उमेदवारांचे परिक्षेचे वेळापत्रक प्रसिध्द केल्याने पेसा उमेदवारांमध्ये अन्याय व नैराश्येची भावना पसरलेली असल्याने, सुशिक्षित बेरोजगार आदिवासी संघटना, गडचिरोली यांनी त्यांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत निवेदनाद्वारे मागणी केली असणे, याबाबत पेसा उमेदवारांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

---

मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मा. राज्यपाल महोदयांनी भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या परि. ५ च्या उप-परि.(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीतील शिफारस क्र. ३४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्रातील) अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्याबाबत दि. २९.०८.२०१९ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी या विभागाने

दि. ०१.०२.२०२३ च्या शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

दि. २९.०८.२०१९ रोजीची अधिसूचना व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेला दि. ०१.०२.२०२३ चा शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकास बिगर आदिवासी आरक्षण हक्क बचाव संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २५४८/२०२३ (IA No. १४५९५/२०२३) द्वारे आव्हान दिले होते. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. २७.०९.२०२३ रोजीच्या न्याय निर्णयान्वये उपरोक्त याचिका त्यांच्या अधिकार क्षेत्रातील बाब नसल्याचे नमूद करून खारिज केली व या प्रकरणी याचिकाकर्त्यांना मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात अपील करण्याची मुभा देण्यात आली आहे.

तदनंतर, याप्रकरणी सामाजिक विकास प्रबोधिनी या संस्थेने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ द्वारे आव्हान दिलेले आहे. याप्रकरणी राज्य शासनाने शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात दि. १३.१०.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान शासनातर्फे मा. महाधिवक्ता यांनी शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना पेसा क्षेत्रातील पदभरतीच्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या पुढील निर्देशापर्यंत पेसा क्षेत्रातील कोणत्याही पदांबाबतच्या नियुक्तीची कार्यवाही करणार नाही, असे मा. न्यायालयास आश्वासित केले. त्यानुषंगाने या विभागाने दि.२०.१०.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत पेसा क्षेत्रातील विहित करण्यात आलेल्या १७ संवर्गात पदभरतीच्या अनुषंगाने निवडप्रक्रिया/नियुक्तीसंदर्भात या विभागाच्या सहमतीशिवाय कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये अशा सूचना सर्व संबंधित विभागांना देण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी दि. ५ ऑगस्ट, २०२४ रोजी होणार आहे. या विभागाच्या दि. १९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये श्री सिध्दार्थ धर्माधिकारी, सरकारी वकील महाराष्ट्र शासन यांना पेसा क्षेत्रातील शिक्षक, सहाय्यकारी परिचारिका व प्रसविका आणि बहुउद्देशिय आरोग्य सेवक या संवर्गातील पदभरती करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात Interim Application दाखल करून त्यांच्या नियुक्तीसाठी शिक्षणावर/आरोग्यसेवेवर विपरीत परिणाम होऊ नये यास्तव मा. न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) अधिसूचित १७ संवर्गामधील तलाठी, वनरक्षक, आरोग्यसेवक, पोलीस पाटील या संवर्गासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी पदभरतीची जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यानुषंगाने सदर संवर्गांची परीक्षा झालेली असून, तलाठी व वनरक्षक या संवर्गांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणामुळे पेसा क्षेत्र वगळून बिगर पेसा क्षेत्रातील उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही संबंधित विभागांकडून सुरू आहे.

पेसा क्षेत्रांतर्गत शिक्षक संवर्गातील अनुसूचित जमातीची सद्यस्थितीत एकूण ४५०६ रिक्त असलेल्या पदांपैकी ८० टक्के पदे म्हणजेच ३६०५ पदे भरण्यास परवानगी आहे. त्यापैकी,

एच- ६४१ – १३ग

सामान्य प्रशासन विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१०९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री विजय वडेट्टीवार, श्री अस्लम शेख, डॉ. देवराव होळी, श्री, विनोद निकोले, श्री. राजेश पाटील, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.बाळासाहेब थोरात, श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १०९ पुढीलप्रमाणे आहे:-

"सन २०२३ मध्ये आदिवासी उमेदवारांकरिता पेसा कायद्यानुसार विविध विभागाच्या १७ संवर्गामधील भरतीची जाहिराती प्रसिध्द करण्यात येणे, त्या जाहिरातीमध्ये पेसा व नॉन पेसा या दोन्ही संवर्गाची पदे रिक्त असणे, काही विभागाच्या परिक्षा झाल्या तर काहींच्या परिक्षासुध्दा अद्याप घेण्यात आलेल्या नसणे, तलाठी, वनरक्षक, शिक्षक व आरोग्यसेवक या पदांची पेसा भरतीचे सर्व प्रक्रिया पार पडली असूनही पेसा उमेदवारांची अंतिम निवडसूची व नियुक्ती आदेशाचा प्रश्न अद्याप सुटलेला नसणे, पेसा उमेदवारांना वगळून त्या जागी नॉन-पेसा उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येत असल्यामुळे पेसा उमेदवारांवर अन्याय होत असणे, जिल्हा परिषदेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पेसा भरतीचे चित्र यापेक्षा विदारक असणे, माहे ऑक्टोबर, २०२३ ला पशुधन पर्यवेक्षकेची परिक्षा घेण्यात येऊनही आजतागायत त्याचा निकाल जाहीर न करणे, अद्याप निकाल जाहीर न झाल्याने उमेदवार नैराश्याच्या गर्तेत ओढले जाणे, जिल्हा परिषदेंतर्गत पेसा भरतीतील आरोग्यसेवक, ग्रामसेवक यांच्या परिक्षाही अद्याप घेण्यात न येणे, यातच पेसा उमेदवारांचे भरतीचे वेळापत्रक प्रसिध्द न करता केवळ नॉन पेसा उमेदवारांचे परिक्षेचे वेळापत्रक प्रसिध्द केल्याने पेसा उमेदवारांमध्ये अन्याय व नैराश्येची भावना पसरलेली असल्याने, सुशिक्षित बेरोजगार आदिवासी संघटना, गडचिरोली यांनी त्यांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत निवेदनाद्वारे मागणी केली असणे, याबाबत पेसा उमेदवारांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

---

मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मा. राज्यपाल महोदयांनी भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या परि. ५ च्या उप-परि.(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीतील शिफारस क्र. ३४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्रातील) अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्याबाबत दि. २९.०८.२०१९ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी या विभागाने

संबंधित जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५४४ उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यापूर्वीची सर्व प्रक्रिया पूर्ण केली असून, मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरण निकाली लागल्यानंतर त्यांना नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही शालेय शिक्षण विभागाकडून करण्यात येईल.

तसेच, पेसा क्षेत्रातील आरोग्यसेवक संवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणामुळे हजर न करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने त्यांच्या दि.०६.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. पशुधन पर्यवेक्षक पदाची परीक्षा झाली असून २१ बिगर पेसा क्षेत्रातील जिल्हा परिषदांचे निकाल घोषित झालेले आहेत. तथापि, पेसा क्षेत्रातील पशुधन पर्यवेक्षक, आरोग्यसेवक व ग्रामसेवक या संवर्गासाठी मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणामुळे जाहिरातीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही ग्रामविकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाकडून करण्यात आलेली नाही.

*******************************************

एच- ६४१-२

सामान्य प्रशासन विभाग
लक्षवेधी सूचना क्र.३५५

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती मंजुळा गावीत, श्री. राजेश पाटील, श्री हितेंद्र ठाकूर, श्री. क्षितीज ठाकूर, श्री. सुभाष धोटे व श्री. किरण लहामटे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३५५ पुढीलप्रमाणे आहे:-

"गेल्या २-३ वर्षापासून राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यातील १७ संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पेसा भरतीला शासनाने स्थगिती दिलेली असणे, पालघर जिल्ह्यातील बिगर आदिवासी लोकांनी पेसा भरती विरूध्द मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे, तेंव्हा पासून पेसा झालेल्या परिक्षांच्या निकालांना व संपुर्ण पेसा क्षेत्रातील परीक्षांना स्थिगिती देण्यात आलेली असणे, त्यामुळे आदिवासी सुशिक्षीत बेरोजगारीचे प्रमाण अधिक वाढलेले असणे, तसेच त्यांची कमाल वयोमर्यादा संपुष्टात येत असल्यामुळे आदिवासी बांधवांत शासनाविषयी असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, त्यामुळे राज्य शासनाने या प्रश्नावर गांभीर्याने विचार करून राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यत १७ संवर्गातील कर्मचाऱ्यांची पेसा भरती त्वरीत सुरू करण्याची आवश्यकता, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दि.१५ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली मागणी, मागणीच्या अनुषंगाने करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मा. राज्यपाल महोदयांनी भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या परि. ५ च्या उप-परि.(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीतील शिफारस क्र. ३४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्रातील) अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्याबाबत दि. २९.०८.२०१९ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी या विभागाने दि. ०१.०२.२०२३ च्या शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

दि. २९.०८.२०१९ रोजीची अधिसूचना व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेला दि. ०१.०२.२०२३ चा शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकास बिगर आदिवासी आरक्षण हक्क बचाव संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २५४८/२०२३ (IA No.१४५९५/२०२३) द्वारे आव्हान दिले होते. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.

२७.०९.२०२३ रोजीच्या न्याय निर्णयान्वये उपरोक्त याचिका त्यांच्या अधिकार क्षेत्रातील बाब नसल्याचे नमूद करून खारिज केली व या प्रकरणी याचिकाकर्त्यांना मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात अपील करण्याची मुभा देण्यात आली आहे.

तद्नंतर, याप्रकरणी सामाजिक विकास प्रबोधिनी या संस्थेने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ द्वारे आव्हान दिलेले आहे. याप्रकरणी राज्य शासनाने शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात दि. १३.१०.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान शासनातर्फे मा. महाधिवक्ता यांनी शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना पेसा क्षेत्रातील पदभरतीच्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या पुढील निर्देशापर्यंत पेसा क्षेत्रातील कोणत्याही पदांबाबतच्या नियुक्तीची कार्यवाही करणार नाही, असे मा. न्यायालयास आश्वासित केले. त्यानुषंगाने या विभागाने दि.२०.१०.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत पेसा क्षेत्रातील विहित करण्यात आलेल्या १७ संवर्गात पदभरतीच्या अनुषंगाने निवडप्रक्रिया/नियुक्तीसंदर्भात या विभागाच्या सहमतीशिवाय कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये अशा सूचना सर्व संबंधित विभागांना देण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी दि. ५ ऑगस्ट, २०२४ रोजी होणार आहे. या विभागाच्या दि. १९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये श्री सिध्दार्थ धर्माधिकारी, सरकारी वकील महाराष्ट्र शासन यांना पेसा क्षेत्रातील शिक्षक, सहाय्यकारी परिचारिका व प्रसविका आणि बहुउद्देशिय आरोग्य सेवक या संवर्गातील पदभरती करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात Interim Application दाखल करून त्यांच्या नियुक्तीसाठी शिक्षणावर/आरोग्यसेवेवर विपरीत परिणाम होऊ नये यास्तव मा. न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यात १७ संवर्गातील कर्मचाऱ्यांची पेसा भरती त्वरीत सुरू करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या नावे अग्रेषित केलेली दि.१५.०६.२०२४ व दि. १८.०६.२०२४ रोजीची निवेदने प्राप्त झाली आहेत.

सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने मा. महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांना स्वत: बाजू मांडण्याबाबत विनंती केलेली आहे. व विशेष समुपदेशी श्री शेखर नाफडे त्यांना सहाय्य करत आहेत.

*******************************************

२७.०९.२०२३ रोजीच्या न्याय निर्णयान्वये उपरोक्त याचिका त्यांच्या अधिकार क्षेत्रातील बाब नसल्याचे नमूद करून खारिज केली व या प्रकरणी याचिकाकर्त्यांना मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात अपील करण्याची मुभा देण्यात आली आहे.

तद्नंतर, याप्रकरणी सामाजिक विकास प्रबोधिनी या संस्थेने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ द्वारे आव्हान दिलेले आहे. याप्रकरणी राज्य शासनाने शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात दि. १३.१०.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान शासनातर्फे मा. महाधिवक्ता यांनी शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना पेसा क्षेत्रातील पदभरतीच्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या पुढील निर्देशापर्यंत पेसा क्षेत्रातील कोणत्याही पदांबाबतच्या नियुक्तीची कार्यवाही करणार नाही, असे मा. न्यायालयास आश्वासित केले. त्यानुषंगाने या विभागाने दि.२०.१०.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत पेसा क्षेत्रातील विहित करण्यात आलेल्या १७ संवर्गात पदभरतीच्या अनुषंगाने निवडप्रक्रिया/नियुक्तीसंदर्भात या विभागाच्या सहमतीशिवाय कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये अशा सूचना सर्व संबंधित विभागांना देण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी दि. ५ ऑगस्ट, २०२४ रोजी होणार आहे. या विभागाच्या दि. १९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये श्री सिध्दार्थ धर्माधिकारी, सरकारी वकील महाराष्ट्र शासन यांना पेसा क्षेत्रातील शिक्षक, सहाय्यकारी परिचारिका व प्रसविका आणि बहुउद्देशिय आरोग्य सेवक या संवर्गातील पदभरती करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात Interim Application दाखल करून त्यांच्या नियुक्तीसाठी शिक्षणावर/आरोग्यसेवेवर विपरीत परिणाम होऊ नये यास्तव मा. न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यात १७ संवर्गातील कर्मचाऱ्यांची पेसा भरती त्वरीत सुरू करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या नावे अग्रेषित केलेली दि.१५.०६.२०२४ व दि. १८.०६.२०२४ रोजीची निवेदने प्राप्त झाली आहेत.

सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने मा. महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांना स्वत: बाजू मांडण्याबाबत विनंती केलेली आहे. व विशेष समुपदेशी श्री शेखर नाफडे त्यांना सहाय्य करत आहेत.

*******************************************

सामान्य प्रशासन विभाग
लक्षवेधी सूचना क्र.३५५

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती मंजुळा गावीत, श्री. राजेश पाटील, श्री हितेंद्र ठाकूर, श्री. क्षितीज ठाकूर, श्री. सुभाष धोटे व श्री. किरण लहामटे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३५५ पुढीलप्रमाणे आहे:-

"गेल्या २-३ वर्षापासून राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यातील १७ संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पेसा भरतीला शासनाने स्थगिती दिलेली असणे, पालघर जिल्ह्यातील बिगर आदिवासी लोकांनी पेसा भरती विरूध्द मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे, तेंव्हा पासून पेसा झालेल्या परिक्षांच्या निकालांना व संपुर्ण पेसा क्षेत्रातील परीक्षांना स्थिगिती देण्यात आलेली असणे, त्यामुळे आदिवासी सुशिक्षीत बेरोजगारीचे प्रमाण अधिक वाढलेले असणे, तसेच त्यांची कमाल वयोमर्यादा संपुष्टात येत असल्यामुळे आदिवासी बांधवांत शासनाविषयी असंतोषाची भावना निर्माण झालेली असणे, त्यामुळे राज्य शासनाने या प्रश्नावर गांभीर्याने विचार करून राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यत १७ संवर्गातील कर्मचाऱ्यांची पेसा भरती त्वरीत सुरू करण्याची आवश्यकता, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दि.१५ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली मागणी, मागणीच्या अनुषंगाने करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## <u>मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

मा. राज्यपाल महोदयांनी भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या परि. ५ च्या उप-परि.(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीतील शिफारस क्र. ३४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्रातील) अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्याबाबत दि. २९.०८.२०१९ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी या विभागाने दि. ०१.०२.२०२३ च्या शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

दि. २९.०८.२०१९ रोजीची अधिसूचना व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेला दि. ०१.०२.२०२३ चा शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकास बिगर आदिवासी आरक्षण हक्क बचाव संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २५४८/२०२३ (IA No.१४५९५/२०२३) द्वारे आव्हान दिले होते. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि.

लक्षवेधी सूचना क्र.१२५१
सामान्य प्रशासन विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२५१ पुढीलप्रमाणे आहे:-

"शासनाने वेळोवेळी आश्वस्थ केल्यावर सुद्धा अकोला (शिवणी) येथील विमानतळ विस्तारीकरणाचे काम गेल्या अनेक वर्षापासून केवळ जमीन भूसंपादन अभावी रखडलेले असणे, विमानतळ विस्तारीकरणाचे कामा त्वरित करावे या करिता लोकांची व लोक प्रतिनिधींची सतत व दीर्घकालीन मागणी असणे, पश्चिम विदर्भाचा विकास साधण्याचे दृष्टीने अकोला विमानतळाची स्थापना सन १९४३ साली होणे राज्यातील तत्कालीन २० विमानतळापैकी अकोला विमानतळ असणे, विमानतळाची धावपट्टी विस्तारित करण्यासाठी आवश्यक ६०.६८ हे. जमीन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला यांचेकडून हस्तांतरित झालेली असणे, तथापि आवश्यक २०.२४ हेक्टर खाजगी जमीन अद्याप संपादित न झाल्याने विमानतळ विस्तारीकरणाचे काम रखडणे, सन २०२२ च्या विधानसभा दुसरे अधिवेशन तसेच २०२२ तिसरे विधानसभा अधिवेशनात चर्चा घडून येणे, खाजगी जमीन संपादनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल अशी शासनाचे वतीने सभागृहात घोषणा करणे, केवळ निधी अभावी राज्य शासनाकडून खाजगी जमीन अधिग्रहण करण्यात होत असलेली चाल ढकल, तसेच सदर विमानतळ विस्तारीकरणाचे काम तातडीने सुरु होत नसल्याने पश्चिम विदर्भातील अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वशिम, हिंगोली या पाच जिल्हयांचा विकास खुंटीत झाला असल्याचे नागरिकांची भावना निर्माण होणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

अकोला विमानतळ हा सद्यस्थितीमध्ये भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या अधिनस्त आहे. हा विमानतळ १९६ एकर (७९ हे.आर) मध्ये विस्तारलेला असून, या विमानतळाची धावपट्टी ही १४०० मी. X ४५ मी. आहे. सदर धावपट्टी ए.टी. आर. ४२ या विमानाकरिता सोईची आहे.

भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी, अकोला विमानतळावरुन मोठी विमाने उतरण्यासाठी या विमानतळाची धावपट्टीची लांबी १८०० मीटर पर्यंत वाढविण्याकरीता मोजणीअंती ८२.९२ हे. आर अतिरिक्त क्षेत्राची आवश्यकता असल्याचे कळविले. त्यानुसार, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाची ६०.६८ हे. आर जमीन दि. ३०/०५/२०१६ रोजी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली

आहे. उर्वरित २२.२४ हे. आर (मोजणी अंती) खाजगी जमिनीच्या मोजणीची कार्यवाही करुन सदर क्षेत्राचे भूसंपादन करण्याची कार्यवाही सुरु असताना तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय, यांनी दि. ०७ फेब्रुवारी, २०२० रोजी अकोला विमानतळाचा व्यवहार्यता अभ्यास अहवाल करण्याबाबत निर्देश दिले. त्या अनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण अकोला यांच्याकडून प्राप्त झालेल्या व्यवहार्यता अभ्यास अहवालात कोणतीही तांत्रिक शक्याशक्यता नसल्यामुळे योग्य व्यवहार्यता अहवाल (feasibility report) देण्याबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास दि.२४-०९-२०२१ रोजी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून पुन्हा कळविण्यात आले. त्या अनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, प्रादेशिक कार्यकारी संचालक (पश्चिम विभाग) यांनी आर. सी. एस. अंतर्गत रुट मिळाल्यास तेथील धावपट्टीचे, आहे त्या जागेतच १८०० मी. x ४५ मी. विस्तारीकरण केले जाईल. तथापि, नाईट लॅण्डींग करिता सुमारे ५१.६५ एकर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता असून अतिरिक्त भूसंपादनाचे कारण नमूद असल्याने इतर कोणत्याही व्यवहार्यतादर्शक अहवालाची आवश्यकता नसल्याचे कळविले.

दरम्यान जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे केंद्रीय मंत्री महोदय मा.श्री. नितिन गडकरी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा. मंत्री महोदयांनी अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार हा २५०० मीटर पर्यंत करावयाचे असल्याचे निर्देश दिले. त्यानुसार पुनश्च म.वि.वि.कं. कडून प्रादेशिक कार्यकारी संचालक (पश्चिम विभाग) भा.वि.प्रा. यांना या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासून अहवाल सादर करण्याबाबत दि. २५-०१-२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्याअनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण अकोला यांचेकडून दि.२७-०३-२०२३ च्या इ-मेलद्वारे प्राप्त अहवालामध्ये अकोला विमानतळाच्या धावपट्टीचे २५०० मी. पर्यंत विस्तारीकरण शक्य असल्याचे तसेच त्यासाठी अतिरिक्त १४५ एकर क्षेत्राची आवश्यकता असल्याचे कळविले. सदर क्षेत्रामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाची बहुतांशी जमीन संपादीत करावी लागणार असून, या जमीनीमध्ये सद्यस्थितीमध्ये वसलेली मानवी लोकवस्ती तसेच कृषी अभियांत्रिकी महाविदयालयाच्या इमारती व वसतीगृह इमारतीसह जमीन तात्काळ संपादन करणे शक्य आहे किंवा कसे? याबाबत जिल्हाधिकारी अकोला यांना दि. २५-०४-२०२३ रोजी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून कळविण्यात आले आहे. त्यानुसार त्यांनी दि. २२-८-२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर जमीन संपादीत करता येणार नसल्याचे स्पष्ट कळविले आहे.

तसेच जिल्हाधिकारी, अकोला यांनी या पत्रासोबत अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार २५०० मीटर पर्यंत करण्यासाठी मुळ धावपट्टीच्या ऑरेन्टीनेशनमध्ये बदल करुन धावपट्टीचे विस्तारीकरण करता येणे शक्य आहे का याबाबतची व्यहार्यता तपासण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस विनंती केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने दि.०५-९-२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रादेशिक कार्यकारी संचालक (पश्चिम विभाग) भा.वि.प्रा. यांना व्यहार्यता तपासण्यासाठी विनंती केली होती. त्यांनी दि.१३-१०-२०२३ रोजीच्या पत्रान्वये, सुधारित मास्टर प्लॅन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सादर केला असून, या मास्टर प्लॅन प्रमाणे जमीन उपलब्ध होणार असल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आहे. उर्वरित २२.२४ हे. आर (मोजणी अंती) खाजगी जमिनीच्या मोजणीची कार्यवाही करुन सदर क्षेत्राचे भूसंपादन करण्याची कार्यवाही सुरु असताना तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय, यांनी दि. ०७ फेब्रुवारी, २०२० रोजी अकोला विमानतळाचा व्यवहार्यता अभ्यास अहवाल करण्याबाबत निर्देश दिले. त्या अनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण अकोला यांच्याकडून प्राप्त झालेल्या व्यवहार्यता अभ्यास अहवालात कोणतीही तांत्रिक शक्याशक्यता नसल्यामुळे योग्य व्यवहार्यता अहवाल (feasibility report) देण्याबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास दि.२४-०९-२०२१ रोजी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून पुन्हा कळविण्यात आले. त्या अनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, प्रादेशिक कार्यकारी संचालक (पश्चिम विभाग) यांनी आर. सी. एस. अंतर्गत रुट मिळाल्यास तेथील धावपट्टीचे, आहे त्या जागेतच १८०० मी. x ४५ मी. विस्तारीकरण केले जाईल. तथापि, नाईट लॅण्डींग करिता सुमारे ५१.६५ एकर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता असून अतिरिक्त भूसंपादनाचे कारण नमूद असल्याने इतर कोणत्याही व्यवहार्यतादर्शक अहवालाची आवश्यकता नसल्याचे कळविले.

दरम्यान जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे केंद्रीय मंत्री महोदय मा.श्री. नितिन गडकरी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा. मंत्री महोदयांनी अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार हा २५०० मीटर पर्यंत करावयाचे असल्याचे निर्देश दिले. त्यानुसार पुनश्च म.वि.वि.कं. कडून प्रादेशिक कार्यकारी संचालक (पश्चिम विभाग) भा.वि.प्रा. यांना या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासून अहवाल सादर करण्याबाबत दि. २५-०१-२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्याअनुषंगाने भारतीय विमानपत्तन प्राधिकरण अकोला यांचेकडून दि.२७-०३-२०२३ च्या इ-मेलद्वारे प्राप्त अहवालामध्ये अकोला विमानतळाच्या धावपट्टीचे २५०० मी. पर्यंत विस्तारीकरण शक्य असल्याचे तसेच त्यासाठी अतिरिक्त १४५ एकर क्षेत्राची आवश्यकता असल्याचे कळविले. सदर क्षेत्रामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाची बहुतांशी जमीन संपादीत करावी लागणार असून, या जमीनीमध्ये सद्यस्थितीमध्ये वसलेली मानवी लोकवस्ती तसेच कृषी अभियांत्रिकी महाविदयालयाच्या इमारती व वसतीगृह इमारतीसह जमीन तात्काळ संपादन करणे शक्य आहे किंवा कसे? याबाबत जिल्हाधिकारी अकोला यांना दि. २५-०४-२०२३ रोजी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून कळविण्यात आले आहे. त्यानुसार त्यांनी दि. २२-८-२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर जमीन संपादीत करता येणार नसल्याचे स्पष्ट कळविले आहे.

तसेच जिल्हाधिकारी, अकोला यांनी या पत्रासोबत अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार २५०० मीटर पर्यंत करण्यासाठी मुळ धावपट्टीच्या ऑरेन्टीनेशनमध्ये बदल करुन धावपट्टीचे विस्तारीकरण करता येणे शक्य आहे का याबाबतची व्यहार्यता तपासण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस विनंती केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने दि.०५-९-२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रादेशिक कार्यकारी संचालक (पश्चिम विभाग) भा.वि.प्रा. यांना व्यहार्यता तपासण्यासाठी विनंती केली होती. त्यांनी दि.१३-१०-२०२३ रोजीच्या पत्रान्वये, सुधारित मास्टर प्लॅन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सादर केला असून, या मास्टर प्लॅन प्रमाणे जमीन उपलब्ध होणार असल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.

लक्षवेधी सूचना क्र.१२५१

सामान्य प्रशासन विभाग

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२५१ पुढीलप्रमाणे आहे:-

"शासनाने वेळोवेळी आश्वस्थ केल्यावर सुद्धा अकोला (शिवणी) येथील विमानतळ विस्तारीकरणाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून केवळ जमीन भूसंपादन अभावी रखडलेले असणे, विमानतळ विस्तारीकरणाचे कामा त्वरित करावे या करिता लोकांची व लोक प्रतिनिधींची सतत व दीर्घकालीन मागणी असणे, पश्चिम विदर्भाचा विकास साधण्याचे दृष्टीने अकोला विमानतळाची स्थापना सन १९४३ साली होणे राज्यातील तत्कालीन २० विमानतळापैकी अकोला विमानतळ असणे, विमानतळाची धावपट्टी विस्तारित करण्यासाठी आवश्यक ६०.६८ हे. जमीन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला यांचेकडून हस्तांतरित झालेली असणे, तथापि आवश्यक २०.२४ हेक्टर खाजगी जमीन अद्याप संपादित न झाल्याने विमानतळ विस्तारीकरणाचे काम रखडणे, सन २०२२ च्या विधानसभा दुसरे अधिवेशन तसेच २०२२ तिसरे विधानसभा अधिवेशनात चर्चा घडून येणे, खाजगी जमीन संपादनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल अशी शासनाचे वतीने सभागृहात घोषणा करणे, केवळ निधी अभावी राज्य शासनाकडून खाजगी जमीन अधिग्रहण करण्यात होत असलेली चाल ढकल, तसेच सदर विमानतळ विस्तारीकरणाचे काम तातडीने सुरु होत नसल्याने पश्चिम विदर्भातील अकोला, यवंतमाळ, बुलढाणा, वशिम, हिंगोली या पाच जिल्हयांचा विकास खुंटीत झाला असल्याचे नागरिकांची भावना निर्माण होणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

अकोला विमानतळ हा सद्यस्थितीमध्ये भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या अधिनस्त आहे. हा विमानतळ १९६ एकर (७९ हे.आर) मध्ये विस्तारलेला असून, या विमानतळाची धावपट्टी ही १४०० मी. X ४५ मी. आहे. सदर धावपट्टी ए.टी. आर. ४२ या विमानाकरिता सोईची आहे.

भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी, अकोला विमानतळावरुन मोठी विमाने उतरण्यासाठी या विमानतळाची धावपट्टीची लांबी १८०० मीटर पर्यंत वाढविण्याकरीता मोजणीअंती ८२.९२ हे. आर अतिरिक्त क्षेत्राची आवश्यकता असल्याचे कळविले. त्यानुसार, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठाची ६०.६८ हे. आर जमीन दि. ३०/०५/२०१६ रोजी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली

जसे की ओ.एल.एस सर्व्हे, वाहणाऱ्या वाऱ्याची दिशा तसेच विमानाच्या आवगमन करण्यासाठी येणाऱ्या अडथळयांचा अभ्यास करता येईल, याचा अभ्यास करुन ऑरेन्टीनेशनमध्ये बदल करण्याबाबत व्यवहार्यता तपासली जाईल. भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी केलेली विनंती विचारात घेता जिल्हाधिकारी अकोला यांना सदर जमीन उपलब्ध होईल का याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून दि.०६-११-२०२३ रोजीच्या पत्रान्वये विचारणा करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी अकोला यांनी दि.२३-११-२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस अहवाल सादर केला आहे. या अहवालानुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांची १७४ एकर जमीन, पशुवैधकीय महाविद्यालय, अकोला यांची ७४ एकर, खाजगी जमीन ७१ एकर आणि सरकारी जमीन १५ एकर असल्याचे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस कळविले आहे. या जमिनीपैकी खाजगी जमीन संपादीत करता येईल असे कळविले आहे. तसेच सरकारी १५ एकर जमिनीमध्ये गावठाण येत असल्याचे ही कळविले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या दि.०७-१२-२०२३ रोजीच्या पत्रान्वये, या सरकारी जमिनीमध्ये किती लोकवस्ती बाधित होत आहे ? तसेच या लोकवस्तीचे भूमिसंपादन अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार पुनर्वसन करावयाचे झाल्यास किती निधीची आवश्यकता आहे ? याबाबत विचारणा करण्यात आली होती.

दरम्यान, सन २०२३ मधील हिवाळी अधिवेशनामध्ये या विमानतळाबाबत अर्धातास चर्चेच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या आश्वासनानुसार मा. मंत्री, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि.२ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार हा १४०० मीटर वरुन २५०० मीटर पर्यंत करावयाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अकोला यांनी तीन पर्याय महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला सुचविले आहेत. या तीन पर्यायापैकी एका पर्यायास महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने सहमती दर्शविली आहे. सदर पर्यायानुसार या विमानतळाचा विस्तार २५०० मीटर पर्यंत पूर्वेकडे करण्यासाठी खाजगी जमीन २७ एकर आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची ३५३ एकर जमीन संपादीत करावी लागणार आहे.

तसेच, दि.२६.०६.२०२४ अपर मुख्य सचिव, विमानचालन यांच्या अध्यक्षतेखाली प्रधान सचिव, कृषी, जिल्हाधिकारी अकोला, उपाध्यक्ष व व्यवस्थापीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, व विद्यापीठाचे प्रतिनिधी यांच्या समवेत झालेल्या बैठकीमध्ये सदर विमानतळ भारतीय विमानपत्तन प्रधिकरण यांच्या अधिनस्त असल्यामुळे याबाबत त्यांचे अभिप्राय घेण्यात यावेत असा निर्णय घेण्यात आला. या अनुषंगाने दि.०२ जुलै, २०२४ रोजी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना पत्र पाठविण्यात आले असून अकोला विमानतळाचे विस्तारीकरण करण्याबाबत शासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

..............................................

सामान्य प्रशासन विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१३२९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री शिरीषकुमार नाईक, ॲड. के.सी. पाडवी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १३२९ पुढीलप्रमाणे आहे:-

" पेसा क्षेत्रातील १६ संवर्गापैकी परिक्षा झालेल्या संवर्गाची अंतिम निवड यादी जाहीर करून मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबीत याचिकेला अधिन राहून नियुक्त्या मिळणे. शिक्षक पदाकरीता कागदपत्र तपासणी झालेली असतांना उमेदवारांना नियुक्ती आदेश अद्यापिही न मिळणे, कृषीसेवक पदाकरीता परीक्षा पार पडली असतांना व सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर झालेली असतांना देखील पेसा क्षेत्रातील अंतिम निवड यादी अजूनही जाहीर न करणे, तलाठी व वनरक्षक पदासाठी पेसा क्षेत्र वगळून उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली असून, मात्र अद्याप पेसा क्षेत्रातील उमेदवारांचे निकाल न लावणे, बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी या पदासाठी उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या होत्या. मात्र सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ६ मार्च २०२४ चे आदेशान्वये नियुक्त्या व नेमणूक केलेल्या उमेदवारांना पदावर हजर न करणे बाबत दिलेले आदेश, जिल्हा परिषदांतर्गत ग्रामसेवक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका या पदांसाठी लेखी परिक्षा सुरू करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला असून त्यात पेसा उमेदवारांना लेखी परिक्षेपासून वंचित ठेवणे, परिणामी पेसा उमेदवारांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण याबाबत शासनाचे लक्ष घालून उपरोक्त पेसा क्षेत्रातील १७ संवर्गापैकी परिक्षा झालेल्या संवर्गाचे अंतिम निवड यादी जाहीर करून मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबीत याचिकेला अधिन राहून नियुक्त्या देणे बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

---

मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मा. राज्यपाल महोदयांनी भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या परि. ५ च्या उप-परि.(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीतील शिफारस क्र. ३४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्रातील) अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्याबाबत दि. २९.०८.२०१९ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी या विभागाने दि. ०१.०२.२०२३ च्या शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

दि. २९.०८.२०१९ रोजीची अधिसूचना व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेला दि. ०१.०२.२०२३ चा शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकास बिगर आदिवासी आरक्षण हक्क बचाव संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २५४८/२०२३ (IA No.14595/2023) द्वारे आव्हान दिले होते. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. २७.०९.२०२३ रोजीच्या न्याय निर्णयान्वये उपरोक्त याचिका त्यांच्या अधिकार क्षेत्रातील बाब नसल्याचे नमूद करून खारिज केली व या प्रकरणी याचिकाकर्त्यांना मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात अपील करण्याची मुभा देण्यात आली आहे.

तद्नंतर, याप्रकरणी सामाजिक विकास प्रबोधिनी या संस्थेने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ द्वारे आव्हान दिलेले आहे. याप्रकरणी राज्य शासनाने शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात दि. १३.१०.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान शासनातर्फे मा. महाधिवक्ता यांनी शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना पेसा क्षेत्रातील पदभरतीच्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या पुढील निर्देशापर्यंत पेसा क्षेत्रातील कोणत्याही पदांबाबतच्या नियुक्तीची कार्यवाही करणार नाही, असे मा. न्यायालयास आश्वासित केले. त्यानुषंगाने या विभागाने दि.२०.१०.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत पेसा क्षेत्रातील विहित करण्यात आलेल्या १७ संवर्गात पदभरतीच्या अनुषंगाने निवडप्रक्रिया/नियुक्तीसंदर्भात या विभागाच्या सहमतीशिवाय कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये अशा सूचना सर्व संबंधित विभागांना देण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी दि. ५ ऑगस्ट, २०२४ रोजी होणार आहे. या विभागाच्या दि. १९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये श्री सिध्दार्थ धर्माधिकारी, सरकारी वकील महाराष्ट्र शासन यांना पेसा क्षेत्रातील शिक्षक, सहाय्यकारी परिचारिका व प्रसविका आणि बहुउद्देशिय आरोग्य सेवक या संवर्गातील पदभरती करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात Interim Application दाखल करून त्यांच्या नियुक्तीसाठी शिक्षणावर/आरोग्यसेवेवर विपरीत परिणाम होऊ नये यास्तव मा. न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

पेसा क्षेत्रांतर्गत शिक्षक संवर्गातील अनुसूचित जमातीची सद्यस्थितीत एकूण ४५०६ रिक्त असलेल्या पदांपैकी ८० टक्के पदे म्हणजेच ३६०५ पदे भरण्यास परवानगी आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरण निकाली लागल्यानंतर त्यांना नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही शालेय शिक्षण विभागाकडून करण्यात येईल.

एच-६४०-१३ग

दि. २९.०८.२०१९ रोजीची अधिसूचना व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेला दि. ०१.०२.२०२३ चा शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकास बिगर आदिवासी आरक्षण हक्क बचाव संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २५४८/२०२३ (IA No.14595/2023) द्वारे आव्हान दिले होते. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. २७.०९.२०२३ रोजीच्या न्याय निर्णयान्वये उपरोक्त याचिका त्यांच्या अधिकार क्षेत्रातील बाब नसल्याचे नमूद करून खारिज केली व या प्रकरणी याचिकाकर्त्यांना मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात अपील करण्याची मुभा देण्यात आली आहे.

तद्नंतर, याप्रकरणी सामाजिक विकास प्रबोधिनी या संस्थेने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ द्वारे आव्हान दिलेले आहे. याप्रकरणी राज्य शासनाने शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात दि. १३.१०.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान शासनातर्फे मा. महाधिवक्ता यांनी शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना पेसा क्षेत्रातील पदभरतीच्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या पुढील निर्देशापर्यंत पेसा क्षेत्रातील कोणत्याही पदांबाबतच्या नियुक्तीची कार्यवाही करणार नाही, असे मा. न्यायालयास आश्वासित केले. त्यानुषंगाने या विभागाने दि.२०.१०.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत पेसा क्षेत्रातील विहित करण्यात आलेल्या १७ संवर्गात पदभरतीच्या अनुषंगाने निवडप्रक्रिया/नियुक्तीसंदर्भात या विभागाच्या सहमतीशिवाय कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये अशा सूचना सर्व संबंधित विभागांना देण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी दि. ५ ऑगस्ट, २०२४ रोजी होणार आहे. या विभागाच्या दि. १९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये श्री सिध्दार्थ धर्माधिकारी, सरकारी वकील महाराष्ट्र शासन यांना पेसा क्षेत्रातील शिक्षक, सहाय्यकारी परिचारिका व प्रसविका आणि बहुउद्देशिय आरोग्य सेवक या संवर्गातील पदभरती करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात Interim Application दाखल करून त्यांच्या नियुक्तीसाठी शिक्षणावर/आरोग्यसेवेवर विपरीत परिणाम होऊ नये यास्तव मा. न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

पेसा क्षेत्रांतर्गत शिक्षक संवर्गातील अनुसूचित जमातीची सद्यस्थितीत एकूण ४५०६ रिक्त असलेल्या पदांपैकी ८० टक्के पदे म्हणजेच ३६०५ पदे भरण्यास परवानगी आहे. मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरण निकाली लागल्यानंतर त्यांना नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही शालेय शिक्षण विभागाकडून करण्यात येईल.

(उचा-६४०-१३ग

सामान्य प्रशासन विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१३२९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री शिरीषकुमार नाईक, ॲड. के.सी. पाडवी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १३२९ पुढीलप्रमाणे आहे:-

" पेसा क्षेत्रातील १६ संवर्गापैकी परिक्षा झालेल्या संवर्गाची अंतिम निवड यादी जाहीर करून मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबीत याचिकेला अधिन राहून नियुक्त्या मिळणे. शिक्षक पदाकरीता कागदपत्र तपासणी झालेली असतांना उमेदवारांना नियुक्ती आदेश अद्यापिही न मिळणे, कृषीसेवक पदाकरीता परीक्षा पार पडली असतांना व सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर झालेली असतांना देखील पेसा क्षेत्रातील अंतिम निवड यादी अजूनही जाहीर न करणे, तलाठी व वनरक्षक पदासाठी पेसा क्षेत्र वगळून उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली असून, मात्र अद्याप पेसा क्षेत्रातील उमेदवारांचे निकाल न लावणे, बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी या पदासाठी उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या होत्या. मात्र सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ६ मार्च २०२४ चे आदेशान्वये नियुक्त्या व नेमणूक केलेल्या उमेदवारांना पदावर हजर न करणे बाबत दिलेले आदेश, जिल्हा परिषदांतर्गत ग्रामसेवक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका या पदांसाठी लेखी परिक्षा सुरू करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला असून त्यात पेसा उमेदवारांना लेखी परिक्षेपासून वंचित ठेवणे, परिणामी पेसा उमेदवारांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण याबाबत शासनाचे लक्ष घालून उपरोक्त पेसा क्षेत्रातील १७ संवर्गापैकी परिक्षा झालेल्या संवर्गाचे अंतिम निवड यादी जाहीर करून मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबीत याचिकेला अधिन राहून नियुक्त्या देणे बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

---

मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मा. राज्यपाल महोदयांनी भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या परि. ५ च्या उप-परि.(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीतील शिफारस क्र. ३४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्रातील) अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्याबाबत दि. २९.०८.२०१९ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी या विभागाने दि. ०१.०२.२०२३ च्या शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

बिगर पेसा क्षेत्रातील कृषी सेवक या संवर्गाची एकूण १८२१ पदांकरिता परीक्षा घेण्यात आली असून, सदर परीक्षेचा निकाल विभागीय कृषी सहसंचालकांना उपलब्ध करून दिलेला आहे. कृषी सहसंचालक, कोल्हापूर व लातूर यांनी नियुक्ती आदेश निर्गमित केलेले आहेत. तसेच, कृषी सहसंचालक पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती नागपूर, ठाणे व नाशिक या विभागात नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे. तथापि, पेसा क्षेत्रातील पदभरतीवर निर्बंध असल्यामुळे कृषी सेवक पदाची परीक्षा झालेली नाही.

तलाठी व वनरक्षक या संवर्गांची परीक्षा झालेली असून, पेसा क्षेत्रातील पदभरतीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने पेसा क्षेत्र वगळून बिगर पेसा क्षेत्रातील उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही महसूल व वन विभागाकडून सुरू आहे.

पेसा क्षेत्रातील आरोग्यसेवक (बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी) संवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणामुळे हजर न करण्याबाबत आरोग्य विभागाने त्यांच्या दि.०६.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. जिल्हा परिषदेंतर्गत बिगर पेसा क्षेत्रातील ग्रामसेवक, आरोग्यसेवक व आरोग्य सेविका या पदासाठी जाहिरात प्रसिध्द झालेली असून, परीक्षेचे वेळापत्रक घोषित करण्यात आलेले आहे. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणामुळे पेसा क्षेत्रातील जाहिरातीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागाकडून करण्यात आलेली नाही.

********************************************

एच ६४०-२

महाराष्ट्र विधानसभा

सामान्य प्रशासन विभाग लक्षवेधी सूचना क्र. १८९२

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम क्र.१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १८९२ पुढीलप्रमाणे आहे :-**

" राज्यातील शासकीय निमशासकीय लिपिक संवर्गीय हक्क परिषदेने केलेल्या मागणीनुसार राज्यातील लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन समान पदोन्नतीचे टप्पे यासंदर्भात पदोन्नतीचे स्तर निश्चित करण्यासाठी गठित केलेल्या समितीने दिलेल्या निर्देशानुसार सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २३ मे, २०२२ च्या शासन परिपत्रकानुसार सर्व विभागांनी तात्काळ अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. तथापि अद्याप याची अंमलबजावणी झाली नाही. याकरिता मुख्यमंत्री महोदयांनी मुख्य सचिवांना सर्व विभागाच्या सचिवांची बैठक घेऊन तातडीने कार्यवाही करण्याचे दोन वेळा लेखी निर्देश दिले आहेत. तसेच पदोन्नतीच्या टप्प्याबाबत जी.प लिपिक सवर्गिय कर्मचाऱ्यांचा ग्रामविकास विभागाने सादर केलेला प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाने सयुक्तिक कारण नसतांना नाकारला, वास्तविक सदर कर्मचारी निमशासकीय कर्मचारी असताना तो नाकारणे उचित नाही, सदर समिती राज्यातील शासकीय निमशासकीय लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी स्थापन केलेली असल्यामुळे तो नाकारण्यात येऊ नये. तसेच राज्यातील १० लाख लिपीक संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रामुख्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये लिपिक तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विद्यापीठे नगरपालिका महानगरपालिका लीपिकाना शासकीय कर्माचाऱ्यांप्रमाने सेवांतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजना १०,२०,३० लागू करावी या मागणीसाठी व पदोन्नतीच्य टप्प्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी तातडीने होण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मुख्य मंत्री महोदय यांचे निवेदन

राज्य शासनाच्या विविध मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतर्गत असलेल्या शासकीय कार्यालयांमध्ये लिपिक या गट-क मधील सर्वात निम्न असलेल्या पदाच्या वरिष्ठ पदावरील पदोन्नतीच्या

साखळीचे स्तर वेगवेगळे आहेत. त्यामुळे लिपिक या पदावर नियुक्ती झाल्यानंतर वरिष्ठ पदावरील पदोन्नतीमध्ये कार्यालय निहाय एकसमानता राहत नसल्याची बाब निदर्शनास आली. या अनुषंगाने शासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या लिपिक या पदाकरीता पदोन्नतीचे एकसमान टप्पे निर्माण करण्याची मागणी लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत होती. या मागणीच्या अनुषंगाने अभ्यास करून शासनास अहवाल सादर करण्याकरीता अपर मुख्य सचिव, लेखा व कोषागारे, वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आले होते. सदर समितीने गट-क मधील पदसंख्या/पदोन्नतीचे स्तर कमी करण्याच्या दृष्टीने शासनास अहवाल सादर करून काही शिफारशी केल्या.

सदर समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन राज्य शासनाने शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २३.०५.२०२२ अन्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना पुढीलप्रमाणे सूचना दिल्या :-

१. सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयांतील गट-क मधील विविध संवर्गांचा आढावा घेऊन, या वेगवेगळ्या संवर्गांपैकी काही संवर्ग कमी करण्याचा विचार करावा. जेणेकरून गट-क मधील पदोन्नतीचे स्तर कमी होतील.
२. सर्व प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे आढावा घेऊन त्याबाबतचा सुयोग्य प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावा.
३. सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर पदांचा आकृतीबंध सुधारित करण्याकरीता वित्त विभागाची मान्यता घेऊन तसे आदेश निर्गमित करावेत.

वरील सूचनांची अंमलबजावणी तात्काळ करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने पुन्हा दि. २१.०४.२०२३ च्या पत्राद्वारे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविले आहे.

राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाकडून राज्यातील जिल्हा परिषदांमधील लिपिक संवर्गाच्या पदोन्नतीचे स्तर कमी करण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झाला होता. तथापि, दि. २३.०५.२०२२ च्या परिपत्रकानुसार केवळ शासकीय कार्यालयांतील गट-क मधील पदोन्नतीचे स्तर कमी करण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाने तपासणे अभिप्रेत आहे. राज्यातील जिल्हा परिषदांमधील लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम २७४ नुसार अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा

साखळीचे स्तर वेगवेगळे आहेत. त्यामुळे लिपिक या पदावर नियुक्ती झाल्यानंतर वरिष्ठ पदावरील पदोन्नतीमध्ये कार्यालय निहाय एकसमानता राहत नसल्याची बाब निदर्शनास आली. या अनुषंगाने शासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या लिपिक या पदाकरीता पदोन्नतीचे एकसमान टप्पे निर्माण करण्याची मागणी लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत होती. या मागणीच्या अनुषंगाने अभ्यास करून शासनास अहवाल सादर करण्याकरीता अपर मुख्य सचिव, लेखा व कोषागारे, वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आले होते. सदर समितीने गट-क मधील पदसंख्या/पदोन्नतीचे स्तर कमी करण्याच्या दृष्टीने शासनास अहवाल सादर करून काही शिफारशी केल्या.

सदर समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन राज्य शासनाने शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २३.०५.२०२२ अन्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना पुढीलप्रमाणे सूचना दिल्या :-

१. सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयांतील गट-क मधील विविध संवर्गांचा आढावा घेऊन, या वेगवेगळ्या संवर्गांपैकी काही संवर्ग कमी करण्याचा विचार करावा. जेणेकरून गट-क मधील पदोन्नतीचे स्तर कमी होतील.
२. सर्व प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे आढावा घेऊन त्याबाबतचा सुयोग्य प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावा.
३. सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर पदांचा आकृतीबंध सुधारित करण्याकरीता वित्त विभागाची मान्यता घेऊन तसे आदेश निर्गमित करावेत.

वरील सूचनांची अंमलबजावणी तात्काळ करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने पुन्हा दि. २१.०४.२०२३ च्या पत्राद्वारे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविले आहे.

राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाकडून राज्यातील जिल्हा परिषदांमधील लिपिक संवर्गाच्या पदोन्नतीचे स्तर कमी करण्याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झाला होता. तथापि, दि. २३.०५.२०२२ च्या परिपत्रकानुसार केवळ शासकीय कार्यालयांतील गट-क मधील पदोन्नतीचे स्तर कमी करण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाने तपासणे अभिप्रेत आहे. राज्यातील जिल्हा परिषदांमधील लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम २७४ नुसार अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा

महाराष्ट्र विधानसभा

सामान्य प्रशासन विभाग लक्षवेधी सूचना क्र. १८९२

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम क्र.१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १८९२ पुढीलप्रमाणे आहे :-**

" राज्यातील शासकीय निमशासकीय लिपिक संवर्गीय हक्क परिषदेने केलेल्या मागणीनुसार राज्यातील लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन समान पदोन्नतीचे टप्पे यासंदर्भात पदोन्नतीचे स्तर निश्चित करण्यासाठी गठित केलेल्या समितीने दिलेल्या निर्देशानुसार सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २३ मे, २०२२ च्या शासन परिपत्रकानुसार सर्व विभागांनी तात्काळ अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. तथापि अद्याप याची अंमलबजावणी झाली नाही. याकरिता मुख्यमंत्री महोदयांनी मुख्य सचिवांना सर्व विभागाच्या सचिवांची बैठक घेऊन तातडीने कार्यवाही करण्याचे दोन वेळा लेखी निर्देश दिले आहेत. तसेच पदोन्नतीच्या टप्प्याबाबत जी.प लिपिक सवर्गिय कर्मचाऱ्यांचा ग्रामविकास विभागाने सादर केलेला प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाने सयुक्तिक कारण नसतांना नाकारला, वास्तविक सदर कर्मचारी निमशासकीय कर्मचारी असताना तो नाकारणे उचित नाही, सदर समिती राज्यातील शासकीय निमशासकीय लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी स्थापन केलेली असल्यामुळे तो नाकारण्यात येऊ नये. तसेच राज्यातील १० लाख लिपीक संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रामुख्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये लिपिक तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विद्यापीठे नगरपालिका महानगरपालिका लीपिकाना शासकीय कर्माचाऱ्यांप्रमाने सेवांतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजना १०,२०,३० लागू करावी या मागणीसाठी व पदोन्नतीच्य टप्प्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी तातडीने होण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मुख्य मंत्री महोदय यांचे निवेदन

राज्य शासनाच्या विविध मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतर्गत असलेल्या शासकीय कार्यालयांमध्ये लिपिक या गट-क मधील सर्वात निम्न असलेल्या पदाच्या वरिष्ठ पदावरील पदोन्नतीच्या

सेवा ( सेवाप्रवेश नियम ) १९६७ व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार करण्यात येते. साहजिकच जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या सेवांचे नियमन सदर अधिनियम व सेवाप्रवेश नियमानुसार होत असल्याने ते शासकीय कर्मचारी नसून जिल्हापरिषदेच्या अखत्यारीतील निमशासकीय कर्मचारी आहेत. त्यामुळे ग्राम विकास विभागास जर सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २३.०५.२०२२ च्या शासन परित्रकानुसार कार्यवाही करावयाची असेल, तर त्या विभागाने तसा जाणीवपूर्वक निर्णय घेऊन जिल्हा परिषदेतील गट-क कर्मचाऱ्याचे पदोन्नतीचे स्तर कमी करण्याबाबत त्यांच्या स्तरावरून कार्यवाही करणे आवश्यक आहे.

राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ ने केलेल्या शिफारशीनुसार वित्त विभागाने त्यांच्या दि. ०१.०१.२०१९ च्या शासन निर्णयाद्वारे राज्य शासकीय आणि जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, तसेच १०० % अनुदानित संस्था, कृषि विद्यापीठे, बिगर कृषि विद्यापीठे, अनुदानित संस्थांमधील शिक्षकेतर कर्मचारी यांना तीन लाभांचे सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा तत्वत: निर्णय घेतला आहे. सदर योजना शासकीय शिक्षकेतर कर्मचारी व जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी यांना कशाप्रकारे लागू करावी, याबाबत वित्त विभागाने दि.०२.०५.२०१९ च्या शासन निर्णयाद्वारे सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत. १०० % अनुदानित संस्था व कृषि/बिगर कृषि विद्यापीठांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदर योजना प्रत्यक्षात कशाप्रकारे लागू करावी, याबाबतचा निर्णय घेण्याकरीता वित्त विभागाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून माहिती व अनुषंगिक कागदपत्र मागविले आहेत.

---

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१८९

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**मा.डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.चेतन तुपे, श्री.मंगेश चव्हाण वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८९ खालीलप्रमाणे आहे.:-**

**"जळगांव येथून वसईकडे जाणाऱ्या एस.टी बसचा दि.३० एप्रिल,२०२४ रोजी वा त्यासुमारास नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे झालेला भीषण अपघात, या अपघातात खलिदा गुलाम हुसेन, साई संजय देवरे, बळीराम सोनू अहिरे, सुरेश तुकाराम सावंत व बसचे वाहक विनोद शिंदे यांचा झालेला दुर्देवी मृत्यू, या अपघातात १५ व्यक्ती जबर जखमी झालेल्या असून त्यांचेवर विविध रुग्णालयात उपचार सुरु असणे, या अपघाताची चौकशी करुन या अपघातात मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याची व जखमींना आर्थिक मदत करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## निवेदन

### {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री}

रा.प.वसई आगार (पालघर विभाग) दिनांक ३०.०४.२०२४ रोजी बस क्र.एम एच १४ केक्यु ३६३१ ही बस जळगाव ते वसई मार्गावर धावत असताना अहीरे वस्ती, ग्रीन व्हॅली हॉटेल चांदवड येथे सुमारे सकाळी ०९.३० ते ९.४५ वाजता आली असता सदर बस पुढे चालणाऱ्या मालवाहतूक ट्रक क्र. OD-०५-Z००४५ ला ओव्हरटेक करीत असताना रा.प.बस मालवाहतूक ट्रकच्या मागील भागास वाहक बाजुने धडकल्याने प्राणांतिक स्वरुपाचा अपघात घडला असुन, अपघातामध्ये रा.प.बसमधील ०४ रा.प.प्रवासी व कामगिरीवरील ०१ वाहक असे एकूण ०५ व्यक्ती मृत पावले आहेत. तसेच ४० रा.प.प्रवासी व कामगिरीवरील ०१ रा.प.बस चालक असे एकूण ४१ व्यक्ती जखमी झाले आहेत. ४० रा.प.प्रवाशांपैकी ०३ प्रवासी अतिगंभीर जखमी, १४ प्रवासी गंभीर जखमी, ११ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

रा.प महामंडळाकडुन अपघातात मृत पावलेल्या ०४ प्रवाशांच्या वारसांना प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे एकूण रु.४०,०००/- आर्थिक तात्कालिक मदत देण्यात आली असुन अंतिम नुकसान भरपाई मागणी करिता पी फॉर्म देण्यात आलेले आहेत.अपघातात मृत पावलेले रा.प.वाहक श्री.विनोद शिंदे यांचे वारसांना रु.५०००/-

आर्थिक तात्कालिक मदत देण्यात आली आहे. तसेच त्यांचे वारसांना श्रमिक नुकसान भरपाई कायदा-१९२३ अन्वये रु.१४,०६,७५०/- (रुपये चौदा लाख सहा हजार सातशे पन्नास) इतकी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच अपघातात जखमी झालेल्या ४० प्रवाशांपैकी १२ व्यक्ती परस्पर निघुन गेल्याने उर्वरित २८ प्रवाशांना एकूण १९०००/- इतकी आर्थिक तात्कालिक मदत देण्यात आली असुन अंतिम नुकसान भरपाई मागणी करिता पी फॉर्म देण्यात आलेले असून, तसेच ०३ अतिगंभीर जखमी रा.प.प्रवाशांपैकी श्रीमती.वैशाली विश्वनाथ अहीरे,यांना नाशिक येथील अपोलो हॉस्पीटल,श्री.संजय दामु देवरे,यांना सह्याद्री हॉस्पीटल व श्री.राजेश मगनराव वाघ यांना सदगुरु हॉस्पीटल येथे वैद्यकीय उपचारार्थ दाखल करण्यात आले. सदर ०३ जखमी प्रवाशांवर केलेल्या वैद्यकीय उपचाराच्या बिलापोटी रा.प.महामंडळाकडुन अनुक्रमे रु.८,००,०००/- ,रु.२१,०८,८०१/- व रु.९,२०,०००/-अशी एकूण रक्कम रु.३८,२८,८०१/- (रुपये अडतीस लाख अठ्ठावीस हजार आठशे एक) संबंधित हॉस्पीटल यांना अदा करण्यात आली आहे. सदर ०३ जखमी प्रवाशांना उपचाराअंती घरी सोडण्यात आले आहे. त्यांचे उपचाराचा संपुर्ण खर्च रा.प.महामंडळाकडुन करण्यात आलेला आहे.

रा.प.खात्यामार्फत तसेच पोलीस विभागाकडुन अपघाताची चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये या अपघातास रा.प.बस चालक श्री.शैलेश शिवाजी सुर्यवंशी,बिल्ला क्र.८८१ हे जबाबदार आढळुन आले आहेत. अपघातास जबाबदार चालक यांचेवर रा.प.खातेनिहाय प्रशासकीय कारवाई सुरु असुन निलंबन आदेश क्र.०७/२०२४ नुसार त्यांचे निलंबन करण्यात आलेले आहे.

या अपघाताचा पंचनामा चांदवड पोलिस स्टेशन,नाशिक ग्रामीण यांनी केला असुन रा.प.बस चालक यांचे विरोधात प्रथम खबर अहवाल क्र.०१७७,दि.३०.०४.२०२४ अन्वये भां.दं.वि.कलम ३०४,२७९, ३३७,३३८,४२७ व महाराष्ट्र मोटार वाहन कायदा-१९८९ नुसार कलम १८४ नुसार सदर बाबतीत पुढील कार्यवाही सुरु आहे.

******

आर्थिक तात्कालिक मदत देण्यात आली आहे. तसेच त्यांचे वारसांना श्रमिक नुकसान भरपाई कायदा-१९२३ अन्वये रु.१४,०६,७५०/- (रुपये चौदा लाख सहा हजार सातशे पन्नास) इतकी नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच अपघातात जखमी झालेल्या ४० प्रवाशांपैकी १२ व्यक्ती परस्पर निघुन गेल्याने उर्वरित २८ प्रवाशांना एकूण १९०००/- इतकी आर्थिक तात्कालिक मदत देण्यात आली असुन अंतिम नुकसान भरपाई मागणी करिता पी फॉर्म देण्यात आलेले असून, तसेच ०३ अतिगंभीर जखमी रा.प.प्रवाशांपैकी श्रीमती.वैशाली विश्वनाथ अहीरे,यांना नाशिक येथील अपोलो हॉस्पीटल,श्री.संजय दामु देवरे,यांना सह्याद्री हॉस्पीटल व श्री.राजेश मगनराव वाघ यांना सदगुरु हॉस्पीटल येथे वैद्यकीय उपचारार्थ दाखल करण्यात आले. सदर ०३ जखमी प्रवाशांवर केलेल्या वैद्यकीय उपचाराच्या बिलापोटी रा.प.महामंडळाकडुन अनुक्रमे रु.८,००,०००/- ,रु.२१,०८,८०१/- व रु.९,२०,०००/-अशी एकूण रक्कम रु.३८,२८,८०१/- (रुपये अडतीस लाख अठ्ठावीस हजार आठशे एक) संबंधित हॉस्पीटल यांना अदा करण्यात आली आहे. सदर ०३ जखमी प्रवाशांना उपचाराअंती घरी सोडण्यात आले आहे. त्यांचे उपचाराचा संपुर्ण खर्च रा.प.महामंडळाकडुन करण्यात आलेला आहे.

रा.प.खात्यामार्फत तसेच पोलीस विभागाकडुन अपघाताची चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये या अपघातास रा.प.बस चालक श्री.शैलेश शिवाजी सुर्यवंशी,बिल्ला क्र.८८१ हे जबाबदार आढळुन आले आहेत. अपघातास जबाबदार चालक यांचेवर रा.प.खातेनिहाय प्रशासकीय कारवाई सुरु असुन निलंबन आदेश क्र.०७/२०२४ नुसार त्यांचे निलंबन करण्यात आलेले आहे.

या अपघाताचा पंचनामा चांदवड पोलिस स्टेशन,नाशिक ग्रामीण यांनी केला असुन रा.प.बस चालक यांचे विरोधात प्रथम खबर अहवाल क्र.०१७७,दि.३०.०४.२०२४ अन्वये भां.दं.वि.कलम ३०४,२७९, ३३७,३३८,४२७ व महाराष्ट्र मोटार वाहन कायदा-१९८९ नुसार कलम १८४ नुसार सदर बाबतीत पुढील कार्यवाही सुरु आहे.

******

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१८९

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**मा.डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.चेतन तुपे, श्री.मंगेश चव्हाण वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८९ खालीलप्रमाणे आहे.:-**

**"जळगांव येथून वसईकडे जाणाऱ्या एस.टी बसचा दि.३० एप्रिल,२०२४ रोजी वा त्यासुमारास नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे झालेला भीषण अपघात, या अपघातात खलिदा गुलाम हुसेन, साई संजय देवरे, बळीराम सोनू अहिरे, सुरेश तुकाराम सावंत व बसचे वाहक विनोद शिंदे यांचा झालेला दुर्देवी मृत्यू, या अपघातात १५ व्यक्ती जबर जखमी झालेल्या असून त्यांचेवर विविध रुग्णालयात उपचार सुरु असणे, या अपघाताची चौकशी करुन या अपघातात मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याची व जखमींना आर्थिक मदत करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## निवेदन

### {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री}

रा.प.वसई आगार (पालघर विभाग) दिनांक ३०.०४.२०२४ रोजी बस क्र.एम एच १४ केक्यु ३६३१ ही बस जळगाव ते वसई मार्गावर धावत असताना अहीरे वस्ती, ग्रीन व्हॅली हॉटेल चांदवड येथे सुमारे सकाळी ०९.३० ते ९.४५ वाजता आली असता सदर बस पुढे चालणाऱ्या मालवाहतूक ट्रक क्र. OD-०५-Z००४५ ला ओव्हरटेक करीत असताना रा.प.बस मालवाहतूक ट्रकच्यां मागील भागास वाहक बाजुने धडकल्याने प्राणांतिक स्वरुपाचा अपघात घडला असुन, अपघातामध्ये रा.प.बसमधील ०४ रा.प.प्रवासी व कामगिरीवरील ०१ वाहक असे एकूण ०५ व्यक्ती मृत पावले आहेत. तसेच ४० रा.प.प्रवासी व कामगिरीवरील ०१ रा.प.बस चालक असे एकूण ४१ व्यक्ती जखमी झाले आहेत. ४० रा.प.प्रवाशांपैकी ०३ प्रवासी अतिगंभीर जखमी, १४ प्रवासी गंभीर जखमी, ११ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

रा.प महामंडळाकडुन अपघातात मृत पावलेल्या ०४ प्रवाशांच्या वारसांना प्रत्येकी रु.१०,०००/- प्रमाणे एकूण रु.४०,०००/- आर्थिक तात्कालिक मदत देण्यात आली असुन अंतिम नुकसान भरपाई मागणी करिता पी फॉर्म देण्यात आलेले आहेत.अपघातात मृत पावलेले रा.प.वाहक श्री.विनोद शिंदे यांचे वारसांना रु.५०००/-

<u>गृह (परिवहन) विभाग</u>
<u>लक्षवेधी सूचना क्र.८२०</u>

## <u>महाराष्ट्र विधानसभा</u>

## सन-२०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**मा.श्री.अमिन पटेल,श्री.बाळासाहेब थोरात,श्री.अस्लम शेख,श्री.नानाभाऊ पटोले, श्रीमती श्र्वेता महाले, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.८२० खालीलप्रमाणे आहे.:-**

**"राज्यात एसटी महामंडळाच्या ताफ्यात असलेल्या जुन्या गाड्या वारंवार काम निघत असणे, गाड्या चालवताना चालक हैराण होणे परिणमी प्रवासी व कर्मचारी या दोघांनाही त्रास सहन करावा लागत असणे, दहा हजारांहून अधिक गाड्या या किलोमीटर पूर्ण झालेल्या व दहा वर्षे पुर्ण झालेल्या असणे, त्यामुळे एसटीच्या स्वमालकीच्या २ हजार २०० गाड्या खरेदी करण्याचा घोषणा शासनाकडून करण्यात येणे, त्यासाठी अर्थसंकल्पात ९१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, निविदा मंजूर केलेल्या कंपनीची वर्कऑर्डर शासन दरबारी प्रलंबित असणे, महामंडळाच्या ताफ्यात असलेल्या जुन्या गाडया वापरण्याची वेळ कर्मचारी व व्यवस्थापनेवर असल्याने तीव्र नाराजी असणे, शासनाचे याबाबत होत असलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे प्रवाशांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

### निवेदन

### {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री}

रा.प.महामंडळाच्या वाहन ताफ्यातील सर्व बसेसचे आगार कार्यशाळेमध्ये दैनिक, दशदिन व त्रैमासिक डेपो डॉकींग अशी प्रतिबंधात्मक देखभालीची कामे केली जातात. तसेच विभागीय कार्यशाळेमध्ये आरटीओ पासिंग, आरटीओ टाईप वर्क, पुन:स्थितीकरण अशी वाहन प्रतिबंधात्मक देखभालीची कामे केली जातात. या व्यतीरिक्त मध्यवर्ती कार्यशाळेमध्ये वाहनांची पुर्नबांधणी केली जाते. केंद्र शासनातर्फे शासकीय वाहनांची आयुमर्यादा १५ वर्षे इतकी ठेवण्यात आलेली आहे. महामंडळाने देखील १५ वर्षे पर्यंत वाहने वापरता यावी या अनुषंगाने वाहनांची प्रतिबंधात्मक देखभालीची कामे करुन घेण्याबाबत नियोजन केलेले आहे. महामंडळाच्या वाहनांचे ६.५ लाख कि.मी. व ६.५ वर्षे आयुर्मान पुर्ण झाल्यानंतर वाहनांचे एम.एस. धातुमध्ये पुर्नबांधणी करुन वाहन १५ वर्षे आयुर्मानापर्यंत वापरण्याचे नियोजन केलेले आहे.

रा.प. महामंडळाने २२०० तयार साधी वाहने खरेदी करण्याबाबत निविदा प्रसारीत केलेली होती. सदर निविदे अंतर्गत निविदेच्या अटी नुसार २४७५ तयार साधी वाहने खरेदी करण्यास शासनाकडुन मंजुरी मिळालेली आहे. सदर मंजुरीनुसार कंपनीला पत्र देऊन नमुना वाहन तयार करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. नमुना वाहन तयार झाल्यानंतर प्रत्यक्षात वाहनांची उपलब्धता होणार आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांच्या आधुनिकरणांतर्गत बांधकाम व इतर सुविधा ( कार्यक्रम ) भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान अंतर्गत रक्कम रु.२२६०.०० कोटी इतका नियतव्यय रा.प.महामंडळासाठी प्रस्तावित करण्यात आलेला होता. त्यापैकी रक्कम रु.९००.०० कोटी नविन वाहने खरेदीसाठी प्रस्तावित आहे.

******

रा.प. महामंडळाने २२०० तयार साधी वाहने खरेदी करण्याबाबत निविदा प्रसारीत केलेली होती. सदर निविदे अंतर्गत निविदेच्या अटी नुसार २४७५ तयार साधी वाहने खरेदी करण्यास शासनाकडुन मंजुरी मिळालेली आहे. सदर मंजुरीनुसार कंपनीला पत्र देऊन नमुना वाहन तयार करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. नमुना वाहन तयार झाल्यानंतर प्रत्यक्षात वाहनांची उपलब्धता होणार आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांच्या आधुनिकरणांतर्गत बांधकाम व इतर सुविधा ( कार्यक्रम ) भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान अंतर्गत रक्कम रु.२२६०.०० कोटी इतका नियतव्यय रा.प.महामंडळासाठी प्रस्तावित करण्यात आलेला होता. त्यापैकी रक्कम रु.९००.०० कोटी नविन वाहने खरेदीसाठी प्रस्तावित आहे.

******

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.८२०

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**मा.श्री.अमिन पटेल,श्री.बाळासाहेब थोरात,श्री.अस्लम शेख,श्री.नानाभाऊ पटोले, श्रीमती श्वेता महाले, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.८२० खालीलप्रमाणे आहे.:-**

**"राज्यात एसटी महामंडळाच्या ताफ्यात असलेल्या जुन्या गाड्या वारंवार काम निघत असणे, गाड्या चालवताना चालक हैराण होणे परिणमी प्रवासी व कर्मचारी या दोघांनाही त्रास सहन करावा लागत असणे, दहा हजारांहून अधिक गाड्या या किलोमीटर पूर्ण झालेल्या व दहा वर्षे पुर्ण झालेल्या असणे, त्यामुळे एसटीच्या स्वमालकीच्या २ हजार २०० गाड्या खरेदी करण्याचा घोषणा शासनाकडून करण्यात येणे, त्यासाठी अर्थसंकल्पात ९१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणे, निविदा मंजूर केलेल्या कंपनीची वर्कऑर्डर शासन दरबारी प्रलंबित असणे, महामंडळाच्या ताफ्यात असलेल्या जुन्या गाडया वापरण्याची वेळ कर्मचारी व व्यवस्थापनेवर असल्याने तीव्र नाराजी असणे, शासनाचे याबाबत होत असलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे प्रवाशांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## निवेदन

## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री}

रा.प.महामंडळाच्या वाहन ताफ्यातील सर्व बसेसचे आगार कार्यशाळेमध्ये दैनिक, दशदिन व त्रैमासिक डेपो डॉकींग अशी प्रतिबंधात्मक देखभालीची कामे केली जातात. तसेच विभागीय कार्यशाळेमध्ये आरटीओ पासिंग, आरटीओ टाईप वर्क, पुन:स्थितीकरण अशी वाहन प्रतिबंधात्मक देखभालीची कामे केली जातात. या व्यतीरिक्त मध्यवर्ती कार्यशाळेमध्ये वाहनांची पुर्नबांधणी केली जाते. केंद्र शासनातर्फे शासकीय वाहनांची आयुमर्यादा १५ वर्षे इतकी ठेवण्यात आलेली आहे. महामंडळाने देखील १५ वर्षे पर्यंत वाहने वापरता यावी या अनुषंगाने वाहनांची प्रतिबंधात्मक देखभालीची कामे करुन घेण्याबाबत नियोजन केलेले आहे. महामंडळाच्या वाहनांचे ६.५ लाख कि.मी. व ६.५ वर्षे आयुर्मान पुर्ण झाल्यानंतर वाहनांचे एम.एस. धातुमध्ये पुर्नबांधणी करुन वाहन १५ वर्षे आयुर्मानापर्यंत वापरण्याचे नियोजन केलेले आहे.

गृह (परिवहन) विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१६४५

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**मा.श्री.जयकुमार गोरे, ॲड.राहूल कुल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६४५ खालीलप्रमाणे आहे :-**

**"राप.महामंडळात शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या पटलावर असणाऱ्या केजीएमजी संस्थेची सन २०१५ च्या माहिती व तंत्रज्ञान महामंडळाच्या विभागाच्या प्रकल्पांसाठी निवड करणे. महामंडळात माहिती व तंत्रज्ञान स्वंतत्र विभाग असताना वाहतूक खात्याकडे या विभागाशी संबंधित कृ श्येड्यूलिंग व्हीटीएसटीपीए आयएससारखे करोडो रुपयांचे प्रकल्प हितसंबध जपण्यासाठी देणे. वाहतूक खात्याने केपीएमजी सल्लागारांची खाजगी कंपन्यांचे हितसंबंध लक्षात घेऊन निविदा तयार करणे. वाहतूक खात्याने व केपीएमजी सल्लागारानी निविदाकराचे हितसंबध जपण्यासाठी काय करणे. सदरचे दोन्ही प्रकल्पासाठी वाहतूक खात्याने सल्लागारापोटी प्रतिमहा लाखो रुपये देऊन महामंडळाचे करोडोचे नुकसान होणे. हे प्रकल्प सुमारे पाच वर्षे करार करुन सुध्दा अयशस्वी होणे. महामंडळाचे मनुष्यबळ/वेळ वाया जाणे. हाताळत असलेल्या सर्व प्रकल्पांची फलनिष्पत्ती शून्य असणे. वाहतूक खात्याचे यात सर्वप्रकल्प पूर्णत:अयशस्वी होऊनही वेळेत पूर्ण होत नाही. सल्लागारांनी कंपन्याविरोधात कोणतीही कारवाई सूचित न करणे व कंपन्यांना मोकाट सोडणे. वाहतूक अधिकाऱ्यांनी स्वत:चे हितसंबध जपण्यासाठी इलेक्ट्रिक बस खरेदी इत्यादी सारख्या नॉन आयटी प्रकल्पात केपीएमजी सल्लागारांचा सल्ला घेणे व त्या तज्ञ नसताना सुध्दा सल्ला देणे. यात राप महामंडळाची फसवणूक झाल्याचे सिध्द होणे. त्यासाठी संबंधित वाहतूक अधिकारी/केपीएम सल्लागार व संस्था हे जबाबदार असणे. महामंडळाच्या करोडो रुपयांची लूट केल्याप्रकरणी राप अधिकारी केपीएमजी संस्थावर गृहखात्यामार्फत चौकशीची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## निवेदन
## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री}

रा. प. महामंडळामध्ये विविध खाते/शाखांचे संगणकीकरण करण्याकरीता शासन निर्णय क्रमांक GAD-मातंस ०८[illegible]/४/२०२४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH) दिनांक ०१.०७.२०१४ नुसार शासन नियुक्त माहिती व तंत्रज्ञान सल्लागारांची सेवा घेणेबाबत रा.प. महामंडळाने मा. संचालक मंडळ ठराव क्र. २०१५:११:२१ दिनांक ०७.११.२०१५ अन्वये निर्णय घेतलेला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासन निर्णयानुसार शासन नियुक्त माहिती व तंत्रज्ञान सल्लागाराची सेवा घेण्याकरीता प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत

करण्यात आली. तदनंतर खाते प्रमुखांच्या बैठकीत ठरल्यानुसार दिनांक ०१.१२.२०१५ रोजी प्रकल्प अंमलबजावणी समिती मार्फत मे. केपीएमजी ॲडव्हाजरी सर्व्हीसेस लि. यांची रा.प. महामंडळातील माहिती व तंत्रज्ञान प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड करण्यात आली.

प्रकल्प अंमजबजावणी समितीने तत्कालीन शासन निर्णय नमूद असलेल्या कंपन्यांची सादरीकरणे घेऊन दि.०७/०१/२०१६ ते दि. ३०/०६/२०१८ या कालावधीकरिता मे. केपीएमजी यांची नियुक्ती केली व वेळोवेळी शासन निर्णय प्रसारित झाल्यानुसार मे. केपीएमजी यांना महामंडळातील प्रगत कामामुळे मुदतवाढ देण्यात आली. मे. केपीएमजी यांचा दि.३०/०६/२०१८ रोजी पर्यंतचा वाढीव कार्यकाळ संपल्यानंतर गठित समितीने नवीन शासन निर्णयानुसार (क्र. GAD/IT/०८०/४/२०१४-O/DIRECTORATE OF IT- DIT, dated २०/०३/२०१८) कंपन्यांची सादरीकरण घेऊन मे. केपीएमजी यांची माहे सप्टेंबर २०१८ मध्ये फेरनियुक्ती केली होती.

दि.०१/१२/२०१८ रोजी वाहतूक खात्यामध्ये कार्यान्वित करण्यात येणाऱ्या VTS (Vehicle Tracking System), स्मार्टकार्ड, Bus & Crew Scheduling या रा.प. महामंडळाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या प्रकल्पांसाठी वाहतूक खात्यास स्वतंत्र मे. केपीएमजी यांचा प्रतिनिधी उपलब्ध करुन देण्याबाबत वाहतूक खात्यामार्फत मे. केपीएमजी यांना कळविण्यात आले होते. सदर तीनही प्रकल्प रा.प. महामंडळाच्या दृष्टीने मोठी आर्थिक गुंतवणूक व दीर्घकाल मर्यादेची असल्याने सदर प्रकल्पांच्या सुरुवाती पासून ते शेवटपर्यंत संचलन, अंमलबजावणी व मूल्यमापन करणे आवश्यक असल्याने वाहतूक खात्यास स्वतंत्र मे. केपीएमजी (PMC) प्रतिनिधी उपलब्ध करुन मिळणेबाबत तत्कालीन उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेली आहे.

नियोजन व पणन खात्यास मे. केपीएमजी यांनी तयार केलेले निविदा प्रपत्र सादर केली असता, त्यामध्ये काही त्रुटी आढळल्याने वाहतुक खात्याने त्रुटींची पुर्तता केली आहे. सदर प्रकल्पाकरीता पुरवठादार संस्थेची नियुक्ती करण्यासाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियाअंती नियोजन व पणन खात्याने दि.०४/०९/२०१८ अन्वये यशस्वी निविदाकार म्हणून मे.कॉमव्हिजन इंडिया प्रा.लि.यांना निवडपत्र देण्यात आले. सदर नियुक्तीस मा. संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्र. २०१८:०९:०९ दि.२९.०९.२०१८ अन्वये सदर नियुक्तीस मंजूरी दिली आहे. दि.३०.११.२०१८ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

रा.प. महामंडळाच्या बसमध्ये व बसस्थानकांमध्ये व्हीटीएस प्रवासी माहिती कार्यप्रणाली कार्यान्वित करण्याकरिता वाहतूक खात्याने सुरुवात केली होती. सदर प्रकल्पाकरीता मे.केपीएमजी यांच्याकडुन निविदा प्रप्रत्र तयार करुन सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेवून मे.के.पी.एम.जी यांनी तयार केलेला निविदा प्रपत्राचा मसुदा नियोजन व पणन खात्यास पाठविण्यात आला व सदर प्रकल्पाकरीता निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत सुचित केले. त्यानुसार सदर प्रकल्पाकरिता मे. रोजमार्टा ॲटोटेक प्रा.लि. यांची नियुक्ती केली. सदर नियुक्तीस मा.संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्रमांक २०१७:११:१३, दि.०८.११.२०१७ अन्वये मंजूरी दिल्यानंतर दि.१६.११.२०१७ अन्वये लेटर ऑफ इनटेंट (LOI) दिले. दि.२८.१२.२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आला.

दि.०१/१२/२०१६ रोजी वाहतूक खात्यामार्फत संगणकीय प्रणालीद्वारे चालक/वाहक कर्तव्ये व वाहन नियते तयार करणेबाबत महामंडळ ठराव क्र. २०१८:०९:०९, दि. २९/०९/२०१८ अन्वये माहिती व तंत्रज्ञान

करण्यात आली. तदनंतर खाते प्रमुखांच्या बैठकीत ठरल्यानुसार दिनांक ०१.१२.२०१५ रोजी प्रकल्प अंमलबजावणी समिती मार्फत मे. केपीएमजी अॅडव्हाजरी सर्व्हीसेस लि. यांची रा.प. महामंडळातील माहिती व तंत्रज्ञान प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड करण्यात आली.

प्रकल्प अंमजबजावणी समितीने तत्कालीन शासन निर्णय नमूद असलेल्या कंपन्यांची सादरीकरणे घेऊन दि.०७/०१/२०१६ ते दि. ३०/०६/२०१८ या कालावधीकरिता मे. केपीएमजी यांची नियुक्ती केली व वेळोवेळी शासन निर्णय प्रसारित झाल्यानुसार मे. केपीएमजी यांना महामंडळातील प्रगत कामामुळे मुदतवाढ देण्यात आली. मे. केपीएमजी यांचा दि.३०/०६/२०१८ रोजी पर्यंतचा वाढीव कार्यकाळ संपल्यानंतर गठित समितीने नवीन शासन निर्णयानुसार (क्र. GAD/IT/०८०/४/२०१४-O/DIRECTORATE OF IT- DIT, dated २०/०३/२०१८) कंपन्यांची सादरीकरण घेऊन मे. केपीएमजी यांची माहे सप्टेंबर २०१८ मध्ये फेरनियुक्ती केली होती.

दि.०१/१२/२०१८ रोजी वाहतूक खात्यामध्ये कार्यान्वित करण्यात येणाऱ्या VTS (Vehicle Tracking System), स्मार्टकार्ड, Bus & Crew Scheduling या रा.प. महामंडळाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या प्रकल्पांसाठी वाहतूक खात्यास स्वतंत्र मे. केपीएमजी यांचा प्रतिनिधी उपलब्ध करुन देण्याबाबत वाहतूक खात्यामार्फत मे. केपीएमजी यांना कळविण्यात आले होते. सदर तीनही प्रकल्प रा.प. महामंडळाच्या दृष्टीने मोठी आर्थिक गुंतवणूक व दीर्घकाल मर्यादेची असल्याने सदर प्रकल्पांच्या सुरुवाती पासून ते शेवटपर्यंत संचलन, अंमलबजावणी व मूल्यमापन करणे आवश्यक असल्याने वाहतूक खात्यास स्वतंत्र मे. केपीएमजी (PMC) प्रतिनिधी उपलब्ध करुन मिळणेबाबत तत्कालीन उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेली आहे.

नियोजन व पणन खात्यास मे. केपीएमजी यांनी तयार केलेले निविदा प्रपत्र सादर केली असता, त्यामध्ये काही त्रुटी आढळल्याने वाहतुक खात्याने त्रुटींची पुर्तता केली आहे. सदर प्रकल्पाकरीता पुरवठादार संस्थेची नियुक्ती करण्यासाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियाअंती नियोजन व पणन खात्याने दि.०४/०९/२०१८ अन्वये यशस्वी निविदाकार म्हणून मे.कॉमव्हिजन इंडिया प्रा.लि.यांना निवडपत्र देण्यात आले. सदर नियुक्तीस मा. संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्र. २०१८:०९:०९ दि.२९.०९.२०१८ अन्वये सदर नियुक्तीस मंजूरी दिली आहे. दि.३०.११.२०१८ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

रा.प. महामंडळाच्या बसमध्ये व बसस्थानकांमध्ये व्हीटीएस प्रवासी माहिती कार्यप्रणाली कार्यान्वित करण्याकरिता वाहतूक खात्याने सुरुवात केली होती. सदर प्रकल्पाकरीता मे.केपीएमजी यांच्याकडुन निविदा प्रप्रत्र तयार करुन सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेवून मे.के.पी.एम.जी यांनी तयार केलेला निविदा प्रपत्राचा मसुदा नियोजन व पणन खात्यास पाठविण्यात आला व सदर प्रकल्पाकरीता निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत सुचित केले. त्यानुसार सदर प्रकल्पाकरिता मे. रोजमार्टा अॅटोटेक प्रा.लि. यांची नियुक्ती केली. सदर नियुक्तीस मा.संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्रमांक २०१७:११:१३, दि.०८.११.२०१७ अन्वये मंजूरी दिल्यानंतर दि.१६.११.२०१७ अन्वये लेटर ऑफ इनटेंट (LOI) दिले. दि.२८.१२.२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आला.

दि.०१/१२/२०१६ रोजी वाहतूक खात्यामार्फत संगणकीय प्रणालीद्वारे चालक/वाहक कर्तव्ये व वाहन नियते तयार करणेबाबत महामंडळ ठराव क्र. २०१८:०९:०९, दि. २९/०९/२०१८ अन्वये माहिती व तंत्रज्ञान

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१६४५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**मा.श्री.जयकुमार गोरे, ॲड.राहूल कुल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६४५ खालीलप्रमाणे आहे :-**

**"राप.महामंडळात शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या पटलावर असणाऱ्या केजीएमजी संस्थेची सन २०१५ च्या माहिती व तंत्रज्ञान महामंडळाच्या विभागाच्या प्रकल्पांसाठी निवड करणे. महामंडळात माहिती व तंत्रज्ञान स्वंतत्र विभाग असताना वाहतूक खात्याकडे या विभागाशी संबंधित कृ श्येड्यूलिंग व्हीटीएसटीपीए आयएससारखे करोडो रुपयांचे प्रकल्प हितसंबध जपण्यासाठी देणे. वाहतूक खात्याने केपीएमजी सल्लागारांची खाजगी कंपन्यांचे हितसंबंध लक्षात घेऊन निविदा तयार करणे. वाहतूक खात्याने व केपीएमजी सल्लागारानी निविदाकराचे हितसंबध जपण्यासाठी काय करणे. सदरचे दोन्ही प्रकल्पासाठी वाहतूक खात्याने सल्लागारापोटी प्रतिमहा लाखो रुपये देऊन महामंडळाचे करोडोचे नुकसान होणे. हे प्रकल्प सुमारे पाच वर्षे करार करुन सुध्दा अयशस्वी होणे. महामंडळाचे मनुष्यबळ/वेळ वाया जाणे. हाताळत असलेल्या सर्व प्रकल्पांची फलनिष्पत्ती शून्य असणे. वाहतूक खात्याचे यात सर्वप्रकल्प पूर्णत:अयशस्वी होऊनही वेळेत पूर्ण होत नाही. सल्लागारांनी कंपन्याविरोधात कोणतीही कारवाई सूचित न करणे व कंपन्यांना मोकाट सोडणे. वाहतूक अधिकाऱ्यांनी स्वत:चे हितसंबध जपण्यासाठी इलेक्ट्रिक बस खरेदी इत्यादी सारख्या नॉन आयटी प्रकल्पात केपीएमजी सल्लागारांचा सल्ला घेणे व त्या तज्ञ नसताना सुध्दा सल्ला देणे. यात राप महामंडळाची फसवणूक झाल्याचे सिध्द होणे. त्यासाठी संबंधित वाहतूक अधिकारी/केपीएम सल्लागार व संस्था हे जबाबदार असणे. महामंडळाच्या करोडो रुपयांची लूट केल्याप्रकरणी राप अधिकारी केपीएमजी संस्थावर गृहखात्यामार्फत चौकशीची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## निवेदन
## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री}

रा. प. महामंडळामध्ये विविध खाते/शाखांचे संगणकीकरण करण्याकरीता शासन निर्णय क्रमांक GAD-मातंस ०८३/४/२०२४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH) दिनांक ०१.०७.२०१४ नुसार शासन नियुक्त माहिती व तंत्रज्ञान सल्लागारांची सेवा घेणेबाबत रा.प. महामंडळाने मा. संचालक मंडळ ठराव क्र. २०१५:११:२१ दिनांक ०७.११.२०१५ अन्वये निर्णय घेतलेला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासन निर्णयानुसार शासन नियुक्त माहिती व तंत्रज्ञान सल्लागाराची सेवा घेण्याकरीता प्रकल्प अंमलबजावणी समिती गठीत

विभाग तसेच लेखा खाते यांनी अभिप्राय दिल्यानुसार व नियोजन व पणन खात्याने प्रस्तावित केल्यानुसार मे. कॉमव्हिजन इंडिया प्रा.लि. यांची प्राप्त सुधारित देकारानुसार रु.१४.५० कोटी + वस्तू व सेवा कर मिळून रु.१७.११ कोटी रक्कमेवर सेवा पुरवठादार म्हणून नियुक्तीकरण्यास मा. संचालक मंडळाने मान्यता दिली. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी वाहतूक खात्यामार्फत होणार असल्याने निवडपत्र व कार्यादेशानुसार पुढील सर्व बाबींची पूर्तता करण्याची कार्यवाही वाहतूक खात्यामार्फत करण्यात यावी यांस मा. संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

परंतू, मे. कॉमव्हिजन प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यास अपयशी झाल्याने वाहतूक खाते दि. २०/०९/२०२३ अन्वये निवड रद्द करण्यात आली होती. निवड रद्द केल्यानंतर मे. कॉमव्हिजन इंडिया प्रा. लि. यांचे विनंतीनुसार निवड रद्द मागे घेऊन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांना मुदतवाढ देण्यात आली होती. तद्नंतरही प्रकल्प पूर्ण करण्यात अपयशी झाल्याने मे. कॉमव्हिजन इंडिया प्रा. लि. यांची वाहतूक खाते दि. ११/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये तिसऱ्या वेळेस निवड रद्द करण्यात आली आहे. निवड रद्द केल्यामुळे मे. कॉमव्हिजन इंडिया प्रा. लि. यांना अद्यापर्यंत कोणतीही रक्कम अदाकरण्यात आलेली नाही.

दि. २०/०४/२०१७ रोजी रा.प. महामंडळसंचालक मंडळाच्या २८० व्या बैठकीमध्ये महामंडळ ठराव क्र. २०१७:०४:०२, दि. २०/०४/२०१७ अन्वये रा.प. महामंडळाच्या बसेसमध्ये व बसस्थानकांवर VTS आणि प्रवासी माहिती कार्यप्रणाली (Passenger Information System) कार्यान्वित करण्याकरिता संस्थेची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यास व सदर कार्यप्रणाली राबविण्याकरिता ५ वर्षे कालावधीसाठी एकूण रु.५०कोटी येणाऱ्या अपेक्षित खर्चास संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. यासाठी मे. केपीएमजी यांचेकडून विनंती प्रस्ताव पत्रिका तयार करुन घेण्यात आलेली आहे. VTS-PIS प्रकल्पाची कार्यप्रणाली कार्यान्वित करण्याबाबत सविस्तर बाब वाहतूक खात्यामार्फत संचालक मंडळासमोर सादर करण्यात आली होती व सदर कार्यप्रणालीस उपरोक्त महामंडळ ठरावान्वये मा. संचालक मंडळाने मान्यता दिली असल्यामुळे सदर प्रकल्प अंमलबजावणीमध्ये कोणतेही हितसंबंध जपण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच रा.प. महामंडळाच्या बसेसमध्ये व बस स्थानकांवर VTS-PIS बसविण्यासाठी संस्थेची निवड करणेसाठी मे. केपीएमजी यांनी सादर केलेल्या निविदा प्रपत्रास मंजूरीसाठी सादर टिपणीवर माहिती व तंत्रज्ञान खात्यानेसहमती दर्शविली आहे.

VTS-PIS प्रकल्पांतर्गत रा.प. महामंडळाच्या एकूण १६,९११ बसेसवर VTS Devices बसविण्यात आली असून एकूण ३६० रा.प. बस स्थानकांवर ५४१ प्रवाशी माहिती संच (PIS) बसविण्यात आलेले आहेत. या संपूर्ण प्रकल्पाचा नियंत्रण कक्ष रा.प. मध्यवर्ती कार्यालयामध्ये कार्यान्वित करण्यात आलेला असून संपूर्ण महामंडळाच्या वाहनांचे Tracking नियंत्रण कक्षातून केले जाते. या प्रकल्पासाठी आवश्यक संगणकसंच व इंटरनेट कनेक्शन सर्व आगारांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

त्रीसदस्यीय समितीसमोर महामंडळाने सादर केलेल्या पुनरुज्जीवन आराखड्यामध्ये वर्ष २०२६-२७ पर्यंत एकूण ५३०० ईलेक्ट्रिक वाहने जीसीसी तत्वावर घेण्याचे प्रस्तावित केले होते. सदर पुनरुज्जीवन आराखडयाचा समावेश उक्त समितीने मा. उच्च न्यायालयात सादर केलेल्या अहवालात केलेला होता. त्यापैकी १५० बसेस केंद्र शासनाच्या फेम-II अंतर्गत घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून उर्वरित ५१५० बसेस जीसीसी तत्वावर महामंडळाच्या ताफ्यात समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव मा. संचालक मंडळाच्या दि.

१८/११/२०२२ रोजी संपन्न झालेल्या ३०२ व्या बैठकीत सादर करण्यात आला. ५१५० ईलेक्ट्रिक बसेसच्या चालनाबाबत सविस्तर प्रस्ताव सुचना (RFP) मे. केपीएमजी यांनी तयार केली असून सदर प्रस्ताव सुचना निर्गमित करण्यास महामंडळ ठराव क्र. २०२२२:११:०३, दि. १८/११/२०२२ अन्वये संचालक मंडळाने मंजूरी दिलेली आहे.

रा.प. महामंडळ ५१५० ईलेक्ट्रिक बस जीसीसी तत्वावर घेण्याचा प्रकल्प हा अत्यंत महत्वकांक्षी प्रकल्प असून याबाबत निविदा प्रपत्र किंवा करारनामा तयार करण्याचा अनुभव वाहतूक खात्याकडे नसल्याने मे.केपीएमजी यांचेकडून तयार करुन घेण्यात आली आहे. ईलेक्ट्रिक बस खरेदीसारख्या नॉन आयटी प्रकल्पात मे. केपीएमजी सल्लागारांचा सल्ला घेण्यामध्ये महामंडळाची कोणतीही फसवणूक झालेली नाही.

******

१८/११/२०२२ रोजी संपन्न झालेल्या ३०२ व्या बैठकीत सादर करण्यात आला. ५१५० ईलेक्ट्रिक बसेसच्या चालनाबाबत सविस्तर प्रस्ताव सुचना (RFP) मे. केपीएमजी यांनी तयार केली असून सदर प्रस्ताव सुचना निर्गमित करण्यास महामंडळ ठराव क्र. २०२२२:११:०३, दि. १८/११/२०२२ अन्वये संचालक मंडळाने मंजूरी दिलेली आहे.

रा.प. महामंडळ ५१५० ईलेक्ट्रिक बस जीसीसी तत्वावर घेण्याचा प्रकल्प हा अत्यंत महत्वकांक्षी प्रकल्प असून याबाबत निविदा प्रपत्र किंवा करारनामा तयार करण्याचा अनुभव वाहतूक खात्याकडे नसल्याने मे.केपीएमजी यांचेकडून तयार करुन घेण्यात आली आहे. ईलेक्ट्रिक बस खरेदीसारख्या नॉन आयटी प्रकल्पात मे. केपीएमजी सल्लागारांचा सल्ला घेण्यामध्ये महामंडळाची कोणतीही फसवणूक झालेली नाही.

******

विभाग तसेच लेखा खाते यांनी अभिप्राय दिल्यानुसार व नियोजन व पणन खात्याने प्रस्तावित केल्यानुसार मे. कॉमव्हिजन इंडिया प्रा.लि. यांची प्राप्त सुधारित देकारानुसार रु.१४.५० कोटी + वस्तू व सेवा कर मिळून रु.१७.११ कोटी रक्कमेवर सेवा पुरवठादार म्हणून नियुक्तीकरण्यास मा. संचालक मंडळाने मान्यता दिली. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी वाहतूक खात्यामार्फत होणार असल्याने निवडपत्र व कार्यादेशानुसार पुढील सर्व बाबींची पूर्तता करण्याची कार्यवाही वाहतूक खात्यामार्फत करण्यात यावी यांस मा. संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

परंतु, मे. कॉमव्हिजन प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यास अपयशी झाल्याने वाहतूक खाते दि. २०/०९/२०२३ अन्वये निवड रद्द करण्यात आली होती. निवड रद्द केल्यानंतर मे. कॉमव्हिजन इंडिया प्रा. लि. यांचे विनंतीनुसार निवड रद्द मागे घेऊन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांना मुदतवाढ देण्यात आली होती. तद्नंतरही प्रकल्प पूर्ण करण्यात अपयशी झाल्याने मे. कॉमव्हिजन इंडिया प्रा. लि. यांची वाहतूक खाते दि. ११/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये तिसऱ्या वेळेस निवड रद्द करण्यात आली आहे. निवड रद्द केल्यामुळे मे. कॉमव्हिजन इंडिया प्रा. लि. यांना अद्यापर्यंत कोणतीही रक्कम अदाकरण्यात आलेली नाही.

दि. २०/०४/२०१७ रोजी रा.प. महामंडळसंचालक मंडळाच्या २८० व्या बैठकीमध्ये महामंडळ ठराव क्र. २०१७:०४:०२, दि. २०/०४/२०१७ अन्वये रा.प. महामंडळाच्या बसेसमध्ये व बसस्थानकांवर VTS आणि प्रवासी माहिती कार्यप्रणाली (Passenger Information System) कार्यान्वित करण्याकरिता संस्थेची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यास व सदर कार्यप्रणाली राबविण्याकरिता ५ वर्षे कालावधीसाठी एकूण रु.५०कोटी येणाऱ्या अपेक्षित खर्चास संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. यासाठी मे. केपीएमजी यांचेकडून विनंती प्रस्ताव पत्रिका तयार करुन घेण्यात आलेली आहे. VTS-PIS प्रकल्पाची कार्यप्रणाली कार्यान्वित करण्याबाबत सविस्तर बाब वाहतूक खात्यामार्फत संचालक मंडळासमोर सादर करण्यात आली होती व सदर कार्यप्रणालीस उपरोक्त महामंडळ ठरावान्वये मा. संचालक मंडळाने मान्यता दिली असल्यामुळे सदर प्रकल्प अंमलबजावणीमध्ये कोणतेही हितसंबंध जपण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच रा.प. महामंडळाच्या बसेसमध्ये व बस स्थानकांवर VTS-PIS बसविण्यासाठी संस्थेची निवड करणेसाठी मे. केपीएमजी यांनी सादर केलेल्या निविदा प्रपत्रास मंजूरीसाठी सादर टिपणीवर माहिती व तंत्रज्ञान खात्यानेसहमती दर्शविली आहे.

VTS-PIS प्रकल्पांतर्गत रा.प. महामंडळाच्या एकूण १६,९११ बसेसवर VTS Devices बसविण्यात आली असून एकूण ३६० रा.प. बस स्थानकांवर ५४१ प्रवाशी माहिती संच (PIS) बसविण्यात आलेले आहेत. या संपूर्ण प्रकल्पाचा नियंत्रण कक्ष रा.प. मध्यवर्ती कार्यालयामध्ये कार्यान्वित करण्यात आलेला असून संपूर्ण महामंडळाच्या वाहनांचे Tracking नियंत्रण कक्षातून केले जाते. या प्रकल्पासाठी आवश्यक संगणकसंच व इंटरनेट कनेक्शन सर्व आगारांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

त्रीसदस्यीय समितीसमोर महामंडळाने सादर केलेल्या पुनरुज्जीवन आराखड्यामध्ये वर्ष २०२६-२७ पर्यंत एकूण ५३०० ईलेक्ट्रिक वाहने जीसीसी तत्वावर घेण्याचे प्रस्तावित केले होते. सदर पुनरुज्जीवन आराखडयाचा समावेश उक्त समितीने मा. उच्च न्यायालयात सादर केलेल्या अहवालात केलेला होता. त्यापैकी १५० बसेस केंद्र शासनाच्या फेम-II अंतर्गत घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून उर्वरित ५१५० बसेस जीसीसी तत्वावर महामंडळाच्या ताफ्यात समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव मा. संचालक मंडळाच्या दि.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | लक्षवेधी सूचना क्रमांक - ५४४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ५४४ पुढीलप्रमाणे आहे -

"राज्यातील जिल्हा - चंद्रपूर येथे आशिया खंडातील सर्वात मोठे थर्मल पॉवर स्टेशन १९८३ च्या सुमारास स्थापित केले गेले परंतु काही वर्ष उत्तम प्रतीचा कोळसा हाताळला जात असताना उत्पादन चांगले व प्रदूषणही नाममात्र होते मात्र आता बाहेरून आलेले व्यापारी जास्त पैसा कमावण्याच्या आमिषाने अधिकाऱ्यांना हाताशी धरून जिल्हयात ७-८ कॉलवॉशरीज आणण्यात पुढाकार घेतला तसेच कोळशाची धुलाई, वाहतूक व कोळसा उठाव करणाऱ्यांनी गैरमार्गाने चंद्रपूर जिल्हा प्रदूषणयुक्त करण्यास हातभार लावला असणे, निकृष्ट दर्जाचा कोळसा उत्पादनासाठी वापरणे, उत्कृष्ट कोळसा बाहेर पाठवणे, दर्जेदार कोळसा वेकोलीकडून घेवुन सीटीपीएस च्या माध्यमातून वॉशरीजला धुवायला दिला जातो, ज्यामध्ये १५% कचरा वजा जाता त्यांनी ८५% कोळसा परत देणे, अशा प्रकारे निकृष्ट दर्जाच्या कोळशामुळे प्रदूषणात प्रचंड वाढ झाली असणे, सीटीपीएस मध्ये भ्रष्ट मार्गाने हा गैरव्यवहार सुरु असल्याने चंद्रपूर जिल्हयाला जीवघेणे प्रदुषण सोसावे लागत असणे, कॉलवॉशरीजचा कोळसा धुवून सीटीपीएसला पुरवठा करण्याची जबाबदारी संबधीत एजन्सीवर असताना, चांगल्या कोळशात डस्ट भरुन तो पुढे पुरवठा केला जात असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, याबाबत तक्रार करूनही याकडे प्रशासनाचे/शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ, यामुळे विभागातील नागरिकांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मुख्यमंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये संच क्र. ३ ते ९ असे एकूण ०७ संचांमधून २९२० मेगावॅट विजेची निर्मिती होते. सदरील औष्णिक विद्युत केंद्राला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे संमतीपत्र प्रदान करण्यात आले असून त्याची वैधता दि. ३१/०५/२०२४ पर्यंत होती. यानंतर सदर उद्योगाने संमतीपत्र नूतनीकरणाचा अर्ज मुदतपुर्व दि.१०/०४/२०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केलेला असून सदर अर्ज विचाराधीन आहे.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये हवा प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक सर्व यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दि.

०५/०९/२०२२ रोजीच्या अधिसूचनेनूसार सदर औष्णिक विद्युत केंद्रास दि. ३१/१२/२०२५ पर्यंत मुदतीत एफजीडी संयंत्रणा उभारण्याकरीता निर्देश देण्यात आले आहेत.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरामध्ये मेजर स्टोअर्स, अंभोरा येथील सोलर प्लांट, ईटीपी-४ व चमरी गेस्ट हाऊस या ठिकाणी सतत हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत या ठिकाणी वातावरणातील हवेची गुणवत्ता तपासणी करण्यात येते. सदर उद्योगातून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता एकूण चार ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्यात आल्या आहेत. प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुर्नवापर ॲश स्लरी बनविणे, पाणी फवारणी करणे व बागकाम इत्यादीकरिता करण्यात येतो. कारखान्याच्या आवारातील एकूण मोकळ्या जागेच्या ४८.७८% जागेमध्ये वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. पावसाळ्यामध्ये कारखान्याच्या आवारातून नाल्याद्वारे अप्रक्रियाकृत सांडपाणी इराई नदीमध्ये गेल्याचे निदर्शनास आल्याने सदर उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा केलेली रूपये दोन लक्ष रकमेची बँक हमी दि. ११/०८/२०२३ रोजीच्या आदेशान्वये जप्त करण्यात आली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात एकूण सात कोल वॉशरी उद्योग कार्यरत असून या सर्व कोल वॉशरी उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अटी व शर्तीसहीत संमतीपत्र प्रदान केलेले आहेत. संमतीपत्रातील अटी व शर्ती नुसार उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा जसे स्क्रबर, बॅग फिल्टर बसविलेली आहे. तसेच, कोल वॉशरीजमधून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा कोळसा धुण्यास तसेच धुलीकण शमविण्यासाठी पुनर्वापर करण्यात येतो. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांची वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने उद्योगांवर कारवाई करण्यात येते.

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ (MSMC) हा महाराष्ट्र सरकारचा अंगीकृत उपक्रम असल्यामुळे, आवश्यक त्या मात्रा व गुणवत्तेचा धुतलेला कोळसा पुरविण्याचा खात्रीलायक पर्याय म्हणून महानिर्मितीच्या संचालक मडळाने निर्णय घेऊन डब्ल्यू.सी.एल. (WCL), एस.ई.सी.एल.(SECL) आणि एम.सी.एल.(MCL) यांच्या खाणीतील कोळसा उचलून वॉशरीमध्ये धुतेलेला कोळसा महानिर्मितीच्या विविध औष्णिक वीज केंद्राना पुरविण्यासाठी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महानिर्मितीच्या धोरणानुसार मुख्यतः कोराडी (३ x ६६० मेगा वॅट) औष्णिक विद्युत केंद्रात धुतलेल्या कोळशाचा वापर केला जातो व अल्प प्रमाणात धुतलेला कोळसा चंद्रपूर, खापरखेडा, भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात वापरला जातो.

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळामार्फत धुतलेल्या कोळशाची गुणवत्ता आणि प्रमाण योग्य राहण्यासाठी संस्थेची एजन्सीची नियुक्ती करण्यात आली असून, सदर संस्थेद्वारे प्रत्येक वेळेस सर्व प्रकियेवर

०५/०९/२०२२ रोजीच्या अधिसूचनेनूसार सदर औष्णिक विद्युत केंद्रास दि. ३१/१२/२०२५ पर्यंत मुदतीत एफजीडी संयंत्रणा उभारण्याकरीता निर्देश देण्यात आले आहेत.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरामध्ये मेजर स्टोअर्स, अंभोरा येथील सोलर प्लांट, ईटीपी-४ व चमरी गेस्ट हाऊस या ठिकाणी सतत हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत या ठिकाणी वातावरणातील हवेची गुणवत्ता तपासणी करण्यात येते. सदर उद्योगातून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता एकूण चार ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्यात आल्या आहेत. प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुर्नवापर ॲश स्लरी बनविणे, पाणी फवारणी करणे व बागकाम इत्यादीकरिता करण्यात येतो. कारखान्याच्या आवारातील एकूण मोकळ्या जागेच्या ४८.७८% जागेमध्ये वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. पावसाळ्यामध्ये कारखान्याच्या आवारातून नाल्याद्वारे अप्रक्रियाकृत सांडपाणी इराई नदीमध्ये गेल्याचे निदर्शनास आल्याने सदर उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा केलेली रूपये दोन लक्ष रकमेची बँक हमी दि. ११/०८/२०२३ रोजीच्या आदेशान्वये जप्त करण्यात आली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात एकूण सात कोल वॉशरी उद्योग कार्यरत असून या सर्व कोल वॉशरी उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अटी व शर्तीसहीत संमतीपत्र प्रदान केलेले आहेत. संमतीपत्रातील अटी व शर्ती नुसार उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा जसे स्क्रबर, बॅग फिल्टर बसविलेली आहे. तसेच, कोल वॉशरीजमधून निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा कोळसा धुण्यास तसेच धुलीकण शमविण्यासाठी पुनर्वापर करण्यात येतो. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांची वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने उद्योगांवर कारवाई करण्यात येते.

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ (MSMC) हा महाराष्ट्र सरकारचा अंगीकृत उपक्रम असल्यामुळे, आवश्यक त्या मात्रा व गुणवत्तेचा धुतलेला कोळसा पुरविण्याचा खात्रीलायक पर्याय म्हणून महानिर्मितीच्या संचालक मडळाने निर्णय घेऊन डब्ल्यू.सी.एल. (WCL), एस.ई.सी.एल.(SECL) आणि एम.सी.एल.(MCL) यांच्या खाणीतील कोळसा उचलून वॉशरीमध्ये धुतेलेला कोळसा महानिर्मितीच्या विविध औष्णिक वीज केंद्राना पुरविण्यासाठी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महानिर्मितीच्या धोरणानुसार मुख्यतः कोराडी (३ x ६६० मेगा वॅट) औष्णिक विद्‌युत केंद्रात धुतलेल्या कोळशाचा वापर केला जातो व अल्प प्रमाणात धुतलेला कोळसा चंद्रपूर, खापरखेडा, भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात वापरला जातो.

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळामार्फत धुतलेल्या कोळशाची गुणवत्ता आणि प्रमाण योग्य राहण्यासाठी संस्थेची एजन्सीची नियुक्ती करण्यात आली असून, सदर संस्थेद्वारे प्रत्येक वेळेस सर्व प्रकियेवर

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग लक्षवेधी सूचना क्रमांक – ५४४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ५४४ पुढीलप्रमाणे आहे –

"राज्यातील जिल्हा - चंद्रपूर येथे आशिया खंडातील सर्वात मोठे थर्मल पॉवर स्टेशन १९८३ च्या सुमारास स्थापित केले गेले परंतु काही वर्ष उत्तम प्रतीचा कोळसा हाताळला जात असताना उत्पादन चांगले व प्रदूषणही नाममात्र होते मात्र आता बाहेरून आलेले व्यापारी जास्त पैसा कमावण्याच्या आमिषाने अधिकाऱ्यांना हाताशी धरून जिल्हयात ७-८ कॉलवॉशरीज आणण्यात पुढाकार घेतला तसेच कोळशाची धुलाई, वाहतूक व कोळसा उठाव करणाऱ्यांनी गैरमार्गाने चंद्रपूर जिल्हा प्रदूषणयुक्त करण्यास हातभार लावला असणे, निकृष्ट दर्जाचा कोळसा उत्पादनासाठी वापरणे, उत्कृष्ट कोळसा बाहेर पाठवणे, दर्जेदार कोळसा वेकोलीकडून घेवुन सीटीपीएस च्या माध्यमातून वॉशरीजला धुवायला दिला जातो, ज्यामध्ये १५% कचरा वजा जाता त्यांनी ८५% कोळसा परत देणे, अशा प्रकारे निकृष्ट दर्जाच्या कोळशामुळे प्रदूषणात प्रचंड वाढ झाली असणे, सीटीपीएस मध्ये भ्रष्ट मार्गाने हा गैरव्यवहार सुरु असल्याने चंद्रपूर जिल्हयाला जीवघेणे प्रदुषण सोसावे लागत असणे, कॉलवॉशरीजचा कोळसा धुवून सीटीपीएसला पुरवठा करण्याची जबाबदारी संबधीत एजन्सीवर असताना, चांगल्या कोळशात डस्ट भरुन तो पुढे पुरवठा केला जात असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, याबाबत तक्रार करूनही याकडे प्रशासनाचे/शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ, यामुळे विभांगातील नागरिकांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मुख्यमंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये संच क्र. ३ ते ९ असे एकूण ०७ संचांमधून २९२० मेगावॅट विजेची निर्मिती होते. सदरील औष्णिक विद्युत केंद्राला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे संमतीपत्र प्रदान करण्यात आले असून त्याची वैधता दि. ३१/०५/२०२४ पर्यंत होती. यानंतर सदर उद्योगाने संमतीपत्र नूतनीकरणाचा अर्ज मुदतपुर्व दि.१०/०४/२०२४ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केलेला असून सदर अर्ज विचाराधीन आहे.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रामध्ये हवा प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक सर्व यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दि.

देखरेख ठेवण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल महानिर्मितीकडे सादर करण्यात येतो. औष्णिक वीज केंद्राना पुरविल्या जाणाऱ्या धुतलेल्या कोळशाची कराराप्रमाणे गुणवत्ता तृतीय पक्ष एजन्सीद्वारे (Third Party Sampling Agency) तपासली जाते. सदर गुणवत्ता तपासणी ही महानिर्मितीच्या औष्णिक वीज केंद्र, Central Coal & Oil Testing Laboratory (CCOTL) हे दोन विभाग व महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत केली जाते. गुणवत्तेमध्ये करारानुसार काही तफावत आढळून आल्यास आलेल्या तफावतेचा दंड देयकातून कपात केला जातो. त्यानुसार चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रासाठी पुरविण्यात आलेल्या कोळशाच्या गुणवत्तेच्या करारातील अटी व शर्तीनुसार रूपये चार (४) कोटी इतका दंड महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडून आकारण्यात आला आहे.

*******

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग लक्षवेधी सूचना क्रमांक - ११२५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती अश्विनी लक्ष्मण जगताप,श्री. महेश किसन लांडगे, ॲड. राहूल सुभाषराव कुल, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ११२५ पुढीलप्रमाणे आहे -

"पिंपरी-चिंचवड शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणा-या पवना नदीची लांबी सुमारे २४.५ कि.मी.असणे, पवना नदीला जलपर्णीचा विळखा पडल्यामुळे पवनामाईचा श्वास कोंडणे.नदीपात्र प्रदूषित होऊन परिसरात मोठी दुर्गंधी पसरणे. महापालिका प्रशासन या सर्व गोष्टींकडे केवळ बघ्याच्या भूमिकेतून पाहत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे. शहरातील पवना, इंद्रायणी, मूळा नद्या प्रदूषित होऊन जलसृष्टी धोक्यात येणे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे डिसेंबर २०१० च्या अहवालानुसार शहरातील नद्यांचे पाणी सध्या प्रक्रिया करूनही पिण्यायोग्य करता न येणे. शहरातील ८० टक्के सांडपाणी वाहून नेण्याची क्षमता असणे, त्यापैकी फक्त ६० टक्के पाणीशुद्धकरण यंत्रणा कार्यरत असल्याचे धक्कादायकरित्या उघडकीस येणे. नद्यांसाठी नदी सुधार प्रकल्प गेल्या साडेसात वर्षांपासून केवळ कागदावरच असणे, गेल्या ३०-४० वर्षांपासून नदीत सोडण्यात आलेले सांडपाणी, कारखान्यांचे रसायनमिश्रीत पाणी, कपडे, वाहने, जनावरे धुणे यांमुळे नद्यांचे पाणी प्रदूषित होणे. प्रदूषण महामंडळाने कारवाई करण्याची गरज असणे, पवना व इंद्रायणी नदी प्रकल्पासाठी तयार करण्यात येणा-या विस्तृत प्रकल्प अहवालासाठी सरकारच्या पर्यावरण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन केंद्राच्या एनआरसीकडे पाठविण्याची आवश्यकता असणे, नदी पात्राचे डिमार्ककेशन करून मुख्य नदीपात्रात साठलेला गाळ काढणे, नद्यांचे खोलीकरण करणे, नदीपात्राकडील खालील पातळीस ग्रॅब्रीयन पद्धतीची भींत उभारणे व नदीत मिळणारे सांडपाणी रोखण्यासाठी नदी पात्राच्याकडेने मोठ्या व्यासाची जलवाहिनी टाकणे, नद्यांच्या काठावर रिव्हर फ्रंट विकसित करण्याची आवश्यकता. मनपा प्रशासनाला नदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत नव्याने प्रकल्प अहवाल तयार करून राज्यशासनाची एनओसी घेऊन केंद्राच्या राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालयाकडे अनुदानासाठी पाठविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातून पवना, इंद्रायणी व मुळा या नद्या वाहतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून ३५९ दशलक्ष लिटर घरगुती सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यासाठी १२ ठिकाणी ३६३ दशलक्ष लीटर प्रतिदिन इतक्या क्षमतेचे एकूण १६ घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत ३०० दशलक्ष लीटर प्रतिदिन सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते तसेच प्रक्रियाकृत सांडपाणी पवना, मुळा व इंद्रायणी नद्यांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी सोडण्यात येते. उर्वरीत

अंदाजे ५९ दशलक्ष लीटर सांडपाणी विनाप्रक्रीया पवना, मुळा व इंद्रायणी नद्यांमध्ये विविध नाल्यामार्फत मिसळते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधून वाहणारी पवना नदी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२२ च्या प्रदूषित नदी पट्टयांच्या अहवालानुसार प्राथम्यता क्र.२ मध्ये आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सन २०४१ च्या लोकसंख्येच्या अनुशंगाने शहरामध्ये ११ विविध ठिकाणी एकूण १३९ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे घरगुती सांडपाणी प्रकल्प प्रस्तावित केले असून त्यापैकी, ६० द.ल.लि. प्रति दिन क्षमतेच्या ७ सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम प्रगतीपथावर असून जुलै -२०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षीत आहे.

पवना, मुळा व इंद्रायणी या नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नदी सुधार प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला असून Interceptor line टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नाल्याद्वारे नदीत मिसळणारे सांडपाणी प्रक्रियेकरिता Interceptor line द्वारे संकलित करुन नदीच्या मैला शुध्दीकरण केंद्रामध्ये सोडण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता पवना नदीस मिळणाऱ्या १६ नाल्यामध्ये व इंद्रायणी नदीस मिळणाऱ्या ५ नाल्यामध्ये Mechanical Screen बसविण्यात आली असून त्यामुळे प्लॅस्टिक व इतर कचरा नाल्याद्वारे नदीत मिसळणार नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नद्यांचे होणारे प्रदुषण कमी करुन नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणेसाठी नद्यांचे सर्वेक्षण करून नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार करण्यात आला आहे.इंद्रायणी नदी व पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा आराखडा अंतिम करणेत आला असुन सदर प्रकल्पास शासनाकडून पर्यावरण नाहरकत प्रमाणपत्र मिळणेची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पास अमृत २.० मधून मान्यता मिळणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे. मुळा नदी पुनरुजीवन प्रकल्प प्रकल्पाला दि. १६.११.२०१९ रोजी शासनाचा ना हरकत प्रमाणपत्र मिळाले आहे. परंतु, मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांच्या निर्देशानुसार सदर प्रकल्पाला सुधारीत ना हरकत दाखला घेणे बाबत निर्देश दिले असून त्याअनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक क्षेत्रामधील मोठया व मध्यम स्वरुपाच्या उद्योगांतून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्वरुपाचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले आहेत. तसेच काही लहान उद्योगांमार्फत निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्राथमिक स्वरुपाचे प्रक्रिया केंद्र उभे करण्यात आले असून सदर प्रक्रिया केंद्रातील प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुनर्वापर उद्योग प्रक्रियेत व बागबगीचांसाठी केला जातो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कोणत्याही उद्योगास प्रक्रियाकृत/ अप्रक्रियाकृत सांडपाणी नदीमध्ये प्रत्यक्षरित्या सोडण्यास परवानगी देण्यात येत नाही. तसेच उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन पाहणी करण्यात येते. सदर पाहणी दरम्यान काही त्रृटी आढळून आल्यास दोषी उद्योगांवर कारवाई करण्यात येते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील भोसरी औद्योगिक परिसरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता MCCIA, MIDC व PCMC यांच्या संयुक्त विद्यमानाने सामुहिक सांडपाणी प्रक्रिया सनियंत्रण यंत्रणा (CETP) प्रस्तावित आहे. तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आलेले असून सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने

अंदाजे ५९ दशलक्ष लीटर सांडपाणी विनाप्रक्रीया पवना, मुळा व इंद्रायणी नद्यांमध्ये विविध नाल्यामार्फत मिसळते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधून वाहणारी पवना नदी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२२ च्या प्रदूषित नदी पट्टयांच्या अहवालानुसार प्राथम्यता क्र.२ मध्ये आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सन २०४१ च्या लोकसंख्येच्या अनुशंगाने शहरामध्ये ११ विविध ठिकाणी एकूण १३९ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे घरगुती सांडपाणी प्रकल्प प्रस्तावित केले असून त्यापैकी, ६० द.ल.लि. प्रति दिन क्षमतेच्या ७ सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम प्रगतीपथावर असून जुलै -२०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षीत आहे.

पवना, मुळा व इंद्रायणी या नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नदी सुधार प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला असून Interceptor line टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नाल्याद्वारे नदीत मिसळणारे सांडपाणी प्रक्रियेकरिता Interceptor line द्वारे संकलित करुन नदीच्या मैला शुध्दीकरण केंद्रामध्ये सोडण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता पवना नदीस मिळणाऱ्या १६ नाल्यामध्ये व इंद्रायणी नदीस मिळणाऱ्या ५ नाल्यामध्ये Mechanical Screen बसविण्यात आली असून त्यामुळे प्लॅस्टिक व इतर कचरा नाल्याद्वारे नदीत मिसळणार नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नद्यांचे होणारे प्रदुषण कमी करुन नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणेसाठी नद्यांचे सर्वेक्षण करून नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार करण्यात आला आहे.इंद्रायणी नदी व पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा आराखडा अंतिम करणेत आला असुन सदर प्रकल्पास शासनाकडून पर्यावरण नाहरकत प्रमाणपत्र मिळणेची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पास अमृत २.० मधून मान्यता मिळणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे. मुळा नदी पुनरुजीवन प्रकल्प प्रकल्पाला दि. १६.११.२०१९ रोजी शासनाचा ना हरकत प्रमाणपत्र मिळाले आहे. परंतु, मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांच्या निर्देशानुसार सदर प्रकल्पाला सुधारीत ना हरकत दाखला घेणे बाबत निर्देश दिले असून त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक क्षेत्रामधील मोठया व मध्यम स्वरुपाच्या उद्योगांतून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्वरुपाचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले आहेत. तसेच काही लहान उद्योगांमार्फत निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्राथमिक स्वरुपाचे प्रक्रिया केंद्र उभे करण्यात आले असून सदर प्रक्रिया केंद्रातील प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुनर्वापर उद्योग प्रक्रियेत व बागबगीचांसाठी केला जातो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कोणत्याही उद्योगास प्रक्रियाकृत/ अप्रक्रियाकृत सांडपाणी नदीमध्ये प्रत्यक्षरित्या सोडण्यास परवानगी देण्यात येत नाही. तसेच उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन पाहणी करण्यात येते. सदर पाहणी दरम्यान काही त्रृटी आढळून आल्यास दोषी उद्योगांवर कारवाई करण्यात येते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील भोसरी औद्योगिक परिसरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता MCCIA, MIDC व PCMC यांच्या संयुक्त विद्यमानाने सामुहिक सांडपाणी प्रक्रिया सनियंत्रण यंत्रणा (CETP) प्रस्तावित आहे. तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आलेले असून सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग लक्षवेधी सूचना क्रमांक - ११२५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती अश्विनी लक्ष्मण जगताप,श्री. महेश किसन लांडगे, ॲड. राहूल सुभाषराव कुल, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ११२५ पुढीलप्रमाणे आहे -

“पिंपरी-चिंचवड शहराच्या मध्यवर्ती भागातून वाहणा-या पवना नदीची लांबी सुमारे २४.५ कि.मी.असणे, पवना नदीला जलपर्णीचा विळखा पडल्यामुळे पवनामाईचा श्वास कोंडणे.नदीपात्र प्रदूषित होऊन परिसरात मोठी दुर्गंधी पसरणे. महापालिका प्रशासन या सर्व गोष्टींकडे केवळ बघ्याच्या भूमिकेतून पाहत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे. शहरातील पवना, इंद्रायणी, मूळा नद्या प्रदूषित होऊन जलसृष्टी धोक्यात येणे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे डिसेंबर २०१० च्या अहवालानुसार शहरातील नद्यांचे पाणी सध्या प्रक्रिया करूनही पिण्यायोग्य करता न येणे. शहरातील ८० टक्के सांडपाणी वाहून नेण्याची क्षमता असणे, त्यापैकी फक्त ६० टक्के पाणीशुद्धकरण यंत्रणा कार्यरत असल्याचे धक्कादायकरित्या उघडकीस येणे. नद्यांसाठी नदी सुधार प्रकल्प गेल्या साडेसात वर्षांपासून केवळ कागदावरच असणे, गेल्या ३०-४० वर्षांपासून नदीत सोडण्यात आलेले सांडपाणी, कारखान्यांचे रसायनमिश्रीत पाणी, कपडे, वाहने, जनावरे धुणे यांमुळे नद्यांचे पाणी प्रदूषित होणे. प्रदूषण महामंडळाने कारवाई करण्याची गरज असणे, पवना व इंद्रायणी नदी प्रकल्पासाठी तयार करण्यात येणा-या विस्तृत प्रकल्प अहवालासाठी सरकारच्या पर्यावरण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊन केंद्राच्या एनआरसीकडे पाठविण्याची आवश्यकता असणे, नदी पात्राचे डिमार्ककेशन करून मुख्य नदीपात्रात साठलेला गाळ काढणे, नद्यांचे खोलीकरण करणे, नदीपात्राकडील खालील पातळीस ग्रॅब्रीयन पद्धतीची भींत उभारणे व नदीत मिळणारे सांडपाणी रोखण्यासाठी नदी पात्राच्याकडेने मोठ्या व्यासाची जलवाहिनी टाकणे, नद्यांच्या काठावर रिव्हर फ्रंट विकसित करण्याची आवश्यकता. मनपा प्रशासनाला नदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत नव्याने प्रकल्प अहवाल तयार करून राज्यशासनाची एनओसी घेऊन केंद्राच्या राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालयाकडे अनुदानासाठी पाठविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

---

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातून पवना, इंद्रायणी व मुळा या नद्या वाहतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून ३५९ दशलक्ष लिटर घरगुती सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यासाठी १२ ठिकाणी ३६३ दशलक्ष लीटर प्रतिदिन इतक्या क्षमतेचे एकूण १६ घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत ३०० दशलक्ष लीटर प्रतिदिन सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते तसेच प्रक्रियाकृत सांडपाणी पवना, मुळा व इंद्रायणी नद्यांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी सोडण्यात येते. उर्वरीत

प्रदूषण नियंत्रणाचा प्रारुप सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्रशासनास पुढील मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील एकूण १६ घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील प्रक्रियाकृत सांडपाण्याची गुणवत्ता नियमीतपणे तपासण्यात येते. तपासणीसाठी घेतलेल्या सांडपाणी नमुन्यांच्या पृथ्थकरण अहवालांचे अवलोकन केले असता, सर्वच प्रक्रियाकृत नमुण्याच्या सांडपाण्यामध्ये बीओडी, सस्पेंडेड सॉलिड्स आणि सीओडी चे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा अधिक असल्याचे आढळून आले आहेत.. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण ) कायदा, १९७४ अन्वये फौजदारी खटला दाखल करण्यात आला असून दि. ०४/१२/२०२३ रोजी प्रस्तावित आदेश व दि. १५/०५/२०२४ रोजी अंतरिम आदेश बजावण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत लोणावळा नगरपरिषद, वडगाव नगरपंचायत, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, देहू रोड कटक मंडळ, देहू नगरपंचायत व आळंदी नगरपरिषद यांना वेळोवेळी जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये आदेश देण्यात आले आहेत.

नेहरू पुतळा ते रेल्वे स्टेशनच्या परिसरातील अतिक्रमण निष्कासित करणे नियंत्रित करण्याकरिता स्वतंत्र पथकाची नेमणूक केलेली आहे. नेहरू पुतळा रेल्वे स्टेशन रोड येथे हॉकर्सची संख्या शहरात झालेल्या हॉकर्स सर्व्हेक्षणांनुसार ६ असून रात्री १० वाजेनंतर स्टेशन परिसरात चहा नाश्ता इत्यादी हॉकर्स ची संख्या ५ ते ६ च्या दरम्यान असते . हॉकर्स दिवसा त्या ठिकाणी व्यवसाय करत नाहीत मात्र ज्या दिवशी हॉकर्स व्यवसाय करताना आढळतात त्या दिवशी रात्री ८ पर्यंत महानगरपालिकेचे अतिक्रमण निर्मूलन पथक जप्तीची कारवाई करते.

जळगाव शहरातील नेहरू पुतळा रेल्वे स्टेशन परिसरात अतिक्रमण निर्मुलनाकरीता दररोज दोन शिफ्ट मध्ये सकाळी १० ते दुपारी २ आणि सायंकाळी ४ ते ८ वाजेपर्यंत पथक नेमलेले आहे.

दिनांक २४.०७.२०२३ ते दिनांक २८.०३.२०२४ पर्यंत नेहरू पुतळ्याच्या रेल्वे स्टेशन रोडवर केलेल्या कारवाई पोटी एकूण २२ हजार ५०० रुपये दंड हॉकर्सकडून आकारण्यात आला आहे. रेल्वे स्टेशन परिसरात मुख्य रस्त्यालगत पे अँड पार्कची व्यवस्था असून रेल्वे स्टेशन अंतर्गत परिसरात पुरेशी पार्किंग व्यवस्था आहे. शहरात फेरीवाला सर्वेक्षण करण्यात आलेले आहे, त्याची यादी कामगार कल्याण आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात आलेली आहे. व कायमस्वरुपी समिती स्थापन करणे कामी कामगार आयुक्त यांचे कडून निवडणूक प्रक्रिया राबविण्याची प्रकिया सुरु आहे.

**************************************************

दिनांक २४.०७.२०२३ ते दिनांक २८.०३.२०२४ पर्यंत नेहरू पुतळ्याच्या रेल्वे स्टेशन रोडवर केलेल्या कारवाई पोटी एकूण २२ हजार ५०० रुपये दंड हॉकर्सकडून आकारण्यात आला आहे. रेल्वे स्टेशन परिसरात मुख्य रस्त्यालगत पे अँड पार्कची व्यवस्था असून रेल्वे स्टेशन अंतर्गत परिसरात पुरेशी पार्किंग व्यवस्था आहे. शहरात फेरीवाला सर्वेक्षण करण्यात आलेले आहे, त्याची यादी कामगार कल्याण आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात आलेली आहे. व कायमस्वरुपी समिती स्थापन करणे कामी कामगार आयुक्त यांचे कडून निवडणूक प्रक्रिया राबविण्याची प्रकिया सुरु आहे.

***************************************************

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग                                                    लक्षवेधी सूचना क्र.१६२९

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्री.सुरेश (राजूमामा) भोळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जळगाव शहरातील वरदळीच्या नेहरु पुतळाचे रेल्वे स्टेशन रोडवर महापालिकेने नो हॉकर्स झोन घोषित केला त्यानुसार सुरुवातीचे काही दिवस त्याची अंमलबजावणी करण्यात आली असणे, मात्र आता त्याचा विसर पडल्याने सर्वत्र खाद्यपदार्थाच्या गाड्या मध्यारात्रीपर्यंत लावण्यात येत असणे, रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आणि त्यांच्या वाहनांना पार्क करण्यात अनेक समस्या येत असणे त्यामुळे हा खर्च आणि जनतेमध्ये तीव्र संघर्ष होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

जळगाव शहर महानगरपालिका महासभेने ठराव क्रमांक ११७४ दि.०७.०७.२०२३ अन्वये जळगाव रेल्वे स्टेशन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते पोलीस चौकीपर्यंत (नेहरु चौक) रस्ता नो हॉकर्स झोन म्हणून घोषित करण्याचा ठराव केला आहे. जळगाव महानगरपालिकेने शहरातील अतिक्रमण निर्मूलनाकरिता दररोज दोन शिफ्ट मध्ये सकाळी १० ते दुपारी २ आणि सायंकाळी ४ ते ८ वाजेपर्यंत पथक नेमलेले आहे. शहरातील वाहतूक असलेल्या मुख्य रस्त्यावर वाहतूक सुरळीत करण्याकरिता अतिक्रमण निर्मूलन पथकामार्फत नियमीत कार्यवाही करण्यात येते.

नेहरू पुतळा ते रेल्वे स्टेशनच्या परिसरातील अतिक्रमण निष्कासित करणे नियंत्रित करण्याकरिता स्वतंत्र पथकाची नेमणूक केलेली आहे. नेहरू पुतळा रेल्वे स्टेशन रोड येथे हॉकर्सची संख्या शहरात झालेल्या हॉकर्स सर्व्हेक्षणांनुसार ६ असून रात्री १० वाजेनंतर स्टेशन परिसरात चहा नाश्ता इत्यादी हॉकर्स ची संख्या ५ ते ६ च्या दरम्यान असते . हॉकर्स दिवसा त्या ठिकाणी व्यवसाय करत नाहीत मात्र ज्या दिवशी हॉकर्स व्यवसाय करताना आढळतात त्या दिवशी रात्री ८ पर्यंत महानगरपालिकेचे अतिक्रमण निर्मूलन पथक जप्तीची कारवाई करते.

जळगाव शहरातील नेहरू पुतळा रेल्वे स्टेशन परिसरात अतिक्रमण निर्मुलनाकरीता दररोज दोन शिफ्ट मध्ये सकाळी १० ते दुपारी २ आणि सायंकाळी ४ ते ८ वाजेपर्यंत पथक नेमलेले आहे.

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१७३०

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई), मा.विधानसभा सदस्या यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७३० पुढीलप्रमाणे आहे :-**

" नाशिक येथील आगामी सिंहस्थ कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्यावतीने ट्रॅफिक सेल कार्यवाहीत करण्यात येणे, या माध्यमातून वाहतुकीचे नियोजन व वाहतुकीसाठी पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत असणे,त्यामुळे नाशिक शहरात गेल्या काही व दिवसापासून वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यात येत नसल्याने ठिकठिकाणी वाहनाच्या लांबच लांब रांगा लागत असणे, नाशिक शहर व परिसरातील बहुतांशी रिक्षा व बसेसच्या थांब्याचे नियोजन होत नसल्याने ठिकठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असणे, वाहनतळ्याची निर्मिती व वाहतूक बेटांचे सुशोभीकरण करणे, रस्त्यावर सायकल ट्रॅक उभारणे, झेब्रा क्रॉसिंग तयार करणे, फुटपाथ व गतिरोधकाची निर्मिती करणे, सार्वजनिक वाहतुकीसाठी डेपो सेंटरची उभारणी करणे, ब्लॉक स्पॉट निर्मूलन करणे, तसेच वडाळा गाव, इंदिरानगर, पाथर्डी सर्कल, अवजड वाहतूक एक महिन्याची मुदतवाढ देऊन प्रायोगिक बंद करण्यात आली होती तिची मुदत संपत असल्याने आता मुदतवाढ न देता कायमस्वरूपी बंद करावी अशी नागरिकांची मागणी असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी नव्याने निर्माण करण्यात आलेल्या वाहतुक कक्ष / ट्रॅफिक सेलच्या अभियांत्रिकी संवर्गाच्या पदांच्या सेवा प्रवेश नियमास शासन निर्णय दि.२७.०२.२०२४ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ट्रॅफिक सेल कार्यान्वीत करण्यात आला आहे. नाशिक महानगरपालिकेचे वाढते क्षेत्रफळ व लोकसंख्या व त्या अनुषंगाने वाढत जाणारी खाजगी वाहन संख्या यामुळे अस्तित्वातील रस्त्यांवर पडत असलेला ताण कमी करण्याबाबत ट्रॅफीक सेल उपाययोजना करत आहे.

वाहतुकीचे नियोजन व अपघातप्रवण क्षेत्रात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजनांबाबत नाशिक महानगरपालिका स्तरावर रस्ते सुरक्षा समितीची दि.०१.०२.२०२३ व दि.३०.०६.२०२३ रोजी बैठकीत झालेल्या चर्चेनुसार नाशिक महानगरपालिकेने रस्ते सुरक्षिततेसाठी सहा विभागात त्या [illegible] रस्त्यांवर रंम्बलर हॅम्ब बसविणे. झेब्राक्रॉसिंग.

थर्मोप्लास्टीक पेंट, रोड मार्कर, कॅटआय, बसविण्यात आले आहेत. तसेच विविध ठिकाणी शहरात नो पार्कींगचे फलक, रिक्षा व टॅक्सी, वाहतुक बस इ. ठिकाणी फलक लावण्यात आलेले आहेत. शाळा/कॉलेज/हॉस्पीटल इ.ठिकाणी दिशादर्शक फलक बसविण्यात आलेले आहे.

शहरात विविध ठिकाणी सीएसआर फंडातुन १६३ ठिकाणच्या चौकाचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. तर वाहतुक बेट निर्मिती करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेतर्फे सुरु आहे. शहरात सार्वजनिक वाहतुकीसाठी सिटीलिंक बससाठी नाशिकरोड व तपोवण येथे बस डेपो ची उभारणी करण्यात आली आहे. तसेच आडगाव परिसरात इलेक्ट्रीक बसडेपोच्या कामास दि. २२.०२.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. स्मार्टसिटी अंतर्गत त्रंबकनाका ते अशोक स्तंभ पर्यंत सायकल ट्रॅकची निर्मिती केली आहे. तसेच त्रंबक नाका ते एबीबी सर्कल पर्यंत सायकल ट्रॅकची कामे सुरु करण्याकरीता दि.२२.१२.२०२३ अन्वये कार्यादेश देण्यात आले असून सदर काम सुरु आहे.

नाशिक शहरात एकूण १३ ब्लॅक स्पॉट असून सदर ठिकाणी स्पीड टेबल, थर्मोप्लास्टिक पेंट मारणे, कॅट आय व हॅझार्ड मार्कर,डेलीनेटर साइनबोर्ड बसविणे इ.कामे करण्याकरीता दि.१३.०३.२०२४ रोजी महानगरपालिकेमार्फत कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तसेच वडाळागाव, इंदिरानगर पाथर्डी सर्कल, या ठिकाणी होणारी अवजड वाहतुक, पोलिस उपायुक्त नाशिक शहर यांच्या दि.०३.०७.२०२४ च्या अधिसुचनेनुसार पुढील आदेशापर्यंत सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत बंद ठेवण्यात आली आहे.

**************************************************

थर्मोप्लास्टीक पेंट, रोड मार्कर, कॅटआय, बसविण्यात आले आहेत. तसेच विविध ठिकाणी शहरात नो पार्कींगचे फलक, रिक्षा व टॅक्सी, वाहतुक बस इ. ठिकाणी फलक लावण्यात आलेले आहेत. शाळा/कॉलेज/हॉस्पीटल इ.ठिकाणी दिशादर्शक फलक बसविण्यात आलेले आहे.

शहरात विविध ठिकाणी सीएसआर फंडातुन १६३ ठिकाणच्या चौकाचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. तर वाहतुक बेट निर्मिती करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेतर्फे सुरु आहे. शहरात सार्वजनिक वाहतुकीसाठी सिटीलिंक बससाठी नाशिकरोड व तपोवण येथे बस डेपो ची उभारणी करण्यात आली आहे. तसेच आडगाव परिसरात इलेक्ट्रीक बसडेपोच्या कामास दि. २२.०२.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. स्मार्टसिटी अंतर्गत त्रंबकनाका ते अशोक स्तंभ पर्यंत सायकल ट्रॅकची निर्मिती केली आहे. तसेच त्रंबक नाका ते एबीबी सर्कल पर्यंत सायकल ट्रॅकची कामे सुरु करण्याकरीता दि.२२.१२.२०२३ अन्वये कार्यादेश देण्यात आले असून सदर काम सुरु आहे.

नाशिक शहरात एकूण १३ ब्लॅक स्पॉट असून सदर ठिकाणी स्पीड टेबल, थर्मोप्लास्टिक पेंट मारणे, कॅट आय व हॅझार्ड मार्कर,डेलीनेटर साइनबोर्ड बसविणे इ.कामे करण्याकरीता दि.१३.०३.२०२४ रोजी महानगरपालिकेमार्फत कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तसेच वडाळागाव, इंदिरानगर पाथर्डी सर्कल, या ठिकाणी होणारी अवजड वाहतुक, पोलिस उपायुक्त नाशिक शहर यांच्या दि.०३.०७.२०२४ च्या अधिसुचनेनुसार पुढील आदेशापर्यंत सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत बंद ठेवण्यात आली आहे.

**************************************************

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१७३०

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई), मा.विधानसभा सदस्या यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७३० पुढीलप्रमाणे आहे :-**

" नाशिक येथील आगामी सिंहस्थ कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्यावतीने ट्रॅफिक सेल कार्यवाहीत करण्यात येणे, या माध्यमातून वाहतुकीचे नियोजन व वाहतुकीसाठी पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत असणे,त्यामुळे नाशिक शहरात गेल्या काही व दिवसापासून वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यात येत नसल्याने ठिकठिकाणी वाहनाच्या लांबच लांब रांगा लागत असणे, नाशिक शहर व परिसरातील बहुतांशी रिक्षा व बसेसच्या थांब्याचे नियोजन होत नसल्याने ठिकठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असणे, वाहनतळ्याची निर्मिती व वाहतूक बेटांचे सुशोभीकरण करणे, रस्त्यावर सायकल ट्रॅक उभारणे, झेब्रा क्रॉसिंग तयार करणे, फुटपाथ व गतिरोधकाची निर्मिती करणे, सार्वजनिक वाहतुकीसाठी डेपो सेंटरची उभारणी करणे, ब्लॉक स्पॉट निर्मूलन करणे, तसेच वडाळा गाव, इंदिरानगर, पाथर्डी सर्कल, अवजड वाहतूक एक महिन्याची मुदतवाढ देऊन प्रायोगिक बंद करण्यात आली होती तिची मुदत संपत असल्याने आता मुदतवाढ न देता कायमस्वरूपी बंद करावी अशी नागरिकांची मागणी असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी नव्याने निर्माण करण्यात आलेल्या वाहतुक कक्ष / ट्रॅफिक सेलच्या अभियांत्रिकी संवर्गाच्या पदांच्या सेवा प्रवेश नियमास शासन निर्णय दि.२७.०२.२०२४ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ट्रॅफिक सेल कार्यान्वीत करण्यात आला आहे. नाशिक महानगरपालिकेचे वाढते क्षेत्रफळ व लोकसंख्या व त्या अनुषंगाने वाढत जाणारी खाजगी वाहन संख्या यामुळे अस्तित्वातील रस्त्यांवर पडत असलेला ताण कमी करण्याबाबत ट्रॅफीक सेल उपाययोजना करत आहे.

वाहतुकीचे नियोजन व अपघातप्रवण क्षेत्रात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजनांबाबत नाशिक महानगरपालिका स्तरावर रस्ते सुरक्षा समितीची दि.०१.०२.२०२३ व दि.३०.०६.२०२३ रोजी बैठकीत झालेल्या चर्चेनुसार नाशिक महानगरपालिकेने रस्ते सुरक्षिततेसाठी सहा विभागात त्या [illegible] रस्त्यांवर रंम्बलर ड्रॅम्ब बसविणे. झेब्राक्रॉसिंग.

नगर विकास विभाग

लक्षवेधी सुचना क्र.१७३९

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्रीमती सीमा महेश हिरे,(सीमाताई) मा.विधानसभा सदस्या यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७३९ पुढीलप्रमाणे आहे :-**

"अंबड खुर्द नाशिक येथील १९७५ सालच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पत्र्याचे बांधकाम नियमित करून त्यास औद्योगिक व सवलतीच्या दराने कर आकारणी करण्याची मागणी या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून होत असणे, १९७५ साली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने येथील शेतकऱ्यांची जमीन संपादित केली व शेतकऱ्यांना नाममात्र दराने जमिनीचा मोबदला एकरी ३१०० रुपये देऊन त्या ठिकाणी एमआयडीसीने अनेक लहान-मोठे उद्योग कारखाने काढले परंतु या कारखान्यामधून अनेक रासायनिक द्रव्य निघाले त्यामुळे वायूप्रदूषण होऊन ते द्रव पाण्यामध्ये मिसळल्यामुळे ते पाणी पाजरुन एमआयडीसीच्या लगतची सर्व शेती नापीके झालेले असणे त्यामुळे या शेतकऱ्यांनी उपजीविकेचे साधन म्हणून पत्र्याचे शेड उभे करून हे शेड लघुउद्योगांसाठी भाड्याने देऊन मागील काही वर्षांपासून आपल्या उदरनिर्वाह सुरू ठेवलेला असणे. या पत्र्याच्या शेडला महानगरपालिकेने अनधिकृत बांधकाम ठरवून पाडण्याच्या नोटीशा दिल्या असणे, या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडील कलम ९४ अंतर्गत ४० पट दंड भरून शेड उभारलेले असून केवळ मनपाकडून नियमानुसार परवानगी घेतलेली नसल्याने याशेतकऱ्यांना बजावण्यात आलेल्या नोटिसा मागे घेऊन घरगुती दराने घरपट्टी भरण्याची मागणी या शेतकऱ्यांची असणे, तसेच शेतकरी घरगुती दराने घरपट्टी भरण्यास तयार असतानाही मनपाकडून ताठर भूमिका घेतली जात असल्याने या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी उपोषण आणि आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, त्यामुळे या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना "

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

नाशिक महानगरपालिका हद्दीतील जमिनी व इमारतींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२७ नुसार तसेच कलम १२८ नुसार मालमत्ता कर जमीन व इमारतीवर आकारण्यात येतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७-अ नुसार मिळकतधारक यांनी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न करता अवैधरित्या बांधकाम करुन वापर सुरु केल्यास त्यावर प्रचलित मुल्यांकन दरानुसार अवैध भोगवटा विचारात घेवुन दंडात्मक दराने मालमत्ता कर लागु करण्यात येतो.

नाशिक महानगरपालिका हददीतील अंबड खुर्द या शिवारातील काही भुभाग हा औदयोगिक वसाहती मध्ये समाविष्ट नाही. सदर ठिकाणी असलेले शेतकरी यांनी उभा केलेले अनधिकृत पत्रा शेड मंजूर विकास आराखड्यात रहिवासी विभाग दर्शविलेल्या जागेवर असून शेतकरी त्याचा औदयोगीक वापर करीत आहेत. सबब अनधिकृत व विनापरवाना पत्र्याचे शेडधारकांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार निवासी व बिगरनिवासी या दोन वर्गवारी असल्याने सदरच्या मिळकती या बिगरनिवासी वापरात असल्याने त्यावर घरघुती दराने मालमत्ता कर लागु करता येणार नाही. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांपैकी सात शेतकऱ्यांच्या अवैध पत्रा शेडच्या मिळकतीवर वापर सुरु केल्याने व त्या शेतकऱ्यांनी मागणी केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७-अ तसेच प्रकरण ८ (कराधान नियम) नियम ५ (२) अन्वये मालमत्ता कर लागु करण्यात आलेला आहे.

**************************************************

नाशिक महानगरपालिका हददीतील अंबड खुर्द या शिवारातील काही भुभाग हा औदयोगिक वसाहती मध्ये समाविष्ट नाही. सदर ठिकाणी असलेले शेतकरी यांनी उभा केलेले अनधिकृत पत्रा शेड मंजूर विकास आराखड्यात रहिवासी विभाग दर्शविलेल्या जागेवर असून शेतकरी त्याचा औदयोगीक वापर करीत आहेत. सबब अनधिकृत व विनापरवाना पत्र्याचे शेडधारकांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार निवासी व बिगरनिवासी या दोन वर्गवारी असल्याने सदरच्या मिळकती या बिगरनिवासी वापरात असल्याने त्यावर घरघुती दराने मालमत्ता कर लागु करता येणार नाही. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांपैकी सात शेतकऱ्यांच्या अवैध पत्रा शेडच्या मिळकतीवर वापर सुरु केल्याने व त्या शेतकऱ्यांनी मागणी केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७-अ तसेच प्रकरण ८ (कराधान नियम) नियम ५ (२) अन्वये मालमत्ता कर लागु करण्यात आलेला आहे.

*****************************************************

महाराष्ट्र विधानसभा



नगर विकास विभाग

लक्षवेधी सुचना क्र.१७३९

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्रीमती सीमा महेश हिरे,(सीमाताई) मा.विधानसभा सदस्या यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७३९ पुढीलप्रमाणे आहे :-**

"अंबड खुर्द नाशिक येथील १९७५ सालच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पत्र्याचे बांधकाम नियमित करून त्यास औद्योगिक व सवलतीच्या दराने कर आकारणी करण्याची मागणी या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून होत असणे, १९७५ साली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने येथील शेतकऱ्यांची जमीन संपादित केली व शेतकऱ्यांना नाममात्र दराने जमिनीचा मोबदला एकरी ३१०० रुपये देऊन त्या ठिकाणी एमआयडीसीने अनेक लहान-मोठे उद्योग कारखाने काढले परंतु या कारखान्यामधून अनेक रासायनिक द्रव्य निघाले त्यामुळे वायूप्रदूषण होऊन ते द्रव पाण्यामध्ये मिसळल्यामुळे ते पाणी पाजरुन एमआयडीसीच्या लगतची सर्व शेती नापीके झालेले असणे त्यामुळे या शेतकऱ्यांनी उपजीविकेचे साधन म्हणून पत्र्याचे शेड उभे करून हे शेड लघुउद्योगांसाठी भाड्याने देऊन मागील काही वर्षांपासून आपल्या उदरनिर्वाह सुरू ठेवलेला असणे. या पत्र्याच्या शेडला महानगरपालिकेने अनधिकृत बांधकाम ठरवून पाडण्याच्या नोटीशा दिल्या असणे, या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडील कलम ९४ अंतर्गत ४० पट दंड भरून शेड उभारलेले असून केवळ मनपाकडून नियमानुसार परवानगी घेतलेली नसल्याने याशेतकऱ्यांना बजावण्यात आलेल्या नोटिसा मागे घेऊन घरगुती दराने घरपट्टी भरण्याची मागणी या शेतकऱ्यांची असणे, तसेच शेतकरी घरगुती दराने घरपट्टी भरण्यास तयार असतानाही मनपाकडून ताठर भूमिका घेतली जात असल्याने या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी उपोषण आणि आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, त्यामुळे या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना "

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

नाशिक महानगरपालिका हद्दीतील जमिनी व इमारतींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२७ नुसार तसेच कलम १२८ नुसार मालमत्ता कर जमीन व इमारतीवर आकारण्यात येतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७-अ नुसार मिळकतधारक यांनी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न करता अवैधरित्या बांधकाम करुन वापर सुरु केल्यास त्यावर प्रचलित मुल्यांकन दरानुसार अवैध भोगवटा विचारात घेवुन दंडात्मक दराने मालमत्ता कर लागु करण्यात येतो.

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१७४०

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्रीमती सीमा महेश हिरे,(सीमाताई) मा.विधानसभा सदस्या यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक अंबड औद्योगिक वसाहतीतील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने रस्त्यांची अक्षरश: चाळण झालेली असल्याचे बाब माहे मे २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, या रस्त्यावरून दररोज हजारो कामगार येजा करत असल्याने त्यांच्या जीविकास धोका निर्माण झालेला असणे, पावसाळा काही दिवसावर आला असतानाही या वसाहतीतील रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल न केल्यास या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडून मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची समस्या त्यामुळे निर्माण होणार असणे, तसेच येथील अनेक कारखान्यांमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी घुसत असल्याने या पाण्याच्या निचऱ्याची सोय करण्याची आवश्यकता, आनंद आय पावर कंपनीजवळ त्र्यंबकेश्वर रस्त्यावर पाणी साचते, ग्लेमार्क कंपनी ते कार्बन कंपनी या रस्त्यावर सिएट कंपनी जवळ पुलाचे काम अत्यंत संथ गतीने चालू असल्याने वाहतुकीला आडथळा निर्माण झालेला असणे, सदर पुलाचे काम तातडीने करून रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा या अनेक मागण्या कामगारांनी लोकप्रतिनिधीकडून होत असतानाही प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष होत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात अंबड औद्योगिक वसाहतीत सुमारे ३६ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. सदरचे रस्ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी साईड पट्टी वगळता डांबरीकरण केलेले रस्ते मनपास हस्तांतरीत केलेले आहे. सदर रस्त्यांपैकी सन २०२३ साली सुमारे १५ कि.मी. रस्त्याचे अस्तरीकरण करण्यात आलेले आहेत. या अस्तरीकरण करण्यात आलेल्या रस्त्यांवर कुठल्याही प्रकारचे खड्डे दिसून येत नाही व ते सुस्थितीत आहेत. सदर अस्तरीकरण केलेले रस्त्याव्यतिरिक्त इतर उर्वरीत रस्ते हे सुमारे १२ ते १५ वर्षापुर्वी अस्तरीकरण करण्यात आलेले असल्यामुळे व अति अवजड वाहनांची ये-जा असल्यामुळे रस्त्यांचा पृष्ठ खराब झाल्याचे दिसून येतो तथापी सदरच्या रस्त्यावर पावसाळ्यापुर्वी दुरुस्ती अंतर्गत आवश्यकतेनुसार व उपलब्ध निधीनुसार रस्त्याची डांबराने दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत पावसाळा सुरु असल्याने खडी, मुरुम,कच,जीएसबी,डब्ल्युएमएम,पेव्हर ब्लॉक इ. मटेरियल वापरून वाहतुक सुरळीत केली जाते. तसेच नागिरकांच्या तक्रारी संबंधात मनपामार्फत तक्रार निवारण कक्ष स्थापन केला असून त्यासाठी हेल्पलाईन क्रमांक ७०३०३००३०० उपलब्ध करून देण्यात आलेला आहे, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम विभागाशी संबंधीत तक्रारी करीता स्वतंत्र व्हॉटसअप क्रमांक ७९७२१५४७९३ उपलब्ध करून दिलेला आहे, महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळ यांनी मनपास सदरचे रस्ते देखभाल दुरुस्ती करीता हस्तांतरीत केलेले आहे. सबब रस्त्यांची पुर्नबांधणी करणे कामी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी निधी उपलब्ध करून दिल्यास रस्त्यांची कामे करणे शक्य होईल.सदर औद्योगिक वसाहतीत पावसाळ्यापुर्वी तसेच पावसाळा सुरु असतांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार रस्त्याची दुरुस्ती ही मनपामार्फत करण्यात येत असते. त्यामुळे नागरिकांचा अथवा कामगारांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी परिस्थिती दिसुन येत नाही.

सदर औद्योगिक वसाहतीतील क्षेत्र हे दक्षिणे बाजूने पांडवलेणी व विल्होळी याबाजूने डोंगराळ भाग असल्याने तसेच औद्योगिक क्षेत्रातील भाग हा उंच व सखल आहे. त्यामुळे पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात अंबड औद्योगिक वसाहतीत येत असते. सदर पाण्याचा निचरा करणे कामी मनपामार्फत सुमारे ७ कि.मी. लांबीच्या पावसाळी गटारीचे काम करण्यात आलेले आहेत.

सीएट कंपनी जवळील नाल्यावर बॉक्स कलव्हर्ट बांधणेचे कामाचा कार्यादेश दि.०१/०३/२०२४ रोजी देणेत आलेला असून कामाचा कालावधी दि.०१/०३/२०२४ ते २८/०२/२०२५ पावेतो आहे. कामाचा कार्यादेश दिल्यानंतर जागेवरील जमिनीची भुस्तर तपासून (Trial Pit) त्यानुसार स्ट्रक्चरल डिझाईन तयार करून कामास सुरुवात करणेत आली आहे. सद्यस्थितीत खोदकाम, आर.सी.सी.फुटींग, आर.सी.सी.पिअरचे काम स्लॅब लेव्हल पर्यंतचे टक्के काम पुर्ण झालेले आहे. सदरचे बॉक्स कल्व्हर्ट व तदअनुषंगिक कामे ७० टक्के काम पुर्ण झाले असून सदरचा रस्ता माहे ऑक्टोबर-२०२४ पावेतो पुर्ण करण्याचे नियोजन आहे. तथापी सद्यस्थितीत वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून शहर वाहतुक शाखेच्या दि.२०/०३/२०२४ च्या परवानगीने वाहतुकीची पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

*************************************************

सद्यस्थितीत पावसाळा सुरु असल्याने खडी, मुरुम,कच,जीएसबी,डब्ल्युएमएम,पेव्हर ब्लॉक इ. मटेरियल वापरून वाहतुक सुरळीत केली जाते. तसेच नागिरकांच्या तक्रारी संबंधात मनपामार्फत तक्रार निवारण कक्ष स्थापन केला असून त्यासाठी हेल्पलाईन क्रमांक ७०३०३००३०० उपलब्ध करून देण्यात आलेला आहे, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम विभागाशी संबंधीत तक्रारी करीता स्वतंत्र व्हॉटसअप क्रमांक ७९७२१५४७९३ उपलब्ध करून दिलेला आहे, महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळ यांनी मनपास सदरचे रस्ते देखभाल दुरुरती करीता हस्तांतरीत केलेले आहे. सबब रस्त्यांची पुर्नबांधणी करणे कामी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी निधी उपलब्ध करून दिल्यास रस्त्यांची कामे करणे शक्य होईल.सदर औद्योगिक वसाहतीत पावसाळ्यापुर्वी तसेच पावसाळा सुरु असतांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार रस्त्याची दुरुस्ती ही मनपामार्फत करण्यात येत असते. त्यामुळे नागरिकांचा अथवा कामगारांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी परिस्थिती दिसुन येत नाही.

सदर औद्योगिक वसाहतीतील क्षेत्र हे दक्षिणे बाजूने पांडवलेणी व विल्होळी याबाजूने डोंगराळ भाग असल्याने तसेच औद्योगिक क्षेत्रातील भाग हा उंच व सखल आहे. त्यामुळे पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात अंबड औद्योगिक वसाहतीत येत असते. सदर पाण्याचा निचरा करणे कामी मनपामार्फत सुमारे ७ कि.मी. लांबीच्या पावसाळी गटारीचे काम करण्यात आलेले आहेत.

सीएट कंपनी जवळील नाल्यावर बॉक्स कलव्हर्ट बांधणेचे कामाचा कार्यादेश दि.०१/०३/२०२४ रोजी देणेत आलेला असून कामाचा कालावधी दि.०१/०३/२०२४ ते २८/०२/२०२५ पावेतो आहे. कामाचा कार्यादेश दिल्यानंतर जागेवरील जमिनीची भुस्तर तपासून (Trial Pit) त्यानुसार स्ट्रक्चरल डिझाईन तयार करून कामास सुरुवात करणेत आली आहे. सद्यस्थितीत खोदकाम, आर.सी.सी.फुटींग, आर.सी.सी.पिअरचे काम स्लॅब लेव्हल पर्यंतचे टक्के काम पुर्ण झालेले आहे. सदरचे बॉक्स कल्व्हर्ट व तदअनुषंगिक कामे ७० टक्के काम पुर्ण झाले असून सदरचा रस्ता माहे ऑक्टोबर-२०२४ पावेतो पुर्ण करण्याचे नियोजन आहे. तथापी सद्यस्थितीत वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून शहर वाहतुक शाखेच्या दि.२०/०३/२०२४ च्या परवानगीने वाहतुकीची पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

****************************************************

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१७४०

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्रीमती सीमा महेश हिरे,(सीमाताई) मा.विधानसभा सदस्या यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक अंबड औद्योगिक वसाहतीतील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने रस्त्यांची अक्षरश: चाळण झालेली असल्याचे बाब माहे मे २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, या रस्त्यावरून दररोज हजारो कामगार येजा करत असल्याने त्यांच्या जीविकास धोका निर्माण झालेला असणे, पावसाळा काही दिवसावर आला असतानाही या वसाहतीतील रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल न केल्यास या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडून मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची समस्या त्यामुळे निर्माण होणार असणे, तसेच येथील अनेक कारखान्यांमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी घुसत असल्याने या पाण्याच्या निचऱ्याची सोय करण्याची आवश्यकता, आनंद आय पावर कंपनीजवळ त्र्यंबकेश्वर रस्त्यावर पाणी साचते, ग्लेमार्क कंपनी ते कार्बन कंपनी या रस्त्यावर सिएट कंपनी जवळ पुलाचे काम अत्यंत संथ गतीने चालू असल्याने वाहतुकीला आडथळा निर्माण झालेला असणे, सदर पुलाचे काम तातडीने करून रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा या अनेक मागण्या कामगारांनी लोकप्रतिनिधीकडून होत असतानाही प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष होत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात अंबड औद्योगिक वसाहतीत सुमारे ३६ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. सदरचे रस्ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी साईड पट्टी वगळता डांबरीकरण केलेले रस्ते मनपास हस्तांतरीत केलेले आहे. सदर रस्त्यांपैकी सन २०२३ साली सुमारे १५ कि.मी. रस्त्याचे अस्तरीकरण करण्यात आलेले आहेत. या अस्तरीकरण करण्यात आलेल्या रस्त्यांवर कुठल्याही प्रकारचे खड्डे दिसून येत नाही व ते सुस्थितीत आहेत. सदर अस्तरीकरण केलेले रस्त्याव्यतिरिक्त इतर उर्वरीत रस्ते हे सुमारे १२ ते १५ वर्षापुर्वी अस्तरीकरण करण्यात आलेले असल्यामुळे व अति अवजड वाहनांची ये-जा असल्यामुळे रस्त्यांचा पृष्ठ खराब झाल्याचे दिसून येतो तथापी सदरच्या रस्त्यावर पावसाळ्यापुर्वी दुरुस्ती अंतर्गत आवश्यकतेनुसार व उपलब्ध निधीनुसार रस्त्याची डांबराने दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१७४३

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्रीमती देवयानी फरांदे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७४३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक शहराला मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणांनी वाढलेले असणे, अनेक ठिकाणी रस्त्याच्या बाजूला अतिक्रमण करून व्यवसाय करीत असणे, त्याच पद्धतीने मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर बांधकाम देखील केले जात असणे, अनेक ठिकाणी नैसर्गिक नाले बंद करून त्यावर बांधकाम केले जात असणे, काही ठिकाणी रस्त्यावर देखील बांधकाम केले जात असणे, याबाबत नाशिक महानगरपालिका नगर नियोजन विभागाकडून अनेक नागरिकांना नोटीसा दिल्या असणे, नगर नियोजन विभागाकडून नोटीस दिल्यानंतर त्याबाबत कारवाई केली न जाणे, नगर नियोजन विभागाकडून नोटीस दिल्यानंतर देखील बेकायदेशीर बांधकाम कायम असणे, माजी विधानसभा सदस्य याचे कार्यालय देखील अतिक्रमित असणे लोकप्रतिनिधींनी मागणी करून देखील त्यांना नोटिसांची प्रत न देणे, त्यामुळे नोटीसा देण्याच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याची शंका नागरिकांकडून व्यक्त होणे, नाशिक शहरात असणाऱ्या अतिक्रमणाला प्रशासनाची असणारी साथ, लोकप्रतिनिधींनी मागणी करून देखील गर्दीच्या वेळात अतिक्रमण विभाग कार्यरत न ठेवता तो अतिक्रमण नसणाऱ्या वेळात कार्यरत ठेवणे, महानगरपालिकेच्या अकार्यक्षमतेमुळे नाशिकला प्राप्त होत असणारे बकाल रूप याबाबत शासनाने तत्काळ दखल घेऊन कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिकेच्या नगरनियोजन विभागाकडून खाजगी जमिनीच्या क्षेत्रातील वापरात बदल विनापरवाना व अनाधिकृत बांधकामांना नोटीस (प्रथम व अंतीम) देण्यात येतात व त्यानंतरची कार्यवाही मनपाचे अतिक्रमण विभागाकडून करण्यात येते. त्याचप्रमाणे शहरातील रस्त्यांवरील अनधिकृत बांधकाम विभागामार्फत नोटीस देण्यात येत नाहीत. अशा रस्त्यांवरील बांधकामाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर नगरनियोजन विभाग मिळकत विभाग व अतिक्रमण विभागाच्या समन्वयाने कार्यवाही करण्यात येते.

शहरात केले जाणारे सर्वेक्षण तसेच प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महानगरपालिका, नगरनियोजन विभाग अशा विनापरवाना व अनाधिकृत बांधकामांना नोटीसा देवून नोटीस कालावधी समाप्तीनंतर सदर प्राप्त तक्रारींवर कार्यवाहीसाठी अतिक्रमण विभागाकडे प्रकरणे पाठविली जातात. त्यानुसार सदर बांधकामे निष्काषित करावयाची कार्ययाही अतिक्रमण विभागामार्फत पार पाडण्यात येते. ०१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अनधिकृत बांधकामाबाबत १८४ नस्त्या नगरनियोजन विभागाकडून अतिक्रमण विभागाकडे पाठविण्यात आल्या असून त्यापैकी ८० नस्त्यांवर निष्कासनासाठी अंतिम आदेश तयार करून पाठविण्यात आले आहेत.उर्वरीत १०४नस्त्यांवर विभागीय कार्यालयामध्ये कार्यवाही सुरु असून लवकरच निकाली काढून अनधिकृत बांधकामे निष्कासित केले जातील. तर दि.०१ जानेवारी २०२४ ते ३०जून २०२४ पर्यंत १४९ प्रकरणे नगर नियोजन विभागाने अतिक्रमण विभागाकडे पाठविण्यात आले असून ३३ प्रकरणांवर कार्यवाही करून अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे. तर १७ प्रकरणे न्याय प्रविष्ठ असून ९९ प्रकरणे विभागीय कार्यालयाकडे अंतिम कारवाईकरीता पाठविण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे शहरातील नैसर्गीक नाले बुजविले असल्याच्या तक्रारी प्राप्त नाहीत. नैसर्गिक नाले नजीक बांधकामांना परवानगी देतांना UDCPR मधील तरतूदींचे पालन करण्यांत येते

लक्षवेधी सुचनेमध्ये बेकायदेशिर कार्यालयाबद्दल उल्लेख केला आहे. तथापी सदर बांधकाम हे अध्यक्ष युवक मित्र मंडळ, मुंबई नाका, नाशिक या नावाने आहे. सदर बांधकाम आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्या दिनांक २९/०६/२०२४ व दिनांक ०९/०७/२०२४ रोजीच्या आदेशान्वये निष्कासित केले आहे. तसेच रे.मु.नं. ४१५/२०२४ युवक मित्र मंडळाचे अध्यक्ष यांनी नाशिक महानगरपालिके विरुद्ध दावा दाखल केला असून सदर दाव्यात कुठल्याही प्रकारचा मनाई हुकुम न्यायालयाने दिलेला नाही.

आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्या आदेशानुसार नाशिक महानगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकामे होवू न देण्यासाठी दक्षता समिती (Vigilance Committee) स्थापन करण्यात आलेली आहे. सदर कमिटी मार्फत नाशिक महानगरपालिका हद्दीत विभाग निहाय दैनंदिन सर्व्हेक्षण केले जाते व आढळून आलेले अनाधिकृत बांधकामे तातडीने थांबविण्याची दक्षता समिती मार्फत करण्यात येते.

***************************************************

शहरात केले जाणारे सर्वेक्षण तसेच प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महानगरपालिका, नगरनियोजन विभाग अशा विनापरवाना व अनाधिकृत बांधकामांना नोटीसा देवून नोटीस कालावधी समाप्तीनंतर सदर प्राप्त तक्रारींवर कार्यवाहीसाठी अतिक्रमण विभागाकडे प्रकरणे पाठविली जातात. त्यानुसार सदर बांधकामे निष्काषित करावयाची कार्ययाही अतिक्रमण विभागामार्फत पार पाडण्यात येते. ०१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अनधिकृत बांधकामाबाबत १८४ नस्त्या नगरनियोजन विभागाकडून अतिक्रमण विभागाकडे पाठविण्यात आल्या असून त्यापैकी ८० नस्त्यांवर निष्कासनासाठी अंतिम आदेश तयार करून पाठविण्यात आले आहेत.उर्वरीत १०४नस्त्यांवर विभागीय कार्यालयामध्ये कार्यवाही सुरु असून लवकरच निकाली काढून अनधिकृत बांधकामे निष्कासित केले जातील. तर दि.०१ जानेवारी २०२४ ते ३०जून २०२४ पर्यंत १४९ प्रकरणे नगर नियोजन विभागाने अतिक्रमण विभागाकडे पाठविण्यात आले असून ३३ प्रकरणांवर कार्यवाही करून अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे. तर १७ प्रकरणे न्याय प्रविष्ठ असून ९९ प्रकरणे विभागीय कार्यालयाकडे अंतिम कारवाईकरीता पाठविण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे शहरातील नैसर्गीक नाले बुजविले असल्याच्या तक्रारी प्राप्त नाहीत. नैसर्गिक नाले नजीक बांधकामांना परवानगी देतांना UDCPR मधील तरतूदींचे पालन करण्यांत येते

लक्षवेधी सुचनेमध्ये बेकायदेशिर कार्यालयाबद्दल उल्लेख केला आहे. तथापी सदर बांधकाम हे अध्यक्ष युवक मित्र मंडळ, मुंबई नाका, नाशिक या नावाने आहे. सदर बांधकाम आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्या दिनांक २९/०६/२०२४ व दिनांक ०९/०७/२०२४ रोजीच्या आदेशान्वये निष्कासित केले आहे. तसेच रे.मु.नं. ४१५/२०२४ युवक मित्र मंडळाचे अध्यक्ष यांनी नाशिक महानगरपालिके विरुद्ध दावा दाखल केला असून सदर दाव्यात कुठल्याही प्रकारचा मनाई हुकुम न्यायालयाने दिलेला नाही.

आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्या आदेशानुसार नाशिक महानगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकामे होवू न देण्यासाठी दक्षता समिती (Vigilance Committee) स्थापन करण्यात आलेली आहे. सदर कमिटी मार्फत नाशिक महानगरपालिका हद्दीत विभाग निहाय दैनंदिन सर्व्हेक्षण केले जाते व आढळून आलेले अनाधिकृत बांधकामे तातडीने थांबविण्याची दक्षता समिती मार्फत करण्यात येते.

******************************************************

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१७४३

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्रीमती देवयानी फरांदे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७४३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक शहराला मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणांनी वाढलेले असणे, अनेक ठिकाणी रस्त्याच्या बाजूला अतिक्रमण करून व्यवसाय करीत असणे, त्याच पद्धतीने मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर बांधकाम देखील केले जात असणे, अनेक ठिकाणी नैसर्गिक नाले बंद करून त्यावर बांधकाम केले जात असणे, काही ठिकाणी रस्त्यावर देखील बांधकाम केले जात असणे, याबाबत नाशिक महानगरपालिका नगर नियोजन विभागाकडून अनेक नागरिकांना नोटीसा दिल्या असणे, नगर नियोजन विभागाकडून नोटीस दिल्यानंतर त्याबाबत कारवाई केली न जाणे, नगर नियोजन विभागाकडून नोटीस दिल्यानंतर देखील बेकायदेशीर बांधकाम कायम असणे, माजी विधानसभा सदस्य याचे कार्यालय देखील अतिक्रमित असणे लोकप्रतिनिधींनी मागणी करून देखील त्यांना नोटिसांची प्रत न देणे, त्यामुळे नोटीसा देण्याच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याची शंका नागरिकांकडून व्यक्त होणे, नाशिक शहरात असणाऱ्या अतिक्रमणाला प्रशासनाची असणारी साथ, लोकप्रतिनिधींनी मागणी करून देखील गर्दीच्या वेळात अतिक्रमण विभाग कार्यरत न ठेवता तो अतिक्रमण नसणाऱ्या वेळात कार्यरत ठेवणे, महानगरपालिकेच्या अकार्यक्षमतेमुळे नाशिकला प्राप्त होत असणारे बकाल रूप याबाबत शासनाने तत्काळ दखल घेऊन कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिकेच्या नगरनियोजन विभागाकडून खाजगी जमिनीच्या क्षेत्रातील वापरात बदल विनापरवाना व अनाधिकृत बांधकामांना नोटीस (प्रथम व अंतीम) देण्यात येतात व त्यानंतरची कार्यवाही मनपाचे अतिक्रमण विभागाकडून करण्यात येते. त्याचप्रमाणे शहरातील रस्त्यांवरील अनधिकृत बांधकाम विभागामार्फत नोटीस देण्यात येत नाहीत. अशा रस्त्यांवरील बांधकामाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर नगरनियोजन विभाग मिळकत विभाग व अतिक्रमण विभागाच्या समन्वयाने कार्यवाही करण्यात येते.

लक्षवेधी सूचना क्र.१८५३

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती जयश्री जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"कोल्हापूर नगरपालिकेचे १९७२ मध्ये महानगरपालिकेत रूपांतर झाले. तब्बल ५० वर्षांपासून कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचा प्रश्न प्रलंबित असणे कोल्हापूर नंतर स्थापन झालेल्या अनेक महानगरपालिकांची एकदा-दोनदा नव्हे, तर अनेकदा हद्दवाढ झाली असणे, त्यामुळे त्या शहरांचा विकासही झालेला नसणे. आता कोल्हापूरची हद्दवाढ झालीच पाहिजे अशी जनभावना असणे, आणि त्यासाठी नागरिकांनी वारंवार आंदोलने केली असणे, सद्य:स्थितीत कोल्हापूर महानगरपालिकेची हद्द ६६.८२ चौरस किलोमीटर असणे, एवढया कमी जागेत तब्बल सात लाख लोक राहत असणे. शहराची उभी वाढ होत असताना शहर आडवे वाढण्याची गरज असणे, शहराला लागून असलेल्या मोरेवाडी, पाचगाव, कळंबा, कंदलगाव, उजळाईवाडी, गांधीनगर अशा कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने २०१३ पासून २०२१ पर्यंत ४ वेळा कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचे प्रस्ताव सादर केले असणे. २०१४ मध्ये १७ गावांचा समावेश असलेला हद्दवाढीचा प्रस्ताव महानगरपालिकेने राज्य शासनाकडे सादर केला होता. २०१७ मध्ये पहिल्या टप्प्यात भौगालिक संलग्नत मुद्द्यावर हद्दवाढ होईल अशी शक्यता वर्तवण्यात येत असणे, मात्र राज्य सरकारने हद्दवाढीला बगल देत ४२ गावांचा समावेश असलेल्या प्राधिकरणाची घोषणा केली असणे त्यामुळे शहराची हद्दवाढ मागे पडली असणे, परिणामी कोल्हापूर वासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

कोल्हापूर महानगरपालिकेची स्थापना सन १९७२ मध्ये झाली असून एकूण क्षेत्र ६६.८२ चौ.कि.मी इतकी आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार कोल्हापूर शहराची लोकसंख्या ५,४९,२३६ इतकी आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीलगत असणाऱ्या मोरेवाडी, पाचगांव, कळंबा, कंदलगांव, उजळाईवाडी, गांधीनगर या गावांसह ६७ गावांना महानगरपालिकेमार्फत बससेवा पुरविण्यात येते. तसेच मोरेवाडी, पाचगांव या गावांसह अन्य गावांना महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा करण्यात येतो व त्याचा अतिरीक्त ताण महानगरपालिकेवर पडतो.

कोल्हापुर महानगरपालिकेने लगतच्या ४२ गावांचा समावेश करुन हद्दवाढीचा प्रस्ताव प्रथमत: सन १९९० मध्ये शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने हद्दवाढीबाबतची प्राथमिक उदघोषणा दिनांक २०/०४/१९९२ रोजी निर्गमित करण्यात आली. सदर प्रस्तावित हद्दवाढीस त्यामध्ये समाविष्ट केलेल्या सर्व गावांनी तसेच लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शविल्यामुळे हद्दवाढीचा निर्णय घेण्यात आलेला नव्हता. तदनंतर शहर हद्दवाढीबाबत विविध संघटनामार्फत प्राप्त झालेली निवेदने, यापूर्वी सन १९९२ मध्ये निर्गमित केलेल्या प्राथमिक उद्घोषणेस जवळपास २० वर्षाचा झालेला कालावधी तसेच हद्दवाढीत समाविष्ट होणाऱ्या गावांच्या लोकसंख्येत,उत्पन्नात व भौगोलिक परिस्थितीमध्ये झालेला बदल विचारात घेऊन महानगरपालिकेस सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे सूचित करुन दिनांक १७ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे यापूर्वीची प्राथमिक उद्घोषणा विखंडीत करण्यात आली.

दिनांक १७ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अधिसूचनेला मा.उच्च न्यायालयात जनहित याचिकेव्दारे आव्हान देण्यात आले. सदर जनहित याचिकेची सुनावणी दिनांक ११/१२/२०१३ रोजी होऊन त्यात "कोल्हापूर महानगरपालिकेने दिनांक ३१/०१/२०१४ पर्यंत हद्दवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करावा व शासनाने सहा महिनेच्या आत याबाबत निर्णय घ्यावा"असे मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले होते. त्यानुसार आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी दिनांक २३/०६/२०१४ रोजी शासनास प्रस्ताव सादर केला. तथापि, सदर प्रस्तावावर महानगरपालिका हद्दवाढीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व हद्दवाढीमध्ये समाविष्ट होणाऱ्या गावांचा हद्दवाढीस होणारा विरोध विचारात घेता सदर हद्दवाढ करणे उचित होणार नाही, असा निर्णय तत्कालिन शासनाकडून घेण्यात आला.

कृ.मा.प.

तद्नंतर कोल्हापूर महानगरपालिकेने शहरालगतच्या एक किलोमीटर परिसरातील १८ गावांचा व २ एम.आय.डी.सी. यांचे क्षेत्रांचा समावेश असलेला हद्दवाढीचा नवीन प्रस्ताव दिनांक १२/०६/२०१५ रोजी सादर केला. त्यावर निर्णय घेण्याच्या दृष्टीने तत्कालिन मा.मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग, सार्व.बांधकाम तथा पालकमंत्री, कोल्हापूर यांच्या निर्देशानुसार नगर विकास विभागातील दोन अधिकाऱ्यांची द्वि-सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली. सदर समितीमार्फत दिनांक १७ जून, २०१६ रोजी हद्दवाढ विरोधक व दिनांक १८ जुन, २०१६ रोजी हद्दवाढ समर्थक यांच्या बैठका घेण्यात आल्या. तसेच प्रस्तावाचे विरोधक व समर्थक यांच्या तोंडी सूचना व लेखी निवेदने स्विकारुन समितीने कोल्हापूर महानगरपालिकेची हद्दवाढ करण्यासंबंधीची शिफारस केली. सदर शिफारशीच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही सुरु असताना कोल्हापूर हद्दवाढ विरोधी समिती तसेच हद्दवाढ कृती समितीने तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांकडे या विषयाबाबत बैठकीची विनंती केली. सदर विनंतीवरुन तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३०/०८/२०१६ रोजी सर्व संबंधितांची बैठक घेतली. सदर बैठकीत पुणे येथे स्थापन केलेले पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) व मुंबई महानगर येथे स्थापन केलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण( MMRDA) या धर्तीवर कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे. त्यानुसार दोन्ही बाजूच्या सदस्यांनी या पर्यायाविषयी आपली भूमिका चार आठवडयात जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सादर करावी. त्यानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सदर प्रस्ताव त्यापुढील दोन आठवडयात नगर विकास विभागाकडे सादर करावा, असे निर्देश तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले.

सदर निर्देशानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी कार्यवाही करुन कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण( MMRDA) यांचे धर्तीवर क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करणे योग्य असल्याचे स्पष्ट अभिप्राय दिले. त्यावरुन तत्कालिन शासन मान्यतेने दिनांक १६/०८/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे "कोल्हापूर नागरीक्षेत्र विकास प्राधिकरण" गठीत करण्यात आले आहे.

सन २०२१ मध्ये कोल्हापूर महानगरपालिकेकडून हद्दवाढीबाबतचा नवीन प्रस्ताव शासनास प्राप्त झाला. तथापि, कोल्हापूर महानगरपालिका सभागृहाची मुदत दिनांक १५/११/२०२० रोजी संपुष्टात आली. त्यानुषंगाने मा.राज्य निवडणूक आयोगाने ५ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूक, २०२० करीता प्रभाग रचना करण्याबाबतचे सुधारीत आदेश दिनांक ०३/०१/२०२० रोजी निर्गमित केले होते. त्यामध्ये "स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या ६ महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाहीत" असे नमूद केले आहे. त्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीसंदर्भात अंतिम निर्णय घेता आला नाही.

******

७(२२) - ९(७३)-९३१

तद्नंतर कोल्हापूर महानगरपालिकेने शहरालगतच्या एक किलोमीटर परिसरातील १८ गावांचा व २ एम.आय.डी.सी. यांचे क्षेत्रांचा समावेश असलेला हद्दवाढीचा नवीन प्रस्ताव दिनांक १२/०६/२०१५ रोजी सादर केला. त्यावर निर्णय घेण्याच्या दृष्टीने तत्कालिन मा.मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग, सार्व.बांधकाम तथा पालकमंत्री, कोल्हापूर यांच्या निर्देशानुसार नगर विकास विभागातील दोन अधिकाऱ्यांची द्वि-सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली. सदर समितीमार्फत दिनांक १७ जून, २०१६ रोजी हद्दवाढ विरोधक व दिनांक १८ जुन, २०१६ रोजी हद्दवाढ समर्थक यांच्या बैठका घेण्यात आल्या. तसेच प्रस्तावाचे विरोधक व समर्थक यांच्या तोंडी सूचना व लेखी निवेदने स्विकारुन समितीने कोल्हापूर महानगरपालिकेची हद्दवाढ करण्यासंबंधीची शिफारस केली. सदर शिफारशीच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही सुरु असताना कोल्हापूर हद्दवाढ विरोधी समिती तसेच हद्दवाढ कृती समितीने तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांकडे या विषयाबाबत बैठकीची विनंती केली. सदर विनंतीवरुन तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३०/०८/२०१६ रोजी सर्व संबंधितांची बैठक घेतली. सदर बैठकीत पुणे येथे स्थापन केलेले पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) व मुंबई महानगर येथे स्थापन केलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण( MMRDA) या धर्तीवर कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे. त्यानुसार दोन्ही बाजूच्या सदस्यांनी या पर्यायाविषयी आपली भूमिका चार आठवडयात जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सादर करावी. त्यानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सदर प्रस्ताव त्यापुढील दोन आठवडयात नगर विकास विभागाकडे सादर करावा, असे निर्देश तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले.

सदर निर्देशानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी कार्यवाही करुन कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण( MMRDA) यांचे धर्तीवर क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करणे योग्य असल्याचे स्पष्ट अभिप्राय दिले. त्यावरुन तत्कालिन शासन मान्यतेने दिनांक १६/०८/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे "कोल्हापूर नागरीक्षेत्र विकास प्राधिकरण" गठीत करण्यात आले आहे.

सन २०२१ मध्ये कोल्हापूर महानगरपालिकेकडून हद्दवाढीबाबतचा नवीन प्रस्ताव शासनास प्राप्त झाला. तथापि, कोल्हापूर महानगरपालिका सभागृहाची मुदत दिनांक १५/११/२०२० रोजी संपुष्टात आली. त्यानुषंगाने मा.राज्य निवडणूक आयोगाने ५ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूक, २०२० करीता प्रभाग रचना करण्याबाबतचे सुधारीत आदेश दिनांक ०३/०१/२०२० रोजी निर्गमित केले होते. त्यामध्ये "स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या ६ महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाहीत" असे नमूद केले आहे. त्यामुळे कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीसंदर्भात अंतिम निर्णय घेता आला नाही.

******

लक्षवेधी सूचना क्र.१८५३

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती जयश्री जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**" कोल्हापूर नगरपालिकेचे १९७२ मध्ये महानगरपालिकेत रूपांतर झाले. तब्बल ५० वर्षांपासून कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचा प्रश्न प्रलंबित असणे कोल्हापूर नंतर स्थापन झालेल्या अनेक महानगरपालिकांची एकदा-दोनदा नव्हे, तर अनेकदा हद्दवाढ झाली असणे, त्यामुळे त्या शहरांचा विकासही झालेला नसणे. आता कोल्हापूरची हद्दवाढ झालीच पाहिजे अशी जनभावना असणे, आणि त्यासाठी नागरिकांनी वारंवार आंदोलने केली असणे, सद्य:स्थितीत कोल्हापूर महानगरपालिकेची हद्द ६६.८२ चौरस किलोमीटर असणे, एवढया कमी जागेत तब्बल सात लाख लोक राहत असणे. शहराची उभी वाढ होत असताना शहर आडवे वाढण्याची गरज असणे, शहराला लागून असलेल्या मोरेवाडी, पाचगाव, कळंबा, कंदलगाव, उजळाईवाडी, गांधीनगर अशा कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने २०१३ पासून २०२१ पर्यंत ४ वेळा कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीचे प्रस्ताव सादर केले असणे. २०१४ मध्ये १७ गावांचा समावेश असलेला हद्दवाढीचा प्रस्ताव महानगरपालिकेने राज्य शासनाकडे सादर केला होता. २०१७ मध्ये पहिल्या टप्प्यात भौगालिक संलग्नत मुद्द्यावर हद्दवाढ होईल अशी शक्यता वर्तवण्यात येत असणे, मात्र राज्य सरकारने हद्दवाढीला बगल देत ४२ गावांचा समावेश असलेल्या प्राधिकरणाची घोषणा केली असणे त्यामुळे शहराची हद्दवाढ मागे पडली असणे, परिणामी कोल्हापूर वासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

कोल्हापूर महानगरपालिकेची स्थापना सन १९७२ मध्ये झाली असून एकुण क्षेत्र ६६.८२ चौ.कि.मी इतकी आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार कोल्हापूर शहराची लोकसंख्या ५,४९,२३६ इतकी आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीलगत असणाऱ्या मोरेवाडी, पाचगांव, कळंबा, कंदलगांव, उजळाईवाडी, गांधीनगर या गावांसह ६७ गावांना महानगरपालिकेमार्फत बससेवा पुरविण्यात येते. तसेच मोरेवाडी, पाचगांव या गावांसह अन्य गावांना महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा करण्यात येतो व त्याचा अतिरीक्त ताण महानगरपालिकेवर पडतो.

कोल्हापुर महानगरपालिकेने लगतच्या ४२ गावांचा समावेश करुन हद्दवाढीचा प्रस्ताव प्रथमत: सन १९९० मध्ये शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने हद्दवाढीबाबतची प्राथमिक उदघोषणा दिनांक २०/०४/१९९२ रोजी निर्गमित करण्यात आली. सदर प्रस्तावित हद्दवाढीस त्यामध्ये समाविष्ट केलेल्या सर्व गावांनी तसेच लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शविल्यामुळे हद्दवाढीचा निर्णय घेण्यात आलेला नव्हता. तदनंतर शहर हद्दवाढीबाबत विविध संघटनामार्फत प्राप्त झालेली निवेदने, यापूर्वी सन १९९२ मध्ये निर्गमित केलेल्या प्राथमिक उद्घोषणेस जवळपास २० वर्षाचा झालेला कालावधी तसेच हद्दवाढीत समाविष्ट होणाऱ्या गावांच्या लोकसंख्येत,उत्पन्नात व भौगोलिक परिस्थितीमध्ये झालेला बदल विचारात घेऊन महानगरपालिकेस सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे सूचित करुन दिनांक १७ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे यापूर्वीची प्राथमिक उद्घोषणा विखंडीत करण्यात आली.

दिनांक १७ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या अधिसूचनेला मा.उच्च न्यायालयात जनहित याचिकेव्दारे आव्हान देण्यात आले. सदर जनहित याचिकेची सुनावणी दिनांक ११/१२/२०१३ रोजी होऊन त्यात "कोल्हापूर महानगरपालिकेने दिनांक ३१/०१/२०१४ पर्यंत हद्दवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करावा व शासनाने सहा महिनेच्या आत याबाबत निर्णय घ्यावा"असे मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले होते. त्यानुसार आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी दिनांक २३/०६/२०१४ रोजी शासनास प्रस्ताव सादर केला. तथापि, सदर प्रस्तावावर महानगरपालिका हद्दवाढीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व हद्दवाढीमध्ये समाविष्ट होणाऱ्या गावांचा हद्दवाढीस होणारा विरोध विचारात घेता सदर हद्दवाढ करणे उचित होणार नाही, असा निर्णय तत्कालिन शासनाकडून घेण्यात आला.

कृ मा. प.

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९१९ खालीलप्रमाणे आहे:-

"भिवंडी शहरात भीषण पाणी टंचाई भासत असणे, सद्यस्थिती शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या प्रकल्पांकडून फक्त १२० द.ल.लि.प्रतिदिन (बृहन्मुंबई मनपाकडून ४२ द.ल.लि, स्टेम वॉटर डिस्ट्री. ७३ द.ल.लि., मनपाचे स्वत:चे वऱ्हाळा तलाव ५ द.ल.लि) केला जात असणे, परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे आवश्यक पाणी पुरवठा १६२ द.ल.लि. प्रतिदिन आवश्यक असणे, सध्यस्थिती शहरात कमी पडत असलेला पाणी पुरवठा ४२ द.ल.लि. प्रतिदिन असणे, महानगरपालिकेमध्ये पाणी वाटप करण्यात असतांना मोठ्या प्रमाणात पाणी लिकेजच्या समस्या असणे, सम प्रमाणात (न्याय्य प्रमाणत) पाणी वाटप (Equitable Distribution) करण्याबाबत योग्य प्रकारे धोरण तसेच नियोजन नसणे, विशेषतः झोपडपट्टी वस्ती मधील नागरिकांच्या हक्कांचे पाणी त्यांना मिळत नसणे, गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयानुसार, शहरी पाणी पुरवठ्यासाठी १३५ लिटर प्रति व्यक्ती प्रतिदिन (lpcd) हे बेंचमार्क असताना देखील उपलब्ध केले जात नसणे, केंद्र शासन पुरस्कृत - अमृत २.० अभियान १०० एम.एल.डी.वाढीव पाणी पुरवठा योजना सुरु नसणे, वितरण व्यवस्थामधील त्रुटीबाबत लोकप्रतिनिधीकडून चौकशीची मागणी केली असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेच्या विभागांशी वारंवार चर्चा केली असणे, अवचित पाडा, डोंगर पाडा, न्यु आझाद नगर,पटेल कंपाऊड, बाला कंपाऊड, सय्यद कंपाऊड येथील नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाण्याच्या समस्यांना समोरे जावे लागत असणे, यापुढे लोकसंख्येत अशीच वाढ होत गेल्यास नागरिकांना पाणी टंचाईच्या संकटाला सामोरे जावे लागण्याची शक्यता, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.४० चौ.कि.मी. असुन भिवंडी सद्याची शहराची तरंगती लोकसंख्या गृहीत धरुन शहराची लोकसंख्या अंदाजे १२ लक्ष इतकी आहे. भिवंडी शहरास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन ४२ द.ल.लि., स्टेम वॉटर डिस्ट्री. कं. यांचे कडुन ७३ द.ल.लि. वऱ्हाळा तलावातुन ५ द.ल.लि. असा एकुण १२० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार शहरामधील सद्यस्थितीत अस्तित्वात असलेली जलवितरण व्यवस्था सुमारे ३५ ते ४० वर्षे इतकी जुनी आहे. सदर वितरण व्यवस्थेची लांबी सुमारे २३० कि.मी. असुन शहरातील ७०% भागाकरीता जुन्या वितरण व्यवस्थेतुन पाणी पुरवठा होत आहे. तसेच २५ एम.एल.डी. एकात्मिक पाणी पुरवठा योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या १४ जलकुंभापैकी ८ जलकुंभ कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. उक्त जलकुंभाद्वारे शहराच्या ३० % भागात पाणी पुरवठा करण्यात येतो.

शहरातील जुन्या वितरण व्यवस्थेमधुन होणारा पाण्याचा अपव्यय व गळत्या सोडुन शहरामध्ये दरडोई अंदाजे ९० लि. प्रतिमाणसी प्रतिदिन इतका पाणी पुरवठा होत आहे. भिवंडी शहरातील अवचित पाडा, बाला कंपाऊंड - पटेल नगर, सय्यद कंपाऊंड, या ठिकाणी स्टेम कंपनीच्या स्त्रोतातुन आय.जी.एम. जलकुंभामधुन पाणी पुरवठा होत आहे. सदर वितरण व्यवस्थेकरीता असलेली आय.जी.एम. जलकुंभ भरणेची मुख्य जलवाहिनी सुमारे ३५ वर्षापेक्षा जास्त जुनी असल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे. तसेच भिवंडी निजामपूर शहरातील काही जुना भाग व उंच टेकडीवरील भाग य़ा ठिकाणी जुनी वितरण व्यवस्था असल्यामुळे सदर ठिकाणी कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

शहरामध्ये सद्यस्थितीत नागरीकांना होणारा पाणी पुरवठा हा ठोक स्वरुपात होत असुन नागरिकांना नळ कनेक्शनच्या व्यासानुसार व वापरानुसार वार्षिक पाणीपट्टी आकारली जाते. नागरीकांना नविन नळ कनेक्शन करीता ऑनलाईन प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन शुल्क आकारुन महानगरपालिकेमार्फत नळ कनेक्शन मंजुर करण्यात येतात.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार भिवंडी शहर हद्दीतील एम.एम.आर.डी.ए. द्वारे सुरु असलेल्या रस्त्याच्या कामामध्ये बाधीत होत असलेली स्टेम कंपनीची १०२२ मी.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी बदलून त्या ठिकाणी नविन जलवाहिनी अंथरणेचे काम एम.एम. आर.डी.ए. काम सुरु असुन सदरचे काम माहे ऑगस्ट, २०२४ अखेर पुर्ण करण्याचे नियोजित आहे. सदर जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा सुरु होऊन आय.जी.एम. जलकुंभामधुन होणारा पाणी पुरवठा सुरळीत होणार आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन नव्याने मंजुर झालेल्या २ द.ल.लि. पाणी पुरवठ्यातुन डोंगर पाडा, न्यु आझाद नगर येथील परीसरामधील पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तथापि, महानगरपालिकेकडुन जुन्या वितरण व्यवस्थेतील पाण्याची गळती रोखण्याचे काम वार्षिक निगा दुरुस्ती कामा अंतर्गत प्राधान्याने करण्यात येत आहे.

भिवंडी शहरातील पाणी पुरवठ्याची मागणी व भविष्य कालीन पाणी पुरवठ्याची गरज लक्षात घेता केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना मंजुर झाली असुन सदर कामी महानगरपालिकेमार्फत कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर योजना कार्यान्वित झाल्यानंतर शहराची सद्यस्थितीतील व भविष्यकालीन सन २०५२ पर्यंतची पाणी समस्या सुटणे अपेक्षित आहे.

शहरामधील पाणी पुरवठ्या संबंधी तक्रारी असल्यास त्या दाखल करण्याकरीता महानगरपालिका स्तरावर वऱ्हाळदेवी जलशुद्धीकरण केंद्र येथे सुविधा उपलब्ध असून सदर तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. तसेच महानगरपालिकेत ई-मेलद्वारे प्राप्त तक्रारीचे स्थळपहाणी करुन निवारण करण्यात येते.

तथापि, भिवंडी शहरातील एखाद्या विशिष्ट भागात पाणी टंचाई जाणवल्यास अथवा उद्भवल्यास मनपाच्या स्वतःच्या मालकीच्या टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो. भिवंडी निलामपूर शहर महानगरपालिकेकडुन उपलब्ध पाणी साठ्यातून नागरीकांना नियोजनपूर्वक पाणी वितरण केले जात असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

******

शहरातील जुन्या वितरण व्यवस्थेमधुन होणारा पाण्याचा अपव्यय व गळत्या सोडुन शहरामध्ये दरडोई अंदाजे ९० लि. प्रतिमाणसी प्रतिदिन इतका पाणी पुरवठा होत आहे. भिवंडी शहरातील अवचित पाडा, बाला कंपाऊंड - पटेल नगर, सय्यद कंपाऊंड, या ठिकाणी स्टेम कंपनीच्या स्त्रोतातुन आय.जी.एम. जलकुंभामधुन पाणी पुरवठा होत आहे. सदर वितरण व्यवस्थेकरीता असलेली आय.जी.एम. जलकुंभ भरणेची मुख्य जलवाहिनी सुमारे ३५ वर्षापेक्षा जास्त जुनी असल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे. तसेच भिवंडी निजामपूर शहरातील काही जुना भाग व उंच टेकडीवरील भाग या ठिकाणी जुनी वितरण व्यवस्था असल्यामुळे सदर ठिकाणी कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

शहरामध्ये सद्यस्थितीत नागरीकांना होणारा पाणी पुरवठा हा ठोक स्वरुपात होत असुन नागरिकांना नळ कनेक्शनच्या व्यासानुसार व वापरानुसार वार्षिक पाणीपट्टी आकारली जाते. नागरीकांना नविन नळ कनेक्शन करीता ऑनलाईन प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन शुल्क आकारुन महानगरपालिकेमार्फत नळ कनेक्शन मंजुर करण्यात येतात.

कोकणातील नरडवे मध्यम प्रकल्पास दिलेल्या पुनर्वसन आर्थिक पॅकेजप्रमाणे न्यू मांडवे प्रकल्पास पॅकेज दिल्यानंतर स्थलांतरण करण्यात येईल, अशी आग्रही मागणी प्रकल्पग्रस्थ यांनी केली आहे. तसेच, न्यू मांडवे प्रकल्पास सन २०१३ चा सुधारीत पुनर्वसन कायदा लागू करून त्याप्रमाणे अनुदान व मोबदला मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

प्रकल्पास रु.५०.७६ कोटी किंमतीस दि.२२.०९.२००५ रोजी प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सद्य:स्थितीत माहे जून २०२४ अखेर झालेला खर्च रु.५१.३९ कोटी इतका आहे. सद्य:स्थितीत प्रकल्प कामावर प्रथम सुप्रमा पेक्षा जादा खर्च होणार असल्याने धरणाचे उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी प्रकल्पाचा रु.१९५.९६ कोटी किमतीचा द्वितीय सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती कडून तपासणी करून शासनास दि. ६.१०.२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावावर शासनाने उपस्थित केलेल्या शे-यांची पूर्तता प्रदेश कार्यालयाचे पत्र क्र. २१२१ दि.१.७.२०२४ अन्वये महामंडळास सादर करणेत आलेली असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

सद्य:स्थितीत धरणाच्या विविध घटक बाबींचे आवश्यक संकल्पने प्राप्त झालेली असून त्यास सक्षम स्तरावर मंजुरी घेण्यात आलेली आहे. तसेच प्रकल्पाच्या द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मंजुरी प्राप्त करून घेवून पुढील ३ वर्षात प्रकल्पाचे काम पूर्ण करून नियोजित ९९६ हे. क्षेत्रास सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे.

****************************************************************************************************

**लक्षवेधी सूचना क्र. १६३६**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. योगेशदादा कदम, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"रत्नागिरी जिल्ह्यतील खेड तालुक्यातील कोकण पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत न्यु-मांडवे प्रकल्प सन १९९४ पासून सुरु होणे, या लघु पाटबंधारे प्रकल्पांची सुमारे २०.४३३ दशलक्ष पाणी साठा साठवूण ठेवण्याची क्षमता असून, यामुळे ९९६ हेक्टर क्षेत्र कायमस्वरुपी सिंचनाखाली येणार असल्याने १५ ते २० टंचाईग्रस्त गावांना लाभ मिळणार असणे, सदर प्रकल्पासाठी १ ते ११ कि.मी. कालवा नियोजित करुन १० कि.मी. मधील मुख्य कालव्याचे काम ९० टक्के पूर्ण केले असून, मोठी बांधकामे-४, गाव रस्ता पूल-६ व जलक्षेत्र-३ इ. कामे निधी अभावी प्रलंबित असणे, माहे जानेवारी २०२२ अखेरपर्यत ४९ कोटी ९६ लाख खर्च आवश्यक असलेल्या १८ नागरी सुविधांपैकी तळे येथील १६ व मांडवे येथील १५ नागरी सुविधांची निविदा निश्चित करुन करण्यात येणे, तर प्रकल्पाच्या उर्वरित नागरी सुविधांसाठी १५५ कोटी ९० लाख इतका खर्च अपेक्षित असल्याबाबतचे मान्यतेचे पत्र राज्य तांत्रिक सल्लागार समितीने दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी शासन स्तरावर सादर केले असून, शासन पत्र क्र. लपायो २०२३/प्र.क्र.१७४/खारभूमी/२०२४ चे पत्र दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४ रोजी शासनास सादर केले असणे, मात्र याबाबत अद्याप निधी मंजूर न झाल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**- मा.उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन -**

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यामधील न्यू मांडवे हा बांधकामाधीन प्रकल्प आहे. न्यू-मांडवे लघु पाटबंधारे प्रकल्पास दि.२२.०७.१९८३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू.४.३२ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, प्रकल्पास निधी न मिळाल्याने प्रशासकीय मान्यता व्यपगत झाली व त्यामुळे दि.२७.०९.१९९४ अन्वये रू.१४.३० कोटी किंमतीस नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली. प्रकल्पांतर्गत २०.४३३ दलघमी पाणीसाठा व ९९६ हे. सिंचन क्षेत्र निर्माण करणे प्रस्तावित आहे.

धरणाचे बांधकामास सन १९९५ मध्ये सुरूवात झाली असून आजपर्यंत ३५ टक्के मातीकाम पूर्ण आहे. धरण व बुडीत क्षेत्राकरीता आवश्यक ११३.४० हे. पैकी सर्व जमीन भूसंपादनाद्वारे जलसंपदा विभागाच्या ताब्यात आहे. तसेच, पुनर्वसनाकरीता आवश्यक ८.१६ हे. पैकी सर्व जमीनीचे भूसंपादन झाले असून ८६ कुटुंबांना भूखंड वाटपाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. परंतु प्रकल्पग्रस्त हे कोकणातील नरडवे मध्यम प्रकल्पाप्रमाणे आर्थिक पॅकेज मिळावे व इतर मागण्यांसाठी अद्यापपर्यंत पुनर्वसन गावठाणामध्ये स्थलांतरीत झालेले नाहीत.

प्रकल्पांतर्गत २१ किमी लांबीचा उजवा कालवा असून त्यांअतर्गत किमी १० पर्यंत खुल्या पध्दतीच्या कालव्यासह काही काम पूर्ण आहे. तथापि, उजव्या कालव्याच्या उर्वरीत लांबीतील काम बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे करणे प्रस्तावित आहे. प्रकल्पांतर्गत धरण, बुडीत क्षेत्र, कालवा व

लक्षवेधी सूचना क्रमांक १७५९.

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये

**श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जळगाव जिल्ह्यातील हातनूर प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सन २०१० मध्ये जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय जळगाव यांचे कार्यालयात प्रकल्पग्रस्त नोंदणी केलेली असून त्याला जवळजवळ बारा वर्षांचा कालावधी पूर्ण होऊन गेलेला असून त्यांना अद्याप कोणत्याही शासकीय नोकरीत सामावून घेण्यात आलेले नसल्याने हे प्रकल्पग्रस्त नाराजी व्यक्त करीत असणे, राज्यात मागील दीड वर्षापासून विविध भरत्या झाल्या परंतु परीक्षेत झालेल्या अनिमित्तेमुळे या भरत्या रद्द केल्याने प्रकल्पग्रस्त अद्याप वंचित राहिलेले असणे, या प्रकल्पग्रस्तांची वयोमर्यादा संपत आली असून त्यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण होण्यास फक्त पाच महिन्याचा अवधी बाकी असल्याने त्यांच्या वयाच्या अटींमध्ये वाढ करून या प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याची मागणी करीत असणे, त्यामुळे शासनाने राज्यभरातील विविध प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या पाल्यांना सामावून घेण्यासाठी विशेष सवलत देण्याची मागणी असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन.

हतनूर प्रकल्प जळगाव जिल्ह्यातील मोठा प्रकल्प असून प्रकल्पाचे बांधकाम सन १९७२ साली सुरू झाले व १९८२ साली बांधकाम पुर्ण होऊन त्यावर्षी सदर प्रकल्पाची घळ भरणी झाली आहे.

प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २१.०१.१९८० अन्वये तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पद भरतीत ५% आरक्षण ठेवण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दिनांक २७ आक्टोबर २००९ अन्वये मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या दिनांक ९/७/२००९ च्या निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांच्या व भुकंपग्रस्तांच्या नेमणूका जाहीरात देवून, संबंधित पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारांची पात्रता तपासून स्पर्धा परिक्षेव्दारा गुणवत्तेनुसार करण्याचे शासनाचे धोरण आहे. जळगाव जिल्ह्यातील पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत बाधित झालेल्या हतनुर प्रकल्पातील ४५२ प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकरीत सामावून घेण्यात आलेले आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०३.०२.२००७ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय/ निमशासकीय सेवेत गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देतांना ३८ वर्षे वयाची अट शिथील करुन ४५ वर्ष करण्यात आली आहे. यामध्ये आणखी शिथीलता देण्याची बाब सद्या प्रस्तावित नाही. तसेच शासन निर्णय दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ अन्वये प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जर लिपिक—टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने असलेली मुदत वाढवून ती २ वर्षे इतकी करण्यात आली आहे. सदर तरतूद ही राज्य शासनाच्या सर्व पदभरतीसाठी लागू आहे. सदर प्रकल्पग्रस्त उमेदवार २०१० पासून आजतागायत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील सर्व गट-क व गट-ड च्या पदावर शासन सेवेत नियुक्तीसाठी प्रकल्पग्रस्तांसाठी ५% समांतर आरक्षण धोरणानुसार पात्र आहेत.

********************

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०३.०२.२००७ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय/ निमशासकीय सेवेत गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देतांना ३८ वर्षे वयाची अट शिथील करुन ४५ वर्ष करण्यात आली आहे. यामध्ये आणखी शिथीलता देण्याची बाब सद्या प्रस्तावित नाही. तसेच शासन निर्णय दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ अन्वये प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जर लिपिक—टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने असलेली मुदत वाढवून ती २ वर्षे इतकी करण्यात आली आहे. सदर तरतूद ही राज्य शासनाच्या सर्व पदभरतीसाठी लागू आहे. सदर प्रकल्पग्रस्त उमेदवार २०१० पासून आजतागायत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील सर्व गट-क व गट-ड च्या पदावर शासन सेवेत नियुक्तीसाठी प्रकल्पग्रस्तांसाठी ५% समांतर आरक्षण धोरणानुसार पात्र आहेत.

*********************

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक १७५९.</u>

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये

**श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जळगाव जिल्ह्यातील हातनूर प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सन २०१० मध्ये जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय जळगाव यांचे कार्यालयात प्रकल्पग्रस्त नोंदणी केलेली असून त्याला जवळजवळ बारा वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन गेलेला असून त्यांना अद्याप कोणत्याही शासकीय नोकरीत सामावून घेण्यात आलेले नसल्याने हे प्रकल्पग्रस्त नाराजी व्यक्त करीत असणे, राज्यात मागील दीड वर्षापासून विविध भरत्या झाल्या परंतु परीक्षेत झालेल्या अनिमित्तेमुळे या भरत्या रद्द केल्याने प्रकल्पग्रस्त अद्याप वंचित राहिलेले असणे, या प्रकल्पग्रस्तांची वयोमर्यादा संपत आली असून त्यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण होण्यास फक्त पाच महिन्याचा अवधी बाकी असल्याने त्यांच्या वयाच्या अटींमध्ये वाढ करून या प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याची मागणी करीत असणे, त्यामुळे शासनाने राज्यभरातील विविध प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या पाल्यांना सामावून घेण्यासाठी विशेष सवलत देण्याची मागणी असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

---

## मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन.

हतनूर प्रकल्प जळगाव जिल्ह्यातील मोठा प्रकल्प असून प्रकल्पाचे बांधकाम सन १९७२ साली सुरू झाले व १९८२ साली बांधकाम पुर्ण होऊन त्यावर्षी सदर प्रकल्पाची घळ भरणी झाली आहे.

प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २१.०१.१९८० अन्वये तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पद भरतीत ५% आरक्षण ठेवण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दिनांक २७ आक्टोबर २००९ अन्वये मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या दिनांक ९/७/२००९ च्या निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांच्या व भुकंपग्रस्तांच्या नेमणूका जाहीरात देवून, संबंधित पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारांची पात्रता तपासून स्पर्धा परिक्षेव्दारा गुणवत्तेनुसार करण्याचे शासनाचे धोरण आहे. जळगाव जिल्ह्यातील पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत बाधित झालेल्या हतनुर प्रकल्पातील ४५२ प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकरीत सामावून घेण्यात आलेले आहे.

<u>लक्षवेधी सूचना क्र.१८२०</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. विश्वजित कदम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२० पुढीलप्रमाणे:-**

"सांगली जिल्ह्यातील कडेगाव येथील टेंभू योजना असतानाही दरवर्षी उन्हाळ्यात कडेगाव शहरात होणारी भीषण पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती असणे, टेंभू योजनेचे मिळणारे अपुरे पाणी यामुळे येथील शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयांचे शेतीचे नुकसान झाले असणे व होत असणे, कडेगाव तलावात टेंभू योजनेचे पाणी उन्हाळ्यात पुरेसे न मिळाल्यामुळे दरवर्षी तलाव तळ गाठणे. पिण्यासाठी अशुद्ध गाळयुक्त पाण्याचा अपुरा पुरवठा कडेगाव शहरात होत असणे, दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईने शेतकरी व नागरिक त्रस्त झाले असून हा पाणीप्रश्न टेंभू योजनेने व शासनाने कायमस्वरूपी सोडविणे आवश्यक असून टेंभू योजनेचे सुर्ली व कामथी आवर्तन एकाच वेळी चालू करण्याची आवश्यकता असणे, सुर्ली व कामथी टेंभू योजनेचे पाणी उपसा करणाऱ्या मोटारी बदलून जास्त पॉवरच्या बसविणे, कडेगाव तलावात बंदिस्त पाईपलाईनने पाणीपुरवठा करणे,अशा विविध मागण्यासाठी कडेगाव मधील नागरिक करीत असलेली आंदोलने, यावर अद्यापही कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, तसेच कडेगांव तालुक्यातील ढाणेवाडी हे गाव टेंभू व उरमोडी लाभ क्षेत्रातून वंचित असल्याने येथील पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असणे, त्यामुळे यापैकी कोणत्याही एका योजनेत समाविष्ठ करणे, कडेगाव शहर व तालुक्यातील पाण्याचा प्रश्न राज्य शासनाने तातडीने सोडविण्याकरीता तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन**

सातारा जिल्ह्यातील कृष्णा नदीवरील टेंभू उपसा सिंचन योजनेद्वारे सातारा, सांगली व सोलापूर जिल्ह्यातील ८०४७२ हे. क्षेत्रात सिंचनाचा लाभ देण्याकरीता योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. टेंभू उपसा सिंचन योजना तालुका कराड जिल्हा सातारा प्रकल्पास रुपये ७३७०.०३ कोटी किमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दि.०५.०१.२०२४ अन्वये दिली आहे. सद्य:स्थितीत योजनेचे पाच टप्पे पूर्ण करण्यात आले असून मुख्य कालव्याची वितरण व्यवस्था पूर्ण करण्यात आलेली असून लाभक्षेत्र विकासाची कामे प्रगतीपथावर आहेत.

टेंभू उपसा सिंचन योजनेद्वारे कडेगाव तालुक्याकरिता सन २०२३-२४ या सिंचन वर्षामध्ये हंगामनिहाय खरीप ०.५९, रब्बी ०.५६ व उन्हाळी १.१८ असे एकूण २.३३ अघफु पाणी देण्यात आलेले आहे.

टेंभू योजनेच्या शिवाजीनगर येथील शिवाजीनगर टप्पा क्र.२ येथून ५० मीटर उंचीवर पाणी उचलण्यात येऊन सुर्ली व कामथी कालव्याद्वारे लाभ क्षेत्रामधील सिंचन केले जाते. सुर्ली कालवा व कामथी कालव्याची लांबी अनुक्रमे २३ व १५ कि.मी. आहे. शिवाजीनगर टप्पा क्र. २ येथे १४००

(कृ.मा.प.)

अश्वशक्तीचे दोन व एक राखीव असे एकूण तीन पंपांची व्यवस्था आहे. सद्यःस्थितीत शिवाजीनगर येथील दोन पंपाद्वारे पाणी उचलण्यात येऊन एकाच वितरण व्यवस्थेद्वारे सुर्ली व कामथी कालव्यामध्ये सोडण्यात येते. टेंभू उपसा सिंचन योजनेचे टप्पा क्र.२ येथील पंप सन २००९ मध्ये कार्यान्वित करण्यात आले असून, पंपांची कार्यक्षमता कमी झाल्यामुळे पुरेशा प्रमाणात एकाच वेळी सुर्ली व कामथी कालव्यासाठी विसर्ग प्राप्त होत नसल्यामुळे सुर्ली व कामथी कालव्यामध्ये स्वतंत्रपणे पाणी सोडण्यात येऊन लाभ क्षेत्रामधील सिंचन केले जाते. सुर्ली व कामथी कालव्याचे एकाच वेळी आवर्तन सुरू करण्यासाठी सन २०२४-२५ च्या बांधकाम प्रापणसूची व यांत्रिक विभागाच्या प्रापणसूचीमध्ये पंपांची कार्यक्षमता व अनुषंगिक उपाय योजना कामांचा समावेश करण्यात आलेला आहे.

टेंभू उपसा सिंचन योजनेच्या सुर्ली कालवा कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या कडेगाव लघु पाटबंधारे तलावाची क्षमता ८८.४ दलघफू असून यावर तलावाचे ४२४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. टेंभू प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात या तलावाचा समावेश नाही. तथापि, लाभधारकाच्या मागणीनुसार ल.पा. तलाव कडेगाव मध्ये सन २०२३- २४ या सिंचन वर्षामध्ये एकूण ४ आवर्तनामध्ये १०३ दलघफू पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. कडेगाव तलावावर एकूण ६३ उपसा परवानाधारक (जवळपास १०२.५ HP) असुन या तलावाच्या लाभक्षेत्रामध्ये प्रामुख्याने उसाचे पीक घेतले जाते. टेंभू उपसा सिंचन योजनेच्या मंजूर प्रकल्प अहवालामध्ये पीक रचनेप्रमाणे ऊस पिकाचा समावेश नाही. टेंभू उपसा सिंचन व्यवस्थापन विभागाने पुरेसे पाणी देऊनसुद्धा लाभ क्षेत्रातील ऊस पिक व त्यासाठीचा पाण्याचा वापर पाहता उन्हाळी हंगामामध्ये पाण्याची कमतरता भासते, ही वस्तुस्थिती आहे. कडेगाव तालुक्यातील ढाणेवाडी हे गाव टेंभू उपसा सिंचन योजनेच्या व उरमोडी उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात येत नाही. तसेच, सदर दोन्ही प्रकल्पांचे जलनियोजन पूर्ण झालेले आहे.

****

अश्वशक्तीचे दोन व एक राखीव असे एकूण तीन पंपांची व्यवस्था आहे. सद्यःस्थितीत शिवाजीनगर येथील दोन पंपाद्वारे पाणी उचलण्यात येऊन एकाच वितरण व्यवस्थेद्वारे सुर्ली व कामथी कालव्यामध्ये सोडण्यात येते. टेंभू उपसा सिंचन योजनेचे टप्पा क्र.२ येथील पंप सन २००९ मध्ये कार्यान्वित करण्यात आले असून, पंपांची कार्यक्षमता कमी झाल्यामुळे पुरेशा प्रमाणात एकाच वेळी सुर्ली व कामथी कालव्यासाठी विसर्ग प्राप्त होत नसल्यामुळे सुर्ली व कामथी कालव्यामध्ये स्वतंत्रपणे पाणी सोडण्यात येऊन लाभ क्षेत्रामधील सिंचन केले जाते. सुर्ली व कामथी कालव्याचे एकाच वेळी आवर्तन सुरू करण्यासाठी सन २०२४-२५ च्या बांधकाम प्रापणसूची व यांत्रिक विभागाच्या प्रापणसूचीमध्ये पंपांची कार्यक्षमता व अनुषंगिक उपाय योजना कामांचा समावेश करण्यात आलेला आहे.

टेंभू उपसा सिंचन योजनेच्या सुर्ली कालवा कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या कडेगाव लघु पाटबंधारे तलावाची क्षमता ८८.४ दलघफू असून यावर तलावाचे ४२४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. टेंभू प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात या तलावाचा समावेश नाही. तथापि, लाभधारकाच्या मागणीनुसार ल.पा. तलाव कडेगाव मध्ये सन २०२३- २४ या सिंचन वर्षामध्ये एकूण ४ आवर्तनामध्ये १०३ दलघफू पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. कडेगाव तलावावर एकूण ६३ उपसा परवानाधारक (जवळपास १०२.५ HP) असुन या तलावाच्या लाभक्षेत्रामध्ये प्रामुख्याने उसाचे पीक घेतले जाते. टेंभू उपसा सिंचन योजनेच्या मंजूर प्रकल्प अहवालामध्ये पीक रचनेप्रमाणे ऊस पिकाचा समावेश नाही. टेंभू उपसा सिंचन व्यवस्थापन विभागाने पुरेसे पाणी देऊनसुद्धा लाभ क्षेत्रातील ऊस पिक व त्यासाठीचा पाण्याचा वापर पाहता उन्हाळी हंगामामध्ये पाण्याची कमतरता भासते, ही वस्तुस्थिती आहे. कडेगाव तालुक्यातील ढाणेवाडी हे गाव टेंभू उपसा सिंचन योजनेच्या व उरमोडी उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात येत नाही. तसेच, सदर दोन्ही प्रकल्पांचे जलनियोजन पूर्ण झालेले आहे.

****

<u>लक्षवेधी सूचना क्र.१८२०</u>

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. विश्वजित कदम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२० पुढीलप्रमाणे:-**

"सांगली जिल्ह्यातील कडेगाव येथील टेंभू योजना असतानाही दरवर्षी उन्हाळ्यात कडेगाव शहरात होणारी भीषण पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती असणे, टेंभू योजनेचे मिळणारे अपुरे पाणी यामुळे येथील शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयांचे शेतीचे नुकसान झाले असणे व होत असणे, कडेगाव तलावात टेंभू योजनेचे पाणी उन्हाळ्यात पुरेसे न मिळाल्यामुळे दरवर्षी तलाव तळ गाठणे. पिण्यासाठी अशुद्ध गाळयुक्त पाण्याचा अपुरा पुरवठा कडेगाव शहरात होत असणे, दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईने शेतकरी व नागरिक त्रस्त झाले असून हा पाणीप्रश्न टेंभू योजनेने व शासनाने कायमस्वरूपी सोडविणे आवश्यक असून टेंभू योजनेचे सुर्ली व कामथी आवर्तन एकाच वेळी चालू करण्याची आवश्यकता असणे, सुर्ली व कामथी टेंभू योजनेचे पाणी उपसा करणाऱ्या मोटारी बदलून जास्त पॉवरच्या बसविणे, कडेगाव तलावात बंदिस्त पाईपलाईनने पाणीपुरवठा करणे,अशा विविध मागण्यासाठी कडेगाव मधील नागरिक करीत असलेली आंदोलने, यावर अद्यापही कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, तसेच कडेगांव तालुक्यातील ढाणेवाडी हे गाव टेंभू व उरमोडी लाभ क्षेत्रातून वंचित असल्याने येथील पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असणे, त्यामुळे यापैकी कोणत्याही एका योजनेत समाविष्ठ करणे, कडेगाव शहर व तालुक्यातील पाण्याचा प्रश्न राज्य शासनाने तातडीने सोडविण्याकरीता तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन**

सातारा जिल्ह्यातील कृष्णा नदीवरील टेंभू उपसा सिंचन योजनेद्वारे सातारा, सांगली व सोलापूर जिल्ह्यातील ८०४७२ हे. क्षेत्रात सिंचनाचा लाभ देण्याकरीता योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. टेंभू उपसा सिंचन योजना तालुका कराड जिल्हा सातारा प्रकल्पास रुपये ७३७०.०३ कोटी किमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दि.०५.०१.२०२४ अन्वये दिली आहे. सद्य:स्थितीत योजनेचे पाच टप्पे पूर्ण करण्यात आले असून मुख्य कालव्याची वितरण व्यवस्था पूर्ण करण्यात आलेली असून लाभक्षेत्र विकासाची कामे प्रगतीपथावर आहेत.

टेंभू उपसा सिंचन योजनेद्वारे कडेगाव तालुक्याकरिता सन २०२३-२४ या सिंचन वर्षामध्ये हंगामनिहाय खरीप ०.५९, रब्बी ०.५६ व उन्हाळी १.१८ असे एकूण २.३३ अघफु पाणी देण्यात आलेले आहे.

टेंभू योजनेच्या शिवाजीनगर येथील शिवाजीनगर टप्पा क्र.२ येथून ५० मीटर उंचीवर पाणी उचलण्यात येऊन सुर्ली व कामथी कालव्याद्वारे लाभ क्षेत्रामधील सिंचन केले जाते. सुर्ली कालवा व कामथी कालव्याची लांबी अनुक्रमे २३ व १५ कि.मी. आहे. शिवाजीनगर टप्पा क्र. २ येथे १४००

(कृ.मा.प.)

## लक्षवेधी सुचना

### ॲड.राहुल कुल, श्री.दत्तात्रय भरणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२७

---

**" पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्प ते लोणी काळभोरपर्यंत बंदनळी कालव्याचा प्रस्ताव मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने सुमारे ३४ कि.मी. अंतरात कालव्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात नासाडी होत असणे, यामुळे दौंड, हवेली व इंदापूर तालुक्यातील नागरिक व शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित राहावे लागत असणे, कालवा उघडा असल्याने नागरिक त्यामध्ये मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकत असणे, बंदनळी कालवा झाल्यास उपलब्ध होणारी जागा रस्ते व इतर सार्वजनिक कामासाठी उपयोगी येणे, यासाठी २००० कोटीचा खर्च अपेक्षित असणे, याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रलंबित असणे, जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्याने परिसरातील ४० हून अधिक गावांना दुष्काळाचा सामना करावा लागणे, वॉल्व, विमोचक, जोडणीच्या ठिकाणी गंज लागण्याचे प्रमाण मोठे असल्यामुळे पाण्याची गळती होणे त्यामुळे सदर प्रकल्प बंदनळीतून करण्याचे प्रस्तावित असणे, बंदनळी प्रकल्प झाल्यास पाणी बचत होऊन, लाभक्षेत्रातील इतर अनेक तलाव त्याला जोडणे शक्य असणे, कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समूहास वीज निर्मितीसाठी कृष्णा खो-यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्प्या टप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास गट गठीत करण्यात आलेला असणे, सुर्वे समितीचा अहवाल शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपाययोजना. "**

---

**मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन :-**

**खडकवासला ते फुरसुंगी बोगदा**

खडकवासला प्रकल्पाचा नवीन मुठा उजवा कालवा सन १९६१ साली पूर्ण झालेला आहे. सदर कालव्यातून मागील सुमारे ६३ वर्षापासून सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत असल्याने कालवा वितरिका यांचे भराव कमकुवत झालेले आहेत. तसेच कालव्यावरील बांधकामे क्षतिग्रस्त झालेली आहेत. त्यामुळे काही प्रमाणात गळती होऊन पाण्याचा अपव्यय होत आहे. तसेच खडकवासला संयुक्त प्रकल्पातून पुणे शहर पाणीपुरवठ्यासाठी ११.५० टीएमसी पाणी कोटा मंजूर आहे . तथापि मागील पाच वर्षात शहरासाठी सरासरी २० टीएमसी पाणीवापर करण्यात आला आहे .पुणे शहराच्या वाढीव पाणी वापरामुळे कालव्याच्या पुच्छभागातील इंदापूर तालुक्यास सिंचनासाठी पुरेसे पाणी देण्यास अडचणी येत आहेत.

नवीन मुठा उजवा कालव्यातून दौंड, हवेली व इंदापूर तालुक्यातील लाभक्षेत्रास मागणीनूसार सिंचनासाठी पाणी देण्यात येत आहे. कालव्याच्या संकल्पित वहन क्षमतेमध्ये घट झाल्याने सद्यस्थितीत नवीन मुठा उजव्या कालव्याचा ५०७५४ हेक्टर प्रकल्पीय सिंचन क्षेत्रापैकी अंदाजे ४५९३१ हेक्टर क्षेत्राला (प्रकल्पावरील व विहिरीवरील) पाणी देणे शक्य होत आहे.

रोटा H/527 (750-11-24)

पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्पातंर्गतच्या नवीन मुठा उजवा कालव्याची एकुण लांबी २०२ कि. मी. असून त्यापैकी कालव्याचा प्रारंभीचा कि. मी. १ ते ३४ हा भाग पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून जात आहे. सदर कालवा पारंपारीक पध्दतीचा उघडा कालवा आहे. सदर कालवा महानगरपालिकेच्या हद्दीतून जात असल्याने परिसरातील नागरीकांकडून त्यामध्ये कचरा, राडा-रोडा टाकला जातो. पुणे शहराची सर्वांगीण बाजूने होणारी वाढ, कालव्याच्या बाजूने वाढलेली अतिक्रमणे/ झोपडपट्टी यामुळे कालव्याची हानी होत आहे आणि पर्यायाने पाण्याची नासाडी होत आहे. या पार्श्वभूमीवर नवीन मुठा उजवा कालवा कि मी १ ते ३४ रद्द करुन त्याऐवजी खडकवासला जलाशयामधून नवीन मुठा उजवा कालव्यास फुरसुंगी जवळ ३४ व्या कि.मी. मध्ये जोडणारा पर्यायी भुयारी मार्ग (बोगदा) तयार करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. हा बोगदा मार्ग झाल्यास प्रतिवर्षी २.१८ अब्ज घनफुट पाण्याची बचत होऊन सुमारे ३४७१ हेक्टर सिंचन क्षेत्राची पुनर्स्थापना होण्यास व बिगर सिंचनासाठी अधिकचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. तसेच सदर बोगद्यामुळे नवीन मुठा उजवा कालव्याची सुमारे २९७ हेक्टर जमीन इतर प्रयोजनाकरिता उपलब्ध होणार आहे. सदर उपलब्ध होणाऱ्या जमिनीचा वापर रस्ते, उड्डाणपुल, मेट्रो मार्गिका, उद्यान अथवा शहराकरीता व आवश्यक इतर प्रयोजनांकरीता करता येणे शक्य आहे किंवा कसे याबाबतचा सविस्तर अभ्यास पुणे महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर आहे. त्यानुषंगाने खडकवासला फुरसुंगी बोगदा प्रकल्पाचे रु.२२२१ कोटी किंमतीचे अंदाजपत्रक मा.मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याच्या दृष्टीने सादर करण्यात आले आहे. सदर बोगदा प्रकल्पास आशियाई विकास बँकेचे (ADB) अर्थसहाय्य घेण्याचे प्रस्तावित आहे.

**<u>जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना</u>**

जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना या प्रकल्पांतर्गत नवीन मुठा उजव्या कालव्याद्वारे वरवंड व शिर्सुफळ या दोन तलावात पाणी सोडून तेथून उपसा करुन जनाई व शिरसाई या दोन उपसा सिंचन योजना कार्यान्वित आहेत.

जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेचे कालवे मुरमाड क्षेत्रातून जात असल्याने कालव्यातून वाहणारे पाणी पाझरून जाण्याचे प्रमाण जास्त आहे. यास्तव टेल पर्यंतच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहचू शकत नाही. त्यामुळे जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेचे कालवे व वितरण व्यवस्था यांची कामे बंद नलिकेद्वारे करण्यात यावे अशी लाभधारकांची मागणी आहे. बंद नलिकेद्वारे काम केल्यास सिंचन आवर्तनाच्या वेळी होणारे वहनव्ययाचे प्रमाण कमी होईल. तसेच सिंचनाच्या दरम्यान पाणी चोरीला जाणे, उपसा करणे, कालव्याच्या तोडफोडीच्या घटना कमी होऊन पाण्याचा अपव्यय टाळला जाईल. त्याअुनषंगाने जनाई व शिरसाई उपसा सिंचन योजनेचे मुख्य कालवे व वितरण व्यवस्था यांना उघड्या कालव्याऐवजी बंदिस्त नलिका वितरण प्रणालीत रूपांतरण करणे प्रस्तावित आहे.

पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्पातंर्गतच्या नवीन मुठा उजवा कालव्याची एकुण लांबी २०२ कि. मी. असून त्यापैकी कालव्याचा प्रारंभीचा कि. मी. १ ते ३४ हा भाग पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून जात आहे. सदर कालवा पारंपारीक पध्दतीचा उघडा कालवा आहे. सदर कालवा महानगरपालिकेच्या हद्दीतून जात असल्याने परिसरातील नागरीकांकडून त्यामध्ये कचरा, राडा-रोडा टाकला जातो. पुणे शहराची सर्वांगीण बाजूने होणारी वाढ, कालव्याच्या बाजूने वाढलेली अतिक्रमणे/ झोपडपट्टी यामुळे कालव्याची हानी होत आहे आणि पर्यायाने पाण्याची नासाडी होत आहे. या पार्श्वभूमीवर नवीन मुठा उजवा कालवा कि मी १ ते ३४ रद्द करुन त्याऐवजी खडकवासला जलाशयामधून नवीन मुठा उजवा कालव्यास फुरसुंगी जवळ ३४ व्या कि.मी. मध्ये जोडणारा पर्यायी भुयारी मार्ग (बोगदा) तयार करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. हा बोगदा मार्ग झाल्यास प्रतिवर्षी २.१८ अब्ज घनफुट पाण्याची बचत होऊन सुमारे ३४७१ हेक्टर सिंचन क्षेत्राची पुनर्स्थापना होण्यास व बिगर सिंचनासाठी अधिकचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. तसेच सदर बोगद्यामुळे नवीन मुठा उजवा कालव्याची सुमारे २९७ हेक्टर जमीन इतर प्रयोजनाकरिता उपलब्ध होणार आहे. सदर उपलब्ध होणाऱ्या जमिनीचा वापर रस्ते, उड्डाणपुल, मेट्रो मार्गिका, उद्यान अथवा शहराकरीता व आवश्यक इतर प्रयोजनांकरीता करता येणे शक्य आहे किंवा कसे याबाबतचा सविस्तर अभ्यास पुणे महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर आहे. त्यानुषंगाने खडकवासला फुरसुंगी बोगदा प्रकल्पाचे रु.२२२१ कोटी किंमतीचे अंदाजपत्रक मा.मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याच्या दृष्टीने सादर करण्यात आले आहे. सदर बोगदा प्रकल्पास आशियाई विकास बँकेचे (ADB) अर्थसहाय्य घेण्याचे प्रस्तावित आहे.

**<u>जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना</u>**

जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना या प्रकल्पांतर्गत नवीन मुठा उजव्या कालव्याद्वारे वरवंड व शिर्सुफळ या दोन तलावात पाणी सोडून तेथून उपसा करुन जनाई व शिरसाई या दोन उपसा सिंचन योजना कार्यान्वित आहेत.

जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेचे कालवे मुरमाड क्षेत्रातून जात असल्याने कालव्यातून वाहणारे पाणी पाझरून जाण्याचे प्रमाण जास्त आहे. यास्तव टेल पर्यंतच्या शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहचू शकत नाही. त्यामुळे जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेचे कालवे व वितरण व्यवस्था यांची कामे बंद नलिकेद्वारे करण्यात यावे अशी लाभधारकांची मागणी आहे. बंद नलिकेद्वारे काम केल्यास सिंचन आवर्तनाच्या वेळी होणारे वहनव्ययाचे प्रमाण कमी होईल. तसेच सिंचनाच्या दरम्यान पाणी चोरीला जाणे, उपसा करणे, कालव्याच्या तोडफोडीच्या घटना कमी होऊन पाण्याचा अपव्यय टाळला जाईल. त्याअुनषंगाने जनाई व शिरसाई उपसा सिंचन योजनेचे मुख्य कालवे व वितरण व्यवस्था यांना उघड्या कालव्याऐवजी बंदिस्त नलिका वितरण प्रणालीत रूपांतरण करणे प्रस्तावित आहे.

**लक्षवेधी सूचना**

**अॅड.राहुल कुल, श्री.दत्तात्रय भरणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२७**

---

**" पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्प ते लोणी काळभोरपर्यंत बंदनळी कालव्याचा प्रस्ताव मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने सुमारे ३४ कि.मी. अंतरात कालव्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात नासाडी होत असणे, यामुळे दौंड, हवेली व इंदापूर तालुक्यातील नागरिक व शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित राहावे लागत असणे, कालवा उघडा असल्याने नागरिक त्यामध्ये मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकत असणे, बंदनळी कालवा झाल्यास उपलब्ध होणारी जागा रस्ते व इतर सार्वजनिक कामासाठी उपयोगी येणे, यासाठी २००० कोटीचा खर्च अपेक्षित असणे, याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रलंबित असणे, जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्याने परिसरातील ४० हून अधिक गावांना दुष्काळाचा सामना करावा लागणे, वॉल्व, विमोचक, जोडणीच्या ठिकाणी गंज लागण्याचे प्रमाण मोठे असल्यामुळे पाण्याची गळती होणे त्यामुळे सदर प्रकल्प बंदनळीतून करण्याचे प्रस्तावित असणे, बंदनळी प्रकल्प झाल्यास पाणी बचत होऊन, लाभक्षेत्रातील इतर अनेक तलाव त्याला जोडणे शक्य असणे, कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समूहास वीज निर्मितीसाठी कृष्णा खो-यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्प्या टप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास गट गठीत करण्यात आलेला असणे, सुर्वे समितीचा अहवाल शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपाययोजना. "**

---

**मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन :-**

**खडकवासला ते फुरसुंगी बोगदा**

खडकवासला प्रकल्पाचा नवीन मुठा उजवा कालवा सन १९६१ साली पूर्ण झालेला आहे. सदर कालव्यातून मागील सुमारे ६३ वर्षापासून सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत असल्याने कालवा वितरिका यांचे भराव कमकुवत झालेले आहेत. तसेच कालव्यावरील बांधकामे क्षतिग्रस्त झालेली आहेत. त्यामुळे काही प्रमाणात गळती होऊन पाण्याचा अपव्यय होत आहे. तसेच खडकवासला संयुक्त प्रकल्पातून पुणे शहर पाणीपुरवठ्यासाठी ११.५० टीएमसी पाणी कोटा मंजूर आहे . तथापि मागील पाच वर्षात शहरासाठी सरासरी २० टीएमसी पाणीवापर करण्यात आला आहे .पुणे शहराच्या वाढीव पाणी वापरामुळे कालव्याच्या पुच्छभागातील इंदापूर तालुक्यास सिंचनासाठी पुरेसे पाणी देण्यास अडचणी येत आहेत.

नवीन मुठा उजवा कालव्यातून दौंड, हवेली व इंदापूर तालुक्यातील लाभक्षेत्रास मागणीनूसार सिंचनासाठी पाणी देण्यात येत आहे. कालव्याच्या संकल्पित वहन क्षमतेमध्ये घट झाल्याने सद्यस्थितीत नवीन मुठा उजव्या कालव्याचा ५०७५४ हेक्टर प्रकल्पीय सिंचन क्षेत्रापैकी अंदाजे ४५९३१ हेक्टर क्षेत्राला (प्रकल्पावरील व विहिरीवरील) पाणी देणे शक्य होत आहे.

सेवा म/५२७ (750-11-24)

राज्य जलनीतीनुसार पुणे शहरास पिण्याचे पाणी दिल्यानंतरच सिंचनाला पाणी देण्याची तरतूद असल्याने खडकवासला प्रकल्पात सिंचनासाठी कमी पाणी उपलब्ध राहते. त्यामुळे जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेला प्रकल्प तरतूदीनुसार पाणी उपलब्ध होत नाही. तसेच सदर योजनेच्या कालव्यांचे अस्तरीकरण झालेले नसल्याने पाण्याचा पाझर मोठ्या प्रमाणात होतो. खडकवासला धरणातून कमी अधिक प्रमाणात उपलब्ध होणा-या पाण्यामधूनच सिंचन करण्यात येते. त्यामुळे दौंड तालुक्यातील दक्षिणेकडील काही गावांना पाणी पुरवठा पूर्ण क्षमतेने करता येत नाही. परंतु उपलब्ध होणारे पाणी समन्यायी तत्वावर सर्व गावांना देण्यात येते.

**पुरंदर उपसा सिंचन योजना**

पुरंदर उपसा सिंचन योजनेचा जलस्त्रोत मुळा- मुठा नदीवर मौजे कोरेगाव मुळ येथील को. प. बंधारा भिवरी येथे असून योजनेचा वार्षिक पाणी वापर ४.०० टि.एम.सी. आहे. पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या मंजुरी प्राप्त संकल्पनेनुसार काम करण्यात येत असुन या अंतर्गत प्रकल्पीय २५४९८ हे. क्षेत्रासाठी ४.०० टि.एम.सी. पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सन २०२३-२४ च्या पावसाळी हंगामात कमी पर्जन्यमान झाल्यामुळे संपूर्ण पुरंदर तालुक्यात सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्यासाठीची तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली.

पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या विविध टप्प्यांवरील पंपगृह क्रमांक १ ते ६ आणि शिंदवणे, कुपटेवाडी, दिवे, राजेवाडी, जाधववाडी, वाघापूर, पिसर्वे, माळशिरस, बारामती या मुख्य वितरीका व त्यावरील लघुवितरिका द्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याद्वारे वेळोवेळी व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचन आवर्तने देण्यात आली. तथापि कडक उन्हाळा व तीव्र पाणीटंचाई तसेच सर्वच वितरिकांच्या लाभक्षेत्रातून एकाच वेळी पाणी सोडण्यासाठी होणाऱ्या मागण्याची पूर्तता करताना पंपिंग यंत्रणात वारंवार होणारे बिघाडामुळे नियोजनाप्रमाणे सिंचनाची आवर्तने पूर्ण करण्यात अनेक अडचणी आल्या. तथापि, शेतकरी /लाभधारक यांना त्यांच्या मागणीनुसार घनमापन पध्दतीने पाणीपुरवठा केला जातो. तसेच शेतकऱ्यांच्या मागणीनुसार समन्यायी पध्दतीने पाणीवाटप करण्यात येते.

पुरंदर उपसा सिंचन योज़ना ही मुळा मुठा नदीतील सांडपाण्यावर कार्यान्वित होणारी योजना असून पुणे मनपा शहराचे निर्मित सांडपाण्यावर पुर्णतः प्रक्रिया करत नसल्यामुळे नदीतील पाणी दूषित होते. या दूषित पाणीवापरामुळे पुरंदर उपसा सिंचन योजनेस ज्या ठिकाणी वॉल्व्ह, विमोचक (Outlet). जोडणी (Connections) आहेत अशा ठिकाणी गंज लागण्याचे प्रमाण जास्त आहेत व ठिकठिकाणी Joint चे ठिकाणी गळती होत आहे. त्या अनुषंगाने पुरंदर उपसा सिंचन योजनेचे परिचलन सुरळीत होण्याच्या दृष्टीने स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत अनुषंगिक कामांच्या रू.४९.१२५ कोटी किंमतीच्या विशेष दुरुस्ती कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर उपसा सिंचन योजनेची मूळ कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने रु.४६०.९५ कोटी किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. प्रकल्प पुर्णत्वाच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

कोयना जलविद्युत प्रकल्पातून ६७.५ टीएमसी पाणी पश्चिमेकडे वळवून महाजनकोद्वारे विद्युत निर्मिती करणेत येत आहे. टाटा पॉवर कंपनीने पुणे जिल्हयातील मावळ व मुळशी तालुक्यात स्वातंत्र्यपूर्व काळात कुंडली, लोणावळा, वळवळ, शिरवटा, ठोकरवाडी व मुळशी अशी सहा धरणे बांधली आहेत. या सर्व धरणातील पाणीसाठा पश्चिमेकडे वळवून त्याव्दारे विद्युत निर्मिती करण्यात येत आहे. कृष्णा पाणी तंटा लवादानुसार जास्तीत जास्त ५४.५० टीएमसी पाणी प्रतिवर्ष मात्र सलग ५ वर्षात जास्तीत जास्त २१३ टीएमसी पाणी कृष्णा खोऱ्याच्या बाहेर वळविणेस मुभा आहे. टाटा जलविद्युत प्रकल्पाद्वारे सरासरी ४२.५ टीएमसी पाणी पश्चिमेकडे वळवून विद्युत निर्मिती करण्यात येत आहे.

राज्य जलनितीनुसार पिण्याचे पाणी व सिंचनाबाबत पाणी वापराचा प्राधान्यक्रम जलविद्युतच्या वर आहे. तसेच विविध पर्यायाव्दारे वीज उपलब्ध करणे शक्य असल्याने कृष्णा खोऱ्यातील पाण्याची वाढती मागणी विचारात घेता विपुलतेचे खोरे असलेल्या कोकण प्रदेशात विद्युत निर्मितीनंतर पश्चिमेकडे वळविणेत येणारे पाणी टप्प्याटप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास करण्यासाठी दि. २ ऑगस्ट, २०१८ चे शासन निर्णयान्वये भावे समिती गठित करण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास दि. १०.५.२०१९ रोजी प्राप्त झाला आहे.

उपरोक्त भावे समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील धोरण व कार्यवाहीची दिशा निश्चित करण्यासाठी श्री. अविनाश सुर्वे, निवृत्त सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या दि.१.१२.२०२० रोजी झालेल्या तिसऱ्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

"कृष्णा पाणी तंटा लवाद संदर्भात इतर राज्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विविध याचिकेवर सुनावणी प्रगतीत असून पुढील वर्षी यावर अंतिम निर्णय अपेक्षित आहे. त्यापूर्वी समितीने अहवाल दिल्यास त्याचा विपरीत परिणाम उपरोक्त सुनावणीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर समितीचा अहवाल जाहीर करावा असे सूचित केले आहे."

सदर गठित समितीच्या दि. ०२ जून, २०२२ व दि. ०३ जून, २०२२ रोजीच्या बैठकीत अहवाल अंतिम करण्यात आला आहे. शासन पत्र दि.१०/०३/२०२३ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर व शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत तज्ञ समितीचा अहवाल गोपनीय स्वरुपात जतन करून ठेवण्याबाबत सूचना दिल्या आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय अद्याप प्राप्त नाही.

***********

कोयना जलविद्युत प्रकल्पातून ६७.५ टीएमसी पाणी पश्चिमेकडे वळवून महाजनकोद्वारे विद्युत निर्मिती करणेत येत आहे. टाटा पॉवर कंपनीने पुणे जिल्हयातील मावळ व मुळशी तालुक्यात स्वातंत्र्यपूर्व काळात कुंडली, लोणावळा, वळवळ, शिरवटा, ठोकरवाडी व मुळशी अशी सहा धरणे बांधली आहेत. या सर्व धरणातील पाणीसाठा पश्चिमेकडे वळवून त्याव्दारे विद्युत निर्मिती करण्यात येत आहे. कृष्णा पाणी तंटा लवादानुसार जास्तीत जास्त ५४.५० टीएमसी पाणी प्रतिवर्ष मात्र सलग ५ वर्षात जास्तीत जास्त २१३ टीएमसी पाणी कृष्णा खोऱ्याच्या बाहेर वळविणेस मुभा आहे. टाटा जलविद्युत प्रकल्पाद्वारे सरासरी ४२.५ टीएमसी पाणी पश्चिमेकडे वळवून विद्युत निर्मिती करण्यात येत आहे.

राज्य जलनितीनुसार पिण्याचे पाणी व सिंचनाबाबत पाणी वापराचा प्राधान्यक्रम जलविद्युतच्या वर आहे. तसेच विविध पर्यायाव्दारे वीज उपलब्ध करणे शक्य असल्याने कृष्णा खोऱ्यातील पाण्याची वाढती मागणी विचारात घेता विपुलतेचे खोरे असलेल्या कोकण प्रदेशात विद्युत निर्मितीनंतर पश्चिमेकडे वळविणेत येणारे पाणी टप्प्याटप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास करण्यासाठी दि. २ ऑगस्ट, २०१८ चे शासन निर्णयान्वये भावे समिती गठित करण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास दि. १०.५.२०१९ रोजी प्राप्त झाला आहे.

उपरोक्त भावे समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील धोरण व कार्यवाहीची दिशा निश्चित करण्यासाठी श्री. अविनाश सुर्वे, निवृत्त सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या दि.१.१२.२०२० रोजी झालेल्या तिसऱ्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

"कृष्णा पाणी तंटा लवाद संदर्भात इतर राज्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विविध याचिकेवर सुनावणी प्रगतीत असून पुढील वर्षी यावर अंतिम निर्णय अपेक्षित आहे. त्यापूर्वी समितीने अहवाल दिल्यास त्याचा विपरीत परिणाम उपरोक्त सुनावणीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर समितीचा अहवाल जाहीर करावा असे सूचित केले आहे."

सदर गठित समितीच्या दि. ०२ जून, २०२२ व दि. ०३ जून, २०२२ रोजीच्या बैठकीत अहवाल अंतिम करण्यात आला आहे. शासन पत्र दि.१०/०३/२०२३ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर व शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत तज्ञ समितीचा अहवाल गोपनीय स्वरुपात जतन करून ठेवण्याबाबत सूचना दिल्या आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय अद्याप प्राप्त नाही.

**********

राज्य जलनीतीनुसार पुणे शहरास पिण्याचे पाणी दिल्यानंतरच सिंचनाला पाणी देण्याची तरतूद असल्याने खडकवासला प्रकल्पात सिंचनासाठी कमी पाणी उपलब्ध राहते. त्यामुळे जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेला प्रकल्प तरतूदीनुसार पाणी उपलब्ध होत नाही. तसेच सदर योजनेच्या कालव्यांचे अस्तरीकरण झालेले नसल्याने पाण्याचा पाझर मोठ्या प्रमाणात होतो. खडकवासला धरणातून कमी अधिक प्रमाणात उपलब्ध होणा-या पाण्यामधूनच सिंचन करण्यात येते. त्यामुळे दौंड तालुक्यातील दक्षिणेकडील काही गावांना पाणी पुरवठा पूर्ण क्षमतेने करता येत नाही. परंतु उपलब्ध होणारे पाणी समन्यायी तत्वावर सर्व गावांना देण्यात येते.

**पुरंदर उपसा सिंचन योजना**

पुरंदर उपसा सिंचन योजनेचा जलस्त्रोत मुळा- मुठा नदीवर मौजे कोरेगाव मुळ येथील को. प. बंधारा भिवरी येथे असून योजनेचा वार्षिक पाणी वापर ४.०० टि.एम.सी. आहे. पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या मंजुरी प्राप्त संकल्पनेनुसार काम करण्यात येत असुन या अंतर्गत प्रकल्पीय २५४९८ हे. क्षेत्रासाठी ४.०० टि.एम.सी. पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सन २०२३-२४ च्या पावसाळी हंगामात कमी पर्जन्यमान झाल्यामुळे संपूर्ण पुरंदर तालुक्यात सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्यासाठीची तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली.

पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या विविध टप्प्यांवरील पंपगृह क्रमांक १ ते ६ आणि शिंदवणे, कुपटेवाडी, दिवे, राजेवाडी, जाधववाडी, वाघापूर, पिसर्वे, माळशिरस, बारामती या मुख्य वितरीका व त्यावरील लघुवितरिका द्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याद्वारे वेळोवेळी व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचन आवर्तने देण्यात आली. तथापि कडक उन्हाळा व तीव्र पाणीटंचाई तसेच सर्वच वितरिकांच्या लाभक्षेत्रातून एकाच वेळी पाणी सोडण्यासाठी होणाऱ्या मागण्याची पूर्तता करताना पंपिंग यंत्रणात वारंवार होणारे बिघाडामुळे नियोजनाप्रमाणे सिंचनाची आवर्तने पूर्ण करण्यात अनेक अडचणी आल्या. तथापि, शेतकरी /लाभधारक यांना त्यांच्या मागणीनुसार घनमापन पध्दतीने पाणीपुरवठा केला जातो. तसेच शेतकऱ्यांच्या मागणीनुसार समन्यायी पध्दतीने पाणीवाटप करण्यात येते.

पुरंदर उपसा सिंचन योज़ना ही मुळा मुठा नदीतील सांडपाण्यावर कार्यान्वित होणारी योजना असून पुणे मनपा शहराचे निर्मित सांडपाण्यावर पुर्णतः प्रक्रिया करत नसल्यामुळे नदीतील पाणी दूषित होते. या दूषित पाणीवापरामुळे पुरंदर उपसा सिंचन योजनेस ज्या ठिकाणी वॉल्व्ह, विमोचक (Outlet). जोडणी (Connections) आहेत अशा ठिकाणी गंज लागण्याचे प्रमाण जास्त आहेत व ठिकठिकाणी Joint चे ठिकाणी गळती होत आहे. त्या अनुषंगाने पुरंदर उपसा सिंचन योजनेचे परिचलन सुरळीत होण्याच्या दृष्टीने स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत अनुषंगिक कामांच्या रू.४९.१२५ कोटी किंमतीच्या विशेष दुरुस्ती कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर उपसा सिंचन योजनेची मूळ कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने रु.४६०.९५ कोटी किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. प्रकल्प पुर्णत्वाच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

लक्षवेधी सूचना क्र. १८९८

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. हिरामण खोसकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८९८ पुढीलप्रमाणे आहे :-

"वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनीपैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हे. जमिन जाहिर लिलावाद्वारे विक्रीकरण्याचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, भातसा धरण, व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांनी जा.क्र.भाधव्यवि/प्रशा-४/२३४३/सन २०२० दि.१५.९.२०२० अन्वये जिल्हाधिकारी जि.नाशिक या कार्यालयास सादर करण्यात येणे, त्यानुसार उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, जि. नाशिक यांनी पत्र क्र. भूसंपादन/कावि/९६२ दि.६.१०.२०२० अन्वये "सदर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नसल्याचे व सदर जमिनीचे प्रचलित शासन निर्णयानुसार जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यास हरकत नसल्याचे" प्रमाणपत्राची मागणी करण्यात येणे, त्यानुसार सदर प्रकरणी ना-हरकत प्रमाणपत्र देणेसाठी शासनाकडून मान्यता मिळणेकरिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे पत्र क्र. कोंपाविम/तां-३/वैतरणा जलविद्युत/२६७४/सन २०२० दि.२९.१०.२०२० अन्वये शासनास सादर करण्यात येणे, त्यानुसार नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत "वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनीपैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हेक्टर जमिनीपैकी सनं.२७/१ नागोसली, ता.इगतपुरी, जि.नाशिक मधील ७ एकर २८ गुंठे क्षेत्रापैकी १.४८ एकर जमिन ही नागोसली ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी बांधकाम व इतर सुविधांसाठी जमिनी प्रचलित रेडीरेकनरनुसार दर आकारून कायमस्वरूपी हस्तांतरीत करण्यास व उर्वरित अतिरिक्त ६२२.६२ हेक्टर जमिन महसूल विभागाचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करून जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे कामी" "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास शिफारस करण्यासाठी मंजूरी देण्यास नियामक मंडळाची एकमताने मान्यता देण्यात येणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी सतत पाठपुरावा करून मा.मंत्री, जलसंपदा यांनी दि.२५.७.२०२० रोजी वैतरणा जलविद्युत प्रकल्पाचा केलेल्या दौऱ्या दरम्यान अतिरिक्त जमिन मूळमालकांना परत देण्याची केलेली मागणी, परंतु अद्यापही यावर कोणतीच कार्यवाही न झाल्याने या जमिनीच्या मूळ मालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी प्रथम प्रस्तावित ६०५.२४ मीटर इतकी पूर्ण संचय पातळी गृहीत धरून ४,६८९ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आले. प्रत्यक्षात धरणाची उंची ५ फूट कमी करून ६०३.५० मीटर इतक्या पूर्ण संचय पातळीनुसार धरणाचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे बुडीत क्षेत्रासाठी घेण्यात आलेली जमिन अतिरिक्त ठरली. या जमिनी सोबतच धरणाच्या बांधकामासाठी आवश्यक माती / मुरुम मिळविण्यासाठी धरणाच्या बुडित क्षेत्राबाहेरील जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या. सद्यस्थितीत या अतिरिक्त जमिनी विनावापर असून त्या मूळ मालकांना परत करण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे. सदर अतिरिक्त जमिनी स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार मूळ मालकांना परत करण्यासाठीचा प्रस्ताव सन १९८८ मध्ये जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सादर केला. एकूण ६२३.२२ हेक्टर अतिरिक्त जमिनीच्या प्रस्तावांपैकी २७४.६१ हेक्टर एवढे क्षेत्र जिल्हाधिकारी यांनी परत करण्यासाठी घोषित केले होते. परंतू, त्यावेळी संबंधित शेतकऱ्यांनी जमिनीच्या परतीकरिता शासन नियमानुसारची रक्कम न भरल्याने सदर क्षेत्र परत करण्यात आलेले नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०५/०५/१९९७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, महसुल व वन विभाग द्वारा दि. १२/०३/२००४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत :-

"संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या किंवा विनावापर असलेल्या जमिनीची अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता नसेल तर संबंधित जिल्हाधिकारी यांनी अशा बिनशेतीच्या किंवा बिनशेतीची क्षमता प्राप्त झालेल्या जमिनीची केवळ जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात यावी. तसेच या लिलावात मूळ भूधारक सुद्धा भाग घेऊ शकतील. या विक्रीतील निधी संविधानातील मार्गदर्शक तत्वात अभिप्रेत असलेल्या अतियोग्य अशा सार्वजनिक उद्दिष्टांसाठी वापरण्यात यावा."

जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने दि.०१/०९/२००८ रोजीच्या पत्रान्वये वैतरणा प्रकल्पांतर्गत अतिरिक्त जमिनीचे सन २००८ च्या दरसूचीप्रमाणे मुल्यांकन करुन जमिनीची किंमत व सर्व्हे नं. याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना सादर केला.

सदर अतिरिक्त ठरलेल्या जमिनी परत मिळण्याकरीता स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांनी वैतरणा जलविद्युत प्रकल्पाबाबत दि.२९/०७/२०२० रोजी बैठक घेतली. त्यावेळी सदर अतिरिक्त ठरलेल्या जमिनी जाहीर लिलावाद्वारेच देणे शक्य आहे, असे स्पष्ट केले. त्या अनुषंगाने वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनी पैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हे. जमीन जाहीर लिलावाद्वारे विक्री करणे करिताचा प्रस्ताव जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर करण्यात आला. त्यास अनुसरून उप विभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उप विभाग, जि.नाशिक यांच्याकडून "सदर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नसल्याचे व सदर जमिनीची प्रचलित शासन निर्णयानूसार जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यास हरकत नसल्याचे" प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली होती.

याबाबत नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीपैंकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हेक्टर जमिनीपैकी ०.६० हेक्टर जमीन ही नागोसली ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी बांधकाम व इतर सुविधांसाठी प्रचलीत रेडी रेकनरनुसार दर आकारून कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यास व उर्वरित अतिरिक्त ६२२.६२ हेक्टर जमीन महसूल विभागाचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करून जाहीर लिलावद्वारे विक्री करणेकामी "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यासाठीचा प्रस्तावावर शासनास शिफारस करण्यासाठी मंजूरी देण्यास नियामक मंडळाची एकमताने मान्यता दिली आहे.

याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावावर शासन पत्र दि. १८.०८.२०२१ अन्वये, अतिरिक्त ठरलेल्या संपादित जमिनी संपादन संस्थेने जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे सुचित केले. तद्नंतर वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी परत करण्याच्या विषयाबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दि.२६.०५.२०२३ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये प्रायोगिक तत्वावर एका गावाचा प्रस्ताव तयार करून तो शासन मान्यतेस पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सूचित केले.

त्याअनुषंगाने सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मौजे आवळीदुमाला, ता. इगतपुरी, जि. नाशिक या गावातील अतिरिक्त क्षेत्राचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांनी मंजूरीस्तव शासनास सादर केला असून सदर प्रस्तावावर महसूल व वन विभागाकडून कार्यवाही प्रगतीत आहे.

**********************************

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०५/०५/१९९७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, महसुल व वन विभाग द्वारा दि. १२/०३/२००४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत :-

"संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या किंवा विनावापर असलेल्या जमिनीची अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता नसेल तर संबंधित जिल्हाधिकारी यांनी अशा बिनशेतीच्या किंवा बिनशेतीची क्षमता प्राप्त झालेल्या जमिनीची केवळ जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात यावी. तसेच या लिलावात मूळ भूधारक सुद्धा भाग घेऊ शकतील. या विक्रीतील निधी संविधानातील मार्गदर्शक तत्वात अभिप्रेत असलेल्या अतियोग्य अशा सार्वजनिक उद्दिष्टांसाठी वापरण्यात यावा."

जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने दि.०१/०९/२००८ रोजीच्या पत्रान्वये वैतरणा प्रकल्पांतर्गत अतिरिक्त जमिनीचे सन २००८ च्या दरसूचीप्रमाणे मुल्यांकन करुन जमिनीची किंमत व सर्व्हे नं. याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना सादर केला.

सदर अतिरिक्त ठरलेल्या जमिनी परत मिळण्याकरीता स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांनी वैतरणा जलविद्युत प्रकल्पाबाबत दि.२९/०७/२०२० रोजी बैठक घेतली. त्यावेळी सदर अतिरिक्त ठरलेल्या जमिनी जाहीर लिलावाद्वारेच देणे शक्य आहे, असे स्पष्ट केले. त्या अनुषंगाने वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनी पैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हे. जमीन जाहीर लिलावाद्वारे विक्री करणे करिताचा प्रस्ताव जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर करण्यात आला. त्यास अनुसरून उप विभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उप विभाग, जि.नाशिक यांच्याकडून "सदर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नसल्याचे व सदर जमिनीची प्रचलित शासन निर्णयानूसार जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यास हरकत नसल्याचे" प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली होती.

याबाबत नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीपैंकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हेक्टर जमिनीपैकी ०.६० हेक्टर जमीन ही नागोसली ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी बांधकाम व इतर सुविधांसाठी प्रचलीत रेडी रेकनरनुसार दर आकारून कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यास व उर्वरित अतिरिक्त ६२२.६२ हेक्टर जमीन महसूल विभागाचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करून जाहीर लिलावद्वारे विक्री करणेकामी "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यासाठीचा प्रस्तावावर शासनास शिफारस करण्यासाठी मंजूरी देण्यास नियामक मंडळाची एकमताने मान्यता दिली आहे.

याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावावर शासन पत्र दि. १८.०८.२०२१ अन्वये, अतिरिक्त ठरलेल्या संपादित जमिनी संपादन संस्थेने जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे सुचित केले. तद्नंतर वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी परत करण्याच्या विषयाबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दि.२६.०५.२०२३ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये प्रायोगिक तत्वावर एका गावाचा प्रस्ताव तयार करून तो शासन मान्यतेस पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सूचित केले.

त्याअनुषंगाने सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मौजे आवळीदुमाला, ता. इगतपुरी, जि. नाशिक या गावातील अतिरिक्त क्षेत्राचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांनी मंजूरीस्तव शासनास सादर केला असून सदर प्रस्तावावर महसूल व वन विभागाकडून कार्यवाही प्रगतीत आहे.

**********************************

लक्षवेधी सूचना क्र. १८९८

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. हिरामण खोसकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८९८ पुढीलप्रमाणे आहे :-

"वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनीपैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हे. जमिन जाहिर लिलावाद्वारे विक्रीकरण्याचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, भातसा धरण, व्यवस्थापन विभाग, भातसानगर यांनी जा.क्र.भाधव्यवि/प्रशा-४/२३४३/सन २०२० दि.१५.९.२०२० अन्वये जिल्हाधिकारी जि.नाशिक या कार्यालयास सादर करण्यात येणे, त्यानुसार उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, जि. नाशिक यांनी पत्र क्र. भूसंपादन/कावि/९६२ दि.६.१०.२०२० अन्वये "सदर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नसल्याचे व सदर जमिनीचे प्रचलित शासन निर्णयानुसार जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यास हरकत नसल्याचे" प्रमाणपत्राची मागणी करण्यात येणे, त्यानुसार सदर प्रकरणी ना-हरकत प्रमाणपत्र देणेसाठी शासनाकडून मान्यता मिळणेकरिता कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे पत्र क्र. कोंपाविम/तां-३/वैतरणा जलविद्युत/२६७४/सन २०२० दि.२९.१०.२०२० अन्वये शासनास सादर करण्यात येणे, त्यानुसार नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत "वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनीपैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हेक्टर जमिनीपैकी सनं.२७/१ नागोसली, ता.इगतपुरी, जि.नाशिक मधील ७ एकर २८ गुंठे क्षेत्रापैकी १.४८ एकर जमिन ही नागोसली ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी बांधकाम व इतर सुविधांसाठी जमिनी प्रचलित रेडीरेकनरनुसार दर आकारून कायमस्वरूपी हस्तांतरीत करण्यास व उर्वरित अतिरिक्त ६२२.६२ हेक्टर जमिन महसूल विभागाचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करून जाहिर लिलावाद्वारे विक्री करणे कामी" "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास शिफारस करण्यासाठी मंजूरी देण्यास नियामक मंडळाची एकमताने मान्यता देण्यात येणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी सतत पाठपुरावा करून मा.मंत्री, जलसंपदा यांनी दि.२५.७.२०२० रोजी वैतरणा जलविद्युत प्रकल्पाचा केलेल्या दौऱ्या दरम्यान अतिरिक्त जमिन मूळमालकांना परत देण्याची केलेली मागणी, परंतु अद्यापही यावर कोणतीच कार्यवाही न झाल्याने या जमिनीच्या मूळ मालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी प्रथम प्रस्तावित ६०५.२४ मीटर इतकी पूर्ण संचय पातळी गृहीत धरून ४,६८९ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आले. प्रत्यक्षात धरणाची उंची ५ फूट कमी करून ६०३.५० मीटर इतक्या पूर्ण संचय पातळीनुसार धरणाचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे बुडीत क्षेत्रासाठी घेण्यात आलेली जमिन अतिरिक्त ठरली. या जमिनी सोबतच धरणाच्या बांधकामासाठी आवश्यक माती / मुरुम मिळविण्यासाठी धरणाच्या बुडित क्षेत्राबाहेरील जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या. सद्यस्थितीत या अतिरिक्त जमिनी विनावापर असून त्या मूळ मालकांना परत करण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे. सदर अतिरिक्त जमिनी स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार मूळ मालकांना परत करण्यासाठीचा प्रस्ताव सन १९८८ मध्ये जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सादर केला. एकूण ६२३.२२ हेक्टर अतिरिक्त जमिनीच्या प्रस्तावांपैकी २७४.६१ हेक्टर एवढे क्षेत्र जिल्हाधिकारी यांनी परत करण्यासाठी घोषित केले होते. परंतू, त्यावेळी संबंधित शेतकऱ्यांनी जमिनीच्या परतीकरिता शासन नियमानुसारची रक्कम न भरल्याने सदर क्षेत्र परत करण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र विधानसभा

सन -२०२४ चे पावसाळी अधिवेशन

श्री.किसन कथोरे , मा.वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९३२

**"ठाणे जिल्हयातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रातील उल्हास नदीच्या पूरप्रवण क्षेत्राबाबत रेड लाईन व ब्लू लाईनची आखणी मंजूर विकास आराखड्यावर करण्यात आलेली असणे, याबाबत सन २०१९ रोजी जलसंपदा विभागाने सदर नकाशा प्रकाशित केलेला असून सदर पूरप्रणव रेड व ब्लू लाईन रेषेमुळे मंजूर विकास आराखड्यातील मोठ्या प्रमाणात रहिवासी क्षेत्र बाधित झाले असल्यामुळे या परिसरातील मूळ शेतकरी, भूखंडधारक बाधित होणे, याबाबत सदर पूरनियंत्रणरेषेची आखणी करताना कुठल्याही प्रकारची पूर्वसूचना स्थानिक प्राधिकरण नगरपालिका प्रशासन यांना न देता याबाबत सदर पूर नियंत्रण रेषेची आखणी जलसंपदा विभागाने परस्पर केलेली असणे, तसेच यापूर्वी बांधण्यात आलेल्या सदनिका किंवा इमारती यांच्या पुनर्बांधणी करिता परवानगी मिळण्याकरिता अनेक अडचणी निर्माण होणे, तसेच या पूर नियंत्रण रेषेचे आखणी करताना स्थानिक प्राधिकरण, नगरपालिका प्रशासन व नागरिकांकडून कुठल्याही प्रकारच्या सूचना व हरकती घेण्यात आलेल्या नसणे, कुळगाव बदलापूर शहर हे गरीब, मध्यमवर्गीयांचेशहर असणे, याठिकाणी अनेक गरीब मध्यमवर्गीय नोकरदार यांनी स्वतःच्या घरासाठी भूखंड घेतलेले असणे, ते या पूर्ण नियंत्रण रेषेमुळे बाधित झाल्याने त्यांच्यावर अन्याय होणे, या गंभीर प्रश्नाबाबत तत्कालीन माननीय मंत्री जलसंपदा यांच्याकडे बैठका होऊनही त्याबाबत निर्णय न होणे, याबाबत सदर पूर नियंत्रण रेषेचे पुर्निविलोकन करून कुलगाव बदलापूर शहरातील स्थानिक भूखंड धारकांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."**

---

मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा व लाक्षेवि) यांचे निवेदन.

दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीने उल्हास नदी व तिच्या उपनद्यांना पूर आला होता. त्यामुळे उल्हास नदी पात्रालगत बदलापूर, अंबरनाथ नगरपरिषद, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका व या परिसरातील नागरी भागाच्या क्षेत्राचे मोठया प्रमाणावर जिवित व वित्तहानी झाली होती.

मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.१७.०९.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत ठाणे जिल्हयातील नद्यांकरिता पुररेषा (Red Line & Blue Line) सर्वेक्षणाचे व प्रत्यक्ष आखणीचे काम करुन सदर नकाशे नगरविकास व महसूल खात्यास (संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे) त्वरीत सादर करणेचे दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश जलसंपदा विभागास देण्यात आले होते.

त्यानुसार उल्हास नदीच्या पूररेषेची आखणी जलसंपदा विभागाच्या मेरी, नाशिक यांचे दि.१६.११.२०१५ च्या तांत्रिक मार्गदर्शक सूचनांच्या आधारे करण्यात आलेली आहे. सदर पूर रेषा आखताना नदीची पूरवहन क्षमता, तसेच मागील १०० वर्ष व २५ वर्षाच्या पावसाची माहिती लक्षात घेतली जाते व

त्यानुसार नियंत्रित व निषिद्ध क्षेत्राची आखणी केली जाते. सदर क्षेत्रामध्ये पुरादरम्यान पुराचे पाणी वाहून नेण्याच्या दृष्टीने अडथळा होऊ नये म्हणून कोणत्याही बांधकामास प्रतिबंध केला जातो. नदीच्या पूरवहन मार्गात बांधकाम झाल्यास नदीची वहनक्षमता कमी होऊन पुराचे पाणी आजूबाजूच्या शहरात जाऊन जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता वाढते. सदर प्रकिया ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने त्यांची आखणी करताना पूर्वसूचना देण्याची तसेच सूचना व हरकती घेण्याची आवश्यकता नाही.

मेरी, नाशिक यांच्या दि.१६.११.२०१५ रोजीच्या परिपत्रकातील सूचनेनुसार नदीवरील ब्रिजच्या ठिकाणी होणारा Afflux तसेच नदीकाठी असणारी गावे, दाट लोकसंख्येची शहरे, घरे बांधकामे इत्यादी तसेच खाडीची महत्तम पूर पातळी (High Tide Level) व लघुत्तम पूर पातळी (Low Tide Level) विचारात घेण्यात आल्या आहेत व त्यानुसार सदर नकाशे तयार करून जलसंपदा विभागाच्या संकेत स्थळावर दि.११.०६.२०२० रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.२८.०९.२०२२ रोजी झालेल्या बैठकी दरम्यान कुळगाव बदलापूर जि. ठाणे शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पूररेषाचे फेरसर्वेक्षण करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तथापि, सदर पुररेषा आखणी यापूर्वीच शासनाच्या प्रचलित नियम / धोरण वापरुन केली असल्याने पुनश्चः त्याच नियमावर आधारीत पूररेषेचे फेरसर्वेक्षण जलसंपदा विभागामार्फत केल्यास सदर आखणी सारखीच येण्याची शक्यता असल्याने उल्हास नदीच्या पूररेषेच्या पडताळणीचे काम आय.आय.टी., रुरकी या संस्थेकडून करण्याबाबत तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून घेण्याबाबतच्या सुचना जलसंपदा विभागाकडून दि. ०८.०३.२०२३ अन्वये देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार उल्हास नदीच्या पूररेषेचे फेरसर्वेक्षण करण्यासाठी आय.आय.टी., रुरकी यांचेसमवेत बैठकीमध्ये उल्हास नदीचे पुनःश्च सर्वेक्षण हे पुर्ण लांबीकरीता (८४ किमी) करणे अधिक योग्य राहील असे सदर तज्ञांनी सांगितले आहे. त्याकरीता पूर्ण लांबीचे पुनःश्च सर्वेक्षण करण्याकरीता रुपये ३४८.१२ लक्षचे अंदाजपत्रक तयार करुन कुळगांव बदलापूर नगरपरिषदेची मान्यता व निधी मिळणेबाबत दि.२५.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. याबाबत संबधित नगरपरिषदेची मान्यता प्राप्त होऊन निधी वितरीत झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

---

4/612-19

त्यानुसार नियंत्रित व निषिद्ध क्षेत्राची आखणी केली जाते. सदर क्षेत्रामध्ये पुरादरम्यान पुराचे पाणी वाहून नेण्याच्या दृष्टीने अडथळा होऊ नये म्हणून कोणत्याही बांधकामास प्रतिबंध केला जातो. नदीच्या पूरवहन मार्गात बांधकाम झाल्यास नदीची वहनक्षमता कमी होऊन पुराचे पाणी आजूबाजूच्या शहरात जाऊन जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता वाढते. सदर प्रकिया ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने त्यांची आखणी करताना पूर्वसूचना देण्याची तसेच सूचना व हरकती घेण्याची आवश्यकता नाही.

मेरी, नाशिक यांच्या दि.१६.११.२०१५ रोजीच्या परिपत्रकातील सूचनेनुसार नदीवरील ब्रिजच्या ठिकाणी होणारा Afflux तसेच नदीकाठी असणारी गावे, दाट लोकसंख्येची शहरे, घरे बांधकामे इत्यादी तसेच खाडीची महत्तम पूर पातळी (High Tide Level) व लघुत्तम पूर पातळी (Low Tide Level) विचारात घेण्यात आल्या आहेत व त्यानुसार सदर नकाशे तयार करून जलसंपदा विभागाच्या संकेत स्थळावर दि.११.०६.२०२० रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.२८.०९.२०२२ रोजी झालेल्या बैठकी दरम्यान कुळगाव बदलापूर जि. ठाणे शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीच्या पूररेषाचे फेरसर्वेक्षण करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तथापि, सदर पुररेषा आखणी यापूर्वीच शासनाच्या प्रचलित नियम / धोरण वापरुन केली असल्याने पुनश्च: त्याच नियमावर आधारीत पूररेषेचे फेरसर्वेक्षण जलसंपदा विभागामार्फत केल्यास सदर आखणी सारखीच येण्याची शक्यता असल्याने उल्हास नदीच्या पूररेषेच्या पडताळणीचे काम आय.आय.टी., रुरकी या संस्थेकडून करण्याबाबत तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून घेण्याबाबतच्या सुचना जलसंपदा विभागाकडून दि. ०८.०३.२०२३ अन्वये देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार उल्हास नदीच्या पूररेषेचे फेरसर्वेक्षण करण्यासाठी आय.आय.टी., रुरकी यांचेसमवेत बैठकीमध्ये उल्हास नदीचे पुनःश्च सर्वेक्षण हे पुर्ण लांबीकरीता (८४ किमी) करणे अधिक योग्य राहील असे सदर तज्ञांनी सांगितले आहे. त्याकरीता पूर्ण लांबीचे पुनःश्च सर्वेक्षण करण्याकरीता रुपये ३४८.१२ लक्षचे अंदाजपत्रक तयार करुन कुळगांव बदलापूर नगरपरिषदेची मान्यता व निधी मिळणेबाबत दि.२५.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. याबाबत संबधित नगरपरिषदेची मान्यता प्राप्त होऊन निधी वितरीत झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा

सन -२०२४ चे पावसाळी अधिवेशन

श्री.किसन कथोरे , मा.वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९३२

**"ठाणे जिल्हयातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रातील उल्हास नदीच्या पूरप्रवण क्षेत्राबाबत रेड लाईन व ब्लू लाईनची आखणी मंजूर विकास आराखड्यावर करण्यात आलेली असणे, याबाबत सन २०१९ रोजी जलसंपदा विभागाने सदर नकाशा प्रकाशित केलेला असून सदर पूरप्रणव रेड व ब्लू लाईन रेषेमुळे मंजूर विकास आराखड्यातील मोठ्या प्रमाणात रहिवासी क्षेत्र बाधित झाले असल्यामुळे या परिसरातील मूळ शेतकरी, भूखंडधारक बाधित होणे, याबाबत सदर पूरनियंत्रणरेषेची आखणी करताना कुठल्याही प्रकारची पूर्वसूचना स्थानिक प्राधिकरण नगरपालिका प्रशासन यांना न देता याबाबत सदर पूर नियंत्रण रेषेची आखणी जलसंपदा विभागाने परस्पर केलेली असणे, तसेच यापूर्वी बांधण्यात आलेल्या सदनिका किंवा इमारती यांच्या पुनर्बांधणी करिता परवानगी मिळण्याकरिता अनेक अडचणी निर्माण होणे, तसेच या पूर नियंत्रण रेषेचे आखणी करताना स्थानिक प्राधिकरण, नगरपालिका प्रशासन व नागरिकांकडून कुठल्याही प्रकारच्या सूचना व हरकती घेण्यात आलेल्या नसणे, कुळगाव बदलापूर शहर हे गरीब, मध्यमवर्गीयांचेशहर असणे, याठिकाणी अनेक गरीब मध्यमवर्गीय नोकरदार यांनी स्वतःच्या घरासाठी भूखंड घेतलेले असणे, ते या पूर्ण नियंत्रण रेषेमुळे बाधित झाल्याने त्यांच्यावर अन्याय होणे, या गंभीर प्रश्नाबाबत तत्कालीन माननीय मंत्री जलसंपदा यांच्याकडे बैठका होऊनही त्याबाबत निर्णय न होणे, याबाबत सदर पूर नियंत्रण रेषेचे पुर्निविलोकन करून कुलगाव बदलापूर शहरातील स्थानिक भूखंड धारकांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."**

---

मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा व लाक्षेवि) यांचे निवेदन.

दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीने उल्हास नदी व तिच्या उपनद्यांना पूर आला होता. त्यामुळे उल्हास नदी पात्रालगत बदलापूर, अंबरनाथ नगरपरिषद, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका व या परिसरातील नागरी भागाच्या क्षेत्राचे मोठया प्रमाणावर जिवित व वित्तहानी झाली होती.

मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.१७.०९.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत ठाणे जिल्हयातील नद्यांकरिता पुररेषा (Red Line & Blue Line) सर्वेक्षणाचे व प्रत्यक्ष आखणीचे काम करुन सदर नकाशे नगरविकास व महसूल खात्यास (संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे) त्वरीत सादर करणेचे दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश जलसंपदा विभागास देण्यात आले होते.

त्यानुसार उल्हास नदीच्या पूररेषेची आखणी जलसंपदा विभागाच्या मेरी, नाशिक यांचे दि.१६.११.२०१५ च्या तांत्रिक मार्गदर्शक सूचनांच्या आधारे करण्यात आलेली आहे. सदर पूर रेषा आखताना नदीची पूरवहन क्षमता, तसेच मागील १०० वर्ष व २५ वर्षाच्या पावसाची माहिती लक्षात घेतली जाते व

लक्षवेधी सूचना क्र. १९६६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९६६**

"परतुर विधानसभा मतदारसंघाच्या मंठा तालुक्यातील बरबडा आकणी बृहद लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम ९० टक्केच्या वर पूर्ण झाले असून केवळ कंदर भरणी करण्याचे काम बाकी असणे, शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीचा व घरांचा मावेजा देणे बाकी असणे, ३० वर्षापासून धरणाचे काम अपूर्ण असणे, आकणी गावाचे पुनर्वसन करणे, या बृहद लघु पाटबंधारे विभागाच्या प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देणे तसेच परतूर तालुक्यातील आंबा व मंठा तालुक्यातील वाघाळा-टाकळखोपा तळणी, देवठाणा-उस्वद येथील कोल्हापुरी बंधारे फुटलेले असणे, बंधारे फुटल्याने नदीपात्रातील पाणी वाहून जात असणे, त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न गंभीर बनलेला असणे, त्यामुळे या फुटलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याचे रुपांतर उच्च पातळी बंधाऱ्यात करणे याबाबत करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

---

## मा.उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन :-

---

परतूर विधानसभा मतदार संघातील मंठा तालुक्यातील बरबडा आकणी बृहत ल.पा.प्रकल्प ता.मंठा, जि.जालना या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ११.०६ द.ल.घ.मी. एवढी असून प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र १२२५ हेक्टर एवढे आहे. तसेच केदळी, बरबडा, आकणी, हिवरखेडा या गावातील जमिनी प्रकल्पासाठी बाधित होतात. सदर प्रकल्पास शासन निर्णय दि. १०.०४.२००१ अन्वये रु. १२.०९ कोटी ची मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली. तद्नंतर दि.२५.११.२००५ अन्वये रु.२९.८७ कोटीं चा प्रथम सुप्रमा आदेश प्राप्त झाला. सद्यास्थितीत प्रकल्पासाठी आवश्यक रु. ३५५.७७ कोटीचा द्वितीय सु. प्र. मा. प्रस्ताव विचाराधीन आहे.

प्रकल्पाचे काम दि. २४.११.२००३ मध्ये सुरु करण्यात आले. मंजुर प्रथम सुप्रमानुसार आकणी गावाचे पुनर्वसन करावे लागत होते. तथापि, आकणी गावातील लोकांनी मोजणीस विरोध केला होता.

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०६.११.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकित या प्रकल्पाबाबत "धरणाची उंची कमी करुन आकणी गावठाण बाधित होणार नाही या दृष्टीने व प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने अभ्यास करावा" असे कळवण्यात आले होते.

त्यानुसार महामंडळाचे दि. ०८.१२.२०२० रोजी च्या पत्रान्वये पुनश्चः सर्वेक्षण करुन धरणाची पूर्ण संचय पातळी पर्याय १ नुसार ४३८.२० मी ( आकणी गावाचे पूनर्वसन सहित) व पर्याय २ नुसार ४३६.०० मी (आकणी गावाचे पूनर्वसन वगळून) दोन पर्याय सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) नाशिक यांना सादर करण्यात आलेला आहे. पर्याय १ नुसार प्रस्तावाची रक्कम रु. ३५५.७६ कोटी (दरसुची २०१७-२०१८) , पाणीसाठा ११.०७ द.ल.घ.मी, सिंचन क्षेत्र १२२५ हे. व पर्याय २ नुसार प्रस्तावाची रक्कम रु १७२.५१ कोटी , पाणीसाठा ४.२९ द.ल.घ.मी, सिंचन क्षेत्र ५८८ हे. इतके आहे.

पर्याय १ नुसार- ५२३.२१ हे. (६३ .७० हे मौ.आखणी गावाचे पुनर्वसनसह ) व पर्याय २- नुसार - ३८९.८० हे. एवढे भुसंपादन क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी २७२.८० हे क्षेत्राचे भूसंपादन पुर्ण झाले आहे.

सदर सु. प्र. मा. प्रस्ताव अ.मु.स. (वित्त) विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीच्या निर्णयानुसार सदर प्रकल्प तिन्ही मापदंडात बसत

नसल्याने शिफारस केली नाही. या अनुषंगाने उपस्थित अनुपालन करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

परतूर विधानसभा मतदार संघातील मंठा तालुक्यातील बरबडा आकणी बृहत ल.पा.प्रकल्प ता.मंठा, जि.जालना या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ११.०६ द.ल.घ.मी. एवढी असून प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र १२२५ हेक्टर एवढे आहे. तसेच केदळी, बरबडा, आकणी, हिवरखेडा या गावातील जमिनी प्रकल्पासाठी बाधित होतात.

सदर प्रकल्पास शासन निर्णय दि. १०.०४.२००१ अन्वये रू. १२.०९ कोटी ची मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली. तद्नंतर दि.२५.११.२००५ अन्वये रु.२९.८७ कोटी चा प्रथम सुप्रमा आदेश प्राप्त झाला. सद्यास्थितीत प्रकल्पासाठी आवश्यक रु. ३५५.७७ कोटीचा द्वितीय सु. प्र. मा. प्रस्ताव विचाराधीन आहे.

प्रकल्पाचे काम दि. २४.११.२००३ मध्ये सुरु करण्यात आले. मंजुर प्रथम सुप्रमानुसार आकणी गावाचे पुनर्वसन करावे लागत होते. तथापि, आकणी गावातील लोकांनी मोजणीस विरोध केला होता. परंतु प्रकल्पग्रस्तनांचा विरोध आता कमी झाला आहे.

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०६.११.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकित या प्रकल्पाबाबत "धरणाची उंची कमी करुन आकणी गावठाण बाधित होणार नाही या दृष्टीने व प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने अभ्यास करावा" असे कळवण्यात आले होते.

त्यानुसार महामंडळाचे दि. ०८.१२.२०२० रोजी च्या पत्रान्वये पुनश्चः सर्वेक्षण करुन धरणाची पूर्ण संचय पातळी पर्याय १ नुसार ४३८.२० मी ( आकणी गावाचे पूनर्वसन सहित) व पर्याय २ नुसार ४३६.०० मी (आकणी गावाचे पूनर्वसन वगळून) दोन पर्याय सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) नाशिक यांना सादर करण्यात आलेला आहे. पर्याय १ नुसार प्रस्तावाची रक्कम रु. ३५५.७६ कोटी (दरसुची २०१७-२०१८) , पाणीसाठा ११.०७ द.ल.घ.मी, सिंचन क्षेत्र १२२५ हे. व पर्याय २ नुसार प्रस्तावाची रक्कम रु १७२.५१ कोटी , पाणीसाठा ४.२९ द.ल.घ.मी, सिंचन क्षेत्र ५८८ हे. इतके आहे.

पर्याय १ नुसार- ५२३.२१ हे. (६३ .७० हे मौ.आखणी गावाचे पुनर्वसनसह ) व पर्याय २- नुसार - ३८९.८० हे. एवढे भुसंपादन क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी २७२.८० हे क्षेत्राचे भूसंपादन पुर्ण झाले आहे.

सदर सु. प्र. मा. प्रस्ताव अ.मु.स. (वित्त) वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीच्या निर्णयानुसार सदर प्रकल्प तिन्ही मापदंडात बसत नसल्याने शिफारस केली नाही. तथापि, याबाबत उचित निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.

जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील पुर्णा नदीवर वाघाळा, तळणी आणि उस्वद देवठाण हे कोल्हापुर पद्धतीचे बंधारे जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखाली आहेत. लक्षवेधी सुचनेत नमुद टाकळखोपा हा को.प.बंधारा नसून ते तळणी को.प.बंधाऱ्याच्या लाभ क्षेत्रातील एक गाव आहे.

ऑक्टोबर २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पुर्णा नदीवरील तळणी को.प.बंधाऱ्याच्या तीरावरील जमीनीचा काही भाग वाहून गेला होता. त्यानुषंगाने यांत्रीकी विभागाच्या मदतीने वाहून गेलेल्या माती भरावाची दुरूस्ती करण्यात आली असून सन २०२४ च्या पावसाळ्या नंतर सदर को.प.बंधाऱ्यामध्ये पुर्ण क्षमतेने पाणी साठा करून ३११ हेक्टर सिंचन क्षेत्रास पाणी देण्याचे नियोजित आहे.

पुर्णा नदीवरील वाघाळा को.प.बंधाऱ्याच्या डाव्या तीरावरील जमीनीचा काही भाग डिसेंबर १९९७ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे वाहून गेला होता. त्यानुषंगाने सदर को.प.बंधाऱ्याच्या विशेष दुरूस्तीच्या कामास शासनाने मे २००३ मध्ये प्रशासकीय मान्यता व सप्टेंबर २००६ मध्ये प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान

नसल्याने शिफारस केली नाही. या अनुषंगाने उपस्थित अनुपालन करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

परतूर विधानसभा मतदार संघातील मंठा तालुक्यातील बरबडा आकणी बृहत ल.पा.प्रकल्प ता.मंठा, जि.जालना या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ११.०६ द.ल.घ.मी. एवढी असून प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र १२२५ हेक्टर एवढे आहे. तसेच केदळी, बरबडा, आकणी, हिवरखेडा या गावातील जमिनी प्रकल्पासाठी बाधित होतात.

सदर प्रकल्पास शासन निर्णय दि. १०.०४.२००१ अन्वये रू. १२.०९ कोटी ची मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली. तद्नंतर दि.२५.११.२००५ अन्वये रु.२९.८७ कोटी चा प्रथम सुप्रमा आदेश प्राप्त झाला. सद्यास्थितीत प्रकल्पासाठी आवश्यक रु. ३५५.७७ कोटीचा द्वितीय सु. प्र. मा. प्रस्ताव विचाराधीन आहे.

प्रकल्पाचे काम दि. २४.११.२००३ मध्ये सुरु करण्यात आले. मंजुर प्रथम सुप्रमानुसार आकणी गावाचे पुनर्वसन करावे लागत होते. तथापि, आकणी गावातील लोकांनी मोजणीस विरोध केला होता. परंतु प्रकल्पग्रस्तनांचा विरोध आता कमी झाला आहे.

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०६.११.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकित या प्रकल्पाबाबत "धरणाची उंची कमी करुन आकणी गावठाण बाधित होणार नाही या दृष्टीने व प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने अभ्यास करावा" असे कळवण्यात आले होते.

त्यानुसार महामंडळाचे दि. ०८.१२.२०२० रोजी च्या पत्रान्वये पुनश्चः सर्वेक्षण करुन धरणाची पूर्ण संचय पातळी पर्याय १ नुसार ४३८.२० मी ( आकणी गावाचे पूनर्वसन सहित) व पर्याय २ नुसार ४३६.०० मी (आकणी गावाचे पूनर्वसन वगळून) दोन पर्याय सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) नाशिक यांना सादर करण्यात आलेला आहे. पर्याय १ नुसार प्रस्तावाची रक्कम रु. ३५५.७६ कोटी (दरसुची २०१७-२०१८) , पाणीसाठा ११.०७ द.ल.घ.मी, सिंचन क्षेत्र १२२५ हे. व पर्याय २ नुसार प्रस्तावाची रक्कम रु १७२.५१ कोटी , पाणीसाठा ४.२९ द.ल.घ.मी, सिंचन क्षेत्र ५८८ हे. इतके आहे.

पर्याय १ नुसार- ५२३.२१ हे. (६३ .७० हे मौ.आखणी गावाचे पुनर्वसनसह ) व पर्याय २- नुसार - ३८९.८० हे. एवढे भुसंपादन क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी २७२.८० हे क्षेत्राचे भूसंपादन पुर्ण झाले आहे.

सदर सु. प्र. मा. प्रस्ताव अ.मु.स. (वित्त) वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीच्या निर्णयानुसार सदर प्रकल्प तिन्ही मापदंडात बसत नसल्याने शिफारस केली नाही. तथापि, याबाबत उचित निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.

जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील पुर्णा नदीवर वाघाळा, तळणी आणि उस्वद देवठाण हे कोल्हापुर पद्धतीचे बंधारे जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखाली आहेत. लक्षवेधी सुचनेत नमुद टाकळखोपा हा को.प.बंधारा नसून ते तळणी को.प.बंधाऱ्याच्या लाभ क्षेत्रातील एक गाव आहे.

ऑक्टोबर २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पुर्णा नदीवरील तळणी को.प.बंधाऱ्याच्या तीरावरील जमीनीचा काही भाग वाहून गेला होता. त्यानुषंगाने यांत्रीकी विभागाच्या मदतीने वाहून गेलेल्या माती भरावाची दुरुस्ती करण्यात आली असून सन २०२४ च्या पावसाळ्या नंतर सदर को.प.बंधाऱ्यामध्ये पुर्ण क्षमतेने पाणी साठा करून ३११ हेक्टर सिंचन क्षेत्रास पाणी देण्याचे नियोजित आहे.

पुर्णा नदीवरील वाघाळा को.प.बंधाऱ्याच्या डाव्या तीरावरील जमीनीचा काही भाग डिसेंबर १९९७ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे वाहून गेला होता. त्यानुषंगाने सदर को.प.बंधाऱ्याच्या विशेष दुरूस्तीच्या कामास शासनाने मे २००३ मध्ये प्रशासकीय मान्यता व सप्टेंबर २००६ मध्ये प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान

लक्षवेधी सूचना क्र. १९६६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९६६**

"परतुर विधानसभा मतदारसंघाच्या मंठा तालुक्यातील बरबडा आकणी बृहद लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम ९० टक्केच्या वर पूर्ण झाले असून केवळ कंदर भरणी करण्याचे काम बाकी असणे, शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीचा व घरांचा मावेजा देणे बाकी असणे, ३० वर्षापासून धरणाचे काम अपूर्ण असणे, आकणी गावाचे पुनर्वसन करणे, या बृहद लघु पाटबंधारे विभागाच्या प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देणे तसेच परतूर तालुक्यातील आंबा व मंठा तालुक्यातील वाघाळा-टाकळखोपा तळणी, देवठाणा-उस्वद येथील कोल्हापुरी बंधारे फुटलेले असणे, बंधारे फुटल्याने नदीपात्रातील पाणी वाहून जात असणे, त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा प्रश्न गंभीर बनलेला असणे, त्यामुळे या फुटलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याचे रुपांतर उच्च पातळी बंधाऱ्यात करणे याबाबत करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

---

मा.उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन :-

---

परतूर विधानसभा मतदार संघातील मंठा तालुक्यातील बरबडा आकणी बृहत ल.पा.प्रकल्प ता.मंठा, जि.जालना या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ११.०६ द.ल.घ.मी. एवढी असून प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र १२२५ हेक्टर एवढे आहे. तसेच केदळी, बरबडा, आकणी, हिवरखेडा या गावातील जमिनी प्रकल्पासाठी बाधित होतात. सदर प्रकल्पास शासन निर्णय दि. १०.०४.२००१ अन्वये रु. १२.०९ कोटी ची मुळ प्रशासकीय मान्यता मिळाली. तद्नंतर दि.२५.११.२००५ अन्वये रु.२९.८७ कोटीं चा प्रथम सुप्रमा आदेश प्राप्त झाला. सद्यास्थितीत प्रकल्पासाठी आवश्यक रु. ३५५.७७ कोटीचा द्वितीय सु. प्र. मा. प्रस्ताव विचाराधीन आहे.

प्रकल्पाचे काम दि. २४.११.२००३ मध्ये सुरु करण्यात आले. मंजुर प्रथम सुप्रमानुसार आकणी गावाचे पुनर्वसन करावे लागत होते. तथापि, आकणी गावातील लोकांनी मोजणीस विरोध केला होता.

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०६.११.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकित या प्रकल्पाबाबत "धरणाची उंची कमी करुन आकणी गावठाण बाधित होणार नाही या दृष्टीने व प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने अभ्यास करावा" असे कळवण्यात आले होते.

त्यानुसार महामंडळाचे दि. ०८.१२.२०२० रोजी च्या पत्रान्वये पुनश्चः सर्वेक्षण करुन धरणाची पूर्ण संचय पातळी पर्याय १ नुसार ४३८.२० मी ( आकणी गावाचे पूनर्वसन सहित) व पर्याय २ नुसार ४३६.०० मी (आकणी गावाचे पूनर्वसन वगळून) दोन पर्याय सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) नाशिक यांना सादर करण्यात आलेला आहे. पर्याय १ नुसार प्रस्तावाची रक्कम रु. ३५५.७६ कोटी (दरसुची २०१७-२०१८) , पाणीसाठा ११.०७ द.ल.घ.मी, सिंचन क्षेत्र १२२५ हे. व पर्याय २ नुसार प्रस्तावाची रक्कम रु १७२.५१ कोटी , पाणीसाठा ४.२९ द.ल.घ.मी, सिंचन क्षेत्र ५८८ हे. इतके आहे.

पर्याय १ नुसार- ५२३.२१ हे. (६३ .७० हे मौ.आखणी गावाचे पुनर्वसनसह ) व पर्याय २- नुसार - ३८९.८० हे. एवढे भुसंपादन क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी २७२.८० हे क्षेत्राचे भूसंपादन पुर्ण झाले आहे.

सदर सु. प्र. मा. प्रस्ताव अ.मु.स. (वित्त) विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीच्या निर्णयानुसार सदर प्रकल्प तिन्ही मापदंडात बसत

केली होती. तद्नंतर गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने सप्टेंबर २०१८ मध्ये व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. पुर परिस्थितीमुळे काही शेतकऱ्यांची जमीन खचलेली असल्याने सदरील शेतकरी भुसंपादनाची मागणी करीत आहेत. त्यामुळे वाघाळा को.प.बंधाऱ्याच्या कामास शेतकऱ्यांचा अद्यापही विरोध असून बंधाऱ्याच्या विशेष दुरूस्तीचे काम अपूर्ण आहे.

पुर्णा नदीवरील उस्वद देवठाणा को.प.बंधारा ऑक्टोबर २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झाला होता. त्यानुषंगाने सदर क्षतिग्रस्त माती भरावाचे काम नोव्हेंबर २०१९ मध्ये खात्यांतर्गत यांत्रिकी संघटनेच्या मदतीने हाती घेण्यात आले होते. तथापी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी महसूल विभागामार्फत नुकसान भरपाई मिळाल्या शिवाय काम सूरू न होऊ देण्याची भुमिका घेतल्याने दुरुस्तीचे काम सुरू करता आलेले नाही. नुकसानग्रस्त जागेची संयुक्त मोजणी दि.१६/०२/२०२३ रोजी पुर्ण झाली असून पुढील कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतिपथावर आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये क्षतिग्रस्त माती भरावाचे काम पुन:श्च सुरू करण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांशी चर्चा केली असता नुकसान भरपाई मिळेपर्यंत काम सुरू करू देण्यास नकार दर्शविला आहे. माती भरावाचे काम पुन:श्च सुरु करण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय कार्यालयाने यांत्रिकी संघटनेस कळविले आहे.

जालना जिल्ह्यातील पूर्णा व दुधना नदीवरील वाघाळा, तळणी आणि उस्वद देवठाण या सर्व को.प.बंधाऱ्यांचे सिंचन क्षेत्र ६०० हेक्टर पेक्षा कमी आहे. अस्तित्वातील को.प.बंधाऱ्यांचे बॅरेज मध्ये रूपांतरण करणे बाबतचे धोरण निश्चित करणेच्या दृष्टीने समीतीचा अहवाल शासनास प्राप्त असून त्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत लक्षवेधी सुचनेत नमूद को.प.बंधाऱ्यांपैकी १ को.प.बंधाऱ्यांच्या दुरूस्तीची कामे पूर्ण असून वाघाळा व उस्वद देवठाण या दोन को.प.बंधाऱ्यांची दुरूस्तीचे कामे शेतकऱ्यांच्या विरोधामुळे प्रलंबीत आहेत.

*************************

920.

लक्षवेधी सूचना क्र. १९६९

श्री.धिरज देशमुख, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

---

"लातूर जिल्ह्यात माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण होणे, परिणामी मांजरा धरण भरल्याने धरणातून ३२ हजार क्युसेक वेगाने पाणी सोडल्याने धरणाच्या जवळच असलेल्या बोरगाव अंजनपूर (ता.जि.लातूर) बंधाऱ्याचे दरवाजे मोठ्या प्रमाणावर क्षतिग्रस्त होणे, बराजच्या नुकसानीची स्थानिक लोकप्रतिनिधीकडून तात्काळ पाहणी करण्यात येऊन बराजच्या क्षतिग्रस्त दरवाजांची दुरूस्ती करण्याच्या सूचना तत्कालीन पालकमंत्री महोदयांमार्फत जलसंपदा विभागाला केल्या असणे, तदनंतरही याबाबत वारंवार पाठपुरावा करण्यात येणे, मात्र बराजचे दरवाजे क्षतिग्रस्त होऊन जवळपास तीन वर्षे होत आली तरी अद्याप सदर क्षतिग्रस्त दरवाजांची दुरूस्ती झाली नसणे, यामुळे शेतकऱ्यांत तीव्र असंतोष असणे, द्वार दुरूस्तीबाबत वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कामात दिरंगाई करण्यात येणे, संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे बराजची दुरूस्ती प्रलंबित असणे, दुरूस्ती अभावी बराजमध्ये सध्या निरंक पाणीसाठा असणे, दरवाजांची दुरूस्ती वेळेत न झाल्याने शेतकऱ्यांचे दरवर्षी मोठे नुकसान होत असणे, यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आणि बराजची द्वारदुरूस्ती करणेची नितांत आवश्यकता असणे, तत्कालीन अधिकाऱ्यांची निष्काळजीपणा झाल्याने त्यांचेवर शासनाने याबाबतची चौकशी करून व क्षतीग्रस्त बंधाऱ्यांचे दुरूस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

---

## मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

बोरगाव- अंजनपूर निम्न पातळी बंधारा ता.जि.लातूर या बॅरेजचा प्रकल्पीय पाणीसाठा १.५१० दलघमी असुन ३१० हे. सिंचन क्षेत्र आहे. या बॅरेजला गोडबोले पद्धतीचे १० x ४ मी आकाराचे ७ द्वारे असुन सदरील बॅरेज मांजरा प्रकल्प, धनेगाव ता.केज जि.बीड या प्रकल्पापासुन १५.५३ कि.मी. अंतरावर आहे.

सप्टेंबर २०२१ मध्ये मांजरा प्रकल्प ता.केज जि.बीड व अधीनस्त बॅरेजेसच्या पाणलोट क्षेत्रामध्ये अतिवृष्टी होऊन पूर परिस्थिती निर्माण झाली होती. दि. २२/०९/२०२१ रोजी मांजरा प्रकल्पात १००% पाणीसाठा झाल्याने व धरणात येवा सुरू असल्यामुळे दि. २४/०९/२०२१ रोजी मांजरा प्रकल्पातून १४८.८० घ.मी./सेकंद (५२५६ घ.फू./सेकंद) इतका विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला. एकंदरीत निर्माण झालेल्या पूर परिस्थितीमुळे बोरगाव- अंजनपूर निम्न पातळी बंधारा बॅरेजची स्वयंचलीत द्वारे क्षतीग्रस्त झाली. त्यानुषंगाने क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि.३०/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदरील द्वार दुरुस्तीबाबत आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना कळविण्यात आले.

अधीक्षक अभियंता (द्वारे),म.सं.सं. नाशिक यांचे दि.१३/१२/२०२१ रोजी क्षेत्रीय पाहणीनुसार व दि.२२/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त निरिक्षण टिप्पणीनुसार आवश्यक नकाशे व दस्तावेज क्षेत्रीय कार्यालयाच्या दि. ०४/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता (दरवाजे), म.सं.सं, नाशिक यांचे कार्यालयास सादर करण्यात आले. तसेच प्रकल्पास क्षेत्रीय भेट देऊन प्रस्तंभाची सक्षमता तपासून अभिप्राय कळविणेबाबत अधीक्षक अभियंता (धरण), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना अवगत करण्यात आले.

मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास (जसंवि), गारखेडा परिसर, छ.संभाजीनगर यांच्या दि.१३/०६/२०२२ रोजी क्षेत्रीय पाहणी दौऱ्या दरम्यान सदरील द्वार दुरुस्तीबाबत आवश्यक सुचना देण्यात आल्या व दि.१८/०८/२०२२ चे पत्रान्वये गोडबोले गेटची दुरूस्ती कमी वेळेत व किफ़ायतशीर असल्याने गोडबोले गेटच्या दुरूस्तीचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार दि.०९/०५/२०२२, दि. २९/०६/२०२२, दि.२३/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रीय स्तरावरुन गोडबोले गेट्स प्रा. लि. नागपूर या कंपनीकडे पाठपुरावा करुन द्वार दुरुस्तीचे अंदाजपत्रक व रेखाचित्रे प्राप्त करुन घेण्यात आली. तथापि सदरील काम यांत्रिकी बाबींशी संबंधीत असल्याने अंदाजपत्रकाची तपासणी करुन **आवश्यक उपाययोजना सुचविणे, सद्य:स्थितीत पाणीसाठा करणेसाठी आवश्यक उपाययोजना करणे तसेच यापुर्वीचे द्वारे नादुरुस्त होण्याच्या कारणांचा सविस्तर अहवाल उपलब्ध करुन देण्याची विनंती** कार्यकारी अभियंता, मुख्य द्वार उभारणी पथक क्र. ४ औरंगाबाद या यांत्रिकी विभागास करण्यात आली.

दि.१७/११/२०२२ रोजी अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नांदेड यांनी बोरगाव अंजनपूर निम्न पातळी बंधारा ता.जि.लातूर या प्रकल्पाची क्षेत्रीय पाहणी केली असून त्यांच्या कार्यालयाच्या दि.२३/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये "मुळी प्रकल्पाच्या धर्तीवर नवीन उभी उचल द्वार बसविण्याची कार्यवाही झाली तर हे योग्य राहील"असे सुचविले आहे.

मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांचे दि.०९/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अभिप्रायाच्या अनुषंगाने, बोरगाव अंजनपूर येथील बंधा-यावर स्वयंचलित गोडबोले द्वारांऐवजी मुळी प्रकल्पाच्या धर्तीवर नवीन उभी उचल द्वारे बसविण्याबाबतचा प्रस्ताव विशेष दुरुस्ती अंतर्गत सादर करणेबाबत प्रादेशिक कार्यालयाने दि.२०/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरण (मंडळ) कार्यालयास कळविले.

त्यानुसार बोरगाव अंजनपूर, ता.जि.लातूर येथील निम्न पातळी बंधारा द्वार दुरुस्ती बाबत मुळी प्रकल्पाच्या धर्तीवर नवीन उभे उचल द्वारे बसविणेबाबतचा रु.१३.९५ कोटी किंमतीचे विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.०५/१२/२०२३ अन्वये अधीक्षक अभियंता तथा सदस्य सचिव, राज्य तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक या कार्यालयास पाठविण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकावर अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र दि.१८/१२/२०२३ अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयांचा पूर्तता अहवाल महामंडळ कार्यालयाच्या पत्र दि.२८/०२/२०२४ अन्वये, अधीक्षक अभियंता तथा सदस्य सचिव, राज्य तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक यांना सादर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने दि.२४/०४/२०२४ रोजी राज्य

अधीक्षक अभियंता (द्वारे),म.सं.सं. नाशिक यांचे दि.१३/१२/२०२१ रोजी क्षेत्रीय पाहणीनुसार व दि.२२/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त निरिक्षण टिप्पणीनुसार आवश्यक नकाशे व दस्तावेज क्षेत्रीय कार्यालयाच्या दि. ०४/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता (दरवाजे), म.सं.सं, नाशिक यांचे कार्यालयास सादर करण्यात आले. तसेच प्रकल्पास क्षेत्रीय भेट देऊन प्रस्तंभाची सक्षमता तपासून अभिप्राय कळविणेबाबत अधीक्षक अभियंता (धरण), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना अवगत करण्यात आले.

मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास (जसंवि), गारखेडा परिसर, छ.संभाजीनगर यांच्या दि.१३/०६/२०२२ रोजी क्षेत्रीय पाहणी दौऱ्या दरम्यान सदरील द्वार दुरुस्तीबाबत आवश्यक सुचना देण्यात आल्या व दि.१८/०८/२०२२ चे पत्रान्वये गोडबोले गेटची दुरूस्ती कमी वेळेत व किफ़ायतशीर असल्याने गोडबोले गेटच्या दुरूस्तीचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार दि.०९/०५/२०२२, दि. २९/०६/२०२२, दि.२३/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रीय स्तरावरुन गोडबोले गेट्स प्रा. लि. नागपूर या कंपनीकडे पाठपुरावा करुन द्वार दुरुस्तीचे अंदाजपत्रक व रेखाचित्रे प्राप्त करुन घेण्यात आली. तथापि सदरील काम यांत्रिकी बाबींशी संबंधीत असल्याने अंदाजपत्रकाची तपासणी करुन **आवश्यक उपाययोजना सुचविणे, सद्य:स्थितीत पाणीसाठा करणेसाठी आवश्यक उपाययोजना करणे तसेच यापुर्वीचे द्वारे नादुरुस्त होण्याच्या कारणांचा सविस्तर अहवाल उपलब्ध करुन देण्याची विनंती** कार्यकारी अभियंता, मुख्य द्वार उभारणी पथक क्र. ४ औरंगाबाद या यांत्रिकी विभागास करण्यात आली.

दि.१७/११/२०२२ रोजी अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नांदेड यांनी बोरगाव अंजनपूर निम्न पातळी बंधारा ता.जि.लातूर या प्रकल्पाची क्षेत्रीय पाहणी केली असून त्यांच्या कार्यालयाच्या दि.२३/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये "मुळी प्रकल्पाच्या धर्तीवर नवीन उभी उचल द्वार बसविण्याची कार्यवाही झाली तर हे योग्य राहील"असे सुचविले आहे.

मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांचे दि.०९/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अभिप्रायाच्या अनुषंगाने, बोरगाव अंजनपूर येथील बंधा-यावर स्वयंचलित गोडबोले द्वारांऐवजी मुळी प्रकल्पाच्या धर्तीवर नवीन उभी उचल द्वारे बसविण्याबाबतचा प्रस्ताव विशेष दुरुस्ती अंतर्गत सादर करणेबाबत प्रादेशिक कार्यालयाने दि.२०/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरण (मंडळ) कार्यालयास कळविले.

त्यानुसार बोरगाव अंजनपूर, ता.जि.लातूर येथील निम्न पातळी बंधारा द्वार दुरुस्ती बाबत मुळी प्रकल्पाच्या धर्तीवर नवीन उभे उचल द्वारे बसविणेबाबतचा रु.१३.९५ कोटी किंमतीचे विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.०५/१२/२०२३ अन्वये अधीक्षक अभियंता तथा सदस्यं सचिव, राज्य तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक या कार्यालयास पाठविण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकावर अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र दि.१८/१२/२०२३ अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयांचा पूर्तता अहवाल महामंडळ कार्यालयाच्या पत्र दि.२८/०२/२०२४ अन्वये, अधीक्षक अभियंता तथा सदस्य सचिव, राज्य तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक यांना सादर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने दि.२४/०४/२०२४ रोजी राज्य

९३०.

लक्षवेधी सूचना क्र. १९६९

श्री.धिरज देशमुख, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

---

"लातूर जिल्ह्यात माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण होणे, परिणामी मांजरा धरण भरल्याने धरणातून ३२ हजार क्युसेक वेगाने पाणी सोडल्याने धरणाच्या जवळच असलेल्या बोरगाव अंजनपूर (ता.जि.लातूर) बंधाऱ्याचे दरवाजे मोठ्या प्रमाणावर क्षतिग्रस्त होणे, बराजच्या नुकसानीची स्थानिक लोकप्रतिनिधीकडून तात्काळ पाहणी करण्यात येऊन बराजच्या क्षतिग्रस्त दरवाजांची दुरूस्ती करण्याच्या सूचना तत्कालीन पालकमंत्री महोदयांमार्फत जलसंपदा विभागाला केल्या असणे, तदनंतरही याबाबत वारंवार पाठपुरावा करण्यात येणे, मात्र बराजचे दरवाजे क्षतिग्रस्त होऊन जवळपास तीन वर्षे होत आली तरी अद्याप सदर क्षतिग्रस्त दरवाजांची दुरूस्ती झाली नसणे, यामुळे शेतकऱ्यांत तीव्र असंतोष असणे, द्वार दुरूस्तीबाबत वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कामात दिरंगाई करण्यात येणे, संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे बराजची दुरूस्ती प्रलंबित असणे, दुरूस्ती अभावी बराजमध्ये सध्या निरंक पाणीसाठा असणे, दरवाजांची दुरूस्ती वेळेत न झाल्याने शेतकऱ्यांचे दरवर्षी मोठे नुकसान होत असणे, यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आणि बराजची द्वारदुरूस्ती करणेची नितांत आवश्यकता असणे, तत्कालीन अधिकाऱ्यांची निष्काळजीपणा झाल्याने त्यांचेवर शासनाने याबाबतची चौकशी करून व क्षतीग्रस्त बंधाऱ्यांचे दुरूस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

---

## मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

बोरगाव- अंजनपूर निम्न पातळी बंधारा ता.जि.लातूर या बॅरेजचा प्रकल्पीय पाणीसाठा १.५१० दलघमी असुन ३१० हे. सिंचन क्षेत्र आहे. या बॅरेजला गोडबोले पद्धतीचे १० x ४ मी आकाराचे ७ द्वारे असुन सदरील बॅरेज मांजरा प्रकल्प, धनेगाव ता.केज जि.बीड या प्रकल्पापासुन १५.५३ कि.मी. अंतरावर आहे.

सप्टेंबर २०२१ मध्ये मांजरा प्रकल्प ता.केज जि.बीड व अधीनस्त बॅरेजेसच्या पाणलोट क्षेत्रामध्ये अतिवृष्टी होऊन पूर परिस्थिती निर्माण झाली होती. दि. २२/०९/२०२१ रोजी मांजरा प्रकल्पात १००% पाणीसाठा झाल्याने व धरणात येवा सुरु असल्यामुळे दि. २४/०९/२०२१ रोजी मांजरा प्रकल्पातून १४८.८० घ.मी./सेकंद (५२५६ घ.फू./सेकंद) इतका विसर्ग नदीपात्रात सोडण्यात आला. एकंदरीत निर्माण झालेल्या पूर परिस्थितीमुळे बोरगाव- अंजनपूर निम्न पातळी बंधारा बॅरेजची स्वयंचलीत द्वारे क्षतीग्रस्त झाली. त्यानुषंगाने क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि.३०/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदरील द्वार दुरुस्तीबाबत आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना कळविण्यात आले.

तांत्रिक सल्लागार समितीच्या बैठक क्र.२१२ मध्ये विषयांकित प्रस्तावाबाबत चर्चा झाली असुन सदर बैठकीत काही मुद्दे उपस्थित करण्यात आले आहे. सदर मुद्यांचे अनुपालन क्षेत्रीय स्तरावर प्रगतिपथावर आहे.

राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या मान्यतेनंतर शासन स्तरावर अंदाजपत्रकास विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रशासकीय मान्यता देवून आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

**********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. संतोष बांगर, श्री.संजय केळकर,श्री.अस्लम शेख, श्री.शांताराम मोरे, श्री.श्रीनिवास वनगा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४६९ पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यातील दुर्गम आदिवासी भागात विशेषतः डहाणू तालुक्यातील (जि. पालघर) आशागड, गंजाड, जमशेत, सरवली, कौनाड, कासा, चारोटी, सायवन, किन्हवली, दाभाडी, चळणी, इ. दुर्गम भागात महावितरणने दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांना मोफत दिलेली मीटर वीज जोडणी, महावितरणचा भोंगळ कारभार, वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा, मुजोर कंत्राटदारांची चाललेली मनमानी, त्यांच्यावर महावितरणच्या अधिकाऱ्यांचे नसलेले नियंत्रण, नवीन डिजिटल मीटर तांत्रिकदृष्ट्या सदोष असल्यामुळे विद्युत वापरापेक्षा तिप्पट-चौपटीने येत असलेले रिडिंग व वीज बिल, वाढत जाणारी थकबाकी, बिल न भरल्यास महावितरणकडून मीटर काढून नेण्याची होत असलेली कारवाई, अंधारातच जीवन कंठावे लागणार या भीतीने दरमहा आलेले भरमसाठ लाखो रुपयांचे वीज बिल कमी करून घेण्यासाठी महावितरणच्या कार्यालयात होणारी गर्दी, त्यामुळे महावितरणच्या कार्यालयात माराव्या लागणाऱ्या अनेक खेपा आणि ये-जा करण्यासाठी सोसावा लागणारा आर्थिक भुर्दंड व प्रचंड मनस्ताप, सदर महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची सखोल चौकशी करून कारवाई करण्याची ग्रामस्थांनी केलेली मागणी, याबाबत ग्रामस्थांमध्ये महावितरणाबद्दल निर्माण झालेली प्रचंड संतापाची व चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

पालघर जिल्हयातील डहाणू तालुक्यातील महावितरण कंपनीच्या डहाणू उपविभागाअंतर्गत एकुण १० शाखा कार्यालय आहेत. यामध्ये आशागड, चारोटी, डहाणू ग्रामीण व कासा या शाखा कार्यालयांतर्गत अनुक्रमे आशागड, गंजाड, जामशेत, सरावली,चारोटी, कौनाड, कासा, सायवन, किन्हवली, दाभाडी, व चळणी ही गावे येतात.

डहाणू उपविभागांतर्गत महावितरण कंपनीचे एकुण घरगुती ग्राहक ४५९४८ असून त्यापैकी दारिद्ररेषेखालील ग्राहकांची संख्या १७१९ आहे. सदर दारिद्ररेषेखालील वीज ग्राहकांना राजीव गांधी विद्युतीकरण योजना व सौभाग्य योजनेमध्ये वीज जोडणी मोफत देण्यात आली आहे. सदर वीज जोडणीसाठी नाममात्र सुरक्षा ठेव रुपये १५/- घेण्यात आले आहे. सदर वीज ग्राहकांना मीटर रिडींगप्रमाणेच वीज देयक देण्यात येतात. परंतु ८७ दारिद्ररेषेखालील ग्राहकांनी विद्युत बिलाचा भरणा केला नसल्याने त्यांचा वीज पुरवठा नाईलाजास्तव तात्पुरत्या स्वरुपात खंडित करण्यात आला आहे.

महापारेषण कंपनीकडून डहाणू उपविभागात दि.२८.०३.२०२४ ते दि.०६.०६.२०२४ या कालावधीमध्ये आपत्कालीन भारनियमन केल्यामुळे ग्राहकांमध्ये असंतोष होता. परंतू, सदरचे भारनियमन आता बंद झाले आहे. डहाणु उपविभागांतर्गत येणारा भाग हा दुर्गम व दाट जंगलाचा आहे. याठिकाणी वीज पुरवठा करणाऱ्या वाहिन्यांची लांबी खूप जास्त असून माहे एप्रिल व मे २०२४ च्या कालावधीत वादळी वारा, पाऊस चालु असल्यामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले

होते. महावितरण कंपनीकडून माहे मे व जून महिन्यात कर्मचारी व सुचीबध्द कंत्राटदाराकडून देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली असून, सद्यस्थितीत वीज पुरवठा सुरळीत सुरू आहे

वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी व विदयुतहानी कमी (Loss Reduction) करणेसाठी सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) योजनेअंतर्गत डहाणु उपविभागाकरिता एकुण १७.४१ कोटींची कामे मंजूर असून, सदर कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामध्ये एरिअल बंच केबल ९५ कि. मी., ११ के व्ही उच्चदाब वाहिनीची क्षमता वाढ (१०० Sqmm) १०५ कि. मी., तसेच ३३ के. व्ही. उच्चदाब वाहिनी ६४ कि.मी. इत्यादी कामे समाविष्ट आहेत. त्यापैकी, सद्यस्थितीत ११ के.व्ही. उच्चदाब वाहिनी क्षमतावाढ सुमारे ६.० कि.मी., तसेच लघुदाब ए. बी. केबलचे ७ कि.मी. काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

महावितरण मार्फत ई-निविदेच्या माध्यमातून खरेदी केलेले सर्व मीटर प्रथम उत्पादनाच्या ठिकाणी असलेल्या चाचणी केंद्रात महावितरणच्या निकष व भारतीय मानकानुसार तपासण्यात येतात. त्यानंतरच त्या विद्युत मीटरचा महावितरणच्या क्षेत्रीय भांडारात पुरवठा करण्यात येतो. तदनंतर पुरवठा केलेल्या मीटरची नमुना चाचणी महावितरणच्या चाचणी विभागात करण्यात येते. हया दोन्ही चाचणीत पात्र ठरलेल्या मीटरची नमुना गुणवत्ता चाचणी राष्ट्रीयकृत मान्यता प्राप्त चाचणी केंद्रामार्फत करण्यात येते. या सर्व चाचणीत यशस्वीरित्या पात्र झाल्यानंतरच विद्युत मीटर प्रत्यक्ष वापरासाठी महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयांना पुरविण्यात येतात. त्यामुळे महावितरण खरेदी करत असलेले मीटर तांत्रिकदृष्टया सदोष आहेत असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही.

वीज ग्राहकांना त्यांच्या वीज वापराप्रमाणे मीटरवरील नोंदीप्रमाणे वीज देयक प्रणालीमधून वीज देयक देण्यात येते. ग्राहकांचे मीटर रिडींग उपलब्ध नसल्यास किंवा मीटर नादुरुस्त (Faulty) असल्यास अशा ग्राहकांना मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या नियमाप्रमाणे त्यांच्या मागील सरासरी वीज वापरानुसार वीज देयक आकारण्यात येतात. ग्राहकाने वीज देयकाबाबत /मीटरबाबत महावितरणकडे तक्रार केलेली असल्यास आणि तक्रारीचे निराकरण करणे बाकी असेल तर अशा ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात येत नाही. महावितरणकडून थकबाकीदार ग्राहकांना विद्युत कायदा २००३ मधील तरतुदींनुसार थकबाकी भरणेकरिता नोटीस देण्यात येतात व त्या अनुषंगाने पाठपुरावा देखील करण्यात येतो. तरीसुध्दा ग्राहकांनी वीज देयके न भरल्यास नाईलाजास्तव सदर ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात येतो.

ग्राहकांना वीज देयकाबाबत शंका असल्यास ते महावितरणच्या स्थानिक कार्यालयामध्ये अथवा महावितरणच्या ऑनलाईन संपर्क माध्यमाद्वारे (Call centers, Mobile app किंवा WSS) आपली तक्रार नोंदवू शकतात. तसेच देयकांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या त्वरीत दुरुस्त करुन देण्यात येतात. सदर तक्रारीचे त्वरित निरसन करण्यात येते.

महावितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा अखंडित ठेवण्याकरीता व ग्राहकांना अचूक वीज देयके देण्याकरीता कसोशीने प्रयत्न करण्यात येतात. याबाबत नागरिकांकडून महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबतचे निवेदन अथवा तक्रार महावितरणच्या क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

*********************************************

होते. महावितरण कंपनीकडून माहे मे व जून महिन्यात कर्मचारी व सुचीबध्द कंत्राटदाराकडून देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली असून, सद्यस्थितीत वीज पुरवठा सुरळीत सुरू आहे

वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी व विदयुतहानी कमी (Loss Reduction) करणेसाठी सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) योजनेअंतर्गत डहाणु उपविभागाकरिता एकुण १७.४१ कोटींची कामे मंजूर असून, सदर कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामध्ये एरिअल बंच केबल ९५ कि. मी., ११ के व्ही उच्चदाब वाहिनीची क्षमता वाढ (१०० Sqmm) १०५ कि. मी., तसेच ३३ के. व्ही. उच्चदाब वाहिनी ६४ कि.मी. इत्यादी कामे समाविष्ट आहेत. त्यापैकी, सद्यस्थितीत ११ के.व्ही. उच्चदाब वाहिनी क्षमतावाढ सुमारे ६.० कि.मी., तसेच लघुदाब ए. बी. केबलचे ७ कि.मी. काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

महावितरण मार्फत ई-निविदेच्या माध्यमातून खरेदी केलेले सर्व मीटर प्रथम उत्पादनाच्या ठिकाणी असलेल्या चाचणी केंद्रात महावितरणच्या निकष व भारतीय मानकानुसार तपासण्यात येतात. त्यानंतरच त्या विद्युत मीटरचा महावितरणच्या क्षेत्रीय भांडारात पुरवठा करण्यात येतो. तदनंतर पुरवठा केलेल्या मीटरची नमुना चाचणी महावितरणच्या चाचणी विभागात करण्यात येते. ह्या दोन्ही चाचणीत पात्र ठरलेल्या मीटरची नमुना गुणवत्ता चाचणी राष्ट्रीयकृत मान्यता प्राप्त चाचणी केंद्रामार्फत करण्यात येते. या सर्व चाचणीत यशस्वीरित्या पात्र झाल्यानंतरच विद्युत मीटर प्रत्यक्ष वापरासाठी महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयांना पुरविण्यात येतात. त्यामुळे महावितरण खरेदी करत असलेले मीटर तांत्रिकदृष्टया सदोष आहेत असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही.

वीज ग्राहकांना त्यांच्या वीज वापराप्रमाणे मीटरवरील नोंदीप्रमाणे वीज देयक प्रणालीमधून वीज देयक देण्यात येते. ग्राहकांचे मीटर रिडींग उपलब्ध नसल्यास किंवा मीटर नादुरुस्त (Faulty) असल्यास अशा ग्राहकांना मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या नियमाप्रमाणे त्यांच्या मागील सरासरी वीज वापरानुसार वीज देयक आकारण्यात येतात. ग्राहकाने वीज देयकाबाबत /मीटरबाबत महावितरणकडे तक्रार केलेली असल्यास आणि तक्रारीचे निराकरण करणे बाकी असेल तर अशा ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात येत नाही. महावितरणकडून थकबाकीदार ग्राहकांना विद्युत कायदा २००३ मधील तरतुदींनुसार थकबाकी भरणेकरिता नोटीस देण्यात येतात व त्या अनुषंगाने पाठपुरावा देखील करण्यात येतो. तरीसुध्दा ग्राहकांनी वीज देयके न भरल्यास नाईलाजास्तव सदर ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात येतो.

ग्राहकांना वीज देयकाबाबत शंका असल्यास ते महावितरणच्या स्थानिक कार्यालयामध्ये अथवा महावितरणच्या ऑनलाईन संपर्क माध्यमाद्वारे (Call centers, Mobile app किंवा WSS) आपली तक्रार नोंदवू शकतात. तसेच देयकांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या त्वरीत दुरुस्त करुन देण्यात येतात. सदर तक्रारीचे त्वरित निरसन करण्यात येते.

महावितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा अखंडित ठेवण्याकरीता व ग्राहकांना अचूक वीज देयके देण्याकरीता कसोशीने प्रयत्न करण्यात येतात. याबाबत नागरिकांकडून महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबतचे निवेदन अथवा तक्रार महावितरणच्या क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

*******************************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. संतोष बांगर, श्री.संजय केळकर,श्री.अस्लम शेख, श्री.शांताराम मोरे, श्री.श्रीनिवास वनगा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४६९ पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यातील दुर्गम आदिवासी भागात विशेषतः डहाणू तालुक्यातील (जि. पालघर) आशागड, गंजाड, जमशेत, सरवली, कौनाड, कासा, चारोटी, सायवन, किन्हवली, दाभाडी, चळणी, इ. दुर्गम भागात महावितरणने दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांना मोफत दिलेली मीटर वीज जोडणी, महावितरणचा भोंगळ कारभार, वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा, मुजोर कंत्राटदारांची चाललेली मनमानी, त्यांच्यावर महावितरणच्या अधिकाऱ्यांचे नसलेले नियंत्रण, नवीन डिजिटल मीटर तांत्रिकदृष्ट्या सदोष असल्यामुळे विद्युत वापरापेक्षा तिप्पट-चौपटीने येत असलेले रिडिंग व वीज बिल, वाढत जाणारी थकबाकी, बिल न भरल्यास महावितरणकडून मीटर काढून नेण्याची होत असलेली कारवाई, अंधारातच जीवन कंठावे लागणार या भीतीने दरमहा आलेले भरमसाठ लाखो रुपयांचे वीज बिल कमी करून घेण्यासाठी महावितरणच्या कार्यालयात होणारी गर्दी, त्यामुळे महावितरणच्या कार्यालयात माराव्या लागणाऱ्या अनेक खेपा आणि ये-जा करण्यासाठी सोसावा लागणारा आर्थिक भुर्दंड व प्रचंड मनस्ताप, सदर महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची सखोल चौकशी करून कारवाई करण्याची ग्रामस्थांनी केलेली मागणी, याबाबत ग्रामस्थांमध्ये महावितरणाबद्दल निर्माण झालेली प्रचंड संतापाची व चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

पालघर जिल्हयातील डहाणू तालुक्यातील महावितरण कंपनीच्या डहाणू उपविभागाअंतर्गत एकुण १० शाखा कार्यालय आहेत. यामध्ये आशागड, चारोटी, डहाणू ग्रामीण व कासा या शाखा कार्यालयांतर्गत अनुक्रमे आशागड, गंजाड, जामशेत, सरावली,चारोटी, कौनाड, कासा, सायवन, किन्हवली, दाभाडी, व चळणी ही गावे येतात.

डहाणू उपविभागांतर्गत महावितरण कंपनीचे एकुण घरगुती ग्राहक ४५९४८ असून त्यापैकी दारिद्ररेषेखालील ग्राहकांची संख्या १७१९ आहे. सदर दारिद्ररेषेखालील वीज ग्राहकांना राजीव गांधी विद्युतीकरण योजना व सौभाग्य योजनेमध्ये वीज जोडणी मोफत देण्यात आली आहे. सदर वीज जोडणीसाठी नाममात्र सुरक्षा ठेव रुपये १५/- घेण्यात आले आहे. सदर वीज ग्राहकांना मीटर रिडींगप्रमाणेच वीज देयक देण्यात येतात. परंतु ८७ दारिद्ररेषेखालील ग्राहकांनी विद्युत बिलाचा भरणा केला नसल्याने त्यांचा वीज पुरवठा नाईलाजास्तव तात्पुरत्या स्वरुपात खंडित करण्यात आला आहे.

महापारेषण कंपनीकडून डहाणू उपविभागात दि.२८.०३.२०२४ ते दि.०६.०६.२०२४ या कालावधीमध्ये आपत्कालीन भारनियमन केल्यामुळे ग्राहकांमध्ये असंतोष होता. परंतू, सदरचे भारनियमन आता बंद झाले आहे. डहाणु उपविभागांतर्गत येणारा भाग हा दुर्गम व दाट जंगलाचा आहे. याठिकाणी वीज पुरवठा करणाऱ्या वाहिन्यांची लांबी खूप जास्त असून माहे एप्रिल व मे २०२४ च्या कालावधीत वादळी वारा, पाऊस चालु असल्यामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तिसरे(पावसाळी) अधिवेशन

श्री. नानाभाऊ पटोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"भुसावळ (जि.जळगांव) थर्मल पॉवर स्टेशनच्या युनिट नं. ४ व ५ मधून फ्लॉय ॲश विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमीपणा झाला असून आर्थिक घोटाळा होत असल्याचा प्रकार माहे मे, २०२४ च्या दरम्यान निदर्शनास आले असणे, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली असणे, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने कारवाई कराण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे १x२१० मे.वॅ आणि २x५०० मे.वॅ असे एकूण १२१० मे.वॅ क्षमता असलेले एकूण ०३ संच कार्यरत आहेत. सदर तिनही संचांमध्ये कोळसा वापरल्यानंतर फ्लाय ॲश व पॉंड ॲश निर्माण होते. मागील वर्षी २०२३-२४ मध्ये सरासरी ६०.९४ लाख मे.टन एवढा कोळसा वापरला गेला. कोळसा वापरल्यानंतर एकूण २२.८२ लाख मे.टन फ्लाय ॲश व पॉंड ॲश निर्माण झाली. माहे मे, २०२४ मध्ये १.८३ लाख मे.टन फ्लाय ॲश व पॉंड ॲश निर्माण झाली.

सदर फ्लाय ॲशची MOEF & CC व Ministry of Power च्या निकषांनुसार ई-निविदा/ ई-लिलाव/ EoI द्वारे पूर्ण पारदर्शक पध्दतीने विक्री केली जाते. हे ई-लिलाव Metal Scrap Trade Corporation (MSTC) या सरकारी कंपनीमार्फत केले जातात.

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राद्वारे सन २०२३-२४ या वर्षात एकूण १४.५२ लाख मे. टन फ्लाय ॲशची विक्री झालेली आहे. विकलेल्या फ्लाय ॲशचे राजस्व रु. २६.६० कोटी असून दंडात्मक रक्कम रु. ९७.८१ लाख इतकी प्राप्त झाली आहे. तसेच माहे मे २०२४ मध्ये एकूण १.०७ लाख मेट्रिक टन फ्लाय ॲशची विक्री झालेली आहे. विकलेल्या फ्लाय ॲशचे राजस्व रु. २ कोटी असून दंडात्मक रक्कम रु.६.६७ लाख इतकी प्राप्त झाली आहे. भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातील युनिट नं. ४ व ५ बाबत माहे मे, २०२४ च्या दरम्यान फ्लाय ॲशबाबत कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

MOEF&CC च्या सन १९९९, २००३, २००९ आणि २०१६ च्या अधिसूचनेनुसार पाँड ॲश मोफत देण्यात येत होती. दिनांक ३१.१२.२०२१ रोजी MOEF ची नवीनतम अधिसूचना लागु करण्यात आली. त्यामुळे महानिर्मितीच्या संचालक मंडळाच्या दि.०५.०१.२०२३ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार पाँड ॲशच्या विक्रीसाठी भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक ३०.०५.२०२३ रोजी ई-लिलाव प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. ई-लिलावद्वारे पाँड ॲशच्या विक्रीचा दर हा रु. १९३/मे. ट. एवढा प्राप्त झाला असुन विक्री ऑर्डर देण्यात आल्या आहेत. यानंतर ई-लिलावाद्वारे प्राप्त झालेल्या दराविरोधात राख वापरकर्त्यांनी आंदोलन करून पाँड ॲशच्या विक्रीबाबत भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात बऱ्याच तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याकारणाने राख बंधाऱ्यातून पाँड ॲश विक्री सुरू झालेली नाही. याबाबत महानिर्मिती कंपनीद्वारे चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

*****************

MOEF&CC च्या सन १९९९, २००३, २००९ आणि २०१६ च्या अधिसूचनेनुसार पॉंड ॲश मोफत देण्यात येत होती. दिनांक ३१.१२.२०२१ रोजी MOEF ची नवीनतम अधिसूचना लागु करण्यात आली. त्यामुळे महानिर्मितीच्या संचालक मंडळाच्या दि.०५.०१.२०२३ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार पॉंड ॲशच्या विक्रीसाठी भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक ३०.०५.२०२३ रोजी ई-लिलाव प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. ई-लिलावद्वारे पॉंड ॲशच्या विक्रीचा दर हा रु. १९३/मे. ट. एवढा प्राप्त झाला असुन विक्री ऑर्डर देण्यात आल्या आहेत. यानंतर ई-लिलावाद्वारे प्राप्त झालेल्या दराविरोधात राख वापरकर्त्यांनी आंदोलन करून पॉंड ॲशच्या विक्रीबाबत भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात बऱ्याच तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याकारणाने राख बंधाऱ्यातून पॉंड ॲश विक्री सुरू झालेली नाही. याबाबत महानिर्मिती कंपनीद्वारे चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

*****************

लक्षवेधी सूचना क्र.१३३९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तिसरे(पावसाळी) अधिवेशन

श्री. नानाभाऊ पटोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"भुसावळ (जि.जळगांव) थर्मल पॉवर स्टेशनच्या युनिट नं. ४ व ५ मधून फ्लॉय ॲश विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमीपणा झाला असून आर्थिक घोटाळा होत असल्याचा प्रकार माहे मे, २०२४ च्या दरम्यान निदर्शनास आले असणे, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली असणे, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने कारवाई कराण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे १x२१० मे.वॅ आणि २x५०० मे.वॅ असे एकूण १२१० मे.वॅ क्षमता असलेले एकूण ०३ संच कार्यरत आहेत. सदर तिनही संचांमध्ये कोळसा वापरल्यानंतर फलाय ॲश व पॉड ॲश निर्माण होते. मागील वर्षी २०२३-२४ मध्ये सरासरी ६०.९४ लाख मे.टन एवढा कोळसा वापरला गेला. कोळसा वापरल्यानंतर एकूण २२.८२ लाख मे.टन फ्लाय ॲश व पॉड ॲश निर्माण झाली. माहे मे, २०२४ मध्ये १.८३ लाख मे.टन फ्लाय ॲश व पॉड ॲश निर्माण झाली.

सदर फ्लाय ॲशची MOEF & CC व Ministry of Power च्या निकषांनुसार ई-निविदा/ ई-लिलाव/ Eol द्वारे पूर्ण पारदर्शक पध्दतीने विक्री केली जाते. हे ई-लिलाव Metal Scrap Trade Corporation (MSTC) या सरकारी कंपनीमार्फत केले जातात.

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राद्वारे सन २०२३-२४ या वर्षात एकूण १४.५२ लाख मे. टन फ्लाय ॲशची विक्री झालेली आहे. विकलेल्या फ्लाय ॲशचे राजस्व रु. २६.६० कोटी असून दंडात्मक रक्कम रु. ९७.८१ लाख इतकी प्राप्त झाली आहे. तसेच माहे मे २०२४ मध्ये एकूण १.०७ लाख मेट्रिक टन फ्लाय ॲशची विक्री झालेली आहे. विकलेल्या फ्लाय ॲशचे राजस्व रु. २ कोटी असून दंडात्मक रक्कम रु.६.६७ लाख इतकी प्राप्त झाली आहे. भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातील युनिट नं. ४ व ५ बाबत माहे मे, २०२४ च्या दरम्यान फ्लाय ॲशबाबत कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

### मा. श्री. महेश लांडगे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३४५ पुढीलप्रमाणे आहे.

"पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी भागातील औदयोगिक व निवासी अशा दोन्ही पट्ट्यातील वीज ग्राहकांना नियमितपणे वीज समस्यांना गेल्या २० वर्षांपासून सामोरे जावे लागत असणे. समाविष्ट गावात मोठ्या प्रमाणात नागरिकरण वाढले परिणामी वीज यंत्रणा सुधारित व सक्षम करण्यात आलेली नसणे, स्थानिक लोकप्रतिधी म्हूणन गेल्या अधिवेशनात सभागृहात वीज समस्याचा मुद्दा उपस्थित करून ऊर्जामंत्री याबाबत २ महिन्यात वीज समस्या निकाली काढण्यात येईल असे आश्वासन मिळूनही अद्याप वीज समस्या जैसे थे असणे. त्याअनुषगाणे भोसरी भागातील वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी सफारी पार्क मोशी याठिकाणी अतिउच्चदाब उपकेंद्र, चऱ्होली अतिउच्चदाब उपकेंद्र, भोसरी गावठाण येथे नवीन स्विचिंग उपकेंद्र निर्माण करणे तसेच ओव्हरहेड वीज वाहिनीचे भूमिगत वाहिन्या मध्ये रूपांतर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरण कंपनीच्या गणेशखिंड शहर मंडळांतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी गावठाण, चऱ्होली, मोशी, तळवडे, चिखली व अन्य भागात औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी वीज ग्राहकांना अतिउच्चदाब उपकेंद्र - भोसरी आर.एस. १ (स्थापित क्षमता २७५ एम.व्ही.ए,. उच्चतम मागणी १४४ एम.व्ही. ए.), भोसरी आर.एस. २ (स्थापित क्षमता १०० एम.व्ही.ए., उच्चतम मागणी ६९ एम.व्ही.ए.,), टेल्को (स्थापित क्षमता १५० एम.व्ही.ए., उच्चतम मागणी ११८ एम.व्ही.ए.,) व चिंचवड आर.एस. (स्थापित क्षमता १७५ एम.व्ही.ए., उच्चतम मागणी १०० एम.व्ही.ए.,) अशा एकुण चार २२०/२२ केव्ही उप केंद्राद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. तसेच, भोसरी विभागात २२/२२ केव्हीची १० व २२/११ केव्हीची २ उपकेंद्रे आहेत. या सर्व उप केंद्रातून एकूण ९८ उच्चदाब वीज वाहिन्यांद्वारे भोसरी विभागात वीज पुरवठा करण्यात येतो. सदर विभागाअंतर्गत महावितरणची एकूण ४ उप विभागीय कार्यालय व १४ शाखा कार्यालये आहेत. तसेच या विभागात एकूण ग्राहक संख्या ४०२८०२ इतकी असून, त्यापैकी ५७९ उच्चदाब ग्राहक आहेत.

उपरोक्त ४ अतिउच्चदाब उपकेंद्राची एकूण स्थापित क्षमता ७०० एमव्हीए असून उच्चतम मागणी ४३१ एमव्हीए आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सदर विभागातील औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी उपरोक्त ४ अति उच्चदाब उपकेंद्रे आहेत. त्याद्वारे पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी गावठाण,चऱ्होली, मोशी, तळवडे, चिखली या सर्व भागात अखंडीत वीज पुरवठा केला जातो. सदर परिसरात नागरिकांच्या सोयी सुविधा करीता महानगरपालिकेकडून तसेच मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामाकरीता वेळोवेळी अनेक ठिकाणी रस्त्याचे खोदकाम केले जाते. या खोदकामामुळे ३९ वेळा महावितरणच्या एच.टी. व एल.टी केबल नादुरुस्त होऊन वीज पुरवठा खंडीत झाला होता. याबाबत महानगरपालिका व मेट्रो रेल्वे प्रकल्प या विभागास सूचित करण्यात आले असून, महावितरण कंपनीतर्फे सूचीबध्द कंत्राटदाराकडून प्राधान्याने दुरुस्ती करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

भोसरी परिसरात ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा करण्याकरीता महावितरणतर्फे महानगर प्रदेशात प्रणाली मजबूतीकरण करणे (SSMR) योजनेअंतर्गत उच्चदाब उपरी वाहिनी-३.५ कि.मी., उच्चदाब भूमीगत वाहिनी (२२ केव्हीए)-९.५ किमी, नविन रोहित्रे - ६ नग, लघुदाब भूमीगत वाहिनी -

४.५ कि.मी.,लघुदाब उपरी वाहिनी भुमीगत करणे- ४ कि.मी., रिंग मेन युनिट बदलणे - २६ नग इत्यादी कामे करण्यात आलेली आहेत.

तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) योजनेअंतर्गत भोसरी परिसरात रिंग मेन युनिट बदलणे- ३० नग,भूमीगत उच्चदाब वाहिनी- २६.४८ कि.मी.,नविन रोहित्र-१५ नग,लघुदाब वाहिनी- १२.३२ कि.मी. ही कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

मागील अधिवेशनात मा. लोकप्रतिनिधी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवरील चर्चेनुसार वाढत्या वीजेची मागणी लक्षात घेता २२०/२२ केव्ही, २x५० एमव्हीए, सफारी पार्क मोशी, २२०/३३/२२ केव्ही, २x५० एमव्हीए (३३ केव्ही) + २x५० एमव्हीए (२२ केव्ही), प्राईड वर्ल्ड सिटी, चऱ्होली, २२०/२२ KV सेन्चुरी इन्का, भोसरी येथील महापारेषण उपकेंद्रामध्ये अतिरीक्त पावर ट्रान्सफॉर्मर १०० MVA या अति उच्चदाब उपकेंद्राचे प्रस्ताव महापारेषण कंपनीस सादर करण्यात आले आहेत.

या व्यतिरीक्त भोसरी परिसरात सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS Loss Reduction) योजनेअंतर्गत एरियल बंच केबल- १६.८ कि.मी., कॅपॅसिटर बँक (APFC - ४ नग), अपग्रेडेशन ऑफ लाईन- ५ कि.मी., इत्यादी रु. २.२४ कोटींची कामे प्रस्तावित आहेत. सदर बाबतीत Tender प्रक्रिया पूर्ण झाली असून कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले आहेत.

सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS System Strengthening and Modernization) अंतर्गत भोसरी विधानसभा मतदार संघातील वितरण प्रणालीच्या बळकटीकरणासाठी रु ३४६.८३ कोटींची विविध कामे प्रस्तावित असून, यामध्ये नविन उपकेंद्र (२२/११ केव्ही), नविन स्विचिंग स्टेशन (२२/२२ केव्ही) यामध्ये भोसरी गावठाण येथे नवीन स्विचिंग केंद्र समाविष्ट आहे, नविन उच्चदाब भूमीगत वाहिनी, नविन लघुदाब भुमीगत वाहिनी, नविन रोहित्र (२२ केव्ही), रोहित्र क्षमता वाढविणे इत्यादी कामे समाविष्ट आहेत. सदर प्रस्तावात भोसरी परिसरातील ओव्हरहेड वीज वाहिन्यांचे भूमीगत वाहिन्यांमध्ये रुपांतर करणे तसेच तळवडे येथील देवी इंद्रायणी स्विचिंग उपकेंद्रातून स्वतंत्र फिडर व इतर कामे अंतर्भूत आहेत. सदर कामे केंद्र शासनाच्या मंजूरीनंतर निविदा प्रक्रिया राबवुन पुर्ण करण्यात येणार आहेत.

भोसरी गाव अंतर्गत असणाऱ्या औद्योगिक आणि रहिवासी ग्राहकांचा वीज पुरवठा अखंडीत राहण्यासाठी व वाढत्या वीजेची मागणी पूर्ण करण्याकरीता श्री. अंकुशराव लांडगे सभागृहाजवळ, भोसरी येथे सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) या प्रकल्पाअंतर्गत स्विचिंग स्टेशन उभारणीसाठी आवश्यक असलेली १० गुंठे जागा मिळण्यासाठी आयुक्त, पिंपरी चिंचवड, महानगरपालिका यांच्याकडे महावितरणमार्फत पाठपुरवठा करण्यात येत आहे.

तसेच, अतिभारीत वाहिनीचा (ओव्हरलोडेड फिडर) लोड कमी करुन नवीन फिडर काढण्यासाठी रु.३५.४२ कोटी इतक्या रक्कमेची निविदा प्रगतीपथावर आहेत. सदर निविदेमध्ये भोसरी मतदार संघातील औद्योगिक क्षेत्रामधील चार अतिभारीत वाहिनीची रु.८.९१ कोटी इतक्या रकमेची कामे प्रस्तावित असून,सदर कामे लवकरच सुरु करण्यात येणार आहेत. सदर कामे पूर्ण झाल्यानंतर पिंपरी चिंचवड शहरातील वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम होऊन सर्व संवर्गातील वीज ग्राहकांना गुणवत्तापूर्वक अखंडित वीज पुरवठा करण्यास मदत होणार आहे.

*******************************************

४.५ कि.मी.,लघुदाब उपरी वाहिनी भुमीगत करणे- ४ कि.मी., रिंग मेन युनिट बदलणे - २६ नग इत्यादी कामे करण्यात आलेली आहेत.

तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) योजनेअंतर्गत भोसरी परिसरात रिंग मेन युनिट बदलणे- ३० नग,भूमीगत उच्चदाब वाहिनी- २६.४८ कि.मी.,नविन रोहित्र-१५ नग,लघुदाब वाहिनी- १२.३२ कि.मी. ही कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

मागील अधिवेशनात मा. लोकप्रतिनिधी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवरील चर्चेनुसार वाढत्या वीजेची मागणी लक्षात घेता २२०/२२ केव्ही, २x५० एमव्हीए, सफारी पार्क मोशी, २२०/३३/२२ केव्ही, २x५० एमव्हीए (३३ केव्ही) + २x५० एमव्हीए (२२ केव्ही), प्राईड वर्ल्ड सिटी, चऱ्होली, २२०/२२ KV सेन्चुरी इन्का, भोसरी येथील महापारेषण उपकेंद्रामध्ये अतिरीक्त पावर ट्रान्सफॉर्मर १०० MVA या अति उच्चदाब उपकेंद्राचे प्रस्ताव महापारेषण कंपनीस सादर करण्यात आले आहेत.

या व्यतिरीक्त भोसरी परिसरात सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS Loss Reduction) योजनेअंतर्गत एरियल बंच केबल- १६.८ कि.मी., कॅपॅसिटर बँक (APFC - ४ नग), अपग्रेडेशन ऑफ लाईन- ५ कि.मी., इत्यादी रु. २.२४ कोटींची कामे प्रस्तावित आहेत. सदर बाबतीत Tender प्रक्रिया पूर्ण झाली असून कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले आहेत.

सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS System Strengthening and Modernization) अंतर्गत भोसरी विधानसभा मतदार संघातील वितरण प्रणालीच्या बळकटीकरणासाठी रु ३४६.८३ कोटींची विविध कामे प्रस्तावित असून, यामध्ये नविन उपकेंद्र (२२/११ केव्ही), नविन स्विचिंग स्टेशन (२२/२२ केव्ही) यामध्ये भोसरी गावठाण येथे नवीन स्विचिंग केंद्र समाविष्ट आहे, नविन उच्चदाब भूमीगत वाहिनी, नविन लघुदाब भुमीगत वाहिनी, नविन रोहित्र (२२ केव्ही), रोहित्र क्षमता वाढविणे इत्यादी कामे समाविष्ट आहेत. सदर प्रस्तावात भोसरी परिसरातील ओव्हरहेड वीज वाहिन्यांचे भूमीगत वाहिन्यांमध्ये रुपांतर करणे तसेच तळवडे येथील देवी इंद्रायणी स्विचिंग उपकेंद्रातून स्वतंत्र फिडर व इतर कामे अंतर्भूत आहेत. सदर कामे केंद्र शासनाच्या मंजूरीनंतर निविदा प्रक्रिया राबवुन पुर्ण करण्यात येणार आहेत.

भोसरी गाव अंतर्गत असणाऱ्या औद्योगिक आणि रहिवासी ग्राहकांचा वीज पुरवठा अखंडीत राहण्यासाठी व वाढत्या वीजेची मागणी पूर्ण करण्याकरीता श्री. अंकुशराव लांडगे सभागृहाजवळ, भोसरी येथे सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) या प्रकल्पाअंतर्गत स्विचिंग स्टेशन उभारणीसाठी आवश्यक असलेली १० गुंठे जागा मिळण्यासाठी आयुक्त, पिंपरी चिंचवड, महानगरपालिका यांच्याकडे महावितरणमार्फत पाठपुरवठा करण्यात येत आहे.

तसेच, अतिभारीत वाहिनीचा (ओव्हरलोडेड फिडर) लोड कमी करुन नवीन फिडर काढण्यासाठी रु.३५.४२ कोटी इतक्या रक्कमेची निविदा प्रगतीपथावर आहेत. सदर निविदेमध्ये भोसरी मतदार संघातील औद्योगिक क्षेत्रामधील चार अतिभारीत वाहिनीची रु.८.९१ कोटी इतक्या रकमेची कामे प्रस्तावित असून,सदर कामे लवकरच सुरु करण्यात येणार आहेत. सदर कामे पूर्ण झाल्यानंतर पिंपरी चिंचवड शहरातील वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम होऊन सर्व संवर्गातील वीज ग्राहकांना गुणवत्तापूर्वक अखंडित वीज पुरवठा करण्यास मदत होणार आहे.

*********************************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

### मा. श्री. महेश लांडगे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३४५ पुढीलप्रमाणे आहे.

"पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी भागातील औदयोगिक व निवासी अशा दोन्ही पट्ट्यातील वीज ग्राहकांना नियमितपणे वीज समस्यांना गेल्या २० वर्षांपासून सामोरे जावे लागत असणे. समाविष्ट गावात मोठ्या प्रमाणात नागरिकरण वाढले परिणामी वीज यंत्रणा सुधारित व सक्षम करण्यात आलेली नसणे, स्थानिक लोकप्रतिधी म्हूणन गेल्या अधिवेशनात सभागृहात वीज समस्याचा मुद्दा उपस्थित करून ऊर्जामंत्री याबाबत २ महिन्यात वीज समस्या निकाली काढण्यात येईल असे आश्वासन मिळूनही अद्याप वीज समस्या जैसे थे असणे. त्याअनुषगाणे भोसरी भागातील वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी सफारी पार्क मोशी याठिकाणी अतिउच्चदाब उपकेंद्र, चऱ्होली अतिउच्चदाब उपकेंद्र, भोसरी गावठाण येथे नवीन स्विचिंग उपकेंद्र निर्माण करणे तसेच ओव्हरहेड वीज वाहिनीचे भूमिगत वाहिन्या मध्ये रूपांतर करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरण कंपनीच्या गणेशखिंड शहर मंडळांतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी गावठाण, चऱ्होली, मोशी, तळवडे, चिखली व अन्य भागात औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी वीज ग्राहकांना अतिउच्चदाब उपकेंद्र - भोसरी आर.एस. १ (स्थापित क्षमता २७५ एम.व्ही.ए,. उच्चतम मागणी १४४ एम.व्ही. ए.), भोसरी आर.एस. २ (स्थापित क्षमता १०० एम.व्ही.ए., उच्चतम मागणी ६९ एम.व्ही.ए.,), टेल्को (स्थापित क्षमता १५० एम.व्ही.ए., उच्चतम मागणी ११८ एम.व्ही.ए.,) व चिंचवड आर.एस. (स्थापित क्षमता १७५ एम.व्ही.ए., उच्चतम मागणी १०० एम.व्ही.ए.,) अशा एकुण चार २२०/२२ केव्ही उप केंद्राद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. तसेच, भोसरी विभागात २२/२२ केव्हीची १० व २२/११ केव्हीची २ उपकेंद्रे आहेत. या सर्व उप केंद्रातून एकूण ९८ उच्चदाब वीज वाहिन्यांद्वारे भोसरी विभागात वीज पुरवठा करण्यात येतो. सदर विभागाअंतर्गत महावितरणची एकूण ४ उप विभागीय कार्यालय व १४ शाखा कार्यालये आहेत. तसेच या विभागात एकूण ग्राहक संख्या ४०२८०२ इतकी असून, त्यापैकी ५७९ उच्चदाब ग्राहक आहेत.

उपरोक्त ४ अतिउच्चदाब उपकेंद्राची एकूण स्थापित क्षमता ७०० एमव्हीए असून उच्चतम मागणी ४३१ एमव्हीए आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सदर विभागातील औद्योगिक, व्यावसायिक आणि निवासी वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी उपरोक्त ४ अति उच्चदाब उपकेंद्रे आहेत. त्याद्वारे पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी गावठाण,चऱ्होली, मोशी, तळवडे, चिखली या सर्व भागात अखंडीत वीज पुरवठा केला जातो. सदर परिसरात नागरिकांच्या सोयी सुविधा करीता महानगरपालिकेकडून तसेच मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामाकरीता वेळोवेळी अनेक ठिकाणी रस्त्याचे खोदकाम केले जाते. या खोदकामामुळे ३९ वेळा महावितरणच्या एच.टी. व एल.टी केबल नादुरुस्त होऊन वीज पुरवठा खंडीत झाला होता. याबाबत महानगरपालिका व मेट्रो रेल्वे प्रकल्प या विभागास सूचित करण्यात आले असून, महावितरण कंपनीतर्फे सूचीबध्द कंत्राटदाराकडून प्राधान्याने दुरुस्ती करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

भोसरी परिसरात ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा करण्याकरीता महावितरणतर्फे महानगर प्रदेशात प्रणाली मजबूतीकरण करणे (SSMR) योजनेअंतर्गत उच्चदाब उपरी वाहिनी-३.५ कि.मी., उच्चदाब भूमीगत वाहिनी (२२ केव्हीए)-९.५ किमी, नविन रोहित्रे - ६ नग, लघुदाब भूमीगत वाहिनी -

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री. विनोद निकोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.**

"राज्यात ऊर्जा विभागामार्फत "सौभाग्य योजना" राबवित असताना पालघर जिल्ह्यातील पालघर, डहाणू,वाडा,जव्हार,मोखाडा,विक्रमगड,तलासरी व इतर गावांत योजना राबवित असताना शासनाची दिशाभूल करून प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे,उप केंद्रचालक आशागड हे शासकीयकर्मचारी असतानाही त्यांच्या पत्नीच्या नावाने अजेंसी सर्टिफिकेट बनवून कार्यकारीअभियंता व वरिष्ठअधिकाऱ्यांच्या संगनमताने शिवाजीनगर डहाणू येथे पोल लाईनचे काम विनापरवाना कामांची प्रशासकीय मान्यता,तांत्रिक मान्यता नसताना बोगस बिले काढल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास येणे,माहिती अधिकारामार्फत सदर प्रकार उघडकीस आलेला असणे, तसेच लाईफ इलेक्ट्रिकल, श्री.विठ्ठल इलेक्ट्रिकल,धनंजय इलेक्ट्रिकल,मातोश्री इलेक्ट्रिकल,मिस्वहा इलेक्ट्रिकल,साईटत सबिक्षिस, सदगुरु इलेक्ट्रो पॉवर,श्री स्वामी समर्थ इलेक्ट्रिकल,श्री जयेश्वर इलेक्ट्रिकल या एजन्सींनी देखील काही ठिकाणी काम न करता देयके मंजुर करून घेतली असल्याचे निदर्शनास आले असणे,सदर कामांमध्ये पोल, केबल हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे वापरण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन कार्यकती अभियंता यांनी १० टक्के रिटेंशन ठेकेदारांना देण्यांत येणार नाही असे कंत्राटदारांना पत्राद्वारे कळविले होते मात्र त्यानंतर अधिक्षक व कार्यकारी अभियंता यांनी सदर १० टक्के बिले मंजुर केले असल्याचे निदर्शनास आले असणे,सदर कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे पोल, केबल वापरणारे ठेकेदार व काम न करता देयके मंजुर केलेले अधिक्षक व कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई करण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

केंद्र शासनाच्या ऊर्जा विभागाकडून २५ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना (सौभाग्य योजना) सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत देशातील विद्युतीकरण न झालेल्या सर्व घरांचे विद्युतीकरण साध्य करण्यासाठी ग्रामीण तसेच शहरी भागात आर्थिकदृष्टया दुर्बल लाभार्थ्यांच्या विद्युतीकरण न झालेल्या प्रत्येक घराला वीज जोडणी देण्याचे उद्दिष्ट होते. महावितरणने दि.२७.१२.२०१८ रोजीपर्यंत सुमारे १०,९३,६१४ विद्युत जोडण्या पूर्ण करून १००% उद्दिष्ट पूर्ण केले आहे. तसेच, एकूण १५,१७,९२२ इतक्या घरांचे विद्युतीकरण करण्यात आले असून, सौभाग्य योजना ३१ मार्च,२०१९ रोजी पुर्ण करण्यात आली.

महावितरण कंपनीच्या डहाणू उप विभागातील डहाणू ग्रामीण या शाखेअंतर्गत असलेल्या शिवाजीनगर येथे अनधिकृतपणे १२ वीज खांब उभारल्याची तक्रार संबंधित ग्रामस्थांनी दि.१५ फेब्रुवारी २०२४ व दि.६ मार्च २०२४ रोजी मुख्य तपास अधिकारी यांच्याकडे दिली होती. तसेच सदर तक्रारीत श्री. सुनिल चव्हाण, उप केंद्रचालक यांनी आपली पत्नी कल्पना चव्हाण यांच्या मालकीच्या स्वामी समर्थ इलेक्ट्रीकल मार्फत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे नमुद केले होते. तथापि, सदर तक्रारीतील काम सौभाग्य योजनेशी संबंधित नाही.

मुख्य तपास अधिकारी यांनी सदर प्रकरणी दि.०४.०३.२०२४ रोजी खातेनिहाय चौकशी केली आहे. यामध्ये तक्रारीत नमूद केलेले ९ लघुदाब वाहिनीचे पोल व एक स्टड पोल असे एकूण १० पोल हे डहाणू उप विभागीय अधिकारी यांनी महावितरण कंपनीचे Empanelled Agency M/s श्री.स्वामी

समर्थ इलेक्ट्रिकल यांना तोंडी आदेश देऊन दि ०६.०२.२०२४ रोजी उभारले असल्याचे व सदर प्रकरणातील ९ लघुदाब वाहिनीचे पोल, एक स्टड पोल व ऐरीअल बंच केबलचे अंदाजपत्रक सद्यस्थितीत मंजुर नसून, याबाबत ठेकेदार मे.श्री.स्वामी समर्थ इलेक्ट्रिकल यांना कोणतेही देयक अदा करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, सदर कामाची Maintenance Order (MO) मंजूर केलेली नसून, Purchase Order (PO) सुध्दा कोणत्याही सुचिबध्द कंत्राटदाराला देण्यात आलेली नाही. चौकशीमध्ये श्री. सुनिल चव्हाण, उप केंद्रचालक यांच्या पत्नीच्या नावे मे.श्री.स्वामी समर्थ इलेक्ट्रीकल ही एजन्सी नोंदणीकृत असल्याचे आढळून आले आहे. तसेच श्री.चव्हाण यांनी याबाबत महावितरण कंपनीस कोणत्याही प्रकारचे घोषणापत्र सादर केलेले नाही.

मुख्य तपास अधिकारी यांनी दि.२०.०६.२०२४ अन्वये चौकशी अहवाल पालघर (लघु) मंडळ कार्यालयाकडे सादर केला आहे. सदर चौकशी अहवालात डहाणू येथील उप कार्यकारी अभियंता श्री.गणेश दंडगव्हाल व प्रधान यंत्रचालक श्री.सुनील चव्हाण यांच्याविरूध्द झालेल्या गैरवर्तणूकीबाबत आरोप ठेवण्यात आलेले आहेत. त्यानुसार, महावितरणमार्फत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

सौभाग्य योजनेमध्ये झालेल्या कामाचा दर्जा व गुणवत्ता यांची तपासणी केंद्र शासनाने नेमलेल्या त्रयस्थ एजन्सीमार्फत (M/s. Lambent Engineers) करण्यात आली आहे. सदर तपासणीमध्ये महाराष्ट्रात सौभाग्य योजनेअंतर्गत झालेल्या कामांमध्ये एकूण १०६९ ठिकाणी त्रुटी आढळल्या आहेत. त्यानुसार संपुर्ण त्रुटी कंत्राटदारामार्फत दुरूस्त करण्यात आल्या असून, सदर ठिकाणांची पुर्नतपासणी करून त्याची खातरजमा करण्यात आली आहे. पालघर मंडळातसुध्दा सौभाग्य योजनेअंतर्गत कामे पूर्ण झाल्यानंतर केंद्रशासनाने नेमलेल्या त्रयस्थ एजन्सीमार्फत तपासणी (थर्ड पार्टी इन्स्पेक्शन) करण्यात आली होती. या तपासणीमध्ये आढळलेल्या त्रुटीची पुर्तता करून सदर फोटो केंद्रशासनाच्या साक्ष पोर्टलवर अपलोड करण्यात आलेले आहेत.

सौभाग्य योजनेची मार्गदर्शक तत्वे व निविदेतील अटी व शर्तीनुसार योजनेतील कामांमध्ये वापरण्यात आलेले साहित्य पोल, केबल व इतर महत्वाची उपकरणे ही महावितरण कंपनीने प्राधिकृत केलेल्या सूचीबध्द पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यात आली होती. सदर साहित्याची खरेदी करताना सदर पुरवठाधारक कंपनीमध्ये महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांमार्फत साहित्याची गुणवत्ता व चाचणी करून सदर साहित्य वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. पालघर मंडळात पोल, केबल इत्यादी उपकरणांच्या दर्जाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सर्व उप विभागीय कार्यालयांना कामाची पूर्तता झाल्यानंतरच १०% रिटेंशन परतावाकरिता प्रस्ताव सादर करण्यात यावा अशा सुचना देण्यात आल्या होत्या. तद्नंतर उपविभागीय कार्यालयांमार्फत कामात कुठलीही त्रुटी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर लाईफ इलेक्ट्रिकल,श्री.विठ्ठल इलेक्ट्रिकल, धनंजय इलेक्ट्रिकल, मातोश्री इलेक्ट्रिकल,मिस्वाहा इलेक्ट्रिकल,साईदत्त सर्व्हिसेस, सद्गुरु इलेक्ट्रो पॉवर,श्री.स्वामी समर्थ इलेक्ट्रिकल या कंत्राटदारांना १० टक्के रिटेंशन रकमेचा परतावा करण्यात आलेला आहे.

*************************************************

समर्थ इलेक्ट्रिकल यांना तोंडी आदेश देऊन दि ०६.०२.२०२४ रोजी उभारले असल्याचे व सदर प्रकरणातील ९ लघुदाब वाहिनीचे पोल, एक स्टड पोल व ऐरीअल बंच केबलचे अंदाजपत्रक सद्यस्थितीत मंजुर नसून, याबाबत ठेकेदार मे.श्री.स्वामी समर्थ इलेक्ट्रिकल यांना कोणतेही देयक अदा करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, सदर कामाची Maintenance Order (MO) मंजूर केलेली नसून, Purchase Order (PO) सुध्दा कोणत्याही सुचिबध्द कंत्राटदाराला देण्यात आलेली नाही. चौकशीमध्ये श्री. सुनिल चव्हाण, उप केंद्रचालक यांच्या पत्नीच्या नावे मे.श्री.स्वामी समर्थ इलेक्ट्रीकल ही एजन्सी नोंदणीकृत असल्याचे आढळून आले आहे. तसेच श्री.चव्हाण यांनी याबाबत महावितरण कंपनीस कोणत्याही प्रकारचे घोषणापत्र सादर केलेले नाही.

मुख्य तपास अधिकारी यांनी दि.२०.०६.२०२४ अन्वये चौकशी अहवाल पालघर (लघु) मंडळ कार्यालयाकडे सादर केला आहे. सदर चौकशी अहवालात डहाणू येथील उप कार्यकारी अभियंता श्री.गणेश दंडगव्हाल व प्रधान यंत्रचालक श्री.सुनील चव्हाण यांच्याविरूध्द झालेल्या गैरवर्तणूकीबाबत आरोप ठेवण्यात आलेले आहेत. त्यानुसार, महावितरणमार्फत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

सौभाग्य योजनेमध्ये झालेल्या कामाचा दर्जा व गुणवत्ता यांची तपासणी केंद्र शासनाने नेमलेल्या त्रयस्थ एजन्सीमार्फत (M/s. Lambent Engineers) करण्यात आली आहे. सदर तपासणीमध्ये महाराष्ट्रात सौभाग्य योजनेअंतर्गत झालेल्या कामांमध्ये एकूण १०६९ ठिकाणी त्रुटी आढळल्या आहेत. त्यानुसार संपुर्ण त्रुटी कंत्राटदारामार्फत दुरूस्त करण्यात आल्या असून, सदर ठिकाणांची पुर्नतपासणी करून त्याची खातरजमा करण्यात आली आहे. पालघर मंडळातसुध्दा सौभाग्य योजनेअंतर्गत कामे पूर्ण झाल्यानंतर केंद्रशासनाने नेमलेल्या त्रयस्थ एजन्सीमार्फत तपासणी (थर्ड पार्टी इन्स्पेक्शन) करण्यात आली होती. या तपासणीमध्ये आढळलेल्या त्रुटीची पुर्तता करून सदर फोटो केंद्रशासनाच्या साक्ष पोर्टलवर अपलोड करण्यात आलेले आहेत.

सौभाग्य योजनेची मार्गदर्शक तत्वे व निविदेतील अटी व शर्तीनुसार योजनेतील कामांमध्ये वापरण्यात आलेले साहित्य पोल, केबल व इतर महत्वाची उपकरणे ही महावितरण कंपनीने प्राधिकृत केलेल्या सूचीबध्द पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यात आली होती. सदर साहित्याची खरेदी करताना सदर पुरवठाधारक कंपनीमध्ये महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांमार्फत साहित्याची गुणवत्ता व चाचणी करून सदर साहित्य वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. पालघर मंडळात पोल, केबल इत्यादी उपकरणांच्या दर्जाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सर्व उप विभागीय कार्यालयांना कामाची पूर्तता झाल्यानंतरच १०% रिटेंशन परतावाकरिता प्रस्ताव सादर करण्यात यावा अशा सुचना देण्यात आल्या होत्या. तद्नंतर उपविभागीय कार्यालयांमार्फत कामात कुठलीही त्रुटी नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर लाईफ इलेक्ट्रिकल,श्री.विठ्ठल इलेक्ट्रिकल, धनंजय इलेक्ट्रिकल, मातोश्री इलेक्ट्रिकल,मिस्वाहा इलेक्ट्रिकल,साईदत्त सर्व्हिसेस, सद्गुरु इलेक्ट्रो पॉवर,श्री.स्वामी समर्थ इलेक्ट्रिकल या कंत्राटदारांना १० टक्के रिटेंशन रकमेचा परतावा करण्यात आलेला आहे.

*****************************************************

## महाराष्ट्र विधानसभा

९३८.

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री. विनोद निकोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.**

"राज्यात ऊर्जा विभागामार्फत "सौभाग्य योजना" राबवित असताना पालघर जिल्ह्यातील पालघर, डहाणू,वाडा,जव्हार,मोखाडा,विक्रमगड,तलासरी व इतर गावांत योजना राबवित असताना शासनाची दिशाभूल करून प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे,उप केंद्रचालक आशागड हे शासकीयकर्मचारी असतानाही त्यांच्या पत्नीच्या नावाने अजेंसी सर्टिफिकेट बनवून कार्यकारीअभियंता व वरिष्ठअधिकाऱ्यांच्या संगनमताने शिवाजीनगर डहाणू येथे पोल लाईनचे काम विनापरवाना कामांची प्रशासकीय मान्यता,तांत्रिक मान्यता नसताना बोगस बिले काढल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास येणे,माहिती अधिकारामार्फत सदर प्रकार उघडकीस आलेला असणे, तसेच लाईफ इलेक्ट्रिकल, श्री.विठ्ठल इलेक्ट्रिकल,धनंजय इलेक्ट्रिकल,मातोश्री इलेक्ट्रिकल,मिस्वहा इलेक्ट्रिकल,साईटत सबिक्षिस, सदगुरु इलेक्ट्रो पॉवर,श्री स्वामी समर्थ इलेक्ट्रिकल,श्री जयेश्वर इलेक्ट्रिकल या एजन्सींनी देखील काही ठिकाणी काम न करता देयके मंजुर करून घेतली असल्याचे निदर्शनास आले असणे,सदर कामांमध्ये पोल, केबल हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे वापरण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन कार्यकती अभियंता यांनी १० टक्के रिटेंशन ठेकेदारांना देण्यांत येणार नाही असे कंत्राटदारांना पत्राद्वारे कळविले होते मात्र त्यानंतर अधिक्षक व कार्यकारी अभियंता यांनी सदर १० टक्के बिले मंजुर केले असल्याचे निदर्शनास आले असणे,सदर कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे पोल, केबल वापरणारे ठेकेदार व काम न करता देयके मंजुर केलेले अधिक्षक व कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई करण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

केंद्र शासनाच्या ऊर्जा विभागाकडून २५ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना (सौभाग्य योजना) सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत देशातील विद्युतीकरण न झालेल्या सर्व घरांचे विद्युतीकरण साध्य करण्यासाठी ग्रामीण तसेच शहरी भागात आर्थिकदृष्टया दुर्बल लाभार्थ्यांच्या विद्युतीकरण न झालेल्या प्रत्येक घराला वीज जोडणी देण्याचे उद्दिष्ट होते. महावितरणने दि.२७.१२.२०१८ रोजीपर्यंत सुमारे १०,९३,६१४ विद्युत जोडण्या पूर्ण करून १००% उद्दिष्ट पूर्ण केले आहे. तसेच, एकूण १५,१७,९२२ इतक्या घरांचे विद्युतीकरण करण्यात आले असून, सौभाग्य योजना ३१ मार्च,२०१९ रोजी पुर्ण करण्यात आली.

महावितरण कंपनीच्या डहाणू उप विभागातील डहाणू ग्रामीण या शाखेअंतर्गत असलेल्या शिवाजीनगर येथे अनधिकृतपणे १२ वीज खांब उभारल्याची तक्रार संबंधित ग्रामस्थांनी दि.१५ फेब्रुवारी २०२४ व दि.६ मार्च २०२४ रोजी मुख्य तपास अधिकारी यांच्याकडे दिली होती. तसेच सदर तक्रारीत श्री. सुनिल चव्हाण, उप केंद्रचालक यांनी आपली पत्नी कल्पना चव्हाण यांच्या मालकीच्या स्वामी समर्थ इलेक्ट्रीकल मार्फत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे नमुद केले होते. तथापि, सदर तक्रारीतील काम सौभाग्य योजनेशी संबंधित नाही.

मुख्य तपास अधिकारी यांनी सदर प्रकरणी दि.०४.०३.२०२४ रोजी खातेनिहाय चौकशी केली आहे. यामध्ये तक्रारीत नमूद केलेले ९ लघुदाब वाहिनीचे पोल व एक स्टड पोल असे एकूण १० पोल हे डहाणू उप विभागीय अधिकारी यांनी महावितरण कंपनीचे Empanelled Agency M/s श्री.स्वामी

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. किशोर जोरगेवार, श्री. विकास ठाकरे,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. भास्कर जाधव,श्री. संजय पोतनीस,श्रीमती यामिनी जाधव,श्री. अस्लम शेख,श्री.प्रताप सरनाईक,श्री.सुनिल प्रभू,श्री.नानाभाऊ पटोले,विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६५१ पुढील प्रमाणे आहे.

"केंद्र व राज्य शासन वीज महावितरणने राज्यात खासगी कंपन्यांच्या माध्यमातून जुने मीटर काढून राज्यातील तब्बल ०२ कोटी ग्राहकांच्या घरी व्यावसायिकांच्या ठिकाणी, छोटे-मोठे दुकानदारांना नवीन प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याचे धोरण अवलंबविल्याने गरीब वीज ग्राहकांवर व जनतेवर अन्याय होणे, स्मार्ट प्रीपेड वीज मीटरसाठी महावितरण कंपनीला सुमारे २७ हजार कोटी रुपये खर्च करावे लागणार असून त्यापैकी ६० टक्के रक्कम केंद्र सरकारकडून अनुदानरुपाने मिळणार असून उर्वरित जवळपास ४० टक्के म्हणजे १९ हजार कोटी रुपयाची रक्कम महावितरण कंपनीला कर्जरुपाने उभारावी लागणार असल्याने त्याचा भार वीज दरवाढीच्या माध्यमातून सामान्य वीज ग्राहकांवर पडणार असल्याने शासनाच्या या धोरणामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत या स्मार्ट प्रीपेड वीज मीटरला राज्यातील जागरुक वीज ग्राहकांनी, जनप्रतिनिधींनी व कार्यकर्त्यांनी या प्रीपेड स्मार्ट मीटरच्या विरोधात माहे जुलै, २०२४ मध्ये विधिमंडळ पावसाळी अधिवेशन दरम्यान तीव्र आंदोलन करण्याचा घेतलेला निर्धार, याबाबत शासनाने खाजगी कंपन्यांकडून राज्यात जुने मीटर काढून नवीन प्रीपेड वीज रुपांतरित करण्यात येणार असल्याने या अल्पकारक निर्णयावर निर्बंध घालून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने जूलै, २०२० मध्ये सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) जाहीर केली आहे. या योजनेमुळे वीज वितरण कंपन्यांची गुणवत्ता व विश्वासार्हतेचे निर्देशांक वाढून आर्थिक दृष्टीने सक्षम होण्यास मदत होईल. या प्रणालीमुळे एकुण तांत्रिक व व्यावसायिक हानी कमी होऊन वीज पुरवठयाची सरासरी किंमत व वीज दर कमी होण्यास मदत होणार आहे.

स्मार्ट मीटरचे विविध फायदे विचारात घेऊन केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने दि. २६.०२.२०२१ रोजी सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर लावण्याचे आदेश दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या दि.१७.०८.२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार डिसेंबर, २०२३ ते मार्च, २०२५ या कालावधीत सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविणे सक्तीचे करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याला पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड च्या दि.२२.०९.२०२२ आदेशाद्वारे स्मार्ट मीटर प्रकल्पाकरिता मंजूरी दिलेली आहे. सुधारित वितरण क्षेत्र (RDSS) योजनेअंतर्गत स्मार्ट मीटर बसविण्यासाठी रुरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन लिमिटेड (RECL) द्वारे दिलेल्या सुधारीत Standard Bidding Document प्रमाणे महावितरण मार्फत ई-निविदा प्रकाशित करण्यात आल्या होत्या. ०६ निविदाधारकांनी यामध्ये भाग घेतला. त्यापैकी निविदेतील अटी व शर्तीनुसार पात्र ०४ निविदाधारकांना कार्यादेश देण्यात आले आहेत. निविदेतील तरतुदीनुसार पारदर्शकरित्या कार्यवाही करून स्पर्धात्मक पद्धतीने निविदा निश्चित करण्यात आल्या आहेत. सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) सर्व कामांच्या निविदा प्रक्रियेपासून ते

अंमलबजावणीपर्यंत केंद्र शासनाची RECPDCL ही त्रयस्थ संस्था Project Management Agency म्हणून काम पाहत आहे. तसेच सुधारित वितरण क्षेत्र योजने (RDSS) प्रकल्पाला मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून आवश्यक मंजुरी प्राप्त आहे.

स्मार्ट मीटर बसविण्यासाठी लागणारा खर्च केंद्र सरकार व महावितरण यांच्यामार्फत संयुक्तपणे केला जाणार आहे. यासाठी केंद्र शासनाकडून महावितरणला ग्राहक मीटरसाठी रु.९०० प्रति मीटर, रोहित्र मीटरसाठी रु. ३,४५० प्रति मीटर व वाहिनी मीटरसाठी रु. ६,३०० प्रति मीटर इतके अनुदान देण्यात येणार आहे. स्मार्ट मीटर बसविल्यामुळे वाणिज्यिक हानी कमी होऊन, प्राप्त होणाऱ्या अतिरिक्त महसूलातून स्मार्ट मीटर बसविण्यासाठी लागणारा खर्च भागविण्यात येणार आहे.

स्मार्ट मीटरसाठी महावितरणद्वारे दिलेल्या निविदांचे दर इतर राज्याच्या तुलनेत वाजवी आहेत. स्मार्ट मीटरचा दर केवळ स्मार्ट मीटरची किंमत नसून, यामध्ये स्मार्ट मीटर प्रणाली यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या हेड एन्ड सिस्टम, मीटर बसविण्यासाठी लागणारे इतर साहित्य, ९३ महिने मीटर रिंडीग व देखभालीचा खर्च तसेच यासाठी लागणाऱ्या तांत्रिक प्रणालीची किंमत यामध्ये समाविष्ठ आहे. यामध्ये निविदाधारकांना कोणतेही आगाऊ भुगतान होणार नाही. सदर निविदा Totex Model (Capital Expenditure + Operation and Maintenance) वर आधारित असून, मीटर लावुन पुढील १० वर्षापर्यंत दुरूस्ती देखभालाची जबाबदारी निविदाधारकाची आहे. दर महिन्याला प्रति मीटर देयक Service Level Agreement प्रमाणे महावितरण तर्फे निविदाधारकाला देण्यात येणार आहे. यासाठी महावितरणला कर्ज घ्यावे लागणार नाही.

स्मार्ट मीटर ग्राहकाला मोफतच लावण्यात येणार असून, त्यामध्ये बिघाड झाल्यास तो दुरुस्त करुन पूर्ववत करण्याची जबाबदारी ही पुढील १० वर्षासाठी संबंधीत कंत्राटदाराची असणार आहे. स्मार्ट मीटर बसविण्याकरीता ग्राहकांकडून कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत नाही. तसेच सद्य:स्थितीत स्मार्ट मीटरमुळे घरगुती/व्यावसायिक वीज दरामध्ये बदल होणार नाहीत. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविण्याचे धोरण अवलंबविल्याने गरीब वीज ग्राहकांवर व जनतेवर अन्याय होतो असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

सदर योजनेद्वारे सिस्टीम मीटरिंग अंतर्गत सबस्टेशनमधील सर्व फीडरवर तसेच वितरण रोहित्रांवर (Distribution Transformer) आणि सर्व सरकारी कार्यालयांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांचे सक्षमीकरण होणार आहे.

स्मार्ट मीटरद्वारे स्वयंचलित रिडींग यंत्रणेमार्फत नोंदविलेल्या रिडींगमुळे मानवी चूका कमी होऊन ग्राहकांना योग्य वीज बील मिळेल व वितरण कंपनीकडून जलद ग्राहक सेवा प्राप्त होण्यास मदत होईल. स्मार्ट मीटरद्वारे अधिक अचूक रिडींग उपलब्ध झाल्यामुळे बिलिंग संबधीत तक्रारींचे प्रमाण नगण्य होण्यास मदत होणार आहे. तसेच, स्मार्ट मीटर ग्राहकांना त्यांच्या विजेच्या वास्तविक (Real Time) वापराची माहिती २४ X ७ उपलब्ध होईल. यासाठी मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असुन त्यामुळे ग्राहकांस इष्टतम वापर करुन बिलात बचत करण्यास मदत होणार आहे.

भविष्यात सौरऊर्जा मोठया प्रमाणात स्वस्त दरात उपलब्ध होणार आहे. मोबाईल ॲपमुळे वीज वापराचा Time Zone समजत असल्यामुळे ग्राहकांना अतिरिक्त वीज उपलब्ध असण्याच्या कालावधीत अधिक वापर (कमी दराने) व कमी वीज उपलब्धतेच्या कालावधीत (अधिक दराने असणाऱ्या) कमी / आवश्यक वापर करणे सहज शक्य होईल व त्यामुळे ग्राहकास वीज बिलाची बचत करणे सहज शक्य होणार आहे. ऊर्जा वापराच्या पद्धतींवर तपशीलवार माहिती उपलब्ध झाल्याने विद्युत कंपन्यांना वीजेचे नियोजन प्रभावीपणे करणे शक्य होईल. त्याचा पर्यायाने ग्राहकांनाच फायदा होऊन दर्जेदार वीज पुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

********************************************

अंमलबजावणीपर्यंत केंद्र शासनाची RECPDCL ही त्रयस्थ संस्था Project Management Agency म्हणून काम पाहत आहे. तसेच सुधारित वितरण क्षेत्र योजने (RDSS) प्रकल्पाला मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून आवश्यक मंजुरी प्राप्त आहे.

स्मार्ट मीटर बसविण्यासाठी लागणारा खर्च केंद्र सरकार व महावितरण यांच्यामार्फत संयुक्तपणे केला जाणार आहे. यासाठी केंद्र शासनाकडून महावितरणला ग्राहक मीटरसाठी रु.९०० प्रति मीटर, रोहित्र मीटरसाठी रु. ३,४५० प्रति मीटर व वाहिनी मीटरसाठी रु. ६,३०० प्रति मीटर इतके अनुदान देण्यात येणार आहे. स्मार्ट मीटर बसविल्यामुळे वाणिज्यिक हानी कमी होऊन, प्राप्त होणाऱ्या अतिरिक्त महसूलातून स्मार्ट मीटर बसविण्यासाठी लागणारा खर्च भागविण्यात येणार आहे.

स्मार्ट मीटरसाठी महावितरणद्वारे दिलेल्या निविदांचे दर इतर राज्याच्या तुलनेत वाजवी आहेत. स्मार्ट मीटरचा दर केवळ स्मार्ट मीटरची किंमत नसून, यामध्ये स्मार्ट मीटर प्रणाली यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या हेड एन्ड सिस्टम, मीटर बसविण्यासाठी लागणारे इतर साहित्य, ९३ महिने मीटर रिडींग व देखभालीचा खर्च तसेच यासाठी लागणाऱ्या तांत्रिक प्रणालीची किंमत यामध्ये समाविष्ठ आहे. यामध्ये निविदाधारकांना कोणतेही आगाऊ भुगतान होणार नाही. सदर निविदा Totex Model (Capital Expenditure + Operation and Maintenance) वर आधारित असून, मीटर लावुन पुढील १० वर्षापर्यंत दुरूस्ती देखभालाची जबाबदारी निविदाधारकाची आहे. दर महिन्याला प्रति मीटर देयक Service Level Agreement प्रमाणे महावितरण तर्फे निविदाधारकाला देण्यात येणार आहे. यासाठी महावितरणला कर्ज घ्यावे लागणार नाही.

स्मार्ट मीटर ग्राहकाला मोफतच लावण्यात येणार असून, त्यामध्ये बिघाड झाल्यास तो दुरुस्त करुन पूर्ववत करण्याची जबाबदारी ही पुढील १० वर्षांसाठी संबंधीत कंत्राटदाराची असणार आहे. स्मार्ट मीटर बसविण्याकरीता ग्राहकांकडून कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत नाही. तसेच सद्य:स्थितीत स्मार्ट मीटरमुळे घरगुती/व्यावसायिक वीज दरामध्ये बदल होणार नाहीत. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविण्याचे धोरण अवलंबविल्याने गरीब वीज ग्राहकांवर व जनतेवर अन्याय होतो असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

सदर योजनेद्वारे सिस्टीम मीटरिंग अंतर्गत सबस्टेशनमधील सर्व फीडरवर तसेच वितरण रोहित्रांवर (Distribution Transformer) आणि सर्व सरकारी कार्यालयांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांचे सक्षमीकरण होणार आहे.

स्मार्ट मीटरद्वारे स्वयंचलित रिडींग यंत्रणेमार्फत नोंदविलेल्या रिडींगमुळे मानवी चूका कमी होऊन ग्राहकांना योग्य वीज बील मिळेल व वितरण कंपनीकडून जलद ग्राहक सेवा प्राप्त होण्यास मदत होईल. स्मार्ट मीटरद्वारे अधिक अचूक रिडींग उपलब्ध झाल्यामुळे बिलिंग संबधीत तक्रारींचे प्रमाण नगण्य होण्यास मदत होणार आहे. तसेच, स्मार्ट मीटर ग्राहकांना त्यांच्या विजेच्या वास्तविक (Real Time) वापराची माहिती २४ X ७ उपलब्ध होईल. यासाठी मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असुन त्यामुळे ग्राहकांस इष्टतम वापर करुन बिलात बचत करण्यास मदत होणार आहे.

भविष्यात सौरऊर्जा मोठया प्रमाणात स्वस्त दरात उपलब्ध होणार आहे. मोबाईल ॲपमुळे वीज वापराचा Time Zone समजत असल्यामुळे ग्राहकांना अतिरिक्त वीज उपलब्ध असण्याच्या कालावधीत अधिक वापर (कमी दराने) व कमी वीज उपलब्धतेच्या कालावधीत (अधिक दराने असणाऱ्या) कमी / आवश्यक वापर करणे सहज शक्य होईल व त्यामुळे ग्राहकास वीज बिलाची बचत करणे सहज शक्य होणार आहे. ऊर्जा वापराच्या पद्धतींवर तपशीलवार माहिती उपलब्ध झाल्याने विद्युत कंपन्यांना वीजेचे नियोजन प्रभावीपणे करणे शक्य होईल. त्याचा पर्यायाने ग्राहकांनाच फायदा होऊन दर्जेदार वीज पुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

*******************************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. किशोर जोरगेवार, श्री. विकास ठाकरे,श्री. विजय वडेट्टीवार,श्री. भास्कर जाधव,श्री. संजय पोतनीस,श्रीमती यामिनी जाधव,श्री. अस्लम शेख,श्री.प्रताप सरनाईक,श्री.सुनिल प्रभू,श्री.नानाभाऊ पटोले,विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६५१ पुढील प्रमाणे आहे.

"केंद्र व राज्य शासन वीज महावितरणने राज्यात खासगी कंपन्यांच्या माध्यमातून जुने मीटर काढून राज्यातील तब्बल ०२ कोटी ग्राहकांच्या घरी व्यावसायिकांच्या ठिकाणी, छोटे-मोठे दुकानदारांना नवीन प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याचे धोरण अवलंबविल्याने गरीब वीज ग्राहकांवर व जनतेवर अन्याय होणे, स्मार्ट प्रीपेड वीज मीटरसाठी महावितरण कंपनीला सुमारे २७ हजार कोटी रुपये खर्च करावे लागणार असून त्यापैकी ६० टक्के रक्कम केंद्र सरकारकडून अनुदानरुपाने मिळणार असून उर्वरित जवळपास ४० टक्के म्हणजे १९ हजार कोटी रुपयाची रक्कम महावितरण कंपनीला कर्जरुपाने उभारावी लागणार असल्याने त्याचा भार वीज दरवाढीच्या माध्यमातून सामान्य वीज ग्राहकांवर पडणार असल्याने शासनाच्या या धोरणामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत या स्मार्ट प्रीपेड वीज मीटरला राज्यातील जागरुक वीज ग्राहकांनी, जनप्रतिनिधींनी व कार्यकर्त्यांनी या प्रीपेड स्मार्ट मीटरच्या विरोधात माहे जुलै, २०२४ मध्ये विधिमंडळ पावसाळी अधिवेशन दरम्यान तीव्र आंदोलन करण्याचा घेतलेला निर्धार, याबाबत शासनाने खाजगी कंपन्यांकडून राज्यात जुने मीटर काढून नवीन प्रीपेड वीज रुपांतरित करण्यात येणार असल्याने या अल्पकारक निर्णयावर निर्बंध घालून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने जूलै, २०२० मध्ये सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) जाहीर केली आहे. या योजनेमुळे वीज वितरण कंपन्यांची गुणवत्ता व विश्वासार्हतेचे निर्देशांक वाढून आर्थिक दृष्टीने सक्षम होण्यास मदत होईल. या प्रणालीमुळे एकुण तांत्रिक व व्यावसायिक हानी कमी होऊन वीज पुरवठयाची सरासरी किंमत व वीज दर कमी होण्यास मदत होणार आहे.

स्मार्ट मीटरचे विविध फायदे विचारात घेऊन केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने दि. २६.०२.२०२१ रोजी सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर लावण्याचे आदेश दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या दि.१७.०८.२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार डिसेंबर, २०२३ ते मार्च, २०२५ या कालावधीत सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविणे सक्तीचे करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याला पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड च्या दि.२२.०९.२०२२ आदेशाद्वारे स्मार्ट मीटर प्रकल्पाकरिता मंजूरी दिलेली आहे. सुधारित वितरण क्षेत्र (RDSS) योजनेअंतर्गत स्मार्ट मीटर बसविण्यासाठी रुरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन लिमिटेड (RECL) द्वारे दिलेल्या सुधारीत Standard Bidding Document प्रमाणे महावितरण मार्फत ई-निविदा प्रकाशित करण्यात आल्या होत्या. ०६ निविदाधारकांनी यामध्ये भाग घेतला. त्यापैकी निविदेतील अटी व शर्तीनुसार पात्र ०४ निविदाधारकांना कार्यादेश देण्यात आले आहेत. निविदेतील तरतुदीनुसार पारदर्शकरित्या कार्यवाही करून स्पर्धात्मक पद्धतीने निविदा निश्चित करण्यात आल्या आहेत. सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) सर्व कामांच्या निविदा प्रक्रियेपासून ते

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६९४ पुढीलप्रमाणे आहे:-

"नाशिक एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्रात विद्युत विनियमासंदर्भात सुविधा उपलब्ध असणे, त्यामध्ये ६५० एकर जागा रेल्वेमार्ग, प्रशासकीय इमारती, कामगार वसाहत, राख साठवणूक बंधारा, पाणी इत्यादि सोयीसुविधांचा समावेश असणे, तसेंच शासनाने एकलहरे येथे ६६० मेगावॅट प्रकल्प दि. २९/११/२०११ रोजी मंजूर करुन शासनाने स्थगित ठेवणे, पावसाळी अधिवेशन २०२३ उपस्थितीत केलेल्या लक्षवेधीच्या उत्तरामध्ये विद्यमान ऊर्जा मंत्री यांनी भारत सरकारच्या प्रस्तावित धोरणामुळे व शासनाने दि.१७/६/२०२० च्या पत्रानुसार पुढील पाच वर्षांत राज्यात कोणताही औष्णिक वीज प्रकल्प प्रस्तावित नमूद करणे, तसेंच दि. २/६/२०२० रोजी मंत्रीमंडळ झालेल्या बैठकीत नवीन औष्णिक प्रकल्प राबविता येणार नसणे, याबाबत संदर्भ सदर उत्तरात असणे असे असतांना देखील नाशिक एकलहरे औष्णिक वीज प्रकल्पास मान्यता न देणे व दि. १९ ऑक्टोबर, २०२३ च्या मंत्रिमंडळ बैठकीत कोराडी सुपर क्रिटिकल वीज प्रकल्पास मान्यता देणे, याबाबत मागील अधिवेशना मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांनी सदर लक्षवेधीच्या उत्तरात शासनाच्या वतीने नमूद करण्यात आले की, सदर प्रकल्पाच्या जागेवर औद्योगिक वसाहत अथवा अन्य प्रकल्प स्थापन करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणेबाबत तात्काळ बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन सभागृहात देणे, परंतु आज रोजी पर्यंत सदर एकलहरे औष्णिक प्रकल्पाबाबत कोणतीही बैठक न घेता या प्रकल्पाबाबत शासनाची उदासीन भुमिका दिसून येणे, याबाबत नाशिक मधील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

देशात दरडोई विजेच्या वापरात वाढ, शेतकऱ्यांसाठी विजेची उपलब्धी, इत्यादी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ११ व्या पंचवार्षिक योजना (२००७-२०१२) व केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार महानिर्मितीद्वारा वीज उत्पादन क्षमतावाढ कार्यक्रम हाती घेण्यात आला व औष्णिक वीज संच प्रस्तावित करण्यात आले होते. शासनाने नाशिक जिल्ह्यातील एकलहरे येथे १ x ६६० मेगावॅट प्रकल्प उभारण्यास दिनांक २९.१२.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली होती.

शासनाच्या मान्यतेच्या अनुषंगाने महानिर्मितीतर्फे विविध प्रकल्पपूर्व कामे/ प्रक्रिया हाती घेण्यात आल्या. त्यामध्ये दिनांक ११.०२.२०११ रोजी सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक मंजुरीसाठी (Terms of Reference) पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्याकडून प्राप्त करण्यात आला होता. दिनांक १५.०६.२०११ रोजीच्या Terms of Reference मध्ये सूचित केल्याप्रमाणे प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करण्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.

प्रस्तावित संच हा रक्षा मंत्रालय, भारत सरकारच्या Aerodrome च्या कक्षेत येत असल्याने प्रकल्पाच्या धूरांड्याच्या उंचीसाठी ना हरकत परवाना प्राप्त करण्यासाठी भारतीय विमानतळ प्राधिकरण, भारत सरकार यांचेकडे दिनांक ११.०२.२०११ रोजी निवेदन करण्यात आले. तथापि, प्रस्तावित प्रकल्प देवळाली विमानतळ (Aerodrome) च्या १५ कि.मी च्या परिघात येत असल्याने सदर परवानगी प्राप्त झाली नाही.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीच्या आदेशानुसार असे निर्देश दिले की, महानिर्मिती व महावितरण कंपन्यांनी राज्यातील अनुमानित नविकरणीय ऊर्जा क्षमतावाढ, Renewable

Purchase Obligation (RPO), भविष्यातील मागणी/पुरवठा इत्यादी बाबींचे सर्वकष यथार्थ अवलोकन/मूल्यांकन करावे आणि तद्नंतरच पूर्वी मंजूर झालेल्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नव्याने प्रस्ताव सादर करावा. आयोगाने असेही नमूद केले की महानिर्मितीने पूर्वी मंजूर असलेल्या पण कार्यादेश जारी न केलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही पुढील कार्यवाही करू नये. अश्या प्रकल्पांवर महानिर्मितीने काही भांडवली खर्च केला, तर त्याची पूर्ण जबाबदारी महानिर्मितीची असेल.

भारत सरकारच्या सन २०१६ च्या टॅरिफ पॉलिसीच्या मेरिट ऑर्डर डिसपॅच नुसार जास्त अस्थिर आकार असलेल्या संचामधून वीज निर्गमित होण्याबाबत शक्यता कमी असते. सदर प्रस्तावित संच हा कोळसा स्त्रोतापासून दूर अंतरावर असल्याने कोळशाची पुरवठा किंमत (Logistic Cost) लक्षात घेता, सदर संचातून तयार होणाऱ्या विजेचा अस्थिर आकार जास्त येतो. दिनांक १६.०६.२०२४ ते १५.०७.२०२४ या कालावधीसाठीच्या MSEDCL च्या MOD Stack नुसार नाशिक येथील सद्यस्थितीत संचलनात असलेल्या संचातून निर्मित होणाऱ्या विजेचा अस्थिर आकार रु.५.२२ इतका असून MOD Stack मध्ये कोळश्यावर आधारित संचांमध्ये सर्वात जास्त आहे. या करिता नाशिक येथे ६६० मेगावॅट प्रकल्प वाणिज्यिक दृष्ट्या व्यवहार्य ठरत नाही. तसेच, भारत सरकारच्या खाणीजवळ असलेल्या परंतु रखडलेल्या प्रकल्पांना कोळसा पुरवठा संबंधित प्रस्तावित धोरणामुळे सदर प्रकल्पासाठी नियमित कोळसा पुरवठा होण्याबद्दलही साशंकता होती. या सर्व कारणांमुळे सदर प्रकल्प स्थगित ठेवण्यात आला होता.

तद्नंतर,तत्कालीन मा.मंत्री (ऊर्जा) यांनी दिनांक २७.०८.२०२० रोजी "एकलहरे, नाशिक येथील महानिर्मितीच्या प्रस्तावित १ x ६६० मे. वॅ. प्रकल्पाऐवजी त्या जागेवर सौर प्रकल्प अथवा औद्योगिक वसाहत वा इतर पर्यायासंदर्भात विचार करावा", असे निर्देश दिले. सदर निर्देशाच्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील एकलहरे प्रकल्पाच्या जागेवर औद्योगिक वसाहत अथवा अन्य प्रकल्प स्थापन करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे महानिर्मितीद्वारे नियोजित आहे.

नाशिक येथील जुन्या संचांचे आयुर्मान ४० वर्षापेक्षा जास्त झालेले असले तरीही सदर संच पूर्ण कार्यक्षमतेने चालू ठेवण्यासाठी संचांची नियमित आणि वार्षिक देखभाल व इतर आवश्यक कामे करण्यात येतात.

कोराडी येथे प्रकल्प राबविण्यासंदर्भात शासनाने कोराडी औष्णिक वीज केंद्र येथे २ x ६६० मेगावॅट प्रकल्प उभारण्यास दिनांक ०७.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता दिली होती. प्रकल्पाकरीता भांडवली खर्चातील घट, जमीनीची उपलब्धता, कोळशाचे नियमित Linkage, वहनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, मा. आयोगाच्या तत्वत: मान्यता, वीज खरेदी कराराकरीता मान्यता इ. बाबी पाहता प्रकल्प उभारणीस व भागभांडवल देण्यास शासनाने दिनांक १९.१०.२०२३ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता दिली आहे.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण, भारत सरकार यांनी दिनांक २०.०१.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार विजेची मागणी तसेच अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतातून होणाऱ्या निर्मितीचे नियमन करण्याच्या दृष्टीने, कोळश्यावर आधारित जे जुने संच बंद करण्याचे प्रस्तावित होते ते संच बंद न करता, सदर संच सन २०३० व तद्नंतर चालू ठेवण्याच्या अनुषंगाने, आयुर्मान वाढविण्याच्या दृष्टीने सदर संचांचे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण करण्याचे नियोजन करावे, असे निर्देशित केले आहेत.

सदर निर्देशांच्या अनुषंगाने महानिर्मितीद्वारे पहिल्या टप्प्यात नाशिक येथील संच क्र. ३, ४ व ५ चे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण/ कार्यकाळ विस्ताराचे काम नियोजित आहे. नूतनीकरण आणि आधुनिकीकरणानंतर नाशिक येथील संच सन २०३० व त्यानंतरही संचलनात राहणार असल्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध राहतील. नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाबाबतीत सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून सदर संचांचे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे महानिर्मितीद्वारे नियोजित आहे.

..........................................................

Purchase Obligation (RPO), भविष्यातील मागणी/पुरवठा इत्यादी बाबींचे सर्वंकष यथार्थ अवलोकन/मूल्यांकन करावे आणि तद्नंतरच पूर्वी मंजूर झालेल्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नव्याने प्रस्ताव सादर करावा. आयोगाने असेही नमूद केले की महानिर्मितीने पूर्वी मंजूर असलेल्या पण कार्यादेश जारी न केलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही पुढील कार्यवाही करू नये. अश्या प्रकल्पांवर महानिर्मितीने काही भांडवली खर्च केला, तर त्याची पूर्ण जबाबदारी महानिर्मितीची असेल.

भारत सरकारच्या सन २०१६ च्या टॅरिफ पॉलिसीच्या मेरिट ऑर्डर डिसपॅच नुसार जास्त अस्थिर आकार असलेल्या संचामधून वीज निर्गमित होण्याबाबत शक्यता कमी असते. सदर प्रस्तावित संच हा कोळसा स्त्रोतापासून दूर अंतरावर असल्याने कोळशाची पुरवठा किंमत (Logistic Cost) लक्षात घेता, सदर संचातून तयार होणाऱ्या विजेचा अस्थिर आकार जास्त येतो. दिनांक १६.०६.२०२४ ते १५.०७.२०२४ या कालावधीसाठीच्या MSEDCL च्या MOD Stack नुसार नाशिक येथील सद्यस्थितीत संचलनात असलेल्या संचातून निर्मित होणाऱ्या विजेचा अस्थिर आकार रु.५.२२ इतका असून MOD Stack मध्ये कोळश्यावर आधारित संचांमध्ये सर्वात जास्त आहे. या करिता नाशिक येथे ६६० मेगावॅट प्रकल्प वाणिज्यिक दृष्ट्या व्यवहार्य ठरत नाही. तसेच, भारत सरकारच्या खाणीजवळ असलेल्या परंतु रखडलेल्या प्रकल्पांना कोळसा पुरवठा संबंधित प्रस्तावित धोरणामुळे सदर प्रकल्पासाठी नियमित कोळसा पुरवठा होण्याबद्दलही साशंकता होती. या सर्व कारणांमुळे सदर प्रकल्प स्थगित ठेवण्यात आला होता.

तद्नंतर,तत्कालीन मा.मंत्री (ऊर्जा) यांनी दिनांक २७.०८.२०२० रोजी "एकलहरे, नाशिक येथील महानिर्मितीच्या प्रस्तावित १ x ६६० मे. वॅ. प्रकल्पाऐवजी त्या जागेवर सौर प्रकल्प अथवा औद्योगिक वसाहत वा इतर पर्यायासंदर्भात विचार करावा", असे निर्देश दिले. सदर निर्देशाच्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यातील एकलहरे प्रकल्पाच्या जागेवर औद्योगिक वसाहत अथवा अन्य प्रकल्प स्थापन करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे महानिर्मितीद्वारे नियोजित आहे.

नाशिक येथील जुन्या संचांचे आयुर्मान ४० वर्षांपेक्षा जास्त झालेले असले तरीही सदर संच पूर्ण कार्यक्षमतेने चालू ठेवण्यासाठी संचांची नियमित आणि वार्षिक देखभाल व इतर आवश्यक कामे करण्यात येतात.

कोराडी येथे प्रकल्प राबविण्यासंदर्भात शासनाने कोराडी औष्णिक वीज केंद्र येथे २ x ६६० मेगावॅट प्रकल्प उभारण्यास दिनांक ०७.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता दिली होती. प्रकल्पाकरीता भांडवली खर्चातील घट, जमीनीची उपलब्धता, कोळशाचे नियमित Linkage, वहनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, मा. आयोगाच्या तत्वत: मान्यता, वीज खरेदी कराराकरीता मान्यता इ. बाबी पाहता प्रकल्प उभारणीस व भागभांडवल देण्यास शासनाने दिनांक १९.१०.२०२३ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता दिली आहे.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण, भारत सरकार यांनी दिनांक २०.०१.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार विजेची मागणी तसेच अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतातून होणाऱ्या निर्मितीचे नियमन करण्याच्या दृष्टीने, कोळश्यावर आधारित जे जुने संच बंद करण्याचे प्रस्तावित होते ते संच बंद न करता, सदर संच सन २०३० व तद्नंतर चालू ठेवण्याच्या अनुषंगाने, आयुर्मान वाढविण्याच्या दृष्टीने सदर संचांचे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण करण्याचे नियोजन करावे, असे निर्देशित केले आहेत.

सदर निर्देशांच्या अनुषंगाने महानिर्मितीद्वारे पहिल्या टप्प्यात नाशिक येथील संच क्र. ३, ४ व ५ चे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण/ कार्यकाळ विस्ताराचे काम नियोजित आहे. नूतनीकरण आणि आधुनिकीकरणानंतर नाशिक येथील संच सन २०३० व त्यानंतरही संचलनात राहणार असल्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध राहतील. नूतनीकरण आणि आधुनिकीकरणाबाबतीत सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून सदर संचांचे नूतनीकरण आणि आधुनिकीकरण जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे महानिर्मितीद्वारे नियोजित आहे.

.................................................................

लक्षवेधी सूचना क्र.१६९४

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६९४ पुढीलप्रमाणे आहे:-

"नाशिक एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्रात विद्युत विनियमासंदर्भात सुविधा उपलब्ध असणे, त्यामध्ये ६५० एकर जागा रेल्वेमार्ग, प्रशासकीय इमारती, कामगार वसाहत, राख साठवणूक बंधारा, पाणी इत्यादि सोयीसुविधांचा समावेश असणे, तसेंच शासनाने एकलहरे येथे ६६० मेगावॅट प्रकल्प दि. २९/११/२०११ रोजी मंजूर करुन शासनाने स्थगित ठेवणे, पावसाळी अधिवेशन २०२३ उपस्थितीत केलेल्या लक्षवेधीच्या उत्तरामध्ये विद्यमान ऊर्जा मंत्री यांनी भारत सरकारच्या प्रस्तावित धोरणामुळे व शासनाने दि.१७/६/२०२० च्या पत्रानुसार पुढील पाच वर्षात राज्यात कोणताही औष्णिक वीज प्रकल्प प्रस्तावित नमूद करणे, तसेंच दि. २/६/२०२० रोजी मंत्रीमंडळ झालेल्या बैठकीत नवीन औष्णिक प्रकल्प राबविता येणार नसणे, याबाबत संदर्भ सदर उत्तरात असणे असे असतांना देखील नाशिक एकलहरे औष्णिक वीज प्रकल्पास मान्यता न देणे व दि. १९ ऑक्टोबर, २०२३ च्या मंत्रिमंडळ बैठकीत कोराडी सुपर क्रिटिकल वीज प्रकल्पास मान्यता देणे, याबाबत मागील अधिवेशना मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांनी सदर लक्षवेधीच्या उत्तरात शासनाच्या वतीने नमूद करण्यात आले की, सदर प्रकल्पाच्या जागेवर औद्योगिक वसाहत अथवा अन्य प्रकल्प स्थापन करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणेबाबत तात्काळ बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन सभागृहात देणे, परंतु आज रोजी पर्यंत सदर एकलहरे औष्णिक प्रकल्पाबाबत कोणतीही बैठक न घेता या प्रकल्पाबाबत शासनाची उदासीन भुमिका दिसून येणे, याबाबत नाशिक मधील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

देशात दरडोई विजेच्या वापरात वाढ, शेतकऱ्यांसाठी विजेची उपलब्धी, इत्यादी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ११ व्या पंचवार्षिक योजना (२००७-२०१२) व केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार महानिर्मितीद्वारा वीज उत्पादन क्षमतावाढ कार्यक्रम हाती घेण्यात आला व औष्णिक वीज संच प्रस्तावित करण्यात आले होते. शासनाने नाशिक जिल्ह्यातील एकलहरे येथे १ x ६६० मेगावॅट प्रकल्प उभारण्यास दिनांक २९.१२.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली होती.

शासनाच्या मान्यतेच्या अनुषंगाने महानिर्मितीतर्फे विविध प्रकल्पपूर्व कामे/ प्रक्रिया हाती घेण्यात आल्या. त्यामध्ये दिनांक ११.०२.२०११ रोजी सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक मंजुरीसाठी (Terms of Reference) पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्याकडून प्राप्त करण्यात आला होता. दिनांक १५.०६.२०११ रोजीच्या Terms of Reference मध्ये सूचित केल्याप्रमाणे प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास करण्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.

प्रस्तावित संच हा रक्षा मंत्रालय, भारत सरकारच्या Aerodrome च्या कक्षेत येत असल्याने प्रकल्पाच्या धूरांड्याच्या उंचीसाठी ना हरकत परवाना प्राप्त करण्यासाठी भारतीय विमानतळ प्राधिकरण, भारत सरकार यांचेकडे दिनांक ११.०२.२०११ रोजी निवेदन करण्यात आले. तथापि, प्रस्तावित प्रकल्प देवळाली विमानतळ (Aerodrome) च्या १५ कि.मी च्या परिघात येत असल्याने सदर परवानगी प्राप्त झाली नाही.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीच्या आदेशानुसार असे निर्देश दिले की, महानिर्मिती व महावितरण कंपन्यांनी राज्यातील अनुमानित नविकरणीय ऊर्जा क्षमतावाढ, Renewable

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी अधिवेशन)

## लक्षेवधी सूचना

मा. ॲड. अशोक पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे जिल्हयातील धर्मादाय रुग्णालय जनसंपर्क अधिकारी यांची बैठक दिनांक ०४/१२/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे पार पडली असून या बैठकीमध्ये अनेक धर्मादाय हॉस्पीटल गरीब रुग्णांना १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार करण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास येणे, ही अतिशय गंभीर बाब असल्याने योजनेचा लाभ नाकारणाऱ्या हॉस्पीटलच्या ट्रस्टींना पत्र काढण्याची आवश्यकता असणे, लोकप्रतिनिधींनी फोन केला असता अनेक हॉस्पीटलचे जनसंपर्क अधिकारी फोन घेत नसणे, तसेच रात्रीच्या वेळी जनसंपर्क अधिकारी फोन उचलत नसणे, अनेक रुग्णांना आयपीएफ निधी संपला असल्याचे सांगून योजनेचा लाभ देण्यास हॉस्पीटल नाकारत असलेल्या हॉस्पीटलमध्ये मध्ये केईएम हॉस्पीटल, इनलॅक्स बुधराणी हॉस्पीटल, भारती हॉस्पीटल, डीवाय पाटील हॉस्पीटल, सहयाद्री हॉस्पीटल या हॉस्पीटलचा समावेश असून अशा हॉस्पीटलचा व ज्या हॉस्पीटलचा आयपीएफ निधी संपलेला आहे अशा हॉस्पीटलचे उच्चस्तर अधिकाऱ्यांकडून ऑडीट करण्याची आवश्यकता असणे, काही धर्मादाय हॉस्पीटल कंपनी कायदयांतर्गत पळवाट काढून धर्मादाय योजनेतून बाहेर पडतात अशा रुग्णांलयांची चौकशी करण्याची आवश्यकता असणे, धर्मादाय रुग्णालये गरीब व निर्धन रुग्णांना योजनेचा लाभ देण्यास नाकारत असल्याने गरीब व निर्धन रुग्णांची होत असणारी हेळसांड त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. उप मुख्यमंत्री महोदयाचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत सार्वजनिक न्यास संचालित धर्मादाय रुग्णालयांनी सदर अधिनियमाच्या कलम ४१ अअ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका (पीआयएल) क्रमांक ३१३२/२००४ मध्ये आदेशित केलेल्या योजनेचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. सदरची योजना ही दिनांक ०१/०९/२००६ पासून अंमलात आलेली आहे. सदर योजनेतील खंड २ नुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयांनी त्यांचेकडील वापरातील एकूण खाटांच्या १० टक्के खाटा ह्या निर्धन रुग्णांकरिता मोफत व १० टक्के खाटा ह्या दुर्बल घटकांतील रुग्णांकरिता सवलतीच्या दराने उपचाराकरिता राखीव ठेवणे बंधनकारक आहे. सदर योजनेतील खंड ४ नुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन रुग्णांचा निधी (आयपीएफ) असा स्वतंत्र निधी निर्माण करुन त्यात (निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्ण सोडून) इतर सर्व रुग्णांच्या स्थूल देयकांच्या २ टक्के रक्कम कोणतीही वजावट न करता जमा करावी, अशी तरतूद आहे. तसेच, खंड ७ नुसार सदर खात्यामध्ये जमा होणारी रक्कम ही संबंधित धर्मादाय रुग्णालयाच्या स्वाधीन राहील व त्या रकमेचा विनियोग फक्त निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय उपचार करण्याकरिता करावा लागेल, अशी तरतूद आहे.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली धर्मादाय रुग्णालयांमधील सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांचे प्रतिनिधी यांच्यासोबत जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे जिल्हास्तरीय समितीची बैठक दि.०४.१२.२०२३ रोजी झाली आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त पाहिले असता असे दिसून येते की, या बैठकीमध्ये अनेक धर्मादाय हॉस्पिटल गरीब

रुग्णांना १०% राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार करण्यात टाळाटाळ करीत असल्याबाबतच्या मुद्दयावर चर्चा करण्यात आली आहे. तसेच धर्मादाय रुग्णालयाच्या जनसंपर्क अधिकारी यांनी लोकप्रतिनिधींनी केलेला फोन उचलण्याबाबत तसेच रात्रीच्या वेळीही फोन उचलण्याबाबत तोंडी निर्देश अध्यक्षा तथा धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी देखरेख समितीच्या दिनांक १९.०६.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये दिले आहेत.

माहे मे - २०२४ मध्ये पुणे येथील पुढील धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकातील एकूण १५७५ रुग्णांना उपचार दिले असून त्याची रुग्णालयनिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे.:-

| अ.क्र | रुग्णालयाचे नाव | निर्धन घटकातील रुग्ण | दुर्बल घटकातील रुग्ण |
|---|---|---|---|
| १ | केईएम हॉस्पीटल | ५६२ | १८६ |
| २ | इनलॅक्स बुधराणी हॉस्पीटल | ३२३ | १६५ |
| ३ | भारती हॉस्पीटल | ४ | ५० |
| ४ | डीवाय पाटील हॉस्पीटल | २५१ | ० |
| ५ | सहयाद्री हॉस्पीटल | १६ | १८ |
| | एकूण | ११५६ | ४१९ |

ज्या रुग्णालयांचा निर्धन रुग्ण निधी (आयपीएफ) वजावटीमध्ये आहे अशा रुग्णालयांची धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, पुणे येथील निरीक्षकांमार्फत तपासणी सुरु आहे.

सद्यस्थितीत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे येथील योजनेत अंतर्भुत असलेल्या धर्मादाय रुग्णालयांपैकी कोणतेही धर्मादाय रुग्णालय कंपनी कायद्याचा लाभ घेवून धर्मादाय योजनेतून बाहेर पडल्याचे दिसून येत नाही.

धर्मादाय रुग्णालयांनी गरीब व निर्धन रुग्णांना योजनेचा लाभ देण्यास नकार दिल्यावर गरीब व निर्धन रुग्णांची हेळसांड होते व त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांत नाराजीची भावना निर्माण होते. ही बाब विचारात घेऊन पुणे जिल्ह्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे अध्यक्षा तथा धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी देखरेख समितीच्या दिनांक १९.०६.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये निर्देशित केले आहे.

तसेच या व अशा तक्रारींना आळा घालण्याकरीता व रुग्णालय योजनेची पारदर्शक व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता विधि व न्याय विभागाच्या दि.३१.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय विशेष मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सदर कक्षामार्फत डिसेंबर २०२३ पासून जुन २०२४ अखेरपर्यंत एकूण ५९१ इतक्या रुग्णांना या योजनेचा लाभ मिळवुन देण्यात आला आहे. सदर प्रयोजनासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्ण किंवा नातेवाईक (अ)संबंधित धर्मादाय रुग्णालय, (आ)संबंधित जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (इ)संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय तसेच (ई)संबंधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय व (उ)राज्यस्तरीय विशेष मदत कक्ष येथून अर्ज सादर करु शकतात. तसेच, गरजु व पात्र रुग्णांवर धर्मादाय रुग्णालयांनी उपचार करण्यास टाळाटाळ करणे यांस प्रतिबंध व्हावा म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांमध्ये धर्मादाय आरोग्य सेवक यांच्या नेमणुकीबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

*******

रुग्णांना १०% राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार करण्यात टाळाटाळ करीत असल्याबाबतच्या मुद्दयावर चर्चा करण्यात आली आहे. तसेच धर्मादाय रुग्णालयाच्या जनसंपर्क अधिकारी यांनी लोकप्रतिनिधींनी केलेला फोन उचलण्याबाबत तसेच रात्रीच्या वेळीही फोन उचलण्याबाबत तोंडी निर्देश अध्यक्षा तथा धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी देखरेख समितीच्या दिनांक १९.०६.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये दिले आहेत.

माहे मे - २०२४ मध्ये पुणे येथील पुढील धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकातील एकूण १५७५ रुग्णांना उपचार दिले असून त्याची रुग्णालयनिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे.:-

| अ.क्र | रुग्णालयाचे नाव | निर्धन घटकातील रुग्ण | दुर्बल घटकातील रुग्ण |
|---|---|---|---|
| १ | केईएम हॉस्पीटल | ५६२ | १८६ |
| २ | इनलॅक्स बुधराणी हॉस्पीटल | ३२३ | १६५ |
| ३ | भारती हॉस्पीटल | ४ | ५० |
| ४ | डीवाय पाटील हॉस्पीटल | २५१ | ० |
| ५ | सहयाद्री हॉस्पीटल | १६ | १८ |
| | एकूण | ११५६ | ४१९ |

ज्या रुग्णालयांचा निर्धन रुग्ण निधी (आयपीएफ) वजावटीमध्ये आहे अशा रुग्णालयांची धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, पुणे येथील निरीक्षकांमार्फत तपासणी सुरु आहे.

सद्यस्थितीत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे येथील योजनेत अंतर्भुत असलेल्या धर्मादाय रुग्णालयांपैकी कोणतेही धर्मादाय रुग्णालय कंपनी कायद्याचा लाभ घेवून धर्मादाय योजनेतून बाहेर पडल्याचे दिसून येत नाही.

धर्मादाय रुग्णालयांनी गरीब व निर्धन रुग्णांना योजनेचा लाभ देण्यास नकार दिल्यावर गरीब व निर्धन रुग्णांची हेळसांड होते व त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांत नाराजीची भावना निर्माण होते. ही बाब विचारात घेऊन पुणे जिल्ह्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे अध्यक्षा तथा धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी देखरेख समितीच्या दिनांक १९.०६.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये निर्देशित केले आहे.

तसेच या व अशा तक्रारींना आळा घालण्याकरीता व रुग्णालय योजनेची पारदर्शक व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता विधि व न्याय विभागाच्या दि.३१.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय विशेष मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सदर कक्षामार्फत डिसेंबर २०२३ पासून जुन २०२४ अखेरपर्यंत एकूण ५९१ इतक्या रुग्णांना या योजनेचा लाभ मिळवुन देण्यात आला आहे. सदर प्रयोजनासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्ण किंवा नातेवाईक (अ)संबंधित धर्मादाय रुग्णालय, (आ)संबंधित जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (इ)संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय तसेच (ई)संबंधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय व (उ)राज्यस्तरीय विशेष मदत कक्ष येथून अर्ज सादर करु शकतात. तसेच, गरजु व पात्र रुग्णांवर धर्मादाय रुग्णालयांनी उपचार करण्यास टाळाटाळ करणे यांस प्रतिबंध व्हावा म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांमध्ये धर्मादाय आरोग्य सेवक यांच्या नेमणुकीबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

*******

H-676-1A

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी अधिवेशन)

### लक्षवेधी सूचना

मा. ॲड. अशोक पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे जिल्हयातील धर्मादाय रुग्णालय जनसंपर्क अधिकारी यांची बैठक दिनांक ०४/१२/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे पार पडली असून या बैठकीमध्ये अनेक धर्मादाय हॉस्पीटल गरीब रुग्णांना १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार करण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास येणे, ही अतिशय गंभीर बाब असल्याने योजनेचा लाभ नाकारणाऱ्या हॉस्पीटलच्या ट्रस्टींना पत्र काढण्याची आवश्यकता असणे, लोकप्रतिनिधींनी फोन केला असता अनेक हॉस्पीटलचे जनसंपर्क अधिकारी फोन घेत नसणे, तसेच रात्रीच्या वेळी जनसंपर्क अधिकारी फोन उचलत नसणे, अनेक रुग्णांना आयपीएफ निधी संपला असल्याचे सांगून योजनेचा लाभ देण्यास हॉस्पीटल नाकारत असलेल्या हॉस्पीटलमध्ये मध्ये केईएम हॉस्पीटल, इनलॅक्स बुधराणी हॉस्पीटल, भारती हॉस्पीटल, डीवाय पाटील हॉस्पीटल, सहयाद्री हॉस्पीटल या हॉस्पीटलचा समावेश असून अशा हॉस्पीटलचा व ज्या हॉस्पीटलचा आयपीएफ निधी संपलेला आहे अशा हॉस्पीटलचे उच्चस्तर अधिकाऱ्यांकडून ऑडीट करण्याची आवश्यकता असणे, काही धर्मादाय हॉस्पीटल कंपनी कायदयांतर्गत पळवाट काढून धर्मादाय योजनेतून बाहेर पडतात अशा रुग्णांलयांची चौकशी करण्याची आवश्यकता असणे, धर्मादाय रुग्णालये गरीब व निर्धन रुग्णांना योजनेचा लाभ देण्यास नाकारत असल्याने गरीब व निर्धन रुग्णांची होत असणारी हेळसांड त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत सार्वजनिक न्यास संचालित धर्मादाय रुग्णालयांनी सदर अधिनियमाच्या कलम ४१ अअ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका (पीआयएल) क्रमांक ३१३२/२००४ मध्ये आदेशित केलेल्या योजनेचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. सदरची योजना ही दिनांक ०१/०९/२००६ पासून अंमलात आलेली आहे. सदर योजनेतील खंड २ नुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयांनी त्यांचेकडील वापरातील एकूण खाटांच्या १० टक्के खाटा ह्या निर्धन रुग्णांकरिता मोफत व १० टक्के खाटा ह्या दुर्बल घटकांतील रुग्णांकरिता सवलतीच्या दराने उपचाराकरिता राखीव ठेवणे बंधनकारक आहे. सदर योजनेतील खंड ४ नुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन रुग्णांचा निधी (आयपीएफ) असा स्वतंत्र निधी निर्माण करुन त्यात (निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्ण सोडून) इतर सर्व रुग्णांच्या स्थूल देयकांच्या २ टक्के रक्कम कोणतीही वजावट न करता जमा करावी, अशी तरतूद आहे. तसेच, खंड ७ नुसार सदर खात्यामध्ये जमा होणारी रक्कम ही संबंधित धर्मादाय रुग्णालयाच्या स्वाधीन राहील व त्या रकमेचा विनियोग फक्त निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय उपचार करण्याकरिता करावा लागेल, अशी तरतूद आहे.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली धर्मादाय रुग्णालयांमधील सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांचे प्रतिनिधी यांच्यासोबत जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे जिल्हास्तरीय समितीची बैठक दि.०४.१२.२०२३ रोजी झाली आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त पाहिले असता असे दिसून येते की, या बैठकीमध्ये अनेक धर्मादाय हॉस्पिटल गरीब

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १८९१

मा. श्री.बाळासाहेब थोरात, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली खालील लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"श्री. साईबाबा शिर्डी संस्थानच्या आस्थापनेवर काम करीत असलेल्या ५९८ कामगारांपैकी जे कामगार पात्र आहेत त्यांना दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ च्या शासन मान्य आकृती बंधानुसार कलम १६ अन्वये या कर्मचा-यांना कायम प्रस्ताव पूर्वलक्षी प्रमाणे तातडीने शासनाने मंजूर करण्याबाबत मा. उपमुख्य मंत्री यांनी माहे मार्च,२०२३ मध्ये सभागृहात उत्तर देताना तत्वत: मान्य असल्याचे सांगण्यात येऊन अधिवेशन संपल्यानंतर लगेच या विषयावर बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात येणे, परंतु अद्याप या विषयावर कोणतीही बैठक घेण्यात न येणे, ५९८ कामगारांपैकी काही कामगारांचा मृत्यु झाला तर काही कामगार सेवानिवृत्त झाले असणे, परंतु उर्वरित कामगारांना अद्यापी न्याय मिळाला नसल्याचे आढळून येणे, यामुळे कामगारांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक ०९ मे, २०२४ च्या आदेशानुसार शासन व संस्थान यांनी सदरहू कामगारांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

निवेदन

मा.उप मुख्यमंत्री — विधि व न्याय विभाग

" श्री साईबाबा शिर्डी संस्थान" या नावे नोंदणी झालेली श्री शिर्डी साईबाबा संस्थानाची "सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरीता, आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तिचे अधिक चांगल्याप्रकारे, प्रशासन, शासन व नियंत्रण करण्यासाठी " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ( शिर्डी) अधिनियम,२००४ अधिनियमित करण्यात आला आहे.

दिनांक ७ ऑगस्ट २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिनियमांतील कलम १६ अन्वये विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असणा-या कर्मचा-यांच्या सेवा संरक्षित करण्यासाठी एकूण ४८२६ पदाचा आकृतीबंध मंजूर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यापैकी २९०८ या पदांना स्थायी स्वरुपात संस्थानाच्या आस्थापनेवर नियुक्ती देता येईल व १९१८ पदे कायमस्वरुपी कंत्राटी पध्दतीने भरता

येतील. स्थायी पदावर नियुक्ती देतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता निश्चित करुन सदर पदावर स्पर्धात्मक परिक्षा घेवून नियुक्ती करावी तसेच समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदेही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमूद करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णयातील नमूद अटी व शर्ती विचारात घेता दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २००१ ते २००४ या कालावधीत संस्थान आस्थापनेवर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने काम करीत असलेल्या ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी पदावर मासिक एकत्रित वेतनावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर विषयाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. १७.०५.२०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे एक बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी शिर्डी आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांच्या इतर मागण्यांबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा, असे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार संस्थानने त्यांच्या आस्थापनावरील कंत्राटी कर्मचा-यांना रजा-सुट्टया लागू करण्यात आलेल्या आहेत. तसेच, संस्थान समितीच्या दि.०९.११.२०२३ रोजीच्या निर्णयानुसार संस्थान आस्थापनावरील कंत्राटी कर्मचा-यांना जुन-२०२३ पासून ४० टक्के वेतनवाढ देण्यात आली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदीसार संस्थानातील कर्मचा-यांच्या सेवेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीला असून कर्मचा-यांच्या पदांचा आकृतीबंध व सेवा प्रवेश नियम करणे यास शासन मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार संस्थानचे अधिकारी / कर्मचारी यांच्या आकृतीबंधास व सेवा विनियमास शासनाने मान्यता दिलेली आहे.

तसेच, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल सिव्हील ॲप्लीकेशन क्र.८७०७/२०२३ मध्ये दि.०९.०५.२०२४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

**********************

येतील. स्थायी पदावर नियुक्ती देतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता निश्चित करुन सदर पदावर स्पर्धात्मक परिक्षा घेवून नियुक्ती करावी तसेच समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदेही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमूद करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णयातील नमूद अटी व शर्ती विचारात घेता दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २००१ ते २००४ या कालावधीत संस्थान आस्थापनेवर कंत्राटदारांमार्फत कंत्राटी पध्दतीने काम करीत असलेल्या ६३५ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी पदावर मासिक एकत्रित वेतनावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर विषयाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. १७.०५.२०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे एक बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी शिर्डी आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांच्या इतर मागण्यांबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा, असे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार संस्थानने त्यांच्या आस्थापनावरील कंत्राटी कर्मचा-यांना रजा-सुट्टया लागू करण्यात आलेल्या आहेत. तसेच, संस्थान समितीच्या दि.०९.११.२०२३ रोजीच्या निर्णयानुसार संस्थान आस्थापनावरील कंत्राटी कर्मचा-यांना जुन-२०२३ पासून ४० टक्के वेतनवाढ देण्यात आली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदीसार संस्थानातील कर्मचा-यांच्या सेवेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीला असून कर्मचा-यांच्या पदांचा आकृतीबंध व सेवा प्रवेश नियम करणे यास शासन मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार संस्थानचे अधिकारी / कर्मचारी यांच्या आकृतीबंधास व सेवा विनियमास शासनाने मान्यता दिलेली आहे.

तसेच, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल सिव्हील ॲप्लीकेशन क्र.८७०७/२०२३ मध्ये दि.०९.०५.२०२४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

**********************

९४६.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १८९१

मा. श्री.बाळासाहेब थोरात, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली खालील लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"श्री. साईबाबा शिर्डी संस्थानच्या आस्थापनेवर काम करीत असलेल्या ५९८ कामगारांपैकी जे कामगार पात्र आहेत त्यांना दिनांक ०७ ऑगस्ट, २००९ च्या शासन मान्य आकृती बंधानुसार कलम १६ अन्वये या कर्मचा-यांना कायम प्रस्ताव पूर्वलक्षी प्रमाणे तातडीने शासनाने मंजूर करण्याबाबत मा. उपमुख्य मंत्री यांनी माहे मार्च,२०२३ मध्ये सभागृहात उत्तर देताना तत्वत: मान्य असल्याचे सांगण्यात येऊन अधिवेशन संपल्यानंतर लगेच या विषयावर बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात येणे, परंतु अद्याप या विषयावर कोणतीही बैठक घेण्यात न येणे, ५९८ कामगारांपैकी काही कामगारांचा मृत्यु झाला तर काही कामगार सेवानिवृत्त झाले असणे, परंतु उर्वरित कामगारांना अद्यापी न्याय मिळाला नसल्याचे आढळून येणे, यामुळे कामगारांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक ०९ मे, २०२४ च्या आदेशानुसार शासन व संस्थान यांनी सदरहू कामगारांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

निवेदन

मा.उप मुख्यमंत्री | विधि व न्याय विभाग

" श्री साईबाबा शिर्डी संस्थान" या नावे नोंदणी झालेली श्री शिर्डी साईबाबा संस्थानाची "सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरीता, आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तिचे अधिक चांगल्याप्रकारे, प्रशासन, शासन व नियंत्रण करण्यासाठी " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ( शिर्डी) अधिनियम,२००४ अधिनियमित करण्यात आला आहे.

दिनांक ७ ऑगस्ट २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिनियमांतील कलम १६ अन्वये विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असणा-या कर्मचा-यांच्या सेवा संरक्षित करण्यासाठी एकूण ४८२६ पदाचा आकृतीबंध मंजूर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यापैकी २९०८ या पदांना स्थायी स्वरुपात संस्थानाच्या आस्थापनेवर नियुक्ती देता येईल व १९१८ पदे कायमस्वरुपी कंत्राटी पध्दतीने भरता

**लक्षवेधी सूचना क्र.१३१८**

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री.कृष्णा गजबे, मा.विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली **लक्षवेधी सूचना क्रमांक १३१८** पुढीलप्रमाणे आहे-

"गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थां या आदिवासी विकास महामंडळाचे उपअभिकर्ता म्हणून अनेक वर्षापासून आधारभूत धान खरेदीचे काम करणे, शासन निर्णयानुसार खरेदी केलेल्या धानाची उचल दोन महिन्याच्या आत होणे अपेक्षीत असणे, मात्र अभिकर्ता आदिवासी विकास महामंडळाकडून वेळेत धानाची उचल न होणे, खरेदी केंद्रावर ८ ते १० महिने कधी-कधी १ ते २ वर्ष धान उघड्यावर पटांगणात व गोदामात साठवणूक करून ठेवला राहील्याने नैसर्गिक आद्रतेच्या कारणाने मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन त्यात अवाजवी घटतुट येणे, पणन हंगाम २०१९-२० व हंगाम २०२०-२१ या वर्षातील उघड्यावरील व गोदामातील धानाची उचल १ ते २ वर्षापर्यंत झालेली नसणे, पणन हंगाम २०२३-२४ च्या खरीप हंगामातील खरेदी धानाची अजूनही ८ महिने होऊन उचल न होणे, मंडळाकडून वेळेत उचल न झाल्याने शासनाच्या कॅशसिटचे कारण पुढे करून संस्थांना कमिशन अदा करण्यात न येणे, महामंडळाने हंगाम २०१४-१५ पासून ते हंगाम २०२२-२३ पर्यंत विविध कार्यकारी संस्थांचे कमिशनचे हिशोब केलेले नसणे, आदिवासी विविध कार्यकारी संस्था कमिशन अभावी मोठ्या आर्थिक संकटात सापडणे, सहकारी संस्था आधारभूत धान खरेदी करण्यास तयार नसणे, खरेदी केंद्राअभावी आदिवासी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे निवेदन**

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना हंगाम २००१ पासून राबविण्यात येत असून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील धान व भरडधान्य खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक व इतर क्षेत्रासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई यांची मुख्य अभिकर्ता म्हणून नेमणूक करण्यात येते.

आदिवासी उपयोजना क्षेत्रात आदिवासी विकास महामंडळामार्फत महामंडळाचे सभासद असलेले आदिवासी विविध कार्यकारी संस्थांची उप अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात येऊन त्यांच्यामार्फत धानाची खरेदी करण्यात येते. गडचिरोली जिल्ह्यांतर्गत सन १९७२ पासून आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था आदिवासी विकास महामंडळाचे उप अभिकर्ता संस्था म्हणून काम करत आहेत.

धान भरडाई करिता त्या त्या पणन हंगामामध्ये केंद्र शासनाच्या सूचना विचारत घेऊन राज्य शासनाकडून मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या जातात. विभागाच्या दि.२४.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये खरेदी केलेल्या धानाची भरडाई २ महिन्याच्या आत करण्याची तरतूद केली आहे.

धान भरडाईच्या प्रकियेत महामंडळाला गिरणीधारक व जिल्हा पुरवठा विभाग यांच्यासोबत काम करावे लागते. गिरणीधारक, जिल्हा पुरवठा विभाग, गोदाम उपलब्धता, जिल्ह्यातील नक्षलप्रभाव तसेच गडचिरोली जिल्ह्याची दुर्गम भौगोलिक परिस्थिती, पावसाळ्यात पुर परिस्थितीमुळे रस्ते बंद झाल्याने वाहतुकीस अडथळे होणे यासारख्या नैसर्गिक बाबींमुळेदेखील धान

भरडाईच्या प्रकीयेत अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. धानाची उचल वेळेत न झाल्यास खुल्या जागेत साठवलेल्या धानातील आद्रतेचे प्रमाण कमी होऊन घटीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते.

पणन हंगाम २०१९-२० व २०२०-२१ मध्ये गिरणीधारकांनी वाढीव भरडाई दर देण्याबाबत तसेच विशेष भरडाई अनुदान देण्याबाबत मागणी केली होती. सदर मागणी पूर्ण होईपर्यंत गिरणीधारकांनी भरडाईच्या कामास सुरूवात केली नव्हती. त्यामुळे खरेदी केलेल्या धानापैकी भरडाई न झालेल्या धानाची ८ ते १० महिने उचल झालेली नव्हती. चालू पणन हंगामामध्येदेखील भरडाई दर, वाहतूक दर व हमाली दर वाढवून देण्याबाबत गिरणीधारकांनी मागणी केली होती. तसेच सदर मागण्या पूर्ण होईपर्यंत भरडाई न करण्याचा पवित्रा घेतला होता. त्यामुळे प्रत्यक्ष धान भरडाईला सुरूवात होण्यास विलंब झाला. तथापि, विभागस्तरावर मिलर्सच्या काही मागण्या पूर्ण करण्यात आल्याने गिरणीधारकांनी मार्च, २०२४ अखेरपासून भरडाईला सुरूवात केली.

दरवर्षी आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धानाची भरडाई होऊन ६७ टक्के जमा होणाऱ्या तांदूळाच्या परावर्तीत धानावर केंद्र शासनाकडून अनुषंगिक खर्च मंजूर करण्यात येतो. त्याबाबत केंद्र शासनाकडून त्या-त्या वर्षाकरिता बाबनिहाय कॉस्ट शीट निर्गमित केली जाते. त्यानुसार संस्थांना भरडाई झालेल्या धानाच्या प्रमाणात संस्था कमिशन मंजूर केले जाते. सदर कमिशन मंजूर करताना शासन निर्णयानुसार अवाजवी घट आलेल्या धानाची वसूली देखील संस्थांकडून केली जाते. सदर बाबी विचारात घेऊन आदिवासी विकास महामंडळाने, खरेदी संस्थांचे वर्षनिहाय हिशोब तयार केलेले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ८९ इतकी खरेदी केंद्र असून त्यांतर्गत धान खरेदीची प्रक्रिया अवलंबिली जाते. चालू पणन हंगामामध्ये खरीप हंगामातील धानाची उचल वेळेत न झाल्याने साठवणूक क्षमतेच्या अभावी रबी हंगामतील धान खरेदी करण्यास काही खरेदी केंद्रांनी नकार दिला होता. तथापि, खरेदी केंद्रांअभावी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करण्याची बाब निदर्शनास आली नाही. खरेदी केलेल्या धानात घट-तूट वाढून आर्थिक नुकसान होऊ नये याकरीता, आदिवासी विकास महामंडळामार्फत मागील वर्षी १८०० मे.टन क्षमतेची सात गोदाम बांधण्यात आली आहेत. गडचिरोली जिल्ह्यात अहेरी, वडधम, झिंगानुर येथे नविन गोदामे बांधण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याशिवाय शबरी वित्त विकास महामंडळामार्फत गडचिरोली जिल्ह्यातील २ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना शेड उभारणीसाठी ४० % अनुदान, ५० % कर्ज दिलेले आहेत. इतर काही संस्थांनी स्वखर्चाने शेड उभारणी केलेली असून त्या शेड खाली सुध्दा धान साठवणूक केले जाते. उघड्यावरील धानाची सामायिक ताबा करीता धानाची उचल जलद गतीने सुरू करण्यासाठी प्राधान्य दिले जाते. नैसर्गिक आपत्ती, आग, चोरी इत्यादी पासून धानाच्या सुरक्षितेकरिता विमा देखील काढण्यात येतो आहे.

***************

भरडाईच्या प्रकीयेत अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. धानाची उचल वेळेत न झाल्यास खुल्या जागेत साठवलेल्या धानातील आद्रतेचे प्रमाण कमी होऊन घटीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते.

पणन हंगाम २०१९-२० व २०२०-२१ मध्ये गिरणीधारकांनी वाढीव भरडाई दर देण्याबाबत तसेच विशेष भरडाई अनुदान देण्याबाबत मागणी केली होती. सदर मागणी पूर्ण होईपर्यंत गिरणीधारकांनी भरडाईच्या कामास सुरूवात केली नव्हती. त्यामुळे खरेदी केलेल्या धानापैकी भरडाई न झालेल्या धानाची ८ ते १० महिने उचल झालेली नव्हती. चालू पणन हंगामामध्येदेखील भरडाई दर, वाहतूक दर व हमाली दर वाढवून देण्याबाबत गिरणीधारकांनी मागणी केली होती. तसेच सदर मागण्या पूर्ण होईपर्यंत भरडाई न करण्याचा पवित्रा घेतला होता. त्यामुळे प्रत्यक्ष धान भरडाईला सुरूवात होण्यास विलंब झाला. तथापि, विभागस्तरावर मिलर्सच्या काही मागण्या पूर्ण करण्यात आल्याने गिरणीधारकांनी मार्च, २०२४ अखेरपासून भरडाईला सुरूवात केली.

दरवर्षी आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धानाची भरडाई होऊन ६७ टक्के जमा होणाऱ्या तांदूळाच्या परावर्तीत धानावर केंद्र शासनाकडून अनुषंगिक खर्च मंजूर करण्यात येतो. त्याबाबत केंद्र शासनाकडून त्या-त्या वर्षाकरिता बाबनिहाय कॉस्ट शीट निर्गमित केली जाते. त्यानुसार संस्थांना भरडाई झालेल्या धानाच्या प्रमाणात संस्था कमिशन मंजूर केले जाते. सदर कमिशन मंजूर करताना शासन निर्णयानुसार अवाजवी घट आलेल्या धानाची वसूली देखील संस्थांकडून केली जाते. सदर बाबी विचारात घेऊन आदिवासी विकास महामंडळाने, खरेदी संस्थांचे वर्षनिहाय हिशोब तयार केलेले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ८९ इतकी खरेदी केंद्र असून त्यांतर्गत धान खरेदीची प्रक्रिया अवलंबिली जाते. चालू पणन हंगामामध्ये खरीप हंगामातील धानाची उचल वेळेत न झाल्याने साठवणूक क्षमतेच्या अभावी रबी हंगामतील धान खरेदी करण्यास काही खरेदी केंद्रांनी नकार दिला होता. तथापि, खरेदी केंद्रांअभावी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करण्याची बाब निदर्शनास आली नाही. खरेदी केलेल्या धानात घट-तूट वाढून आर्थिक नुकसान होऊ नये याकरीता, आदिवासी विकास महामंडळामार्फत मागील वर्षी १८०० मे.टन क्षमतेची सात गोदाम बांधण्यात आली आहेत. गडचिरोली जिल्ह्यात अहेरी, वडधम, झिंगानुर येथे नविन गोदामे बांधण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याशिवाय शबरी वित्त विकास महामंडळामार्फत गडचिरोली जिल्ह्यातील २ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना शेड उभारणीसाठी ४० % अनुदान, ५० % कर्ज दिलेले आहेत. इतर काही संस्थांनी स्वखर्चाने शेड उभारणी केलेली असून त्या शेड खाली सुध्दा धान साठवणूक केले जाते. उघड्यावरील धानाची सामायिक ताबा करीता धानाची उचल जलद गतीने सुरू करण्यासाठी प्राधान्य दिले जाते. नैसर्गिक आपत्ती, आग, चोरी इत्यादी पासून धानाच्या सुरक्षितेकरिता विमा देखील काढण्यात येतो आहे.

***************

**लक्षवेधी सूचना क्र.१३१८**

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री.कृष्णा गजबे, मा.विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली **लक्षवेधी सूचना क्रमांक १३१८** पुढीलप्रमाणे आहे-

"गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थां या आदिवासी विकास महामंडळाचे उपअभिकर्ता म्हणून अनेक वर्षापासून आधारभूत धान खरेदीचे काम करणे, शासन निर्णयानुसार खरेदी केलेल्या धानाची उचल दोन महिन्याच्या आत होणे अपेक्षीत असणे, मात्र अभिकर्ता आदिवासी विकास महामंडळाकडून वेळेत धानाची उचल न होणे, खरेदी केंद्रावर ८ ते १० महिने कधी-कधी १ ते २ वर्ष धान उघड्यावर पटांगणात व गोदामात साठवणूक करून ठेवला राहील्याने नैसर्गिक आद्रतेच्या कारणाने मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन त्यात अवाजवी घटतुट येणे, पणन हंगाम २०१९-२० व हंगाम २०२०-२१ या वर्षातील उघड्यावरील व गोदामातील धानाची उचल १ ते २ वर्षापर्यंत झालेली नसणे, पणन हंगाम २०२३-२४ च्या खरीप हंगामातील खरेदी धानाची अजूनही ८ महिने होऊन उचल न होणे, मंडळाकडून वेळेत उचल न झाल्याने शासनाच्या कॅशसिटचे कारण पुढे करून संस्थांना कमिशन अदा करण्यात न येणे, महामंडळाने हंगाम २०१४-१५ पासून ते हंगाम २०२२-२३ पर्यंत विविध कार्यकारी संस्थांचे कमिशनचे हिशोब केलेले नसणे, आदिवासी विविध कार्यकारी संस्था कमिशन अभावी मोठ्या आर्थिक संकटात सापडणे, सहकारी संस्था आधारभूत धान खरेदी करण्यास तयार नसणे, खरेदी केंद्राअभावी आदिवासी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे निवेदन**

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना हंगाम २००१ पासून राबविण्यात येत असून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील धान व भरडधान्य खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक व इतर क्षेत्रासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई यांची मुख्य अभिकर्ता म्हणून नेमणूक करण्यात येते.

आदिवासी उपयोजना क्षेत्रात आदिवासी विकास महामंडळामार्फत महामंडळाचे सभासद असलेले आदिवासी विविध कार्यकारी संस्थांची उप अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात येऊन त्यांच्यामार्फत धानाची खरेदी करण्यात येते. गडचिरोली जिल्ह्यांतर्गत सन १९७२ पासून आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था आदिवासी विकास महामंडळाचे उप अभिकर्ता संस्था म्हणून काम करत आहेत.

धान भरडाई करिता त्या त्या पणन हंगामामध्ये केंद्र शासनाच्या सूचना विचारत घेऊन राज्य शासनाकडून मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या जातात. विभागाच्या दि.२४.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये खरेदी केलेल्या धानाची भरडाई २ महिन्याच्या आत करण्याची तरतूद केली आहे.

धान भरडाईच्या प्रकियेत महामंडळाला गिरणीधारक व जिल्हा पुरवठा विभाग यांच्यासोबत काम करावे लागते. गिरणीधारक, जिल्हा पुरवठा विभाग, गोदाम उपलब्धता, जिल्ह्यातील नक्षलप्रभाव तसेच गडचिरोली जिल्ह्याची दुर्गम भौगोलिक परिस्थिती, पावसाळ्यात पुर परिस्थितीमुळे रस्ते बंद झाल्याने वाहतुकीस अडथळे होणे यासारख्या नैसर्गिक बाबींमुळेदेखील धान

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १८५१**

श्री. अभिमन्यु पवार, ॲड. राहूल कुल, मा. विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८५१ पुढीलप्रमाणे आहे: -

"राज्यात सन २०१४ मध्ये दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त मराठवाडा आणि विदर्भातील १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या वतीने अन्न सुरक्षा योजनेच्या धर्तीवर अत्यल्प दराने स्वस्त धान्य दुकानातून प्रति व्यक्ती ५ किलो तांदुळ आणि गहू वितरीत केला जात असणे.सदरील शेतकऱ्यांसाठी असलेली ही योजना राज्यशासनाने २०२२ मध्ये बंद केली असणे.या गरिबी रेषेवरील (APL ) शिधापत्रिका धारक कुटुंबाना शासनाने धान्याऐवजी प्रति व्यक्ती रु.१५० प्रमाणे रक्कम सदरील कुटुंबातील महिला सदस्याच्या बँक खात्यात माहे जानेवारी २०२४ पासून जमा होत असणे. बाजारातील तांदुळ आणि गहू यांच्या भावात आणि देण्यात येत असलेल्या अनुदानात मोठी तफावत असल्याने रोख रकमेऐवजी स्वस्त धान्य दुकानामार्फत माफक दारात पूर्वीप्रमाणे धान्य वाटप करण्याची या शेतकरी शिधापत्रिकाधारक यांची मागणी असणे. सदर मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

==========================================

मा. मंत्री , अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे निवेदन.

दि. २४.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, बीड, धाराशीव, परभणी, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांप्रमाणे (प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य २.०० प्रति किलो गहू व ₹३.०० प्रति किलो तांदुळ या दराने) अन्नधान्याचा लाभ देण्यात येत होता. सदर योजनेकरिता आवश्यक असलेल्या अन्नधान्याची खरेदी मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार केंद्र शासनाकडून Economic Cost ने करण्यात येत होती.

Novel Corona Virus (COVID-१९) प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर शेतकरी योजनेंतर्गत आवश्यक अन्नधान्याची उचल केंद्र शासनाच्या Non NFSA योजनेंतर्गत गहू ₹२२.०० प्रति किलो व तांदुळ ₹२३.०० प्रति किलो या दराने करण्यात येत होती. तथापि, सदर योजनेंतर्गत माहे जुलै,२०२२ पासून गहू व माहे ऑक्टोबर,२०२२ पासून तांदूळ उपलब्ध होणार नसल्याचे भारतीय अन्न महामंडळाकडून कळविण्यात आल्याने माहे जुलै,२०२२ पासून गहू व माहे ऑक्टोबर,२०२२ पासून तांदळाचे वितरण थांबविण्यात आले आहे.

सबब, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांकरिता

अन्नधान्याऐवजी थेट रोख हस्तांतरण (Direct benefit Transfer-DBT) योजना सुरु करण्याबाबतचा निर्णय दि. ३०.१२.२०२२ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला.

राज्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०२३ पासून अन्नधान्याऐवजी Cash Transfer of Food Subsidy Rules, २०१५ मधील तरतूदीनुसार, प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹ १५०/- इतक्या रोख रकमेच्या थेट हस्तांतरणाची (Direct Benefit Transfer-DBT) योजना कार्यान्वित करण्याबाबतचा शासन निर्णय दि. २८.२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. प्रतिवर्षी किमान आधारभूत किंमतीत होणाऱ्या वाढ विचारात घेऊन शासन परिपत्रक दि. २० जून २०२४ अन्वये माहे एप्रिल, २०२४ पासून प्रति माह प्रति लाभार्थी ₹ १७०/- इतकी रक्कम लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार सदर योजनेंतर्गत वितरीत करावयाची रोख रक्कम महिला कुटुंबप्रमुखाच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. महिला कुटुंब प्रमुखाचे कोणत्याही बँकेत खाते नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत संबंधित तहसिलदार यांच्या मान्यतेने कुटुंबातील इतर सदस्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात रक्कम जमा करण्यात येत आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच लाभार्थ्यांकडून थेट रोख रकमेऐवजी (Direct Benefit Transfer-DBT) पूर्वीप्रमाणेच प्रतिमाह प्रति लाभार्थी ५ किलो अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी वारंवार केली जात आहे. त्यापार्श्वभूमीवर १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांकरिता अन्नधान्य वितरणाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत विभाग प्रयत्नशील आहे.

*********************************

अन्नधान्याऐवजी थेट रोख हस्तांतरण (Direct benefit Transfer-DBT) योजना सुरु करण्याबाबतचा निर्णय दि. ३०.१२.२०२२ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला.

राज्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०२३ पासून अन्नधान्याऐवजी Cash Transfer of Food Subsidy Rules, २०१५ मधील तरतूदीनुसार, प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹ १५०/- इतक्या रोख रकमेच्या थेट हस्तांतरणाची (Direct Benefit Transfer-DBT) योजना कार्यान्वित करण्याबाबतचा शासन निर्णय दि. २८.२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. प्रतिवर्षी किमान आधारभूत किंमतीत होणाऱ्या वाढ विचारात घेऊन शासन परिपत्रक दि. २० जून २०२४ अन्वये माहे एप्रिल, २०२४ पासून प्रति माह प्रति लाभार्थी ₹ १७०/- इतकी रक्कम लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार सदर योजनेंतर्गत वितरीत करावयाची रोख रक्कम महिला कुटुंबप्रमुखाच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. महिला कुटुंब प्रमुखाचे कोणत्याही बँकेत खाते नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत संबंधित तहसिलदार यांच्या मान्यतेने कुटुंबातील इतर सदस्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात रक्कम जमा करण्यात येत आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच लाभार्थ्यांकडून थेट रोख रकमेऐवजी (Direct Benefit Transfer-DBT) पूर्वीप्रमाणेच प्रतिमाह प्रति लाभार्थी ५ किलो अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी वारंवार केली जात आहे. त्यापार्श्वभूमीवर १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांकरिता अन्नधान्य वितरणाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत विभाग प्रयत्नशील आहे.

*******************************

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १८५१**

श्री. अभिमन्यु पवार, ॲड. राहूल कुल, मा. विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८५१ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात सन २०१४ मध्ये दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त मराठवाडा आणि विदर्भातील १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या वतीने अन्न सुरक्षा योजनेच्या धर्तीवर अत्यल्प दराने स्वस्त धान्य दुकानातून प्रति व्यक्ती ५ किलो तांदुळ आणि गहू वितरीत केला जात असणे.सदरील शेतकऱ्यांसाठी असलेली ही योजना राज्यशासनाने २०२२ मध्ये बंद केली असणे.या गरिबी रेषेवरील (APL ) शिधापत्रिका धारक कुटुंबाना शासनाने धान्याऐवजी प्रति व्यक्ती रु.१५० प्रमाणे रक्कम सदरील कुटुंबातील महिला सदस्याच्या बँक खात्यात माहे जानेवारी २०२४ पासून जमा होत असणे. बाजारातील तांदुळ आणि गहू यांच्या भावात आणि देण्यात येत असलेल्या अनुदानात मोठी तफावत असल्याने रोख रकमेऐवजी स्वस्त धान्य दुकानामार्फत माफक दारात पूर्वीप्रमाणे धान्य वाटप करण्याची या शेतकरी शिधापत्रिकाधारक यांची मागणी असणे. सदर मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

===================================================

मा. मंत्री , अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे निवेदन.

दि. २४.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, बीड, धाराशीव, परभणी, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांप्रमाणे (प्रतिमाह प्रति सदस्य ५ किलो अन्नधान्य २.०० प्रति किलो गहू व ₹३.०० प्रति किलो तांदुळ या दराने) अन्नधान्याचा लाभ देण्यात येत होता. सदर योजनेकरिता आवश्यक असलेल्या अन्नधान्याची खरेदी मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार केंद्र शासनाकडून Economic Cost ने करण्यात येत होती.

Novel Corona Virus (COVID-१९) प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर शेतकरी योजनेंतर्गत आवश्यक अन्नधान्याची उचल केंद्र शासनाच्या Non NFSA योजनेंतर्गत गहू ₹२२.०० प्रति किलो व तांदुळ ₹२३.०० प्रति किलो या दराने करण्यात येत होती. तथापि, सदर योजनेंतर्गत माहे जुलै,२०२२ पासून गहू व माहे ऑक्टोबर,२०२२ पासून तांदूळ उपलब्ध होणार नसल्याचे भारतीय अन्न महामंडळाकडून कळविण्यात आल्याने माहे जुलै,२०२२ पासून गहू व माहे ऑक्टोबर,२०२२ पासून तांदळाचे वितरण थांबविण्यात आले आहे.

सबब, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांकरिता

लक्षवेधी सुचना क्र.११५५.

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२४ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. रवि राणा , मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"अमरावती जिल्हाधिकारी यांचे दालनात स्थानीक लोकप्रतिनीधी यांनी दि.१८/०६/२०२४ रोजी च्या दरम्यान बैठक घेऊन अमरावती जिल्हा अंतर्गत अमरावती मनपा, नगर पंचायत भातकूली तसेच इतरही नगर पंचायत, नगर परिषद अंतर्गत, भातकुली, अमरावती तालुका व इतर तालुका अंतर्गत केंद्र सरकारच्या कडून व राज्य सरकारच्या कडून राबविण्यात येणाऱ्या घरकूल योजना घरकुले मिळण्यासाठी पि. आर. कार्ड अत्यावशाक असल्याने ज्या अभावी किंव्हा तांत्रिक अडचणी अभावी रखडलेले असणे तसेच शासनाच्या अनेक योजनाचा लाभ पि आर कार्ड मुळे घेऊ शकत नाही अश्या समस्येमुळे नागरीक गोर गरीब नागरीक छोटया छोटया कागदपत्रांन अभावी त्रस्त असणे, त्या सर्व नागरिकांच्या समस्या एकूण त्यावर उपाययोजना करण्यासंबंधी बैठक बोलावली असणे. या बैठकीत पि.आर. कार्ड मा. न्यायालयाचे आदेशामुळे थांबले असल्याची माहिती जिल्हाधकारी यांनी बैठकीत दिली असणे ज्यामुळे संपुर्ण महाराष्ट्रात राज्यातील घरकुले बांधकामासाठी जागेचे पि.आर. कार्ड नसल्याने लाभ मिळत नसणे ज्या मुळे गोर गरीब नागरीकांना घरकुल बांधकामांचे प्रस्त्वाव होत नसणे. या विषयी शासनाने वेळीच दखल घेऊन स्थगिती उठवण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

अमरावती शहरातील व भातकुली नगरपंचायत अंतर्गत राहणाऱ्या लोकांना शासनाकडून मिळत असलेल्या घरकुलाचा लाभ मिळवून देण्याकरीता पी. आर कार्ड उपलब्ध होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या समवेत जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८/६/२०२४ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीदरम्यान अमरावती जिल्हा अंतर्गत अमरावती मनपा, नगर पंचायत भातकुली तसेच इतरही नगर पंचायत अंतर्गत घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी पी.आर.कार्ड आवश्यक असल्याने पी. आर. कार्ड देण्यासंदर्भात उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

नगर विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७/११/२०१८, दिनांक ६/३/२०१९ व दिनांक ११/९/२०१९ अन्वये सर्वासाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या अनुक्रमे शासकिय जमीनींवरील, शासकिय विभागांच्या (वन विभाग वगळून) जमीनींवरील तसेच खाजगी जमीनींवरील अतिक्रमण धारकांना पट्टे वाटप करण्यासंदर्भात कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली आहे.

कृ.मा.प.

रोल क्रमांक ६५५-१ (७५०-०९-२०२४)

अमरावती व भातकुली तालुका अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अतिक्रमण नियमानुकुल करणेकरीता जिल्हाधिकारी, अमरावती/ उपविभागीय अधिकारी / तहसिलदार, अमरावती यांचेकडून उप अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती व उप अधीक्षक भूमि अभिलेख, भातकुली यांचे कार्यालयास प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अतिक्रमण नियमानुकुल करण्याच्या अनुषंगाने पडताळणीसाठी एकूण ६८ प्रस्ताव प्राप्त झाले होते. उप अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती व उप अधीक्षक भूमि अभिलेख, भातकुली कार्यालयाकडून सदर ६८ प्रस्तावाची पडताळणी करुन मंजुरीकरीता संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर केले आहेत. सक्षम प्राधिकारी (जिल्हाधिकारी, अमरावती/ उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार अमरावती) यांचे कडून पट्टे प्रदानाबाबत उप अधिक्षक कार्यालयाकडे १६ अंतीम आदेश प्राप्त झाले आहेत. सदर आदेशाप्रमाणे मिळकत पत्रिकेमध्ये एकूण १३२१ पट्टेधारकांच्या नावाची नोंद संबंधीत आखीव पत्रिकेमध्ये घेणेत आलेली आहे. सद्यस्थितीत उप अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती कार्यालयात प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अतिक्रमण नियमानुकुल पडताळणीसाठी एकही प्रस्ताव प्रलंबित नाही. सक्षम प्राधिकारी यांचेकडून पट्टे वाटप करण्याबाबतचे अंतीम मंजुरी आदेश उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालयास प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, भातकुली यांचे कडून नगर पंचायत, भातकुली या गावाचे सन १९७२-७३ मध्ये नगर भूमापन होऊन खाजगी मिळकतीस पी. आर. कार्ड उपलब्ध आहेत. शासकीय जागेवर अतिक्रमण धारक यांचे पी. आर. कार्ड तयार करणे कामी गट न. ९३६, ५८५, ५८६, ५८८ मधील एकुण २९ धारकांचे प्रस्ताव मोजणी करीता प्राप्त झाले असून त्यांची मोजणी करून दि.२९/१०/२०२१ रोजी "क" प्रत नगर पंचायत, भातकुली यांचेकडे सादर करण्यात आली आहे. नगर पंचायत, भातकुली यांचेकडून अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याचे पी. आर. कार्ड तयार तयार करणेची कार्यवाही उप अधीक्षक भूमि अभिलेख,भातुकली यांचेकडून करण्यात येणार आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.२/२०२२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ६/१०/२०२२ रोजी " There shall be no further regularization of any enchorchment by any authority/officer of the Government until further orders of this Court, except in the manner directed by the Supreme Court In Jagpal Sing (Supra)" असे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे नगर विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७/११/२०१८, दिनांक ६/३/२०१९ व दिनांक ११/९/२०१९ अन्वये सर्वासाठी घरे-२०२२ या धोरणाची अंमलबजावणी करता येत नाही.. मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या सदर जनहित याचिकेमधील निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**********

अमरावती व भातकुली तालुका अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अतिक्रमण नियमानुकुल करणेकरीता जिल्हाधिकारी, अमरावती/ उपविभागीय अधिकारी / तहसिलदार, अमरावती यांचेकडून उप अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती व उप अधीक्षक भूमि अभिलेख, भातकुली यांचे कार्यालयास प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अतिक्रमण नियमानुकुल करण्याच्या अनुषंगाने पडताळणीसाठी एकूण ६८ प्रस्ताव प्राप्त झाले होते. उप अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती व उप अधीक्षक भूमि अभिलेख, भातकुली कार्यालयाकडून सदर ६८ प्रस्तावाची पडताळणी करुन मंजुरीकरीता संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर केले आहेत. सक्षम प्राधिकारी (जिल्हाधिकारी, अमरावती/ उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार अमरावती) यांचे कडून पट्टे प्रदानाबाबत उप अधिक्षक कार्यालयाकडे १६ अंतीम आदेश प्राप्त झाले आहेत. सदर आदेशाप्रमाणे मिळकत पत्रिकेमध्ये एकूण १३२१ पट्टेधारकांच्या नावाची नोंद संबंधीत आखीव पत्रिकेमध्ये घेणेत आलेली आहे. सद्यस्थितीत उप अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती कार्यालयात प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अतिक्रमण नियमानुकुल पडताळणीसाठी एकही प्रस्ताव प्रलंबित नाही. सक्षम प्राधिकारी यांचेकडून पट्टे वाटप करण्याबाबतचे अंतीम मंजुरी आदेश उप अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालयास प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, भातकुली यांचे कडून नगर पंचायत, भातकुली या गावाचे सन १९७२-७३ मध्ये नगर भूमापन होऊन खाजगी मिळकतीस पी. आर. कार्ड उपलब्ध आहेत. शासकीय जागेवर अतिक्रमण धारक यांचे पी. आर. कार्ड तयार करणे कामी गट न. ९३६, ५८५, ५८६, ५८८ मधील एकुण २९ धारकांचे प्रस्ताव मोजणी करीता प्राप्त झाले असून त्यांची मोजणी करून दि.२९/१०/२०२१ रोजी "क" प्रत नगर पंचायत, भातकुली यांचेकडे सादर करण्यात आली आहे. नगर पंचायत, भातकुली यांचेकडून अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याचे पी. आर. कार्ड तयार तयार करणेची कार्यवाही उप अधीक्षक भूमि अभिलेख,भातुकली यांचेकडून करण्यात येणार आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.२/२०२२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ६/१०/२०२२ रोजी " There shall be no further regularization of any enchorchment by any authority/officer of the Government until further orders of this Court, except in the manner directed by the Supreme Court In Jagpal Sing (Supra)" असे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे नगर विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७/११/२०१८, दिनांक ६/३/२०१९ व दिनांक ११/९/२०१९ अन्वये सर्वासाठी घरे-२०२२ या धोरणाची अंमलबजावणी करता येत नाही. मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या सदर जनहित याचिकेमधील निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**********

(७२) ६,५५-१३७

लक्षवेधी सुचना क्र.११५५.

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२४ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. रवि राणा , मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"अमरावती जिल्हाधिकारी यांचे दालनात स्थानीक लोकप्रतिनीधी यांनी दि.१८/०६/२०२४ रोजी च्या दरम्यान बैठक घेऊन अमरावती जिल्हा अंतर्गत अमरावती मनपा, नगर पंचायत भातकूली तसेच इतरही नगर पंचायत, नगर परिषद अंतर्गत, भातकुली, अमरावती तालुका व इतर तालुका अंतर्गत केंद्र सरकारच्या कडून व राज्य सरकारच्या कडून राबविण्यात येणाऱ्या घरकूल योजना घरकुले मिळण्यासाठी पि. आर. कार्ड अत्यावशक असल्याने ज्या अभावी किंवा तांत्रिक अडचणी अभावी रखडलेले असणे तसेच शासनाच्या अनेक योजनाचा लाभ पि आर कार्ड मुळे घेऊ शकत नाही अश्या समस्येमुळे नागरीक गोर गरीब नागरीक छोटया छोटया कागदपत्रांन अभावी त्रस्त असणे, त्या सर्व नागरिकांच्या समस्या एकूण त्यावर उपाययोजना करण्यासंबंधी बैठक बोलावली असणे. या बैठकीत पि.आर. कार्ड मा. न्यायालयाचे आदेशामुळे थांबले असल्याची माहिती जिल्हाधकारी यांनी बैठकीत दिली असणे ज्यामुळे संपुर्ण महाराष्ट्रात राज्यातील घरकुले बांधकामासाठी जागेचे पि.आर. कार्ड नसल्याने लाभ मिळत नसणे ज्या मुळे गोर गरीब नागरीकांना घरकुल बांधकामांचे प्रस्त्वाव होत नसणे. या विषयी शासनाने वेळीच दखल घेऊन स्थगिती उठवण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

अमरावती शहरातील व भातकुली नगरपंचायत अंतर्गत राहणाऱ्या लोकांना शासनाकडून मिळत असलेल्या घरकुलाचा लाभ मिळवून देण्याकरीता पी. आर कार्ड उपलब्ध होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या समवेत जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८/६/२०२४ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीदरम्यान अमरावती जिल्हा अंतर्गत अमरावती मनपा, नगर पंचायत भातकुली तसेच इतरही नगर पंचायत अंतर्गत घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी पी.आर.कार्ड आवश्यक असल्याने पी. आर. कार्ड देण्यासंदर्भात उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

नगर विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७/११/२०१८, दिनांक ६/३/२०१९ व दिनांक ११/९/२०१९ अन्वये सर्वासाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या अनुक्रमे शासकिय जमीनींवरील, शासकिय विभागांच्या (वन विभाग वगळून) जमीनींवरील तसेच खाजगी जमिनींवरील अतिक्रमण धारकांना पट्टे वाटप करण्यासंदर्भात कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली आहे.

कृ.मा.प.

रोटा एच ६५५-१ (७५०-०९-२०२४)

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

## ॲड.आकाश फुंडकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२४५ पुढीलप्रमाणे आहे:-

" ज्याअर्थी, बुलढाणा जिल्हयाचे विभाजन करून खामगांव हा घाटाखालील ६ तालुक्यातील नागरीकांनी स्वतंत्र जिल्हा करण्याची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबीत असणे, यामागणीसाठी वेळोवेळी आंदोलने केली असणे, याबाबत लोकप्रतिनिधीनी वेळोवेळी अधिवेशनात मागणी केली असणे, जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दि.३०/०९/२०१५ रोजी जिल्हा विभाजनाबाबत निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या जिल्हा पुनर्रचना समितीचा आवश्यक माहिती/अहवाल दि.३०/०९/२०१५ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती यांना सादर केला असणे, बुलढाणा जिल्हयाचे ठिकाणी जाण्यासाठी नागरीकांना ८० ते १०० किमी. चा प्रवास करावा लागत असणे, त्यामुळे नागरीकांना जिल्हयाचे ठिकाने कार्यालयीन कामासाठी जावे लागल्यास संपुर्ण दिवसाच वेळ वाया जात असणे, बुलढाणा जिल्हयाचे विभाजन करुन खामगांव स्वतंत्र जिल्हा केल्यास घाटा खालील ६ तालुक्यातील नागरीकांना दळणवळणाचे दृष्टीने सोयीचे असणे, बुलढाणा जिल्हयाचे भौगोलिक स्थिती पाहता जिल्हयाचे ठिकाणी कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्यापेक्षा खामगांव हा स्वतंत्र जिल्हा केल्यास ते सर्व दृष्टीने योग्य असणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांना जिल्हयाचे ठिकाणी जाण्यास त्रास असणे, यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये शासनाबाबत रोष निर्माण झाला असणे, तथापी मोठ्या जिल्हयाचे विभाजन करुन छोटया जिल्हयाची निर्मीती करण्याचा शासनाचा मानस असणे, अशा परिस्थतीत बुलढाणा जिल्हयाचे विभाजन करून खामगांव जिल्हा निर्मीती करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

## मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री (महसूल) यांचे निवेदन

राज्यातील अस्तित्वातील जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणकोणते निकष विचारात घ्यावे, याचा अभ्यास करुन शासनास या निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी दि.२४.०६.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती.

०२. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी बुलढाणा जिल्ह्याचे विभाजन करुन नवीन खामगांव जिल्हा निर्माण करणेबाबत दि.३०.०९.२०१५ च्या पत्रान्वये जिल्हा पुनर्रचना समितीस अहवाल सादर केला होता. याद्वारे बुलढाणा

जिल्ह्यातील एकुण १३ तालुक्यांपैकी खामगांव, शेगांव, मलकापूर, नांदुरा, जळगाव-जामोद व संग्रामपूर या ६ तालुक्यांचा खामगांव जिल्हा निर्माण करणेबाबत प्रस्तावित केले होते.

०३. बुलढाणा जिल्हाचे विभाजन करुन खामगांव जिल्हा निर्मितीबाबत लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त आहे. तसेच, याबाबत विधिमंडळ आयुधांद्वारेदेखील मागणी करण्यात आली आहे.

०४. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुका मुख्यालयाचे बुलढाणा जिल्हा मुख्यालयापर्यंतचे अंतर ९६ कि.मी. तर खामगांव मुख्यालयापर्यंतचे अंतर ५० कि.मी.आहे. संग्रामपूर तालुक्यातील सर्वात दुरचे दुनकी या गावाचे बुलढाणा मुख्यालयापर्यंतचे अंतर सुमारे १०२ कि.मी.आहे. तसेच जिल्हास्तरीय कार्यालयांकरीता खामगांव येथे इमारती व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याचा अहवाल विभागीय आयुक्त यांनी शासनास सादर केला आहे.

०५. जिल्हा पुनर्रचना समितीने अस्तित्वातील जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणकोणते निकष विचारात घ्यावे, याचा अभ्यास करुन शासनास दि.१६.११.२०१६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे.

०६. नवीन जिल्हा निर्मिती प्रशासकीय प्रक्रिया आहे.त्याकरीता आर्थिक भार असून त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मिती संदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

**************

जिल्ह्यातील एकुण १३ तालुक्यांपैकी खामगांव, शेगांव, मलकापूर, नांदुरा, जळगाव-जामोद व संग्रामपूर या ६ तालुक्यांचा खामगांव जिल्हा निर्माण करणेबाबत प्रस्तावित केले होते.

०३. बुलढाणा जिल्हाचे विभाजन करुन खामगांव जिल्हा निर्मितीबाबत लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त आहे. तसेच, याबाबत विधिमंडळ आयुधांद्वारेदेखील मागणी करण्यात आली आहे.

०४. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुका मुख्यालयाचे बुलढाणा जिल्हा मुख्यालयापर्यंतचे अंतर ९६ कि.मी. तर खामगांव मुख्यालयापर्यंतचे अंतर ५० कि.मी.आहे. संग्रामपूर तालुक्यातील सर्वात दुरचे दुनकी या गावाचे बुलढाणा मुख्यालयापर्यंतचे अंतर सुमारे १०२ कि.मी.आहे. तसेच जिल्हास्तरीय कार्यालयांकरीता खामगांव येथे इमारती व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याचा अहवाल विभागीय आयुक्त यांनी शासनास सादर केला आहे.

०५. जिल्हा पुनर्रचना समितीने अस्तित्वातील जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणकोणते निकष विचारात घ्यावे, याचा अभ्यास करुन शासनास दि.१६.११.२०१६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे.

०६. नवीन जिल्हा निर्मिती प्रशासकीय प्रक्रिया आहे.त्याकरीता आर्थिक भार असून त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मिती संदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

**************

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

ॲड.आकाश फुंडकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२४५ पुढीलप्रमाणे आहे:-

" ज्याअर्थी, बुलढाणा जिल्हयाचे विभाजन करून खामगांव हा घाटाखालील ६ तालुक्यातील नागरीकांनी स्वतंत्र जिल्हा करण्याची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबीत असणे, यामागणीसाठी वेळोवेळी आंदोलने केली असणे, याबाबत लोकप्रतिनिधीनी वेळोवेळी अधिवेशनात मागणी केली असणे, जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दि.३०/०९/२०१५ रोजी जिल्हा विभाजनाबाबत निकष ठरविण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या जिल्हा पुनर्रचना समितीचा आवश्यक माहिती/अहवाल दि.३०/०९/२०१५ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती यांना सादर केला असणे, बुलढाणा जिल्हयाचे ठिकाणी जाण्यासाठी नागरीकांना ८० ते १०० किमी. चा प्रवास करावा लागत असणे, त्यामुळे नागरीकांना जिल्हयाचे ठिकाने कार्यालयीन कामासाठी जावे लागल्यास संपुर्ण दिवसाच वेळ वाया जात असणे, बुलढाणा जिल्हयाचे विभाजन करुन खामगांव स्वतंत्र जिल्हा केल्यास घाटा खालील ६ तालुक्यातील नागरीकांना दळणवळणाचे दृष्टीने सोयीचे असणे, बुलढाणा जिल्हयाचे भौगोलिक स्थिती पाहता जिल्हयाचे ठिकाणी कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्यापेक्षा खामगांव हा स्वतंत्र जिल्हा केल्यास ते सर्व दृष्टीने योग्य असणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांना जिल्हयाचे ठिकाणी जाण्यास त्रास असणे, यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये शासनाबाबत रोष निर्माण झाला असणे, तथापी मोठ्या जिल्हयाचे विभाजन करुन छोटया जिल्हयाची निर्मीती करण्याचा शासनाचा मानस असणे, अशा परिस्थतीत बुलढाणा जिल्हयाचे विभाजन करून खामगांव जिल्हा निर्मीती करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

**मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

राज्यातील अस्तित्वातील जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणकोणते निकष विचारात घ्यावे, याचा अभ्यास करुन शासनास या निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी दि.२४.०६.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती.

०२. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी बुलढाणा जिल्ह्याचे विभाजन करुन नवीन खामगांव जिल्हा निर्माण करणेबाबत दि.३०.०९.२०१५ च्या पत्रान्वये जिल्हा पुनर्रचना समितीस अहवाल सादर केला होता. याद्वारे बुलढाणा

**लक्षवेधी सूचना क्र.१५१०**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.मंगेश कुडाळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५१० पुढीलप्रमाणे आहे :-

"मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील सर्व्हे नंबर ३७ व ४२ या जागेतील मूळ मालक कायम अस्तित्वात नसताना, मिळकतीमध्ये वारसाहक्काने नाव नोंद करण्यास मा.उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट असताना, प्रोबेट आदेश मंजूर नसताना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तहसिलदार बोरीवली व मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनी आर्थिक गैरव्यवहार करुन बेकायदेशीर आदेश मंजूर करुन कोट्यावधीचा भ्रष्टाचार केल्याबाबत सामाजिक कार्यकर्ता यांनी माहे जून, २०२४ मध्ये व त्यादरम्यान तक्रार केलेली असणे, उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दावा क्रमांक ७८/२०२० व दावा क्रमांक ९५०/२०१८ न्यायप्रविष्ट असून मा.न्यायालयाने त्यासंदर्भात कोणताही आदेश पारित केलेला नसतानाही श्री. कैकसरु रतनशा कालापीशी यांच्या मालकीची जमीन श्री. बेहराम रुस्तमजी इच्छापोरिया यांच्या नावे आर्थिक संगनमत करुन मंजूर करणे, उक्त प्रकरणी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी पदाचा गैरवापर करुन सातबारा उताऱ्यात श्री. इच्छापोरिया यांच्या नावाशी नोंद घेणे, श्री. इरेश चप्पलवार हे खालापूर विभागात तहसिलदार पदावर असताना जमिन विक्री प्रकरणात आरोपी असून ते सद्या जामिनावर असणे, मूळ मालकाला डावलून मा.न्यायालयाचा अवमान करुन तहसिलदार, बोरीवली यांनी माहे मार्च, २०२४ मध्ये दिलेले आदेश, तात्काळ रद्द करुन दोषी अधिकाऱ्यांवर करावाई करावी, तसेच याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स.क्र. ३७ व स.क्र. ४२ या जमीन मिळकतीचे ७/१२ सदरी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील दि.१९/०५/२०२१ रोजीचे लेटर ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन व दि.०३/०४/२०२१ रोजीचे प्रोबेट अन्वये कैकसरु रतनाशा कालापीशी यांचे नाव कमी करुन श्री. बेहराम रुस्तमजी इच्छापोरीया यांचे नाव दाखल करण्याबाबत तहसिलदार यांच्याकडे अर्ज केला होता. त्यानुसार तलाठी सजा कांदिवली यांनी सादर केलेल्या अहवालात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील दावा क्र. NOTICE OF MOTION (L) NO.2103 OF 2018 IN COMMERCIAL SUIT (I) NO.1207 OF 2018 मधील दि.१०/०९/२०१८ रोजीचे आदेश सादर केले असून, सदर आदेशान्वये MAINTAIN STATUS QUO आदेशित केल्याचे दिसून येत असल्याने, तहसिलदार, बोरीवली यांनी दि. १४/०६/२०२२ अन्वये फेरफार नोंद न करता पत्रान्वये श्री. बेहराम रुस्तमजी इच्छापोरीया यांचा अर्ज निकाली काढला होता.

श्री. बेहराम रुस्तमजी इच्छापोरीआ यांनी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांच्याकडे तहसिलदार, बोरीवली यांच्या दि.१४/०६/२०२४ रोजीच्या पत्राला आव्हानित केले होते. परंतु, अपिल दाखल करण्यास विलंब झाल्याने प्रथम विलंब माफीचे अर्जावर सुनावणी होवून दि.३०/०६/२०२३ चे आदेशान्वये विलंबमाफ करण्यात येऊन, दि.१०/०१/२०२४ रोजी अंतिम आदेश पारित करुन, अपिलार्थी यांचे गाव अभिलेखांमध्ये फेरफार नोंदविण्यासाठीचा अर्ज निकाली काढण्यापूर्वी नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार अपिलार्थी

यांना सुनावणीची संधी देवून मा. मुंबई उच्च न्यायालयाकडील कमर्शीयल सूट (एल) नंबर १२०७/२०१८ मधील नोटीस ऑफ मोशन (L) नं. २१०३/२०१८ मधील दि.१०/०९/२०१८ चे आदेश व अपिलार्थी यांनी सादर केलेली कागदपत्रे याचा विचार करुन अपिलार्थी यांच्या अर्जावर गुणवत्तेवर निर्णय घेणे साठी प्रकरण परत तहसिलदार, बोरीवली यांच्याकडे पाठविण्यात आले होते. प्रस्तुत अपिल प्रकरणामध्ये अर्धन्यायिक स्वरुपाचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार सदर प्रकरणात तहसीलदार, बोरीवली यांनी सुनावणी घेवून दि.०६/०३/२०२४ रोजीच्या आदेशान्वये "तलाठी सजा कांदिवली यांनी मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स.क्र. ३७ व स.क्र.४२ या मिळकतीवर कैकसरु रतनशॉ कालापीशी यांचे दि.१५/१२/१९७१ रोजी केलेले मृत्युपत्रावर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा क्र.७८/२०२० दाखल करुन, दि.१९/०५/२०२१ रोजीचे Letter of Administration तसेच रुस्तमजी दोराबजी इच्छापोरीया यांनी दि.०७/११/२००८ रोजी केलेले मृत्युपत्रावर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा क्र. ९५० ऑफ २०१८ दाखल करुन दि.०३/०४/२०२१ रोजीच्या आदेशाने प्राप्त PROBATE नुसार अर्जदार बेहराम रुस्तमजी इच्छापोरीया यांचे नाव अधिकार अभिलेखात दाखल करणेत यावे." असे आदेश पारीत केले आहेत.

सदर संचिकेतील कागदपत्रे, अर्जदार यांनी सादर केलेले क्षतीपूर्ती बंधपत्र, मा. सर्वोच्च न्यायालयातील न्यायनिर्णय व मा. उच्च न्यायालयाकडील आदेशाचे अवलोकन करुन अर्जदार यांची नैसर्गिक न्यायिकदृष्ट्या विनंती मान्य करुन तहसिलदार, बोरीवली यांनी दि.०६/०३/२०२४ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशान्वये अर्जदार बेहराम रुस्तमजी इच्छापोरिया यांचे नाव सदर मिळकतीच्या अधिकार अभिलेखात फेरफार क्र.५७३ अन्वये दाखल करण्यात आले. तसेच सदर आदेशात वरिष्ठ न्यायालयाचे आदेश अंतिम असतील, असे देखील नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कोणीही पदाचा गैरवापर केलेला नाही किंवा आर्थिक गैरव्यवहार करुन भ्रष्टाचार केलेला नाही. प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९, १५० (२) व महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील नियम १७ व २६ खालील कार्यवाही नुसार अर्धन्यायिक (Quasi Judicial) प्रकरणांमध्ये नैसर्गिक न्यायतत्वार आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. असा तहसिलदार, बोरीवली यांनी खुलासा सादर केलेला आहे.

तहसिलदार, बोरीवली यांच्या दि.०६/०३/२०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द मे. सेव्हन स्टार इस्टेट प्रा.लि. यांनी उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांच्याकडे अपिल सादर केले असून सद्यःस्थितीत ते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच तहसिलदार, बोरीवली यांच्या दि. ०६/०३/२०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द अन्य अपिलार्थी श्रीमती शितल शांताराम चव्हाण यांनी उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांच्याकडे अपिल दाखल केले आहे.

श्री. इरेश चप्पलवार हे तहसिलदार, खालापूर म्हणून कार्यरत असताना जमीन विक्री प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक रायगड, अलिबाग यांनी भा.दं.वि.रा. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) अन्वये महाराष्ट्र नवनिर्माण भुदान समितीचे कार्यालयीन मंत्री, संयोजक/ अध्यक्ष, श्री. चप्पलवार, तत्का. तहसिलदार, खालापूर व इतर यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे.

*******

यांना सुनावणीची संधी देवून मा. मुंबई उच्च न्यायालयाकडील कमर्शीयल सूट (एल) नंबर १२०७/२०१८ मधील नोटीस ऑफ मोशन (L) नं. २१०३/२०१८ मधील दि.१०/०९/२०१८ चे आदेश व अपिलार्थी यांनी सादर केलेली कागदपत्रे याचा विचार करुन अपिलार्थी यांच्या अर्जावर गुणवत्तेवर निर्णय घेणे साठी प्रकरण परत तहसिलदार, बोरीवली यांच्याकडे पाठविण्यात आले होते. प्रस्तुत अपिल प्रकरणामध्ये अर्धन्यायिक स्वरुपाचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार सदर प्रकरणात तहसीलदार, बोरीवली यांनी सुनावणी घेवून दि.०६/०३/२०२४ रोजीच्या आदेशान्वये "तलाठी सजा कांदिवली यांनी मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स.क्र. ३७ व स.क्र.४२ या मिळकतीवर कैकसरु रतनशॉ कालापीशी यांचे दि.१५/१२/१९७१ रोजी केलेले मृत्युपत्रावर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा क्र.७८/२०२० दाखल करुन, दि.१९/०५/२०२१ रोजीचे Letter of Administration तसेच रुस्तमजी दोराबजी इच्छापोरीया यांनी दि.०७/११/२००८ रोजी केलेले मृत्युपत्रावर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा क्र. ९५० ऑफ २०१८ दाखल करुन दि.०३/०४/२०२१ रोजीच्या आदेशाने प्राप्त PROBATE नुसार अर्जदार बेहराम रुस्तमजी इच्छापोरीया यांचे नाव अधिकार अभिलेखात दाखल करणेत यावे." असे आदेश पारीत केले आहेत.

सदर संचिकेतील कागदपत्रे, अर्जदार यांनी सादर केलेले क्षतीपूर्ती बंधपत्र, मा. सर्वोच्च न्यायालयातील न्यायनिर्णय व मा. उच्च न्यायालयाकडील आदेशाचे अवलोकन करुन अर्जदार यांची नैसर्गिक न्यायिकदृष्ट्या विनंती मान्य करुन तहसिलदार, बोरीवली यांनी दि.०६/०३/२०२४ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशान्वये अर्जदार बेहराम रुस्तमजी इच्छापोरिया यांचे नाव सदर मिळकतीच्या अधिकार अभिलेखात फेरफार क्र.५७३ अन्वये दाखल करण्यात आले. तसेच सदर आदेशात वरिष्ठ न्यायालयाचे आदेश अंतिम असतील, असे देखील नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कोणीही पदाचा गैरवापर केलेला नाही किंवा आर्थिक गैरव्यवहार करुन भ्रष्टाचार केलेला नाही. प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९, १५० (२) व महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मधील नियम १७ व २६ खालील कार्यवाही नुसार अर्धन्यायिक (Quasi Judicial) प्रकरणांमध्ये नैसर्गिक न्यायतत्वार आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. असा तहसिलदार, बोरीवली यांनी खुलासा सादर केलेला आहे.

तहसिलदार, बोरीवली यांच्या दि.०६/०३/२०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द मे. सेव्हन स्टार इस्टेट प्रा.लि. यांनी उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांच्याकडे अपिल सादर केले असून सद्य:स्थितीत ते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच तहसिलदार, बोरीवली यांच्या दि. ०६/०३/२०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द अन्य अपिलार्थी श्रीमती शितल शांताराम चव्हाण यांनी उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांच्याकडे अपिल दाखल केले आहे.

श्री. इरेश चप्पलवार हे तहसिलदार, खालापूर म्हणून कार्यरत असताना जमीन विक्री प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक रायगड, अलिबाग यांनी भा.दं.वि.रा. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) अन्वये महाराष्ट्र नवनिर्माण भुदान समितीचे कार्यालयीन मंत्री, संयोजक/ अध्यक्ष, श्री. चप्पलवार, तत्का. तहसिलदार, खालापूर व इतर यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र.१५१०

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.मंगेश कुडाळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५१० पुढीलप्रमाणे आहे :-

"मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील सर्व्हे नंबर ३७ व ४२ या जागेतील मूळ मालक कायम अस्तित्वात नसताना, मिळकतीमध्ये वारसाहक्काने नाव नोंद करण्यास मा.उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट असताना, प्रोबेट आदेश मंजूर नसताना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तहसिलदार बोरीवली व मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनी आर्थिक गैरव्यवहार करुन बेकायदेशीर आदेश मंजूर करुन कोट्यावधीचा भ्रष्टाचार केल्याबाबत सामाजिक कार्यकर्ता यांनी माहे जून, २०२४ मध्ये व त्यादरम्यान तक्रार केलेली असणे, उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दावा क्रमांक ७८/२०२० व दावा क्रमांक ९५०/२०१८ न्यायप्रविष्ट असून मा.न्यायालयाने त्यासंदर्भात कोणताही आदेश पारित केलेला नसतानाही श्री. कैकसरु रतनशा कालापीशी यांच्या मालकीची जमीन श्री. बेहराम रुस्तमजी इच्छापोरिया यांच्या नावे आर्थिक संगनमत करुन मंजूर करणे, उक्त प्रकरणी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी पदाचा गैरवापर करुन सातबारा उताऱ्यात श्री. इच्छापोरिया यांच्या नावाशी नोंद घेणे, श्री. इरेश चप्पलवार हे खालापूर विभागात तहसिलदार पदावर असताना जमिन विक्री प्रकरणात आरोपी असून ते सद्या जामिनावर असणे, मूळ मालकाला डावलून मा.न्यायालयाचा अवमान करुन तहसिलदार, बोरीवली यांनी माहे मार्च, २०२४ मध्ये दिलेले आदेश, तात्काळ रद्द करुन दोषी अधिकाऱ्यांवर करावाई करावी, तसेच याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे चारकोप, ता. बोरीवली येथील स.क्र. ३७ व स.क्र. ४२ या जमीन मिळकतीचे ७/१२ सदरी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील दि.१९/०५/२०२१ रोजीचे लेटर ऑफ अॅडमिनीस्ट्रेशन व दि.०३/०४/२०२१ रोजीचे प्रोबेट अन्वये कैकसरु रतनाशा कालापीशी यांचे नाव कमी करुन श्री. बेहराम रुस्तमजी इच्छापोरीया यांचे नाव दाखल करण्याबाबत तहसिलदार यांच्याकडे अर्ज केला होता. त्यानुसार तलाठी सजा कांदिवली यांनी सादर केलेल्या अहवालात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील दावा क्र. NOTICE OF MOTION (L) NO.2103 OF 2018 IN COMMERCIAL SUIT (I) NO.1207 OF 2018 मधील दि.१०/०९/२०१८ रोजीचे आदेश सादर केले असून, सदर आदेशान्वये MAINTAIN STATUS QUO आदेशित केल्याचे दिसून येत असल्याने, तहसिलदार, बोरीवली यांनी दि. १४/०६/२०२२ अन्वये फेरफार नोंद न करता पत्रान्वये श्री. बेहराम रुस्तमजी इच्छापोरीया यांचा अर्ज निकाली काढला होता.

श्री. बेहराम रुस्तमजी इच्छापोरीआ यांनी उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांच्याकडे तहसिलदार, बोरीवली यांच्या दि.१४/०६/२०२४ रोजीच्या पत्राला आव्हानित केले होते. परंतु, अपिल दाखल करण्यास विलंब झाल्याने प्रथम विलंब माफीचे अर्जावर सुनावणी होवून दि.३०/०६/२०२३ चे आदेशान्वये विलंबमाफ करण्यात येऊन, दि.१०/०१/२०२४ रोजी अंतिम आदेश पारित करुन, अपिलार्थी यांचे गाव अभिलेखांमध्ये फेरफार नोंदविण्यासाठीचा अर्ज निकाली काढण्यापूर्वी नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार अपिलार्थी

**लक्षवेधी सूचना क्र.१५९३**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.अबू आजमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५९३ पुढीलप्रमाणे आहे :-

"मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रातील घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, एकता नगर, मंडाळा, टी जंक्शन, मानखुर्द येथील शासनाच्या जमिनीवर अवैधरितीने कब्जा करून बांधण्यात आलेले अवैध आठ गाळे बांधण्यात येणे, सदर गाळे निष्कासित करण्याबाबत जिल्हाधिकारी व संबंधित विभागांना पत्रव्यवहार केले असता गाळे निष्कासित करण्याचे आदेश काढण्यात येणे, कार्यकारी अभियंता वाघमारे यांचा अनेकवेळा पाठपुरावा केल्यावर फक्त २ गाळे काढण्यात येणे, तसेच विभगातील छेडा नगर येथून इंडियन ऑईल कॉंप्लेक्स कडे येत असतांना, शंकरा कॉलनी, नारायण गुरु शाळेच्या पाठीमागे कलेक्टर च्या जमिनीवर भूमाफियांनी मोठ मोठाले गोडाऊन बनवून २७ ते ३० लाख रुपय महिना किराया वसूल करीत असणे, सदर बाबतीत संबंधित विभागांचे अधिकारी व गाळे धारक संगनमताने शासनाचा करोडोच्या महसुलाचे नुकसान करणे, क्षेत्राच्या मंडाळा विभागात असलेल्या संक्रमण इमारती मध्ये पुनर्वसन झालेले नागरिक तेथून गेले असता सदर इमारती मध्ये अवैधरीत्या लोकांकडून ५ ते १० लाख रुपय घेऊन विकत असणे, सदर विषयी संबंधितांवर कारवाई करून सदर जागा शासनाने ताब्यात घेऊन सदर जागेचा वापर शाळा, महाविद्यालय किंवा लोक उपयोगासाठी करण्याची मागणी स्थानिक नागरिक, सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी यांच्या मार्फत होणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

➢ **टी जंक्शन मानखुर्द येथील अतिक्रमणाबाबत (सायन पनवेल हायवे)**

मौजे मंडाळे ता. कुर्ला येथील स.नं. ८०, न.भू.क्र. ६/१ अ पैकी, टी जंक्शन, घाटकोपर- मानखुर्द लिंक रोड या शासकीय मिळकतीवरील एकता नगर, गल्ली नं.१ च्या बाजुला टी-जंक्शन, सर्व्हिस रोड, मंडाळा या ठिकाणी न.भू.क्र.६/१ अ या शासकीय जागेत अतिक्रमण करुन ०२ अनिवासी गाळे बांधण्यात आल्याचे दिनांक ०७.०१.२०२० रोजी निदर्शनास आले होते. त्यामुळे सदर गाळेधारकांना दिनांक १७.०१.२०२० रोजी नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. संबंधितांकडून खुलासा ऐकून घेऊन स्वतःहून निष्कासन करण्याचे निर्देश दिले होते. तद्नंतर उपरोक्त गाळयांच्या बाजूलाच कोरोना लॉकडाऊन कालावधीमध्ये आणखी ०३ अनिवासी गाळयांचे अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले होते. त्या ०३ गाळेधारकांना दि.१८.०८.२०२० रोजी नोटीसा देण्यात आल्या होत्या. तद्नंतर दि.०८.०९.२०२० रोजी गाळयांचे अतिक्रमण २४ तासांचे आत काढून टाकणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि, आदेशाप्रमाणे अतिक्रमणधारकांनी कार्यवाही न केल्याने सदरहू ०५ अनिवासी गाळयांचे दिनांक १६.०९.२०२० रोजी पोलीस बंदोबस्तात निष्कासन केले होते.

परंतु, सदर निष्कासनानंतर उक्त नमुद ५ ही अतिक्रमणाधारकांनी त्याठिकाणी पुनःश्च बांधकाम करुन नव्याने अतिक्रमण केल्याचे दिसून आले. सदर अतिक्रमण धारकांपैकी ३ अतिक्रमणधारकांनी मा. उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे. तसेच २ अतिक्रमणधारकांनी मा. नगर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेने घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड (जी.एम.एल.आर.), एकता नगर, मंडाळा, टी जंक्शन, मानखुर्द येथील महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जमिनीवरील ६

व्यावसायिक गाळयांना १५.०२.२०२४ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच दिनांक ११.०६.२०२४ रोजी २ व्यावसायिक गाळयांवर निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

- **शंकरा कॉलनी, नारायण गुरु शाळेच्या पाठीमागील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाबाबत**

मौजे चेंबूर, ता. कुर्ला येथील स.नं. ३७६, न.भू.क्र. ८२३ अ मधील २३००० चौ.मी. शासकीय जमीन ही माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेली आहे.

दरम्यान माथाडी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मा. मंत्री (कामगार) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.०२.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेला चेंबूर या ठिकाणी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) चेंबूर यांच्या दि.१९.०७.२०२३ अन्वये, सदर जागेवर झालेल्या अतिक्रमण निष्कासन कार्यक्रम दि. ३१.०५.२०२२ व दि. ०१.०६.२०२२ रोजी आयोजित करण्यात आला होता. परंतु झोपडीधारक यांनी सदर नोटीसीच्या विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात रिट याचिका (एल) क्रमांक १६७६६/२०२२ दाखल केली असून, सदर याचिकेमध्ये मा.न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. वास्तविक पाहता यापूर्वीच दिनांक २०.०४.२०१७ रोजी निष्कासनाची कार्यवाही करण्यात येवून, मोकळया जागेचा ताबा माथाडी कामगार संस्थेस देण्यात आला होता. तसेच दि.१५.११.२०२२ रोजी देखील ०७ व्यावसायिक गाळयांचे निष्कासन केले होते.

दरम्यान सदर मिळकतीवरील अतिक्रमणधारक आदिवासी पारधी संघ व इतर लोकांच्या वतीने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका (क्र.३०९४/२०२२) दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये मा. न्यायालयाने दिनांक ०३.०८.२०२३ रोजीच्या आदेशान्वये याचिकाकर्त्यांच्या सर्व साभासदास व माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस सुनावणीची संधी देवून २ आठवडयात योग्य आदेश पारीत करणेबाबत उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), चेंबूर यांना आदेशित केले होते. त्याप्रमाणे उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), चेंबूर यांनी दिनांक २७.०९.२०२३ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशानुसार १७३ पैकी ३५ अतिक्रमण झोपडीधारकांने पुरावे सादर केले असून, उर्वरित १३८ झोपडीधारकांचे पुरावे सादर करण्यास आदिवासी पारधी संघ असमर्थ ठरले असून, सादर करण्यात आलेले पुरावे हे माथाडी कामगार यांना ताबा दिल्याचे तारखेनंतरचे आहेत. त्यामुळे उपरोक्त १७३ झोपडीधारक हे अतिक्रमण केल्याचे दिसून येत आहे. असे आदेश उपजिल्हाधिकारी, (अति./निष्का.) चेंबूर यांनी पारीत केले आहेत.

- **संक्रमण इमारत (ट्रान्जीट कॅम्प) :-**

मौजे-मानखुर्द, तालुका-कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा यातील सर्वे नं १३८, न.भू.क्र. १/अ, व न.भू.क्र. १/ब या जमिनीवर साधारण ७६० बैठी घरे स्वरुपात संक्रमण शिबीर असून त्यास चारही बाजूने तारेचे कुंपन घातले आहे. प्राधिकरणाच्या सदर बैठी घरे स्वरुपात असणाऱ्या संक्रमण शिबीरामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होत नसल्याचे दिसून येते, असे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी कळविले आहे.

*******

व्यावसायिक गाळयांना १५.०२.२०२४ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच दिनांक ११.०६.२०२४ रोजी २ व्यावसायिक गाळयांवर निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

➢ **शंकरा कॉलनी, नारायण गुरु शाळेच्या पाठीमागील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाबाबत**

मौजे चेंबूर, ता. कुर्ला येथील स.नं. ३७६, न.भू.क्र. ८२३ अ मधील २३००० चौ.मी. शासकीय जमीन ही माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आलेली आहे.

दरम्यान माथाडी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मा. मंत्री (कामगार) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.०२.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेला चेंबूर या ठिकाणी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) चेंबूर यांच्या दि.१९.०७.२०२३ अन्वये, सदर जागेवर झालेल्या अतिक्रमण निष्कासन कार्यक्रम दि. ३१.०५.२०२२ व दि. ०१.०६.२०२२ रोजी आयोजित करण्यात आला होता. परंतु झोपडीधारक यांनी सदर नोटीसीच्या विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात रिट याचिका (एल) क्रमांक १६७६६/२०२२ दाखल केली असून, सदर याचिकेमध्ये मा.न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. वास्तविक पाहता यापूर्वीच दिनांक २०.०४.२०१७ रोजी निष्कासनाची कार्यवाही करण्यात येवून, मोकळया जागेचा ताबा माथाडी कामगार संस्थेस देण्यात आला होता. तसेच दि.१५.११.२०२२ रोजी देखील ०७ व्यावसायिक गाळयांचे निष्कासन केले होते.

दरम्यान सदर मिळकतीवरील अतिक्रमणधारक आदिवासी पारधी संघ व इतर लोकांच्या वतीने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका (क्र.३०९४/२०२२) दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये मा. न्यायालयाने दिनांक ०३.०८.२०२३ रोजीच्या आदेशान्वये याचिकाकर्त्यांच्या सर्व साभासदास व माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस सुनावणीची संधी देवून २ आठवडयात योग्य आदेश पारीत करणेबाबत उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), चेंबूर यांना आदेशित केले होते. त्याप्रमाणे उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), चेंबूर यांनी दिनांक २७.०९.२०२३ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशानुसार १७३ पैकी ३५ अतिक्रमण झोपडीधारकांने पुरावे सादर केले असून, उर्वरित १३८ झोपडीधारकांचे पुरावे सादर करण्यास आदिवासी पारधी संघ असमर्थ ठरले असून, सादर करण्यात आलेले पुरावे हे माथाडी कामगार यांना ताबा दिल्याचे तारखेनंतरचे आहेत. त्यामुळे उपरोक्त १७३ झोपडीधारक हे अतिक्रमण केल्याचे दिसून येत आहे. असे आदेश उपजिल्हाधिकारी, (अति./निष्का.) चेंबूर यांनी पारीत केले आहेत.

➢ **संक्रमण इमारत (ट्रान्जीट कॅम्प) :-**

मौजे-मानखुर्द, तालुका-कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा यातील सर्वे नं १३८, न.भू.क्र. १/अ, व न.भू.क्र. १/ब या जमिनीवर साधारण ७६० बैठी घरे स्वरुपात संक्रमण शिबीर असून त्यास चारही बाजूने तारेचे कुंपन घातले आहे. प्राधिकरणाच्या सदर बैठी घरे स्वरुपात असणाऱ्या संक्रमण शिबीरामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होत नसल्याचे दिसून येते, असे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी कळविले आहे.

*******

**लक्षवेधी सूचना क्र.१५९३**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.अबू आजमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५९३ पुढीलप्रमाणे आहे :-

"मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रातील घाटकोपर मानखुर्द लिंक रोड, एकता नगर, मंडाळा, टी जंक्शन, मानखुर्द येथील शासनाच्या जमिनीवर अवैधरितीने कब्जा करून बांधण्यात आलेले अवैध आठ गाळे बांधण्यात येणे, सदर गाळे निष्कासित करण्याबाबत जिल्हाधिकारी व संबंधित विभागांना पत्रव्यवहार केले असता गाळे निष्कासित करण्याचे आदेश काढण्यात येणे, कार्यकारी अभियंता वाघमारे यांचा अनेकवेळा पाठपुरावा केल्यावर फक्त २ गाळे काढण्यात येणे, तसेच विभगातील छेडा नगर येथून इंडियन ऑईल कॉंप्लेक्स कडे येत असतांना, शंकरा कॉलनी, नारायण गुरु शाळेच्या पाठीमागे कलेक्टर च्या जमिनीवर भूमाफियांनी मोठ मोठाले गोडाऊन बनवून २७ ते ३० लाख रुपय महिना किराया वसूल करीत असणे, सदर बाबतीत संबंधित विभागांचे अधिकारी व गाळे धारक संगनमताने शासनाचा करोडोच्या महसुलाचे नुकसान करणे, क्षेत्राच्या मंडाळा विभागात असलेल्या संक्रमण इमारती मध्ये पुनर्वसन झालेले नागरिक तेथून गेले असता सदर इमारती मध्ये अवैधरीत्या लोकांकडून ५ ते १० लाख रुपय घेऊन विकत असणे, सदर विषयी संबंधितांवर कारवाई करून सदर जागा शासनाने ताब्यात घेऊन सदर जागेचा वापर शाळा, महाविद्यालय किंवा लोक उपयोगासाठी करण्याची मागणी स्थानिक नागरिक, सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी यांच्या मार्फत होणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

➢ **टी जंक्शन मानखुर्द येथील अतिक्रमणाबाबत (सायन पनवेल हायवे)**

मौजे मंडाळे ता. कुर्ला येथील स.नं. ८०, न.भू.क्र. ६/१ अ पैकी, टी जंक्शन, घाटकोपर- मानखुर्द लिंक रोड या शासकीय मिळकतीवरील एकता नगर, गल्ली नं.१ च्या बाजुला टी-जंक्शन, सर्व्हिस रोड, मंडाळा या ठिकाणी न.भू.क्र.६/१ अ या शासकीय जागेत अतिक्रमण करुन ०२ अनिवासी गाळे बांधण्यात आल्याचे दिनांक ०७.०१.२०२० रोजी निदर्शनास आले होते. त्यामुळे सदर गाळेधारकांना दिनांक १७.०१.२०२० रोजी नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. संबंधितांकडून खुलासा ऐकून घेऊन स्वतःहून निष्कासन करण्याचे निर्देश दिले होते. तद्नंतर उपरोक्त गाळयांच्या बाजूलाच कोरोना लॉकडाऊन कालावधीमध्ये आणखी ०३ अनिवासी गाळयांचे अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले होते. त्या ०३ गाळेधारकांना दि.१८.०८.२०२० रोजी नोटीसा देण्यात आल्या होत्या. तद्नंतर दि.०८.०९.२०२० रोजी गाळयांचे अतिक्रमण २४ तासांचे आत काढून टाकणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि, आदेशाप्रमाणे अतिक्रमणधारकांनी कार्यवाही न केल्याने सदरहू ०५ अनिवासी गाळयांचे दिनांक १६.०९.२०२० रोजी पोलीस बंदोबस्तात निष्कासन केले होते.

परंतु, सदर निष्कासनानंतर उक्त नमुद ५ ही अतिक्रमणाधारकांनी त्याठिकाणी पुनःश्च बांधकाम करुन नव्याने अतिक्रमण केल्याचे दिसून आले. सदर अतिक्रमण धारकांपैकी ३ अतिक्रमणधारकांनी मा. उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे. तसेच २ अतिक्रमणधारकांनी मा. नगर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेने घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड (जी.एम.एल.आर.), एकता नगर, मंडाळा, टी जंक्शन, मानखुर्द येथील महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जमिनीवरील ६

**लक्षवेधी सुचना क्र.१६३१.**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन-२०२४ चे (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" जळगाव जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागाकडे शेतकऱ्यांनी तातडीचे व साधी मोजण्यासाठी सादर केलेली शेकडं प्रकरण प्रकरणे प्रलंबित असल्याने ती तात्काळ निकालने काढण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असतानाही प्रशासनाकडून महिन्यांमध्ये वर्षापर्यंतचा कालावधी लागत असणे, भूमी अभिलेख विभागाला जमीन मोजणीसाठी अत्याधुनिक रोवर मशीन प्राप्त होऊनही मोजणी जीआय टॅगिंग द्वारे करण्यात येत असून अर्जदाराला ऑनलाइन मोजणी सीट देण्यात येते त्यामुळे कामाला गती असल्याचे विभागाकडून सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात अनेक प्रकारचे प्रलंबित असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत असणे, त्यासाठी शासनाने शेतकऱ्याच्या जमिनी तात्काळ मोजून देण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

जळगाव जिल्ह्यामध्ये एकुण १५ उप अधीक्षक भूमि अभिलेख व ०१ नगर भूमापन अधिकारी यांची कार्यालय आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये दरमहा सुमारे ५०० मोजणी प्रकरणांची आवक होत असते. तसेच याव्यतिरिक्त भूसंपादन मोजणी प्रकरणे, वनदावे मोजणी प्रकरणे, स्वामित्व योजने अतंर्गत गावठांण मोजणी, इत्यादी मोजणी विषय कामकाज केले जाते.

जळगाव जिल्ह्यात माहे जुन, २०२४ अखेर एकूण २३२४ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामध्ये तीन महिन्यातील प्रकरणांची संख्या १८१९ व तीन महिने ते सहा महिन्यामधील प्रकरणांची संख्या ४८३ इतकी आहे. १ वर्षावर ५ प्रकरणे शिल्लक असून मे.दिवाणी न्यायालय यांचे कडील स्थगिती असलेने सदरची मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत, ६ महिन्यांच्या वरील १७ प्रकरणे शिल्लक असून ती एकत्रीकरण योजनेतील क्षेत्र तफावत / ७/१२ व आकारबंद क्षेत्र तफावत / हद्द दाखविणे व कार्यालयीन कामावर / अर्जदार यांचे विनंती अर्ज / भूसंपादन मोजणी प्रस्ताव सादर करणे इ. कारणास्तव प्रलंबित आहेत.

मोजणीची कार्यवाही ९० दिवसात पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार प्रलंबित असलेल्या २३२४ मोजणी प्रकरणांपैकी १०४९ मोजणी प्रकरणांमध्ये मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली असून सदर प्रकरणे कार्यालयीन कामावर प्रलंबित आहेत. तसेच जूलै व ऑगस्ट २०२४ मध्ये अनुक्रमे ६३५ व ६४० मोजणी प्रकरणांमध्ये मोजणी तारखा नेमण्यात आलेल्या आहेत. माहे जून,२०२४

कृ. मा. प.

रोल क्र. ६५४-१ (७५०-०२-२०२४

अखेरची सर्व २३२४ प्रलंबित मोजणी प्रकरणे माहे, सप्टेंबर,२०२४ अखेर निकाली करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

संपुर्ण महाराष्ट्र राज्यात ७७ CORS (Continuously operating reference stations) स्थापित करण्यात आले असून त्याच्या आधारे GNSS Rover द्वारे मोजणी प्रकरणे निकाली करणेची प्रक्रिया गतिमान झालेली आहे. CORS -Rovers या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे मोजणी प्रक्रियेत गतिमानता व अचुकता आलेली आहे. तसेच शेतकरी/मोजणी अर्जदार यांना अक्षांश-रेखांश असलेला GIS प्रणाली आधारीत मोजणी नकाशा मिळत आहे. त्यामुळे जमिनीचे हद्दीचे वाद कमी होणेस मदत होणार आहे. संपुर्ण जळगाव जिल्ह्यामध्ये ई- मोजणी व्हर्जन २.० ही ऑनलाईन आज्ञावली कार्यान्वित करण्यात आलेली असून या आज्ञावली अंतर्गत मोजणी अर्जदार यांना मोजणी अर्ज सादर करणेपासून ते मोजणी नकाशा अक्षांश व रेखांशासह प्राप्त करुन घेणे पर्यंत कार्यपध्दती सुलभ झालेली आहे.

*********

अखेरची सर्व २३२४ प्रलंबित मोजणी प्रकरणे माहे, सप्टेंबर,२०२४ अखेर निकाली करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

संपुर्ण महाराष्ट्र राज्यात ७७ CORS (Continuously operating reference stations) स्थापित करण्यात आले असून त्याच्या आधारे GNSS Rover द्वारे मोजणी प्रकरणे निकाली करणेची प्रक्रिया गतिमान झालेली आहे. CORS -Rovers या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे मोजणी प्रक्रियेत गतिमानता व अचुकता आलेली आहे. तसेच शेतकरी/मोजणी अर्जदार यांना अक्षांश-रेखांश असलेला GIS प्रणाली आधारीत मोजणी नकाशा मिळत आहे. त्यामुळे जमिनीचे हद्दीचे वाद कमी होणेस मदत होणार आहे. संपुर्ण जळगाव जिल्ह्यामध्ये ई- मोजणी व्हर्जन २.० ही ऑनलाईन आज्ञावली कार्यान्वित करण्यात आलेली असून या आज्ञावली अंतर्गत मोजणी अर्जदार यांना मोजणी अर्ज सादर करणेपासून ते मोजणी नकाशा अक्षांश व रेखांशासह प्राप्त करुन घेणे पर्यंत कार्यपध्दती सुलभ झालेली आहे.

*********

**लक्षवेधी सुचना क्र.१६३१.**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन-२०२४ चे (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" जळगाव जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागाकडे शेतकऱ्यांनी तातडीचे व साधी मोजण्यासाठी सादर केलेली शेकडं प्रकरण प्रकरणे प्रलंबित असल्याने ती तात्काळ निकालने काढण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असतानाही प्रशासनाकडून महिन्यांमध्ये वर्षापर्यंतचा कालावधी लागत असणे, भूमी अभिलेख विभागाला जमीन मोजणीसाठी अत्याधुनिक रोवर मशीन प्राप्त होऊनही मोजणी जीआय टॅगिंग द्वारे करण्यात येत असून अर्जदाराला ऑनलाइन मोजणी सीट देण्यात येते त्यामुळे कामाला गती असल्याचे विभागाकडून सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात अनेक प्रकारचे प्रलंबित असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत असणे, त्यासाठी शासनाने शेतकऱ्याच्या जमिनी तात्काळ मोजून देण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

जळगाव जिल्ह्यामध्ये एकुण १५ उप अधीक्षक भूमि अभिलेख व ०१ नगर भूमापन अधिकारी यांची कार्यालय आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये दरमहा सुमारे ५०० मोजणी प्रकरणांची आवक होत असते. तसेच याव्यतिरिक्त भूसंपादन मोजणी प्रकरणे, वनदावे मोजणी प्रकरणे, स्वामित्व योजने अतंर्गत गावठांण मोजणी, इत्यादी मोजणी विषय कामकाज केले जाते.

जळगाव जिल्ह्यात माहे जुन, २०२४ अखेर एकूण २३२४ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामध्ये तीन महिन्यातील प्रकरणांची संख्या १८१९ व तीन महिने ते सहा महिन्यामधील प्रकरणांची संख्या ४८३ इतकी आहे. १ वर्षावर ५ प्रकरणे शिल्लक असून मे.दिवाणी न्यायालय यांचे कडील स्थगिती असलेने सदरची मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत, ६ महिन्यांच्या वरील १७ प्रकरणे शिल्लक असून ती एकत्रीकरण योजनेतील क्षेत्र तफावत / ७/१२ व आकारबंद क्षेत्र तफावत / हद्द दाखविणे व कार्यालयीन कामावर / अर्जदार यांचे विनंती अर्ज / भूसंपादन मोजणी प्रस्ताव सादर करणे इ. कारणास्तव प्रलंबित आहेत.

मोजणीची कार्यवाही ९० दिवसात पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार प्रलंबित असलेल्या २३२४ मोजणी प्रकरणांपैकी १०४९ मोजणी प्रकरणांमध्ये मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली असून सदर प्रकरणे कार्यालयीन कामावर प्रलंबित आहेत. तसेच जूलै व ऑगस्ट २०२४ मध्ये अनुक्रमे ६३५ व ६४० मोजणी प्रकरणांमध्ये मोजणी तारखा नेमण्यात आलेल्या आहेत. माहे जून,२०२४

कृ.मा.प.

रोम (न्य ६५४-१ (७५०-०२-२०२४

## महाराष्ट्र विधानसभा
### सन २०२४ चे तृतीय अधिवेशन

श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६६२ पुढीलप्रमाणे आहे:-

"कल्याण-मुंबई-वडोदरा महामार्गावरील भूसंपादनादरम्यान तत्कालीन प्रांत अधिकाऱ्यांवर २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत असणे, कल्याण तालुक्यातील बल्याणी, उंभर्णी, नांदप, मानिवली, वाहोली, रायते या गावांचा तत्कालीन प्रांताधिकारी अभिजित भांडे पाटील यांनी तलाठी प्रशांत चौगुले यांच्यासह बोगस पंचनामा व बनावट जीपीएस अहवाल तयार करून खासगी एजंटांमार्फत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करुन भ्रष्टाचार करणे, कल्याण तालुक्यातील मोहम्मद शाहिद मिठाईवाला यांनी सुरुवातीच्या कालखंडात नावाची अपरातफर करीत भ्रष्टाचार सन २०२३ मध्ये उघड करणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन या प्रकरणातील दोषींवर करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

### श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्ग (Spur Alignment) या प्रकल्पामधील कल्याण तालुक्यातील बाधित एकूण १२ गावांमधील १८७.७६६६ हे. आर खाजगी जमिनींचे भूसंपादन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदीनुसार करण्यात आले आहे. सदर भूसंपादन करताना संयुक्त मोजणीच्या वेळी स्थानिक नागरीकांच्या विरोधामुळे भूसंपादन संस्था, स्थानिक तलाठी, उप अधीक्षक भूमि अभिलेख कल्याण यांचे प्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषि विभाग व जलसंधारण विभाग यांचे प्रतिनिधी यांचे मार्फत संयुक्त स्थळ पाहणी करुन त्याप्रमाणे मोबदला अदा करण्यात आला आहे. तद्नंतर मोबदला अदा केलेल्या सर्व जमिनी संसाधने दुर करुन संपादन संस्थेच्या ताब्यात देण्यात आलेल्या आहेत.

मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी, उप अधीक्षक भूमि अभिलेख कल्याण यांचेमार्फत प्राप्त संयुक्त मोजणी अहवाल, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्राप्त मुल्यांकन अहवाल, तत्कालीन तलाठी सजा मांडा यांचा स्थळ पाहणी पंचनामा अहवाल तसेच नोटराईज्ड खरेदीखत इत्यादी कागदपत्रे/पुरावे विचारात घेऊन बांधकामचा मोबदला अदा करणेत आला आहे. तथापि, मौजे बल्याणी, ता. कल्याण येथील ०३ प्रकरणात मोबदल्याविरोधात दाखल केलेल्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने सर्व संबंधिताना सुनावणीची संधी देऊन हरकत अर्ज मंजुर करुन मोबदला रक्कम

शासनास परत जमा करणेकामी आदेशित केले आहे. सदर रकमपैकी रुपये १,८०.९७,४७४/- ही रक्कम शासन जमा झाली असून रक्कम रूपये १३,७७,८१०/- वसूल झालेली नाही.

दिनांक ०२/०६/२०२४ रोजीच्या सामना या दैनिक वृत्तपत्रामध्ये 'मुंबई बडोदा मार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेत २०० कोटींचा भ्रष्टाचार' या शिर्षकाखाली बातमीबाबत उपविभागीय अधिकारी कल्याण यांचा अहवाल व मौजे बल्याणी, ता. कल्याण येथील ०३ प्रकरणात वसूल करावयाच्या रूपये १३,७७,८१०/- रकमेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून वस्तुस्थितीनिहाय अहवाल प्राप्त होताच उचित कार्यवाही करण्याचे नियोजीत आहे.

---

शासनास परत जमा करणेकामी आदेशित केले आहे. सदर रकमपैकी रुपये १,८०.९७,४७४/- ही रक्कम शासन जमा झाली असून रक्कम रूपये १३,७७,८१०/- वसूल झालेली नाही.

दिनांक ०२/०६/२०२४ रोजीच्या सामना या दैनिक वृत्तपत्रामध्ये 'मुंबई बडोदा मार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेत २०० कोटींचा भ्रष्टाचार' या शिर्षकाखाली बातमीबाबत उपविभागीय अधिकारी कल्याण यांचा अहवाल व मौजे बल्याणी, ता. कल्याण येथील ०३ प्रकरणात वसूल करावयाच्या रूपये १३,७७,८१०/- रकमेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून वस्तुस्थितीनिहाय अहवाल प्राप्त होताच उचित कार्यवाही करण्याचे नियोजीत आहे.

---------------------------------------------

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय अधिवेशन

श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६६२ पुढीलप्रमाणे आहे:-

"कल्याण-मुंबई-वडोदरा महामार्गावरील भूसंपादनादरम्यान तत्कालीन प्रांत अधिकाऱ्यांवर २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत असणे, कल्याण तालुक्यातील बल्याणी, उंभर्णी, नांदप, मानिवली, वाहोली, रायते या गावांचा तत्कालीन प्रांताधिकारी अभिजित भांडे पाटील यांनी तलाठी प्रशांत चौगुले यांच्यासह बोगस पंचनामा व बनावट जीपीएस अहवाल तयार करून खासगी एजंटांमार्फत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करुन भ्रष्टाचार करणे, कल्याण तालुक्यातील मोहम्मद शाहिद मिठाईवाला यांनी सुरुवातीच्या कालखंडात नावाची अपरातफर करीत भ्रष्टाचार सन २०२३ मध्ये उघड करणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन या प्रकरणातील दोषींवर करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

## श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्ग (Spur Alignment) या प्रकल्पामधील कल्याण तालुक्यातील बाधित एकूण १२ गावांमधील १८७.७६६६ हे. आर खाजगी जमिनींचे भूसंपादन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदीनुसार करण्यात आले आहे. सदर भूसंपादन करताना संयुक्त मोजणीच्या वेळी स्थानिक नागरीकांच्या विरोधामुळे भूसंपादन संस्था, स्थानिक तलाठी, उप अधीक्षक भूमि अभिलेख कल्याण यांचे प्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषि विभाग व जलसंधारण विभाग यांचे प्रतिनिधी यांचे मार्फत संयुक्त स्थळ पाहणी करुन त्याप्रमाणे मोबदला अदा करण्यात आला आहे. तद्नंतर मोबदला अदा केलेल्या सर्व जमिनी संसाधने दुर करुन संपादन संस्थेच्या ताब्यात देण्यात आलेल्या आहेत.

मुंबई वडोदरा द्रुतगती महामार्गासाठी, उप अधीक्षक भूमि अभिलेख कल्याण यांचेमार्फत प्राप्त संयुक्त मोजणी अहवाल, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्राप्त मुल्यांकन अहवाल, तत्कालीन तलाठी सजा मांडा यांचा स्थळ पाहणी पंचनामा अहवाल तसेच नोटराईज्ड खरेदीखत इत्यादी कागदपत्रे/पुरावे विचारात घेऊन बांधकामचा मोबदला अदा करणेत आला आहे. तथापि, मौजे बल्याणी, ता. कल्याण येथील ०३ प्रकरणात मोबदल्याविरोधात दाखल केलेल्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने सर्व संबंधिताना सुनावणीची संधी देऊन हरकत अर्ज मंजुर करुन मोबदला रक्कम

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**डॉ. देवराव होळी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९०२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजे मुलुंड तालुका कुर्ला येथील सर्वे क्रमांक ३०१ ते ३०५ सीटीएस क्रमांक ८८० ते ८८९ या शेतजमिनी मध्ये राहत असलेल्या संरक्षित कूळ आदिवासी अर्जदार कु. कविता सिताराम बोंड कुटुंब यांचे पक्षात विभागीय कोकण आयुक्त तसेच अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे आदेश पारित झालेले असणे, असे असताना देखील सदर नमूद आदेशाची पुढील कारवाई अंमलबजावणी न होणे, तसेच अनुसूचित जाती जमाती कायद्याअंतर्गत एफआयआर फौजदारी गुन्हा दाखल होण्याबाबतचे न्यायालयाने चौकशीचे आदेश होणे, मात्र त्यावर देखील अजून पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई न होणे, शासकीय प्रशासकीय अधिकारी व पोलीस अधिकारी हे बिगर आदिवासी व त्रयस्त लोकांना सोबत घेवून संगणमत करून आदिवासी कु. कविता सिताराम बोंड कुटुंब अर्जदार यांच्यावर अमानुषपणे अत्याचार अन्याय करणे, त्यांना जबरदस्तीने भूमिहीन करण्यासाठी कटकारस्थान करीत असल्याचे निदर्शनास येणे, आदिवासी अर्जदारांना संरक्षण व न्याय मिळावे व बेकायदेशीर अर्जावरील सुनावणीला स्थगिती मिळावी करिता आदेश देण्याची आवश्यकता असणे, "१०-अ" नुसार शासनाने तातडीनं करून आदिवासींना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे मुलुंड ता.कुर्ला येथील सर्वे क्र.३०१ ते ३०५ हे स्वतंत्र ७/१२ अस्तित्वात असून स.नं.३०५ च्या मुळ गाव नमुना नं. ७/१२ सदरी इतर हक्कात संरक्षित कुळ म्हणुन धर्मा जानु यांचे नाव आहे. तथापि मौजे मुलुंड ता. कुर्ला येथील स.नं. ३०१, ३०२ व ३०३ च्या इतर हक्कामध्ये कुळ म्हणुन धर्मा जानु यांचे नाव दिसून येत नाही. स.नं. ३०३ व ३०४ ची खरेदी खेमका अँन्ड कंपनी एजन्सीज यांनी घेतल्याचे दिनांक २१/०२/१९६० रोजीच्या फेरफार क्र. ३२१० अन्वये दिसून येते.

**<u>मौजे मुलुंड, ता. कुर्ला, सर्वे. नं. ३०५</u> :-**

मौजे मुलुंड, ता. कुर्ला, सर्वे. नं. ३०५ या मिळकतीचे क्षेत्र-२.३५.० (ए.गुं.आ.) या क्षेत्रास फेरफार क्र.२८४४, दि.१७/०८/१९५६ अन्वये संरक्षित कुळ म्हणून इतर हक्कात धर्मा जानू यांचे नाव दाखल झाले आहे. सदर मिळकतीमधील एकूण क्षेत्रापैकी ५८०८ चौ.वार क्षेत्र प्राणजीवनदास वगैरे ७ यांचेकडून जे.आर.पुरी यांनी दि.२५/१०/१९६१ रोजी खरेदी केले असून, जे.आर.पुरी यांनी दि.१०/३/१९६९ रोजी द गॅब्रीअल इंडीया कं. लि. यांना विकले आहे. त्याप्रमाणे द गॅब्रीअल इंडीया कं.लि. यांच्या नावाची फेरफारान्वये नोंद झाली आहे. तसेच या मिळकतीच्या मुळ क्षेत्रापैकी ५०१९.०७ चौ.वार क्षेत्र प्राणजीवनदास व इतर यांच्याकडून कुलदीपचंद आनंद व इतर यांनी दि.२७/१२/१९६७ रोजी घेतली असून BOM/R-१२८०/१९६८ अन्वये फेरफार होऊन या फेरफाराची नोंद गावी झाली आहे. तथापि, स.नं.३०५ पै, क्षेत्र-५०१९.०७ चौ.वार आज रोजी सतिषचंद आनंद यांचे नावे दाखल आहे.

श्रीमती पार्वतीबाई धर्मा बोंड यांनी स.नं.३०५पै, क्षेत्र-८१०७ चौ. वार व क्षेत्र-३०८८ चौ.वार एवढे क्षेत्र ते आदिवासी असल्याने, सदरचे क्षेत्र प्रत्यार्पित करणेबाबत उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगरे यांच्याकडे दि.२६/०३/१९८७ रोजी अर्ज केला होता. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांनी या प्रकरणी सुनावणीअंती दि.२६/०२/१९९९ रोजीआदेश पारित केले. सदर आदेशान्वये मौजे- मुलुंड येथील सर्वे नं.३०५ पै. मधील बांधकामाखालील क्षेत्र, भूसंपादनाचे क्षेत्र व आरक्षणाचे क्षेत्र वगळून उर्वरित सर्व क्षेत्र शासनजमा करण्याचे आदेश पारित केले होते.

या प्रकरणी मा. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने (एमआरटीपी) दि.०२/११/२००० रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांचे दिनांक २६/०२/१९९९ रोजीचे आदेश रद्द करुन उप विभागीय अधिकारी, मुंबई उपनगरे यांना फेरचौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २८/०२/२००२ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती पार्वतीबाई धर्मा बोंड यांचा दिनांक २६/०३/१९८७ रोजीचा अर्ज अमान्य केला.

उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगरे यांच्या दिनांक २८/०२/२००२ आदेशाविरुध्द श्रीम. पार्वतीबाई धर्मा बोंड (मयत) यांचे वारस सिताराम धर्मा बोंड व इतर ३ यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे अपिल दाखल केले होते. या अपिल प्रकरणात विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दि.११/०६/२००४ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगरे यांचे दिनांक २८/०२/२००२ रोजीचे आदेश रद्द करुन, मौजे-मुलुंड येथील स.नं.३०५ पै, क्षेत्र २.३५.० (ए.गुं.आ.) जमिनीचा बिगर आदिवासींकडून ताबा काढून, कलम ४ मधील तरतुदीनुसार आदीवासी अर्जदारास देण्याचे आदेशित केले होते.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या दिनांक ११/६/२००४ रोजीच्या आदेशाविरुध्द गॅब्रीयल इंडीया लिमिटेड यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.५४१६/२००४ दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये याचिकाकर्ता व सामनेवाले क्र. सिताराम धर्मा बोंड व इतर यांनी दि.०७/०३/२००८ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयात कन्सेंट टर्म (समझोता करार) दाखल केला. या समझोता करारानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे दिनांक ११/०६/२००४ रोजीचे आदेश रद्द झाल्याचे उभय पक्षकारांनी मान्य केल्याने त्याआधारे मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०६/०५/२००८ रोजी सदर याचिका निकाली काढली. तथापि, सदरचा समझोता करार मान्य नसल्याबाबत श्री. सिताराम धर्मा बोंड यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लिकेशन क्र.१७०/२०१६ मा. उच्च न्यायालयाने दि.०१/०३/२०१७ रोजी फेटाळले आहे. सद्य:स्थितीत अपर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजीच्या आदेशान्वये सन.नं.३०५ च्या इतर अधिकार सदरी संरक्षित कूळ म्हणून धर्मा जानु यांच्या नावाची नोंद आहे.

**<u>मौजे मुलुंड, ता. कुर्ला, सर्वे. नं. ३०४</u> :-**

मौजे मुलुंड, ता.कुर्ला येथील स.नं.३०४ या मिळकतीचे क्षेत्र १.०८.५३ हे.आर असून ही मिळकत सतिषचंद आनंद यांनी के. रहेजा कॉर्प रिअल इस्टेट प्रायवेट लिमीटेड चे ऑथोराईज सिक्रेटरी अमेय कर्णिक यांना विक्री केली आहे. त्यानुषंगाने खरेदीदाराने खरेदीने नाव मिळकतीमध्ये लावण्याबाबत अर्ज सादर केला असता, कु. कविता सिताराम बोंड यांनी सदर मिळकतीमध्ये नाव दाखल करण्यास हरकत घेतलेली आहे. त्याअनुषंगाने तहसिल कार्यालय, कुर्ला येथे सुनावणी घेण्यात येत असून सदर प्रकरण अद्याप सुनावणीवर प्रलंबित आहे.

**<u>सर्वे नं.३०४ व सर्वे नं.३०५ पै (न.भू.क्र.८८६ ते ८८७) च्या मिळकती अकृषिक करण्याबाबत</u> :-**

मौजे मुलुंड (प.), ता. कुर्ला येथील स.नं. ३०४ पै व ३०५पै, न.भू.क्र.८८६ ते ८८७ या मिळकतीपैकी ३९१४.९७ चौ.मी. येथील मिळकतीस निवासी प्रयोजनार्थ अकृषीक सनद मिळण्यासाठी मे. सतिशचंद आनंद यांचे कुळमखत्यारधारक संचालक रमेश रंगनाथन के. रहेजा क्रॉप. रियल इस्टेट यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे. या प्रकरणी देखील कु. कविता बोंड यांनी दि.२२/०३/२०२४ रोजीच्या अर्जानुसार स.नं. ३०४ पै व ३०५पै, च्या मिळकतीस अकृषिक सनद देण्यास हरकत घेतली आहे.

या प्रकरणाबाबत फिर्यादी कु. कविता सिताराम बोंड यांच्या तक्रारी अनुषंगाने मा. सत्र न्यायालय, कोर्ट क्र.६० मुंबई यांनी मुलुंड पोलीस ठाणे यांना फौ. दं.प्र.सं. कलम १५६ (२) प्रमाणे गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिल्याने या प्रकरणातील आरोपीं विरोधात मुलुंड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१८१/ २४, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, भा.दं.वि. सह कलम ३(१), (एफ), (जी) व गु.र.क्र.१८२/२४, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, भा.दं.वि. सह कलम ३(१), (एफ), (जी) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम, २०१५ (सुधारित) प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. या गुन्ह्यांचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुलुंड यांच्याकडून सुरु आहे.

*******

या प्रकरणी मा. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने (एमआरटीपी) दि.०२/११/२००० रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांचे दिनांक २६/०२/१९९९ रोजीचे आदेश रद्द करुन उप विभागीय अधिकारी, मुंबई उपनगरे यांना फेरचौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २८/०२/२००२ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती पार्वतीबाई धर्मा बोंड यांचा दिनांक २६/०३/१९८७ रोजीचा अर्ज अमान्य केला.

उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगरे यांच्या दिनांक २८/०२/२००२ आदेशाविरुध्द श्रीम. पार्वतीबाई धर्मा बोंड (मयत) यांचे वारस सिताराम धर्मा बोंड व इतर ३ यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे अपिल दाखल केले होते. या अपिल प्रकरणात विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दि.११/०६/२००४ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगरे यांचे दिनांक २८/०२/२००२ रोजीचे आदेश रद्द करुन, मौजे-मुलुंड येथील स.नं.३०५ पै, क्षेत्र २.३५.० (ए.गुं.आ.) जमिनीचा बिगर आदिवासींकडून ताबा काढून, कलम ४ मधील तरतुदीनुसार आदीवासी अर्जदारास देण्याचे आदेशित केले होते.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या दिनांक ११/६/२००४ रोजीच्या आदेशाविरुध्द गॅब्रीयल इंडीया लिमिटेड यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.५४१६/२००४ दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये याचिकाकर्ता व सामनेवाले क्र. सिताराम धर्मा बोंड व इतर यांनी दि.०७/०३/२००८ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयात कन्सेंट टर्म (समझोता करार) दाखल केला. या समझोता करारानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे दिनांक ११/०६/२००४ रोजीचे आदेश रद्द झाल्याचे उभय पक्षकारांनी मान्य केल्याने त्याआधारे मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०६/०५/२००८ रोजी सदर याचिका निकाली काढली. तथापि, सदरचा समझोता करार मान्य नसल्याबाबत श्री. सिताराम धर्मा बोंड यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लिकेशन क्र.१७०/२०१६ मा. उच्च न्यायालयाने दि.०१/०३/२०१७ रोजी फेटाळले आहे. सद्य:स्थितीत अपर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजीच्या आदेशान्वये सन.नं.३०५ च्या इतर अधिकार सदरी संरक्षित कूळ म्हणून धर्मा जानु यांच्या नावाची नोंद आहे.

**<u>मौजे मुलुंड, ता. कुर्ला, सर्वे. नं. ३०४</u> :-**

मौजे मुलुंड, ता.कुर्ला येथील स.नं.३०४ या मिळकतीचे क्षेत्र १.०८.५३ हे.आर असून ही मिळकत सतिषचंद आनंद यांनी के. रहेजा कॉर्प रिअल इस्टेट प्रायवेट लिमीटेड चे ऑथोराईज सिक्रेटरी अमेय कर्णिक यांना विक्री केली आहे. त्यानुषंगाने खरेदीदाराने खरेदीने नाव मिळकतीमध्ये लावण्याबाबत अर्ज सादर केला असता, कु. कविता सिताराम बोंड यांनी सदर मिळकतीमध्ये नाव दाखल करण्यास हरकत घेतलेली आहे. त्याअनुषंगाने तहसिल कार्यालय, कुर्ला येथे सुनावणी घेण्यात येत असून सदर प्रकरण अद्याप सुनावणीवर प्रलंबित आहे.

**<u>सर्वे नं.३०४ व सर्वे नं.३०५ पै (न.भू.क्र.८८६ ते ८८७) च्या मिळकती अकृषिक करण्याबाबत</u> :-**

मौजे मुलुंड (प.), ता. कुर्ला येथील स.नं. ३०४ पै व ३०५पै, न.भू.क्र.८८६ ते ८८७ या मिळकतीपैकी ३९१४.९७ चौ.मी. येथील मिळकतीस निवासी प्रयोजनार्थ अकृषीक सनद मिळण्यासाठी मे. सतिशचंद आनंद यांचे कुळमखत्यारधारक संचालक रमेश रंगनाथन के. रहेजा क्रॉप. रियल इस्टेट यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे. या प्रकरणी देखील कु. कविता बोंड यांनी दि.२२/०३/२०२४ रोजीच्या अर्जानुसार स.नं. ३०४ पै व ३०५पै. च्या मिळकतीस अकृषिक सनद देण्यास हरकत घेतली आहे.

या प्रकरणाबाबत फिर्यादी कु. कविता सिताराम बोंड यांच्या तक्रारी अनुषंगाने मा. सत्र न्यायालय, कोर्ट क्र.६० मुंबई यांनी मुलुंड पोलीस ठाणे यांना फौ. दं.प्र.सं. कलम १५६ (२) प्रमाणे गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिल्याने या प्रकरणातील आरोपीं विरोधात मुलुंड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१८१/ २४, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, भा.दं.वि. सह कलम ३(१), (एफ), (जी) व गु.र.क्र.१८२/२४, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, भा.दं.वि. सह कलम ३(१), (एफ), (जी) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम, २०१५ (सुधारित) प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. या गुन्ह्यांचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुलुंड यांच्याकडून सुरु आहे.

*******

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**डॉ. देवराव होळी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९०२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजे मुलुंड तालुका कुर्ला येथील सर्वे क्रमांक ३०१ ते ३०५ सीटीएस क्रमांक ८८० ते ८८९ या शेतजमिनी मध्ये राहत असलेल्या संरक्षित कूळ आदिवासी अर्जदार कु. कविता सिताराम बोंड कुटुंब यांचे पक्षात विभागीय कोकण आयुक्त तसेच अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे आदेश पारित झालेले असणे, असे असताना देखील सदर नमूद आदेशाची पुढील कारवाई अंमलबजावणी न होणे, तसेच अनुसूचित जाती जमाती कायद्याअंतर्गत एफआयआर फौजदारी गुन्हा दाखल होण्याबाबतचे न्यायालयाने चौकशीचे आदेश होणे, मात्र त्यावर देखील अजून पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई न होणे, शासकीय प्रशासकीय अधिकारी व पोलीस अधिकारी हे बिगर आदिवासी व त्रयस्त लोकांना सोबत घेवून संगणमत करून आदिवासी कु. कविता सिताराम बोंड कुटुंब अर्जदार यांच्यावर अमानुषपणे अत्याचार अन्याय करणे, त्यांना जबरदस्तीने भूमिहीन करण्यासाठी कटकारस्थान करीत असल्याचे निदर्शनास येणे, आदिवासी अर्जदारांना संरक्षण व न्याय मिळावे व बेकायदेशीर अर्जावरील सुनावणीला स्थगिती मिळावी करिता आदेश देण्याची आवश्यकता असणे, "१०-अ" नुसार शासनाने तातडीनं करून आदिवासींना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे मुलुंड ता.कुर्ला येथील सर्वे क्र.३०१ ते ३०५ हे स्वतंत्र ७/१२ अस्तित्वात असून स.नं.३०५ च्या मुळ गाव नमुना नं. ७/१२ सदरी इतर हक्कात संरक्षित कुळ म्हणुन धर्मा जानु यांचे नाव आहे. तथापि मौजे मुलुंड ता. कुर्ला येथील स.नं. ३०१, ३०२ व ३०३ च्या इतर हक्कामध्ये कुळ म्हणुन धर्मा जानु यांचे नाव दिसून येत नाही. स.नं. ३०३ व ३०४ ची खरेदी खेमका अॅन्ड कंपनी एजन्सीज यांनी घेतल्याचे दिनांक २१/०२/१९६० रोजीच्या फेरफार क्र. ३२१० अन्वये दिसून येते.

**<u>मौजे मुलुंड, ता. कुर्ला, सर्वे. नं. ३०५</u> :-**

मौजे मुलुंड, ता. कुर्ला, सर्वे. नं. ३०५ या मिळकतीचे क्षेत्र-२.३५.० (ए.गुं.आ.) या क्षेत्रास फेरफार क्र.२८४४, दि.१७/०८/१९५६ अन्वये संरक्षित कुळ म्हणून इतर हक्कात धर्मा जानू यांचे नाव दाखल झाले आहे. सदर मिळकतीमधील एकूण क्षेत्रापैकी ५८०८ चौ.वार क्षेत्र प्राणजीवनदास वगैरे ७ यांचेकडून जे.आर.पुरी यांनी दि.२५/१०/१९६१ रोजी खरेदी केले असून, जे.आर.पुरी यांनी दि.१०/३/१९६९ रोजी द गॅब्रीअल इंडीया कं. लि. यांना विकले आहे. त्याप्रमाणे द गॅब्रीअल इंडीया कं.लि. यांच्या नावाची फेरफारान्वये नोंद झाली आहे. तसेच या मिळकतीच्या मुळ क्षेत्रापैकी ५०१९.०७ चौ.वार क्षेत्र प्राणजीवनदास व इतर यांच्याकडून कुलदीपचंद आनंद व इतर यांनी दि.२७/१२/१९६७ रोजी घेतली असून BOM/R-१२८०/१९६८ अन्वये फेरफार होऊन या फेरफाराची नोंद गावी झाली आहे. तथापि, स.नं.३०५ पै, क्षेत्र-५०१९.०७ चौ.वार आज रोजी सतिषचंद आनंद यांचे नावे दाखल आहे.

श्रीमती पार्वतीबाई धर्मा बोंड यांनी स.नं.३०५पै, क्षेत्र-८१०७ चौ. वार व क्षेत्र-३०८८ चौ.वार एवढे क्षेत्र ते आदिवासी असल्याने, सदरचे क्षेत्र प्रत्यार्पित करणेबाबत उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगरे यांच्याकडे दि.२६/०३/१९८७ रोजी अर्ज केला होता. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, मुंबई उपनगर यांनी या प्रकरणी सुनावणीअंती दि.२६/०२/१९९९ रोजीआदेश पारित केले. सदर आदेशान्वये मौजे- मुलुंड येथील सर्वे नं.३०५ पै. मधील बांधकामाखालील क्षेत्र, भूसंपादनाचे क्षेत्र व आरक्षणाचे क्षेत्र वगळून उर्वरित सर्व क्षेत्र शासनजमा करण्याचे आदेश पारित केले होते.

लक्षवेधी सूचना क्र.८४५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे ~~द्वितीय~~ तृतीय अधिवेशन

श्री.मंगेश कुडाळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" मुंबईतील कुर्ला येथील दुग्धविकास विभागाच्या अखत्यारीत प्लॉट नं २ सर्व्हे नं २२९ मातृदुग्ध शाळा हा भूखंड असणे, दि १० जून, २०२४ रोजी दुग्धविकास विभागाच्या अखत्यारीत असलेला भूखंड कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन धारावी पुनर्वसन प्रकल्पास हस्तांतरित करण्याबाबत शासन निर्णय येणे, माहे मार्च सन २०२१ पासून कुर्ला (पूर्व) नेहरू नगर येथील मातृदुग्धशाळेच्या जमिनीवर क्रीडा संकुल आणि बॉटेनिकल उद्यान उभारण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणे, जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या कडून संबंधित विभागाला पत्र व्यवहार होणे, सदरहू जमिनीवर जीर्ण झालेले मातृदुग्ध शाळेचे बांधकाम सोडून उर्वरित जागेवर मोठ्या प्रमाणात झाडांची संख्या असून मोठा हरित पट्टा असणे, तेथील मेट्रो २ बी स्थानका करिता सुमारे १.०३ हेक्टर जागा बाधित होणे, स्थानिक लोकांमध्ये उक्त शासन निर्णया विरुद्ध प्रचंड रोष असणे, या ठिकाणी हरित पट्टा असावा याकरिता मोठे जन आंदोलन उभे राहणे, कुर्ला व चेंबूर परिसरातील हजारो रहिवाश्यांचा धारावी पुनर्वसन कुर्ला डेरीत होण्यास विरोध असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने दि १३ जुन, २०२४ रोजी सदर शासन निर्णय रद्द होण्याकरिता मा. मुख्यमंत्री यांचेसह सर्व संबंधित मंत्री व सचिव यांना पत्र देऊन विनंती करण्यात येणे, त्यानुषंगाने शासनाने यांसदर्भात कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना."

---

### श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री (दुग्धव्यवसाय विकास) यांचे निवेदन

बृहन्मुंबई शहराला स्वच्छ व निर्भेळ दूध पुरवठा करण्याच्या हेतूने बृहन्मुंबई शासकीय दूध योजना सुरू करण्यात आली. त्यामध्ये आरे, वरळी व कुर्ला येथील शासकीय दूध योजनांचा समावेश

आहे. कालांतराने दुग्धव्यवसायात सहकारी व खाजगी दुग्ध क्षेत्राचा वाटा मोठ्याप्रमाणात वाढल्याने, शासनाचे दूध संकलन टप्प्याटप्प्याने कमी होत जाऊन सद्यस्थितीत निरंक झाले आहे. तसेच शासकीय दूध योजनांना मोठ्या प्रमाणात महसूली तोटा होऊ लागल्याने, यावर प्रभावी उपाय म्हणून शासनाने सन २००२ पासून दुग्धव्यवसायातून टप्प्याटप्प्याने बाहेर पडुन सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले आहे.

शासकीय दूध योजनांना होणारा प्रंचड महसूली तोटा व अत्यल्प संकलन यामुळे मातृदुग्धशाळा कुर्ला दुध योजना सन २०१४ पासून बंद झाली आहे. सदर प्रकल्प बंद असल्याने, प्रकल्पाची स्थावर व जंगम मालमत्ता विनावापर पडुन आहे.

शासनाने दि.११ सप्टेंबर, २००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये धारावी पुनर्विकास योजनेचे महत्त्व व सुलभ रितीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सदर योजना ही "अत्यावशक नागरी प्रकल्प" (Vital Public Project) म्हणून घोषित केला आहे. त्यानुषंगाने शासनाने दि.११ नोव्हेंबर, २०२२ रोजी धारावी पूनर्विकास प्रकल्पासोबत "राज्य समर्थन करार" केला असून, त्यामध्ये शासन धारावी पूनर्विकास प्रकल्पासाठी जमीन संपादानासाठी सहाय्य करण्याचे नमूद आहे.

महसूल व वन विभागाचा शासन निर्णय दि.१५ मार्च, २०२४ अन्वये मुंबईतील सार्वजनिक हिताच्या पायाभूत प्रकल्प (Public Vital Project) (धारावी पुनर्वसन प्रकल्प, म्हाडा) बाधितांच्या पुनर्वसनासाठी / पीएपी सदनीकांच्या बांधकांमासाठी शासकीय जमिनी सवलतीच्या दराने देणेबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार शासनाने मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये विविध शासकीय विभागांना व त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय यंत्रणांना दिलेल्या शासकीय जमिनी सार्वजनिक हिताच्या पायाभूत प्रकल्पाने (Public / Vital Project) बाधित लोकांच्या पुनर्वसनाकरिता / पीएपी सदनिकांच्या बांधकामासाठी अशा शासकीय जमिनीची प्रचलित बाजार मुल्य दर तक्त्याप्रमाणे येणाऱ्या किंमतीच्या (रेडी रेकनरच्या) २५ टक्के या सवलतीच्या दराने शासकीय व निमशासकीय

आहे. कालांतराने दुग्धव्यवसायात सहकारी व खाजगी दुग्ध क्षेत्राचा वाटा मोठ्याप्रमाणात वाढल्याने, शासनाचे दूध संकलन टप्प्याटप्प्याने कमी होत जाऊन सद्यस्थितीत निरंक झाले आहे. तसेच शासकीय दूध योजनांना मोठ्या प्रमाणात महसूली तोटा होऊ लागल्याने, यांवर प्रभावी उपाय म्हणून शासनाने सन २००२ पासून दुग्धव्यवसायातून टप्प्याटप्प्याने बाहेर पडुन सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले आहे.

शासकीय दूध योजनांना होणारा प्रंचड महसूली तोटा व अत्यल्प संकलन यामुळे मातृदुग्धशाळा कुर्ला दुध योजना सन २०१४ पासून बंद झाली आहे. सदर प्रकल्प बंद असल्याने, प्रकल्पाची स्थावर व जंगम मालमत्ता विनावापर पडुन आहे.

शासनाने दि.११ सप्टेंबर, २००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये धारावी पुनर्विकास योजनेचे महत्त्व व सुलभ रितीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सदर योजना ही "अत्यावशक नागरी प्रकल्प" (Vital Public Project) म्हणून घोषित केला आहे. त्यानुषंगाने शासनाने दि.११ नोव्हेंबर, २०२२ रोजी धारावी पूनर्विकास प्रकल्पासोबत "राज्य समर्थन करार" केला असून, त्यामध्ये शासन धारावी पूनर्विकास प्रकल्पासाठी जमीन संपादानासाठी सहाय्य करण्याचे नमूद आहे.

महसूल व वन विभागाचा शासन निर्णय दि.१५ मार्च, २०२४ अन्वये मुंबईतील सार्वजनिक हिताच्या पायाभूत प्रकल्प (Public Vital Project) (धारावी पुनर्वसन प्रकल्प, म्हाडा) बाधितांच्या पुनर्वसनासाठी / पीएपी सदनीकांच्या बांधकांमांसाठी शासकीय जमिनी सवलतीच्या दराने देणेबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार शासनाने मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये विविध शासकीय विभागांना व त्यांच्या नियंत्रणाखालील शासकीय यंत्रणांना दिलेल्या शासकीय जमिनी सार्वजनिक हिताच्या पायाभूत प्रकल्पाने (Public / Vital Project) बाधित लोकांच्या पुनर्वसनाकरिता / पीएपी सदनिकांच्या बांधकामासाठी अशा शासकीय जमिनीची प्रचलित बाजार मुल्य दर तक्त्याप्रमाणे येणाऱ्या किंमतीच्या (रेडी रेकनरच्या) २५ टक्के या सवलतीच्या दराने शासकीय व निमशासकीय

लक्षवेधी सूचना क्र.८४५

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे ~~द्वितीय~~ तृतीय अधिवेशन

श्री.मंगेश कुडाळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" मुंबईतील कुर्ला येथील दुग्धविकास विभागाच्या अखत्यारीत प्लॉट नं २ सर्व्हे नं २२९ मातृदुग्ध शाळा हा भूखंड असणे, दि १० जून, २०२४ रोजी दुग्धविकास विभागाच्या अखत्यारीत असलेला भूखंड कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन धारावी पुनर्वसन प्रकल्पास हस्तांतरित करण्याबाबत शासन निर्णय येणे, माहे मार्च सन २०२१ पासून कुर्ला (पूर्व) नेहरू नगर येथील मातृदुग्धशाळेच्या जमिनीवर क्रीडा संकुल आणि बॉटेनिकल उद्यान उभारण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणे, जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या कडून संबंधित विभागाला पत्र व्यवहार होणे, सदरहू जमिनीवर जीर्ण झालेले मातृदुग्ध शाळेचे बांधकाम सोडून उर्वरित जागेवर मोठ्या प्रमाणात झाडांची संख्या असून मोठा हरित पट्टा असणे, तेथील मेट्रो २ बी स्थानका करिता सुमारे १.०३ हेक्टर जागा बाधित होणे, स्थानिक लोकांमध्ये उक्त शासन निर्णया विरुद्ध प्रचंड रोष असणे, या ठिकाणी हरित पट्टा असावा याकरिता मोठे जन आंदोलन उभे राहणे, कुर्ला व चेंबूर परिसरातील हजारो रहिवाश्यांचा धारावी पुनर्वसन कुर्ला डेरीत होण्यास विरोध असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने दि १३ जुन, २०२४ रोजी सदर शासन निर्णय रद्द होण्याकरिता मा. मुख्यमंत्री यांचेसह सर्व संबंधित मंत्री व सचिव यांना पत्र देऊन विनंती करण्यात येणे, त्यानुषंगाने शासनाने यांसदर्भात कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना."

---

**श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री (दुग्धव्यवसाय विकास) यांचे निवेदन**

बृहन्मुंबई शहराला स्वच्छ व निर्भेळ दूध पुरवठा करण्याच्या हेतूने बृहन्मुंबई शासकीय दूध योजना सुरू करण्यात आली. त्यामध्ये आरे, वरळी व कुर्ला येथील शासकीय दूध योजनांचा समावेश

संस्थांना / शासकीय प्राधिकरणांना व ज्यामध्ये शासन पूर्णतः किंवा अंशतः स्टेकहोल्डर आहे, जसे की म्हाडा, धारावी पुनर्वसन प्रकल्प अशा संस्थांना देण्यात याव्यात, अशी तरतुद करण्यात आली आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुंबई शहाराच्या दृष्टीने असलेले महत्त्व व "अत्यावश्यक नागरी प्रकल्प" (Vital Public Project) तसेच या विशेष प्रकल्पासाठी गृहनिर्माण विभागाने मागणी केल्यानुसार आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अखत्यारीतील प्लॉट नं. २, सर्व्हे नं २२९, मातृदुग्धशाळा, कुर्ला येथील ८.५ हेक्टर येथील जमीन हस्तांतरीत करण्यात आली आहे. सदर जमीन हस्तांतरीत करतांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ त्याखालील नियम, जमीन विषयक इतर कायदे व शासनाने वेळोवेळी घेतलेले सर्व धोरणात्मक निर्णय लागू आहेत.

*****

लक्षवेधी सूचना क्र. १०२६

तृतीय

सन २०२४ चे ~~द्वितीय~~ (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती यामिनी यशवंत जाधव, डॉ. नितिन राऊत, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १०२६ पुढीलप्रमाणे आहे :-

"सन २०१९ मध्ये केंद्र शासनाच्या सर्व एम्स, आयआयटी, पीजी आय चंदिगढ़, इत्यादी उच्च दर्जाच्या राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन संस्थामध्ये एस.सी., एस.टी., एस.इ.बी.सी. या वर्गाकरिता अध्यापक संवर्गातील सर्व पदे एकत्र करून लागू केलेले आरक्षण, सन २०२२ मध्ये राज्य शासनाने राज्यातील वैद्यकीय, दंत, आयुर्वेदिक इत्यादी संस्थामधील अध्यापकांच्या भरतीमध्ये महाराष्ट्र शासनाचा कायदा नं. XVII of २०२२ प्रमाणे आरक्षण लागू न करणे, सदर विसंगतीबाबत संबंधित अध्यापकांनी शासनाकडे केलेल्या तक्रारी, राज्यातील वैद्यकिय इत्यादी महाविद्यालयातील अध्यापकांच्या भरतीमधील सदर विसंगती दूर करण्याची आवश्यकता, शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

केंद्र शासनाने दि.०९.०७.२०१९ च्या अधिसूचनेन्वये केंद्रीय शैक्षणिक संस्थेकरिता केंद्रीय शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०१९ लागू केला आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने शासन अधिसूचना दि.२५.०१.२०२२ अन्वये महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ लागू करून शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकीय पदांच्या मंजूर पदसंख्येपैकी सरळसेवा भरतीमध्ये पदांच्या आरक्षणाबाबत तरतूद विहित केली आहे.

राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद व परिचर्या महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांमध्ये वैद्यकीय शिक्षण व रुग्णसेवा याचबरोबर विविध आजारावरील संशोधन करणे हा अविभाज्य भाग आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषांनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांतील अध्यापकीय पदांवरील नियुक्त होण्यासाठी मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नियतकालिकांमध्ये विशिष्ट संख्येने शोधनिबंध प्रसिध्द करणे तसेच "बेसिक कोर्स इन बायोमेडीकल रिसर्च" हा संशोधनात्मक अभ्यासक्रम मान्यता प्राप्त संस्थेतून पूर्ण करणे अनिवार्य आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कोणत्याही विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याला पदव्युत्तर पदवी प्राप्त करण्यासाठी व संबंधित विषयात पी. एचडी हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी संबंधित विषयातील बाबींवर संशोधन करुन प्रबंध सादर करणे व त्यास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची मान्यता घेणे अनिवार्य आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद व परिचर्या महाविद्यालये व सलग्नित रुग्णालयांमध्ये संशोधनात्मक बाबी अनिवार्य आहेत.

वरील बाबी विचारात घेवून सामान्य प्रशासन विभाग व विधी व न्याय विभागाने दिलेल्या सहमतीनुसार "महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१, दि.१७.११.२०२२ च्या अधिसुचनेन्वये राज्यातील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/परिचर्या महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये या संस्थांना संशोधन संस्था म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तसेच सदर संस्थांना महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ मधील कलम ३ मधील तरतुदी लागू होणार नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यानुसार राज्यातील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/परिचर्या महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयातील विविध विषयामधील अध्यापकीय संवर्गात रिक्त असलेली पदे सरळसेवेने भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने प्रवर्गनिहाय निश्चित करून दिलेल्या आरक्षणानुसार सदरची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहेत.

******************

लक्षवेधी सुचना क्र. १८०४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे ~~द्वितीय~~ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. रवि राणा, मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८०४ खालील प्रमाणे आहे.

"अमरावती महसुल विभाग अंतर्गत भातकुली, दर्यापुर, अचलपुर या तालुकयातील रहिवासी असलेले आदिवासी कोळी महादेव या जमातीतील लोकांना संबधीत सक्षम उपविभागीय अधिकारी महसुल यांचेकडुन अनु.ज.चे जात प्रमाणपत्र मिळावे याच प्रमाणे अकोला, बुलढाणा, वाशिम येथील जिल्हयातील लोकांना ही ते मिळावे यासाठी विभागीय आयुक्त अमरावती यांचे आदेशानुसार जिल्हावार बैठकी झाल्या असणे, वरील मागणी शासनस्तरावरील असल्याने निर्णय होणे अत्यावश्यक असल्याचे संबधीत जिल्हाधिकारी यांनी बैठकीत सांगीतले असणे, सरकारकडे वरील मागणी मान्य करणेबाबत म.कृ.स.महासचिव श्री. उमेश ढोणे यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दि.२५/०६/२०२४ रोजीचे निवेदन देऊन ते निवेदन माननिय मुख्यमंत्री व इतर मंत्री यांनाही पाठविले असणे, वरील अतीशय महत्वाची मागणी असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणुन त्यांनी त्यांचे पत्रक क्र. ४६८१/२४VIP दि.२७/०६/२०२४ रोजी मुख्यमंत्री व इतर मंत्री यांना पाठवुन वरील मागणी शासनाकडुन मान्य व निर्णय घेण्याबाबत विनंती केली असणे, या समुदायाची लोकसंख्या राज्यात बघता शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, तसेच दिशा समिती अमरावती जिल्हा समितीचे दि.१०/०३/२०२३ रोजी विषय क्र.०७ मध्ये मंजुर झाल्याप्रमाणे आदिवासी घटक संबधित मौजे सासन रामापुर ता.दर्यापुर जि. अमरावती येथील आदिवासी दुर्मिळ व पुरातन चालीरिती बाबत जिल्हा गॅझेटर किंवा अन्य शासकीय दस्ताऐवज मध्ये नोंद घेण्याची आवश्यकता असणे यासंबधाने निर्णय घेण्याची आवश्यकता करावयाची उपाययोजना"

---

मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व ३४२ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या याद्या राष्ट्रपतींच्या अध्यादेशान्वये प्रसिध्द केल्या आहेत. अनुसूचित जमातीची यादी दि. ६ सप्टेंबर, १९५० रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये केंद्र शासनामार्फत वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

दि. १८ सप्टेंबर, १९७६ च्या अधिसुचनेपर्यंत राज्यामध्ये काही जमातींसाठी क्षेत्रबंधन निश्चित करण्यात आलेले होते. यामध्ये अ. क्र. २९ वर कोळी महादेव, डोंगर कोळी अशी नोंद आहे. महादेव कोळी यासाठी अहमदनगर, तत्कालीन कुलाबा, नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांमधील काही तालुके असे क्षेत्रबंधन ठरविण्यात आलेले होते. दि. १८ सप्टेंबर, १९७६ च्या अधिसूचनेव्दारे केंद्र शासनामार्फत क्षेत्रबंधन शिथील करण्यात आले. केंद्र शासनाच्या दि. २२ मार्च, १९७७ च्या पत्रानुसार अर्जदार व त्याच्या पूर्वजांच्या मूळ निवासस्थानास महत्व देण्यात आलेले आहे.

कुमारी माधुरी पाटील विरुध्द विभागीय आयुक्त, आदिवासी विकास प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने, "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा.क्र.२३)," दि. १८.१०.२००१ पासून लागू केलेला आहे. तसेच सदर अधिनियमांतर्गत "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३," तयार केलेले आहे. सदर अधिनियमातील व नियमांतील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते.

अमरावती जिल्ह्यामध्ये कोळी महादेव जमातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली संघटनांचे प्रतिनिधी व उपजिल्हाधिकारी यांची बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीत कोळी महादेव जात प्रमाणपत्राबाबत येणारे अर्ज स्विकारणेबाबत व त्याअनुषंगाने कायद्यातील तरतूदी व वेळोवेळी दिलेल्या शासन निर्णयातील निर्देशांनुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महासचिव, मागासवर्ग कृती समिती यांच्या दिनांक २५ जून, २०२४ च्या पत्राच्या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील कोळी महादेव जमातीचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळण्यासंबंधाने बैठकीचे आयोजन करण्याबाबत मागणी केली आहे.

राज्यामध्ये अधिनियम २००० व त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम २००३ मधील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते. अनुसूचित जमातीच्या यादीतील नमूद अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करणाऱ्या प्रत्येक अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिनियम २००० च्या कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदारावर आहे. विशिष्ट क्षेत्रातील अनुसूचित जमातीसाठी वेगळे नियम अस्तित्वात नाहीत. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र देताना अधिनियम व नियमांतर्गत तरतूदीनुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधीत सक्षम प्राधिकारी यांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच राज्यातील ४५ अनुसूचित जमातींचा अभ्यास करण्याचे काम पुणे विद्यापीठाकडे देण्यात आलेले असून ते प्रगतीपथावर आहे.

**************************

कुमारी माधुरी पाटील विरुध्द विभागीय आयुक्त, आदिवासी विकास प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाने, "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा.क्र.२३)," दि. १८.१०.२००१ पासून लागू केलेला आहे. तसेच सदर अधिनियमांतर्गत "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३," तयार केलेले आहे. सदर अधिनियमातील व नियमांतील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते.

अमरावती जिल्ह्यामध्ये कोळी महादेव जमातीचे जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात अपर जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली संघटनांचे प्रतिनिधी व उपजिल्हाधिकारी यांची बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीत कोळी महादेव जात प्रमाणपत्राबाबत येणारे अर्ज स्विकारणेबाबत व त्याअनुषंगाने कायद्यातील तरतूदी व वेळोवेळी दिलेल्या शासन निर्णयातील निर्देशांनुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महासचिव, मागासवर्ग कृती समिती यांच्या दिनांक २५ जून, २०२४ च्या पत्राच्या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील कोळी महादेव जमातीचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळण्यासंबंधाने बैठकीचे आयोजन करण्याबाबत मागणी केली आहे.

राज्यामध्ये अधिनियम २००० व त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम २००३ मधील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते. अनुसूचित जमातीच्या यादीतील नमूद अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करणाऱ्या प्रत्येक अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिनियम २००० च्या कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदारावर आहे. विशिष्ट क्षेत्रातील अनुसूचित जमातीसाठी वेगळे नियम अस्तित्वात नाहीत. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र देताना अधिनियम व नियमांतर्गत तरतूदीनुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधीत सक्षम प्राधिकारी यांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच राज्यातील ४५ अनुसूचित जमातींचा अभ्यास करण्याचे काम पुणे विद्यापीठाकडे देण्यात आलेले असून ते प्रगतीपथावर आहे.

*************************

लक्षवेधी सुचना क्र. १८०४

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
तृतीय

श्री. रवि राणा, मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८०४ खालील प्रमाणे आहे.

"अमरावती महसुल विभाग अंतर्गत भातकुली, दर्यापुर, अचलपुर या तालुकयातील रहिवासी असलेले आदिवासी कोळी महादेव या जमातीतील लोकांना संबधीत सक्षम उपविभागीय अधिकारी महसुल यांचेकडुन अनु.ज.चे जात प्रमाणपत्र मिळावे याच प्रमाणे अकोला, बुलढाणा, वाशिम येथील जिल्हयातील लोकांना ही ते मिळावे यासाठी विभागीय आयुक्त अमरावती यांचे आदेशानुसार जिल्हावार बैठकी झाल्या असणे, वरील मागणी शासनस्तरावरील असल्याने निर्णय होणे अत्यावश्यक असल्याचे संबधीत जिल्हाधिकारी यांनी बैठकीत सांगीतले असणे, सरकारकडे वरील मागणी मान्य करणेबाबत म.कृ.स.महासचिव श्री. उमेश ढोणे यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दि.२५/०६/२०२४ रोजीचे निवेदन देऊन ते निवेदन माननिय मुख्यमंत्री व इतर मंत्री यांनाही पाठविले असणे, वरील अतीशय महत्वाची मागणी असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणुन त्यांनी त्यांचे पत्रक क्र. ४६८१/२४VIP दि.२७/०६/२०२४ रोजी मुख्यमंत्री व इतर मंत्री यांना पाठवुन वरील मागणी शासनाकडुन मान्य व निर्णय घेण्याबाबत विनंती केली असणे, या समुदायाची लोकसंख्या राज्यात बघता शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, तसेच दिशा समिती अमरावती जिल्हा समितीचे दि.१०/०३/२०२३ रोजी विषय क्र.०७ मध्ये मंजुर झाल्याप्रमाणे आदिवासी घटक संबधित मौजे सासन रामापुर ता.दर्यापुर जि. अमरावती येथील आदिवासी दुर्मिळ व पुरातन चालीरिती बाबत जिल्हा गॅझेटर किंवा अन्य शासकीय दस्ताऐवज मध्ये नोंद घेण्याची आवश्यकता असणे यासंबधाने निर्णय घेण्याची आवश्यकता करावयाची उपाययोजना"

---

### मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ व ३४२ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या याद्या राष्ट्रपतींच्या अध्यादेशान्वये प्रसिध्द केल्या आहेत. अनुसूचित जमातीची यादी दि. ६ सप्टेंबर, १९५० रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये केंद्र शासनामार्फत वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

दि. १८ सप्टेंबर, १९७६ च्या अधिसुचनेपर्यंत राज्यामध्ये काही जमातींसाठी क्षेत्रबंधन निश्चित करण्यात आलेले होते. यामध्ये अ. क्र. २९ वर कोळी महादेव, डोंगर कोळी अशी नोंद आहे. महादेव कोळी यासाठी अहमदनगर, तत्कालीन कुलाबा, नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांमधील काही तालुके असे क्षेत्रबंधन ठरविण्यात आलेले होते. दि. १८ सप्टेंबर, १९७६ च्या अधिसूचनेव्दारे केंद्र शासनामार्फत क्षेत्रबंधन शिथील करण्यात आले. केंद्र शासनाच्या दि. २२ मार्च, १९७७ च्या पत्रानुसार अर्जदार व त्याच्या पूर्वजांच्या मूळ निवासस्थानास महत्व देण्यात आलेले आहे.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे (पावसाळी) अधिवेशन

श्री. विश्वजित कदम, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. संजय जगताप, श्री. अमीन पटेल, श्री. अस्लम शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ४७७ पुढीलप्रमाणे आहे:-

" सांगली जिल्हयातील पुसेसावळी-वाकुर्डे, पुसेसावळी-वाळवा या दुपदरी मार्गाचे काम उखडले असून रस्त्याचे काम दर्जाहिन करण्यात आले असल्याचे माहे २० मे,२०२४ रोजी वा त्या दरम्यान उघडकीस आले असणे, सदरील रस्ता उखडल्यामुळे, भेगा पडल्यामुळे वांगी ते कडेपूरकडे जाणाऱ्या वाहनधारकांसह प्रवाशांना मोठी जीवघेणी कसरत करावी लागत असल्यामुळे प्रशासनाच्या कारभाराबाबत ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत असणे, ५ जूनपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यास रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला असणे, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील रस्त्याचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (सा.बां. सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

१) सांगली जिल्ह्यातील पुसेसावळी-वाकुर्डे येथील रस्त्याच्या दुपदरीकरणाचे अर्थसंकल्पीय काम अंदाजे ६०% व आशियाई विकास बँक सहाय्यितकाम अंदाजे ४० % निविदा शर्तीनुसार ठेकेदारामार्फत पूर्ण करण्यात आले आहे

" EPC-२३ B पुसेसावळी वांगी नागठाणे वाळवा बोरगांव बहे तांबवे कासेगांव टाकवे रस्ता रा.मा.१५८ (भाग- हिंगणगांव ते वांगी कारखाना, स्वर्गीय पतंगराव कदम स्मारक रा.मा.क्र.१५८ पर्यंत जोडरस्ता) कि.मी. २४/४७० ते २८/४७० ची जोडरस्त्यासह सुधारणा करणे. ता. कडेगांव, जि.सांगली " हे काम प्रगतीपथावर आहे. अस्तित्वातील डांबरी पृष्ठभाग उखडून काँक्रीटीकरणाकरिता पूर्ण रूंदीने Sub Grade चे काम पूर्ण करणेत आले असून एका बाजूस DLC पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. पूर्ण करण्यात आलेले काम गुणवत्तापुर्वक करण्यात आले आहे. सदर काम निधी अभावी विहित मुदतीत पूर्ण करणे शक्य झाले नाही. दि.१८/०६/२०२४ रोजी निवेदन उपविभागास प्राप्त झाले आहे. त्यास उपविभागाने

**(कृमाप)**

दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये एका बाजूचे काम जुलै २०२४ अखेर पुर्ण करून रस्ता वाहतुकीस सुयोग्य करत असल्याचे कळविले आहे. त्यानुसार सदर रस्त्याच्या एका बाजूचे काम माहे जुलै, २०२४ अखेर व संपूर्ण काम माहे ऑक्टोबर, २०२४ अखेर पूर्ण करणेचे नियोजित आहे.

२) EPC-२३ आशियायी विकास बँक सहाय्यित प्रकल्प - "महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत" सांगली जिल्ह्यातील पुसेसावळी कडेपूर वांगी अंबक देवराष्ट्रे कुंभारगांव कुंडल किर्लोस्करवाडी बुर्ली अमणापूर औदुंबर अंकलखोप नागठाणे वाळवा रस्ता रा.मा.क्र.१५८ कि.मी.२८/४७० ते ६९/४६० [भाग- वांगी ते वाळवा] ची सुधारणा करणे हे काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्पातील अंदाजे ४० % काम निविदा शर्तीनुसार ठेकेदारामार्फत पूर्ण करण्यात आले आहे व उर्वरित काम प्रगतीपथावर असून विहित वेळेत ठेकेदारामार्फत पूर्ण करणेत येणार आहे. कामावर गुणनियंत्रण करणेसाठी Authority Engineer नेमण्यात आले असून त्यांचेमार्फत वांरवारांतेनुसार चाचण्या घेण्यात येतात व काम गुणवत्तापूर्वक पूर्ण करण्यात येत आहे. तसेच सदर कामावर दक्षता व गुणनियंत्रण विभाग, पुणे यांचा प्रत्यक्ष पाहणी दौरा झाला असून कामाच्या दर्जाबाबत कोणताही प्रतिकूल शेरा नाही.

---

दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये एका बाजूचे काम जुलै २०२४ अखेर पुर्ण करून रस्ता वाहतुकीस सुयोग्य करत असल्याचे कळविले आहे. त्यानुसार सदर रस्त्याच्या एका बाजूचे काम माहे जुलै, २०२४ अखेर व संपूर्ण काम माहे ऑक्टोबर, २०२४ अखेर पूर्ण करणेचे नियोजित आहे.

२) EPC-२३ आशियायी विकास बँक सहाय्यित प्रकल्प - "महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत" सांगली जिल्ह्यातील पुसेसावळी कडेपूर वांगी अंबक देवराष्ट्रे कुंभारगांव कुंडल किर्लोस्करवाडी बुर्ली अमणापूर औदुंबर अंकलखोप नागठाणे वाळवा रस्ता रा.मा.क्र.१५८ कि.मी.२८/४७० ते ६९/४६० [भाग-वांगी ते वाळवा] ची सुधारणा करणे हे काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्पातील अंदाजे ४० % काम निविदा शर्तीनुसार ठेकेदारामार्फत पूर्ण करण्यात आले आहे व उर्वरित काम प्रगतीपथावर असून विहित वेळेत ठेकेदारामार्फत पूर्ण करणेत येणार आहे. कामावर गुणनियंत्रण करणेसाठी Authority Engineer नेमण्यात आले असून त्यांचेमार्फत वांरवारांतेनुसार चाचण्या घेण्यात येतात व काम गुणवत्तापूर्वक पूर्ण करण्यात येत आहे. तसेच सदर कामावर दक्षता व गुणनियंत्रण विभाग, पुणे यांचा प्रत्यक्ष पाहणी दौरा झाला असून कामाच्या दर्जाबाबत कोणताही प्रतिकूल शेरा नाही.

---

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे (पावसाळी) अधिवेशन

श्री. विश्वजित कदम, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. संजय जगताप, श्री. अमीन पटेल, श्री. अस्लम शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ४७७ पुढीलप्रमाणे आहे:-

" सांगली जिल्हयातील पुसेसावळी-वाकुर्डे, पुसेसावळी-वाळवा या दुपदरी मार्गाचे काम उखडले असून रस्त्याचे काम दर्जाहिन करण्यात आले असल्याचे माहे २० मे,२०२४ रोजी वा त्या दरम्यान उघडकीस आले असणे, सदरील रस्ता उखडल्यामुळे, भेगा पडल्यामुळे वांगी ते कडेपूरकडे जाणाऱ्या वाहनधारकांसह प्रवाशांना मोठी जीवघेणी कसरत करावी लागत असल्यामुळे प्रशासनाच्या कारभाराबाबत ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत असणे, ५ जूनपर्यंत रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यास रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला असणे, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील रस्त्याचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (सा.बां. सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

१) सांगली जिल्ह्यातील पुसेसावळी-वाकुर्डे येथील रस्त्याच्या दुपदरीकरणाचे अर्थसंकल्पीय काम अंदाजे ६०% व आशियाई विकास बँक सहाय्यितकाम अंदाजे ४० % निविदा शर्तीनुसार ठेकेदारामार्फत पूर्ण करण्यात आले आहे

" EPC-२३ B पुसेसावळी वांगी नागठाणे वाळवा बोरगांव बहे तांबवे कासेगांव टाकवे रस्ता रा.मा.१५८ (भाग- हिंगणगांव ते वांगी कारखाना, स्वर्गीय पतंगराव कदम स्मारक रा.मा.क्र.१५८ पर्यंत जोडरस्ता) कि.मी. २४/४७० ते २८/४७० ची जोडरस्त्यासह सुधारणा करणे. ता. कडेगांव, जि.सांगली " हे काम प्रगतीपथावर आहे. अस्तित्वातील डांबरी पृष्ठभाग उखडून काँक्रीटीकरणाकरिता पूर्ण रूंदीने Sub Grade चे काम पूर्ण करणेत आले असून एका बाजूस DLC पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. पूर्ण करण्यात आलेले काम गुणवत्तापुर्वक करण्यात आले आहे. सदर काम निधी अभावी विहित मुदतीत पूर्ण करणे शक्य झाले नाही. दि.१८/०६/२०२४ रोजी निवेदन उपविभागास प्राप्त झाले आहे. त्यास उपविभागाने

**(कृमाप)**

<u>लक्षवेधी सूचना क्र.१८७९</u>

मा.श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८७९ खालीलप्रमाणे आहे.

“महाराष्ट्र राज्यात ग्रामीण भागातील लोक हे गावांत व वाड्या-वस्त्यांवरती जास्त प्रमाणात राहत असणे, ग्रामीण भागात ५०-१००-२०० लोकसंख्या असलेल्या वाड्यावस्त्यांना जोडणारे रस्ते अत्यंत खराब झाले असणे, त्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीने नागरीकांची अत्यंत गैरसोय होणे, ग्रामीण भागातील गावांना किंवा प्रमुख मार्गांना जोडणारे रस्ते हे रस्ते विकास आराखड्यात नसल्यामुळे त्यांना निधी मिळत नसणे, याबाबत शासनाने पाणंद रस्ते योजना सुरु केली असणे, परंतू सोलापूर जिल्ह्यामध्ये पाणंद रस्ते योजना कोठेही प्रभावीपणे राबविली जात नसणे, याचबरोबर २५१५/जनसुविधा/ नागरीसुविधा योजनांमधून उपलब्ध होणारा तुटपुंजा निधी यामध्ये ही कामे होत नसणे,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेसाठी जवळच्या गावांत अथवा शहरात जाणेसाठी रस्त्यांची सुविधा नसल्यामुळे अनेक मुली शिक्षणापासून वंचित राहत असणे तसेच रुग्णांना आरोग्य सुविधा घेणेसाठी शहरी ठिकाणी जावे लागत असणे, त्यांना मुख्य रस्त्यांना जाणेसाठी एक-दोन तास लागत असल्याने उपचारापूर्वीच मृत्यु होत असणे, खराब रस्त्यांअभावी अशा प्रकारे अपघात होत असणे, ज्याप्रमाणे शहरांच्या विकासासाठी रस्त्यांना निधी दिला जातो त्याप्रमाणे ग्रामीण भागातील नॉन प्लॅन रस्त्यांना निधी उपलब्ध करणेसाठी धोरण राबविणे आवश्यक असणे, याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी वारंवार करीत असणे,परंतू त्याकडे होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे नागरिकांच्या मनात शासनाच्या विषयी झालेली तीव्र नाराजी, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

<u>मा.मंत्री ( ग्राम विकास ) यांचे निवेदन</u>

महाराष्ट्र राज्यात ग्रामीण भागातील गाव व वाड्या-वस्त्या रस्त्याने जोडण्यासाठी शासनाच्या अनेक योजना सुरु आहेत. या योजनांमध्ये ग्राम विकास विभागाच्या प्रामुख्याने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, ३०५४ रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम, २५१५ मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा पुरविणे इ.योजना राबविल्या जातात. तसेच, रोजगार हमी योजनेची मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना व आदिवासी विभागामार्फत भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना तसेच, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना अशा राज्य स्तरावर योजना राबविल्या जातात. तसेच, जिल्हा स्तरावर ग्रामपंचायतींना जनसुविधासाठी अनुदाने व मोठया ग्रामपंचायतींना नागरी सुविधा पुरविणेसाठी विशेष अनुदाने योजना राबविण्यात येतात, अशा प्रकारे विविध योजना राज्य शासन व जिल्हा स्तरावर राबविण्यात येतात.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२१ जुलै, २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये योजनाबाह्य/अवर्गीकृत रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून घोषित करणे तसेच ग्रामीण मार्गांना इतर

जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नती देणे हा विषय ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने ग्रामविकास विभागाच्या दि.०४ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये योजनाबाह्य/अवर्गीकृत रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून रस्ते विकास योजनेत समाविष्ट करणेबाबतची कार्यपध्दती व निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना/निकष विचारात घेऊन रस्ते दर्जोन्नतीबाबतचे प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांचेमार्फत शासनास सादर करण्याच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्राप्त होणा-या प्रस्तावावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

अशा प्रकारे जनसुविधा, २५१५, पाणंद रस्ते व योजनाबाह्य रस्त्यांना दर्जोन्नती देणे इ. सारख्या योजनांमधून लोकप्रतिनिधींनी व संबंधित यंत्रणेने योजनाबाह्य रस्त्यांना प्राधान्य दिल्यास योजनाबाह्य रस्त्यांसाठी निधी उपलब्ध होऊ शकतो. अंतिमत: शासन निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार शासनाच्या विविध योजनांमधून टप्प्या-टप्प्याने योजनाबाह्य रस्त्यांची कामे प्रस्तावित करणे शक्य आहे.

---

जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नती देणे हा विषय ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने ग्रामविकास विभागाच्या दि.०४ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये योजनाबाह्य/अवर्गीकृत रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून रस्ते विकास योजनेत समाविष्ट करणेबाबतची कार्यपध्दती व निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना/निकष विचारात घेऊन रस्ते दर्जोन्नतीबाबतचे प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांचेमार्फत शासनास सादर करण्याच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्राप्त होणा-या प्रस्तावावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**अशा प्रकारे जनसुविधा, २५१५, पाणंद रस्ते व योजनाबाह्य रस्त्यांना दर्जोन्नती देणे इ. सारख्या योजनांमधून लोकप्रतिनिधींनी व संबंधित यंत्रणेने योजनाबाह्य रस्त्यांना प्राधान्य दिल्यास योजनाबाह्य रस्त्यांसाठी निधी उपलब्ध होऊ शकतो. अंतिमत: शासन निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार शासनाच्या विविध योजनांमधून टप्प्या-टप्प्याने योजनाबाह्य रस्त्यांची कामे प्रस्तावित करणे शक्य आहे.**

---

<u>लक्षवेधी सूचना क्र.१८७९</u>

मा.श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८७९ खालीलप्रमाणे आहे.

"महाराष्ट्र राज्यात ग्रामीण भागातील लोक हे गावांत व वाड्या-वस्त्यांवरती जास्त प्रमाणात राहत असणे, ग्रामीण भागात ५०-१००-२०० लोकसंख्या असलेल्या वाड्यावस्त्यांना जोडणारे रस्ते अत्यंत खराब झाले असणे, त्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीने नागरीकांची अत्यंत गैरसोय होणे, ग्रामीण भागातील गावांना किंवा प्रमुख मार्गांना जोडणारे रस्ते हे रस्ते विकास आराखड्यात नसल्यामुळे त्यांना निधी मिळत नसणे, याबाबत शासनाने पाणंद रस्ते योजना सुरु केली असणे, परंतू सोलापूर जिल्ह्यामध्ये पाणंद रस्ते योजना कोठेही प्रभावीपणे राबविली जात नसणे, याचबरोबर २५१५/जनसुविधा/ नागरीसुविधा योजनांमधून उपलब्ध होणारा तुटपुंजा निधी यामध्ये ही कामे होत नसणे,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेसाठी जवळच्या गावांत अथवा शहरात जाणेसाठी रस्त्यांची सुविधा नसल्यामुळे अनेक मुली शिक्षणापासून वंचित राहत असणे तसेच रुग्णांना आरोग्य सुविधा घेणेसाठी शहरी ठिकाणी जावे लागत असणे, त्यांना मुख्य रस्त्यांना जाणेसाठी एक-दोन तास लागत असल्याने उपचारापूर्वीच मृत्यु होत असणे, खराब रस्त्यांअभावी अशा प्रकारे अपघात होत असणे, ज्याप्रमाणे शहरांच्या विकासासाठी रस्त्यांना निधी दिला जातो त्याप्रमाणे ग्रामीण भागातील नॉन प्लॅन रस्त्यांना निधी उपलब्ध करणेसाठी धोरण राबविणे आवश्यक असणे, याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी वारंवार करीत असणे,परंतू त्याकडे होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे नागरिकांच्या मनात शासनाच्या विषयी झालेली तीव्र नाराजी, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

<u>मा.मंत्री ( ग्राम विकास ) यांचे निवेदन</u>

महाराष्ट्र राज्यात ग्रामीण भागातील गाव व वाड्या-वस्त्या रस्त्याने जोडण्यासाठी शासनाच्या अनेक योजना सुरु आहेत. या योजनांमध्ये ग्राम विकास विभागाच्या प्रामुख्याने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, ३०५४ रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम, २५१५ मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा पुरविणे इ.योजना राबविल्या जातात. तसेच, रोजगार हमी योजनेची मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना व आदिवासी विभागामार्फत भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना तसेच, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना अशा राज्य स्तरावर योजना राबविल्या जातात. तसेच, जिल्हा स्तरावर ग्रामपंचायतींना जनसुविधासाठी अनुदाने व मोठया ग्रामपंचायतींना नागरी सुविधा पुरविणेसाठी विशेष अनुदाने योजना राबविण्यात येतात, अशा प्रकारे विविध योजना राज्य शासन व जिल्हा स्तरावर राबविण्यात येतात.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.२१ जुलै, २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये योजनाबाह्य/अवर्गीकृत रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून घोषित करणे तसेच ग्रामीण मार्गांना इतर

सन २०२४ चे तिसरे( पावसाळी )अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १२८६**

**मा.श्री.सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १२८६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यात जलजीवन मिशन कार्यक्रम राबवला जात असुन ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत हर घर से जल (FHTC) प्रमाणे पाणीपुरवठा करण्यास काही उद्दिष्ट ठरवून देण्यात आलेली असणे, राजुरा मतदारसंघात जलजीवन मिशन कार्यक्रमात अनेक तांत्रिक बाबीमध्ये दोष आधळून आलेले असणे, नेमून दिलेल्या कंत्रादारांकडून निकृष्ट दर्जाची कामे करण्यास येत असणे, पाणीपुरवठा योजनेसाठी लागणारे दर्जेदार बांधकाम व अभियांत्रिकी साहित्याचा अभाव असणे, त्यामुळे जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या संपूर्ण कामांची चौकशी करणे, या कामांकडे दुर्लक्ष करणारे अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून विभागाचे संबधित अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करण्याकामी संबधित विभागामार्फत होत असलेले दुर्लक्ष, निष्काळजीपणा यामुळे स्थानिक जनतेत शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन.**

चंद्रपूर जिल्हयातील राजूरा विधानसभा मतदारसंघातील राजूरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी या ०४ तालुक्यांत जिल्हा परिषदेकडील पाणी पुरवठा योजनेच्या एकूण ४४२ कामांपैकी १६८ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहेत. सदरच्या ४४२ कामांतर्गत ९३,३७२ इतके कार्यात्मक घरगुती नळ जोडणी प्रस्तावित आहेत, त्यापैकी सद्यस्थितीत ८०,५८८ कार्यात्मक घरगुती नळ जोडणी (८६.३१%) पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित २७४ कामे व १२,७८४ कार्यात्मक घरगुती नळ जोडणीची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रामपूर पाणी पुरवठा योजना, ता.राजूरा आणि निमणी व ५ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.कोरपना या २ योजनांची कामे राबविण्यात येत आहेत. सदर दोन्ही योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. निमणी व ५ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ही अंशत: कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

०२. राजूरा विधानसभा मतदार संघातील ०४ तालुक्यातील एकुण ४४२ कामांपैकी ८२ कामांमध्ये स्त्रोत बदल, साठवण टाकीची जागा बदल, यामुळे उर्ध्वनलिकाच्या लांबीत झालेली वाढ, त्याच प्रमाणे वितरण व्यवस्थेत मागणी प्रमाणे झालेली वाढ यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करावयाचे असून, त्यापैकी ३२ क्षेत्रीय कार्यालय स्तरावर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेली आहेत व उर्वरित ५० कामांची सुधारीत अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

०३. राजूरा विधानसभा मतदार संघातील ०४ तालुक्यातील एकूण ४४२ कामांना कार्यारंभ आदेश देवून कंत्राटदाराकडून कामास सुरुवात करण्यात आली आहे. सदर कामे सुरु करताना त्याकरीता

लागणारे साहित्य जसे पाईप, सिमेंट, लोखंड, वाळू व खडी इत्यादी चाचणी करुन त्याबाबतचे Third Party Inspection अहवाल प्राप्त झाल्यानंतरच कामे करण्यात येतात. तसेच कामाचे टप्पानिहाय क्राँक्रीटची चाचणी सुध्दा करण्यात येते. राजूरा विधानसभा मतदार संघातील ०४ ही तालुके मिळून ०३ उपविभागीय अभियंता व ०३ शाखा अभियंता यांचे कामावर वेळोवेळी १००% तपासणी असते, तसेच शासनामार्फत नेमणुक करण्यांत आलेले NABARD LTD (नाबार्ड क्षेत्रातील सल्लागार) यांचे १८ अभियंते यांची योजनांच्या कामावर वेळोवेळी देखरेख असते. त्याच प्रमाणे कामाचा दर्जा चांगला होण्याच्या दृष्टीने टप्पा निहाय योजनेतील उपांगनिहाय कामांची छायाचित्रे काढण्यात येतात. त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणा, मे.मुडी इंटरनॅशनल कंपनी यांचेकडून सुध्दा कामांची गुणवत्ता तपासणी करण्यात येत असते. चंद्रपूर जिल्हयातील राजूरा, जिवती, कोरपना व गोंडपिपरी या ०४ तालुक्यातील एकूण ४४२ कामांपैकी ३५२ योजनांची त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्यात आली आहे. त्रयस्थ तांत्रिक तपासणी अहवालावरुन कुठेही निकृष्ठ दर्जाची कामे झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच सदर तपासणीत ५४७ तांत्रिक मुद्दे (NCs) उपस्थित करण्यात आलेले असून त्यापैकी ३९५ मुद्द्यांची पूर्तता करण्यात आली असून १५२ मुद्द्यांची पूर्तता करुन अनुपालन सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

०४. राजूरा विधानसभा अंतर्गत राजूरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी या ०४ तालुक्यांतील एकूण ८९ कामांत निकृष्ठ दर्जाचे अभियांत्रिकी साहित्य वापरल्याबाबतची तक्रार मा.लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता ०३ अभियंत्याची समिती स्थापन करण्यात आलेली असून, समितीकडून कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर मतदार संघातील असमाधानकारक कामाची प्रगती असलेल्या ५६ कंत्राटदारांना दंड लावण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यापैकी ०२ कंत्राटदारांना ५ वर्षांकरीता जिल्हा परिषदे अंतर्गत कामांकरीता काळया यादी मध्ये समाविष्ठ करण्यात आलेले आहे. वरील ५६ कंत्राटदारांपैकी ०८ कंत्राटदाराकडून त्यांच्या देयकामधून एकूण रु.९,५९,४२१/- एवढ्या दंडाची वसूली करण्यात आली आहे, उर्वरित ४८ कंत्राटदारांची कामांची देयके प्राप्त होताच त्यामधून दंड वसूली करण्यात येणार आहे.

०५. चंद्रपूर जिल्हयात व्यापक प्रमाणात राबविण्यात येत असलेला जल जीवन मिशन कार्यक्रम, संपूर्ण जिल्हयात राबविण्यात येत असलेल्या कामांची मोठी संख्या, तसेच कामाकरीता लागणारे खनिज साहित्य, जसे- वाळूची अनुपलब्धता या कारणामुळे काही कामांत विलंब झालेला आहे; तरीपण याबाबत वेळीच योग्य ती उपाययोजना करुन कार्यक्रम लवकर पुर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच विलंब झालेल्या योजनांमधील गावात पिण्याच्या पाण्याकरीता अस्तित्वातील नळ पाणी पुरवठा योजना, सार्वजनिक हातपंप व सार्वजनिक विहिरी उपलब्ध आहेत.

*****************************

लागणारे साहित्य जसे पाईप, सिमेंट, लोखंड, वाळू व खडी इत्यादी चाचणी करुन त्याबाबतचे Third Party Inspection अहवाल प्राप्त झाल्यानंतरच कामे करण्यात येतात. तसेच कामाचे टप्पानिहाय क्रॉंक्रीटची चाचणी सुध्दा करण्यात येते. राजूरा विधानसभा मतदार संघातील ०४ ही तालुके मिळून ०३ उपविभागीय अभियंता व ०३ शाखा अभियंता यांचे कामावर वेळोवेळी १००% तपासणी असते, तसेच शासनामार्फत नेमणुक करण्यांत आलेले NABARD LTD (नाबार्ड क्षेत्रातील सल्लागार) यांचे १८ अभियंते यांची योजनांच्या कामावर वेळोवेळी देखरेख असते. त्याच प्रमाणे कामाचा दर्जा चांगला होण्याच्या दृष्टीने टप्पा निहाय योजनेतील उपांगनिहाय कामांची छायाचित्रे काढण्यात येतात. त्रयस्थ तांत्रिक तपासणी यंत्रणा, मे.मुडी इंटरनॅशनल कंपनी यांचेकडून सुध्दा कामांची गुणवत्ता तपासणी करण्यात येत असते. चंद्रपूर जिल्हयातील राजूरा, जिवती, कोरपना व गोंडपिपरी या ०४ तालुक्यातील एकूण ४४२ कामांपैकी ३५२ योजनांची त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्यात आली आहे. त्रयस्थ तांत्रिक तपासणी अहवालावरुन कुठेही निकृष्ठ दर्जाची कामे झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच सदर तपासणीत ५४७ तांत्रिक मुद्दे (NCs) उपस्थित करण्यात आलेले असून त्यापैकी ३९५ मुद्द्यांची पूर्तता करण्यात आली असून १५२ मुद्द्यांची पूर्तता करुन अनुपालन सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

०४. राजूरा विधानसभा अंतर्गत राजूरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी या ०४ तालुक्यांतील एकूण ८९ कामांत निकृष्ठ दर्जाचे अभियांत्रिकी साहित्य वापरल्याबाबतची तक्रार मा.लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त झालेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता ०३ अभियंत्याची समिती स्थापन करण्यात आलेली असून, समितीकडून कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर मतदार संघातील असमाधानकारक कामाची प्रगती असलेल्या ५६ कंत्राटदारांना दंड लावण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यापैकी ०२ कंत्राटदारांना ५ वर्षांकरीता जिल्हा परिषदे अंतर्गत कामांकरीता काळया यादी मध्ये समाविष्ठ करण्यात आलेले आहे. वरील ५६ कंत्राटदारांपैकी ०८ कंत्राटदाराकडून त्यांच्या देयकामधून एकूण रु.९,५९,४२१/- एवढ्या दंडाची वसूली करण्यात आली आहे, उर्वरित ४८ कंत्राटदारांची कामांची देयके प्राप्त होताच त्यामधून दंड वसूली करण्यात येणार आहे.

०५. चंद्रपूर जिल्हयात व्यापक प्रमाणात राबविण्यात येत असलेला जल जीवन मिशन कार्यक्रम, संपूर्ण जिल्हयात राबविण्यात येत असलेल्या कामांची मोठी संख्या, तसेच कामाकरीता लागणारे खनिज साहित्य, जसे- वाळूची अनुपलब्धता या कारणामुळे काही कामांत विलंब झालेला आहे; तरीपण याबाबत वेळीच योग्य ती उपाययोजना करुन कार्यक्रम लवकर पुर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच विलंब झालेल्या योजनांमधील गावात पिण्याच्या पाण्याकरीता अस्तित्वातील नळ पाणी पुरवठा योजना, सार्वजनिक हातपंप व सार्वजनिक विहिरी उपलब्ध आहेत.

******************************

सन २०२४ चे तिसरे( पावसाळी )अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १२८६**

**मा.श्री.सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १२८६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यात जलजीवन मिशन कार्यक्रम राबवला जात असुन ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत हर घर से जल (FHTC) प्रमाणे पाणीपुरवठा करण्यास काही उद्दिष्ट ठरवून देण्यात आलेली असणे, राजुरा मतदारसंघात जलजीवन मिशन कार्यक्रमात अनेक तांत्रिक बाबीमध्ये दोष आधळून आलेले असणे, नेमून दिलेल्या कंत्रादारांकडून निकृष्ट दर्जाची कामे करण्यास येत असणे, पाणीपुरवठा योजनेसाठी लागणारे दर्जेदार बांधकाम व अभियांत्रिकी साहित्याचा अभाव असणे, त्यामुळे जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या संपूर्ण कामांची चौकशी करणे, या कामांकडे दुर्लक्ष करणारे अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून विभागाचे संबधित अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करण्याकामी संबधित विभागामार्फत होत असलेले दुर्लक्ष, निष्काळजीपणा यामुळे स्थानिक जनतेत शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन.**

चंद्रपूर जिल्हयातील राजूरा विधानसभा मतदारसंघातील राजूरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी या ०४ तालुक्यांत जिल्हा परिषदेकडील पाणी पुरवठा योजनेच्या एकुण ४४२ कामांपैकी १६८ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहेत. सदरच्या ४४२ कामांतर्गत ९३,३७२ इतके कार्यात्मक घरगुती नळ जोडणी प्रस्तावित आहेत, त्यापैकी सद्यस्थितीत ८०,५८८ कार्यात्मक घरगुती नळ जोडणी (८६.३१%) पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित २७४ कामे व १२,७८४ कार्यात्मक घरगुती नळ जोडणीची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रामपूर पाणी पुरवठा योजना, ता.राजूरा आणि निमणी व ५ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.कोरपना या २ योजनांची कामे राबविण्यात येत आहेत. सदर दोन्ही योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. निमणी व ५ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ही अंशत: कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

०२. राजूरा विधानसभा मतदार संघातील ०४ तालुक्यातील एकूण ४४२ कामांपैकी ८२ कामांमध्ये स्त्रोत बदल, साठवण टाकीची जागा बदल, यामुळे उर्ध्वनलिकाच्या लांबीत झालेली वाढ, त्याच प्रमाणे वितरण व्यवस्थेत मागणी प्रमाणे झालेली वाढ यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करावयाचे असून, त्यापैकी ३२ क्षेत्रीय कार्यालय स्तरावर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेली आहेत व उर्वरित ५० कामांची सुधारीत अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

०३. राजूरा विधानसभा मतदार संघातील ०४ तालुक्यातील एकूण ४४२ कामांना कार्यारंभ आदेश देवून कंत्राटदाराकडून कामास सुरुवात करण्यात आली आहे. सदर कामे सुरु करताना त्याकरीता

१८८७

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन
## श्री.बबनराव शिंदे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८८७ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून पंढरपूर ते कुर्डूवाडी रस्त्याचे रुंदीकरण करुन रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा तयार झालेला असून वाहतुकीसाठी गेल्या दोन वर्षापासून खुला केला असणे, सदर रस्त्याचे काम राष्ट्रीय महामार्गाचे कोणत्याही नियमाचे पालन केले नसल्यामुळे रस्त्याला कोणत्याही प्रकारची लेवल नाही व रस्ता जागोजागी खाली वर होवून सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असणे, तसेच मौजे बावी ता. माढा हे सदर मार्गावरील गाव असून येथे काम न झाल्याने अनेक अपघात होऊन नागरीकांचे मृत्यू झालेले असणे, सदरचे काम करणेबाबत वारंवार संबंधित कार्यकारी अभियंता यांना फोनवर सुचना देऊनही त्यांचेकडून कोणतीही कार्यवाही होत नसणे ही गंभीर बाब असणे, तसेच सदर रस्त्यावरील मौजे रोपळे (बु) ता.पंढरपूर येथील उजनी धरणाच्या डाव्या कालव्यावरील पुल जुना व अरुंद असून पुलावर आणि पुलाच्या दोन्ही बाजूला रस्ता १० ते १५ फुट खाली असल्यामुळे पुलावरुन वाहतूक करणे धोकादायक बनले असणे, सदर रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे धोकादायक पुलामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून अनेक निष्पाप नागरीकांना आपला जीव गमवावा लागला असणे, सदर रस्त्याच्या निकृष्ट कामाची चौकशी करणेची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीक वारंवार करीत असणे, यामुळे नागरिकांच्या मनात शासनाच्या विषयी झालेली तीव्र नाराजी, याप्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

कुर्डुवाडी ते पंढरपूर हा रस्ता केंद्र शासनाने नव्याने राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५सी म्हणून घोषित केला आहे. कुर्डूवाडी ते पंढरपूर साखळी क्र. ०/०० ते ४८/३७५ या लांबीत पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरणाचे काम जॉब क्र.NH-९६५C-MAH-२०१६-१७-११०२, दि.२७/०१/२०१७ अन्वये केंद्र शासनाच्या रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांनी मंजूर केलेले आहे. सदर कामामध्ये अस्तित्वातील दुपदरी डांबरी (५.५० मी.) पृष्टभागाचे १० मी. करिता कॉंक्रीटीकरण करणे, लहान मोठ्या पुलांचे बांधकाम, मोऱ्यांचे बांधकाम, रोड फर्निचर इ. बाबींचा समावेश आहे.

प्रकल्पाची मंजूर किंमत रु.३०७.६३ कोटी एवढी असून मंजूर निविदा रक्कम रु.२११.६० कोटी आहे. सदर प्रकल्पाचे काम मे.रोडवे सोल्यूशन इंडिया प्रा.लि., पुणे यांना दि. ०१/०८/२०१७ रोजी देण्यात आले होते. सदरच्या कामाची मुळ मुदत दि. ३१/०७/२०१९ पर्यन्त होती ,COVID-१९ च्या महामारीमुळे दि.३१/१०/२०२२ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली होती. सदर प्रकल्पाचा दोषदायित्व कालावधी चार वर्षाचा आहे. प्रकल्पावर प्राधिकृत अभियंता म्हणून मे.स्टुप कन्सल्टंट इन Joint Venture विथ मे.आयोलीजा कन्सलटंन्ट प्रा. ली. यांची नियुक्ती केली आहे.

प्रकल्पाच्या एकूण ४८.३७५ कि.मी. लांबीमधील ४७.३४० कि.मी. लांबीचे (९६.३०%) काम आज रोजी पूर्ण झाले आहे. सदर प्रकल्पात एकूण १५ लहान पूलांपैकी १३ पूलांची कामे पूर्ण झाली आहेत व त्यापैकी कुर्डुवाडी नगरपरिषद हद्दीतील ७०० मी. लांबी व त्यामधील साखळी क्र. ०+६९० व साखळी क्र. ३४+५०० (रोपळे बु.) येथील लहान पुलाचे काम अपूर्ण आहे. सदर प्रकल्पाची भौतिक प्रगती ९६.३०% झाली असून आर्थिक प्रगती ९६.२८% झाली आहे.

कुर्डुवाडी नगरपरिषदेने पूर्वी ७०० मी. (साखळी क्र. ०+०० ते ०+७००) लांबीचे काम करण्यात येऊ नये व सदर काम त्यांच्या निधीतून करणार असल्याबाबत दि.२८/०१/२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कळविले होते. तथापि तद्नंतर सदर काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने करून देण्याबाबत त्यांनी त्यांचे पत्र दि. १२/०२/२०२४ अन्वये पुनश्च विनंती केली आहे. त्याअनुषंगाने या लांबीतील पुलाचे (साखळी क्र. ०+६९०) व लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येत आहे. सदर काम ३१/१२/२०२४ पर्यन्त पूर्ण करण्यात येईल.

२१२१-८५-५५०(७२०-२४२५)

[पु.मा.५

तसेच, सदर रस्त्यावरील मौजे रोपळे बु., ता. पंढरपूर येथील (कि.मी. ३४+५००) उजनी धरणाच्या डाव्या कालव्यावरील पुलाचे सुधारित संकल्पन पाटबंधारे विभागाच्या निर्देशानुसार प्रगतीपथावर आहे. सदर संकल्पन पूर्ण होताच कॅनाल वरील पुलाचे काम हाती घेण्यात येईल व सदर काम येत्या ६ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

तसेच मौजे बावी (सोलंकरवाडी), ता. माढा येथील प्रकल्पाच्या (कि.मी. १७/९६० ते कि.मी. १८/१९०) (२३० मीटर) लांबीतील क्षेत्र हे श्री. यशवंत बाळासो पाटील असल्याचे दावा केल्याने व सदर कामास त्यांनी हरकत घेतल्यामुळे बांधकाम करता येत नाही. या लांबीतील श्री. यशवंत बाळासो पाटील यांचा गट क्र. १६७ मधील रस्ता हद्दी बाहेरील संपादित क्षेत्र ०.९३६ हे आर एवढ्या क्षेत्राच्या अंतिम निवाडयास मंजूरी अद्याप अप्राप्त आहे. तसेच सदर इसम सदर प्रकल्पाच्या अस्तित्वातील रुंदीत बांधकाम करून देण्यास देखील वारंवार तीव्र विरोध करत असल्यामुळे सदर लांबीतील बांधकाम पूर्ण करण्यासाठी अडचणी येत आहेत. याबाबत संबंधित जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व पोलिस स्टेशनला देखील दि.२१/०८/२०२०, दि.०६/०९/२०२३, दि.२५/०६/२०२४ व दि.२७/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये पाठपुरावा केला आहे. बावी (सोलंकरवाडी) येथील भूसंपादनाची प्रक्रिया लवकर पूर्ण करून सदर लांबीमधील काम पूर्ण करण्यात येईल.

सदर प्रकल्पाचे काम IRC मानकाप्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे. रस्त्याच्या काँक्रीटचा पृष्टभागाला काही ठिकाणी Minor Crack पडले होते. तरी आता सदर प्रकल्पाचा दोष दायित्व कालावधी सुरू असून Minor Crack पडलेले काँक्रीट पॅनल दुरूस्तीचे काम ठेकेदाराच्या खर्चाने पूर्ण करण्यात येत आहे. सदर Minor Crackपडलेल्या काँक्रीट पॅनेलच्या दुरुस्तीचे काम चालू असून लवकरच पूर्ण करण्यात येईल. रस्त्याची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती ही निविदा अटी व शर्तीनुसार करण्यात येत आहे.

*****************************************************

तसेच, सदर रस्त्यावरील मौजे रोपळे बु., ता. पंढरपूर येथील (कि.मी. ३४+५००) उजनी धरणाच्या डाव्या कालव्यावरील पुलाचे सुधारित संकल्पन पाटबंधारे विभागाच्या निर्देशानुसार प्रगतीपथावर आहे. सदर संकल्पन पूर्ण होताच कॅनाल वरील पुलाचे काम हाती घेण्यात येईल व सदर काम येत्या ६ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

तसेच मौजे बावी (सोलंकरवाडी), ता. माढा येथील प्रकल्पाच्या (कि.मी. १७/९६० ते कि.मी. १८/१९०) (२३० मीटर) लांबीतील क्षेत्र हे श्री. यशवंत बाळासो पाटील असल्याचे दावा केल्याने व सदर कामास त्यांनी हरकत घेतल्यामुळे बांधकाम करता येत नाही. या लांबीतील श्री. यशवंत बाळासो पाटील यांचा गट क्र. १६७ मधील रस्ता हद्दी बाहेरील संपादित क्षेत्र ०.९३६ हे आर एवढ्या क्षेत्राच्या अंतिम निवाडयास मंजूरी अद्याप अप्राप्त आहे. तसेच सदर इसम सदर प्रकल्पाच्या अस्तित्वातील रुंदीत बांधकाम करून देण्यास देखील वारंवार तीव्र विरोध करत असल्यामुळे सदर लांबीतील बांधकाम पूर्ण करण्यासाठी अडचणी येत आहेत. याबाबत संबंधित जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व पोलिस स्टेशनला देखील दि.२१/०८/२०२०, दि.०६/०९/२०२३, दि.२५/०६/२०२४ व दि.२७/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये पाठपुरावा केला आहे. बावी (सोलंकरवाडी) येथील भूसंपादनाची प्रक्रिया लवकर पूर्ण करून सदर लांबीमधील काम पूर्ण करण्यात येईल.

सदर प्रकल्पाचे काम IRC मानकाप्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे. रस्त्याच्या काँक्रीटचा पृष्टभागाला काही ठिकाणी Minor Crack पडले होते. तरी आता सदर प्रकल्पाचा दोष दायित्व कालावधी सुरू असून Minor Crack पडलेले काँक्रीट पॅनल दुरूस्तीचे काम ठेकेदाराच्या खर्चाने पूर्ण करण्यात येत आहे. सदर Minor Crackपडलेल्या काँक्रीट पॅनेलच्या दुरुस्तीचे काम चालू असून लवकरच पूर्ण करण्यात येईल. रस्त्याची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती ही निविदा अटी व शर्तीनुसार करण्यात येत आहे.

*****************************************************************

१८८७

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन**
**श्री.बबनराव शिंदे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८८७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून पंढरपूर ते कुर्डूवाडी रस्त्याचे रुंदीकरण करुन रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा तयार झालेला असून वाहतुकीसाठी गेल्या दोन वर्षापासून खुला केला असणे, सदर रस्त्याचे काम राष्ट्रीय महामार्गाचे कोणत्याही नियमाचे पालन केले नसल्यामुळे रस्त्याला कोणत्याही प्रकारची लेवल नाही व रस्ता जागोजागी खाली वर होवून सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असणे, तसेच मौजे बावी ता. माढा हे सदर मार्गावरील गाव असून येथे काम न झाल्याने अनेक अपघात होऊन नागरीकांचे मृत्यू झालेले असणे, सदरचे काम करणेबाबत वारंवार संबंधित कार्यकारी अभियंता यांना फोनवर सुचना देऊनही त्यांचेकडून कोणतीही कार्यवाही होत नसणे ही गंभीर बाब असणे, तसेच सदर रस्त्यावरील मौजे रोपळे (बु) ता.पंढरपूर येथील उजनी धरणाच्या डाव्या कालव्यावरील पुल जुना व अरुंद असून पुलावर आणि पुलाच्या दोन्ही बाजूला रस्ता १० ते १५ फुट खाली असल्यामुळे पुलावरुन वाहतूक करणे धोकादायक बनले असणे, सदर रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे धोकादायक पुलामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून अनेक निष्पाप नागरीकांना आपला जीव गमवावा लागला असणे, सदर रस्त्याच्या निकृष्ट कामाची चौकशी करणेची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीक वारंवार करीत असणे, यामुळे नागरिकांच्या मनात शासनाच्या विषयी झालेली तीव्र नाराजी, याप्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

---

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)**

कुर्डुवाडी ते पंढरपूर हा रस्ता केंद्र शासनाने नव्याने राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५सी म्हणून घोषित केला आहे. कुर्डूवाडी ते पंढरपूर साखळी क्र. ०/०० ते ४८/३७५ या लांबीत पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरणाचे काम जॉब क्र.NH-९६५C-MAH-२०१६-१७-११०२, दि.२७/०१/२०१७ अन्वये केंद्र शासनाच्या रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांनी मंजूर केलेले आहे. सदर कामामध्ये अस्तित्वातील दुपदरी डांबरी (५.५० मी.) पृष्टभागाचे १० मी. करिता कॉंक्रीटीकरण करणे, लहान मोठ्या पुलांचे बांधकाम, मोऱ्यांचे बांधकाम, रोड फर्निचर इ. बाबींचा समावेश आहे.

प्रकल्पाची मंजूर किंमत रु.३०७.६३ कोटी एवढी असून मंजूर निविदा रक्कम रु.२११.६० कोटी आहे. सदर प्रकल्पाचे काम मे.रोडवे सोल्यूशन इंडिया प्रा.लि., पुणे यांना दि. ०१/०८/२०१७ रोजी देण्यात आले होते. सदरच्या कामाची मुळ मुदत दि. ३१/०७/२०१९ पर्यन्त होती ,COVID-१९ च्या महामारीमुळे दि.३१/१०/२०२२ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली होती. सदर प्रकल्पाचा दोषदायित्व कालावधी चार वर्षाचा आहे. प्रकल्पावर प्राधिकृत अभियंता म्हणून मे.स्टुप कन्सल्टंट इन Joint Venture विथ मे.आयोलीजा कन्सलटंन्ट प्रा. ली. यांची नियुक्ती केली आहे.

प्रकल्पाच्या एकूण ४८.३७५ कि.मी. लांबीमधील ४७.३४० कि.मी. लांबीचे (९६.३०%) काम आज रोजी पूर्ण झाले आहे. सदर प्रकल्पात एकूण १५ लहान पूलांपैकी १३ पूलांची कामे पूर्ण झाली आहेत व त्यापैकी कुर्डुवाडी नगरपरिषद हद्दीतील ७०० मी. लांबी व त्यामधील साखळी क्र. ०+६९० व साखळी क्र. ३४+५०० (रोपळे बु.) येथील लहान पुलाचे काम अपूर्ण आहे. सदर प्रकल्पाची भौतिक प्रगती ९६.३०% झाली असून आर्थिक प्रगती ९६.२८% झाली आहे.

राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) योजनेसाठीच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना सन २०१० नुसार राज्यस्तरावर राज्य समन्वयक व संगणक आज्ञावली रुपरेषक (१ पद), जिल्हास्तरावरील संगणक आज्ञावली रुपरेषक (CP) (३३ पदे) व तालुकास्तरावरील तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM) (३५१ पदे) व विषय विशेषज्ञ ही पदे मंजूर होती. तर, केंद्र शासनाच्या सन २०१४ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यस्तरावर महिला समन्वयक (१ पद) व तालुका स्तरावर २ सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (ATM) (१०५३ पदे) या पदांचा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. सदरची पदे विभागीय कृषि सहसंचालक स्तरावरुन वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मुलाखतीद्वारे करार/कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत. यापैकी सद्यस्थितीत एकूण ५१४ पदे भरलेली आहेत. तर ९२४ पदे रिक्त आहेत.

राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) अंतर्गत तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक व कॉम्पुटर प्रोग्रामर ही पदे करार/कंत्राटी तत्वावर घेण्यात आली आहेत. या कर्मचा-यांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०१८ च्या सूचनांनुसार वार्षिक १० टक्के वेतनवाढ देण्यात आली होती तथापि केंद्र शासनाच्या

दि.२५.०२.२०२१ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार ही मानधनवाढ रद्द करून, मानधनाच्या कमाल मर्यादेत तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांना रू.३०,०००/- , सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक यांना रू.२५,०००/- तर संगणक आज्ञावली रुपरेषक यांना रू.१६,०००/-याप्रमाणे वेतन अदा करण्यात येत आहे.

इतर राज्यांमध्ये याच योजनेंतर्गत कार्यरत कर्माचा-यांना केंद्रः राज्य ६०:४० या प्रमाणात वेतन वाढ देण्यात आलेली आहे. या प्रकरणी मानधनवाढ व आर्थिक बोजाच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून दि.१०.०१.२०२४ व दि.१६.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.५०६०/२०१५ च्या दिनांक २४.८.२०१६ रोजीच्या न्यायालयीन आदेशानुसार त्यांच्या सेवा सुरु ठेवल्या आहेत. या कर्मचाऱ्यांना समायोजित करणे म्हणजे एक प्रकारे बॅक डोअर एंट्री होईल व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार अशा कर्मचाऱ्यांना नियमित करुन शासन सेवेत सामावून घेता येणे शक्य नाही.

*****

एच ६६३-१३7

दि.२५.०२.२०२१ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार ही मानधनवाढ रद्द करून, मानधनाच्या कमाल मर्यादेत तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांना रू.३०,०००/- , सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक यांना रू.२५,०००/- तर संगणक आज्ञावली रुपरेषक यांना रू.१६,०००/-याप्रमाणे वेतन अदा करण्यात येत आहे.

इतर राज्यांमध्ये याच योजनेंतर्गत कार्यरत कर्माचा-यांना केंद्रः राज्य ६०:४० या प्रमाणात वेतन वाढ देण्यात आलेली आहे. या प्रकरणी मानधनवाढ व आर्थिक बोजाच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून दि.१०.०१.२०२४ व दि.१६.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.५०६०/२०१५ च्या दिनांक २४.८.२०१६ रोजीच्या न्यायालयीन आदेशानुसार त्यांच्या सेवा सुरु ठेवल्या आहेत. या कर्मचाऱ्यांना समायोजित करणे म्हणजे एक प्रकारे बॅक डोअर एंट्री होईल व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार अशा कर्मचाऱ्यांना नियमित करुन शासन सेवेत सामावून घेता येणे शक्य नाही.

*****

एच ६६३-१३अ

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक २०५५</u>

२३५.

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

मा.श्री.कृष्णा गजबे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०५५ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक व कॉम्पुटर प्रोग्रामर ही पदे सन २०१० पासुन कंत्राटी पद्धतीने कार्यरत असणे, ग्रामीण भागातील शेतक-यांना शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान व व्यवस्थापन करण्याकरीता यांची महत्वाची भूमिका असणे, त्यामुळे शेतक-यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ होणे, सदरहू कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा(आत्मा) अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून मागण्या प्रलंबित असणे, त्यात प्रामुख्याने तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक व कॉम्पुटर प्रोग्रामर यांना नियमित करुन शासन सेवेत सामावून घ्यावे, त्यांना इतर शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, सन २०२१ पासुन कमी करण्यात आलेले मानधन पुर्ववत करुन तेव्हापासुनची मानधनातील फरकाची रक्कम अदा करावी अशा असणे, सदरहू कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा(आत्मा) अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मागण्या रास्त असून त्या पूर्ण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.श्री.धनंजय मुंडे, मंत्री, कृषि महोदयांचे निवेदन

राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) योजनेसाठीच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना सन २०१० नुसार राज्यस्तरावर राज्य समन्वयक व संगणक आज्ञावली रुपरेषक (१ पद), जिल्हास्तरावरील संगणक आज्ञावली रुपरेषक (CP) (३३ पदे) व तालुकास्तरावरील तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM) (३५१ पदे) व विषय विशेषज्ञ ही पदे मंजूर होती. तर, केंद्र शासनाच्या सन २०१४ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यस्तरावर महिला समन्वयक (१ पद) व तालुका स्तरावर २ सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (ATM) (१०५३ पदे) या पदांचा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. सदरची पदे विभागीय कृषि सहसंचालक स्तरावरुन वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मुलाखतीद्वारे करार/कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत. यापैकी सद्यस्थितीत एकूण ५१४ पदे भरलेली आहेत. तर ९२४ पदे रिक्त आहेत.

राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) अंतर्गत तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक व कॉम्पुटर प्रोग्रामर ही पदे करार/कंत्राटी तत्वावर घेण्यात आली आहेत. या कर्मचा-यांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०१८ च्या सूचनांनुसार वार्षिक १० टक्के वेतनवाढ देण्यात आली होती तथापि केंद्र शासनाच्या

लक्षवेधी सूचना क्र.१७९८



महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१७९८

श्री. रवि राणा मा.वि.स.स. यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१७९८ पुढीलप्रमाणे आहे :-

" म.रा. नियोजन वि.रोहयो पत्र क्र.मग्रारोहयो-२०२४/पत्र क्र.१४/रोहयो -६,अ दि.२५/०१/२०२४ शासन आदेशाप्रमाणे पांधण रस्त्याची कामे मंजुर झाली असुन त्या मधिल वायंगाव-परतवाडा डांबरी रस्त्यापासुन ते सुधिल वानखडे ते ढोणे ते पुढे इंगोले यांचे शेतापर्यंत रस्ता बांधकाम करणेसाठी तहसिलदार ,भुमीअभिलेख व इतर यंत्रणेचे अधिकाऱ्यांनी संयुक्त पहाणी दि.२६/०६/२०२४ रोजी केली, यापूर्विच तहसिलदार भातकुली यांनी दि.२५/०६/२०२४ रोजी सर्व यंत्रणेला उपस्थित राहण्याचे निर्देश दिले, व उपविभागीय अभियंता सा.बां.उपविभाग क्र.४ अमरावती यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र.६०४/२०२४ दि.२०/०५/२०२४ ला वरिल यंत्रणेला रस्ता बांधकाम करणेसाठी कोणत्याही शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी यंत्रणेच्या समन्वयाने हद्द निश्चित करुन काम सुरु करणेबाबत कळविले असणे, दि.२६/०६/२०२४ संयुक्त पाहणी दरम्यान नकाशात पांदण रस्ता नसल्याने पांदण रस्ता होऊ शकत नाही उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगणे या प्रकरणी संबंधीत अल्पभुधारक आदिवासी खातेदार शेतकरी श्री.ढोणे यांचे शेतामधुन दरवर्षी इतर शेतकरी उभे पिके तुडवत टॅक्टर, बैलबंडी ने आण करुन मोठया प्रमाणात शेतपिकांचे नुकसान दरवर्षी होत असणे या संबंधाने पोलीस स्टेशन वलगांव व तहसिलदार भातकुली यांचेकडे लेखी तक्रारही केली असणे, शेतकरी हित बघता रस्ता बांधकाम करणे व जर रस्ता नाही तर आदिवासी शेतकरी यांचे शेतामधुन जाणाऱ्या ज्यामुळे उभ्या पिकांचे नुकसान होते तो रस्ता बंद करणेसाठी निर्णयात्मक शासनाने करावयाची आवश्यकता त्या संबंधाने करावयाची उपाययोजना."

मा.मंत्री (रोजगार हमी ) यांचे निवेदन

शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांकरीता नियोजन (रोहयो प्रभाग) विभागाच्या दिनांक ११/११/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध योजनांच्या अभिसरणातुन मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते

योजना विहीत करण्यात आली आहे. मनरेगा आणि राज्य रोहयो यांच्या अभिसरणातुन करावयाच्या शेत /पाणंद रस्त्यांच्या कामांकरीता शासनस्तरावरुन आराखडा मंजुर करण्यात येतो. शेत/पाणंद रस्त्याच्या कामाकरीता येणाऱ्या मजुरी (अकुशल) आणि सामुग्री (कुशल) यांवरील खर्चाकरीता मनरेगांतर्गत अनुक्रमे ६०:४० याप्रमाणात निधी उपलब्ध होतो. तर सदर कामावरील सामुग्रीचा उर्वरित खर्चाकरीता राज्य रोहयोंतर्गत निधी (पुरक कुशल) उपलब्ध करुन देण्यात येता.

ग्रामीण भागात अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यासंदर्भात "महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम १९७७" महाराष्ट्र राज्यात पुर्वीपासुनच लागु आहे. तथापि, देशभरातील ग्रामीण भागातील कुटुंबांना अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यासंदर्भात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ या केंद्रीय कायद्यामध्ये तरतुद करण्यात आली आहे. तथापि, ज्या राज्यांमध्ये उपरोक्त केंद्रीय कायद्यात विहीत केल्यानुसार यापुर्वीच अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यात आली आहे. अशा राज्यांना त्यांचे स्वताचे कायद्यांची अंमलबजावणी करण्याची उपरोक्त केंद्रीय कायद्यातील कलम २८ अन्वये मुभा देण्यात आली होती. उपरोक्त केंद्रीय कायद्यातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्यासही केंद्र शासनामार्फत निधी उपलब्ध व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम,१९७७ (सन २०१४ पर्यंतच्या सुधारणांसह) या कायद्यामध्ये वेळोवेळ आवश्यक सुधारणा करण्यात आल्या असुन सदर सुधारणांनुसार राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र (मगांराग्रारोहयो-महाराष्ट्र) ही योजना सध्या राबविण्यात येत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत सध्या मजुरीचा संपुर्ण खर्च केंद्र शासनामार्फत अदा करण्यात येतो, तर साहित्यावरील ७५ टक्के खर्च केंद्र शासनामार्फत आणि २५ टक्के खर्च राज्य शासनामार्फत करण्यात येतो.

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या दिनांक २२/०६/२०१६ रोजीच्या अधिसुचनेनुसार मनरेगा योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांवरील एकुण खर्चातील सामुग्री या घटकावरील खर्चाचे प्रमाण जिल्हास्तरावर ४० टक्केपर्यंत (मजुरी खर्चाच्या दोन तृतीयांश) राखावयाचे आहे. ग्रामपंचायतींची आग्रही मागणी असताना व उक्त मर्यादेत सामुग्रीचा खर्च करण्यास वाव असतानांही सामुग्रीवरील खर्च अधिक असणारी कामे घेण्यास क्षेत्रीयस्तरावर उदासिनतना दिसुन येते. त्यामुळे जिल्हास्तरावरील मजुरी खर्चाच्या दोन तृतीयांश प्रमाणास केंद्र शासनामार्फत उपलब्ध होऊ शकणारा सामुग्रीवरील खर्च नियोजना अभावी होत नाही. सबब, ज्या जिल्ह्यामध्ये सामुग्रीवरील खर्च करण्यास वाव आहे अशा जिल्ह्यांमध्ये लोकप्रतिनिधी/ग्रामपंचायती यांच्या

योजना विहीत करण्यात आली आहे. मनरेगा आणि राज्य रोहयो यांच्या अभिसरणातुन करावयाच्या शेत /पाणंद रस्त्यांच्या कामांकरीता शासनस्तरावरुन आराखडा मंजुर करण्यात येतो. शेत/पाणंद रस्त्याच्या कामाकरीता येणाऱ्या मजुरी (अकुशल) आणि सामुग्री (कुशल) यांवरील खर्चाकरीता मनरेगांतर्गत अनुक्रमे ६०:४० याप्रमाणात निधी उपलब्ध होतो. तर सदर कामावरील सामुग्रीचा उर्वरित खर्चाकरीता राज्य रोहयोंतर्गत निधी (पुरक कुशल) उपलब्ध करुन देण्यात येता.

ग्रामीण भागात अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यासंदर्भात "महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम १९७७" महाराष्ट्र राज्यात पुर्वीपासुनच लागु आहे. तथापि, देशभरातील ग्रामीण भागातील कुटुंबांना अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यासंदर्भात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ या केंद्रीय कायद्यामध्ये तरतुद करण्यात आली आहे. तथापि, ज्या राज्यांमध्ये उपरोक्त केंद्रीय कायद्यात विहीत केल्यानुसार यापुर्वीच अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यात आली आहे. अशा राज्यांना त्यांचे स्वताचे कायद्यांची अंमलबजावणी करण्याची उपरोक्त केंद्रीय कायद्यातील कलम २८ अन्वये मुभा देण्यात आली होती. उपरोक्त केंद्रीय कायद्यातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्यासही केंद्र शासनामार्फत निधी उपलब्ध व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम,१९७७ (सन २०१४ पर्यंतच्या सुधारणांसह) या कायद्यामध्ये वेळोवेळ आवश्यक सुधारणा करण्यात आल्या असुन सदर सुधारणांनुसार राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र (मगांराग्रारोहयो-महाराष्ट्र) ही योजना सध्या राबविण्यात येत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत सध्या मजुरीचा संपुर्ण खर्च केंद्र शासनामार्फत अदा करण्यात येतो, तर साहित्यावरील ७५ टक्के खर्च केंद्र शासनामार्फत आणि २५ टक्के खर्च राज्य शासनामार्फत करण्यात येतो.

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या दिनांक २२/०६/२०१६ रोजीच्या अधिसुचनेनुसार मनरेगा योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांवरील एकुण खर्चातील सामुग्री या घटकावरील खर्चाचे प्रमाण जिल्हास्तरावर ४० टक्केपर्यंत (मजुरी खर्चाच्या दोन तृतीयांश) राखावयाचे आहे. ग्रामपंचायतींची आग्रही मागणी असताना व उक्त मर्यादेत सामुग्रीचा खर्च करण्यास वाव असतानांही सामुग्रीवरील खर्च अधिक असणारी कामे घेण्यास क्षेत्रीयस्तरावर उदासिनतना दिसुन येते. त्यामुळे जिल्हास्तरावरील मजुरी खर्चाच्या दोन तृतीयांश प्रमाणास केंद्र शासनामार्फत उपलब्ध होऊ शकणारा सामुग्रीवरील खर्च नियोजना अभावी होत नाही. सबब, ज्या जिल्ह्यामध्ये सामुग्रीवरील खर्च करण्यास वाव आहे अशा जिल्ह्यांमध्ये लोकप्रतिनिधी/ग्रामपंचायती यांच्या

लक्षवेधी सूचना क्र.१७९८ २४६.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१७९८

श्री. रवि राणा मा.वि.स.स. यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१७९८ पुढीलप्रमाणे आहे :-

" म.रा. नियोजन वि.रोहयो पत्र क्र.मग्रारोहयो-२०२४/पत्र क्र.१४/रोहयो -६,अ दि.२५/०१/२०२४ शासन आदेशाप्रमाणे पांधण रस्त्याची कामे मंजुर झाली असुन त्या मधिल वायंगाव-परतवाडा डांबरी रस्त्यापासुन ते सुधिल वानखडे ते ढोणे ते पुढे इंगोले यांचे शेतापर्यंत रस्ता बांधकाम करणेसाठी तहसिलदार ,भुमीअभिलेख व इतर यंत्रणेचे अधिकाऱ्यांनी संयुक्त पहाणी दि.२६/०६/२०२४ रोजी केली, यापूर्विच तहसिलदार भातकुली यांनी दि.२५/०६/२०२४ रोजी सर्व यंत्रणेला उपस्थित राहण्याचे निर्देश दिले, व उपविभागीय अभियंता सा.बां.उपविभाग क्र.४ अमरावती यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र.६०४/२०२४ दि.२०/०५/२०२४ ला वरिल यंत्रणेला रस्ता बांधकाम करणेसाठी कोणत्याही शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी यंत्रणेच्या समन्वयाने हद्द निश्चित करुन काम सुरु करणेबाबत कळविले असणे, दि.२६/०६/२०२४ संयुक्त पाहणी दरम्यान नकाशात पांदण रस्ता नसल्याने पांदण रस्ता होऊ शकत नाही उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगणे या प्रकरणी संबंधीत अल्पभुधारक आदिवासी खातेदार शेतकरी श्री.ढोणे यांचे शेतामधुन दरवर्षी इतर शेतकरी उभे पिके तुडवत टॅक्टर, बैलबंडी ने आण करुन मोठया प्रमाणात शेतपिकांचे नुकसान दरवर्षी होत असणे या संबंधाने पोलीस स्टेशन वलगांव व तहसिलदार भातकुली यांचेकडे लेखी तक्रारही केली असणे, शेतकरी हित बघता रस्ता बांधकाम करणे व जर रस्ता नाही तर आदिवासी शेतकरी यांचे शेतामधुन जाणाऱ्या ज्यामुळे उभ्या पिकांचे नुकसान होते तो रस्ता बंद करणेसाठी निर्णयात्मक शासनाने करावयाची आवश्यकता त्या संबंधाने करावयाची उपाययोजना."

मा.मंत्री (रोजगार हमी ) यांचे निवेदन

शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांकरीता नियोजन (रोहयो प्रभाग) विभागाच्या दिनांक ११/११/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध योजनांच्या अभिसरणातुन मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते

मगणीनुसार मनरेगा योजनेच्या सर्व अटी व शर्थींचे पालन करुन काम घेण्याबाबत शासनस्तरावरुन सहमती प्रदान करण्यात येते.

नियोजन विभागाच्या दिनांक २५.०१.२०२४ रोजीच्या शासनपत्रान्वये अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यातील मौजे वायगांव येथे परतवाडा डांबरी रस्त्यापासुन ते सुधिर वानखडे ढोणे ते विनायक चौधरी ते पुढे इंगोले यांचे शेतापर्यंत मगांराग्ररोहयो-महाराष्ट्र योजनेंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करण्यास लोकप्रतिनिधींच्या विनंतीनुसार शासनस्तरावरुन संमती देण्यात आली होती. मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत सदर रस्त्यास मान्यता देण्यात आलेली नाही. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निदेशानुसार उपविभागीय अभियंता, सार्वजनकि बांधकाम उपविभाग क्र.४ अमरावती आणि उपअधिक्षक भुमीअभिलेख, भातकुली यांच्यामार्फत नकाशा व प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण पाहणी करण्यात आली होती. तथापि, सदर रस्ता पाणंद रस्ता नसल्याचे पाहणीमध्ये निदर्शनास आले आहे. तसेच, सदर भागातील शेतकरी वडीलोपार्जित वहीवाट म्हणुन सदर रस्त्याचा वापर करीत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे. सदर रस्ता खाजगी जमिनीतुन जात असल्याने रस्त्याचे बांधकाम करण्यापुर्वी संबंधित जमिन मालकांकडुन रस्त्याच्या जागेसंदर्भात विनामावेजा दानपत्र प्राप्त होणे आवश्यक आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १९१८

**सर्वश्री. राजकुमार पटेल व ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १९१८ पुढीलप्रमाणे आहे :-**

**"देशात आतापर्यंत ३ लाखांच्यावर शेतक-यांच्या आत्महत्या होणे, त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील आत्महत्यांची संख्या सर्वाधिक असणे, शासनाने कर्जमाफी करुनसुध्दा शेतकरी आत्महत्या कमी न होता अधिक प्रमाणात वाढणे, शेतीमालाच्या भावाची घसरण होणे, त्यासाठी उपाययोजना म्हणून पेरणी ते कापणी पर्यंतची कामे MREGS किंवा रोहयो मधुन करण्याची गरज असणे, फळबाग लागवडीसाठी MREGS मधून ३ वर्षाच्या योजनेमध्ये वाढ संगोपनासाठी अधिक ५ वर्षे MREGS मधून योजना राबविण्याची गरज असणे, तसेच मेळघाट, धारणी, चिखलदरा सर्वाधिक कुपोषण सारख्या आदिवासी बहुल क्षेत्रात मजूरांचे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी MREGS मधून किमान ८ महिने सर्व मजुरांना शासनाच्या उपायोजना कमी पडणे, MREGS योजनेचा अधिक वापर होण्यासाठी काही अटी व शर्ती कमी करण्याची गरज असणे, तसेच MREGS मधील किंवा शेतमजुराचा अपघात झाल्यास स्व. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेच्या धर्तीवर मदतीची गरज असणे, MREGS मजुरांना बांधकाम मंडळात समाविष्ट केल्याप्रमाणे शेतमजुरांनासुध्दा बांधकाम मंडळात समाविष्ट करण्याची सातत्याने होत असलेली मागणी व MREGS मजुरांना वेळेवर मजुरी मिळणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

मा. मंत्री (रोजगार हमी) यांचे निवेदन

❖ महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांच्या दि. १९/१२/२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नापिकी, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्यामूळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा हे ३ निकष आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तातडीची मदत देण्याकरिता ठरविण्यात आले आहेत.

दिनांक ०१ जानेवारी, २०२४ ते ३१ मे, २०२४ या (५ महिने) कालावधीत एकूण १,०४६ शेतकऱ्यांची आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली आहेत. त्यापैकी ३५८ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे जिल्हास्तरीय समितीने शिफारस केली असून १४२ प्रकरणांची शिफारस करण्यात आलेली नाहीत. ५४६ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असून शिफारस केलेल्या १७४ प्रकरणी शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ नुसार प्रत्येकी रू.१.०० लक्ष मदत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना देण्यात आलेली आहे. तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही जिल्हास्तरीय समितीमार्फत सुरू आहेत. कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना यांच्या अंमलबजावणीला गती देण्यात येत आहे.

शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आली आहे. दि.२३/०६/२०२३ च्या

कृषी विभागाच्या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना केवळ १.०० रू.भरून पिक विमा योजनेचा लाभ देण्याकरिता "सर्वसमावेशक पिक विमा योजना" सन २०२३-२४ पासून राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्य शासनाकडून प्रतिवर्ष रुपये ६,०००/- शेतक-यांना देण्यासाठी नमो किसान शेतकरी महासन्मान निधी योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्तीवेळी राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीतून अथवा वेळ प्रसंगी राज्य शासनाच्या निधीतून मदत दिली जाते.

❖ सहकार विभागाच्या दि.२७/१२/२०१९ रोजीच्या शासननिर्णयान्वये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना -२०१९ अंमलात आली असून एकुण रु.२०,४८६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यामध्ये आधार प्रमाणीकरण झालेल्या एकुण ३२.३३ लाख कर्जखात्यांना लाभ देण्यासाठी रु. २०,५३७ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी एकुण ३२.२७ लाख कर्जखात्यांवर रु.२०,४९७.१३ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत ४९ हजार कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे. बँक स्तरावरील तांत्रिक अडचणींमुळे ज्या कर्जखात्यांवर लाभ जमा झालेला नाही, त्यांची माहिती घेऊन पात्र लाभ रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सद्य:स्थितीत सदर योजनेचे कामकाज ९९.०८% पूर्ण झाले आहे.

सहकार विभागाच्या दि.२९/०७/२०२२ रोजीच्या शासननिर्णयाद्वारे महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ प्रोत्साहनपर लाभ योजनेअंतर्गत सन २०१७-१८, सन २०१८-१९ आणि सन २०१९-२० या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना कमाल रु.५०,००० पर्यंतच्या रकमेचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येत आहे. सदर योजनेसाठी एकुण **रु.५४४०.६१ कोटी** इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. राज्यातील एकुण २८.८४ लाख खाती सादर करण्यात आली. त्यापैकी १५.४४ लाख कर्जखात्यांना पात्र ठरवून विशिष्ट क्रमांक देण्यात आला. त्यापैकी १५.१६ लाख कर्ज खात्यांचे आधार प्रमाणीकरण झाले. त्यापैकी १४.४० लाख कर्जखात्यांना रु.५२२२.०५ कोटी इतका लाभ मंजूर करण्यात आला असून त्यापैकी १४.३८ लाख कर्जखात्यांना रु.५२१६.७५ कोटी रकमेचा लाभ प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला. पात्र ठरलेल्या एकुण ३३,३५६ कर्जखात्यांचे आधार प्रमाणिकरण बाकी असून बँक स्तरावरील तांत्रिक अडचणींमुळे ज्या कर्जखात्यांवर लाभ जमा झालेला नाही त्यांना लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

❖ केंद्र शासन पुढील पिकांसाठी किमान आधारभूत किंमती जाहीर करते. त्यामध्ये धान, ज्वारी, बाजरी, मका, भुईमुग, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, सूर्यफुल, तीळ, कापूस, खरीप कांदा, गहू, हरभरा, करडई, रब्बी ज्वारी, हळद व ऊस या पिकांचा समावेश आहे. त्यापैकी हळद, खरीप कांदा व रब्बी ज्वारी या पिकांसाठी केंद्र शासन किमान आधारभूत किंमत जाहीर करत नाही. शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी खेळत्या भांडवलावरील व्याज ६% दराने संपूर्ण वर्षासाठी, कुटुंबातील व्यक्तींचे श्रम दिवस / रोजंदारीवरील श्रम दिवसाची मजूरी / अदायगी, १०% देखरेख/ व्यवस्थापन खर्च, पणन व वाहतुकीवरील खर्च उत्पादन खर्चात समाविष्ट करण्यात येतो. तसेच प्रति क्विंटल उत्पादन खर्चावर १५% नफा गृहीत धरुन त्यानंतर येणाऱ्या प्रति क्विंटल किंमतीची शिफारस केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे केली जाते. केंद्र शासन राष्ट्रीय पातळीवर आधारभूत किंमत योजनेत समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करुन जाहीर केलेल्या किंमती सर्व राज्यांना लागू होतात.

❖ सन २०२४-२५ च्या मनरेगा योजनेबाबत केंद्र शासनाच्या (Annual Master Circular) मधील मुद्दा क्र.७.२.२ च्या Non-permissible Works मध्ये **"जी कामे मुर्त स्वरुपाची नाहीत, मोजणी योग्य नाहीत आणि पुनरावृत्ती / वारंवार होणारी आहेत," अशी कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घेता येणार नाहीत, असे नमूद करण्यात आले आहे.** पेरणी ते कापणीच्या कामांचा समावेश करण्याबाबतची मागणी वारंवार होत असल्याने सदरची कामे मनरेगा/रोहयो अंतर्गत अनुज्ञेय करण्यास

कृषी विभागाच्या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना केवळ १.०० रू.भरून पिक विमा योजनेचा लाभ देण्याकरिता "सर्वसमावेशक पिक विमा योजना" सन २०२३-२४ पासून राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्य शासनाकडून प्रतिवर्ष रुपये ६,०००/- शेतक-यांना देण्यासाठी नमो किसान शेतकरी महासन्मान निधी योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. नैसर्गीक आपत्तीवेळी राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीतून अथवा वेळ प्रसंगी राज्य शासनाच्या निधीतून मदत दिली जाते.

- सहकार विभागाच्या दि.२७/१२/२०१९ रोजीच्या शासननिर्णयान्वये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना -२०१९ अंमलात आली असून एकुण रु.२०,४८६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यामध्ये आधार प्रमाणीकरण झालेल्या एकुण ३२.३३ लाख कर्जखात्यांना लाभ देण्यासाठी रु. २०,५३७ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी एकुण ३२.२७ लाख कर्जखात्यांवर रु.२०,४९७.१३ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत ४९ हजार कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे. बँक स्तरावरील तांत्रिक अडचणींमुळे ज्या कर्जखात्यांवर लाभ जमा झालेला नाही, त्यांची माहिती घेऊन पात्र लाभ रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सद्य:स्थितीत सदर योजनेचे कामकाज ९९.०८% पूर्ण झाले आहे.

सहकार विभागाच्या दि.२९/०७/२०२२ रोजीच्या शासननिर्णयाद्वारे महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ प्रोत्साहनपर लाभ योजनेअंतर्गत सन २०१७-१८, सन २०१८-१९ आणि सन २०१९-२० या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना कमाल रु.५०,००० पर्यंतच्या रकमेचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येत आहे. सदर योजनेसाठी एकुण **रु.५४४०.६१ कोटी** इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. राज्यातील एकुण २८.८४ लाख खाती सादर करण्यात आली. त्यापैकी १५.४४ लाख कर्जखात्यांना पात्र ठरवून विशिष्ट क्रमांक देण्यात आला. त्यापैकी १५.१६ लाख कर्ज खात्यांचे आधार प्रमाणीकरण झाले. त्यापैकी १४.४० लाख कर्जखात्यांना रु.५२२२.०५ कोटी इतका लाभ मंजूर करण्यात आला असून त्यापैकी १४.३८ लाख कर्जखात्यांना रु.५२१६.७५ कोटी रकमेचा लाभ प्रत्यक्ष वितरीत करण्यात आला. पात्र ठरलेल्या एकुण ३३,३५६ कर्जखात्यांचे आधार प्रमाणिकरण बाकी असून बँक स्तरावरील तांत्रिक अडचणींमुळे ज्या कर्जखात्यांवर लाभ जमा झालेला नाही त्यांना लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

- केंद्र शासन पुढील पिकांसाठी किमान आधारभूत किंमती जाहीर करते. त्यामध्ये धान, ज्वारी, बाजरी, मका, भुईमुग, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, सूर्यफुल, तीळ, कापूस, खरीप कांदा, गहू, हरभरा, करडई, रब्बी ज्वारी, हळद व ऊस या पिकांचा समावेश आहे. त्यापैकी हळद, खरीप कांदा व रब्बी ज्वारी या पिकांसाठी केंद्र शासन किमान आधारभूत किंमत जाहीर करत नाही. शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी खेळत्या भांडवलावरील व्याज ६% दराने संपूर्ण वर्षासाठी, कुटुंबातील व्यक्तींचे श्रम दिवस / रोजंदारीवरील श्रम दिवसाची मजूरी / अदायगी, १०% देखरेख/ व्यवस्थापन खर्च, पणन व वाहतुकीवरील खर्च उत्पादन खर्चात समाविष्ट करण्यात येतो. तसेच प्रति क्विंटल उत्पादन खर्चावर १५% नफा गृहीत धरुन त्यानंतर येणाऱ्या प्रति क्विंटल किंमतीची शिफारस केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे केली जाते. केंद्र शासन राष्ट्रीय पातळीवर आधारभूत किंमत योजनेत समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करुन जाहीर केलेल्या किंमती सर्व राज्यांना लागू होतात.
- सन २०२४-२५ च्या मनरेगा योजनेबाबत केंद्र शासनाच्या (Annual Master Circular) मधील मुद्दा क्र.७.२.२ च्या Non-permissible Works मध्ये **"जी कामे मुर्त स्वरुपाची नाहीत, मोजणी योग्य नाहीत आणि पुनरावृत्ती / वारंवार होणारी आहेत," अशी कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घेता येणार नाहीत, असे नमूद करण्यात आले आहे.** पेरणी ते कापणीच्या कामांचा समावेश करण्याबाबतची मागणी वारंवार होत असल्याने सदरची कामे मनरेगा/रोहयो अंतर्गत अनुज्ञेय करण्यास

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १९१८

---

**सर्वश्री. राजकुमार पटेल व ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १९१८ पुढीलप्रमाणे आहे :-**

**"देशात आतापर्यंत ३ लाखांच्यावर शेतक-यांच्या आत्महत्या होणे, त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील आत्महत्यांची संख्या सर्वाधिक असणे, शासनाने कर्जमाफी करुनसुध्दा शेतकरी आत्महत्या कमी न होता अधिक प्रमाणात वाढणे, शेतीमालाच्या भावाची घसरण होणे, त्यासाठी उपाययोजना म्हणून पेरणी ते कापणी पर्यंतची कामे MREGS किंवा रोहयो मधुन करण्याची गरज असणे, फळबाग लागवडीसाठी MREGS मधून ३ वर्षाच्या योजनेमध्ये वाढ संगोपनासाठी अधिक ५ वर्षे MREGS मधून योजना राबविण्याची गरज असणे, तसेच मेळघाट, धारणी, चिखलदरा सर्वाधिक कुपोषण सारख्या आदिवासी बहुल क्षेत्रात मजूरांचे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी MREGS मधून किमान ८ महिने सर्व मजुरांना शासनाच्या उपायोजना कमी पडणे, MREGS योजनेचा अधिक वापर होण्यासाठी काही अटी व शर्ती कमी करण्याची गरज असणे, तसेच MREGS मधील किंवा शेतमजुराचा अपघात झाल्यास स्व. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेच्या धर्तीवर मदतीची गरज असणे, MREGS मजुरांना बांधकाम मंडळात समाविष्ट केल्याप्रमाणे शेतमजुरांनासुध्दा बांधकाम मंडळात समाविष्ट करण्याची सातत्याने होत असलेली मागणी व MREGS मजुरांना वेळेवर मजुरी मिळणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

**मा. मंत्री (रोजगार हमी) यांचे निवेदन**

❖ महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांच्या दि. १९/१२/२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नापिकी, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्यामूळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा हे ३ निकष आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तातडीची मदत देण्याकरिता ठरविण्यात आले आहेत.

दिनांक ०१ जानेवारी, २०२४ ते ३१ मे, २०२४ या (५ महिने) कालावधीत एकूण १,०४६ शेतकऱ्यांची आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली आहेत. त्यापैकी ३५८ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे जिल्हास्तरीय समितीने शिफारस केली असून १४२ प्रकरणांची शिफारस करण्यात आलेली नाहीत. ५४६ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असून शिफारस केलेल्या १७४ प्रकरणी शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ नुसार प्रत्येकी रू.१.०० लक्ष मदत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना देण्यात आलेली आहे. तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही जिल्हास्तरीय समितीमार्फत सुरू आहेत. कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना यांच्या अंमलबजावणीला गती देण्यात येत आहे.

शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आली आहे. दि.२३/०६/२०२३ च्या

परवानगी देणेबाबत दिनांक २२ मार्च, २०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली होती. तथापि सदरची कामे मनरेगा / रोहयो अंतर्गत करता येणार नसल्याबाबत केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये पुनश्च: विनंती केंद्र शासनास करण्यात आली असून याबाबत केंद्र शासनाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत.

दिनांक ३०/०३/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात मग्रारोहयोअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमीनीवर अमृत महोत्सवी फळझाड/ वृक्ष लागवड व फुलपिक लागवड कार्यक्रम राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या सन २०२४-२५ च्या मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र.७.६.५ नुसार सदर कार्यक्रमांतर्गत फळबाग लागवडीचे आर्थिक मापदंड ५ वर्ष करण्यासंदर्भात प्रस्ताव विचाराधीन आहे.

मनरेगाअंतर्गत ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार पुरविण्याबरोबरच त्यांना शाश्वत स्वरूपात टिकाऊ मत्ता लाभुन त्यांचा व पर्यायाने स्थानिक भागाचा विकास व कायापालट हे उद्दिष्ट आहे.अमरावती जिल्ह्यातील मेळघाट यांसारख्या दुर्गम/पाडे भागातील लोकांना मागणीप्रमाणे मनरेगाची कामे गरजूंना सातत्याने उपलब्ध करून देण्यासाठी व आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरावर दर ३ महिन्यात ून बैठक घेण्यात येतात. स्थानिक व्यक्ती इतरत्र अधिक मजुरीसाठी विटाभट्टी, कंत्राटी कामावर जात असतात ते न जाण्यासाठी स्थानिक प्रशासनामार्फत योजनेच्या लोकाभिमुख उपक्रमांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सक्रिय प्रयत्न करण्यात येत आहेत.

मनरेगा योजनेअंतर्गत काम करत असताना एखाद्या मजुरास कायमचे अपंगत्व आल्यास किंवा त्याचा मृत्यु झाल्यास प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत कायमचे अपंगत्व आणि मृत्यु याकरिता सरंक्षित रक्कमे इतके सानुग्रह अनुदान मजुरांना केंद्र शासनाच्या सन २०२४-२५ या वर्षाच्या मस्टर सर्क्युलर अन्वये अनुज्ञेय करण्यात आले आहे.

❖ इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ च्या कलम ११ अन्वये नोंदीत बांधकाम कामगार हे मंडळाअंतर्गत जमा होणाऱ्या उपकर निधीचे लाभार्थी आहेत, त्यामुळे शेतमजुरांना बांधकाम मंडळात समाविष्ट करता येणार नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय रिट पिटीशन नं. W.P. (C) ३१८/२०१६ Contempt Petition नं. ५२ of २०१३ प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत. c) **The funds available with welfare boards which have not been disbursed or are not likely to be disbursed with in short period should be properly invested with the nationalised banks only. Funds available with the welfare boards shall not be utilised by the state for any other head of expenditure of the State Government.** त्यामुळे बांधकाम कामगारांव्यतिरीक्त इतर कामगारांचा लाभार्थी म्हणून मंडळात समावेश करणे शक्य नाही.

❖ मनरेगा अंतर्गत मजूरांना वेळेवर मजूरी मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्यात काम करणाऱ्या कुटुंबाची मजूरी केंद्र शासनाच्या N-efms प्रणालीद्वारे मजूरांच्या खात्यात थेट जमा करण्यात येते.

*******

# महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२४ चे तृतीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ९३

डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.संजय पोतनीस, श्री.भास्कर जाधव, श्रीमती अश्विनी जगताप, श्री.रोहित पवार, श्री.मानसिंग नाईक, श्री.जयंत पाटील, श्री.संग्राम थोपटे, श्री.अमित झनक, श्री. संजय जगताप,ॲड.राहूल कुल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९३ पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे जिल्हयातील हिंजवडी येथील राजीव गांधी इन्फोटेक पार्क या माहिती -तंत्रज्ञान (आयटी) पार्कमधील पायाभूत सुविधांची स्थीती दिवसेंदिवस दयनीय होत असल्याची गंभीर बाब मे,२०२४ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास येणे, याठिकाणच्या रस्ते,पाणी,कचरा आणि वीज यासारख्या पायाभूत सुविधा अपुऱ्या पडत असणे, परिसरातील वाहतुक कोंडीमुळे अर्ध्या तासाच्या प्रवासासाठी दीड ते दोन तास लागत असणे, पायाभूत सोयीसुविधांअभावी येथील उद्योजकांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत असणे, हिंजवडी येथील प्रतिकुल परिस्थीतीमुळे मागील काळात आतापर्यंत ३७ कंपन्यांनी स्थलांतर केले असल्याची माहिती दि. ३० मे,२०२४ रोजी उघडकीस आलेली असणे, त्यामुळे हजारो युवकांना बेरोजगार व्हावे लागलेले असणे, पायाभूत सोयीसुविधांच्या अभावामुळे हिंजवडीबरोबरच राज्यातीलही अनेक उद्योग परराज्यात गेलेले असून अद्यापही स्थलांतर सुरुच असणे, उद्योगांचे स्थलांतर थांबविण्यास प्रशासनाला अपयश येत असल्याने सदर गंभीर लवकरात लवकर कार्यवाही करण्याची स्थानिक लोकप्रतिनीधी सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा. उद्योगमंत्री यांचेकडे दि.३१ मे,२०२४ तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, हिंजवडी तसेच राज्यातील उद्योगांचे स्थलांतर रोखण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करण्यासंदर्भात युध्दस्तरावर त्वरेने कार्यवाही करणे नितांत गरजेचे असणे, सदर चिंताजनक तथा गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. १, २, ३ व ४ (हिंजवडी माण) औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यात आलेल्या भूखंडांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे .

| अ. क्र. | औद्योगिक क्षेत्राचे नाव | संपादित जमीन (हे.आर) | अधिसुचित वर्ष | स्थापना वर्ष (ताबा) | पाडण्यात आलेले भूखंड | वाटप केलेले भूखंड | वाटपास उपलब्ध भूखंड | रोजगार निर्मिती | महत्त्वाचे उद्योग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान टप्पा क्र. १ | ९६.४२ | १९९८/ २००१ | १९९८/ २००१ | ४० | ४० | ० | ५२१९० | १) मे. इन्फोसिस लि.<br>२)मे. टाटा टेक्नॉलॉजिस् लि.<br>३) मे. विप्रो लि.<br>४) मे. केपीआयटी टेक्नॉलॉजिस् लि.<br>५) मे. बिर्ला सॉफ्ट. |

| अ. क्र. | औद्योगिक क्षेत्राचे नाव | संपादित जमीन (हे.आर) | अधिसुचित वर्ष | स्थापना वर्ष (ताबा) | पाडण्यात आलेले भूखंड | वाटप केलेले भूखंड | वाटपास उपलब्ध भूखंड | रोजगार निर्मिती | महत्त्वाचे उद्योग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान टप्पा क्र. २ | २३६.२३ | १९९९ | २००१ | ५३ | ५३ | ० | ८८७७८ | १) मे. इन्फोसिस लि. २) मे. इन्वॉसेय पुणे टेक्झोन प्रा.लि. ३) मे. विप्रो लि. ४)मे. एमक्योर फार्मा. |
| ३. | राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान टप्पा क्र. ३ | ३५१.१७ | २००१ | २००५ | ५३ | ४७ | ६ | ७६४४४ | १) मे. कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स. २) मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिस लि. ३) मे. टेक महिंद्रा लि. ४) मे. असेडन्स आयटी पार्क (पुणे) प्रा. ५)मे. टुडिप इन्फ्रा एलएलपी. ६) मे. कॅपजेमिनी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस इंडिया लि. ७) मे. केपीआयटी टेक्नॉलॉजीस् लि. |
| ४. | राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान टप्पा क्र. ४ | १६.५३ | २००४ | २०१५/ २०२० | २ | २ | ० | ० | भूखंड धारकाने अद्याप भूखंड विकसीत करण्याचे काम चालू केलेले नाही. |

सदर माहिती व तंत्रज्ञान उद्यानात मऔवि महामंडळातर्फे जलशुध्दी केंद्र, रस्ते, अंतर्गत जलवितरण वाहिन्या, पथदिवे, वाहतुक बेटे, वृक्षारोपण, विद्युत उपकेंद्र इत्यादी पायाभूत सोई सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानामध्ये माहिती तंत्रज्ञान उद्योगांसाठी एकूण १४८ भूखंड आरेखित केले असून, त्यापैकी १४२ भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. त्यामध्ये मुख्यत: इन्फोसिस, विप्रो, डेसॉल्ट, टाटा टेक्नॉलॉजीस,पर्सिस्टंट, टेक महिंद्रा,टाटा कन्सल्टन्सिस सर्व्हिसेस, कॉग्निझंट, केपजेमिनी, हेक्झावेअर, एमक्युअर फार्मास्युटिकल, वेंकटेश्वरा हॅचरीज, आय.बी.पी.एल., असेन्डस, एस.क्यु.एस. इत्यादी नामांकित माहिती तंत्रज्ञान व इतर उद्योग साधारणपणे सन २००० पासून आजपर्यंत मऔवि महामंडळाच्या हिंजवडी औद्योगिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील दैनंदिन कामकाजासाठी लाखो कर्मचारी ये-जा करीत असतात. या उद्यानामध्ये सर्व मुख्य रस्ते फुटपाथसह ६ पदरी बांधलेले आहेत. या क्षेत्रामध्ये होणाऱ्या वाहतुक कोंडीचा त्रास कमी करण्यासाठी शासनाने शिवाजीनगर (पुणे) ते हिंजवडी मेट्रो लाईन-३ या एकूण २३.३० कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचे काम हाती घेतले असून, या प्रकल्पाच्या एकूण लांबीपैकी ८.०० कि.मी. लांबीचा भाग हिंजवडी माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील मुख्य रस्त्यावरुन मे,२०२१ पासून सुरु आहे. या प्रकल्पाचे काम मुख्य रस्त्याच्या मधील दोन मधून चालू असून त्यामुळे वाहतुक कोंडीचा त्रास सकाळी व संध्याकाळी होतो. सदर मेट्रो

| अ. क्र. | औद्योगिक क्षेत्राचे नाव | संपादित जमीन (हे.आर) | अधिसुचित वर्ष | स्थापना वर्ष (ताबा) | पाडण्यात आलेले भूखंड | वाटप केलेले भूखंड | वाटपास उपलब्ध भूखंड | रोजगार निर्मिती | महत्त्वाचे उद्योग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान टप्पा क्र. २ | २३६.२३ | १९९९ | २००१ | ५३ | ५३ | ० | ८८७७८ | १) मे. इन्फोसिस लि. २) मे. इन्बॉसेय पुणे टेक्झोन प्रा.लि. ३) मे. विप्रो लि. ४)मे. एमक्योर फार्मा. |
| ३. | राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान टप्पा क्र. ३ | ३५१.१७ | २००१ | २००५ | ५३ | ४७ | ६ | ७६४४४ | १) मे. कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स. २) मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिस लि. ३) मे. टेक महिंद्रा लि. ४) मे. असेडन्स आयटी पार्क (पुणे) प्रा. ५)मे. टुडिप इन्फ्रा एलएलपी. ६) मे. कॅपजेमिनी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस इंडिया लि. ७) मे. केपीआयटी टेक्नॉलॉजीस् लि. |
| ४. | राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान टप्पा क्र. ४ | १६.५३ | २००४ | २०१५/ २०२० | २ | २ | ० | ० | भूखंड धारकाने अद्याप भूखंड विकसीत करण्याचे काम चालू केलेले नाही. |

सदर माहिती व तंत्रज्ञान उद्यानात मऔवि महामंडळातर्फे जलशुध्दी केंद्र, रस्ते, अंतर्गत जलवितरण वाहिन्या, पथदिवे, वाहतुक बेटे, वृक्षारोपण, विद्युत उपकेंद्र इत्यादी पायाभूत सोई सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानामध्ये माहिती तंत्रज्ञान उद्योगांसाठी एकूण १४८ भूखंड आरेखित केले असून, त्यापैकी १४२ भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. त्यामध्ये मुख्यतः इन्फोसिस, विप्रो, डेसॉल्ट, टाटा टेक्नॉलॉजीस,पर्सिस्टंट, टेक महिंद्रा,टाटा कन्सल्टन्सिस सर्व्हिसेस, कॉग्निझंट, केपजेमिनी, हेक्झावेअर, एमक्युअर फार्मास्युटिकल, वेंकटेश्वरा हॅचरीज, आय.बी.पी.एल., असेन्डस, एस.क्सु.एस. इत्यादी नामांकित माहिती तंत्रज्ञान व इतर उद्योग साधारणपणे सन २००० पासून आजपर्यंत मऔवि महामंडळाच्या हिंजवडी औद्योगिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील दैनंदिन कामकाजासाठी लाखो कर्मचारी ये-जा करीत असतात. या उद्यानामध्ये सर्व मुख्य रस्ते फुटपाथसह ६ पदरी बांधलेले आहेत. या क्षेत्रामध्ये होणाऱ्या वाहतुक कोंडीचा त्रास कमी करण्यासाठी शासनाने शिवाजीनगर (पुणे) ते हिंजवडी मेट्रो लाईन-३ या एकूण २३.३० कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचे काम हाती घेतले असून, या प्रकल्पाच्या एकूण लांबीपैकी ८.०० कि.मी. लांबीचा भाग हिंजवडी माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील मुख्य रस्त्यावरुन मे,२०२१ पासून सुरु आहे. या प्रकल्पाचे काम मुख्य रस्त्याच्या मधील दोन मधून चालू असून त्यामुळे वाहतुक कोंडीचा त्रास सकाळी व संध्याकाळी होतो. सदर मेट्रो

# महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२४ चे तृतीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ९३

डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.संजय पोतनीस, श्री.भास्कर जाधव, श्रीमती अश्विनी जगताप, श्री.रोहित पवार, श्री.मानसिंग नाईक, श्री.जयंत पाटील, श्री.संग्राम थोपटे, श्री.अमित झनक, श्री. संजय जगताप,ॲड.राहूल कुल, विधानसभा सदस्य यांनीं महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९३ पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे जिल्हयातील हिंजवडी येथील राजीव गांधी इन्फोटेक पार्क या माहिती -तंत्रज्ञान (आयटी) पार्कमधील पायाभूत सुविधांची स्थीती दिवसेंदिवस दयनीय होत असल्याची गंभीर बाब मे,२०२४ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास येणे, याठिकाणच्या रस्ते,पाणी,कचरा आणि वीज यासारख्या पायाभूत सुविधा अपुऱ्या पडत असणे, परिसरातील वाहतुक कोंडीमुळे अर्ध्या तासाच्या प्रवासासाठी दीड ते दोन तास लागत असणे, पायाभूत सोयीसुविधांअभावी येथील उद्योजकांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत असणे, हिंजवडी येथील प्रतिकुल परिस्थितीमुळे मागील काळात आतापर्यंत ३७ कंपन्यांनी स्थलांतर केले असल्याची माहिती दि. ३० मे,२०२४ रोजी उघडकीस आलेली असणे, त्यामुळे हजारो युवकांना बेरोजगार व्हावे लागलेले असणे, पायाभूत सोयीसुविधांच्या अभावामुळे हिंजवडीबरोबरच राज्यातीलही अनेक उद्योग परराज्यात गेलेले असून अद्यापही स्थलांतर सुरुच असणे, उद्योगांचे स्थलांतर थांबविण्यास प्रशासनाला अपयश येत असल्याने सदर गंभीर लवकरात लवकर कार्यवाही करण्याची स्थानिक लोकप्रतिनीधी सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा. उद्योगमंत्री यांचेकडे दि.३१ मे,२०२४ तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, हिंजवडी तसेच राज्यातील उद्योगांचे स्थलांतर रोखण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करण्यासंदर्भात युध्दस्तरावर त्वरेने कार्यवाही करणे नितांत गरजेचे असणे, सदर चिंताजनक तथा गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. १, २, ३ व ४ (हिंजवडी माण) औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यात आलेल्या भूखंडांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे .

| अ. क्र. | औद्योगिक क्षेत्राचे नाव | संपादित जमीन (हे.आर) | अधिसुचित वर्ष | स्थापना वर्ष (ताबा) | पाडण्यात आलेले भूखंड | वाटप केलेले भूखंड | वाटपास उपलब्ध भूखंड | रोजगार निर्मिती | महत्त्वाचे उद्योग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान टप्पा क्र. १ | ९६.४२ | १९९८/ २००१ | १९९८/ २००१ | ४० | ४० | ० | ५२१९० | १) मे. इन्फोसिस लि.<br>२)मे. टाटा टेक्नॉलॉजिस् लि.<br>३) मे. विप्रो लि.<br>४) मे. केपीआयटी टेक्नॉलॉजिस् लि.<br>५) मे. बिर्ला सॉफ्ट. |

प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर या माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील वाहतुक कोंडीचा त्रास मोठया प्रमाणात कमी होणार आहे.

सद्य:स्थितीत हिंजवडी औद्योगिक क्षेत्रात असलेल्या सोई-सुविधांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

१) रस्ते -२७.३९ कि.मी. २)जलवाहिनी- ३८.३९ कि.मी. ३) पथदिवे- ८५६ नग

४)सांडपाणी वाहिनी- १४.२३ कि.मी. ५) जलशुध्दीकरण केंद्र-२४ MLD ६)सांडपाणी शुध्दीकरण केंद्र- ४ MLD

हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांनी उपस्थित केलेल्या समस्यांबाबत मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) तथा पालकमंत्री, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९/०६/२०२४ रोजी मंत्रालय, मुंबई येथे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगरपालिका, पिंपरी -चिंचवड महानगरपालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हा परिषद, पुणे, सार्वजनिक बांधकाम विभाग, गृह विभाग, मऔवि महामंडळाचे संबंधित अधिकारी व हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांचे समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांनी उपस्थित केलेल्या समस्यांबाबत व हिंजवडी येथील वाहतुक कोंडी टाळण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांसोबत चर्चा केली व विभागीय आयुक्त, पुणे यांना सर्व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांसोबत प्रत्येक्ष जागेवर पाहणी करुन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

तद्नंतर दि. २३/०६/२०२४ रोजी पुणे सर्कीट हाऊस येथे मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी दि. १९/०६/२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या आदेशान्वये केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकरीता संबंधित शासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली आणि कचरा व वाहतुकी संबंधीत भेडसावणाऱ्या मुख्य समस्यांबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

| अ. क्र. | विषय | केलेली व करण्यात येत असलेली कार्यवाही |
|---|---|---|
| १ | PMRDA कडून पर्यायी रस्ता उपलब्ध होणेबाबत. | पर्यायी रस्त्याच्या अनुषंगाने व राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान मधील होणारी वाहतुक कोंडी कमी होण्याच्या दृष्टीने म.औ.वि. महामंडळाने मुंबई पुणे बेंगलोर महामार्ग पासून अंदाजे ६ कि.मी. लांबीच्या ६ पदरी रस्त्याचे काम हाती घेतले आहे.<br>या रस्त्याच्या एकूण ६.०० कि.मी. लांबीपैकी २.७५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम पुर्ण झाले असून ३.२५ कि.मी. रस्त्याचे काम भूसपांदनांअभावी अपुर्ण आहे. सदर भूसंपादन PMRDA ने त्वरीत करून मऔवि महामंडळास पुढील कार्यवाही करिता हस्तांतरीत करावे. |
| २ | हिंजवडी येथील शिवाजी चौक ते स्मशानभूमी दरम्यानच्या ९०० मी.रुंदीच्या रस्त्याचे रुंदीकरण करणे | सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना सदर रस्त्यावरील अतिक्रमणे काढुन, सहा पदरी रस्ता विकसित करणेकरीता आदेश दिले आहेत. |
| ३ | घनकचरा व्यवस्थापन | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील, विविध कंपन्यांचा तयार होणारा अघातक (Non Hazardous) कचरा संकलित करुन त्यावर प्रक्रिया करणेकरीताच्या १०.०० मेट्रीक टन प्रतिदिन क्षमतेच्या प्रकल्पाचे काम म.औ.वि. महामंडळाने हाती घेतले असून या घनकचरा प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या भूखंडाचे वाटप |

| अ. क्र. | विषय | केलेली व करण्यात येत असलेली कार्यवाही |
| --- | --- | --- |
| | | करण्यात येत आहे तसेच औद्योगिक क्षेत्रालगत असणाऱ्या ग्रामपंचायत माण, मारूंजी, हिंजवडी यांच्या निर्माण होणाऱ्या घन कचऱ्याबाबत मु.का.अ., जि.प., पुणे यांनी १०० मे.ट. क्षमतेचा घन कचरा प्रकल्प त्वरीत विकसित करण्याचे आदेश दिले आहेत. |
| ४ | लक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल बांधणे. | लक्ष्मी चौक येथे होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता उड्डाण पूल म.औ.वि.महामंडळाने विकसित करावा असे निर्देश मा. उपमुख्यमंत्री यांनी दिले. |
| ५ | मुंबई बेंगलोर महामार्गावर मर्सिडिज बेंझ शोरूम येथे अंडर पास बांधणेबाबत (माण, म्हाळुंगे हायटेक, सिटी प्रवेश) तसेच मुळा नदीवरील सेवा रस्त्यावर पुल बांधणे. | प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. |
| ६ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील टप्पा क्र १ व ३ मधील माण गावाकडे जाणाऱ्या SH-१३० रस्त्याचे रुंदीकरण करणेबाबत. | मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सदर रस्ता रुंदीकरणासहीत हिंजवडी टप्पा क्र.१ व ३ दरम्यान उड्डाण पुल स्वरुपात विकसित करावा असे आदेश दिले व यासाठी येणारा ५०% खर्चाचा हिस्सा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे त्यांचे मागणीनुसार उपलब्ध करुन द्यावा असे निर्देश दिले आहेत. |
| ७ | पर्यायी रस्त्यावरील एमआयडीसी सर्कलपासून नांदे गावाकडे जाणाऱ्या पर्यायी रस्त्याच्या कामाबाबत. | एमआयडीसी सर्कल ते नांदे पर्यंतच्या रस्त्याचे काम भुसंपादन करुन सहापदरी करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना मा.उपमुख्यमंत्री यांनी आदेश दिले आहेत. |

वरील अनुक्रमांक २,४ व ५ मध्ये नमूद अनुक्रमे, हिंजवडी येथील शिवाजी चौक ते स्मशान भूमी दरम्यानच्या ९०० मी. रस्त्याचे रुंदीकरण , लक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल बांधणे व मुंबई बेंगलोर महामार्गावर मर्सिडिज बेंझ शोरुम येथे अंडर पास बांधणे (माण, म्हाळुंगे हायटेक, सिटी प्रवेश) तसेच मुळा नदीवरील सेवा रस्त्यावर पुल बांधणे इ.कामांसाठी चालू अतिरिक्त अर्थसंकल्पीय (पावसाळी) अधिवेशनात रुपये ५२३ कोटींची पूरक मागणी मंजूर करण्यात आली आहे. याअनुषंगाने संबंधित विभागांकडून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

हिंजवडी औद्योगिक क्षेत्रात मऔवि महामंडळाकडून सर्व पायाभूत सुविधा पुरवण्यात आल्या असून इतर शासकीय विभागांकडे औद्योगिक क्षेत्राबाहेरील सेवा सुविधांसाठी मऔवि महामंडळाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

*********************

| अ. क्र. | विषय | केलेली व करण्यात येत असलेली कार्यवाही |
|---|---|---|
| | | करण्यात येत आहे तसेच औद्योगिक क्षेत्रालगत असणाऱ्या ग्रामपंचायत माण, मारूंजी, हिंजवडी यांच्या निर्माण होणाऱ्या घन कचऱ्याबाबत मु.का.अ., जि.प., पुणे यांनी १०० मे.ट. क्षमतेचा घन कचरा प्रकल्प त्वरीत विकसित करण्याचे आदेश दिले आहेत. |
| ४ | लक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल बांधणे. | लक्ष्मी चौक येथे होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता उड्डाण पूल म.औ.वि.महामंडळाने विकसित करावा असे निर्देश मा. उपमुख्यमंत्री यांनी दिले. |
| ५ | मुंबई बेंगलोर महामार्गावर मर्सिडिज बेंझ शोरुम येथे अंडर पास बांधणेबाबत (माण, म्हाळुंगे हायटेक, सिटी प्रवेश) तसेच मुळा नदीवरील सेवा रस्त्यावर पुल बांधणे. | प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. |
| ६ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील टप्पा क्र १ व ३ मधील माण गावाकडे जाणाऱ्या SH-१३० रस्त्याचे रुंदीकरण करणेबाबत. | मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सदर रस्ता रुंदीकरणासहीत हिंजवडी टप्पा क्र.१ व ३ दरम्यान उड्डाण पुल स्वरुपात विकसित करावा असे आदेश दिले व यासाठी येणारा ५०% खर्चाचा हिस्सा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे त्यांचे मागणीनुसार उपलब्ध करुन द्यावा असे निर्देश दिले आहेत. |
| ७ | पर्यायी रस्त्यावरील एमआयडीसी सर्कलपासून नांदे गावाकडे जाणाऱ्या पर्यायी रस्त्याच्या कामाबाबत. | एमआयडीसी सर्कल ते नांदे पर्यंतच्या रस्त्याचे काम भुसंपादन करुन सहापदरी करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना मा.उपमुख्यमंत्री यांनी आदेश दिले आहेत. |

वरील अनुक्रमांक २,४ व ५ मध्ये नमूद अनुक्रमे, हिंजवडी येथील शिवाजी चौक ते स्मशान भूमी दरम्यानच्या ९०० मी. रस्त्याचे रुंदीकरण , लक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल बांधणे व मुंबई बेंगलोर महामार्गावर मर्सिडिज बेंझ शोरुम येथे अंडर पास बांधणे (माण, म्हाळुंगे हायटेक, सिटी प्रवेश) तसेच मुळा नदीवरील सेवा रस्त्यावर पुल बांधणे इ.कामांसाठी चालू अतिरिक्त अर्थसंकल्पीय (पावसाळी) अधिवेशनात रुपये ५२३ कोटींची पूरक मागणी मंजूर करण्यात आली आहे. याअनुषंगाने संबंधित विभागांकडून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

हिंजवडी औद्योगिक क्षेत्रात मऔवि महामंडळाकडून सर्व पायाभूत सुविधा पुरवण्यात आल्या असून इतर शासकीय विभागांकडे औद्योगिक क्षेत्राबाहेरील सेवा सुविधांसाठी मऔवि महामंडळाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

********************

प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर या माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील वाहतुक कोंडीचा त्रास मोठया प्रमाणात कमी होणार आहे.

सद्य:स्थितीत हिंजवडी औद्योगिक क्षेत्रात असलेल्या सोई-सुविधांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

१) रस्ते -२७.३९ कि.मी. २)जलवाहिनी- ३८.३९ कि.मी. ३) पथदिवे- ८५६ नग

४)सांडपाणी वाहिनी- १४.२३ कि.मी. ५) जलशुध्दीकरण केंद्र-२४ MLD ६)सांडपाणी शुध्दीकरण केंद्र- ४ MLD

हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांनी उपस्थित केलेल्या समस्यांबाबत मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) तथा पालकमंत्री, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९/०६/२०२४ रोजी मंत्रालय, मुंबई येथे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगरपालिका, पिंपरी -चिंचवड महानगरपालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हा परिषद, पुणे, सार्वजनिक बांधकाम विभाग, गृह विभाग, मऔवि महामंडळाचे संबंधित अधिकारी व हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांचे समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांनी उपस्थित केलेल्या समस्यांबाबत व हिंजवडी येथील वाहतुक कोंडी टाळण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांसोबत चर्चा केली व विभागीय आयुक्त, पुणे यांना सर्व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांसोबत प्रत्येक्ष जागेवर पाहणी करुन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

तद्नंतर दि. २३/०६/२०२४ रोजी पुणे सर्कीट हाऊस येथे मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी दि. १९/०६/२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या आदेशान्वये केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकरीता संबंधित शासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली आणि कचरा व वाहतुकी संबंधीत भेडसावणाऱ्या मुख्य समस्यांबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

| अ. क्र. | विषय | केलेली व करण्यात येत असलेली कार्यवाही |
|---|---|---|
| १ | PMRDA कडून पर्यायी रस्ता उपलब्ध होणेबाबत. | पर्यायी रस्त्याच्या अनुषंगाने व राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान मधील होणारी वाहतुक कोंडी कमी होण्याच्या दृष्टीने म.औ.वि. महामंडळाने मुंबई पुणे बेंगलोर महामार्ग पासून अंदाजे ६ कि.मी. लांबीच्या ६ पदरी रस्त्याचे काम हाती घेतले आहे.<br>या रस्त्याच्या एकूण ६.०० कि.मी. लांबीपैकी २.७५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम पुर्ण झाले असून ३.२५ कि.मी. रस्त्याचे काम भूसपांदनांअभावी अपुर्ण आहे. सदर भूसंपादन PMRDA ने त्वरीत करून मऔवि महामंडळास पुढील कार्यवाही करिता हस्तांतरीत करावे. |
| २ | हिंजवडी येथील शिवाजी चौक ते स्मशानभूमी दरम्यानच्या ९०० मी.रुंदीच्या रस्त्याचे रुंदीकरण करणे | सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना सदर रस्त्यावरील अतिक्रमणे काढुन, सहा पदरी रस्ता विकसित करणेकरीता आदेश दिले आहेत. |
| ३ | घनकचरा व्यवस्थापन | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील, विविध कंपन्यांचा तयार होणारा अघातक (Non Hazardous) कचरा संकलित करुन त्यावर प्रक्रिया करणेकरीताच्या १०.०० मेट्रीक टन प्रतिदिन क्षमतेच्या प्रकल्पाचे काम म.औ.वि. महामंडळाने हाती घेतले असून या घनकचरा प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या भूखंडाचे वाटप |

सन- २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्र. १९४८

श्री. राजेश रघुनाथ पाटील, श्री.हितेंद्र ठाकूर, श्री.क्षितीज ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९४८ पुढीलप्रमाणे आहे:-

" पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक विकास महामंडळाची ५० वर्षापूर्वी स्थापना होऊन या क्षेत्रात १४०० पेक्षा जास्त कारखाने असणे, त्यापैकी ६०० पेक्षा जास्त अतिधोकादायक रासायनिक कारखाने असणे, केंद्र शासनाच्या २०१६ च्या, घनकचरा कायद्यानुसार एमआयडीसीला एकुण क्षेत्रफळाच्या ५% अथवा ५ भुखंड घनकचऱ्यासाठी राखून ठेवणे आणि कचऱ्यावर पुर्नप्रक्रिया केंद्र उभारणे बंधनकारक असूनही त्याबाबत कोणतीही उपाययोजना केलेली नसणे, एमआयडीसीकडे आजपावेतो १० कोटींचा निधी ग्रामपंचायतीच्या महसुलामधून जमा होणे, याबाबतीत लोकायुक्तांनकडे ८ मार्च २०२३ रोजी तक्रार दाखल केलेली असणे, २८ ऑक्टोबर, २०२३ रोजी लोकायुक्तांकडे झालेल्या प्रथम सुनावणीमध्ये त्वरेने भुखंड उपलब्ध करून देऊन तिथे घनकचरा प्रकल्प उभारण्याचे दिलेले आदेश, तारापूर येथे होत असलेल्यां प्रचंड प्रदुषणाचे नियंत्रण करण्यात एमआयडीसीला आलेले अपयश, उक्त प्रकरणी एमआयडीसीने पर्यावरण कायद्याचे उल्लंघन करून स्वच्छ भारत अभियानालाही हरताळ फासण्याचे उघड झालेले स्वरूप, या कचऱ्याच्या समस्येमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, जागोजागी कच-याचे ढिग साठल्याने मोकाट जनावरांचा वावर वाढणे, कचऱ्यामुळे नाले, गटारे तुंबलेली असणे, परिणामी परिसरात दुर्गंधी पसरणे, यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, घातक कचऱ्याची वाल्हेवाट लावण्याची कसलीही यंत्रणा एमआयडीसीकडे नसणे, त्या मुळे राज्य शासनाने यासंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

### मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

म.औ.वि.महामंडळाने पश्चिम रेल्वे मार्गावरील बोईसर गावाजवळ ११३० हे. क्षेत्रामध्ये तारापूर औद्योगिक क्षेत्र सन १९७२ साली विकसित केले आहे. सदर औद्योगिक क्षेत्र मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून रस्त्याच्या मार्गाने अंदाजे १०५ कि.मी. अंतरावर आहे व मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पासून १६.५० कि.मी. अंतरावर आहे.

म. औ. वि. महामंडळाने तारापूर औद्योगिक क्षेत्रात सर्व प्रकारच्या मुलभूत सुविधा जसे पाणी पुरवठा योजना, भूमिगत जलनि:सारण योजना, डांबरीकरण केलेले रस्ते, पथदिवे, सामायिक सुविधा केंद्र, अग्निशमन केंद्र इत्यादि सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. मऔवि महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे औद्योगिक क्षेत्राचे नियोजन करताना १० टक्के मोकळी जागा व ५ टक्के सुविधा (Amenity) साठी जसे पाणीपुरवठा योजना, सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र, औद्योगिक सांडपाणी एकत्रिकरण व निस्सारण यंत्रणा, विद्युत उपकेंद्र, शासकीय कार्यालये, भारतीय डाक विभाग, बँक इ. साठी राखीव व उर्वरीत जागेवर औद्योगिक भूखंड आरेखित केले जातात.

शासन आदेश व्हीपीएम-२०१६ /प्र.क्र.१८९ /पंरा-४ दिनांक ११/०९/२०१९ मधील मुद्दा क्र.१२ प्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्वत:कडे ठेवलेल्या ५० टक्के रकमेचा विनियोग हा या कर वसुलीकरिता येणारा प्रशासकिय खर्च आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील कलम ४५ मध्ये उल्लेख केलेल्या अनुसुची १ मधील ग्रामसुची मध्ये नमुद विषयापैकी अ.क्र. २९, ३१, ३२, ३९, ४०, ४१, ४५, ५२, ५३ मधील विषयांबाबत कार्यवाही करण्यासाठी करावयाचा आहे.त्यानुषंगाने मऔवि महामंडळाची त्यांच्या क्षेत्रात सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा जसे की रस्ते, दिवाबत्ती, कचरा / घनकचरा व्यवस्थापन,

गटारे, पाणीपुरवठा, अग्निशमन सेवा (उपलब्धतेनुसार) इत्यादी पुरवण्याची सर्वस्वी जबाबदारी आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार तारापूर औद्योगिक क्षेत्रातील ग्रामपंचायत हद्दीतील मऔवि महामंडळाच्या क्षेत्रातील जमीन, इमारती मालमत्ता यांवरील मालमत्ता कर वसुली ग्रामपंचायतीच्या वतीने मऔवि महामंडळाकडून वसुल करण्यात येत असून ग्रामपंचायतीच्या वतीने वसुल केलेल्या करापोटी मिळणारी ५० टक्के रक्कम संबंधित ग्रामपंचायतीला अदा करण्यात येत आहे. मऔवि महामंडळाने सप्टेंबर २०२० ते मार्च २०२३ अखेर महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील ग्रामपंचायतीकडून रु. १५,३३,२३,८०९/- इतका मालमत्ता कर गोळा केला असून रु. ७,११,३१,११७/- इतका मालमत्ता कर ग्रामपंचायतींची निव्वळ पाणी देयकाची रक्कम रु. ७७,७४,९४५/- वळती करुन देण्यात आला आहे.

तारापूर औद्योगिक क्षेत्रालगतच्या व आजूबाजूच्या ग्रामपंचायतीच्या परिसरात औद्योगिकरणामुळे लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली असून, निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यांचे ग्रामपंचायतीद्वारे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट न लावता औद्योगिक क्षेत्रातील विविध खुल्या जागेमध्ये व रस्त्यालगत विल्हेवाट करण्यात येते. मऔवि महामंडळाने औद्योगिक क्षेत्रालगतच्या ग्रामपंचायतीमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेकामी तारापूर औद्योगिक क्षेत्रातील खुली जागा क्र.१४ क्षेत्र ३६१२ चौ.मी., खुली जागा क्र. ६२ क्षेत्र ५९६९ चौ.मी., खुली जागा क्र.८९ क्षेत्र ४००० चौ.मी., खुली जागा क्र.२४ क्षेत्र २२७५९ चौ.मी. या खुल्या जागांमधून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरिता सीटीझन फोरम तारापूर यांनी त्यांचे पत्र दि.०१/१२/२०२२ अन्वये किमान १०००० चौ.मी. जागा घनकचरा प्रकल्पाकरिता वाटप करणेबाबत केलेली विनंती व मा. लोकआयुक्त यांचेकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महामंडळाच्या नियोजन विभागाने छाननी केली असता असे दिसून येते की तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये खुल्या जागांचे प्रमाण १०% असुन औद्योगिक भूखंड अथवा सुविधा (Amenity) भूखंड STP/घनकचरा व्यवस्थापन करीता उपलब्ध नाही तसेच खुल्या जागेचे रुपांतरण करावयाचे झाल्यास खुल्या जागेसाठी पर्यायी क्षेत्र देखील उपलब्ध नाही. महामंडळाच्या खुल्या जागा हया नियमानुसार १० टक्के मोकळी जागा रांखीव (Open Space) या सदराखाली येत असल्याने सदर खुल्या जागेचे वाटप घन कचरा व्यवस्थापनाकरिता बांधकाम नियंत्रण नियमावली २०२३ नुसार करता येत नाही.

सबब, या प्रकरणाची वस्तुस्थिती मा. लोकआयुक्त यांना दि.०९/०५/२०२४ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मऔवि महामंडळामार्फत कळविण्यात आली. यावर मा. लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली एसआयटी (S.I.T.) कमिटीची स्थापना करून सदर कमिटीने तारापूर औद्योगिक क्षेत्र व त्या अंतर्गत येणाऱ्या सरावली, खैरापाडा, कोलवडे, कुंभवली, पाम, टेंभी, सालवड इ. ग्रामपंचायतींमधील घनकचरा व्यवस्थापनाकरिता जागा निश्चित करून पुढील सुनावणी दि.२०/०९/२०२४ पुर्वी न चुकता सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने दि.२८/०६/२०२४ जिल्हाधिकारी, पालघर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर, प्रादेशिक अधिकारी मऔविम, ठाणे-१, कार्यकारी अभियंता, मऔविम, ठाणे-१, अध्यक्ष, सिटिझन फोरम बोईसर, तारापूर औद्योगिक संघटनेचे प्रतिनिधी (TIMA), ग्रामपंचायतीचे लोकप्रतिनिधी इ. सोबत घनकचरा प्रकल्पाकरिता संपादित करण्या योग्य संभाव्य खाजगी जागा तसेच महामंडळाच्या खुली जागा क्र. २४ क्षेत्र २२७५९ चौ.मी., खुली जागा क्र.१४ क्षेत्र ३६१२ चौ.मी., खुली जागा क्र. ६२ क्षेत्र ५९६९ चौ.मी. व खुली जागा क्र.८९ क्षेत्र ४००० चौ.मी. ची पाहणी केली. सदर कमिटीचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने मऔवि महामंडळास शासन निर्णय क्र. पर्या /१०९६/सी.आर-९/टी.सी-२१ दि. १२/०३/९७ तसेच घातक घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी)

गटारे, पाणीपुरवठा, अग्निशमन सेवा (उपलब्धतेनुसार) इत्यादी पुरवण्याची सर्वस्वी जबाबदारी आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार तारापूर औद्योगिक क्षेत्रातील ग्रामपंचायत हद्दीतील मऔवि महामंडळाच्या क्षेत्रातील जमीन, इमारती मालमत्ता यांवरील मालमत्ता कर वसुली ग्रामपंचायतीच्या वतीने मऔवि महामंडळाकडून वसुल करण्यात येत असून ग्रामपंचायतीच्या वतीने वसुल केलेल्या करापोटी मिळणारी ५० टक्के रक्कम संबंधित ग्रामपंचायतीला अदा करण्यात येत आहे. मऔवि महामंडळाने सप्टेंबर २०२० ते मार्च २०२३ अखेर महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील ग्रामपंचायतीकडून रु. १५,३३,२३,८०९/- इतका मालमत्ता कर गोळा केला असून रु. ७,११,३१,११७/- इतका मालमत्ता कर ग्रामपंचायतींची निव्वळ पाणी देयकाची रक्कम रु. ७७,७४,९४५/- वळती करुन देण्यात आला आहे.

तारापूर औद्योगिक क्षेत्रालगतच्या व आजूबाजूच्या ग्रामपंचायतीच्या परिसरात औद्योगिकरणामुळे लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली असून, निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यांचे ग्रामपंचायतीद्वारे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट न लावता औद्योगिक क्षेत्रातील विविध खुल्या जागेमध्ये व रस्त्यालगत विल्हेवाट करण्यात येते. मऔवि महामंडळाने औद्योगिक क्षेत्रालगतच्या ग्रामपंचायतीमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेकामी तारापूर औद्योगिक क्षेत्रातील खुली जागा क्र.१४ क्षेत्र ३६१२ चौ.मी., खुली जागा क्र. ६२ क्षेत्र ५९६९ चौ.मी., खुली जागा क्र.८९ क्षेत्र ४००० चौ.मी., खुली जागा क्र.२४ क्षेत्र २२७५९ चौ.मी. या खुल्या जागांमधून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरिता सीटीझन फोरम तारापूर यांनी त्यांचे पत्र दि.०१/१२/२०२२ अन्वये किमान १०००० चौ.मी. जागा घनकचरा प्रकल्पाकरिता वाटप करणेबाबत केलेली विनंती व मा. लोकआयुक्त यांचेकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महामंडळाच्या नियोजन विभागाने छाननी केली असता असे दिसून येते की तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये खुल्या जागांचे प्रमाण १०% असुन औद्योगिक भूखंड अथवा सुविधा (Amenity) भूखंड STP/घनकचरा व्यवस्थापन करीता उपलब्ध नाही तसेच खुल्या जागेचे रुपांतरण करावयाचे झाल्यास खुल्या जागेसाठी पर्यायी क्षेत्र देखील उपलब्ध नाही. महामंडळाच्या खुल्या जागा हया नियमानुसार १० टक्के मोकळी जागा राखीव (Open Space) या सदराखाली येत असल्याने सदर खुल्या जागेचे वाटप घन कचरा व्यवस्थापनाकरिता बांधकाम नियंत्रण नियमावली २०२३ नुसार करता येत नाही.

सबब, या प्रकरणाची वस्तुस्थिती मा. लोकआयुक्त यांना दि.०९/०५/२०२४ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मऔवि महामंडळामार्फत कळविण्यात आली. यावर मा. लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली एसआयटी (S.I.T.) कमिटीची स्थापना करून सदर कमिटीने तारापूर औद्योगिक क्षेत्र व त्या अंतर्गत येणाऱ्या सरावली, खैरापाडा, कोलवडे, कुंभवली, पाम, टेंभी, सालवड इ. ग्रामपंचायतींमधील घनकचरा व्यवस्थापनाकरिता जागा निश्चित करून पुढील सुनावणी दि.२०/०९/२०२४ पुर्वी न चुकता सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने दि.२८/०६/२०२४ जिल्हाधिकारी, पालघर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर, प्रादेशिक अधिकारी मऔविम, ठाणे-१, कार्यकारी अभियंता, मऔविम, ठाणे-१, अध्यक्ष, सिटिझन फोरम बोईसर, तारापूर औद्योगिक संघटनेचे प्रतिनिधी (TIMA), ग्रामपंचायतीचे लोकप्रतिनिधी इ. सोबत घनकचरा प्रकल्पाकरिता संपादित करण्या योग्य संभाव्य खाजगी जागा तसेच महामंडळाच्या खुली जागा क्र. २४ क्षेत्र २२७५९ चौ.मी., खुली जागा क्र.१४ क्षेत्र ३६१२ चौ.मी., खुली जागा क्र. ६२ क्षेत्र ५९६९ चौ.मी. व खुली जागा क्र.८९ क्षेत्र ४००० चौ.मी. ची पाहणी केली. सदर कमिटीचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने मऔवि महामंडळास शासन निर्णय क्र. पर्या /१०९६/सी.आर-९/टी.सी-२१ दि. १२/०३/९७ तसेच घातक घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी)

## लक्षवेधी सूचना क्र. १९४८

श्री. राजेश रघुनाथ पाटील, श्री.हितेंद्र ठाकूर, श्री.क्षितीज ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९४८ पुढीलप्रमाणे आहे:-

" पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक विकास महामंडळाची ५० वर्षापूर्वी स्थापना होऊन या क्षेत्रात १४०० पेक्षा जास्त कारखाने असणे, त्यापैकी ६०० पेक्षा जास्त अतिधोकादायक रासायनिक कारखाने असणे, केंद्र शासनाच्या २०१६ च्या, घनकचरा कायद्यानुसार एमआयडीसीला एकुण क्षेत्रफळाच्या ५% अथवा ५ भुखंड घनकचऱ्यासाठी राखून ठेवणे आणि कचऱ्यावर पुर्नप्रक्रिया केंद्र उभारणे बंधनकारक असूनही त्याबाबत कोणतीही उपाययोजना केलेली नसणे, एमआयडीसीकडे आजपावेतो १० कोटींचा निधी ग्रामपंचायतीच्या महसुलामधून जमा होणे, याबाबतीत लोकायुक्तांनकडे ८ मार्च २०२३ रोजी तक्रार दाखल केलेली असणे, २८ ऑक्टोबर, २०२३ रोजी लोकायुक्तांकडे झालेल्या प्रथम सुनावणीमध्ये त्वरेने भुखंड उपलब्ध करून देऊन तिथे घनकचरा प्रकल्प उभारण्याचे दिलेले आदेश, तारापूर येथे होत असलेल्यां प्रचंड प्रदुषणाचे नियंत्रण करण्यात एमआयडीसीला आलेले अपयश, उक्त प्रकरणी एमआयडीसीने पर्यावरण कायद्याचे उल्लंघन करून स्वच्छ भारत अभियानालाही हरताळ फासण्याचे उघड झालेले स्वरूप, या कचऱ्याच्या समस्येमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, जागोजागी कच-याचे ढिग साठल्याने मोकाट जनावरांचा वावर वाढणे, कचऱ्यामुळे नाले, गटारे तुंबलेली असणे, परिणामी परिसरात दुर्गंधी पसरणे, यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, घातक कचऱ्याची वाल्हेवाट लावण्याची कसलीही यंत्रणा एमआयडीसीकडे नसणे, त्या मुळे राज्य शासनाने यासंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

### मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

म.औ.वि.महामंडळाने पश्चिम रेल्वे मार्गावरील बोईसर गावाजवळ ११३० हे. क्षेत्रामध्ये तारापूर औद्योगिक क्षेत्र सन १९७२ साली विकसित केले आहे. सदर औद्योगिक क्षेत्र मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून रस्त्याच्या मार्गाने अंदाजे १०५ कि.मी. अंतरावर आहे व मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ पासून १६.५० कि.मी. अंतरावर आहे.

म. औ. वि. महामंडळाने तारापूर औद्योगिक क्षेत्रात सर्व प्रकारच्या मुलभूत सुविधा जसे पाणी पुरवठा योजना, भूमिगत जलनि:सारण योजना, डांबरीकरण केलेले रस्ते, पथदिवे, सामायिक सुविधा केंद्र, अग्निशमन केंद्र इत्यादि सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. मऔवि महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे औद्योगिक क्षेत्राचे नियोजन करताना १० टक्के मोकळी जागा व ५ टक्के सुविधा (Amenity) साठी जसे पाणीपुरवठा योजना, सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र, औद्योगिक सांडपाणी एकत्रिकरण व निस्सारण यंत्रणा, विद्युत उपकेंद्र, शासकीय कार्यालये, भारतीय डाक विभाग, बँक इ. साठी राखीव व उर्वरीत जागेवर औद्योगिक भूखंड आरेखित केले जातात.

शासन आदेश व्हीपीएम-२०१६ /प्र.क्र.१८९ /पंरा-४ दिनांक ११/०९/२०१९ मधील मुद्दा क्र.१२ प्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्वत:कडे ठेवलेल्या ५० टक्के रकमेचा विनियोग हा या कर वसुलीकरिता येणारा प्रशासकिय खर्च आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील कलम ४५ मध्ये उल्लेख केलेल्या अनुसुची १ मधील ग्रामसुची मध्ये नमुद विषयापैकी अ.क्र. २९, ३१, ३२, ३९, ४०, ४१, ४५, ५२, ५३ मधील विषयांबाबत कार्यवाही करण्यासाठी करावयाचा आहे.त्यानुषंगाने मऔवि महामंडळाची त्यांच्या क्षेत्रात सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा जसे की रस्ते, दिवाबत्ती, कचरा / घनकचरा व्यवस्थापन,

नियम १९८९ नियम क्र. ८(१) सी व (३) या नियमातंर्गत धोकादायक टाकाऊ पदार्थ व्यवस्थापनासाठी उपयुक्त अशा जागा निवडणे व प्रकल्प उभारणे यासाठी नोडल एजन्सी म्हणून मान्यता दिलेली आहे. पर्यावरण विभागाच्या दिनांक १२/०३/९७ च्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणी नुसार मऔवि महामंडळाने सर्व समावेशक धोकादायक टाकाऊ पदार्थ व्यवस्थापन सुविधा प्रकल्प तळोजा, ठाणे बेलापूर (TTC), रांजणगाव (पुणे) व बुटीबोरी (नागपूर) येथे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर उभारले आहेत. तारापूर येथील रासायनिक कारखान्यांच्या उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या धोकादायक टाकाऊ पदार्थांवर पुढील शास्त्रीय प्रक्रिया व विल्हेवाट तळोजा येथील सर्व समावेशक धोकादायक टाकाऊ पदार्थ व्यवस्थापन सुविधा प्रकल्पामार्फत करणे उद्योजकांना बंधनकारक आहे.

**********************

# महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्र.१९९०

ॲड.आशिष जयस्वाल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९९० पुढीलप्रमाणे आहे:-

"नागपूर जिल्हयातील पारशिवनी तालुक्यातील कन्हान येथील MIDC संपादित जमीनीमध्ये कोळसा निघाल्याने त्याऐवजी नवीन जागा निवडण्याचे निर्णय वर्ष २०१९ मध्ये होणे, त्यांनतर वारंवार प्रस्तावामध्ये वेगवेगळी त्रुटी काढून जागेबाबत निर्णय न होणे, मा.मंत्री (उद्योग) यांच्या दालनात व उच्चाधिकार समितीने क्षेत्रीय अधिकाऱ्यांना व्यवहारीक प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिल्यानंतरही याबाबत कार्यवाही न होणे, एकीकडे राज्याच्या उपराजधानीत उद्योग वाढीसाठी जागा उपलब्ध न होणे तर दुसरीकडे उद्योग विभागाने भूखंड विकसीत करण्याचा खर्च अवाजवी आकारणे तर भूसंपादन कायद्याच्या तरतुदीनुसार जमीनीचा मोबदला जास्त होत असल्याने नवीन औद्योगिक क्षेत्र विकसीत होण्यास अडचणी निर्माण होणे, मा.मुख्यमंत्री यांनी नागपूर येथे उद्योजकांच्या बैठकीत महिलांसाठी वेगळा औद्योगिक क्षेत्र जाहीर करण्याची घोषणा करणे, याकरिता जमीन विकासाचा खर्च आता शासनाने किंवा MIDC ने करण्याचे धोरण करण्याची आवश्यकता, नागपूर जिल्हयातील शहरापासून अतिशय जवळ उपलब्ध असलेल्या व उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त प्रस्तावित या जागेत नवीन औद्योगिक क्षेत्र करण्यास शासनाकडून होत असलेला विलंब, त्यामुळे उद्भवलेले अनेक प्रश्न, उद्योगाच्या विकासासाठी याप्रकरणी तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### मा.मंत्री (उद्योग)यांचे निवेदन

पारशिवनी तालुक्यामधील मौजे सिहोराव कन्हान (पिपरी) येथील १४१.८८ हे. आर. क्षेत्र भूसंपादन करणेबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक कार्यालय,नागपूर यांच्याकडून दि. २९/०८/२०१९ व १८/०८/२०२० मऔवि महामंडळाच्या मुख्यालयास सादर करण्यात आलाहोता.परंतू, सदर क्षेत्रासाठी येणारा भूसंपादनाचा खर्च व अभियांत्रिकी विभागाने कळविलेला विकास खर्च परिगणित केला असता, सदर क्षेत्र हे औद्योगिकदृष्टया व आर्थिकदृष्टया सुसाध्य होत नसल्याने सदर प्रस्ताव मुख्य कार्यकारीअधिकारी, मऔविम यांनी रद्द केलेला होता.

ॲड.आशिष जयस्वाल, मा.विधानसभा सदस्य,यांचे विनंतीनुसार मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५/०९/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पारशिवनी तालुक्यातील मौजे आमडी, नयाकुंड व चिंचभुवन तसेच रामटेक तालुकयातील मौजे पटगोवारी येथील एकूण ११५२.११४ हे.आर क्षेत्राचा तसेच मौजे सिहोरा व कन्हान (पिपरी)येथीलमे. नागपूरपॉवर अँड इंडस्ट्रिज लि. (मे. खंडेलवाल फेरो) यांच्या मालकीचे १४६.३४ हे.आर क्षेत्र व त्यालगत असलेले मौजे सिहोरा व खंडाळा (घटाटे) येथील ३५८.३१२४ हे.आर अशी एकूण ५०४.६५२४ हे.आर क्षेत्राची दि. १०/०२/२०२३ रोजी सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विशेष प्रकल्प) यांच्या अध्यक्षतेखाली मऔवि महामंडळाच्या भूनिवड समितीमार्फत स्थळपाहणी केली. सदर स्थळपाहणीनुसार नियोजित जागा औद्योगिक क्षेत्रासाठी सुयोग्य असल्याचे दिसून आले. प्रस्तावित क्षेत्राचे विवरण तपशिल खालीलप्रमाणे आहे. प्रस्ताव "अ"

| अ.क्र. | गावाचेनाव | खाजगीक्षेत्र(हे.आर.) | सरकारीक्षेत्र(हे.आर.) | एकुण(हे.आर.) |
|---|---|---|---|---|
| १. | कन्हान(पिपरी) | १५.७९ | ०.०० | १५.७९ |
| २. | सिहोरा | ३५२.७१ | ४९.१०२४ | ४०१.८१२४ |
| ३. | खंडाळा(घटाटे) | ८७.०५ | ०.०० | ८७.०५ |
| | एकूणक्षेत्र:- | ४५५.५५ | ४९.१०२४ | ५०४.६५२४ |

ब) प्रस्ताव "ब"

| अ.क्र. | गावाचेनाव | खाजगीक्षेत्रहे.आर | सरकारीक्षेत्रहे.आर | एकूणक्षेत्रहे.आर. |
|---|---|---|---|---|
| १. | पटगोवारी | ८४७.८५ | ३.१७ | ८५१.०२ |
| २. | आमडी | १४८.६७ | ०.०४ | १४८.७१ |
| ३. | नयाकुंड | १०४.४५४ | ०.०४ | १०४.४९४ |
| ४. | चिंचभुवन | ४७.८४ | ०.०५ | ४७.८९ |
| | एकूण | ११४८.८१४ | ३.३० | ११५२.११४ |

वरील दोन्ही तक्तामधील क्षेत्र अधिसूचित करण्याकरीतामऔवि,१९६१ अन्वयेप्रकरण ६ वकलम २ खंड (ग) च्या तरतूदी लागू करण्याबाबत दि. १२/०५/२०२३ रोजीच्या १५३ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला. उच्चाधिकार समितीच्या निर्देशानुसार केलेली कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे.

**अ) मौज सिहोरा व खंडाळा (घटाटे) येथील ३५८.३१२४ हे.आर अशी एकूण ५०४.६५२४ हे.आर भूसंपादनाबाबत :-**

पारशिवनी तालुक्यातील मौजे सिहोरा व कन्हान (पिंपरी) येथील मे. नागपूरपॉवर अँड इंडस्ट्रिज लि. (मे. खंडेलवाल फेरो) यांच्या मालकीची १४६.३४ हे.आर क्षेत्र व त्यालगत असलेले मौजे सिहोरा व खंडाळा (घटाटे) येथील ३५८.३१२४ हे.आर अशी एकूण ५०४.६५२४ हे.आर क्षेत्राच्या भूसंपादनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर क्षेत्र बिनशेती दराऐवजी शेतजमिन दराने (Agricultural Land Rate)उपलब्ध झाल्यास संपादित करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. त्याअनुषंगाने मान्यता प्राप्त क्षेत्राची फेर तपासणी करुन पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश उच्चाधिकार समितीने दिले.

मे.नागपूर पॉवर अँड इंडस्ट्रिज लि. यांनी दि.१४/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये १४६.३४ हे. आर. क्षेत्र महामंडळास देण्यास इच्छुक असल्याचे कळविलेले आहे. तसेच सदर पत्रान्वये, औद्योगिक अकृषक असलेली प्रस्तावित जमीन शेतजमिन दराने (AgriculturalRate) देणे परवडणारे नसल्याने त्यांनी MIDCAct,1961 व The Righto fFair Compe nsat ionand Transparency InL and Acquisition, Rehabilitationand Resettlement Act, 2013 चे कलम २६ ते ३० नुसार मोबदला दराबाबत वाटाघाटी करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. त्याअनुषंगाने सदर प्रस्ताव दि. १८/०७/२०२३ रोजीच्या १५५ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला असता, "सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत असून, आगामी उच्चाधिकार समितीच्या बैठकीत सादर करण्यात यावा" असे निर्देश समितीने दिले.

अभियांत्रिकी विभागाच्या दि.१६/०९/२०२३ रोजीच्या अहवालानुसार, मे.नागपूर पॉवर अँड इंडस्ट्रिजलि. (मे.खंडेलवाल फेरो) यांचे १४६.३४ हे . आर जमिनीवर अंदाजे १७००० ते १८००० झाडांनी ९५ टक्के क्षेत्र व्यापलेले आहे. त्याचप्रमाणे सदर क्षेत्रामध्ये अंदाजे ३३२२ चौ.मी.क्षेत्रफळावर जीर्ण अवस्थेतील बांधकाम असल्याचे नमुद केले आहे. प्रस्तावित क्षेत्र कन्हान नदीलगत असल्याने नदीपात्रापासून ब फरझोनबाबत उच्चतम पूर नियंत्रण रेषा ) पाटबंधारे विभागामार्फत माहिती मागविली असता, प्रस्तावित ५०४.६५२४ हे. आर क्षेत्रापैकी त्यांचे विभागामार्फत करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणानुसार ६६.९८ हे. आर क्षेत्र निळ्या रेषेनुसार बाधित होत आहे. सदर प्रस्तावित ५०४.६५२४ हे.आर क्षेत्रापैकी ४१७.६०२४ हे.आर क्षेत्र हे कन्हान (पिपरी) नगर परिषद हद्दीमध्ये येत आहे. उर्वरित ८७.०५ हे. आर. क्षेत्र नागपूर महानगर प्रदेशविकास प्राधिकरण (NMRDA) यांचे विकास आराखडयामध्ये निवासी झोनमध्ये समाविष्ट आहे. उप कार्यकारी अभियंता, पेंच पाटबंधारे विभाग, नागपूर यांनी त्यांच्या दि.१८/१०/२०२३ रोजीच्या पत्रामध्ये मौजे खंडाळा (घटाटे) येथील क्षेत्र ७४.६५ हे.आर,मौजे-सिहोरा येथील क्षेत्र ५४.५७ हे . आर. अशी एकूण १२९.२२ हे.आर. क्षेत्र पेंच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये समाविष्ट असल्याचे नमूद केले आहे.

ब) प्रस्ताव "ब"

| अ.क्र. | गावाचेनाव | खाजगीक्षेत्रहे.आर | सरकारीक्षेत्रहे.आर | एकूणक्षेत्रहे.आर. |
|---|---|---|---|---|
| १. | पटगोवारी | ८४७.८५ | ३.१७ | ८५१.०२ |
| २. | आमडी | १४८.६७ | ०.०४ | १४८.७१ |
| ३. | नयाकुंड | १०४.४५४ | ०.०४ | १०४.४९४ |
| ४. | चिंचभुवन | ४७.८४ | ०.०५ | ४७.८९ |
| | एकूण | ११४८.८१४ | ३.३० | ११५२.११४ |

वरील दोन्ही तक्तामधील क्षेत्र अधिसूचित करण्याकरीतामऔवि,१९६१ अन्वयेप्रकरण ६ वकलम २ खंड (ग) च्या तरतूदी लागू करण्याबाबत दि. १२/०५/२०२३ रोजीच्या १५३ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला. उच्चाधिकार समितीच्या निर्देशानुसार केलेली कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे.

**अ) मौज सिहोरा व खंडाळा (घटाटे) येथील ३५८.३१२४ हे.आर अशी एकूण ५०४.६५२४ हे.आर भूसंपादनाबाबत :-**

पारशिवनी तालुक्यातील मौजे सिहोरा व कन्हान (पिंपरी) येथील मे. नागपूरपॉवर अँड इंडस्ट्रिज लि. (मे. खंडेलवाल फेरो) यांच्या मालकीची १४६.३४ हे.आर क्षेत्र व त्यालगत असलेले मौजे सिहोरा व खंडाळा (घटाटे) येथील ३५८.३१२४ हे.आर अशी एकूण ५०४.६५२४ हे.आर क्षेत्राच्या भूसंपादनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर क्षेत्र बिनशेती दराऐवजी शेतजमिन दराने (Agricultural Land Rate)उपलब्ध झाल्यास संपादित करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. त्याअनुषंगाने मान्यता प्राप्त क्षेत्राची फेर तपासणी करुन पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश उच्चाधिकार समितीने दिले.

मे.नागपूर पॉवर अँड इंडस्ट्रिज लि. यांनी दि.१४/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये १४६.३४ हे. आर. क्षेत्र महामंडळास देण्यास इच्छुक असल्याचे कळविलेले आहे. तसेच सदर पत्रान्वये, औद्योगिक अकृषक असलेली प्रस्तावित जमीन शेतजमिन दराने (AgriculturalRate) देणे परवडणारे नसल्याने त्यांनी MIDCAct,1961 व The Righto fFair Compe nsat ionand Transparency InL and Acquisition, Rehabilitationand Resettlement Act, 2013 चे कलम २६ ते ३० नुसार मोबदला दराबाबत वाटाघाटी करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. त्याअनुषंगाने सदर प्रस्ताव दि. १८/०७/२०२३ रोजीच्या १५५ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला असता, "सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत असून, आगामी उच्चाधिकार समितीच्या बैठकीत सादर करण्यात यावा" असे निर्देश समितीने दिले.

अभियांत्रिकी विभागाच्या दि.१६/०९/२०२३ रोजीच्या अहवालानुसार, मे.नागपूर पॉवर अँड इंडस्ट्रिजलि. (मे.खंडेलवाल फेरो) यांचे १४६.३४ हे . आर जमिनीवर अंदाजे १७००० ते १८००० झाडांनी ९५ टक्के क्षेत्र व्यापलेले आहे. त्याचप्रमाणे सदर क्षेत्रामध्ये अंदाजे ३३२२ चौ.मी.क्षेत्रफळावर जीर्ण अवस्थेतील बांधकाम असल्याचे नमुद केले आहे. प्रस्तावित क्षेत्र कन्हान नदीलगत असल्याने नदीपात्रापासून ब फरझोनबाबत उच्चतम पूर नियंत्रण रेषा ) पाटबंधारे विभागामार्फत माहिती मागविली असता, प्रस्तावित ५०४.६५२४ हे. आर क्षेत्रापैकी त्यांचे विभागामार्फत करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणानुसार ६६.९८ हे. आर क्षेत्र निळ्या रेषेनुसार बाधित होत आहे. सदर प्रस्तावित ५०४.६५२४ हे.आर क्षेत्रापैकी ४१७.६०२४ हे.आर क्षेत्र हे कन्हान (पिपरी) नगर परिषद हद्दीमध्ये येत आहे. उर्वरित ८७.०५ हे. आर. क्षेत्र नागपूर महानगर प्रदेशविकास प्राधिकरण (NMRDA) यांचे विकास आराखडयामध्ये निवासी झोनमध्ये समाविष्ट आहे. उप कार्यकारी अभियंता, पेंच पाटबंधारे विभाग, नागपूर यांनी त्यांच्या दि.१८/१०/२०२३ रोजीच्या पत्रामध्ये मौजे खंडाळा (घटाटे) येथील क्षेत्र ७४.६५ हे.आर,मौजे-सिहोरा येथील क्षेत्र ५४.५७ हे . आर. अशी एकूण १२९.२२ हे.आर. क्षेत्र पेंच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये समाविष्ट असल्याचे नमूद केले आहे.

# महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्र.१९९०

**ॲड.आशिष जयस्वाल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९९० पुढीलप्रमाणे आहे:-**

"नागपूर जिल्हयातील पारशिवनी तालुक्यातील कन्हान येथील MIDC संपादित जमीनीमध्ये कोळसा निघाल्याने त्याऐवजी नवीन जागा निवडण्याचे निर्णय वर्ष २०१९ मध्ये होणे, त्यांनतर वारंवार प्रस्तावामध्ये वेगवेगळी त्रुटी काढून जागेबाबत निर्णय न होणे, मा.मंत्री (उद्योग) यांच्या दालनात व उच्चाधिकार समितीने क्षेत्रीय अधिकाऱ्यांना व्यवहारीक प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिल्यानंतरही याबाबत कार्यवाही न होणे, एकीकडे राज्याच्या उपराजधानीत उद्योग वाढीसाठी जागा उपलब्ध न होणे तर दुसरीकडे उद्योग विभागाने भूखंड विकसीत करण्याचा खर्च अवाजवी आकारणे तर भूसंपादन कायद्याच्या तरतुदीनुसार जमीनीचा मोबदला जास्त होत असल्याने नवीन औद्योगिक क्षेत्र विकसीत होण्यास अडचणी निर्माण होणे, मा.मुख्यमंत्री यांनी नागपूर येथे उद्योजकांच्या बैठकीत महिलांसाठी वेगळा औद्योगिक क्षेत्र जाहीर करण्याची घोषणा करणे, याकरिता जमीन विकासाचा खर्च आता शासनाने किंवा MIDC ने करण्याचे धोरण करण्याची आवश्यकता, नागपूर जिल्हयातील शहरापासून अतिशय जवळ उपलब्ध असलेल्या व उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त प्रस्तावित या जागेत नवीन औद्योगिक क्षेत्र करण्यास शासनाकडून होत असलेला विलंब, त्यामुळे उद्भवलेले अनेक प्रश्न, उद्योगाच्या विकासासाठी याप्रकरणी तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### मा.मंत्री (उद्योग)यांचे निवेदन

पारशिवनी तालुक्यामधील मौजे सिहोराव कन्हान (पिपरी) येथील १४१.८८ हे. आर. क्षेत्र भूसंपादन करणेबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक कार्यालय,नागपूर यांच्याकडून दि. २९/०८/२०१९ व १८/०८/२०२० मऔवि महामंडळाच्या मुख्यालयास सादर करण्यात आलाहोता.परंतू, सदर क्षेत्रासाठी येणारा भूसंपादनाचा खर्च व अभियांत्रिकी विभागाने कळविलेला विकास खर्च परिगणित केला असता, सदर क्षेत्र हे औद्योगिकदृष्टया व आर्थिकदृष्टया सुसाध्य होत नसल्याने सदर प्रस्ताव मुख्य कार्यकारीअधिकारी, मऔविम यांनी रद्द केलेला होता.

ॲड.आशिष जयस्वाल, मा.विधानसभा सदस्य,यांचे विनंतीनुसार मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५/०९/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पारशिवनी तालुक्यातील मौजे आमडी, नयाकुंड व चिंचभुवन तसेच रामटेक तालुकयातील मौजे पटगोवारी येथील एकुण ११५२.११४ हे.आर क्षेत्राचा तसेच मौजे सिहोरा व कन्हान (पिपरी)येथीलमे. नागपूरपॉवर अँड इंडस्ट्रिज लि. (मे. खंडेलवाल फेरो) यांच्या मालकीचे १४६.३४ हे.आर क्षेत्र व त्यालगत असलेले मौजे सिहोरा व खंडाळा (घटाटे) येथील ३५८.३१२४ हे.आर अशी एकुण ५०४.६५२४ हे.आर क्षेत्राची दि. १०/०२/२०२३ रोजी सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विशेष प्रकल्प) यांच्या अध्यक्षतेखाली मऔवि महामंडळाच्या भूनिवड समितीमार्फत स्थळपाहणी केली. सदर स्थळपाहणीनुसार नियोजित जागा औद्योगिक क्षेत्रासाठी सुयोग्य असल्याचे दिसून आले. प्रस्तावित क्षेत्राचे विवरण तपशिल खालीलप्रमाणे आहे. प्रस्ताव "अ"

| अ.क्र. | गावाचेनाव | खाजगीक्षेत्र(हे.आर.) | सरकारीक्षेत्र(हे.आर.) | एकुण(हे.आर.) |
|---|---|---|---|---|
| १. | कन्हान(पिपरी) | १५.७९ | ०.०० | १५.७९ |
| २. | सिहोरा | ३५२.७१ | ४९.१०२४ | ४०१.८१२४ |
| ३. | खंडाळा(घटाटे) | ८७.०५ | ०.०० | ८७.०५ |
| | एकूणक्षेत्र:- | ४५५.५५ | ४९.१०२४ | ५०४.६५२४ |

दि.२३/११/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, नागपूर यांना सदर प्रकरणात संपुर्ण ५०४.६५२४ हे. आर. प्रस्तावित जागेबाबत शेतजमिन (AgriculturalRate) दराने मुल्यांकन काढून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार म. औ. वि महामंडळामार्फत दि.२३/११/२०२३ रोजीचेपत्रान्वयेजिल्हाधिकारी,नागपूरयांना विनंती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकरणी खालीलप्रमाणे माहिती एकत्रित करण्याची कार्यवाही सुरु आहे:-

१. प्रस्तावित औद्योगिक क्षेत्राच्या नकाशामधील BlueLine (बफरझोन) /RedLine नुसार बाधीत होणारे क्षेत्र वगळून प्रस्तावित होणारे एकूण क्षेत्राची माहिती.

२. प्रस्तावित क्षेत्र शेतीदराने उपलब्ध होत आहे काय ? व सदर क्षेत्राचे शेतीदराने मुल्यांकन.

३. उक्तप्रमाणे बाधीत होणारे क्षेत्र वगळून औद्योगिक क्षेत्राचीसुसाध्यता व सदर क्षेत्राची अर्थिक व्यवहार्यता.

४. प्रस्तावितऔद्योगिकक्षेत्रातीलझाडेवबांधकामाचेमुल्यांकन.

५. रामटेक, पारशिवनी येथील खाजगी व सरकारी मिळून एकूण ११५२.११४ हे.आर. क्षेत्राच्या भूसंपादन प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त प्रस्तावित क्षेत्राची अर्थिक व औद्योगिक सुसाध्यता.

६. भूसंपादन दर,विकास खर्च एकत्रित करून भूखंड दरनिश्चितीचेTemplate.

७. उद्योजकांची प्रस्तावित क्षेत्रास असलेली मागणी.

सदर मुद्यांबाबत कार्यकारी अभियंता विभाग क्र.२, नागपूर यांचेकडून नियोजनदृष्ट्या बाधित क्षेत्रालगतचे क्षेत्र वगळून उर्वरित ३००.१६ हे.आर क्षेत्राबाबतचा विकास कामावरील सुधारीत अपेक्षित खर्च अन्वये मागविण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रस्तावित औद्योगिक क्षेत्राबाबत म. औ. वि. महामंडळाच्या प्रादेशिक अधिकारी, नागपूर व अभियांत्रिकी विभागाकडून सदर क्षेत्र औद्योगिक व आर्थिकदृष्ट्या सुसाध्य असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्याची तजवीज म. औ. वि. महामंडळाकडून ठेवण्यात आली आहे.

**ब) पारशिवनी तालुक्यातील मौजे आमडी, नयाकुंड व चिंचभुवन तसेच रामटेक तालुकयातील मौजे पटगोवारी येथील एकूण ११५२.११४ हे.आर भूसंपादनाबाबत :-**

उच्चाधिकार समितीच्या दिनांक १२.०५.२०२३ रोजीच्या १५३ व्या बैठकीत नागपुर जिल्हातील पारशिवनी तालुक्यातील मौजे आमडी, नयाकुंड व चिंचभुवन तसेच रामटेक तालुकयातील मौजे पटगोवारी येथील एकूण ११५२.११४ हे.आर महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) अन्वये अधिसूचित करण्यास उच्चाधिकार समितीने तत्वत: मान्यता दिली आहे. त्यानुसार म. औ. वि. महामंडळाने प्रस्तावित केल्यानुसार उपरोक्त ११५२.११४ हे.आर क्षेत्र अधिसूचित करण्यास शासनाने मान्यता दिली. या क्षेत्राची म. औ. वि. अधिनियम १९६१ ची प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) ची अधिसूचना शासन राजपत्रात दि.१८.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार खाजगी क्षेत्राचीभूसंपादनाची कार्यवाही म. औ.वि. अधिनियम १९६१ च्या तरतूदी व भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकताचा हक्क अधिनियम,२०१३मधील तरतूदीनुसार नुकसान भरपाई दर निश्चिती करुन भूसंपादनाची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

******

# महाराष्ट्र विधानसभा

## लक्षवेधी सूचना क्रमांक ६७

## सन २०२४ चे (तिसरे) पावसाळी अधिवेशन

ॲड.आशिष शेलार, ॲड पराग अळवणी, श्री.राम कदम, श्री.संजय केळकर, श्री.महेश (दादा) किसन लांडगे, श्री.मंगेश चव्हाण, श्री.अनिल देशमुख, श्री.रोहीत पवार, डॉ.जितेंद्र आव्हाड, ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.विकास ठाकरे, श्री.सुनिल प्रभू, श्री.नानाभाऊ पटोले, डॉ.पंकज भोयर, श्री.सुरेश भोळे विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६७ पुढीलप्रमाणे आहे :-

"राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी भागातील ग्रामस्थांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचे काम करीत असलेल्या ७४ हजार आशा स्वयंसेविकांना दरमहा देण्यात येणाऱ्या १३००० रुपये मानधनांपैकी ८००० रुपये राज्य सरकारकडून व उर्वरित ५००० रुपये केंद्र सरकारकडून देण्यात देत असताना या राज्यातील आशा स्वयंसेविकांना राज्य सरकारकडून देणे असलेली रुपये ५००० रक्कम जानेवारी २०२४ पासून आजमितीस मिळालेली नसणे, सदरहू आशा स्वयंसेविका राज्य सरकारच्या हिश्याच्या रुपये ५ हजार रुपयांच्या मानधनांपासून मागील ४ महिन्यांपासून वंचित राहिल्याने त्यांची व त्यांच्या कुटुंबाची अत्यंत हलाखीची परिस्थिती निर्माण झाली असून उदरनिर्वाहाची ही गंभीर समस्या निर्माण झाला असणे, या आशा स्वयंसेविकांना राज्याच्या हिश्याच्या रुपये ५ हजारांचे थकीत मानधनांसह दरमहा नियमितपणे संपूर्ण मानधन अदा होण्याचे दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.

राज्यामध्ये आशा कार्यक्रमातंर्गत ग्रामीण व नागरी भागात एकूण ८००८५ आशा स्वयंसेविका व ३६६४ गटप्रवर्तकांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी आशा स्वयंसेविकांची ७५५७८ व गटप्रवर्तकांची ३६२२ पदे कार्यरत आहेत.

आशांना केंद्र शासनाकडून ४ बाबींवर काम केल्यास रू. २००० व HWC टिम बेस इन्सेटिव्ह रू.१००० असे एकूण रु. ३००० इतके मानधन अदा करण्यात येते. तसेच राज्य शासनाकडून आशांना रु. ५००० इतके मासिक मानधन अदा करण्यात येत होते. सदर मानधनामध्ये राज्य शासनाने रु.५००० इतकी वाढ करुन एकूण रु.१०,००० इतके मासिक मानधन देण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे.

गटप्रवर्तक यांना क्षेत्रीय भेटी या तत्वावर नियुक्त करण्यात येते. केंद्र शासनाकडून रू. ८७७५ इतके मासिक मानधन गटप्रवर्तकांना अदा करण्यात येते. तसेच राज्य शासनाकडून

रू.६२०० इतके मासिक मानधन गटप्रवर्तकांना अदा करण्यात येत होते. सदर मानधनामध्ये राज्य शासनाने रु.१००० इतकी वाढ करुन एकूण रु.७२०० इतके मासिक मानधन देण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे.

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांच्या मानधनात राज्य शासनाने केलेली वाढ नोव्हेंबर, २०२३ पासून लागू करण्यात आलेली आहे. आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना नोव्हेंबर, २०२३ पासून वाढीव दराने मानधन देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयानुसार आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तक यांना दि.१४.०३.२०२४ रोजीच्या शासननिर्णयानुसार नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ या ५ महिन्यांच्या कालावधी करिता वाढीव मोबदला अदा करण्यासाठी रू.१९००८.७५ लक्ष व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वाढीव दराने मानधन अदा करण्यासाठी रु.६६३९९.७१ लक्ष अशी एकूण रू.८५४०८.४६ लक्ष इतकी तरतूद पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनात मान्यतेसाठी सादर झालेली आहे. सदर अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होताच आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांचे नोव्हेंबर, २०२३ पासूनचे थकीत वाढीव मासिक मानधन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सन २०२३ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांचे मानधन अदा करण्यासाठी रु.३२८.६७/- कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी लेखा अनुदानाच्या मर्यादेत रु.१०९.५६ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांचे माहे एप्रिल, २०२४ चे मानधन रु.८२७२.३० लक्ष इतके वितरीत करण्यात आलेले आहे. माहे मे ते जून, २०२४ या कालावधीतील मानधन अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनातून पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणा-या निधीतून अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

********************

रू.६२०० इतके मासिक मानधन गटप्रवर्तकांना अदा करण्यात येत होते. सदर मानधनामध्ये राज्य शासनाने रु.१००० इतकी वाढ करुन एकूण रु.७२०० इतके मासिक मानधन देण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे.

आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांच्या मानधनात राज्य शासनाने केलेली वाढ नोव्हेंबर, २०२३ पासून लागू करण्यात आलेली आहे. आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना नोव्हेंबर, २०२३ पासून वाढीव दराने मानधन देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयानुसार आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तक यांना दि.१४.०३.२०२४ रोजीच्या शासननिर्णयानुसार नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ या ५ महिन्यांच्या कालावधी करिता वाढीव मोबदला अदा करण्यासाठी रू.१९००८.७५ लक्ष व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वाढीव दराने मानधन अदा करण्यासाठी रु.६६३९९.७१ लक्ष अशी एकूण रू.८५४०८.४६ लक्ष इतकी तरतूद पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनात मान्यतेसाठी सादर झालेली आहे. सदर अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होताच आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांचे नोव्हेंबर, २०२३ पासूनचे थकीत वाढीव मासिक मानधन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सन २०२३ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांचे मानधन अदा करण्यासाठी रु.३२८.६७/- कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी लेखा अनुदानाच्या मर्यादेत रु.१०९.५६ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांचे माहे एप्रिल, २०२४ चे मानधन रु.८२७२.३० लक्ष इतके वितरीत करण्यात आलेले आहे. माहे मे ते जून, २०२४ या कालावधीतील मानधन अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनातून पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणा-या निधीतून अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

********************

# महाराष्ट्र विधानसभा

## लक्षवेधी सूचना क्रमांक ६७

## सन २०२४ चे (तिसरे) पावसाळी अधिवेशन

ॲड.आशिष शेलार, ॲड पराग अळवणी, श्री.राम कदम, श्री.संजय केळकर, श्री.महेश (दादा) किसन लांडगे, श्री.मंगेश चव्हाण, श्री.अनिल देशमुख, श्री.रोहीत पवार, डॉ.जितेंद्र आव्हाड, ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.विकास ठाकरे, श्री.सुनिल प्रभू, श्री.नानाभाऊ पटोले, डॉ.पंकज भोयर, श्री.सुरेश भोळे विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६७ पुढीलप्रमाणे आहे :-

"राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी भागातील ग्रामस्थांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचे काम करीत असलेल्या ७४ हजार आशा स्वयंसेविकांना दरमहा देण्यात येणाऱ्या १३००० रुपये मानधनांपैकी ८००० रुपये राज्य सरकारकडून व उर्वरित ५००० रुपये केंद्र सरकारकडून देण्यात देत असताना या राज्यातील आशा स्वयंसेविकांना राज्य सरकारकडून देणे असलेली रुपये ५००० रक्कम जानेवारी २०२४ पासून आजमितीस मिळालेली नसणे, सदरहू आशा स्वयंसेविका राज्य सरकारच्या हिश्याच्या रुपये ५ हजार रुपयांच्या मानधनांपासून मागील ४ महिन्यांपासून वंचित राहिल्याने त्यांची व त्यांच्या कुटुंबाची अत्यंत हलाखीची परिस्थिती निर्माण झाली असून उदरनिर्वाहाची ही गंभीर समस्या निर्माण झाला असणे, या आशा स्वयंसेविकांना राज्याच्या हिश्याच्या रुपये ५ हजारांचे थकीत मानधनांसह दरमहा नियमितपणे संपूर्ण मानधन अदा होण्याचे दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.

राज्यामध्ये आशा कार्यक्रमातंर्गत ग्रामीण व नागरी भागात एकूण ८००८५ आशा स्वयंसेविका व ३६६४ गटप्रवर्तकांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी आशा स्वयंसेविकांची ७५५७८ व गटप्रवर्तकांची ३६२२ पदे कार्यरत आहेत.

आशांना केंद्र शासनाकडून ४ बाबींवर काम केल्यास रू. २००० व HWC टिम बेस इन्सेटिव्ह रू.१००० असे एकूण रु. ३००० इतके मानधन अदा करण्यात येते. तसेच राज्य शासनाकडून आशांना रु. ५००० इतके मासिक मानधन अदा करण्यात येत होते. सदर मानधनामध्ये राज्य शासनाने रु.५००० इतकी वाढ करुन एकूण रु.१०,००० इतके मासिक मानधन देण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे.

गटप्रवर्तक यांना क्षेत्रीय भेटी या तत्वावर नियुक्त करण्यात येते. केंद्र शासनाकडून रू. ८७७५ इतके मासिक मानधन गटप्रवर्तकांना अदा करण्यात येते. तसेच राज्य शासनाकडून

# महाराष्ट्र विधानसभा

## लक्षवेधी सूचना क्रमांक १६२२

## सन २०२४ चे ( तिसरे ) पावसाळी अधिवेशन

श्री.विनोद निकोले, श्री.हितेंद्र ठाकूर, श्री.क्षितीज ठाकूर, श्री.राजेश रघुनाथ पाटील विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६२२ पुढीलप्रमाणे आहे :-

"पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर तब्बल १० वर्षांनी २१० कोटी रुपये खर्चाचे जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला असणे, मात्र या रुग्णालयाच्या बांधकामाला निधीची कमतरता भासत असल्याने रुग्णालयाचे बांधकाम ठप्प झालेले असणे, जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्याच्या कामाची मुदत डिसेंबर २०२४ मध्ये संपत असून निधी अभावी हे काम रखडलेले असणे, त्यामुळे पालघर जिल्ह्यातील नागरिकांना विविध आजाराच्या उपचारासाठी मुंबई, ठाणे, केंद्रशासित सेलवासा आधी ठिकाणी जावे लागत असल्याने जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड बसत असणे, रुग्णांचे सतत प्रचंड हालअपेष्टा होत असणे, त्यामुळे पालघर जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक जनतेतून व लोकप्रतिनिधीकडून होत असतानाही शासनाकडून दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे सर्वसामान्य जनतेतून नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

### प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.

दिनांक १.८.२०१४ रोजी ठाणे जिल्हयाचे विभाजन होवून पालघर हा नवीन आदिवासी जिल्हा निर्माण करण्यात आला. पालघर जिल्हयामध्ये पालघर, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा, डहाणू, तलासरी व वसई या ८ तालुक्यांचा समावेश आहे. पालघर जिल्हयात सद्यस्थितीत १०० खाटांची २ उपजिल्हा रुग्णालये, ५० खाटांचे १ उपजिल्हा रुग्णालय व ३० खाटांची ९ ग्रामीण रुग्णालये तसेच ३ आश्रमशाळा पथके कार्यान्वित आहेत. या रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांमार्फत रुग्णालयात येणा-या रुग्णांना प्राथमिक व द्वितीय स्तरावरील आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. नियमित वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त असली तरी, राष्ट्रीय आरोग्य अभियानामधून व कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिका-यांच्या नियुक्त्या करुन सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये येथे सर्व सोयींनी युक्त प्रसुतीगृह कार्यान्वित असून, प्रयोगशाळा, क्ष-किरण, ईसीजी व उपजिल्हा रुग्णालय डहाणू, उपजिल्हा रुग्णालय कासा, उपजिल्हा रुग्णालय जव्हार, ग्रामीण रुग्णालय मोखाडा, ग्रामीण रुग्णालय पालघर आणि ग्रामीण रुग्णालय वाडा येथे

सोनोग्राफी सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. गंभीर वा अतिगंभीर असल्यास त्या रुग्णांना संस्थेच्या जवळच्या तृतीय स्तरावरील सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता संदर्भीत करण्यात येते.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (२०१८-१९) मध्ये पालघर येथे २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय व कर्मचारी निवासस्थाने बांधकाम करणे याकरिता १५५.३० कोटी निधी मंजूर झाला होता. परंतु सदरचे जिल्हा रुग्णालय हे IPHS (भारतीय सार्वजनिक आरोग्य मानक) नुसार बांधावयाचे असल्याने सदर बांधकामाचे नकाशे हे सुधारित करण्यात आले होते. त्यानुसार सुधारित रक्कमेचा रु. २०९.११ कोटी निधीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रकल्प अंमलबजावणी आराखडा २०१९-२० मध्ये प्रस्तावित करण्यात आला असून त्यास दिनांक २५/०४/२०१९ रोजी (२०१९-२०) च्या आराखड्यात सदरचे बांधकामास मंजुरी मिळाली. त्या अनुषंगाने शासनाकडून बांधकामाच्या अंदाज आराखड्यास दिनांक ०९/०८/२०१९ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. प्रस्तावित बांधकामाचे नकाशे हे IPHS (भारतीय सार्वजनिक आरोग्य मानक) नुसार केंद्राच्या NHSRC टीम कडून मंजुरी घेऊन राज्यस्तरावर मुख्य वास्तुविशारद सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडून मंजुरी घेण्यात आली. सदर मंजूर नकाशानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेमध्ये काही बाबींचे परिमाण बदल असल्याने त्यास दिनांक २१/१२/२०२० रोजी शासनाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

प्रस्तावित बांधकामाची निविदा प्रक्रिया करण्यास झालेल्या विलंबाची कारणे :-

१) सदर कामासाठी बनविण्यात आलेल्या आराखड्यांना दिनांक १८/०३/२०१९ रोजी मुख्य वास्तुविशारद सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून प्राप्त झाली असून यात ३ महिन्याचा कालावधी लागला.

२) Fire NOC Cidco मार्फत ११/०९/२०१९ रोजी प्राप्त झालेली असून यात ५ महिन्यांचा कालावधी लागला.

३) Development Permission ही Cidco मार्फत २५/०९/२०२० रोजी प्राप्त झालेली असून यात १९ महिन्यांचा कालावधी लागला.

४) मुख्य अभियंता (विद्युत), सा.बा.विभाग, मुंबई यांच्याकडून सदर कामासाठी बनविण्यात आलेल्या विद्युत अंदाजपत्रकास दिनांक २६/०२/२०२१ रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असून यात १४ महिन्यांचा कालावधी लागला.

५) Environmental NOC पर्यावरण विभाग सचिव (SEIAA) यांच्याकडून दिनांक २५/०३/२०२१ रोजी प्राप्त झाली असून यात ६ महिन्यांचा कालावधी लागला.

सोनोग्राफी सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. गंभीर वा अतिगंभीर असल्यास त्या रुग्णांना संस्थेच्या जवळच्या तृतीय स्तरावरील सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता संदर्भीत करण्यात येते.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (२०१८-१९) मध्ये पालघर येथे २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय व कर्मचारी निवासस्थाने बांधकाम करणे याकरिता १५५.३० कोटी निधी मंजूर झाला होता. परंतु सदरचे जिल्हा रुग्णालय हे IPHS (भारतीय सार्वजनिक आरोग्य मानक) नुसार बांधावयाचे असल्याने सदर बांधकामाचे नकाशे हे सुधारित करण्यात आले होते. त्यानुसार सुधारित रक्कमेचा रु. २०९.११ कोटी निधीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रकल्प अंमलबजावणी आराखडा २०१९-२० मध्ये प्रस्तावित करण्यात आला असून त्यास दिनांक २५/०४/२०१९ रोजी (२०१९-२०) च्या आराखड्यात सदरचे बांधकामास मंजुरी मिळाली. त्या अनुषंगाने शासनाकडून बांधकामाच्या अंदाज आराखड्यास दिनांक ०९/०८/२०१९ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. प्रस्तावित बांधकामाचे नकाशे हे IPHS (भारतीय सार्वजनिक आरोग्य मानक) नुसार केंद्राच्या NHSRC टीम कडून मंजुरी घेऊन राज्यस्तरावर मुख्य वास्तुविशारद सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडून मंजुरी घेण्यात आली. सदर मंजूर नकाशानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यानुसार प्रशासकीय मान्यतेमध्ये काही बाबींचे परिमाण बदल असल्याने त्यास दिनांक २१/१२/२०२० रोजी शासनाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

**प्रस्तावित बांधकामाची निविदा प्रक्रिया करण्यास झालेल्या विलंबाची कारणे :-**

१) सदर कामासाठी बनविण्यात आलेल्या आराखड्यांना दिनांक १८/०३/२०१९ रोजी मुख्य वास्तुविशारद सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून प्राप्त झाली असून यात ३ महिन्याचा कालावधी लागला.

२) Fire NOC Cidco मार्फत ११/०९/२०१९ रोजी प्राप्त झालेली असून यात ५ महिन्यांचा कालावधी लागला.

३) Development Permission ही Cidco मार्फत २५/०९/२०२० रोजी प्राप्त झालेली असून यात १९ महिन्यांचा कालावधी लागला.

४) मुख्य अभियंता (विद्युत), सा.बा.विभाग, मुंबई यांच्याकडून सदर कामासाठी बनविण्यात आलेल्या विद्युत अंदाजपत्रकास दिनांक २६/०२/२०२१ रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असून यात १४ महिन्यांचा कालावधी लागला.

५) Environmental NOC पर्यावरण विभाग सचिव (SEIAA) यांच्याकडून दिनांक २५/०३/२०२१ रोजी प्राप्त झाली असून यात ६ महिन्यांचा कालावधी लागला.

# महाराष्ट्र विधानसभा

## लक्षवेधी सूचना क्रमांक १६२२

## सन २०२४ चे ( तिसरे ) पावसाळी अधिवेशन

श्री.विनोद निकोले, श्री.हितेंद्र ठाकूर, श्री.क्षितीज ठाकूर, श्री.राजेश रघुनाथ पाटील विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६२२ पुढीलप्रमाणे आहे :-

"पालघर जिल्ह्याच्या निर्मितीनंतर तब्बल १० वर्षांनी २१० कोटी रुपये खर्चाचे जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला असणे, मात्र या रुग्णालयाच्या बांधकामाला निधीची कमतरता भासत असल्याने रुग्णालयाचे बांधकाम ठप्प झालेले असणे, जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्याच्या कामाची मुदत डिसेंबर २०२४ मध्ये संपत असून निधी अभावी हे काम रखडलेले असणे, त्यामुळे पालघर जिल्ह्यातील नागरिकांना विविध आजाराच्या उपचारासाठी मुंबई, ठाणे, केंद्रशासित सेलवासा आधी ठिकाणी जावे लागत असल्याने जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड बसत असणे, रुग्णांचे सतत प्रचंड हालअपेष्टा होत असणे, त्यामुळे पालघर जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक जनतेतून व लोकप्रतिनिधीकडून होत असतानाही शासनाकडून दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे सर्वसामान्य जनतेतून नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.

दिनांक १.८.२०१४ रोजी ठाणे जिल्हयाचे विभाजन होवून पालघर हा नवीन आदिवासी जिल्हा निर्माण करण्यात आला. पालघर जिल्हयामध्ये पालघर, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा, डहाणू, तलासरी व वसई या ८ तालुक्यांचा समावेश आहे. पालघर जिल्हयात सद्यस्थितीत १०० खाटांची २ उपजिल्हा रुग्णालये, ५० खाटांचे १ उपजिल्हा रुग्णालय व ३० खाटांची ९ ग्रामीण रुग्णालये तसेच ३ आश्रमशाळा पथके कार्यान्वित आहेत. या रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांमार्फत रुग्णालयात येणा-या रुग्णांना प्राथमिक व द्वितीय स्तरावरील आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. नियमित वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त असली तरी, राष्ट्रीय आरोग्य अभियानामधून व कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिका-यांच्या नियुक्त्या करुन सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये येथे सर्व सोयींनी युक्त प्रसुतीगृह कार्यान्वित असून, प्रयोगशाळा, क्ष-किरण, ईसीजी व उपजिल्हा रुग्णालय डहाणू, उपजिल्हा रुग्णालय कासा, उपजिल्हा रुग्णालय जव्हार, ग्रामीण रुग्णालय मोखाडा, ग्रामीण रुग्णालय पालघर आणि ग्रामीण रुग्णालय वाडा येथे

६) मुख्य अभियंता, सा.बा. विभाग, मुंबई यांच्याकडून सदर कामासाठी बनविण्यात आलेल्या विद्युत अंदाजपत्रकास दिनांक ०६/०४/२०२१ रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असून यात १६ महिन्यांचा कालावधी लागला.

तद्नंतर सदर बांधकामाची निविदा प्रारूपास दिनांक २७/०८/२०२१ रोजी मुख्य अभियंता, सा.बा. विभाग, मुंबई यांच्याकडून मंजूरी मिळाली व दिनांक ०४/११/२०२१ रोजी निविदा प्रसिद्धी करण्यात आली. परंतु सदर निविदेकरीता पात्र झालेल्या निविदाधारकाने सदर कामाची निविदा १७.४६% वाढीव दराने भरली होती. तसेच निविदेमध्ये Price variation clause चा समावेश असल्याने व ठेकेदाराने वाटाघाटी अंती १२.५% वाढीव दराने काम करणेस सहमती दर्शवली होती. सदर निविदा रक्कम ही जवळपास २२.५% दराने वाढ होत असल्याने प्रथम निविदा दिनांक १.९.२०२२ रोजी रद्द करुन, द्वितीय निविदा दिनांक ३.९.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यांत आली. सदर निविदेस दिनांक ०७/१२/२०२२ रोजी मंजुरी घेण्यात आली असून दिनांक १५/१२/२०२२ रोजी मे. शांती कन्स्ट्रक्शन यांच्याशी वाटाघाटी अंती १५.९१% निविदेचा अधिक दराने कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. या कामासाठीचा मंजूर निधी रु. २०९.११ कोटी हा केंद्र शासनाकडून राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्याअंतर्गत सन २०१८-१९ ते २०२४-२५ या आर्थिक वर्षात पूर्णपणे मंजूर झाला आहे. कामाच्या प्रगतीनुसार कंत्राटदारास धावते देयके देण्यात आलेली आहेत. आतापर्यंत या कामावर रु.१०७.३६ कोटी निधी खर्च झालेला आहे. उर्वरित निधीची राज्यस्तरावर मागणी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत जिल्हा रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे ९०% R. C.C काम पूर्ण झाले आहे, ५०% Block work व External plaster चे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच सदरचे जिल्हा रुग्णालयाचे काम मार्च २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

*********************

# महाराष्ट्र विधानसभा
## लक्षवेधी सूचना क्रमांक १७३३
## सन २०२४ चे (तिसरे) पावसाळी अधिवेशन

श्रीमती.सीमा महेश हिरे (सिमाताई), विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७३३ पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक शहरातील गोरगरीब जनतेला तात्काळ प्राथमिक उपचार मिळावेत या उद्देशाने केंद्र शासनाने पंधरावे वित्त आयोगातून महापालिकेला दिलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्राची केवळ रंगरंगोटी करण्यात आली असून प्रत्यक्षात अनेक ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्र कुलूप बंद असल्याचे निदर्शनास आले असणे, सिडकोतील चुंचाळे शिवारातील केवळ एकच केंद्र सद्यस्थितीत सुरू असल्याने आरोग्य आरोग्यवर्धिनी केंद्र सलाइनवर असल्याने सर्वसामान्याच्या आरोग्याचा बिकट प्रश्न निर्माण झालेला असणे, आरोग्यवर्धिनी केंद्र उभारणीसाठी महापालिका प्रशासनाने मनपाच्या जुन्या व्यायाम शाळा समाज मंदिर ताब्यात घेऊन त्या ठिकाणी रंगरंगोटी करत फर्निचर काम करून सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याचा दावा केला व सकाळी १० ते सायंकाळी ०६ या वेळेत एक डॉक्टर आणि एक सिस्टर कार्यरत असल्याचे स्पष्ट केले मात्र अनेक आरोग्यवर्धिनी केंद्र कुलूप बंद असल्याने या योजनेचा बोजवारा उडालेला असणे, सध्या डॉक्टरांची शेकडो पदे रिक्त असून आरोग्यवर्धिनी केंद्र कशाच्या आधारावर चालवण्यात येणार हा ही यक्ष प्रश्न निर्माण असणे, यावर शासनाने तातडीने करावयाचे कार्यवाही व उपाययोजना."

---

प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.

नाशिक शहरातील गोरगरीब जनतेला तात्काळ प्राथमिक उपचार मिळावे या उद्देशाने पंधरावे वित्त आयोगातून नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण १०६ नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर (नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र) मंजूर असून ४६ नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर कार्यान्वित आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे महानगरपालिका यांची स्वत:ची मिळकत (समाजमंदिर/व्यायामशाळा/सभागृह/बांधीव मिळकत, इ.) येथे नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर स्थापन करणेस प्राधान्य देणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिळकत विभाग व त्या त्या विभागातील विभागीय अधिकारी यांचे पथकाने एकत्रितपणे नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १०१ इमारतींची निवड केलेली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर इमारतींची दुरुस्ती, रंगरंगोटी वगैरे विषयक कामांकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. १०१ इमारती पैकी एकूण ४६ नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर हे दि. १२ मार्च २०२४ पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

उर्वरीत ६० नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर यांचे काम प्रगतीपथावर आहे व त्यातील काही आयुष्यमान आरोग्य मंदिर यांचे रंगरंगोटी झालेली असून उर्वरीत कामे सुरु असून ती तातडीने पूर्ण होईल याची खातरजमा महानगरपालिकेच्या वैदयकीय विभागामार्फत करण्यात येत आहे. सदर नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर येथील वैद्यकीय व आय. टी. उपकरणे, फर्निचर, औषधी खरेदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. या नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर मध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, बहुउद्देशिय आरोग्य सेवक, अटेंडंट/गार्ड व सफाई कर्मचारी या मनुष्यबळाचा समावेश आहे. यानुसार सर्व नागरी आयुष्यमान आरोग्य मंदीराकरीता आवश्यक मनुष्यबळ जाहिरात व मुलाखतीद्वारे निवडसूचीतून नाशिक महानगरपालिका यांना उपलब्ध झाले आहे. वैद्यकीय अधिकारी यांची पदे ही नाशिक महानगरपालिकाद्वारे जाहिरात प्रक्रिया राबवुन गूणांकनानुसार निवड करणेत आलेली आहे. सबब, कार्यान्वित झालेल्या ४६ नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर मार्फत आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

सिडको येथील चुंचाळे शिवारातील १ आरोग्य केंद्र हे राज्य शासनाच्या "हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" या योजने अंतर्गत कार्यरत असून सदर केंद्रांद्वारे रुग्णांना आरोग्य सेवा पुरविली जात आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कार्यान्वित असलेल्या ४६ नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर येथे ४६ वैद्यकीय अधिकारी यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले असून त्यापैकी ४३ ठिकाणी वैद्यकीय अधिकारी रुजु झालेले आहेत. ३ ठिकाणी वैद्यकीय अधिकारी रुजु झालेले नसल्याकारणाने नजिकचे शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आलेले असून सदर केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

मंजूर नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर केंद्रांकरीता वैद्यकीय अधिकारी पदभरतीबाबत नाशिक महानगरपालिका मार्फत जाहिरात क्र. ०१/२०२४ अन्वये एम.बी.बी.एस./बी.ए.एम.एस. पदांकरीता दि. ३.०१.२४ ते ११.०१.२४ या कालावधीत अर्ज मागवून भरती प्रक्रिया / निवड प्रक्रिया पुर्ण झालेली असून १५६ वैदयकीय अधिकारी पैकी १०६ निवड यादी व उर्वरीत ५० प्रतिक्षा यादीत आहेत. सबब नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित करणेसाठी पद भरतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून उर्वरीत नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्र स्थापनेनंतर निवड यादीतील वैद्यकीय अधिका-यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत.

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात आज रोजी ५ रुग्णालये, ८ प्रसुतिगृहे व २२ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र व ४६ नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर कार्यरत आहेत. सद्यस्थितीत २२ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र व ४६ नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर यांचेमार्फत सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

********************

उर्वरीत ६० नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर यांचे काम प्रगतीपथावर आहे व त्यातील काही आयुष्मान आरोग्य मंदिर यांचे रंगरंगोटी झालेली असून उर्वरीत कामे सुरु असून ती तातडीने पूर्ण होईल याची खातरजमा महानगरपालिकेच्या वैदयकीय विभागामार्फत करण्यात येत आहे. सदर नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर येथील वैद्यकीय व आय. टी. उपकरणे, फर्निचर, औषधी खरेदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. या नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर मध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, बहुउद्देशिय आरोग्य सेवक, अटेंडंट/गार्ड व सफाई कर्मचारी या मनुष्यबळाचा समावेश आहे. यानुसार सर्व नागरी आयुष्मान आरोग्य मंदीराकरीता आवश्यक मनुष्यबळ जाहिरात व मुलाखतीद्वारे निवडसूचीतून नाशिक महानगरपालिका यांना उपलब्ध झाले आहे. वैद्यकीय अधिकारी यांची पदे ही नाशिक महानगरपालिकाद्वारे जाहिरात प्रक्रिया राबवुन गूणांकनानुसार निवड करणेत आलेली आहे. सबब, कार्यान्वित झालेल्या ४६ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर मार्फत आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

सिडको येथील चुंचाळे शिवारातील १ आरोग्य केंद्र हे राज्य शासनाच्या "हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" या योजने अंतर्गत कार्यरत असून सदर केंद्रांद्वारे रुग्णांना आरोग्य सेवा पुरविली जात आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कार्यान्वित असलेल्या ४६ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर येथे ४६ वैद्यकीय अधिकारी यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले असून त्यापैकी ४३ ठिकाणी वैद्यकीय अधिकारी रुजु झालेले आहेत. ३ ठिकाणी वैद्यकीय अधिकारी रुजु झालेले नसल्याकारणाने नजिकचे शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आलेले असून सदर केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

मंजूर नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्रांकरीता वैद्यकीय अधिकारी पदभरतीबाबत नाशिक महानगरपालिका मार्फत जाहिरात क्र. ०१/२०२४ अन्वये एम.बी.बी.एस./बी.ए.एम.एस. पदांकरीता दि. ३.०१.२४ ते ११.०१.२४ या कालावधीत अर्ज मागवून भरती प्रक्रिया / निवड प्रक्रिया पुर्ण झालेली असून १५६ वैदयकीय अधिकारी पैकी १०६ निवड यादी व उर्वरीत ५० प्रतिक्षा यादीत आहेत. सबब नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित करणेसाठी पद भरतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून उर्वरीत नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्र स्थापनेनंतर निवड यादीतील वैद्यकीय अधिका-यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत.

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात आज रोजी ५ रुग्णालये, ८ प्रसुतिगृहे व २२ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र व ४६ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यरत आहेत. सद्यस्थितीत २२ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र व ४६ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर यांचेमार्फत सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

********************

# महाराष्ट्र विधानसभा

## लक्षवेधी सूचना क्रमांक १७३३

## सन २०२४ चे (तिसरे) पावसाळी अधिवेशन

श्रीमती.सीमा महेश हिरे (सिमाताई), विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७३३ पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक शहरातील गोरगरीब जनतेला तात्काळ प्राथमिक उपचार मिळावेत या उद्देशाने केंद्र शासनाने पंधरावे वित्त आयोगातून महापालिकेला दिलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्राची केवळ रंगरंगोटी करण्यात आली असून प्रत्यक्षात अनेक ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्र कुलूप बंद असल्याचे निदर्शनास आले असणे, सिडकोतील चुंचाळे शिवारातील केवळ एकच केंद्र सद्यस्थितीत सुरू असल्याने आरोग्य आरोग्यवर्धिनी केंद्र सलाइनवर असल्याने सर्वसामान्याच्या आरोग्याचा बिकट प्रश्न निर्माण झालेला असणे, आरोग्यवर्धिनी केंद्र उभारणीसाठी महापालिका प्रशासनाने मनपाच्या जुन्या व्यायाम शाळा समाज मंदिर ताब्यात घेऊन त्या ठिकाणी रंगरंगोटी करत फर्निचर काम करून सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याचा दावा केला व सकाळी १० ते सायंकाळी ०६ या वेळेत एक डॉक्टर आणि एक सिस्टर कार्यरत असल्याचे स्पष्ट केले मात्र अनेक आरोग्यवर्धिनी केंद्र कुलूप बंद असल्याने या योजनेचा बोजवारा उडालेला असणे, सध्या डॉक्टरांची शेकडो पदे रिक्त असून आरोग्यवर्धिनी केंद्र कशाच्या आधारावर चालवण्यात येणार हा ही यक्ष प्रश्न निर्माण असणे, यावर शासनाने तातडीने करावयाचे कार्यवाही व उपाययोजना."

---

प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.

नाशिक शहरातील गोरगरीब जनतेला तात्काळ प्राथमिक उपचार मिळावे या उद्देशाने पंधरावे वित्त आयोगातून नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण १०६ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर (नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र) मंजूर असून ४६ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे महानगरपालिका यांची स्वत:ची मिळकत (समाजमंदिर/व्यायामशाळा/सभागृह/बांधीव मिळकत, इ.) येथे नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर स्थापन करणेस प्राधान्य देणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिळकत विभाग व त्या त्या विभागातील विभागीय अधिकारी यांचे पथकाने एकत्रितपणे नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील १०१ इमारतींची निवड केलेली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर इमारतींची दुरुस्ती, रंगरंगोटी वगैरे विषयक कामांकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. १०१ इमारती पैकी एकूण ४६ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर हे दि. १२ मार्च २०२४ पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२४ चे (पावसाळी) अधिवेशन**

**डॉ.आशिष शेलार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"वांद्रे रिक्लेमेशन येथील न.भू.क्र. ए-७९२, वांद्रे अ ब्लॉक अंतर्गत असून सदर भूखंड हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारित असणे, सदर वांद्रे अ ब्लॉकच्या विकास नियोजन आराखड्यात या भूखंडावर स्मशानभूमीचे आरक्षण प्रस्तावित करण्यात आलेले असणे. सदर स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी दिनांक ०९/०३/२०२० रोजी वांद्रे अ ब्लॉकमधील सदर आरक्षित जागा मनपाला हस्तांतरित करण्याकरता उपाध्यक्ष व संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना कळवलेले असून अद्याप पर्यंत सदर भूखंड मनपाला हस्तांतरित झालेला नसणे, त्यामुळे येथील हिंदू, मुस्लिम व ख्रिश्चन स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी सदर जागा ही महानगरपालिकेला हस्तांतरित करणे आवश्यक असणे, याचबरोबर येथील उर्वरित भूखंड विकासासाठी एमएसआरडीसी मार्फत अदानी कंपनीला देण्यात आलेला असणे, परंतु एमएसआरडीसी मार्फत अदानी कंपनीला देण्यात आलेला भूखंड हा कायदेशीर प्रक्रिया न करताच देण्यात आल्याने सदर भूखंड देखील त्यांच्याकडून मोकळा करून घेणे आवश्यक असणे. त्यामुळे या भूखंडावर हिंदू, मुस्लिम व ख्रिश्चन स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी व कायदेशीर प्रक्रिया न करताच अदानी कंपनीला दिलेला भूखंड मोकळा करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

महसूल व वन विभाग, ज्ञापन क्र. जमीन-२६१६/प्र.क्र.६३/ज-३, दिनांक ०४.११.२०१६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४० मधील तरतुदीनुसार तसेच, दिनांक ०५.०७.२०१६ रोजीच्या मंत्रीमंडळ निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. खाक्षेस-२००२/प्र.क्र.१८२/रस्ते-८, दिनांक ०५.०७.२०१६ मधील तरतुदीनुसार नगर भूमापन ए वॉर्ड (वांद्रे-प), तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथील न.भू. क्र. ए-७९२ (पै.) क्षेत्र २,३२,४६५ चौ.मी. इतकी शासकीय जमीन निर्बंधरित्या व अनर्जित रक्कम / अधिमुल्य / नजराणा / हस्तांतरण शुल्क / वापरातील बदलाबाबतचे शुल्क इत्यादी कोणत्याही प्रकारचे शुल्क भरण्याची सूट देऊन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांना महसूल मुक्त व भोगवटामूल्य विरहीत तत्वावर हस्तांतरीत करण्यास व या जमिनीच्या विकासास नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून सुपूर्द करण्यास शासनाची मान्यता दिली आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील आदेश क्र. ३अ/कावि-४८४/सीआर-४५२/२०१७, दिनांक ३०.०१.२०१७ अन्वये महसूल व वन विभागाकडील ज्ञापन दिनांक ०४.११.२०१६ च्या अनुषंगाने उक्त जमीन नमूद अटी व शर्तीस अधीन राहून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास हस्तांतर केली आहे.

महसूल व वन विभागाकडील ज्ञापन दिनांक ०४.११.२०१६ व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील आदेश दिनांक ३०.०१.२०१७ च्या अनुषंगाने जमिनीच्या मालमत्ता पत्रकामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचे नाव दाखल करण्यात आले आहे.

शासनाने दिनांक ११.०५.२०१८ रोजीच्या शासन अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र महामार्ग (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडील जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम, २०१८ प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

वांद्रे येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ताब्यातील जागा Construction & Devlopment Agency (C&DA) तत्वावर विकसित करण्यासाठी विकासक एजन्सीची नेमणूक करण्याबाबतची निविदा दि. १०.०१.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदर निविदा दस्तामध्ये Volume १ मधील पान क्र. ९ वरील पहिल्या परिच्छेदात 'महामंडळाचा ताबा असलेला नगर भूमापन ए वॉर्ड (वांद्रे-प), तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथील न.भू. क्र. ए-७९२ (पै.) २८ एकर क्षेत्र निविदाकारास विकासासाठी उपलब्ध करुन दिली जाईल. त्यापैकी ४ एकर क्षेत्रावर आरक्षण असल्याने २४ एकर क्षेत्र



[क्रमाप.

उपलब्ध करुन देण्यात येईल व आरक्षण असलेले ४ एकर क्षेत्र नंतर उपलब्ध करुन देण्यात येईल' असे नमूद आहे. सदर निविदेमध्ये अदानी प्रॉपटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या revenue share basis तत्वावरील महत्तम २३.१५९% इतका देकार स्वीकार करुन त्यांची यशस्वी निविदाकार म्हणून निवड करण्यात आली. त्यास अनुसरुन संचालक मंडळाच्या दि.२८.०२.२०२४ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रस्ताव मान्यतेसाठी दि.०७.०३.२०२४ रोजी शासनास पाठविण्यात आला.

सदर महामंडळाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक १६.०३.२०२४ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १२.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालील बाबी महामंडळास कळविल्या आहेत :-

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या संचालक मंडळाने दिनांक २८.०२.२०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये नगर भूमापन ए वार्ड (वांद्रे-प.), तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या न.भू.क्र.अ.अ-७९२ (पै) २,३२,४६५ चौ. मी. जागेचा विकास करण्याकरीता अदानी प्रॉपटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या revenue share basis तत्वावरील २३.१५९% इतका देकार स्विकारण्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) च्या संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयास विषयांकीत जमिनीसंबंधात मा. सर्वोच्च न्यायालय किंवा इतर मा. न्यायालयात न्यायालयीन प्रकरणी महाराष्ट्र शासनाच्या वतीने शपथपत्र दाखल केले असल्यास त्यात नमूद भूमिकेस बाधा येणार नाही. तसेच Construction and Development Agency बरोबर करावयाच्या करारनाम्याच्या मसुद्यास विधि व न्याय विभागाची मान्यता घेणे बंधनकारक राहील तसेच प्रस्तावास अनुसरुन झालेल्या अनुषंगाने कायद्यातील सर्व तरतूदी व नियम तपासून आवश्यक कार्यवाही करण्याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सीटीएस क्र. ए.७९२ (ए वार्ड), मध्ये विकास आराखड्यात दर्शविलेले स्मशानभूमीचे आरक्षण संदर्भात मोहम्मद अल कुरेशी यांनी PIL क्र. १०१/२०१६ उच्च न्यायालयात दाखल केले आहे. सदर याचिकेमध्ये महामंडळास प्रतिवादी करण्यात आल्यानंतर आरक्षित जागा मुंबई महानगर पालिकेस हस्तांतरित करण्यास महामंडळाने तयारी दर्शविली आहे. त्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनूसार सदर जागा मुंबई महानगर पालिकेस सार्वजनिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरीता सुपूर्द करण्यासाठी प्राथमिक हद्द कायम मोजणी दिनांक १३.०५.२०२४ रोजी करण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेकडून जागेच्या हद्दीच्या खुणा भूमापन अधिकारी यांना निश्चित करुन देण्याबाबत भूमापन अधिकारी, बांद्रा यांनी महानगर पालिकेस सुचना दिल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर प्रारुप करारनाम्यातील पान क्र.५ वरील मुद्दा क्र.१.१(सी) मध्ये 'निविदाकारास विकासासाठी द्यावयाचे निव्वळ क्षेत्र अंदाजे २८ एकर पैकी अंदाजे ४ एकर जागेवर आरक्षण असल्याने मा. उच्च न्यायालयामध्ये या संदर्भात दाखल असलेल्या याचिकेमध्ये होणा-या आदेशास अधीन राहून सदर अंदाजे ४ एकर जागा वगळून निविदाकारास २४ एकर जागा' असे नमूद करुन करारनामा विधी व न्याय विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

सदर प्रारुप करारनाम्यास विधी व न्याय विभागाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निविदाकारासोबत विकसन करारनामा करण्याचे नियोजन आहे.

****************************************

उपलब्ध करुन देण्यात येईल व आरक्षण असलेले ४ एकर क्षेत्र नंतर उपलब्ध करुन देण्यात येईल' असे नमूद आहे. सदर निविदेमध्ये अदानी प्रॉपटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या revenue share basis तत्वावरील महत्तम २३.१५९% इतका देकार स्वीकार करुन त्यांची यशस्वी निविदाकार म्हणून निवड करण्यात आली. त्यास अनुसरुन संचालक मंडळाच्या दि.२८.०२.२०२४ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रस्ताव मान्यतेसाठी दि.०७.०३.२०२४ रोजी शासनास पाठविण्यात आला.

सदर महामंडळाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक १६.०३.२०२४ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १२.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालील बाबी महामंडळास कळविल्या आहेत :-

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या संचालक मंडळाने दिनांक २८.०२.२०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये नगर भूमापन ए वार्ड (वांद्रे-प.), तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या न.भू.क्र.अ.अ-७९२ (पै) २,३२,४६५ चौ. मी. जागेचा विकास करण्याकरीता अदानी प्रॉपटीज प्रायव्हेट लिमिटेड यांच्या revenue share basis तत्वावरील २३.१५९% इतका देकार स्विकारण्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) च्या संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयास विषयांकीत जमिनीसंबंधात मा. सर्वोच्च न्यायालय किंवा इतर मा. न्यायालयात न्यायालयीन प्रकरणी महाराष्ट्र शासनाच्या वतीने शपथपत्र दाखल केले असल्यास त्यात नमूद भूमिकेस बाधा येणार नाही. तसेच Construction and Development Agency बरोबर करावयाच्या करारनाम्याच्या मसुद्यास विधि व न्याय विभागाची मान्यता घेणे बंधनकारक राहील तसेच प्रस्तावास अनुसरुन झालेल्या अनुषंगाने कायद्यातील सर्व तरतूदी व नियम तपासून आवश्यक कार्यवाही करण्याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सीटीएस क्र. ए.७९२ (ए वार्ड), मध्ये विकास आराखड्यात दर्शविलेले स्मशानभूमीचे आरक्षण संदर्भात मोहम्मद अल कुरेशी यांनी PIL क्र. १०१/२०१६ उच्च न्यायालयात दाखल केले आहे. सदर याचिकेमध्ये महामंडळास प्रतिवादी करण्यात आल्यानंतर आरक्षित जागा मुंबई महानगर पालिकेस हस्तांतरित करण्यास महामंडळाने तयारी दर्शविली आहे. त्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनूसार सदर जागा मुंबई महानगर पालिकेस सार्वजनिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरीता सुपूर्द करण्यासाठी प्राथमिक हद्द कायम मोजणी दिनांक १३.०५.२०२४ रोजी करण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेकडून जागेच्या हद्दीच्या खुणा भूमापन अधिकारी यांना निश्चित करुन देण्याबाबत भूमापन अधिकारी, बांद्रा यांनी महानगर पालिकेस सुचना दिल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर प्रारुप करारनाम्यातील पान क्र.५ वरील मुद्दा क्र.१.१(सी) मध्ये 'निविदाकारास विकासासाठी द्यावयाचे निव्वळ क्षेत्र अंदाजे २८ एकर पैकी अंदाजे ४ एकर जागेवर आरक्षण असल्याने मा. उच्च न्यायालयामध्ये या संदर्भात दाखल असलेल्या याचिकेमध्ये होणा-या आदेशास अधीन राहून सदर अंदाजे ४ एकर जागा वगळून निविदाकारास २४ एकर जागा' असे नमूद करुन करारनामा विधी व न्याय विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

सदर प्रारुप करारनाम्यास विधी व न्याय विभागाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निविदाकारासोबत विकसन करारनामा करण्याचे नियोजन आहे.

*****************************************

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२४ चे (पावसाळी) अधिवेशन**

**डॉ.आशिष शेलार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"वांद्रे रिक्लेमेशन येथील न.भू.क्र. ए-७९२, वांद्रे अ ब्लॉक अंतर्गत असून सदर भूखंड हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारित असणे, सदर वांद्रे अ ब्लॉकच्या विकास नियोजन आराखड्यात या भूखंडावर स्मशानभूमीचे आरक्षण प्रस्तावित करण्यात आलेले असणे. सदर स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी दिनांक ०९/०३/२०२० रोजी वांद्रे अ ब्लॉकमधील सदर आरक्षित जागा मनपाला हस्तांतरित करण्याकरता उपाध्यक्ष व संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना कळवलेले असून अद्याप पर्यंत सदर भूखंड मनपाला हस्तांतरित झालेला नसणे, त्यामुळे येथील हिंदू, मुस्लिम व ख्रिश्चन स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी सदर जागा ही महानगरपालिकेला हस्तांतरित करणे आवश्यक असणे, याचबरोबर येथील उर्वरित भूखंड विकासासाठी एमएसआरडीसी मार्फत अदानी कंपनीला देण्यात आलेला असणे, परंतु एमएसआरडीसी मार्फत अदानी कंपनीला देण्यात आलेला भूखंड हा कायदेशीर प्रक्रिया न करताच देण्यात आल्याने सदर भूखंड देखील त्यांच्याकडून मोकळा करून घेणे आवश्यक असणे, त्यामुळे या भूखंडावर हिंदू, मुस्लिम व ख्रिश्चन स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी व कायदेशीर प्रक्रिया न करताच अदानी कंपनीला दिलेला भूखंड मोकळा करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

महसूल व वन विभाग, ज्ञापन क्र. जमीन-२६१६/प्र.क्र.६३/ज-३, दिनांक ०४.११.२०१६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४० मधील तरतुदीनुसार तसेच, दिनांक ०५.०७.२०१६ रोजीच्या मंत्रीमंडळ निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. खाक्षेस-२००२/प्र.क्र.१८२/रस्ते-८, दिनांक ०५.०७.२०१६ मधील तरतुदीनुसार नगर भूमापन ए वॉर्ड (वांद्रे-प), तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथील न.भू. क्र. ए-७९२ (पै.) क्षेत्र २,३२,४६५ चौ.मी. इतकी शासकीय जमीन निर्बंधरित्या व अनर्जित रक्कम / अधिमुल्य / नजराणा / हस्तांतरण शुल्क / वापरातील बदलाबाबतचे शुल्क इत्यादी कोणत्याही प्रकारचे शुल्क भरण्याची सूट देऊन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांना महसूल मुक्त व भोगवटामूल्य विरहीत तत्वावर हस्तांतरीत करण्यास व या जमिनीच्या विकासास नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून सुपूर्द करण्यास शासनाची मान्यता दिली आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील आदेश क्र. ३अ/कावि-४८४/सीआर-४५२/२०१७, दिनांक ३०.०१.२०१७ अन्वये महसूल व वन विभागाकडील ज्ञापन दिनांक ०४.११.२०१६ च्या अनुषंगाने उक्त जमीन नमूद अटी व शर्तीस अधीन राहून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास हस्तांतर केली आहे.

महसूल व वन विभागाकडील ज्ञापन दिनांक ०४.११.२०१६ व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील आदेश दिनांक ३०.०१.२०१७ च्या अनुषंगाने जमिनीच्या मालमत्ता पत्रकामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचे नाव दाखल करण्यात आले आहे.

शासनाने दिनांक ११.०५.२०१८ रोजीच्या शासन अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र महामार्ग (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडील जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम, २०१८ प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

वांद्रे येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ताब्यातील जागा Construction & Devlopment Agency (C&DA) तत्वावर विकसित करण्यासाठी विकासक एजन्सीची नेमणूक करण्याबाबतची निविदा दि. १०.०१.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदर निविदा दस्तामध्ये Volume १ मधील पान क्र. ९ वरील पहिल्या परिच्छेदात 'महामंडळाचा ताबा असलेला नगर भूमापन ए वॉर्ड (वांद्रे-प), तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर येथील न.भू. क्र. ए-७९२ (पै.) २८ एकर क्षेत्र निविदाकारास विकासासाठी उपलब्ध करुन दिली जाईल. त्यापैकी ४ एकर क्षेत्रावर आरक्षण असल्याने २४ एकर क्षेत्र

**६९६**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२४ चे तृतीय अधिवेशन**

**श्री.मोहनराव हंबर्डे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा**

**नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६९६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजे विष्णुपुरी, ता.जि.नांदेड येथील शेतक-यांच्या प्रस्तावित जालना ते नांदेड या द्रुतगती समृध्दी महामार्ग मध्ये गट क्रमांक ३११ व गट क्रमांक ३१३ मधील जमीन बाधित झाली असणे, बाधित शेतकरी श्री. गणेशराव चंद्रोजी हंबर्डे व श्री. अप्पाराव माधवराव कल्याणकर यांच्या ७/१२ वर वर्ष २०१८-२०१९ आणि २०१९-२० पेरा असणे, तसेच IGR सूचना क्रमांक २० नूसार " गटातील संपूर्ण क्षेत्रापैकी ५०% पेक्षा अधिकच्या क्षेत्रावर जर बागायती पेरा असेल तर त्या संपुर्ण क्षेत्राला बागायती म्हणून मूल्यांकन करण्यात यावे असे शासनाचे स्पष्ट निर्देश असणे, परंतु त्या शेतक-यांना हंगामी पाणी योजना मोबदला देण्यात आलेला असणे, त्यामुळे त्या शेतक-यांनी त्यांना देण्यात आलेल्या हंगामी बागायती मोबदला नोटीस वर आक्षेप घेतला असणे, तसेच त्यांनी त्यांचा ऊस दिलेल्या कारखान्याच्या पावत्या व ईतर सर्व पुराव्यासह दि.२०/१०/२०२३ रोजी उप-विभागीय अधिकारी नांदेड यांच्याकडे पत्राद्वारे विनंती केली असणे, परंतु कार्यालयातील भ्रष्ट अधिका-यांनी चुकीचा सर्व्हे अहवाल दिल्यामूळे व शेतक-यांना खोटी आश्वासने दिल्यामूळे शेतक-यांना जमीनीच्या मोबदल्यापासुन वंच्छित रहावे लागणे, त्यामूळे शासनाने त्या अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी बाधित शेतक-यांनी केली असणे, व त्यांच्या जमिनीला मोबदला हंगामी बागायती न देता बारमाही बागायती मोबदला व निवाडा रक्कम तातडीने देण्याबाबत शासनाने तातडीने कारवाई किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया"

.....................................................................................................................

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

हिंदुह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गास जोडणारा जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गाचे भुसंपादन महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ अन्वये प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पात मौ.विष्णुपुरी, ता. नांदेड येथील गट क्र.३११ मधील श्री गणेश चंद्रु हंबर्डे यांची ०.५२८६ हे. व अप्पाराव माधवराव कल्याणकर व इतर ०३ यांची गट क्र.३१३ मधील १.१४४० हे. जमीन संपादीत झाली आहे.

सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना क्रमांक २० अ मध्ये नमूद केल्यानुसार ग्रामीण क्षेत्रात शेतजमीनीचे मुल्यांकन करताना त्या जमिनीचे मागील ३ वर्षाचे ७/१२ उतारे पाहून व त्यावरील पिकपाण्याची व इतर शे-यांची नोंद पाहून जमिनीचा प्रकार (पड, जिरायत, तरीपॅडी, हंगामी बागायत, बारमाही बागायत इ.) ठरविण्यात यावा, संपूर्ण जमीन क्षेत्राच्या ५०% पेक्षा जास्त क्षेत्रावर विहीर / कॅनॉल /उपसा जलसिंचन इत्यादी द्वारा ऊस /फळबाग /फुलबाग असल्यास संपुर्ण क्षेत्राचे मुल्यांकन बारमाही बागायत म्हणून व ५०% पेक्षा कमी क्षेत्रावर वरील उपलब्ध सुविधाद्वारा ऊस/ फळबाग / फुलबाग असल्यास तेवढ्या क्षेत्राचे बागायत म्हणून मुल्यांकन करावे व उर्वरित क्षेत्राचे पिकपाणी विचारात घेवून, जिरायत /हंगामी बागायत म्हणून मुल्यांकन करावे, ७/१२ उता-यावर पीक पे-यामध्ये ऊस / फळबाग /फूलबाग इत्यादी यांचे क्षेत्र नमूद नसल्यास ७/१२ उता-यावरील सिंचन सोय विचारात घेऊन हंगामी बागायत /बागायत म्हणून मुल्यांकन करावे अशी तरतुद आहे.

संबंधित शेतकरी यांचे ७/१२ उताऱ्यावर सन-२०१८-२०१९, सन २०१९-२०२० या दोन वर्षाची बागायती पिकाची नोंद आहे. परंतु, महाराष्ट्र शासन वार्षिक मुल्य दर तक्ता २०२०-२०२१ मधील सूचना क्रमांक २० (अ) च्या तरतूदींनुसार श्री.अप्पाराव माधवराव कल्याणकर व श्री.गणेश चंद्रु हंबर्डे यांचे ७/१२ सदरी सन २०१८-२०१९, २०१९-२०२० आणि २०२०-२०२१ असे तीन वर्ष बागायती पिकांची नोंद असणे आवश्यक होते. मात्र संबंधीतांच्या ७/१२ सन २०२०-२०२१ मध्ये पिकपाणी सदरी बागायती पिकाची नोंद नसल्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील "जिल्हास्तरीय मुल्यांकन समितीने" त्यांचे संपादित होत असलेल्या जमीनीस हंगामी बागायती दराने मोबदला निश्चित केला आहे.



[ क्र.मा.५

००१



संबंधीतांच्या संपादित होत असलेल्या जमीनीचा मोबदला हंगामी बागायती निश्चित करण्यात आल्याने त्याबाबत सन २०२०-२०२१ मध्ये साखर कारखान्यास ऊस दिल्याच्या पावत्या सादर करुन त्यांचे संपादित होत असलेल्या जमीनीस हंगामी बागायत दराऐवजी बारमाही बागायत दराने मोबदला मिळण्याबाबत दिनांक २३.१०.२०२३ रोजी अर्ज उपविभागीय अधिकारी, नांदेड यांच्याकडे सादर केला होता. सदर अर्ज व कागदपत्रे जिल्हास्तरीय मूल्यांकन समिती समोर आवश्यक त्या कार्यवाहीस्तव भुसंपादन अधिकारी यांना सादर करण्यात आली होती. मात्र जिल्हास्तरीय मुल्यांकन समिती मार्फत सर्वंकष विचार करुन संबंधीत अर्जदार यांच्या जमीनीस हंगामी बागायतीचा दर निश्चित केला आहे.

संबंधीतास संपादित होत असलेल्या जमीनीची जिल्हास्तरीय मुल्यांकन समितीने दर निश्चिती करुन महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे कलम १९ (ब) (६) अन्वये संमती दिल्यास देय मोबदला रक्कम व विनासंमती देय मोबदला रकमेची नोंद करुन नोटीस देण्यात आली होती. संबंधीतांनी विहीत कालावधीत संमती न दिल्यामुळे दिनांक ११.०३.२०२४ रोजी त्यांचे संपादित होत असलेल्या जमीनीचा विनासंमती निवाडा पारीत करुन संबंधीतास कलम १९ (१) अन्वये देय मावेजा रक्कम स्वीकारणेबाबत नोटीस देण्यात आली आहे. त्यानुसार, संबंधीतांनी ताबा पावती व सि.सि.फॉर्मवर स्वाक्षऱ्या करुन दिलेल्या आहेत. यास्तव, विनासंमती निवाडयानुसार देय मावेजा रक्कम त्यांच्या खात्यावर दिनांक २५.०६.२०२४ रोजी जमा करण्यात आला आहे.

सदर मोबदला संबंधीत भूधारक यांना मान्य नसल्यास महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ च्या कलम १९ (ब) (८) नुसार नेमण्यात आलेल्या लवादाकडे अर्ज करता येईल.

******************************

संबंधीतांच्या संपादित होत असलेल्या जमीनीचा मोबदला हंगामी बागायती निश्चित करण्यात आल्याने त्याबाबत सन २०२०-२०२१ मध्ये साखर कारखान्यास ऊस दिल्याच्या पावत्या सादर करुन त्यांचे संपादित होत असलेल्या जमीनीस हंगामी बागायत दराऐवजी बारमाही बागायत दराने मोबदला मिळण्याबाबत दिनांक २३.१०.२०२३ रोजी अर्ज उपविभागीय अधिकारी, नांदेड यांच्याकडे सादर केला होता. सदर अर्ज व कागदपत्रे जिल्हास्तरीय मूल्यांकन समिती समोर आवश्यक त्या कार्यवाहीस्तव भुसंपादन अधिकारी यांना सादर करण्यात आली होती. मात्र जिल्हास्तरीय मुल्यांकन समिती मार्फत सर्वंकष विचार करुन संबंधीत अर्जदार यांच्या जमीनीस हंगामी बागायतीचा दर निश्चित केला आहे.

संबंधीतास संपादित होत असलेल्या जमीनीची जिल्हास्तरीय मुल्यांकन समितीने दर निश्चिती करुन महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे कलम १९ (ब) (६) अन्वये संमती दिल्यास देय मोबदला रक्कम व विनासंमती देय मोबदला रकमेची नोंद करुन नोटीस देण्यात आली होती. संबंधीतांनी विहीत कालावधीत संमती न दिल्यामुळे दिनांक ११.०३.२०२४ रोजी त्यांचे संपादित होत असलेल्या जमीनीचा विनासंमती निवाडा पारीत करुन संबंधीतास कलम १९ (१) अन्वये देय मावेजा रक्कम स्वीकारणेबाबत नोटीस देण्यात आली आहे. त्यानुसार, संबंधीतांनी ताबा पावती व सि.सि.फॉर्मवर स्वाक्षऱ्या करुन दिलेल्या आहेत. यास्तव, विनासंमती निवाडयानुसार देय मावेजा रक्कम त्यांच्या खात्यावर दिनांक २५.०६.२०२४ रोजी जमा करण्यात आला आहे.

सदर मोबदला संबंधीत भूधारक यांना मान्य नसल्यास महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ च्या कलम १९ (ब) (८) नुसार नेमण्यात आलेल्या लवादाकडे अर्ज करता येईल.

**********************************

६९६

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२४ चे तृतीय अधिवेशन**
**श्री.मोहनराव हंबर्डे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा**
**नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६९६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजे विष्णुपुरी, ता.जि.नांदेड येथील शेतक-यांच्या प्रस्तावित जालना ते नांदेड या द्रुतगती समृध्दी महामार्ग मध्ये गट क्रमांक ३११ व गट क्रमांक ३१३ मधील जमीन बाधित झाली असणे, बाधित शेतकरी श्री. गणेशराव चंद्रोजी हंबर्डे व श्री. अप्पाराव माधवराव कल्याणकर यांच्या ७/१२ वर वर्ष २०१८-२०१९ आणि २०१९-२० पेरा असणे, तसेच IGR सूचना क्रमांक २० नूसार " गटातील संपूर्ण क्षेत्रापैकी ५०% पेक्षा अधिकच्या क्षेत्रावर जर बागायती पेरा असेल तर त्या संपुर्ण क्षेत्राला बागायती म्हणून मूल्यांकन करण्यात यावे असे शासनाचे स्पष्ट निर्देश असणे, परंतु त्या शेतक-यांना हंगामी पाणी योजना मोबदला देण्यात आलेला असणे, त्यामुळे त्या शेतक-यांनी त्यांना देण्यात आलेल्या हंगामी बागायती मोबदला नोटीस वर आक्षेप घेतला असणे, तसेच त्यांनी त्यांचा ऊस दिलेल्या कारखान्याच्या पावत्या व ईतर सर्व पुराव्यासह दि.२०/१०/२०२३ रोजी उप-विभागीय अधिकारी नांदेड यांच्याकडे पत्राद्वारे विनंती केली असणे, परंतु कार्यालयातील भ्रष्ट अधिका-यांनी चुकीचा सर्व्हे अहवाल दिल्यामूळे व शेतक-यांना खोटी आश्वासने दिल्यामूळे शेतक-यांना जमीनीच्या मोबदल्यापासुन वंच्छित रहावे लागणे, त्यामुळे शासनाने त्या अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी बाधित शेतक-यांनी केली असणे, व त्यांच्या जमिनीला मोबदला हंगामी बागायती न देता बारमाही बागायती मोबदला व निवाडा रक्कम तातडीने देण्याबाबत शासनाने तातडीने कारवाई किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया"

..........................................................................................................

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

हिंदुह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गास जोडणारा जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गाचे भुसंपादन महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ अन्वये प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पात मौ.विष्णुपुरी, ता. नांदेड येथील गट क्र.३११ मधील श्री गणेश चंद्रु हंबर्डे यांची ०.५२८६ हे. व अप्पाराव माधवराव कल्याणकर व इतर ०३ यांची गट क्र.३१३ मधील १.१४४० हे. जमीन संपादीत झाली आहे.

सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना क्रमांक २० अ मध्ये नमूद केल्यानुसार ग्रामीण क्षेत्रात शेतजमीनीचे मुल्यांकन करताना त्या जमिनीचे मागील ३ वर्षाचे ७/१२ उतारे पाहून व त्यावरील पिकपाण्याची व इतर शे-यांची नोंद पाहून जमिनीचा प्रकार (पड, जिरायत, तरीपॅडी, हंगामी बागायत, बारमाही बागायत इ.) ठरविण्यात यावा, संपूर्ण जमीन क्षेत्राच्या ५०% पेक्षा जास्त क्षेत्रावर विहीर / कॅनॉल /उपसा जलसिंचन इत्यादी द्वारा ऊस /फळबाग /फुलबाग असल्यास संपुर्ण क्षेत्राचे मुल्यांकन बारमाही बागायत म्हणून व ५०% पेक्षा कमी क्षेत्रावर वरील उपलब्ध सुविधाद्वारा ऊस/ फळबाग / फुलबाग असल्यास तेवढ्या क्षेत्राचे बागायत म्हणून मुल्यांकन करावे व उर्वरित क्षेत्राचे पिकपाणी विचारात घेवून, जिरायत /हंगामी बागायत म्हणून मुल्यांकन करावे, ७/१२ उता-यावर पीक पे-यामध्ये ऊस / फळबाग /फूलबाग इत्यादी यांचे क्षेत्र नमूद नसल्यास ७/१२ उता-यावरील सिंचन सोय विचारात घेऊन हंगामी बागायत /बागायत म्हणून मुल्यांकन करावे अशी तरतुद आहे.

संबंधित शेतकरी यांचे ७/१२ उताऱ्यावर सन-२०१८-२०१९, सन २०१९-२०२० या दोन वर्षाची बागायती पिकाची नोंद आहे. परंतु, महाराष्ट्र शासन वार्षिक मुल्य दर तक्ता २०२०-२०२१ मधील सूचना क्रमांक २० (अ) च्या तरतूदींनुसार श्री.अप्पाराव माधवराव कल्याणकर व श्री.गणेश चंद्रु हंबर्डे यांचे ७/१२ सदरी सन २०१८-२०१९, २०१९-२०२० आणि २०२०-२०२१ असे तीन वर्ष बागायती पिकांची नोंद असणे आवश्यक होते. मात्र संबंधीतांच्या ७/१२ सन २०२०-२०२१ मध्ये पिकपाणी सदरी बागायती पिकाची नोंद नसल्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील "जिल्हास्तरीय मुल्यांकन समितीने" त्यांचे संपादित होत असलेल्या जमीनीस हंगामी बागायती दराने मोबदला निश्चित केला आहे.

२१२१-एम-551 (720-7-24

[ क्र.मा.५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती जयश्री जाधव, डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.मोहनराव हंबर्डे, श्री.ऋतुराज पाटील, श्री.विजय वडेट्टीवार, श्री. सुरेश वरपुडकर, डॉ.नितिन राऊत, श्री. अस्लम शेख, श्री.धिरज देशमुख, श्री.अमित झनक, श्री. सुभाष धोटे, श्री.संजय जगताप, श्री.विक्रमसिंह सावंत, श्री.विनोद निकोले, श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ, श्री. राजु आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७३३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्र सरकारने गोवा ते नागपूर असा ८०६ किलोमीटरचा शक्तिपीठ महामार्ग करणार असल्याचे जाहीर केले असणे, याकरिता ४० हजार एकर जमीन संपादित केली जाणार असून ८६ हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. तसेच या महामार्गास बारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असणे, राज्यातील कोणत्याही नागरिकांनी समूहाने किंवा संघटनेने या महामार्गाची मागणी केलेली नसणे, तरीदेखील शेतकऱ्यांशी चर्चा न करताच हा प्रकल्प रेटला गेला आहे. या महामार्गामध्ये संपादित होणारी जमीन ही बहुतांश बागायत आहे. पर्यावरण, जैवविविधता, जलस्रोत, भूजल पातळी, नदी, विहिरी, कालवे पाण्याच्या पाईपलाईन, शेती या सर्व गोष्टी या महामार्गामुळे नष्ट होणार असणे, पर्यायी महामार्ग असताना हा महामार्ग केवळ कंत्राटदार, रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी व मंत्री यांच्या संगनमताने लाभाच्या उद्देशाने तयार होत असणे, प्रस्तावित नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असणे, तसेच कोल्हापुरात शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या वतीने दिनांक १८ जून रोजी वा त्या दरम्यान, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह हजारो शेतकऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात आलेला असणे, शासनाने हा महामार्ग १२ जुलैपर्यंत रद्द करावा अन्यथा त्यानंतर हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असा इशारा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रशासनाला दिला असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर सर्व धार्मिक स्थळांच्या सर्वांगिण विकासासाठी तसेच पर्यटनांच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यातील पवनार जि. वर्धा ते पत्रादेवी जि.सिंधुदुर्ग या महाराष्ट्र - गोवा सरहद्द पर्यंतच्या प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे (महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग) बांधकाम करण्याची घोषणा दिनांक ०९ मार्च, २०२३ च्या अर्थसंकल्पिय भाषणात तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी केली होती.

महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रस्तावित मुंबई-नागपूर, नागपूर-गोवा व मुंबई-गोवा या गोल्डन ट्रॅंगल शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गामुळे राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी २६ जिल्हे शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गाने जोडले जाणार असून, त्यामुळे राज्यातील शेतीमाल व औद्योगिक उत्पादने यांची वाहतूक कमी खर्चात होऊन राज्याच्या सर्वांगीण विकासास चालना मिळणार आहे.

प्रस्तावित महामार्ग हा वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातुर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधदुर्ग या १२ जिल्ह्यातून पुढे गोवा महाराष्ट्र सरहद्दीवर जोडणे प्रस्तावित आहे. सदर द्रुतगती महामार्गामुळे महाराष्ट्रातील प्रमुख शक्तीपीठे माहुर, तुळजापूर व कोल्हापूर, तसेच अंबाजोगाई ही तिर्थक्षेत्र जोडली जाणार असून संताची कर्मभूमी असलेले मराठीचे आद्यकवी अंबेजोगाई स्थित मुकुंदराज स्वामी, औंढानागनाथ व परळी वैद्यनाथ येथील १२ ज्योर्तिलिंग पैकी दोन ज्योर्तिलिंग व महाराष्ट्राचे आराध्यदैवत पंढरपूर येथील विठ्ठल-रुखमाईचे मंदीर ही जोडले जाणार आहे. तसेच कारंजा (लाड), माहुर,

अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औंदुबर ही दत्त गुरुची धार्मिक स्थळेही जोडली जातील. अंतीमतः महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोकण विभाग एकत्र जोडून गोवा राज्याशी कमीत कमी अंतराने जोडले जाईल.

यास अनुसरुन पवनार जि. वर्धा ते पत्रादेवी जि. सिंधुदुर्ग या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाची (महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग) आखणी शासन निर्णय दि.०७.०२.२०२४ अन्वये अंतिम केले असून, सदर महामार्गाचा विकास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता पवनार ते पत्रादेवी (नागपुर - गोवा) महाराष्ट्र शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग महामार्गाच्या अंतिम केलेल्या आखणीनुसार प्रकल्पात समाविष्ट होत असलेल्या जमिनीस शासन अधिसूचना दि.२८.०२.२०२४ अन्वये महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम ३ नुसार राज्य महामार्ग (विशेष) क्र. १० घोषित करण्यात आला आहे.

आरेखनात समाविष्ट जमीन भूसंपादन करणेप्रकरणी महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १५ (२) अन्वये प्रारंभिक अधिसूचना दि.०७.०३.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रस्तावित महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग १२ जिल्ह्यातील एकुण ३९ तालुक्यांतील ३७२ गावांमधुन प्रस्तावित असून त्याची अंदाजित लांबी ८०२.५९२ किमी आहे. अंतिम आखणी अहवालानुसार प्रकल्पाचा भूसंपादनासह अपेक्षित खर्च रु.८६३५८ कोटी आहे.

सदर प्रस्तावित महामार्गासाठी एकूण १२ जिल्ह्यांमधील साधारणतः ९३८५.३६ हे. जमिन संपादित करावी लागणार आहे.

सदर महामार्गांचे भूसंपादन करणेकामी शासन अधिसूचना दि.०७.०३.२०२४ अन्वये महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १५(४) नूसार संबंधित उपविभागीय अधिकारी यांना 'भूसंपादन अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

महामंडळाने जिल्हानिहाय भूसंपादन प्रस्ताव संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केले आहेत. त्यानुसार संबंधीत जिल्हाधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांना भूसंपादनाबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत निर्देशित केले आहे. उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी अधिसूचित क्षेत्रामध्ये संयुक्त मोजणी करणेस्तव संबंधीत तालुक्यांच्या उपअधीक्षक भूमी अभिलेख यांना मोजणी फी कळविणेबाबत सूचित केले आहे.

महामार्गाच्या कोल्हापूर, सांगली, नांदेड जिल्हयातील काही अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित होत असल्याने, त्यांचा विरोध दर्शविणारी निवेदने महामंडळास प्राप्त झाली आहेत. कोल्हापूर जिल्हयातील शेतकरी सदरील महामार्गास विरोध करत असून, दि.१८ जून, २०२४ रोजी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता.

शेतकऱ्यांच्या निवेदनांबाबत सर्वकष विचार करुन, तसेच प्रत्यक्ष परिस्थितचा आढावा घेऊन शेतकरी / भूधारक यांना विश्वासात घेण्यात येईल. त्यानंतरच सदर प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांचे / भूधारकांचे नुकसान होणार नाही, या दृष्टीने शासन पुढील योग्य तो निर्णय घेईल.

******

अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औंदुबर ही दत्त गुरुची धार्मिक स्थळेही जोडली जातील. अंतीमतः महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोकण विभाग एकत्र जोडून गोवा राज्याशी कमीत कमी अंतराने जोडले जाईल.

यास अनुसरुन पवनार जि. वर्धा ते पत्रादेवी जि. सिंधुदुर्ग या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाची (महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग) आखणी शासन निर्णय दि.०७.०२.२०२४ अन्वये अंतिम केले असून, सदर महामार्गाचा विकास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता पवनार ते पत्रादेवी (नागपुर - गोवा) महाराष्ट्र शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग महामार्गाच्या अंतिम केलेल्या आखणीनुसार प्रकल्पात समाविष्ट होत असलेल्या जमिनीस शासन अधिसूचना दि.२८.०२.२०२४ अन्वये महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम ३ नुसार राज्य महामार्ग (विशेष) क्र. १० घोषित करण्यात आला आहे.

आरेखनात समाविष्ट जमीन भूसंपादन करणेप्रकरणी महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १५ (२) अन्वये प्रारंभिक अधिसूचना दि.०७.०३.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रस्तावित महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग १२ जिल्ह्यातील एकुण ३९ तालुक्यांतील ३७२ गावांमधुन प्रस्तावित असून त्याची अंदाजित लांबी ८०२.५९२ किमी आहे. अंतिम आखणी अहवालानुसार प्रकल्पाचा भूसंपादनासह अपेक्षित खर्च रु.८६३५८ कोटी आहे.

सदर प्रस्तावित महामार्गासाठी एकूण १२ जिल्ह्यांमधील साधारणतः ९३८५.३६ हे. जमिन संपादित करावी लागणार आहे.

सदर महामार्गाचे भूसंपादन करणेकामी शासन अधिसूचना दि.०७.०३.२०२४ अन्वये महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १५(४) नूसार संबंधित उपविभागीय अधिकारी यांना 'भूसंपादन अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

महामंडळाने जिल्हानिहाय भूसंपादन प्रस्ताव संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केले आहेत. त्यानुसार संबंधीत जिल्हाधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांना भूसंपादनाबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत निर्देशित केले आहे. उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी अधिसूचित क्षेत्रामध्ये संयुक्त मोजणी करणेस्तव संबंधीत तालुक्यांच्या उपअधीक्षक भूमी अभिलेख यांना मोजणी फी कळविणेबाबत सूचित केले आहे.

महामार्गाच्या कोल्हापूर, सांगली, नांदेड जिल्हयातील काही अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित होत असल्याने, त्यांचा विरोध दर्शविणारी निवेदने महामंडळास प्राप्त झाली आहेत. कोल्हापूर जिल्हयातील शेतकरी सदरील महामार्गास विरोध करत असून, दि.१८ जून, २०२४ रोजी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता.

शेतकऱ्यांच्या निवेदनांबाबत सर्वकष विचार करुन, तसेच प्रत्यक्ष परिस्थितचा आढावा घेऊन शेतकरी / भूधारक यांना विश्वासात घेण्यात येईल. त्यानंतरच सदर प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांचे / भूधारकांचे नुकसान होणार नाही, या दृष्टीने शासन पुढील योग्य तो निर्णय घेईल.

******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती जयश्री जाधव, डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.मोहनराव हंबर्डे, श्री.ऋतुराज पाटील, श्री.विजय वडेट्टीवार, श्री. सुरेश वरपुडकर, डॉ.नितिन राऊत, श्री. अस्लम शेख, श्री.धिरज देशमुख, श्री.अमित झनक, श्री. सुभाष धोटे, श्री.संजय जगताप, श्री.विक्रमसिंह सावंत, श्री.विनोद निकोले, श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ, श्री. राजु आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७३३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्र सरकारने गोवा ते नागपूर असा ८०६ किलोमीटरचा शक्तिपीठ महामार्ग करणार असल्याचे जाहीर केले असणे, याकरिता ४० हजार एकर जमीन संपादित केली जाणार असून ८६ हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. तसेच या महामार्गास बारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असणे, राज्यातील कोणत्याही नागरिकांनी समूहाने किंवा संघटनेने या महामार्गाची मागणी केलेली नसणे, तरीदेखील शेतकऱ्यांशी चर्चा न करताच हा प्रकल्प रेटला गेला आहे. या महामार्गामध्ये संपादित होणारी जमीन ही बहुतांश बागायत आहे. पर्यावरण, जैवविविधता, जलस्रोत, भूजल पातळी, नदी, विहिरी, कालवे पाण्याच्या पाईपलाईन, शेती या सर्व गोष्टी या महामार्गामुळे नष्ट होणार असणे, पर्यायी महामार्ग असताना हा महामार्ग केवळ कंत्राटदार, रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी व मंत्री यांच्या संगनमताने लाभाच्या उद्देशाने तयार होत असणे, प्रस्तावित नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असणे, तसेच कोल्हापुरात शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या वतीने दिनांक १८ जून रोजी वा त्या दरम्यान, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह हजारो शेतकऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात आलेला असणे, शासनाने हा महामार्ग १२ जुलैपर्यंत रद्द करावा अन्यथा त्यानंतर हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल असा इशारा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रशासनाला दिला असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर सर्व धार्मिक स्थळांच्या सर्वांगिण विकासासाठी तसेच पर्यटनांच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यातील पवनार जि. वर्धा ते पत्रादेवी जि.सिंधुदुर्ग या महाराष्ट्र - गोवा सरहद्द पर्यंतच्या प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे (महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग) बांधकाम करण्याची घोषणा दिनांक ०९ मार्च, २०२३ च्या अर्थसंकल्पिय भाषणात तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी केली होती.

महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रस्तावित मुंबई-नागपूर, नागपूर-गोवा व मुंबई-गोवा या गोल्डन ट्रँगल शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गामुळे राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी २६ जिल्हे शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गाने जोडले जाणार असून, त्यामुळे राज्यातील शेतीमाल व औद्योगिक उत्पादने यांची वाहतूक कमी खर्चात होऊन राज्याच्या सर्वांगीण विकासास चालना मिळणार आहे.

प्रस्तावित महामार्ग हा वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातुर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधदुर्ग या १२ जिल्ह्यातून पुढे गोवा महाराष्ट्र सरहद्दीवर जोडणे प्रस्तावित आहे. सदर द्रुतगती महामार्गामुळे महाराष्ट्रातील प्रमुख शक्तीपीठे माहुर, तुळजापूर व कोल्हापूर, तसेच अंबाजोगाई ही तिर्थक्षेत्र जोडली जाणार असून संताची कर्मभूमी असलेले मराठीचे आद्यकवी अंबेजोगाई स्थित मुकुंदराज स्वामी, औंढानागनाथ व परळी वैद्यनाथ येथील १२ ज्योर्तिलिंग पैकी दोन ज्योर्तिलिंग व महाराष्ट्राचे आराध्यदैवत पंढरपूर येथील विठ्ठल-रुखमाईचे मंदीर ही जोडले जाणार आहे. तसेच कारंजा (लाड), माहुर,

१५९५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती श्वेता महाले, डॉ.राजेंद्र शिंगणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५९५ पुढीलप्रमाणे आहे :-

"बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव ते सिंदखेडराजा या भक्ती महामार्गासाठी मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात घोषणा झालेली असणे, सदर भक्ती मार्ग सिंदखेडराजा, देऊळगावराजा, चिखली, खामगाव, शेगाव या तालुक्यातील ४३ गावांतून जात असणे, त्यामुळे या सर्व गावात शेतकऱ्यांची सुपीक व कसदार जमीन अधिग्रहीत करण्यात येत असणे, याबाबतची अधिसूचना देखील प्रसिध्द झालेली असणे, सदर अधिग्रहण सुचनेमुळे शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण होणे, प्रस्तावित भक्ती महामार्गामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात भूमिहीन होणार असणे, सदर ४३ गावांतील शेतकऱ्यांचा या भक्ती मार्गाला विरोध असणे, तसेच ग्रामपंचायतींनी ठराव तयार करून जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेमार्फत मुख्यमंत्री यांचेकडे सादर केलेला असणे, शेतकऱ्यांचा असंतोष पहाता सदर भक्ती महामार्गासाठी ४३ गावातील शेतकऱ्यांच्या शेत जमिनी संपादित करण्यात येऊ नये व प्रस्तावित शेगाव ते सिंदखेड राजा हा भक्ती महामार्ग रद्द करण्यात यावा अशी होणारी मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन

श्री संत गजानन महाराजांच्या वास्तव्यामुळे शेगाव हे विदर्भातील एक पवित्र धार्मिक तीर्थक्षेत्र बनले आहे. शेगावला कापसाची मोठी बाजारपेठ आहे. शेगावच्या परिसरात कापूस जिनिंग आणि प्रेसिंगचे मोठे जाळे असून मिलमधील उत्पादन राज्यातील अन्य ठिकाणी कापड निर्मितीसाठी माल गाड्यांद्वारे नेला जातो. तसेच, सिंदखेड राजा हे माँसाहेब जिजाऊ यांचे जन्मस्थान आहे.

सद्यस्थितीत शेगाव हे विभाजकासह चौपदरी मार्गिका व दुपदरी मार्गिका असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या नेटवर्कने जोडलेले आहे. नुकतेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग नागपूर ते इगतपूरी हा सुमारे ६२५ किलोमीटरचा महामार्ग पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

प्रस्तावित प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग १०९.५२७ कि.मी. मुळे सिंदखेड राजा ते शेगाव हे अंतर कमी वेळेत पार करणे शक्य होईल व वाहन इंधन, देखभाल व दुरुस्तीवरील खर्च कमी होईल तसेच नवीन ग्रीनफील्ड आखणीवर दोन्ही बाजूस सुविधा केंद्रे, पथकर नाके व प्रवेश नियंत्रित प्रणाली प्रस्तावित आहेत.

रोटा H/391 (७५०-७-२४)

८ कृ.भा.प.

दि.०९ मार्च,२०२३ रोजीच्या अर्थसंकल्पीय भाषणाद्वारे मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा विस्तार करून सिंदखेडराजा नोड ते शेगावपर्यंत चौपदरी महामार्ग बांधण्यात येईल अशी घोषणा केली.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी प्रकल्पाचा प्राथमिक आखणी प्रस्ताव तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती केली आहे. सद्य:स्थितीत सल्लागाराचे काम प्रगतीपथावर आहे. शेगाव-सिंदखेडराजा भक्ती मार्गाची अंदाजित लांबी १०९.५२७ कि.मी. आहे. प्रकल्पाच्या आरेखनानुसार अंदाजे ११०७.६९ हे. जमीन संपादित करण्याचे प्रस्तावित आहे. ढोबळमानाने प्रकल्पाचा भूसंपादनासह अपेक्षित खर्च रु. ५८६७.१४ कोटी एवढा आहे.

प्रस्तावित भक्ती महामार्गाच्या अंतिम आखणीस शासनाने खाक्षेस-२०२४/प्र.क्र.३९/रस्ते-८, दि.०७.०२.२०२४ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सिंदखेडराजा ते शेगाव भक्ती महामार्गाच्या अंतिम केलेल्या आखणीनुसार प्रकल्पात समाविष्ट होत असलेल्या जमिनीस शासन अधिसूचना क्र. खाक्षेस-२०२४/प्र.क्र.७१/रस्ते-८, दि. १६.०२.२०२४ अन्वये महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम ३ नुसार राज्य महामार्ग (विशेष) क्र. १२ म्हणून अधिसूचित केले आहे.

प्रकल्पाच्या भुसंपादन प्रक्रियेतील विलंब टाळण्याच्या व प्रकल्पाचे काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने संपादनाचा उद्देश घोषित करण्याबाबत महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १५ च्या पोट-कलम २ अन्वये प्रारंभिक अधिसूचना क्र.खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१०७/रस्ते-८, दि.०८.०३.२०२४ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत मा. डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे, विधानसभा सदस्य (सिंदखेडराजा मतदार संघ) यांनी त्यांचे दि.२०.०३.२०२४ च्या पत्रानुसार सदर महामार्ग रद्द करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनात त्यांनी प्रस्तावित भक्ती महामार्गामुळे शेतकरी मोठया प्रमाणात भूमीहीन होणार आहेत व सिंदखेडराजा, देऊळगावराजा, चिखली, खामगाव, शेगाव या तालुक्यांमधील ४३ गावांतील शेतक-यांचा महामार्गास विरोध आहे असे कळविले आहे. श्री. समाधान म्हस्के व इतर ४ शेतकरी भक्तीमार्ग विरोधी समिती, बुलढाणा यांचे जिल्हादंडाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांना पाठविलेले निवेदन महामंडळास प्राप्त झाले असून त्याअन्वये त्यांनी भक्तीमार्गास विरोध दर्शविला आहे.

शेतकऱ्यांच्या निवेदनांबाबत सर्वंकष विचार करुन, तसेच प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकरी/भूधारक यांना विश्वासात घेण्यात येईल. त्यानंतरच सदर प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांचे/भूधारकांचे नुकसान होणार नाही, या दृष्टीने शासन पुढील योग्य तो निर्णय घेईल.

*********************

दि.०९ मार्च,२०२३ रोजीच्या अर्थसंकल्पीय भाषणाद्वारे मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा विस्तार करून सिंदखेडराजा नोड ते शेगावपर्यंत चौपदरी महामार्ग बांधण्यात येईल अशी घोषणा केली.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी प्रकल्पाचा प्राथमिक आखणी प्रस्ताव तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती केली आहे. सद्य:स्थितीत सल्लागाराचे काम प्रगतीपथावर आहे. शेगाव-सिंदखेडराजा भक्ती मार्गाची अंदाजित लांबी १०९.५२७ कि.मी. आहे. प्रकल्पाच्या आरेखनानुसार अंदाजे ११०७.६९ हे. जमीन संपादित करण्याचे प्रस्तावित आहे. ढोबळमानाने प्रकल्पाचा भूसंपादनासह अपेक्षित खर्च रु. ५८६७.१४ कोटी एवढा आहे.

प्रस्तावित भक्ती महामार्गाच्या अंतिम आखणीस शासनाने खाक्षेस-२०२४/प्र.क्र.३९/रस्ते-८, दि.०७.०२.२०२४ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. सिंदखेडराजा ते शेगाव भक्ती महामार्गाच्या अंतिम केलेल्या आखणीनुसार प्रकल्पात समाविष्ट होत असलेल्या जमिनीस शासन अधिसूचना क्र. खाक्षेस-२०२४/प्र.क्र.७१/रस्ते-८, दि. १६.०२.२०२४ अन्वये महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम ३ नुसार राज्य महामार्ग (विशेष) क्र. १२ म्हणून अधिसूचित केले आहे.

प्रकल्पाच्या भुसंपादन प्रक्रियेतील विलंब टाळण्याच्या व प्रकल्पाचे काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने संपादनाचा उद्देश घोषित करण्याबाबत महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाच्या कलम १५ च्या पोट-कलम २ अन्वये प्रारंभिक अधिसूचना क्र.खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१०७/रस्ते-८, दि.०८.०३.२०२४ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत मा. डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे, विधानसभा सदस्य (सिंदखेडराजा मतदार संघ) यांनी त्यांचे दि.२०.०३.२०२४ च्या पत्रानुसार सदर महामार्ग रद्द करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनात त्यांनी प्रस्तावित भक्ती महामार्गामुळे शेतकरी मोठया प्रमाणात भूमीहीन होणार आहेत व सिंदखेडराजा, देऊळगावराजा, चिखली, खामगाव, शेगाव या तालुक्यांमधील ४३ गावांतील शेतक-यांचा महामार्गास विरोध आहे असे कळविले आहे. श्री. समाधान म्हस्के व इतर ४ शेतकरी भक्तीमार्ग विरोधी समिती, बुलढाणा यांचे जिल्हादंडाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांना पाठविलेले निवेदन महामंडळास प्राप्त झाले असून त्याअन्वये त्यांनी भक्तीमार्गास विरोध दर्शविला आहे.

शेतकऱ्यांच्या निवेदनांबाबत सर्वंकष विचार करुन, तसेच प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकरी/भूधारक यांना विश्वासात घेण्यात येईल. त्यानंतरच सदर प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांचे/भूधारकांचे नुकसान होणार नाही, या दृष्टीने शासन पुढील योग्य तो निर्णय घेईल.

**********************

१५९५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती श्वेता महाले, डॉ.राजेंद्र शिंगणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५९५ पुढीलप्रमाणे आहे :-

"बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव ते सिंदखेडराजा या भक्ती महामार्गासाठी मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात घोषणा झालेली असणे, सदर भक्ती मार्ग सिंदखेडराजा, देऊळगावराजा, चिखली, खामगाव, शेगाव या तालुक्यातील ४३ गावांतून जात असणे, त्यामुळे या सर्व गावात शेतकऱ्यांची सुपीक व कसदार जमीन अधिग्रहीत करण्यात येत असणे, याबाबतची अधिसूचना देखील प्रसिध्द झालेली असणे, सदर अधिग्रहण सुचनेमुळे शेतकरी वर्गात प्रचंड असंतोष निर्माण होणे, प्रस्तावित भक्ती महामार्गामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात भूमिहीन होणार असणे, सदर ४३ गावांतील शेतकऱ्यांचा या भक्ती मार्गाला विरोध असणे, तसेच ग्रामपंचायतींनी ठराव तयार करून जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेमार्फत मुख्यमंत्री यांचेकडे सादर केलेला असणे, शेतकऱ्यांचा असंतोष पहाता सदर भक्ती महामार्गासाठी ४३ गावातील शेतकऱ्यांच्या शेत जमिनी संपादित करण्यात येऊ नये व प्रस्तावित शेगाव ते सिंदखेड राजा हा भक्ती महामार्ग रद्द करण्यात यावा अशी होणारी मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे निवेदन

श्री संत गजानन महाराजांच्या वास्तव्यामुळे शेगाव हे विदर्भातील एक पवित्र धार्मिक तीर्थक्षेत्र बनले आहे. शेगावला कापसाची मोठी बाजारपेठ आहे. शेगावच्या परिसरात कापूस जिनिंग आणि प्रेसिंगचे मोठे जाळे असून मिलमधील उत्पादन राज्यातील अन्य ठिकाणी कापड निर्मितीसाठी माल गाड्यांद्वारे नेला जातो. तसेच, सिंदखेड राजा हे माँसाहेब जिजाऊ यांचे जन्मस्थान आहे.

सद्यस्थितीत शेगाव हे विभाजकासह चौपदरी मार्गिका व दुपदरी मार्गिका असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या नेटवर्कने जोडलेले आहे. नुकतेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग नागपूर ते इगतपूरी हा सुमारे ६२५ किलोमीटरचा महामार्ग पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

प्रस्तावित प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग १०९.५२७ कि.मी. मुळे सिंदखेड राजा ते शेगाव हे अंतर कमी वेळेत पार करणे शक्य होईल व वाहन इंधन, देखभाल व दुरुस्तीवरील खर्च कमी होईल तसेच नवीन ग्रीनफील्ड आखणीवर दोन्ही बाजूस सुविधा केंद्रे, पथकर नाके व प्रवेश नियंत्रित प्रणाली प्रस्तावित आहेत.

2/- [handwritten initials]

रोख H/391 (२०५०-०-२४)

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१८६३**

श्री. मनोहर चंद्रिकापूरे, वि.स.स. महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८६३ खालीलप्रमाणे आहे :-

"अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया मतदार संघातील सावर्जनिक बांधकाम विभागांतर्गत येणारी तीन कामे एकाच कंत्राटदाराला देऊन शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, सदर तिन्ही कामांच्या निविदा प्रक्रिया M/s Tirupti Construction Deori या कंत्राटदारास देण्याच्या हेतूने संबंधित कार्यकारी अभियंता यांचेमार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असणे, सदर कामे ही वाहतुक वर्दळीच्या रस्त्यावर सुरु असुनही वाहतुकीस पर्यायी Diversion निकृष्ट असणे, पावसाळ्यात दाणीग्रस्त होऊन वाहतुकीत अडथळा निर्माण होऊन वाहतुकीच्या पर्यायी Diversion कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करुन Diversion दुरुस्ती दाखवून कंत्राटदारास लाभ देण्यात येणे, सदर कामाबाबत व गैरव्यवहाराबाबत सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

.....................................................................................................................................

### मा. मंत्री (सा. बां. सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

सदर सूचनेत नमूद कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्र.मा. किंमत | सद्य:स्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील मुंडीपार कमरगाव तुमसर तेढा मांडोदेवी हरदोली रस्ता, प्रजिमा २३ कि.मी. २/२०० वर लहान पुलांचे बांधकाम करणे. (मुंडीपार ते कमरगाव गावांच्यामध्ये) | ₹ २००.०० लक्ष | सदर पुलाचे बांधकाम पूर्ण व पोच मार्गाचे खडीकरण पूर्ण. | सदर पुलावरील वाहतूक दिनांक ०८ जुलै, २०२४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. |
| २ | गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील मुंडीपार कमरगाव तुमसर तेढा मांडोदेवी हरदोली रस्ता, प्रजिमा २३ कि.मी. ७/०० वर लहान पुलांचे बांधकाम करणे. (मोहाडी ते गिधाडी गावांच्यामध्ये) | ₹ २५०.०० लक्ष | सदर पुलाचे बांधकाम पूर्ण व पोच मार्गाचे खडीकरण पूर्ण | सदर पुलावरील वाहतूक दिनांक ०१ जुलै, २०२४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. |
| ३ | गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील तुमसर तिगाव प्रजिमा २४ कि.मी. ६/५०० वर लहान पुलांचे बांधकाम करणे. | ₹ २७०.०० लक्ष | सदर पुलाचे बांधकाम पूर्ण व पोच मार्गाचे खडीकरण पूर्ण | सदर पुलावरील वाहतूक दिनांक १० जुलै, २०२४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. |

वरील अ.क्र. १ व २ पुलांची कामे एकाच रस्त्यावरील असल्यामुळे कामांची एकत्रित निविदा प्रक्रिया करण्यात आली. हे काम मे. तिरुपती कन्स्ट्रक्शन, देवरी यांना रुपये ३,७७,१६,५३८.०० या निविदा किंमतीच्या ०.०१५ टक्के कमी दराने देण्यात आले. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १९.१२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला. अ.क्र. ३ मधील पुलाचे काम मे. तिरुपती कन्स्ट्रक्शन, देवरी यांना रुपये २,२४,७९,३३४.०० या निविदा किंमतीच्या २४.५४ टक्के कमी दराने देण्यात आले. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १५.१२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला.

वरील तिन्ही कामे Online निविदेद्वारे मे. तिरुपती कन्स्ट्रक्शन, देवरी यांना देण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

वरील तिन्ही पुलांची बांधकामे प्रगतीत असतांना, वाहतुकीसाठी वळणमार्गाचे बांधकाम करण्यात आले होते. सदरहू वळणमार्गाचे बांधकाम निविदेतील तरतुदीप्रमाणे व मानकाप्रमाणे करण्यात आलेले आहे. तसेच, कंत्राटदाराला वळणमार्गांच्या दुरुस्तीसाठी कोणतेही अतिरिक्त भुगतान करण्यात आलेले नाही. वरील तिन्ही पुलांची कामे पूर्ण झाली असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

*****************

वरील अ.क्र. १ व २ पुलांची कामे एकाच रस्त्यावरील असल्यामुळे कामांची एकत्रित निविदा प्रक्रिया करण्यात आली. हे काम मे. तिरुपती कन्स्ट्रक्शन, देवरी यांना रुपये ३,७७,१६,५३८.०० या निविदा किंमतीच्या ०.०१५ टक्के कमी दराने देण्यात आले. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १९.१२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला. अ.क्र. ३ मधील पुलाचे काम मे. तिरुपती कन्स्ट्रक्शन, देवरी यांना रुपये २,२४,७९,३३४.०० या निविदा किंमतीच्या २४.५४ टक्के कमी दराने देण्यात आले. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक १५.१२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला.

वरील तिन्ही कामे Online निविदेद्वारे मे. तिरुपती कन्स्ट्रक्शन, देवरी यांना देण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

वरील तिन्ही पुलांची बांधकामे प्रगतीत असतांना, वाहतुकीसाठी वळणमार्गाचे बांधकाम करण्यात आले होते. सदरहू वळणमार्गाचे बांधकाम निविदेतील तरतुदीप्रमाणे व मानकाप्रमाणे करण्यात आलेले आहे. तसेच, कंत्राटदाराला वळणमार्गांच्या दुरुस्तीसाठी कोणतेही अतिरिक्त भुगतान करण्यात आलेले नाही. वरील तिन्ही पुलांची कामे पूर्ण झाली असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

****************

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्र.१८६३**

श्री. मनोहर चंद्रिकापूरे, वि.स.स. महाराष्ट्र विधानसभा नियम १०५अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८६३ खालीलप्रमाणे आहे :-

"अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया मतदार संघातील सावर्जनिक बांधकाम विभागांतर्गत येणारी तीन कामे एकाच कंत्राटदाराला देऊन शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, सदर तिन्ही कामांच्या निविदा प्रक्रिया M/s Tirupti Construction Deori या कंत्राटदारास देण्याच्या हेतूने संबंधित कार्यकारी अभियंता यांचेमार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असणे, सदर कामे ही वाहतुक वर्दळीच्या रस्त्यावर सुरु असुनही वाहतुकीस पर्यायी Diversion निकृष्ट असणे, पावसाळ्यात दाणीग्रस्त होऊन वाहतुकीत अडथळा निर्माण होऊन वाहतुकीच्या पर्यायी Diversion कामे अंदाजपत्रकात समाविष्ट करुन Diversion दुरुस्ती दाखवून कंत्राटदारास लाभ देण्यात येणे, सदर कामाबाबत व गैरव्यवहाराबाबत सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

.................................................................................................................................

**मा. मंत्री (सा. बां. सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

सदर सूचनेत नमूद कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्र.मा. किंमत | सद्य:स्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील मुंडीपार कमरगाव तुमसर तेढा मांडोदेवी हरदोली रस्ता, प्रजिमा २३ कि.मी. २/२०० वर लहान पुलांचे बांधकाम करणे. (मुंडीपार ते कमरगाव गावांच्यामध्ये) | ₹ २००.०० लक्ष | सदर पुलाचे बांधकाम पूर्ण व पोच मार्गाचे खडीकरण पूर्ण. | सदर पुलावरील वाहतूक दिनांक ०८ जुलै, २०२४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. |
| २ | गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील मुंडीपार कमरगाव तुमसर तेढा मांडोदेवी हरदोली रस्ता, प्रजिमा २३ कि.मी. ७/०० वर लहान पुलांचे बांधकाम करणे. (मोहाडी ते गिधाडी गावांच्यामध्ये) | ₹ २५०.०० लक्ष | सदर पुलाचे बांधकाम पूर्ण व पोच मार्गाचे खडीकरण पूर्ण | सदर पुलावरील वाहतूक दिनांक ०१ जुलै, २०२४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. |
| ३ | गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील तुमसर तिगाव प्रजिमा २४ कि.मी. ६/५०० वर लहान पुलांचे बांधकाम करणे. | ₹ २७०.०० लक्ष | सदर पुलाचे बांधकाम पूर्ण व पोच मार्गाचे खडीकरण पूर्ण | सदर पुलावरील वाहतूक दिनांक १० जुलै, २०२४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. |

# महाराष्ट्र विधानसभा,सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री संदिप क्षिरसागर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" विधानसभा मतदार संघातील बीड शहरामध्ये अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी अद्यावत वसतिगृह नसणे, त्यामुळे सदर वसतिगृह बांधण्यासाठी अल्पसंख्यांक समाजाकडून मागणी करण्यात येणे, त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून बीड जिल्हा परिषदेकडे तसेच शासनाकडे सन २०२१ पासून सतत मागणी करण्यात येत असणे, त्यानुसार दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ च्या पत्रान्वये अल्पसंख्यांक विकास मंत्री महोदयांच्या आदेशानुसार शासनामार्फत स्थानिक अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविण्यात येणे, परंतु तीन साडेतीन वर्षे होऊनही त्याबाबतचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आलेला नसल्याचे माहे मे, २०२४ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, बीड यांनी त्यांचे दिनांक ७ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये मा.अल्पसंख्यांक विकास मंत्री यांना पत्र-निवेदन देण्यात येणे, बीड शहरात अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतिगृह नसल्याने त्यांची होत असलेली शैक्षणिक गैरसोय, परिणामी समाजामध्ये निर्माण झालेले नाराजीचे वातावरण व संतापाची भावना, यासंदर्भात तातडीने कार्यवाही करुन वसतिगृह उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## श्री. अब्दुल सत्तार, मंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे निवेदन

अल्पसंख्याक बहूल क्षेत्रामध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणा-या मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्याची योजना विभागाच्या दि.२/३/२०१० च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्याधिका-यांना अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतिगृहासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार बीड येथील किल्ला मैदान येथील नगर परिषदेच्या मालकीची डाक बंगल्याची जागा अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतिगृहासाठी देण्यास बीड नगर परिषदेने मान्यता दिली आहे. सदर जागा नगर परिषदेच्या मालकीची असल्यामुळे, महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करणे आवश्यक आहे. सदर जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्यासाठीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दि.३/१०/२०१८ च्या पत्रान्वये सादर केल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी कळविले

होते. सदर जागा महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्याच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दि.१/११/२०१८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकारी, बीड यांना दि.१०/११/२०२१ च्या पत्रान्वये तसेच दि.९/६/२०२२ व दि.१४/१२/२०२२ रोजी स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. तदनंतर सदर जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करुन, वसतिगृहासाठी २००० चौ.मी. क्षेत्राची मोजणी करुन जागेच्या मिळकत पत्रिकेवर अल्पसंख्याक विकास विभागाचे नाव लावण्याची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना प्रधान सचिव स्तरावरुन दि.१२/७/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांनी दि.२५/११/२०२१ च्या पत्रान्वये महसूल विभागाकडे पाठविला आहे.

********

होते. सदर जागा महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित करण्याच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दि.१/११/२०१८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकारी, बीड यांना दि.१०/११/२०२१ च्या पत्रान्वये तसेच दि.९/६/२०२२ व दि.१४/१२/२०२२ रोजी स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. तदनंतर सदर जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करुन, वसतिगृहासाठी २००० चौ.मी. क्षेत्राची मोजणी करुन जागेच्या मिळकत पत्रिकेवर अल्पसंख्याक विकास विभागाचे नाव लावण्याची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना प्रधान सचिव स्तरावरुन दि.१२/७/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांनी दि.२५/११/२०२१ च्या पत्रान्वये महसूल विभागाकडे पाठविला आहे.

********

## महाराष्ट्र विधानसभा,सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री संदिप क्षिरसागर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" विधानसभा मतदार संघातील बीड शहरामध्ये अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी अद्यावत वसतिगृह नसणे, त्यामुळे सदर वसतिगृह बांधण्यासाठी अल्पसंख्यांक समाजाकडून मागणी करण्यात येणे, त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून बीड जिल्हा परिषदेकडे तसेच शासनाकडे सन २०२१ पासून सतत मागणी करण्यात येत असणे, त्यानुसार दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ च्या पत्रान्वये अल्पसंख्यांक विकास मंत्री महोदयांच्या आदेशानुसार शासनामार्फत स्थानिक अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविण्यात येणे, परंतु तीन साडेतीन वर्षे होऊनही त्याबाबतचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आलेला नसल्याचे माहे मे, २०२४ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, बीड यांनी त्यांचे दिनांक ७ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये मा.अल्पसंख्यांक विकास मंत्री यांना पत्र-निवेदन देण्यात येणे, बीड शहरात अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतिगृह नसल्याने त्यांची होत असलेली शैक्षणिक गैरसोय, परिणामी समाजामध्ये निर्माण झालेले नाराजीचे वातावरण व संतापाची भावना, यासंदर्भात तातडीने कार्यवाही करुन वसतिगृह उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाहीं व उपाययोजना."

---

### श्री. अब्दुल सत्तार, मंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे निवेदन

अल्पसंख्याक बहूल क्षेत्रामध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणा-या मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्याची योजना विभागाच्या दि.२/३/२०१० च्या शासन निर्णयान्वये कार्यन्वित झालेली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्याधिका-यांना अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतिगृहासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार बीड येथील किल्ला मैदान येथील नगर परिषदेच्या मालकीची डाक बंगल्याची जागा अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतिगृहासाठी देण्यास बीड नगर परिषदेने मान्यता दिली आहे. सदर जागा नगर परिषदेच्या मालकीची असल्यामुळे, महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करणे आवश्यक आहे. सदर जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्यासाठीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दि.३/१०/२०१८ च्या पत्रान्वये सादर केल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी कळविले

लक्षवेधी सूचना क्र.१५५९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा. डॉ. विनय विलासराव कोरे विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम- १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१५५९ पुढीलप्रमाणे आहे :-

" शासनाच्या शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जात असणे, त्याचबरोबर पूरक आहारात बिस्किटे, केळे, शेंगदाणा चिक्की, कुरमुरे आणि राजगिरा लाडू देणे अपेक्षित असणे, सदर योजनेमार्फत राज्यातील २८२० शाळेतील अंदाजे ३,४०,००० विद्यार्थ्यांना लाभ मिळत असणे, शालेय पोषण आहार योजनेत सध्याच्या देण्यात येणाऱ्या पूरक आहारात गुळाचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांची रोगप्रतिकारक शक्ती व स्मरणशक्ती वाढण्यास मदत होईल. याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

निवेदन

(श्री. दिपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री)

केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची शालेय पोषण आहार) योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित इ.१ ली ते इ.८ वी मध्ये शिकणाऱ्या राज्यातील ८५,५२६ शाळांमधील सुमारे ९८.९२ लाख विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे लाभ देण्यात येत आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत केंद्र शासनामार्फत इ.१ ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना १०० ग्रॅम तसेच इ.५ वी ते इ.८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना १५० ग्रॅम याप्रमाणे तांदूळ उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर तांदूळापासून शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे विविध पाककृतींच्या स्वरुपात विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

ग्रामीण भागातील शाळांना जिल्हानिहाय पुरवठेदारामार्फत तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येतो. सदर धान्यादी मालापासून स्थानिक बचत गट/ स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्यामार्फत शाळांमध्ये आहार बनवून विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. यासाठी इंधन व भाजीपाल्याची रक्कम शाळांना देण्यात येते. तसेच, नागरी भागातील विद्यार्थ्यांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांव्दारे

निवड केलेल्या महिला बचत गटांमार्फत केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे तयार आहाराचा पुरवठा करण्यात येतो. यासाठी आहार खर्चाची रक्कम संबंधित बचत गटांना अदा केली जाते.

प्रस्तुत योजनेंतर्गत आहार शिजविणाऱ्या यंत्रणेमार्फत आठवड्यातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना फळे, सोयाबिस्कीट, दूध, चिक्की, राजगीरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे इ.च्या स्वरुपात पुरक आहार देण्यात येतो. यासाठी वेगळा निधी शासनामार्फत देण्यात येत नाही.

प्रस्तुत योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या आहारामध्ये स्थानिक उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करुन आहाराचा दर्जा व पौष्टिकता वृध्दीगत करण्याच्या दृष्टीने तज्ज्ञ व्यक्तींची समिती शासन निर्णय दि.१५ मार्च, २०२३ अन्वये गठीत करण्यात आली होती. त्यानुषंगाने विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात वैविध्यता आणण्यासाठी विद्यार्थ्यांना तीन संरचित आहार (Three Course Meal) पध्दतीनुसार (तांदूळ, डाळी / कडधान्यापासून तयार केलेला आहार, मोड आलेले कडधान्य (स्प्राऊटस) व गोड पदार्थ म्हणून तांदळाची खीर व नाचणीसत्व) आहार देण्याचा निर्णय दि.११ जून, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

तीन संरचित आहार पध्दतीमध्ये १३ पाककृतींचा समावेश आहे. सदर १३ पाककृतींपैकी गोड खिचडी, नाचणी सत्व आणि तांदळाची खीर या तीन पाककृतींमध्ये गुळाचा समावेश करण्यात आलेला आहे.

*********

निवड केलेल्या महिला बचत गटांमार्फत केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे तयार आहाराचा पुरवठा करण्यात येतो. यासाठी आहार खर्चाची रक्कम संबंधित बचत गटांना अदा केली जाते.

प्रस्तुत योजनेंतर्गत आहार शिजविणाऱ्या यंत्रणेमार्फत आठवड्यातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना फळे, सोयाबिस्कीट, दूध, चिक्की, राजगीरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे इ.च्या स्वरुपात पुरक आहार देण्यात येतो. यासाठी वेगळा निधी शासनामार्फत देण्यात येत नाही.

प्रस्तुत योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या आहारामध्ये स्थानिक उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करुन आहाराचा दर्जा व पौष्टिकता वृध्दीगत करण्याच्या दृष्टीने तज्ज्ञ व्यक्तींची समिती शासन निर्णय दि.१५ मार्च, २०२३ अन्वये गठीत करण्यात आली होती. त्यानुषंगाने विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात वैविध्यता आणण्यासाठी विद्यार्थ्यांना तीन संरचित आहार (Three Course Meal) पध्दतीनुसार (तांदूळ, डाळी / कडधान्यापासून तयार केलेला आहार, मोड आलेले कडधान्य (स्प्राऊटस) व गोड पदार्थ म्हणून तांदळाची खीर व नाचणीसत्व) आहार देण्याचा निर्णय दि.११ जून, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

तीन संरचित आहार पध्दतीमध्ये १३ पाककृतींचा समावेश आहे. सदर १३ पाककृतींपैकी गोड खिचडी, नाचणी सत्व आणि तांदळाची खीर या तीन पाककृतींमध्ये गुळाचा समावेश करण्यात आलेला आहे.

*********

लक्षवेधी सूचना क्र.१५५९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा. डॉ. विनय विलासराव कोरे विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम- १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१५५९ पुढीलप्रमाणे आहे :-

" शासनाच्या शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जात असणे, त्याचबरोबर पूरक आहारात बिस्किटे, केळे, शेंगदाणा चिक्की, कुरमुरे आणि राजगिरा लाडू देणे अपेक्षित असणे, सदर योजनेमार्फत राज्यातील २८२० शाळेतील अंदाजे ३,४०,००० विद्यार्थ्यांना लाभ मिळत असणे, शालेय पोषण आहार योजनेत सध्याच्या देण्यात येणाऱ्या पूरक आहारात गुळाचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांची रोगप्रतिकारक शक्ती व स्मरणशक्ती वाढण्यास मदत होईल. याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

निवेदन

(श्री. दिपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री)

केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची शालेय पोषण आहार) योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित इ.१ ली ते इ.८ वी मध्ये शिकणाऱ्या राज्यातील ८५,५२६ शाळांमधील सुमारे ९८.९२ लाख विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे लाभ देण्यात येत आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत केंद्र शासनामार्फत इ.१ ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना १०० ग्रॅम तसेच इ.५ वी ते इ.८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना १५० ग्रॅम याप्रमाणे तांदूळ उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर तांदूळापासून शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे विविध पाककृतींच्या स्वरुपात विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

ग्रामीण भागातील शाळांना जिल्हानिहाय पुरवठेदारामार्फत तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येतो. सदर धान्यादी मालापासून स्थानिक बचत गट/ स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्यामार्फत शाळांमध्ये आहार बनवून विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. यासाठी इंधन व भाजीपाल्याची रक्कम शाळांना देण्यात येते. तसेच, नागरी भागातील विद्यार्थ्यांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांव्दारे

लक्षवेधी सूचना क्र. १७२८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे (तृतीय) पावसाळी अधिवेशन

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अमिन पटेल, श्री. विनोद निकोले, श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"भिवंडी परिसरातील कारखान्यांमध्ये विविध उत्पादनांत सुरू असलेली भेसळ, पालघर जिल्ह्यात बनावट जिन्याच्या कारखान्याबाबत काही महिन्यांपूर्वी झालेल्या तक्रारीकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, परवाना नसलेल्या बोगस औषधविक्रेत्यांकडून बनावट औषधांची आणि बनावट सौदर्यप्रसाधनांची होणारी विक्री, अनेक बेकरीमध्ये कामगारांची नियमित आरोग्य तपासणी न होणे, मानखुर्दमध्ये रस्त्यावर विक्री केला जाणारा शोरमा खाल्याने बारा जणांना विषबाधा होऊन एका तरूणाचा नाहक जीव जाणे, बार्बेक्युनेशन या हॉटेलमधून ऑर्डर केलेल्या डाळीच्या शाकाहारी मिलच्या बॉक्समध्ये आढळून आलेला उंदिर, भिवंडीतील कत्तल खान्यांत जनावरांची चरबी व कातडी गोळा करून त्याचा खाद्य पदार्थात होत असलेल्या वापराबाबत सखोल चौकशी करून कारवाई न होणे, ४ हजार मेडीकल स्टोअर्सची सुनावणीची प्रकरणे प्रलंबीत ठेवून फार्मासिस्टना वेठीस धरणे, शेजारील राज्यातून आयात केला जाणाऱ्या गुटख्यावर होणारे अक्षम्य दुर्लक्ष, परमीट रूम व बारमध्ये ग्राहकांना भेसळयुक्त मद्य दिले जाणे, बनावट बटर व पनीरचे वाढलेले प्रमाण, दूषित बर्फाचा होणारा वापर, मासे टिकविण्यासाठी होत असलेला सोडियम मेटा बाय सल्फाईडचा वापर, केळी व आंबे पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडचा सर्रास वापर होणे, सर्रासपणे सुरू असलेली एमडी ड्रग्ज, गुटखा, तंबाखू, मावा व तत्सम पदार्थांची विक्री, यासंबंधी सखोल चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

संपूर्ण भारतासह महाराष्ट्र राज्यामध्ये अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नियम व विनियम २०११ दिनांक ५ ऑगस्ट २०११ पासून लागू झालेला आहे. राज्यात सदर कायद्याची अंमलबजावणी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचेकडून केली जाते. अन्न पदार्थातील भेसळीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यभरात उत्पादक, वितरक, किरकोळ विक्रेते यांच्या नियमित तपासण्या करून अन्न पदार्थांचे नमुने घेण्याची कार्यवाही निरंतर केली जाते. अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील तरतुदीचे उल्लंघन झाल्यास कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाने बंद असलेल्या कत्तलखान्यामध्ये धाड टाकली असता असे आढळून आले की, महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत काही इसमांनी अतिक्रमण करून अनधिकृतपणे/विनापरवाना मोठ्या जनावरांचे शिल्लक अवशेष (हाडे,

चरबी) इत्यादी मोठ्या लोखंडी कढईमध्ये टाकून ते वितळविण्याचे काम करून त्यापासून पांढऱ्या रंगासारखा पदार्थ तयार करण्याचे काम चालू केले होते. सदर ठिकाणी आढळून आलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यालयाने भोईवाडा पोलीस स्टेशन, भिवंडी येथे संबंधित इसमांविरुध्द गुन्हा क्र. ०२/२०२४, दिनांक ०६.०१.२०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर ठिकाणी घेण्यात आलेले अन्न पदार्थांचे नमुने अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न विश्लेषक, महानगरपालिका प्रयोगशाळा, दादर (प.) येथे विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून विश्लेषण अहवाल अद्याप प्रतिक्षाधीन आहेत. अन्न व औषध प्रशासनाने भिवंडी परिसरातील एकूण २३ उत्पादक पेढ्यांची तपासणी करून रु.१,०६,४०,४०८ /- किमतीचा साठा जप्त केला आहे.

तसेच, पालघर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन व शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी यांनी जीरे या अन्नपदार्थाची वाहतूक करणाऱ्या वाहनाची तपासणी करून जिरे या अन्नपदार्थाचा नमुना विश्लेषणासाठी घेतला व उर्वरित २३९५ कि. ग्रॅम साठा जप्त केला. सदर नमुन्याचा अहवाल असुरक्षित घोषित झाल्यामुळे संबंधिताविरूद्ध शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी येथे गुन्हे दाखल करून मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भिवंडी यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

परवाना नसलेल्या बोगस औषधविक्रेत्यांकडून बनावट औषधांची होणारी विक्री होत असल्याचे आढळून आले नाही. औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत सौदर्य प्रसाधने विक्रीसाठी परवान्यांची आवश्यकता नाही. अन्न व औषध प्रशासनाने दि. ०१.०४.२०२३ ते ३१.०५.२०२४ पर्यंतच्या कालावधीत विना परवाना उत्पादन विना रजिस्ट्रेशन आयात केलेल्या सौदर्य प्रसाधनांच्या ०८ प्रकरणाचा शोध घेऊन रूपये ३४,८१,०१८/- इतक्या किंमतीचा साठा जप्त केला आहे. तसेच, ०१ प्रकरणात न्यायालयात संबधिताविरूद्व खटला दाखल केला आहे व उर्वरित ०७ प्रकरणांचा तपास सुरु आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ ( अन्न व्यावसायिकांचे परवाने व नोंदणी ) नियमन २०११ मधील परिशिष्ट ४, भाग २ चे नियमन १०.१.२ अन्वये आस्थापनातील अन्न हाताळणारे/कर्मचाऱ्यांची नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक (Registered medical practitioner) यांचेकडून वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी करून ते कोणत्याही संसर्गजन्य, संसर्गजन्य आणि इतर संसर्गजन्य रोगांपासून मुक्त आहेत याबाबत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले आहे. सदर तरतूदीनुसार बेकरी आस्थापनांची तपासणी करण्यात येते. ज्या बेकरी आस्थापना वैद्यकीय प्रमाणपत्र घेत नाहीत, त्यांच्यावर उक्त तरतूदीनुसार कारवाई करण्यात येत आहे.

मानखुर्द, मुंबई येथील एका इसमाचा शोरमा खाल्यानंतर मृत्यु झाला आहे. परंतू, शवविच्छेदन अहवाल प्राप्त नसल्यामुळे त्याच्या मृत्यूचे कारण स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी शोरमा विक्री करणा-या संबंधित जबाबदार व्यक्तीस संशयावरून ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत महाराष्ट्र नगर, मानखुर्द, मुंबई येथे गु. र. क्र. २११/२०२४, दि. ०६.०५.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

"दैनिक भास्कर खास "या वृत्तपत्रामध्ये पार्सल मागवलेल्या शाकाहारी जेवणामधील डाळीमध्ये मेलेला उंदीर आढळून आला असल्याबाबत बातमी प्रकाशित झाली होती. सदर प्रकरणी संबंधित इसमास झालेली विषबाधा हॉटेलमधून मागविण्यात आलेल्या जेवणामुळे झाली नसल्याचे न्यायवैद्यकिय पुराव्यातून निष्पन्न झाले आहे, असा अहवाल नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई दिला आहे.

चरबी) इत्यादी मोठ्या लोखंडी कढईमध्ये टाकून ते वितळविण्याचे काम करून त्यापासून पांढऱ्या रंगासारखा पदार्थ तयार करण्याचे काम चालू केले होते. सदर ठिकाणी आढळून आलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यालयाने भोईवाडा पोलीस स्टेशन, भिवंडी येथे संबंधित इसमांविरुध्द गुन्हा क्र. ०२/२०२४, दिनांक ०६.०१.२०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर ठिकाणी घेण्यात आलेले अन्न पदार्थांचे नमुने अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न विश्लेषक, महानगरपालिका प्रयोगशाळा, दादर (प.) येथे विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून विश्लेषण अहवाल अद्याप प्रतिक्षाधीन आहेत. अन्न व औषध प्रशासनाने भिवंडी परिसरातील एकूण २३ उत्पादक पेढ्यांची तपासणी करून रु.१,०६,४०,४०८ /- किमतीचा साठा जप्त केला आहे.

तसेच, पालघर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन व शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी यांनी जीरे या अन्नपदार्थाची वाहतूक करणाऱ्या वाहनाची तपासणी करून जिरे या अन्नपदार्थाचा नमुना विश्लेषणासाठी घेतला व उर्वरित २३९५ कि. ग्रॅम साठा जप्त केला. सदर नमुन्याचा अहवाल असुरक्षित घोषित झाल्यामुळे संबंधिताविरूद्ध शांतीनगर पोलीस ठाणे, भिवंडी येथे गुन्हे दाखल करून मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भिवंडी यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

परवाना नसलेल्या बोगस औषधविक्रेत्यांकडून बनावट औषधांची होणारी विक्री होत असल्याचे आढळून आले नाही. औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत सौदर्य प्रसाधने विक्रीसाठी परवान्यांची आवश्यकता नाही. अन्न व औषध प्रशासनाने दि. ०१.०४.२०२३ ते ३१.०५.२०२४ पर्यंतच्या कालावधीत विना परवाना उत्पादन विना रजिस्ट्रेशन आयात केलेल्या सौदर्य प्रसाधनांच्या ०८ प्रकरणाचा शोध घेऊन रूपये ३४,८१,०१८/- इतक्या किंमतीचा साठा जप्त केला आहे. तसेच, ०१ प्रकरणात न्यायालयात संबधिताविरूद्व खटला दाखल केला आहे व उर्वरित ०७ प्रकरणांचा तपास सुरु आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ ( अन्न व्यावसायिकांचे परवाने व नोंदणी ) नियमन २०११ मधील परिशिष्ट ४, भाग २ चे नियमन १०.१.२ अन्वये आस्थापनातील अन्न हाताळणारे/कर्मचाऱ्यांची नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक (Registered medical practitioner) यांचेकडून वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी करून ते कोणत्याही संसर्गजन्य, संसर्गजन्य आणि इतर संसर्गजन्य रोगांपासून मुक्त आहेत याबाबत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले आहे. सदर तरतूदीनुसार बेकरी आस्थापनांची तपासणी करण्यात येते. ज्या बेकरी आस्थापना वैद्यकीय प्रमाणपत्र घेत नाहीत, त्यांच्यावर उक्त तरतूदीनुसार कारवाई करण्यात येत आहे.

मानखुर्द, मुंबई येथील एका इसमाचा शोरमा खाल्यानंतर मृत्यु झाला आहे. परंतू, शवविच्छेदन अहवाल प्राप्त नसल्यामुळे त्याच्या मृत्यूचे कारण स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी शोरमा विक्री करणा-या संबंधित जबाबदार व्यक्तीस संशयावरून ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीत महाराष्ट्र नगर, मानखुर्द, मुंबई येथे गु. र. क्र. २११/२०२४, दि. ०६.०५.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

"दैनिक भास्कर खास "या वृत्तपत्रामध्ये पार्सल मागवलेल्या शाकाहारी जेवणामधील डाळीमध्ये मेलेला उंदीर आढळून आला असल्याबाबत बातमी प्रकाशित झाली होती. सदर प्रकरणी संबंधित इसमास झालेली विषबाधा हॉटेलमधून मागविण्यात आलेल्या जेवणामुळे झाली नसल्याचे न्यायवैद्यकिय पुराव्यातून निष्पन्न झाले आहे, असा अहवाल नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई दिला आहे.

लक्षवेधी सूचना क्र. १७२८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे (तृतीय) पावसाळी अधिवेशन

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अमिन पटेल, श्री. विनोद निकोले, श्री. बाळासाहेब थोरात, वि. स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"भिवंडी परिसरातील कारखान्यांमध्ये विविध उत्पादनांत सुरू असलेली भेसळ, पालघर जिल्ह्यात बनावट जिऱ्याच्या कारखान्याबाबत काही महिन्यांपूर्वी झालेल्या तक्रारीकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, परवाना नसलेल्या बोगस औषधविक्रेत्यांकडून बनावट औषधांची आणि बनावट सौदर्यप्रसाधनांची होणारी विक्री, अनेक बेकरीमध्ये कामगारांची नियमित आरोग्य तपासणी न होणे, मानखुर्दमध्ये रस्त्यावर विक्री केला जाणारा शोरमा खाल्याने बारा जणांना विषबाधा होऊन एका तरूणाचा नाहक जीव जाणे, बार्बेक्युनेशन या हॉटेलमधून ऑर्डर केलेल्या डाळीच्या शाकाहारी मिलच्या बॉक्समध्ये आढळून आलेला उंदिर, भिवंडीतील कत्तल खान्यांत जनावरांची चरबी व कातडी गोळा करून त्याचा खाद्य पदार्थात होत असलेल्या वापराबाबत सखोल चौकशी करून कारवाई न होणे, ४ हजार मेडीकल स्टोअर्सची सुनावणीची प्रकरणे प्रलंबीत ठेवून फार्मासिस्टना वेठीस धरणे, शेजारील राज्यातून आयात केला जाणाऱ्या गुटख्यावर होणारे अक्षम्य दुर्लक्ष, परमीट रूम व बारमध्ये ग्राहकांना भेसळयुक्त मद्य दिले जाणे, बनावट बटर व पनीरचे वाढलेले प्रमाण, दूषित बर्फाचा होणारा वापर, मासे टिकविण्यासाठी होत असलेला सोडियम मेटा बाय सल्फाईडचा वापर, केळी व आंबे पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडचा सर्रास वापर होणे, सर्रासपणे सुरू असलेली एमडी ड्रग्ज, गुटखा, तंबाखू, मावा व तत्सम पदार्थांची विक्री, यासंबंधी सखोल चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

संपूर्ण भारतासह महाराष्ट्र राज्यामध्ये अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नियम व विनियम २०११ दिनांक ५ ऑगस्ट २०११ पासून लागू झालेला आहे. राज्यात सदर कायद्याची अंमलबजावणी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचेकडून केली जाते. अन्न पदार्थातील भेसळीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यभरात उत्पादक, वितरक, किरकोळ विक्रेते यांच्या नियमित तपासण्या करून अन्न पदार्थांचे नमुने घेण्याची कार्यवाही निरंतर केली जाते. अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील तरतुदीचे उल्लंघन झाल्यास कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाने बंद असलेल्या कत्तलखान्यामध्ये धाड टाकली असता असे आढळून आले की, महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत काही इसमांनी अतिक्रमण करून अनधिकृतपणे/विनापरवाना मोठ्या जनावरांचे शिल्लक अवशेष (हाडे,

राज्यातील औषध विक्रेत्यांची अपिले शासन स्तरावर सुनावणीसाठी दाखल होतात. सदर अपिले दाखल झाल्यानंतर प्रकरणप्रयत्वे स्थगिती देण्याची कार्यवाही करण्यात येते. तदनंतर सदर अपिलांवर सुनावणी घेवून अंतिम आदेश पारीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ३०(२)(अ) अन्वये सार्वजनिक आरोग्य व हिताच्या दृष्टीने गुटखा, पानमसाला, स्वादिष्ट / सुगंधित तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, अपमिश्रकेयुक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू, खर्रा, मावा व तत्सम पदार्थाचे उत्पादन, विक्री, साठवणूक, वितरण, वाहतूक (महाराष्ट्र राज्यात व महाराष्ट्र राज्यातून) करण्यास राज्यात सन २०१२ पासून प्रत्येक वर्षी प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रतिबंधित अन्न पदार्थांची वाहनातून वाहतूक होत असल्यास तसेच साठा करुन ठेवला असल्यास त्याचा प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या वाहतूकीसाठी व साठवणूकीसाठी पुर्नवापर न होण्याकरिता सदर वाहने जप्त करण्यात येतात.

अल्कोहोलिक पेयांमधील भेसळ रोखण्याच्या दृष्टीने राज्यात वेळोवेळी मोहिमा घेऊन अल्कोहोलिक पेयांचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात. राज्यात सन २०२३-२४ या वर्षात परमिट रूम व बार आस्थापनांच्या एकूण ३९६ तपासण्या करण्यात आल्या असून नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येते. एमडी ड्रग ( Mephedrone) हे घटक औषध या प्रवर्गात मोडत नाहीत. एमडी ड्रगच्या अनुषंगाने पोलीस विभागामार्फत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.

बटर, पनीर, चीज तसेच बर्फ या अन्न पदार्थांचे नमुने अन्न व औषध प्रशासनामार्फत विश्लेषणासाठी घेण्यात येतात. विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येते. मासे टिकविण्यासाठी सोडियम मेटाबाय सल्फाईडचा वापर होत असल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

अन्न सुरक्षा मानके (Prohibition & Restrictions on sale ) Regulation २०११ मधील नियमन २.३.५ नुसार कृत्रिमरित्या फळे पिकविण्यासाठी १०० पीपीएम पर्यंत इथिलिन गॅसचा वापर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. राज्यात कृत्रिमरित्या फळे पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाइड गॅस सारख्या रासायनिक पदार्थाचा वापर होत असल्याचे आढळून आले नाही.

********

## सन २०२४ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुनील राणे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३९५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"चारकोप १, अर्चना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नोंदणी क्र. बीओएम (डब्लू आर) / एच.एस.जी. (टी.ओ.) / ३९५५/८८-८९ प्लॉट नं. ५५९, भाग ३, विभाग नं. ५, चारकोप (१), कांदिवली (पश्चिम), मुंबई ६७ हि म्हाडाची संस्था चारकोप विभागात असणे, सदर म्हाडा वसाहत पंतप्रधान अनुदान प्रकल्पा अंतर्गत अल्प, अत्यल्प व मध्यम वर्गासाठी घरे मिळावीत या उद्देशाने ९९ वर्षाच्या कराराने विकसित केली असणे, संस्थेस या पूर्वी वार्षिक२० हजार कर भरणा करण्यात येत असणे, सदर भूखंडाच्या अकृषिक कराच्या रक्कमेत सुधारीत दर रूपये ५,४०,९०६/- इतका वाढीव वार्षिक भरणा विलंब शुल्का व्यतिरीक्त संस्थेस भरणा करणेस मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मिळकत व्यवस्थापक डब्लू यांचेकडून सदर संस्थेस पत्र क्र.०३०१ /२०२२ दि. २७.०१.२०२२ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आलेला असणे, सदर जुजबी कर कमी करून पूर्वी प्रमाणेच कर आकारणी करण्याबाबत शासनाकडून ठोस कार्यवाही करण्याची आवशक्यता असणे, याकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

जागतिक बँक प्रकल्पा अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्थांना / उच्च उत्पन्न गट / बंगलो व इतर प्रयोजनाकरीता ९० वर्षाच्या भाडेपट्टा करारनाम्याने भूखंड वितरित करण्यात आले आहेत. याप्रमाणे अर्चना सहकारी गृहनिर्माण या संस्थेस सोडतीद्वारे मार्च, १९८९ रोजी सदर भूखंड वितरित करण्यात आला होता. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या म्हाडासोबत झालेल्या भाडेपट्टा करारनाम्यातील अटीनुसार सर्व अनुषंगिक कर संस्थेने परस्पर त्या-त्या विभागास भरणा करणे बंधनकारक आहे. मिळकत पत्रीकेवर म्हाडाचे नाव असल्याने अकृषिक कराच्या मागणी नोटीसा महसूल विभागाकडून म्हाडास पाठविण्यात येतात. तसेच थकित रक्कमेचा भरणा विहीत मुदतीत म्हाडाकडून न झाल्यास प्रसंगी महसूल विभागाकडून म्हाडाचे बँक खाते गोठविण्यात येते. त्यामुळे जागतिक बँकेतंर्गत वितरित भूखंडधारकांकडून मंडळास देय असलेले सर्व अनुषंगिक शुल्क विहीत कालावधीत भरणा करणे बंधनकारक आहे. महसूल विभागाकडून दर १० वर्षानी अकृषिक करामध्ये वाढ करण्यात येते. अकृषिक करामध्ये झालेले बदल महसूल विभागाकडून म्हाडास वेळोवेळी कळविण्यात आलेले नाहीत. सप्टेंबर-२०२१ मध्ये महसूल विभागाकडून कळविल्यानुसार सुधारित अकृषिक दराच्या अनुषंगाने अर्चना सहकारी गृहनिर्माण संस्थेस (अंदाजित रु.५,४०,९०६/-) ची अकृषिक करापोटी नोटीस काढण्यात आली होती. त्यापूर्वी जुन्याच दरानुसार वसुली करण्यात येत होती. मंडळाने गृहनिर्माण संस्थेकडून / गाळेधारकांकडून वाढीव अकृषिक कर वसुल न करता महसूल विभागास मंडळाच्या राखीव निधीमधून आगाऊ भरणा केलेला आहे. त्यामुळे ज्या गाळेधारक / संस्थांनी भुईभाडे व अकृषिक कर वर्षानुवर्षे

थकविला आहे, अशा गाळेधाकांकडून भाडेपट्टा करारनाम्यातील अटीनुसार विलंब शुल्क म्हाडाकडून आकारले जाते. अकृषिक कराची वसुली महसूल विभागाच्या दि.०७.०४.२०२२ च्या शासन आदेशानुसार थांबविण्यात आलेली आहे. म्हाडाकडूनही अकृषिक कर थकित वसूली बाबत सहकारी गृहनिर्माण संस्थाना वसूली नोटीसा देण्याचे थांबविण्यात आलेले आहे.

अर्चना सहकारी गृहनिर्माण संस्थेस भाडेपट्टा नुतनीकरण करण्यासाठी ना-देय प्रमाणपत्र दि.१८.०४.२०२४ रोजी मुंबई मंडळाकडून निर्गमित करण्यात आलेले आहे.

*-*-*-*-*-*

थकविला आहे, अशा गाळेधाकांकडून भाडेपट्टा करारनाम्यातील अटीनुसार विलंब शुल्क म्हाडाकडून आकारले जाते. अकृषिक कराची वसुली महसूल विभागाच्या दि.०७.०४.२०२२ च्या शासन आदेशानुसार थांबविण्यात आलेली आहे. म्हाडाकडूनही अकृषिक कर थकित वसूली बाबत सहकारी गृहनिर्माण संस्थाना वसूली नोटीसा देण्याचे थांबविण्यात आलेले आहे.

अर्चना सहकारी गृहनिर्माण संस्थेस भाडेपट्टा नुतनीकरण करण्यासाठी ना-देय प्रमाणपत्र दि.१८.०४.२०२४ रोजी मुंबई मंडळाकडून निर्गमित करण्यात आलेले आहे.

*_*_*_*_*_*

## सन २०२४ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुनील राणे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३९५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"चारकोप १, अर्चना सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नोंदणी क्र. बीओएम (डब्लू आर) / एच.एस.जी. (टी.ओ.) / ३९५५/८८-८९ प्लॉट नं. ५५९, भाग ३, विभाग नं. ५, चारकोप (१), कांदिवली (पश्चिम), मुंबई ६७ हि म्हाडाची संस्था चारकोप विभागात असणे, सदर म्हाडा वसाहत पंतप्रधान अनुदान प्रकल्पा अंतर्गत अल्प, अत्यल्प व मध्यम वर्गासाठी घरे मिळावीत या उद्देशाने ९९ वर्षांच्या कराराने विकसित केली असणे, संस्थेस या पूर्वी वार्षिक२० हजार कर भरणा करण्यात येत असणे, सदर भूखंडाच्या अकृषिक कराच्या रक्कमेत सुधारीत दर रूपये ५,४०,९०६/- इतका वाढीव वार्षिक भरणा विलंब शुल्का व्यतिरीक्त संस्थेस भरणा करणेस मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मिळकत व्यवस्थापक डब्लू यांचेकडून सदर संस्थेस पत्र क्र.०३०१ /२०२२ दि. २७.०१.२०२२ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आलेला असणे, सदर जुजबी कर कमी करून पूर्वी प्रमाणेच कर आकारणी करण्याबाबत शासनाकडून ठोस कार्यवाही करण्याची आवशक्यता असणे, याकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

जागतिक बँक प्रकल्पा अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्थांना / उच्च उत्पन्न गट / बंगलो व इतर प्रयोजनाकरीता ९० वर्षाच्या भाडेपट्टा करारनाम्याने भूखंड वितरित करण्यात आले आहेत. याप्रमाणे अर्चना सहकारी गृहनिर्माण या संस्थेस सोडतीद्वारे मार्च, १९८९ रोजी सदर भूखंड वितरित करण्यात आला होता. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या म्हाडासोबत झालेल्या भाडेपट्टा करारनाम्यातील अटीनुसार सर्व अनुषंगिक कर संस्थेने परस्पर त्या-त्या विभागास भरणा करणे बंधनकारक आहे. मिळकत पत्रीकेवर म्हाडाचे नाव असल्याने अकृषिक कराच्या मागणी नोटीसा महसूल विभागाकडून म्हाडास पाठविण्यात येतात. तसेच थकित रक्कमेचा भरणा विहीत मुदतीत म्हाडाकडून न झाल्यास प्रसंगी महसूल विभागाकडून म्हाडाचे बँक खाते गोठविण्यात येते. त्यामुळे जागतिक बँकेतंर्गत वितरित भूखंडधारकांकडून मंडळास देय असलेले सर्व अनुषंगिक शुल्क विहीत कालावधीत भरणा करणे बंधनकारक आहे. महसूल विभागाकडून दर १० वर्षांनी अकृषिक करामध्ये वाढ करण्यात येते. अकृषिक करामध्ये झालेले बदल महसूल विभागाकडून म्हाडास वेळोवेळी कळविण्यात आलेले नाहीत. सप्टेंबर-२०२१ मध्ये महसूल विभागाकडून कळविल्यानुसार सुधारित अकृषिक दराच्या अनुषंगाने अर्चना सहकारी गृहनिर्माण संस्थेस (अंदाजित रु.५,४०,९०६/-) ची अकृषिक करापोटी नोटीस काढण्यात आली होती. त्यापूर्वी जुन्याच दरानुसार वसुली करण्यात येत होती. मंडळाने गृहनिर्माण संस्थेकडून / गाळेधारकांकडून वाढीव अकृषिक कर वसुल न करता महसूल विभागास मंडळाच्या राखीव निधीमधून आगाऊ भरणा केलेला आहे. त्यामुळे ज्या गाळेधारक / संस्थांनी भुईभाडे व अकृषिक कर वर्षानुवर्षे

लक्षवेधी सूचना क्रमांक ६५४

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. सदा सरवणकर वि. स. स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र. ६५४ वरील निवेदन गृहनिर्माण मंत्री सभागृहासमोर ठेवतील :-

" महाराष्ट्र शासनाच्या नवीन इमारत पुर्नविकास धोरणानुसार महाराष्ट्र अधिनियम १९७६ मधील कलम ७९ (अ) मधील कलम नव्याने पुर्नगठीत करणे, त्यानुसार मुंबई शहरातील जुन्या उपकर प्राप्त व दुरुस्ती पलीकडे गेलेल्या इमारतींची पुर्नविकासाची कामे हाती घेणे, यासांठी सदर कायद्यात इमारत मालक व भाडेकरू यांच्यातर्फे पुर्नविकास करण्यासाठी कालबद्ध कालावधी निश्चित करणे, त्याप्रमाणे इमारत मालकांस प्रथम नोटीस देणे, त्यानंतर विहित कालावधी संपल्यावर इमारतीतील भाडेकरूवर नियम ७९ अ (ब) अन्वये पुर्नविकास करण्यासाठीची संधी बाबत नवीन नोटीस देणे, त्यानंतर विशेष कार्यपद्धतीचे (SOP) कारण सांगून पुन्हा नोटिसीची कार्यवाही करणे, याद्वारे मालकांना फायदेशीर होण्याकरिता अधिकाऱ्यांमार्फत सुनावणी घेणे, याप्रकारे भाडेकरूंना जाणून बुजून नाहक त्रास व त्यांच्यावर विकासकांमार्फतच पुर्नविकास करण्यासाठी दबाव आणणे, तसेच भाडेकरुं मार्फत होणाऱ्या स्वयंपुर्नविकासात अडथळा आणणे, परिणामी भाडेकरूंमध्ये विकासक व अधिकाऱ्यांविरोधात पसरलेले असंतोषाचे वातावरण, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मुंबई शहरातील धोकादायक, जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींचा पुर्नविकास जलद गतीने होण्यासाठी म्हाड अधिनियम, १९७६ मध्ये दि.०२.१२.२०२२ रोजी नवीन कलम ७९ (अ) अंतर्भूत करण्यात आले असून, त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने अथवा सक्षम प्राधिकाऱ्याने मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारत धोकादायक घोषित केल्यानंतर संबंधित इमारतीच्या मालकास सर्वप्रथम इमारत पुर्नविकासाची संधी देण्यात येणार आहे. त्याने ६ महिन्याच्या आत पुर्नविकासाचा प्रस्ताव सादर न केल्यास दुसरी संधी संबंधित इमारतीच्या भाडेकरुंच्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्यात येणार आहे. त्यांनी देखील ६ महिन्याच्या आत पुर्नविकासाचा प्रस्ताव सादर न केल्यास अशा इमारतींचे भूसंपादन करुन पुर्नविकास म्हाडा / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत करण्यात येईल. सदरहू तरतुदीनुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने एकूण ८६१ जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांना नोटीस बजावली आहे. त्यापैकी ३६ इमारत मालकांनी पुर्नविकासाचा प्रस्ताव सादर केला असून त्यापैकी ९ इमारत मालकांना ना-हकरत प्रमाणपत्र (NOC) प्रदान करण्यात आले आहे. इमारत मालकांना देण्यात आलेल्या ७९ (अ) नोटिसीची मुदत संपल्यानंतर २६० प्रकरणांमध्ये इमारत मालक व भाडेकरूची संयुक्त सुनावणी घेण्यात आली. इमारत मालकांनी प्रतिसाद न दिलेल्या २५५ प्रकरणांमध्ये भाडेकरू/रहिवाशी यांना पुर्नविकास करण्याबाबत नोटिस देण्यात आली. सदर २५५ प्रकरणांपैकी ८ प्रकरणांमध्ये भाडेकरू/रहिवाश्यांनी पुर्नविकास प्रस्ताव सादर केला आहे. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, म्हाड अधिनियमामध्ये केलेल्या दुरूस्तीमुळे पुर्नविकासाच्या प्रक्रियेला चालना मिळत असल्याचे दिसून येते.

*****

## सन २०२४ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, श्री.धिरज देशमुख, श्री.सुभाष धोटे, श्री.विनोद निकोले, श्री.सदा सरवणकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११७२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (१०) या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुर्नविकास योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून राबविल्या जात असणे, तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून अधिकाराचा गैरवापर करुन नियमबाह्य पद्धतीने दिलेल्या परवानग्यांमुळे चटईक्षेत्रफळाचे उल्लंघन झाल्याची बाब मुंबई महापालिका आयुक्तांनी शासनाच्या व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अलीकडेच निदर्शनास आणून दिलेली असणे, मुंबई महानगरपालिकेला असलेल्या अधिकारांवर अतिक्रमण करुन नियमबाह्य पध्दतीने विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (१२) (ब) आणि ३३ (१९) या तरतुदींचा फायदाही संबंधित विकासकाला करुन दिला जात असणे, परिणामी विकासकाला मोठ्या प्रमाणावर वाढीव चटईक्षेत्रफळाचा लाभ मिळत असणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील अधिकारी व विकासक यांनी या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केलेला असणे, महापालिका आयुक्तांनी ही बाब निदर्शनास आणून देईपर्यंत झोपू प्राधिकरणाकडून कितीतरी योजनांना/विकासकांना बेकायदेशीरपणे लाभ दिला गेला असल्यामुळे या संपूर्ण गैरव्यवहाराची चौकशी शासन स्तरावरुन करण्याची नितांत आवश्यकता, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी मुंबईच्या नियोजनाचा झालेला बट्ट्याबोळ शासनाने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायदा १९६६ मधील कलम ४० नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून स्थापना झालेली आहे. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पु) अधिनियम १९७१ च्या कलम ३ अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकार आणि कर्तव्य नमूद करण्यात आलेली आहेत. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सदर कलमांचा वापर करुन घोषित केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायदा १९६६ मधील कलम २(१९)(ब) नुसार नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनिमय ३३(१२)(ब) हा रस्त्याच्या आखणी रेषेमधील बाधित होणारी संरक्षित बांधकामे हटवून त्यांचे लगतच्या जागेत पुनर्वसन करण्यासाठी आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायदा १९६६ व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी यांना अनुसरुन

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसोबत इतर कलमांच्या तरतुदीनुसार विकासाचे प्रस्ताव राबविण्याबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून वेळोवेळी ना-हरकती प्राप्त झाल्या आहेत. तसेच विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील प्रकल्पग्रस्तांची त्याच प्रभागामध्ये (Ward) पुनर्वसनाची गरज लक्षात घेता रस्त्याच्या आखणी रेषेमधील बाधित होणारी संरक्षित बांधकामे हटवून त्यांचे लगतच्या जागेत पुनर्वसन करण्यासाठी महानगर पालिकेकडून प्राप्त झालेल्या मागणी पत्रानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विनियम ३३(१२)(ब) नुसार मंजूरी दिलेली आहे.

सार्वजनिक सुविधा, पोच रस्ता, विकास नियोजन रस्ता अशा प्रकारच्या सार्वजनिक सुविधा जनतेस तातडीने उपलब्ध होण्यासाठी त्यावर असणाऱ्या बांधकामांची बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून नियमानुसार परिशिष्ट बनवून व त्याची पडताळणी करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सदर गाळयांच्या पुनर्वसनाबाबत विनंती केली जाते. तद्नंतरच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने तेवढ्या झोपडपट्टीधारकांचा समावेश करुन मंजूरी दिलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने याबाबतची पत्र / प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच प्राधिकरणास परवानग्या दिलेल्या आहेत.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील कलम ३३(१२)(ब)(ह) मधील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगर पालिकेने प्रमाणित केल्यानंतर परिशिष्ट-२ मध्ये नमूद पात्र असलेल्या बांधकामांना विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय असलेले चटईक्षेत्र मंजूर करण्यात आलेले असून कोणत्याही प्रकरणात चटईक्षेत्राचे उल्लंघन झालेले नाही. तसेच देण्यात आलेली मंजुरी ही महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायदा १९६६ व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार देण्यात आलेली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडपट्टीने व्यापलेल्या क्षेत्राचा विकास विनियम ३३(१०) नुसार करण्यात येतो व त्याच भूखंडावरील झोपडपट्टी व्यतिरिक्त क्षेत्र (Non Slum Area) याचा विकास हा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील कलम ३३ मध्ये नमूद तरतूदीनुसार करण्यात येतो. त्यानुसार काही प्रकरणात विकासकाने झोपडपट्टीने व्यापलेल्या क्षेत्राचा विकास विनियम ३३(१०) व त्याच भूखंडावरील झोपडपट्टी व्यतिरिक्त क्षेत्र (Non Slum Area) ३३(१९) नुसार करण्याची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार मुभा आहे. अशा प्रकरणांची मंजूरी देताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने अनुज्ञेय चटई क्षेत्र मंजूर केलेले असून विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदींच्या मर्यादेत असून याबाबत कोणत्याही प्रकरणात अतिरिक्त चटईक्षेत्रफळाचा लाभ देण्यात आलेला नाही.

-----*******-----

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसोबत इतर कलमांच्या तरतुदीनुसार विकासाचे प्रस्ताव राबविण्याबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून वेळोवेळी ना-हरकती प्राप्त झाल्या आहेत. तसेच विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील प्रकल्पग्रस्तांची त्याच प्रभागामध्ये (Ward) पुनर्वसनाची गरज लक्षात घेता रस्त्याच्या आखणी रेषेमधील बाधित होणारी संरक्षित बांधकामे हटवून त्यांचे लगतच्या जागेत पुनर्वसन करण्यासाठी महानगर पालिकेकडून प्राप्त झालेल्या मागणी पत्रानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विनियम ३३(१२)(ब) नुसार मंजूरी दिलेली आहे.

सार्वजनिक सुविधा, पोच रस्ता, विकास नियोजन रस्ता अशा प्रकारच्या सार्वजनिक सुविधा जनतेस तातडीने उपलब्ध होण्यासाठी त्यावर असणाऱ्या बांधकामांची बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून नियमानुसार परिशिष्ट बनवून व त्याची पडताळणी करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सदर गाळयांच्या पुनर्वसनाबाबत विनंती केली जाते. तद्नंतरच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने तेवढ्या झोपडपट्टीधारकांचा समावेश करुन मंजूरी दिलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने याबाबतची पत्र / प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच प्राधिकरणास परवानग्या दिलेल्या आहेत.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील कलम ३३(१२)(ब)(ह) मधील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगर पालिकेने प्रमाणित केल्यानंतर परिशिष्ट-२ मध्ये नमूद पात्र असलेल्या बांधकामांना विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय असलेले चटईक्षेत्र मंजूर करण्यात आलेले असून कोणत्याही प्रकरणात चटईक्षेत्राचे उल्लंघन झालेले नाही. तसेच देण्यात आलेली मंजुरी ही महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायदा १९६६ व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार देण्यात आलेली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडपट्टीने व्यापलेल्या क्षेत्राचा विकास विनियम ३३(१०) नुसार करण्यात येतो व त्याच भूखंडावरील झोपडपट्टी व्यतिरिक्त क्षेत्र (Non Slum Area) याचा विकास हा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील कलम ३३ मध्ये नमूद तरतूदीनुसार करण्यात येतो. त्यानुसार काही प्रकरणात विकासकाने झोपडपट्टीने व्यापलेल्या क्षेत्राचा विकास विनियम ३३(१०) व त्याच भूखंडावरील झोपडपट्टी व्यतिरिक्त क्षेत्र (Non Slum Area) ३३(१९) नुसार करण्याची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार मुभा आहे. अशा प्रकरणांची मंजूरी देताना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने अनुज्ञेय चटई क्षेत्र मंजूर केलेले असून विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदींच्या मर्यादेत असून याबाबत कोणत्याही प्रकरणात अतिरिक्त चटईक्षेत्रफळाचा लाभ देण्यात आलेला नाही.

-----*******-----

## सन २०२४ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, श्री.धिरज देशमुख, श्री.सुभाष धोटे, श्री.विनोद निकोले, श्री.सदा सरवणकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११७२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (१०) या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्विकास योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून राबविल्या जात असणे, तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून अधिकाराचा गैरवापर करुन नियमबाह्य पद्धतीने दिलेल्या परवानग्यांमुळे चटईक्षेत्रफळाचे उल्लंघन झाल्याची बाब मुंबई महापालिका आयुक्तांनी शासनाच्या व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अलीकडेच निदर्शनास आणून दिलेली असणे, मुंबई महानगरपालिकेला असलेल्या अधिकारांवर अतिक्रमण करुन नियमबाह्य पध्दतीने विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (१२) (ब) आणि ३३ (१९) या तरतुदींचा फायदाही संबंधित विकासकाला करुन दिला जात असणे, परिणामी विकासकाला मोठ्या प्रमाणावर वाढीव चटईक्षेत्रफळाचा लाभ मिळत असणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील अधिकारी व विकासक यांनी या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केलेला असणे, महापालिका आयुक्तांनी ही बाब निदर्शनास आणून देईपर्यंत झोपू प्राधिकरणाकडून कितीतरी योजनांना/विकासकांना बेकायदेशीरपणे लाभ दिला गेला असल्यामुळे या संपूर्ण गैरव्यवहाराची चौकशी शासन स्तरावरुन करण्याची नितांत आवश्यकता, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी मुंबईच्या नियोजनाचा झालेला बट्टयाबोळ शासनाने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायदा १९६६ मधील कलम ४० नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून स्थापना झालेली आहे. तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पु) अधिनियम १९७१ च्या कलम ३ अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकार आणि कर्तव्य नमूद करण्यात आलेली आहेत. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सदर कलमांचा वापर करुन घोषित केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायदा १९६६ मधील कलम २(१९)(ब) नुसार नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनिमय ३३(१२)(ब) हा रस्त्याच्या आखणी रेषेमधील बाधित होणारी संरक्षित बांधकामे हटवून त्यांचे लगतच्या जागेत पुनर्वसन करण्यासाठी आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना कायदा १९६६ व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी यांना अनुसरुन

सन २०२४ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.कालीदास कोळंबकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३८९ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यात विशेषत: मुंबई शहरातील वरळी, डिलाईल रोड, नायगाव इ. ठिकाणी नागरी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत राबविण्यात येत असलेल्या बीडीडी चाळीच्या पुनर्विकासात तेथील पोलीस बांधवांना हक्काचे घर अंदाजे रुपये १५ लाख मध्ये देण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने घेतल्याचे निदर्शनास येणे, सदरहू पुनर्विकासात सन २०११ पर्यंत असलेल्या कुटुंबांना घरांसाठी ग्रह्रय धरण्यात येणे, तथापि, २०११ नंतर या वसाहतींमध्ये सुमारे २०० पोलीस कुटुंबे राहायला आली असल्याचे निदर्शनास येणे, २०११ नंतरच्या पोलीस कुटुंबांनाही बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात सामावून घेण्याची तसेच, पोलीस वसाहतींचा पोलीस हौसिंग मंडळाच्या मदतीने पुनर्विकास करण्याची आवश्यकता असल्याने विद्यमान मा. मुख्यमंत्री महोदयांची समक्ष भेट घेऊन लेखी निवेदन दिले असल्याची बाब निदर्शनास येणे, मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी सुध्दा याबाबतीत आश्वासित केले असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईतील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्याच्या बाबतीत शासनाने ठोस निर्णय घेतले असले तरी त्यांच्या पुनर्विकासाचे काम धीम्यागतीने होत असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरातील बीडीडी चाळी व पोलीस वसाहतींच्या पुनर्विकासाची बाब शासनाने प्रधान्याने विचारात घेऊन तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मुंबईतील वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय दि. ३०/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामध्ये सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी तसेच दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना कायमस्वरूपी निवासस्थाने कशाप्रकारे उपलब्ध करून देता येतील, यावर उपाययोजना सुचविण्यासाठी तसेच तद्नुषंगीक मुद्यांबाबत सखोल अभ्यास करून सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी दि.०९/०७/२०२१ च्या शासन निर्णयान्वये तत्कालीन मा. मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली व तत्कालीन मा. मंत्री (गृह) यांच्या सह अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती.

उपरोक्त समितीने सादर केलेला अहवाल व त्या अनुषंगाने दि.२२/०७/२०२१ रोजी तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार, बीडीडी चाळींमध्ये दि.०१/०१/२०११ रोजी पर्यंत जे पोलीस कर्मचारी पोलीस सेवानिवासस्थानात वास्तव्यास आहेत (सेवेत कार्यरत, सेवानिवृत्त व दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांचे कायदेशीर वारस इ.) त्यांना बीडीडी चाळींच्या पुनर्विकासांतर्गत ५०० चौ.फूट क्षेत्रफळाचा पुनर्विकसित गाळ्यांचे वितरण बांधकाम खर्च (Construction Cost) आकारुन मालकी तत्त्वावर करण्यात यावे, असा शासन निर्णय दि.१८/०८/२०२१ रोजी निर्गमित करण्यात

आला आहे. बीडीडी चाळींमधील पुनर्वसनास पात्र पोलीस कर्मचारी / त्यांचे वारसदार यांचेकडून पुनर्विकसित गाळ्यांकरीता रु.१५ लक्ष इतकी बांधकाम खर्चाची रक्कम आकारण्यात यावी, असा निर्णय दि.३०/०८/२०२२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

पोलीस विभागाने पुनर्वसनास पात्र केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या गाळ्यांची पुनर्विकासांतर्गत बांधण्यात येणाऱ्या पुनर्वसन सदनिकेची सोडत काढण्यात आली असून प्रकल्प जागेवर पुनर्वसन गाळ्यांची दस्त नोंदणीची कार्यवाही सुरु आहे.

"नेहरू नगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास १० ते १५ वर्ष होऊनही अद्याप त्यांना भोगवटा प्रमाणपत्र (OC) मिळालेले नसणे, विकासक यांच्याकडे लक्ष देत नसणे, संपूर्ण जबाबदारी ही रहिवाश्यांवर येणे, सदरहू विकासक आणि वास्तुविशारद यांच्यावर कारवाई होणे गरजेचे असणे, तसेच अशा इमारतींसाठी भोगवटा प्रमाणपत्र करिता आकारण्यात येणारा दंड आणि शुल्क भरणे सामान्य नागरिकांना परवडणारे नसणे, या करिता अभय योजना आणण्याची मागणी सन्मा. सदस्यांमार्फत सातत्याने होत असणे, मा. मुख्यमंत्री यांचे निर्देश असूनही अद्याप अभय योजनेबाबत गृहनिर्माण विभाग व नगरविकास विभागाकडून कोणताही प्रस्ताव सादर न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन**

नेहरूनगर व टिळकनगर या म्हाडा वसाहतीमध्ये एकूण ३०१ इमारती आहेत. त्यापैकी १८२ इमारतींच्या पुनर्विकासाकरिता म्हाडामार्फत मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्यापैकी बहुतांश इमारतींचे काम पूर्ण झाले असून, ४९ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आलेले आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासाकरिता विकासकाची नियुक्ती करून संस्थेमार्फत विकासकासोबत विकास करारनामा करण्यात येतो. सदर करारनाम्यामध्ये संस्थेच्या सभासदांना मिळणारे पुनर्वसन सदनिकेचे क्षेत्रफळ, कॉर्पस फंड, मासिक भाडे इत्यादी बाबींचा समावेश असतो. सदर विकास करारनाम्यानुसार संस्थेच्या विकासकास नविन इमारतीचे बांधकाम पूर्ण करून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन संस्थेच्या मूळ सभासदांचे पुनर्वसन करणे बंधनकारक असते. तसेच या विकास करारनाम्यातील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे संस्था व त्यांचे विकासक यांना बंधनकारक असते.

नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील बहुतांश इमारतींच्या पुनर्विकासाकरिता, म्हाडा प्राधिकरण ठराव क्र.६०४१. दि.२९.०७.२००४ नुसार चटई क्षेत्र निर्देशांकाचे (FSI) विभागीय (Zonal) दरानुसार अधिमुल्याची परिगणना करुन देकारपत्र जारी करण्यात आले होते.

म्हाडा प्राधिकरणामार्फत ठराव क्र.६२६०, दि.०४.०६.२००७ नुसार, या गृहनिर्माण सस्थांनी "शासन जो निर्णय घेईल किंवा शासन ज्या प्रकरणात जो दर अंतिमत: निश्चित करेल, असा सुधारित दर आकारणे संबंधित संस्था वा व्यक्तीवर बंधनकारक राहील, तसेच विविध प्रकरणाच्या वसुलीबाबत नविन मंजूर दरानुसार फरकाची रक्कम वसुल करावी" अशा आशयाचे हमीपत्र मुंबई मंडळाकडे सादर केलेले आहे. त्यानुसार संस्थांना पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आले होते.

सदर ठरावानुसार ज्या संस्थांकडून म्हाडा प्राधिकरण ठराव क्र.६०४१ नुसार झोनल दराप्रमाणे अधिमुल्य स्विकारले आहे अशा संस्थांकडून फरकाची रक्कम वसुल करण्याबाबत वसुली पत्र जारी करण्यात आलेली आहेत. टिळकनगर व नेहरूनगर या वसाहतीमधील अंदाजे ५७ इमारतीच्या पुनर्विकासाकरिता म्हाडा प्राधिकरण ठराव क्र.६०४१ नुसार अधिमुल्याची परिगणना करून देकारपत्र व ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आले होते. त्यापैकी ४२ सहकारी गृहनिर्माण संस्थांना प्राधिकरण ठराव क्र.६२६० नुसार अधिमूल्य फरकाची रक्कम भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यापैकी १३ संस्थांनी अधिमुल्य फरकाची रक्कम म्हाडाकडे भरणा केलेली आहे. सदर १३ संस्थांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता संमतीपत्र जारी करण्यात आलेले आहे. ज्या संस्थांनी फरकाची रक्कम भरणा केलेली नाही अशा उर्वरित ३१ संस्थांकडून फरकाच्या रकमेसह व्याजाची अशी एकूण अंदाजे रू.१५.२७ कोटी इतकी रक्कम म्हाडास प्राप्त होणे अभिप्रेत आहे.

म्हाडा वसाहतीतील प्रलंबित असलेल्या भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) देण्याकरीता अभय योजना लागू करण्याबाबत मा. लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने, प्रकरणनिहाय छाननी करून आकारण्यात येणाऱ्या व्याजाकरिता अभय योजनेबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही म्हाडा स्तरावर सुरू आहे.

*_*_*_*_*_*

सदर ठरावानुसार ज्या संस्थांकडून म्हाडा प्राधिकरण ठराव क्र.६०४१ नुसार झोनल दराप्रमाणे अधिमुल्य स्विकारले आहे अशा संस्थांकडून फरकाची रक्कम वसुल करण्याबाबत वसुली पत्र जारी करण्यात आलेली आहेत. टिळकनगर व नेहरूनगर या वसाहतीमधील अंदाजे ५७ इमारतीच्या पुनर्विकासाकरिता म्हाडा प्राधिकरण ठराव क्र.६०४१ नुसार अधिमुल्याची परिगणना करून देकारपत्र व ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आले होते. त्यापैकी ४२ सहकारी गृहनिर्माण संस्थांना प्राधिकरण ठराव क्र.६२६० नुसार अधिमूल्य फरकाची रक्कम भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यापैकी १३ संस्थांनी अधिमुल्य फरकाची रक्कम म्हाडाकडे भरणा केलेली आहे. सदर १३ संस्थांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता संमतीपत्र जारी करण्यात आलेले आहे. ज्या संस्थांनी फरकाची रक्कम भरणा केलेली नाही अशा उर्वरित ३१ संस्थांकडून फरकाच्या रकमेसह व्याजाची अशी एकूण अंदाजे रू.१५.२७ कोटी इतकी रक्कम म्हाडास प्राप्त होणे अभिप्रेत आहे.

म्हाडा वसाहतीतील प्रलंबित असलेल्या भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) देण्याकरीता अभय योजना लागू करण्याबाबत मा. लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने, प्रकरणनिहाय छाननी करून आकारण्यात येणाऱ्या व्याजाकरिता अभय योजनेबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही म्हाडा स्तरावर सुरू आहे.

*-*-*-*-*-*

लक्षवेधी सूचना क्र.१८८३

## सन २०२४ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.मंगेश कुडाळकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८८३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नेहरू नगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास १० ते १५ वर्ष होऊनही अद्याप त्यांना भोगवटा प्रमाणपत्र (OC) मिळालेले नसणे, विकासक यांच्याकडे लक्ष देत नसणे, संपूर्ण जबाबदारी ही रहिवाश्यांवर येणे, सदरहू विकासक आणि वास्तुविशारद यांच्यावर कारवाई होणे गरजेचे असणे, तसेच अशा इमारतींसाठी भोगवटा प्रमाणपत्र करिता आकारण्यात येणारा दंड आणि शुल्क भरणे सामान्य नागरिकांना परवडणारे नसणे, या करिता अभय योजना आणण्याची मागणी सन्मा. सदस्यांमार्फत सातत्याने होत असणे, मा. मुख्यमंत्री यांचे निर्देश असूनही अद्याप अभय योजनेबाबत गृहनिर्माण विभाग व नगरविकास विभागाकडून कोणताही प्रस्ताव सादर न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

नेहरूनगर व टिळकनगर या म्हाडा वसाहतीमध्ये एकूण ३०१ इमारती आहेत. त्यापैकी १८२ इमारतींच्या पुनर्विकासाकरिता म्हाडामार्फत मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्यापैकी बहुतांश इमारतींचे काम पूर्ण झाले असून, ४९ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आलेले आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासाकरिता विकासकाची नियुक्ती करून संस्थेमार्फत विकासकासोबत विकास करारनामा करण्यात येतो. सदर करारनाम्यामध्ये संस्थेच्या सभासदांना मिळणारे पुनर्वसन सदनिकेचे क्षेत्रफळ, कॉर्पस फंड, मासिक भाडे इत्यादी बाबींचा समावेश असतो. सदर विकास करारनाम्यानुसार संस्थेच्या विकासकास नविन इमारतीचे बांधकाम पूर्ण करून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन संस्थेच्या मूळ सभासदांचे पुनर्वसन करणे बंधनकारक असते. तसेच या विकास करारनाम्यातील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे संस्था व त्यांचे विकासक यांना बंधनकारक असते.

नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील बहुतांश इमारतींच्या पुनर्विकासाकरिता, म्हाडा प्राधिकरण ठराव क्र.६०४१. दि.२९.०७.२००४ नुसार चटई क्षेत्र निर्देशांकाचे (FSI) विभागीय (Zonal) दरानुसार अधिमुल्याची परिगणना करुन देकारपत्र जारी करण्यात आले होते.

म्हाडा प्राधिकरणामार्फत ठराव क्र.६२६०, दि.०४.०६.२००७ नुसार, या गृहनिर्माण सस्थांनी "शासन जो निर्णय घेईल किंवा शासन ज्या प्रकरणात जो दर अंतिमत: निश्चित करेल, असा सुधारित दर आकारणे संबंधित संस्था वा व्यक्तीवर बंधनकारक राहील, तसेच विविध प्रकरणाच्या वसुलीबाबत नविन मंजूर दरानुसार फरकाची रक्कम वसुल करावी" अशा आशयाचे हमीपत्र मुंबई मंडळाकडे सादर केलेले आहे. त्यानुसार संस्थांना पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आले होते.

रोटा.H/538 (750 – 7 – 24)

[कृ.मा.पृ.]

श्री मोहनराव हबर्ड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ९६२ पुढीलप्रमाणे आहे:-

"नांदेड जिल्हयात २०२३-२४ मध्ये दुष्काळ पडला असणे, पावसाचे पाणी वेळेवर न पडल्यामुळे शेतकऱ्याच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, निसर्गाच्या कोपामुळे शेतकऱ्यांचे उभे पिके करपून गेली असणे, त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला असणे, त्यामुळे शासनाने सदर दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला होता, त्यात शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान कोरडवाहू जमिनीच्या शेतकऱ्यांसाठी रुपये १३६०० प्रति हेक्टर व बागायत जमिनीच्या शेतकऱ्यांसाठी रुपये २७००० प्रती हेक्टरी अनुदान तातडीने देण्याची घोषणा केली असणे, तसेच नांदेड जिल्ह्यात जुले महिन्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले होते त्या वेळी शासनाने अतिवृष्टी अनुदान म्हणून शेतकऱ्यांना प्रत्ती हेक्टरी ८००० हजार रुपये अनुदान वाटप केले असणे, त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला असणे, तसेच अतिवृष्टी अनुदान वाटप करतांना शेतकऱ्यांचे ३०% शेतीचे क्षेत्र बागायती म्हणून सोडून देण्यात आले असणे, त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असणे, त्यामुळे शासनाने तातडीने नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्याऱ्यांना २७००० हजार रुपये प्रति हेक्टर अनुदान देण्याची उपाय योजना करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांची सरकारकडे असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

शासन निर्णय दि.३१.१०.२०२३ अन्वये सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील एकही तालुका प्रचलीत निकषानुसार नाही. तसेच शासन निर्णय दि.१०.११.२०२३ व दि.१६.०२.२०२४ अन्वये नांदेड जिल्हयात एकूण ०८ तालुक्यातील २८ मंडळे ही दुष्काळसदृश्य मंडळे म्हणून घोषीत करण्यात आली असून, राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यांमधील ज्या महसुली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत सरासरी पर्जन्याच्या ७५% पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी झाले आहे अशा महसूली मंडळात अद्याप पर्जन्यमापक यंत्र (AWS) बसविण्यात आलेले नाही अशी मंडळे दुष्काळ सदृश्य मंडळे म्हणून घोषित करून या महसुली मंडळांकरिता ८ सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

नांदेड जिल्ह्यात सन २०२३-२४ मध्ये विविध नैसर्गीक आपत्ती अंतर्गत एकूण ५.६०,६२७.३६ हे. आर क्षेत्रावरील शेतीपिके/शेतजमीनींचे नुकसान झाले असून त्या करिता एकूण ५,७४,८१० इतक्या शेतक-यांना रक्कम ४५६०४.३२ लक्ष इतकी मदत शासन निर्णय दि.२४.०१.२०२३ अन्वये निश्चीत करण्यात आलेल्या सुधारीत ऑनलाईन पध्दतीने वितरीत करण्यात आली आहे.

दि.२७.०३.२०२३ च्या शासन निर्णयानुसार कोरडवाहू पिकांसाठी रु.८,५००/- प्रति हेक्टर, बागायती करीता रु. १७,०००/- प्रती हेक्टर, बहुवार्षिक पिकांसाठी रु.२२;५००/- प्रती हेक्टर अशी नुकसान भरपाईची मदत २ हेक्टर च्या मर्यादित करण्यात येते. दि.०९.११.२०२३ शासन निर्णयानुसार दि.२०.०३.२०२३ च्या शासन निर्णयानुसार देव असलेल्या रकमेबाबतची मदत SDRF च्या निकषांच्या

बाहेर राहून ३ हेक्टर मर्यादेत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर दि.०१.०१.२०२४ च्या शासन निर्णयान्वये जिरायती पिकांसाठी रु.१३,५००/- प्रती हेक्टर (३ हेक्टरच्या मर्यादेत) बागायती पिकासाठी रु २७,०००/- प्रती हेक्टर (३ हेक्टरच्या मर्यादित) बहुवार्षिक पिकांसाठी रु.३६,०००/- प्रति हेक्टर (३ हेक्टरच्या मर्यादेत) अशी मदत नोव्हेंबर, २०२३ व त्यापासून पुढे शेतीपिक नुकसान भरपाईकरिता देण्यात येत आहे. दुष्काळासाठी दि.२९.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये जिरायती बागायती आणि बहुवार्षिक पिकांसाठी दि.२७.०३.२०२३ च्या शासन निर्णयातील दराप्रमाणे जास्तीत जास्त ३ हेक्टरच्या मर्यादेत अनुदान देण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यात माहे जुन-जुलै २०२३ या कालावधीत अतिवृष्टी व पुर परिस्थीतीमुळे झालेल्या पिक नुकसानीच्या अनुषंगाने अनुदान वाटप करतांना शेतकऱ्यांचे ३०% शेतीचे क्षेत्र बागायती म्हणून सोडून देण्यात आले नाही. नांदेड जिल्ह्यात माहे जुन-जुलै २०२३ या कालावधीत अतिवृष्टी व पुर परिस्थीतीमुळे झालेल्या पिक नुकसानीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पंचनाम्यांचे आधारे मदतीचे वाटप करण्यात आले आहे.

********

बाहेर राहून ३ हेक्टर मर्यादेत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर दि.०१.०१.२०२४ च्या शासन निर्णयान्वये जिरायती पिकांसाठी रु.१३,५००/- प्रती हेक्टर (३ हेक्टरच्या मर्यादेत) बागायती पिकासाठी रु २७,०००/- प्रती हेक्टर (३ हेक्टरच्या मर्यादित) बहुवार्षिक पिकांसाठी रु.३६,०००/- प्रति हेक्टर (३ हेक्टरच्या मर्यादेत) अशी मदत नोव्हेंबर, २०२३ व त्यापासून पुढे शेतीपिक नुकसान भरपाईकरिता देण्यात येत आहे. दुष्काळासाठी दि.२९.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये जिरायती बागायती आणि बहुवार्षिक पिकांसाठी दि.२७.०३.२०२३ च्या शासन निर्णयातील दराप्रमाणे जास्तीत जास्त ३ हेक्टरच्या मर्यादेत अनुदान देण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यात माहे जुन-जुलै २०२३ या कालावधीत अतिवृष्टी व पुर परिस्थीतीमुळे झालेल्या पिक नुकसानीच्या अनुषंगाने अनुदान वाटप करतांना शेतकऱ्यांचे ३०% शेतीचे क्षेत्र बागायती म्हणून सोडून देण्यात आले नाही. नांदेड जिल्ह्यात माहे जुन-जुलै २०२३ या कालावधीत अतिवृष्टी व पुर परिस्थीतीमुळे झालेल्या पिक नुकसानीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पंचनाम्यांचे आधारे मदतीचे वाटप करण्यात आले आहे.

********

श्री मोहनराव हबर्ड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ९६२ पुढीलप्रमाणे आहे:-

"नांदेड जिल्हयात २०२३-२४ मध्ये दुष्काळ पडला असणे, पावसाचे पाणी वेळेवर न पडल्यामुळे शेतकऱ्याच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, निसर्गाच्या कोपामुळे शेतकऱ्यांचे उभे पिके करपून गेली असणे, त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला असणे, त्यामुळे शासनाने सदर दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला होता, त्यात शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान कोरडवाहू जमिनीच्या शेतकऱ्यांसाठी रुपये १३६०० प्रति हेक्टर व बागायत जमिनीच्या शेतकऱ्यांसाठी रुपये २७००० प्रती हेक्टरी अनुदान तातडीने देण्याची घोषणा केली असणे, तसेच नांदेड जिल्ह्यात जुले महिन्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले होते त्या वेळी शासनाने अतिवृष्टी अनुदान म्हणून शेतकऱ्यांना प्रत्ती हेक्टरी ८००० हजार रुपये अनुदान वाटप केले असणे, त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला असणे, तसेच अतिवृष्टी अनुदान वाटप करतांना शेतकऱ्यांचे ३०% शेतीचे क्षेत्र बागायती म्हणून सोडून देण्यात आले असणे, त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असणे, त्यामुळे शासनाने तातडीने नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्याऱ्यांना २७००० हजार रुपये प्रति हेक्टर अनुदान देण्याची उपाय योजना करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांची सरकारकडे असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

शासन निर्णय दि.३१.१०.२०२३ अन्वये सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील एकही तालुका प्रचलीत निकषानुसार नाही. तसेच शासन निर्णय दि.१०.११.२०२३ व दि.१६.०२.२०२४ अन्वये नांदेड जिल्हयात एकूण ०८ तालुक्यातील २८ मंडळे ही दुष्काळसदृश्य मंडळे म्हणून घोषीत करण्यात आली असून, राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यांमधील ज्या महसुली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत सरासरी पर्जन्याच्या ७५% पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मि. पेक्षा कमी झाले आहे अशा महसूली मंडळात अद्याप पर्जन्यमापक यंत्र (AWS) बसविण्यात आलेले नाही अशी मंडळे दुष्काळ सदृश्य मंडळे म्हणून घोषित करून या महसुली मंडळांकरिता ८ सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

नांदेड जिल्ह्यात सन २०२३-२४ मध्ये विविध नैसर्गीक आपत्ती अंतर्गत एकूण ५.६०,६२७.३६ हे. आर क्षेत्रावरील शेतीपिके/शेतजमीनींचे नुकसान झाले असून त्या करिता एकूण ५,७४,८१० इतक्या शेतक-यांना रक्कम ४५६०४.३२ लक्ष इतकी मदत शासन निर्णय दि.२४.०१.२०२३ अन्वये निश्चीत करण्यात आलेल्या सुधारीत ऑनलाईन पध्दतीने वितरीत करण्यात आली आहे.

दि.२७.०३.२०२३ च्या शासन निर्णयानुसार कोरडवाहू पिकांसाठी रु.८,५००/- प्रति हेक्टर, बागायती करीता रु. १७,०००/- प्रती हेक्टर, बहुवार्षिक पिकांसाठी रु.२२,५००/- प्रती हेक्टर अशी नुकसान भरपाईची मदत २ हेक्टर च्या मर्यादित करण्यात येते. दि.०९.११.२०२३ शासन निर्णयानुसार दि.२०.०३.२०२३ च्या शासन निर्णयानुसार देव असलेल्या रकमेबाबतची मदत SDRF च्या निकषांच्या

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तिसरे ( पावसाळी ) अधिवेशन

श्री.सुनील राणे, श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यशासनाच्या सेवेतील 'दुरध्वनीचालक' हा 'क' गटातील संवर्ग दुर्लक्षित असल्याचे निदर्शनास येणे, केंद्रशासनाच्या कार्यालयातील दूरध्वनीचालक व राज्यशासनाच्या कार्यालयातील दूरध्वनीचालक या पदावरील कर्मचाऱ्यांची कार्यप्रणाली सारखीच असताना केंद्रशासनाच्या कार्यालयातील दूरध्वनीचालकांप्रमाणे राज्यशासनाच्या कार्यालयातील दूरध्वनीचालकांना वेतनश्रेणीचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, राज्य शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी सुधारित करण्यासाठी प्रत्येक १० वर्षातून वेतन आयोगाची निर्मिती करण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, चौथा ते सहावा वेतन आयोगामध्ये प्रत्येक वेळी गट 'क' व 'ड' मधील समकक्ष नसलेल्या विशिष्ट संवर्गातील (peculiar posts) कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील व पदोन्नतीतील कुंठीतता दूर करण्यासाठी वेतनत्रुटी निवारण समिती राज्यशासनाकडून स्थापन करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, राज्यशासनाच्या सेवेतील दूरध्वनीचालकांनी चौथा, पाचवा व सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर वेतनत्रुटी निवारण समितीकडे प्रत्येक वेळी आपली व्यथा मांडली असता त्या-त्या समितीने त्यांना न्याय दिला नसल्याची बाब निदर्शनास येणे, राज्यशासनाच्या सेवेतील दूरध्वनीचालकांना पदोन्नतीची संधी नाही, केंद्र शासनाच्या दूरध्वनी चालकांप्रमाणे वेतनश्रेणी मिळत नाही, दूरध्वनीचालक पदावरच संपूर्ण सेवाकाळ व्यतीत करुन त्याच पदावर सेवानिवृत्त व्हावे लागते या बाबींमुळे राज्यशासनाच्या सेवेतील दूरध्वनीचालक पदावरील कर्मचा-यांमध्ये निर्माण झालेले प्रचंड नैराश्य, निदान सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील त्रुटींचे निवारण करण्याकरिता शासनाने नियुक्त केलेल्या वेतन त्रुटी निवारण समिती, २०२४ मध्ये तरी राज्यशासनाच्या सेवेतील दूरध्वनीचालकांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

****************************

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे निवेदन

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य शासनाच्या धोरणानुसार केंद्र शासनाच्या वेतनश्रेणीचा अभ्यास करुन राज्य शासकीय व पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाकडून "राज्य वेतन सुधारणा समिती" ची स्थापना करण्यात येते. सदर समितीकडे केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करणे या बाबी सोपविण्यात येतात.

सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींबाबत विविध न्यायालयातील दाखल रिट याचिकांच्या अनुषंगाने तपासणी करुन शिफारशी करण्याकरीता श्री.मुकेश खुल्लर, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली वित्त विभाग, शासन निर्णय, दि.१६.०३.२०२४ अन्वये वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ स्थापना करण्यात आली आहे.

सदर समितीकडे प्रशासकीय विभागाकडून एखाद्या विशिष्ट संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीतील त्रुटी संबंधित सादर होणाऱ्या प्रकरणांची तपासणी करणे, ही बाब देखील सापेविण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम कर्मचारी संघ यांच्याकडून "दूरध्वनी चालक" या संवर्गाच्या वेतनत्रुटींबाबतचे प्रस्ताव समितीकडे सादर झाले आहेत.

सद्य:स्थितीत वेतनत्रुटी निवारण समितीचे अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. वेतनत्रुटी निवारण समितीने सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतनश्रेणीतील त्रुटी निवारणाबाबतच्या शिफारशींचा अहवाल शासनास सादर केल्यानंतर सदर अहवालातील शिफारशी मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येतील व त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.

*****************************

सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींबाबत विविध न्यायालयातील दाखल रिट याचिकांच्या अनुषंगाने तपासणी करुन शिफारशी करण्याकरीता श्री.मुकेश खुल्लर, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली वित्त विभाग, शासन निर्णय, दि.१६.०३.२०२४ अन्वये वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ स्थापना करण्यात आली आहे.

सदर समितीकडे प्रशासकीय विभागाकडून एखाद्या विशिष्ट संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीतील त्रुटी संबंधित सादर होणाऱ्या प्रकरणांची तपासणी करणे, ही बाब देखील सापेविण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम कर्मचारी संघ यांच्याकडून "दूरध्वनी चालक" या संवर्गाच्या वेतनत्रुटींबाबतचे प्रस्ताव समितीकडे सादर झाले आहेत.

सद्य:स्थितीत वेतनत्रुटी निवारण समितीचे अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. वेतनत्रुटी निवारण समितीने सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतनश्रेणीतील त्रुटी निवारणाबाबतच्या शिफारशींचा अहवाल शासनास सादर केल्यानंतर सदर अहवालातील शिफारशी मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येतील व त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.

****************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तिसरे ( पावसाळी ) अधिवेशन

श्री.सुनील राणे, श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यशासनाच्या सेवेतील 'दुरध्वनीचालक' हा 'क' गटातील संवर्ग दुर्लक्षित असल्याचे निदर्शनास येणे, केंद्रशासनाच्या कार्यालयातील दूरध्वनीचालक व राज्यशासनाच्या कार्यालयातील दूरध्वनीचालक या पदावरील कर्मचाऱ्यांची कार्यप्रणाली सारखीच असताना केंद्रशासनाच्या कार्यालयातील दूरध्वनीचालकांप्रमाणे राज्यशासनाच्या कार्यालयातील दूरध्वनीचालकांना वेतनश्रेणीचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, राज्य शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी सुधारित करण्यासाठी प्रत्येक १० वर्षातून वेतन आयोगाची निर्मिती करण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, चौथा ते सहावा वेतन आयोगामध्ये प्रत्येक वेळी गट 'क' व 'ड' मधील समकक्ष नसलेल्या विशिष्ट संवर्गातील (peculiar posts) कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील व पदोन्नतीतील कुंठीतता दूर करण्यासाठी वेतनत्रुटी निवारण समिती राज्यशासनाकडून स्थापन करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास येणे, राज्यशासनाच्या सेवेतील दूरध्वनीचालकांनी चौथा, पाचवा व सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर वेतनत्रुटी निवारण समितीकडे प्रत्येक वेळी आपली व्यथा मांडली असता त्या-त्या समितीने त्यांना न्याय दिला नसल्याची बाब निदर्शनास येणे, राज्यशासनाच्या सेवेतील दूरध्वनीचालकांना पदोन्नतीची संधी नाही, केंद्र शासनाच्या दूरध्वनी चालकांप्रमाणे वेतनश्रेणी मिळत नाही, दूरध्वनीचालक पदावरच संपूर्ण सेवाकाळ व्यतीत करुन त्याच पदावर सेवानिवृत्त व्हावे लागते या बाबींमुळे राज्यशासनाच्या सेवेतील दूरध्वनीचालक पदावरील कर्मचा-यांमध्ये निर्माण झालेले प्रचंड नैराश्य, निदान सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील त्रुटींचे निवारण करण्याकरिता शासनाने नियुक्त केलेल्या वेतन त्रुटी निवारण समिती, २०२४ मध्ये तरी राज्यशासनाच्या सेवेतील दूरध्वनीचालकांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

****************************

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे निवेदन

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य शासनाच्या धोरणानुसार केंद्र शासनाच्या वेतनश्रेणीचा अभ्यास करुन राज्य शासकीय व पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाकडून "राज्य वेतन सुधारणा समिती" ची स्थापना करण्यात येते. सदर समितीकडे केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करणे या बाबी सोपविण्यात येतात.

# महाराष्ट्र विधानसभा

सन -२०२४ चे तृतीय (पावसाळी) आधिवेशन

श्री. संदिप क्षिरसागर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेले लक्षवेधी सूचना क्रमांक ८३० पुढीलप्रमाणे आहे:-

"बीड येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात मागील वर्षी तत्कालीन श्री.स्वप्नील माने व श्री.विघ्ने हे एआरटीओ पदावर कार्यरत असणे, त्यांचे कार्यकाळात झालेल्या अर्थिक गैरव्यवहार प्रकरणी त्यांचेवर दि.१३ जुलै,२०२१ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम १२ व ७ नुसार एफआयआर (क्र.०२०६) नोंदविण्यात आलेला असणे, त्याखेरीज श्री.माने व विघ्ने यांनी तेथील नागरीक श्रीमती खेडकर यांच्या चारचाकी वाहनांच्या बाबतीत देखील फसवणूक करुन त्यांचे अर्थिक नुकसान केल्याचे त्याचबरोबर श्री.खरात यांना चुकीच्या पध्दतीने वाहन चालविण्याचा परवाना (Driving License) देण्यात आल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आलेले असणे, तथापि शासनाने या दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द नोंदविण्यात आलेल्या सदर एफआयआरनुसार व शासन परिपत्रकानुसार कोणती कारवाई केली याबाबत अद्याप संदिग्धता असल्याने त्याबाबतच्या अहवालाबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी, बीड यांनी मागणी केली असतांनाही सदर अहवाल अद्याप त्यांना देण्यात आला नसल्याचे दि.३ मे,२०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, परिणामी सदर अधिकाऱ्यांनी शासनाची केलेली फसवणूक व दिशाभूल, त्यामुळे तेथील कर्मचारी व अधिकारी तसेच कामानिमित्त येणारे गरजु नागरिक यांचेमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण व शासनाप्रति चिडीची भावना, अधिकाऱ्यांवर वचक बसविण्याचे दृष्टीने शासनाने त्याबाबत चौकशी करण्याची व नोंदविण्यात आलेल्या एफआयआर प्रकरणीचा अहवाल देण्याची आवश्यकता, त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## निवेदन

### {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि. ०३ जानेवारी, २०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री.स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. उक्त आदेशानुसार श्री. माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी हे दि. १० जानेवारी, २०२२ पासून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. तसेच श्री. गणेश विघ्ने, हे मोटार वाहन निरिक्षक पदावर उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड येथे कार्यरत आहेत.

श्री. स्वप्नील माने हे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदावर छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असताना त्यांचेवर दि. १३ जुलै, २०२१ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम १२ व ७ नुसार एफआयआर (क्र.२०६) नोंदविण्यात आला असून त्याप्रकरणी त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. सदर एफआयआर (क्र.२०६) हा त्यांचे उप प्रादेशिक परिवहन

कार्यालय, बीड येथील कार्यकाळामधील नाही. श्री.गणेश विघ्ने, मोटार वाहन निरिक्षक यांचेविरुध्द कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

मा.श्री.संदिप क्षिरसागर, विधानसभा सदस्य यांनी परिवहन आयुक्त कार्यालयास दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री.विजय काळे, तत्कालीन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी सखोल चौकशी केली असता श्रीमती खेडकर यांनी कोणत्या वाहनाबाबत तक्रार केली, त्या वाहनाचा क्रमांक कळविणेबाबत व श्री. खरात यांच्या अनुज्ञप्तीबाबतची सविस्तर तक्रार पुरविल्यास सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन पुढील कार्यवाही करणे शक्य होईल, असे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांनी दि. १४ फेब्रुवारी, २०२४ च्या पत्रान्वये मा. विधानसभा सदस्य यांना कळविले आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांचे कार्यालयीन अभिलेखानुसार श्रीमती खेडकर यांच्या चारचाकी वाहनांच्या बाबत फसवणूक झाल्याबाबत कोणताही तक्रार अर्ज उपलब्ध नाही.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड च्या कार्यक्षेत्रात महसूल हानी व बेकायदेशीर कामकाज करुन घेण्याची प्रवृत्ती वाहन प्रतिनिधींमध्ये असल्यामुळे सदर प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी श्री.स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर विशेष प्रयत्न केले असून सन २०२२-२३ मध्ये बीड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये विविध दलालांवर गुन्हे दाखल केले आहेत. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांनी वायुवेग पथकाची कामगिरी उंचावण्याकरिता विशेष प्रयत्न केले असून त्याअनुषंगाने विविध मोहिमा राबवून दोषी वाहनांवर कारवाई करुन महसूल वाढीकरिता प्रयत्न केले आहेत.

विविध जनजागृती मोहिमा आखून अपघाताचे प्रमाण व अपघाताने मृत्यू कमी करणेकरिता विशेष प्रयत्न केले आहेत. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचे अपघातांचे प्रमाण जास्त असल्याने सदर वाहनांना रिफलेक्टर टेप लावण्याची मोहिम हाती घेण्यात आली होती. बीड कार्यालयाने वेळोवेळी नागरीकांच्या तक्रारींची दखल घेवून कामकाज केले आहे. सणासुदीमध्ये बस चालकांकडून अतिरिक्त भाडे आकारणी होत असल्यामुळे त्यास आळा घालण्यासाठी सदर कार्यालयामार्फत विशेष मोहिम राबविण्यात आली असून सदर मोहिमेदरम्यान ५५ प्रवासी बस वाहनांवर कारवाई करुन रु. २.८७ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला. जवळपास १००० प्रवाशांना अंदाज रु. ६.५० लक्ष पर्यंत बसधारकांनी अवैधरित्या वसूल केलेले अतिरिक्त भाडे परत देण्यात आले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता श्री. स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी व श्री. गणेश विघ्ने, मोटार वाहन निरिक्षक यांचेविरुध्द उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड मधील कार्यकाळात कोणतीही अनियमितता दिसून येत नाही.

*****

कार्यालय, बीड येथील कार्यकाळामधील नाही. श्री.गणेश विघ्ने, मोटार वाहन निरिक्षक यांचेविरुध्द कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

मा.श्री.संदिप क्षिरसागर, विधानसभा सदस्य यांनी परिवहन आयुक्त कार्यालयास दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री.विजय काळे, तत्कालीन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी सखोल चौकशी केली असता श्रीमती खेडकर यांनी कोणत्या वाहनाबाबत तक्रार केली, त्या वाहनाचा क्रमांक कळविणेबाबत व श्री. खरात यांच्या अनुज्ञप्तीबाबतची सविस्तर तक्रार पुरविल्यास सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन पुढील कार्यवाही करणे शक्य होईल, असे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांनी दि. १४ फेब्रुवारी, २०२४ च्या पत्रान्वये मा. विधानसभा सदस्य यांना कळविले आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांचे कार्यालयीन अभिलेखानुसार श्रीमती खेडकर यांच्या चारचाकी वाहनांच्या बाबत फसवणूक झाल्याबाबत कोणताही तक्रार अर्ज उपलब्ध नाही.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड च्या कार्यक्षेत्रात महसूल हानी व बेकायदेशीर कामकाज करुन घेण्याची प्रवृत्ती वाहन प्रतिनिधींमध्ये असल्यामुळे सदर प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी श्री.स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर विशेष प्रयत्न केले असून सन २०२२-२३ मध्ये बीड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये विविध दलालांवर गुन्हे दाखल केले आहेत. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांनी वायुवेग पथकाची कामगिरी उंचावण्याकरिता विशेष प्रयत्न केले असून त्याअनुषंगाने विविध मोहिमा राबवून दोषी वाहनांवर कारवाई करुन महसूल वाढीकरिता प्रयत्न केले आहेत.

विविध जनजागृती मोहिमा आखून अपघाताचे प्रमाण व अपघाताने मृत्यू कमी करणेकरिता विशेष प्रयत्न केले आहेत. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचे अपघातांचे प्रमाण जास्त असल्याने सदर वाहनांना रिफलेक्टर टेप लावण्याची मोहिम हाती घेण्यात आली होती. बीड कार्यालयाने वेळोवेळी नागरीकांच्या तक्रारींची दखल घेवून कामकाज केले आहे. सणासुदीमध्ये बस चालकांकडून अतिरिक्त भाडे आकारणी होत असल्यामुळे त्यास आळा घालण्यासाठी सदर कार्यालयामार्फत विशेष मोहिम राबविण्यात आली असून सदर मोहिमेदरम्यान ५५ प्रवासी बस वाहनांवर कारवाई करुन रु. २.८७ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला. जवळपास १००० प्रवाशांना अंदाज रु. ६.५० लक्ष पर्यंत बसधारकांनी अवैधरित्या वसूल केलेले अतिरिक्त भाडे परत देण्यात आले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता श्री. स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी व श्री. गणेश विघ्ने, मोटार वाहन निरिक्षक यांचेविरुध्द उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड मधील कार्यकाळात कोणतीही अनियमितता दिसून येत नाही.

*****

# महाराष्ट्र विधानसभा

सन -२०२४ चे तृतीय (पावसाळी) आधिवेशन

श्री. संदिप क्षिरसागर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेले लक्षवेधी सूचना क्रमांक ८३० पुढीलप्रमाणे आहे:-

"बीड येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात मागील वर्षी तत्कालीन श्री.स्वप्नील माने व श्री.विघ्ने हे एआरटीओ पदावर कार्यरत असणे, त्यांचे कार्यकाळात झालेल्या अर्थिक गैरव्यवहार प्रकरणी त्यांचेवर दि.१३ जुलै,२०२१ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम १२ व ७ नुसार एफआयआर (क्र.०२०६) नोंदविण्यात आलेला असणे, त्याखेरीज श्री.माने व विघ्ने यांनी तेथील नागरीक श्रीमती खेडकर यांच्या चारचाकी वाहनांच्या बाबतीत देखील फसवणूक करुन त्यांचे अर्थिक नुकसान केल्याचे त्याचबरोबर श्री.खरात यांना चुकीच्या पध्दतीने वाहन चालविण्याचा परवाना (Driving License) देण्यात आल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आलेले असणे, तथापि शासनाने या दोन्ही अधिकाऱ्यांविरुध्द नोंदविण्यात आलेल्या सदर एफआयआरनुसार व शासन परिपत्रकानुसार कोणती कारवाई केली याबाबत अद्याप संदिग्धता असल्याने त्याबाबतच्या अहवालाबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी, बीड यांनी मागणी केली असतांनाही सदर अहवाल अद्याप त्यांना देण्यात आला नसल्याचे दि.३ मे,२०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, परिणामी सदर अधिकाऱ्यांनी शासनाची केलेली फसवणूक व दिशाभूल, त्यामुळे तेथील कर्मचारी व अधिकारी तसेच कामानिमित्त येणारे गरजु नागरिक यांचेमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण व शासनाप्रति चिडीची भावना, अधिकाऱ्यांवर वचक बसविण्याचे दृष्टीने शासनाने त्याबाबत चौकशी करण्याची व नोंदविण्यात आलेल्या एफआयआर प्रकरणीचा अहवाल देण्याची आवश्यकता, त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## निवेदन

**{श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}**

परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि. ०३ जानेवारी, २०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री.स्वप्नील माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. उक्त आदेशानुसार श्री. माने, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी हे दि. १० जानेवारी, २०२२ पासून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. तसेच श्री. गणेश विघ्ने, हे मोटार वाहन निरिक्षक पदावर उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड येथे कार्यरत आहेत.

श्री. स्वप्नील माने हे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदावर छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असताना त्यांचेवर दि. १३ जुलै, २०२१ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम १२ व ७ नुसार एफआयआर (क्र.२०६) नोंदविण्यात आला असून त्याप्रकरणी त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. सदर एफआयआर (क्र.२०६) हा त्यांचे उप प्रादेशिक परिवहन

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र. ५६४

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती मंदा म्हात्रे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"न. मुं. म.पा. आस्थापनेवरील करारपध्दतीवरील कर्मचारी किमानवेतनावर गेल्या १० ते १५ वर्षापासून प्रामाणिकपणे अविरतसेवा बजावित असणे, प्रकल्पग्रस्त कर्मचारी यांना कायमस्वरूपी करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.१.६.२०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत निर्देश देवूनही सदरप्रकरणी अद्याप योग्य ती कार्यवाही न होणे अंमलबजावणी पूर्ण करण्याकरिता अपेक्षित ३ महिन्याचा कालावधी दिला असतांना कालवधी संपून गेला तरी अजून पर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी कुठल्याही प्रकारचा निर्णय न घेणे, न.मुं.म.पा. आस्थापनेवरील आरसीएच कार्यक्रमांतर्गत मानधन तत्वावर कार्यरत एकूण ११ कर्मचाऱ्यांना दि.४.३.२०२४ रोजीच्या कायम करण्याबाबत शासन निर्णय पारित केल्याने स्थानिक प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असणे, न.मुं.म.पामध्ये कार्यरत प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना बारवीधरण प्रकल्पबाधितांप्रमाणेच सेवेतकायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत हिवाळी अधिवेशनात उपस्थित केलेल्या लक्षवेधीसूचनेच्या अनुषंगाने सदर प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव सादर करण्याबाबत नमुंमपा यांना निर्देश देणे. जिल्हाधिकारी ठाणे व सिडको यांनी शासनाच्या निर्देशानुसार नमुंमपा.तील कार्यरत ५०१ कर्मचाऱ्यांपैकी १६४ कर्मचाऱ्यांच्या मूळ कागदपत्र निवाडा प्रत (अवॉर्ड कॉपी) ७/१२ उतारा, वंशावळ इ कागदपत्रांची छाननी करून त्यांची यादी न.मुं.म.पास उपलब्ध करून दिली असून देखिल नमुंमपा मार्फत प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांची माहिती उपलब्ध नसल्याचे शासनास कळविणे, सर्व प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांबाबत सर्व माहिती उपलब्ध असताना न.मुं.म.पा. मार्फत सदरप्रकरणी वारंवार शासनास चुकीचा प्रस्ताव सादरकरणे गेली १०-१५ वर्षे सदर न.मुं.म.पा.मधील कार्यरत प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना बारवीधरण प्रकल्पबाधितांप्रमाणेच सेवेत कायमस्वरूपी करण्याबाबत विशेषबाब म्हणून कायम करण्याची गरज सदरबाबत राज्य शासनाने प्रस्ताव सादर करून मंजुरी दिल्यास सर्व कर्मचारी कायमस्वरूपी होणारे सहाय्य याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कंत्राटी पध्दतीने कार्यरत १६४ प्रकल्पग्रस्त यांना महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेने शासनास सादर केला होता, ही वस्तुस्थिती आहे. सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला असून, त्यानुसार विषयांकित १६४ प्रकल्पग्रस्त कर्मचारी किंवा त्यांच्या पूर्वजांच्या जमिनी शहर औद्योगिक विकास महामंडळ किंवा महानगरपालिका यांनी कोणत्याही प्रकल्पासाठी संपादीत केल्या आहेत काय, विषयांकित १६४ प्रकल्पग्रस्त कर्मचारी किंवा त्यांच्या पूर्वजांना प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात आला होता काय, जर सदर कर्मचारी किंवा त्यांच्या पूर्वजांच्या जमिनी शहर औद्योगिक विकास महामंडळ वा महानगरपालिकेने कोणत्याही प्रकल्पासाठी संपादीत केल्या असल्यास, त्यांना किंवा पूर्वजांना शहर औद्योगिक विकास महामंडळ वा महानगरपालिकेकडून कोणता लाभ दिला आहे किंवा कसे, इतर कोणता लाभ दिला किंवा कसे, जर सदर कर्मचाऱ्यांच्या किंवा पूर्वजांच्या जमिनी संपादीत केल्यास असल्यास / प्रकल्पग्रस्त दाखला दिला असल्यास पूर्वजांच्या सोबत कार्यरत कर्मचाऱ्यांचे नाते सिध्द होणारी वंशावळी प्राप्त करून खात्री करावी. याप्रमाणे प्रकल्पग्रस्त असल्याचे व धोरणानुसार अनुज्ञेयतेबाबत खातरजमा झालेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात समावेशनाची कार्यवाही करावी, असे दि.०६.०९.२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

*********

लक्षवेधी सूचना क्रमांक ८८३

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८८३ पुढीलप्रमाणे आहे :-

"गोरेगाव (पश्चिम) येथील राम मंदीर परिसराचा संपूर्ण भूखंड एम.एम.आर.डी.ए.च्या मालकीचा असणे, या भूभागाला ओशिवरा डिस्ट्रिक सेंटर या नावाने ओळखले जाणे, एम. एम. आर. डी.ए.च्या जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असणे, सदर परिसरात मुलभूत सोई सुविधांचा असलेला अभाव, रस्ते, दिवाबत्ती, सार्वजनिक शौचालय, रुग्णालय या सारखा अत्यावश्यक सेवा या भागात नसणे, सरकारतर्फे सदर भूभाग हा बीकेसीच्या धर्तीवर करण्यात येण्याची संकल्पना असणे, परंतु प्रत्यक्षात मात्र धारावीपेक्षाही बिकट परिस्थीती या भागाची झालेली असणे, सदर परिसराच्या नियोजनबध्द विकासाची आवश्यकता असणे, सदर भूभाग एम.एम.आर.डी.ए. कडून मुंबई महानगर पालिकेकडे हस्तांतरीत करण्याची स्थानिकांची मागणी असणे, याबाबत अजून पर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

ओशिवरा जिल्हा केंद्राच्या सुमारे १०२ हेक्टर क्षेत्राच्या विकसनासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची दि.०६/०६/१९८२ रोजीच्या अधिसुचनेन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात आली असुन त्याचा नियोजन प्रस्ताव दि.१६/०१/१९९२ रोजी शासनाने मंजूर केला. तद्नंतर दिनांक १८/११/२०१५ रोजीच्या अधिसुचनेन्वये स्वामी विवेकानंद रस्त्याच्या पश्चिमेकडील क्षेत्र प्राधिकरणाच्या विशेष नियोजन क्षेत्रामधून वगळून ते बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन क्षेत्रामध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे.

ओशिवरा जिल्हा केंद्राचे सध्याचे क्षेत्र सुमारे ६४ हेक्टर आहे.बांद्रा कुर्ला संकुलातील भूखंड पुर्णतः मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मालकीचे आहेत तर ओशिवरा जिल्हा केंद्रातील भूखंड खाजगी असून ते जमिनमालकांकडून नाममात्र मोबदल्याने ताब्यात घेण्यात येतात. आरक्षणाखालील क्षेत्र प्राधिकरण स्वतःकडे ठेवून उर्वरीत क्षेत्र त्याच जमिन मालकाला साठ वर्षाच्या भाडेपट्ट्याने परत देते व अशा प्रकारे सदर क्षेत्राचा जमिन मालकांच्या सहभागाद्वारे विकास करण्यात येतो. ओशिवरा जिल्हा केंद्राच्या मंजूर नियोजन प्रस्तावानुसार दोन भूखंड मैदानासाठी, एक भूखंड बगीच्यासाठी तर दोन भूखंड शाळेसाठी असे एकुण पाच भूखंड आरक्षित आहेत. त्यापैकी उद्यानासाठीच्या आरक्षणावरती मुलांकरीता ओशिवरा उद्यान विकसित झालेले आहे. सदर

उद्यानासमोरील शाळेकरीता आरक्षित असलेल्या भूखंडापैकी भागशः भूखंडावर शाळा विकसित करण्यात आली आहेत.

मैदानासाठी आरक्षित असलेल्या दोन भूखंडांची व शाळेकरीता आरक्षित असलेल्या एका भूखंडाची मालकी खाजगी असून जेव्हा त्याचे जमिन मालक भूखंडाच्या विकसनासाठी प्रस्ताव सादर करतील/पुढाकार घेतील त्यावेळेस सदर आरक्षणे जमिन मालकांच्या सहभागाद्वारे विकसित करता येतील. प्राधिकरणाने ओशिवरा जिल्हा केंद्रामध्ये सार्वजनिक शौचालय उभारणीसाठी प्रस्तावित केलेल्या चार जागांकरीता नाहरकत प्रमाणपत्र म्हाडास देण्यात आले आहे.

ओशिवरा जिल्हा केंद्रामधील एकुण ५.३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांपैकी विकसित झालेल्या ३.८१ कि.मी. लांबीच्या रस्त्यांसह तेवढयाच लांबीची पाणीपुरवठा वाहिनी, मल नि:सारण वाहिनी, पर्जन्यजल नि:सारण वाहिनी व पथदिव्यांचे खांब यांचे काम देखिल पूर्ण झाले आहे. उर्वरित रस्त्यांचा विकास प्राधिकरणामार्फत टप्प्या टप्प्याने हाती घेण्यात आला असून त्यासह जलवाहिनी, मल:निसारण वाहिन्या इ. देखील पुरविण्यांत येतील. ओशिवरा जिल्हा केंद्र, स्वामी विवेकानंद रस्त्याशी जोडण्याकरीता बालभट व मजास नाल्यावर प्रस्तावित असलेल्या पुलाचे काम प्रगतीप्रथावर आहे. सदर पुलामुळे वाहतूक कोंडी टळून वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल.तसेच प्राधिकरणामार्फत वेळोवेळी हाती घेण्यात येणा-या अभियानांतर्गत या ओशिवरा जिल्हा केंद्रामधील अनधिकृत बांधकामांवर निष्कासनची कार्यवाही करण्यात येते.

ओशिवरा जिल्हा केंद्रामध्ये पाणीपुरवठा, मलनिस्सारण सुविधा, दिवाबत्तीची सुविधा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येते. बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत ८६ पथदिवे कार्यरत आहेत. सदर भागातील ३७ इमारतींच्या व्दारातून घन कचरा उचलला जातो, याभागातून प्रतिदिन १० मे.टन कचरा उचलण्यात येतो. तसेच एक स्थिर दाबयंत्र (Hawaya) सदर भागात उभे असते. या भागात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत "आपला दवाखाना" कार्यरत असून त्यामार्फत प्रतिदिन ६०-७० रूग्णांची मोफत तपासणी करून वैदयकिय सेवा पुरविण्यात येत आहेत.

******

एच ६८० - १ अ

उद्यानासमोरील शाळेकरीता आरक्षित असलेल्या भूखंडापैकी भागशः भूखंडावर शाळा विकसित करण्यात आली आहेत.

मैदानासाठी आरक्षित असलेल्या दोन भूखंडांची व शाळेकरीता आरक्षित असलेल्या एका भूखंडाची मालकी खाजगी असून जेव्हा त्याचे जमिन मालक भूखंडाच्या विकसनासाठी प्रस्ताव सादर करतील/पुढाकार घेतील त्यावेळेस सदर आरक्षणे जमिन मालकांच्या सहभागाद्वारे विकसित करता येतील. प्राधिकरणाने ओशिवरा जिल्हा केंद्रामध्ये सार्वजनिक शौचालय उभारणीसाठी प्रस्तावित केलेल्या चार जागांकरीता नाहरकत प्रमाणपत्र म्हाडास देण्यात आले आहे.

ओशिवरा जिल्हा केंद्रामधील एकुण ५.३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांपैकी विकसित झालेल्या ३.८१ कि.मी. लांबीच्या रस्त्यांसह तेवढयाच लांबीची पाणीपुरवठा वाहिनी, मल निःसारण वाहिनी, पर्जन्यजल निःसारण वाहिनी व पथदिव्यांचे खांब यांचे काम देखिल पूर्ण झाले आहे. उर्वरित रस्त्यांचा विकास प्राधिकरणामार्फत टप्प्या टप्प्याने हाती घेण्यात आला असून त्यासह जलवाहिनी, मल:निसारण वाहिन्या इ. देखील पुरविण्यांत येतील. ओशिवरा जिल्हा केंद्र, स्वामी विवेकानंद रस्त्याशी जोडण्याकरीता बालभट व मजास नाल्यावर प्रस्तावित असलेल्या पुलाचे काम प्रगतीप्रथावर आहे. सदर पुलामुळे वाहतूक कोंडी टळून वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल.तसेच प्राधिकरणामार्फत वेळोवेळी हाती घेण्यात येणा-या अभियानांतर्गत या ओशिवरा जिल्हा केंद्रामधील अनधिकृत बांधकामांवर निष्कासनची कार्यवाही करण्यात येते.

ओशिवरा जिल्हा केंद्रामध्ये पाणीपुरवठा, मलनिस्सारण सुविधा, दिवाबत्तीची सुविधा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येते. बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत ८६ पथदिवे कार्यरत आहेत. सदर भागातील ३७ इमारतींच्या व्दारातून घन कचरा उचलला जातो, याभागातून प्रतिदिन १० मे.टन कचरा उचलण्यात येतो. तसेच एक स्थिर दाबयंत्र (Hawaya) सदर भागात उभे असते. या भागात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत “आपला दवाखाना” कार्यरत असून त्यामार्फत प्रतिदिन ६०-७० रूग्णांची मोफत तपासणी करून वैदयकिय सेवा पुरविण्यात येत आहेत.

******

एच ६८०-१३अ

लक्षवेधी सूचना क्रमांक ८८३

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८८३ पुढीलप्रमाणे आहे :-

"गोरेगाव (पश्चिम) येथील राम मंदीर परिसराचा संपूर्ण भूखंड एम.एम.आर.डी.ए.च्या मालकीचा असणे, या भूभागाला ओशिवरा डिस्ट्रिक सेंटर या नावाने ओळखले जाणे, एम. एम. आर. डी.ए.च्या जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असणे, सदर परिसरात मुलभूत सोई सुविधांचा असलेला अभाव, रस्ते, दिवाबत्ती, सार्वजनिक शौचालय, रुग्णालय या सारखा अत्यावश्यक सेवा या भागात नसणे, सरकारतर्फे सदर भूभाग हा बीकेसीच्या धर्तीवर करण्यात येण्याची संकल्पना असणे, परंतु प्रत्यक्षात मात्र धारावीपेक्षाही बिकट परिस्थीती या भागाची झालेली असणे, सदर परिसराच्या नियोजनबध्द विकासाची आवश्यकता असणे, सदर भूभाग एम.एम.आर.डी.ए. कडून मुंबई महानगर पालिकेकडे हस्तांतरीत करण्याची स्थानिकांची मागणी असणे, याबाबत अजून पर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

ओशिवरा जिल्हा केंद्राच्या सुमारे १०२ हेक्टर क्षेत्राच्या विकसनासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची दि.०६/०६/१९८२ रोजीच्या अधिसुचनेन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात आली असुन त्याचा नियोजन प्रस्ताव दि.१६/०१/१९९२ रोजी शासनाने मंजूर केला. तद्नंतर दिनांक १८/११/२०१५ रोजीच्या अधिसुचनेन्वये स्वामी विवेकानंद रस्त्याच्या पश्चिमेकडील क्षेत्र प्राधिकरणाच्या विशेष नियोजन क्षेत्रामधून वगळून ते बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन क्षेत्रामध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे.

ओशिवरा जिल्हा केंद्राचे सध्याचे क्षेत्र सुमारे ६४ हेक्टर आहे.बांद्रा कुर्ला संकुलातील भूखंड पुर्णतः मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मालकीचे आहेत तर ओशिवरा जिल्हा केंद्रातील भूखंड खाजगी असून ते जमिनमालकांकडून नाममात्र मोबदल्याने ताब्यात घेण्यात येतात. आरक्षणाखालील क्षेत्र प्राधिकरण स्वतःकडे ठेवून उर्वरीत क्षेत्र त्याच जमिन मालकाला साठ वर्षाच्या भाडेपट्ट्याने परत देते व अशा प्रकारे सदर क्षेत्राचा जमिन मालकांच्या सहभागाद्वारे विकास करण्यात येतो. ओशिवरा जिल्हा केंद्राच्या मंजूर नियोजन प्रस्तावानुसार दोन भूखंड मैदानासाठी, एक भूखंड बगीच्यासाठी तर दोन भूखंड शाळेसाठी असे एकुण पाच भूखंड आरक्षित आहेत. त्यापैकी उद्यानासाठीच्या आरक्षणावरती मुलांकरीता ओशिवरा उद्यान विकसित झालेले आहे. सदर

लक्षवेधी सूचना क्रमांक ८८६

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८८६ पुढीलप्रमाणे आहे :-

"सन २००५ मध्ये मुंबई शहरामध्ये झालेल्या महाप्रलयकारी अतिवृष्टीमुळे मिठीनदी शेजारील क्रांतीनगर, संदेशनगर, जरीमरी येथील झोपडीधारकांच्या घरांवरून ७-८ फूट उंचीवरून पाणी वाहून मोठ्याप्रमाणावर जीवित व वित्तीय हानी झालेली असणे, तत्कालीन पंतप्रधान-मुख्यमंत्री यांनी तात्काळ निर्णय घेऊन मिठी नदीपात्रातील व विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील झोपडीधारकांसाठी स्थलांतरणाचा प्रस्ताव मंजूर करून सुमारे ३०-३२ इमारती खाजगी विकासकाकडून एच.डी.आय.एल.संकुल, प्रिमिअर वसाहत, कुर्ला (प) येथे बांधण्यात येणे, सदर झोपडपट्टीचे शासकीय नियमाप्रमाणे स्थलांतरण सर्वेक्षण करून झोपडीधारकांचे पात्रता निश्चित करण्यात येणे, प्रत्यक्षात ज्या झोपडपट्टीधारकांसाठी इमारती बांधल्या, सदनिकांच्या चाव्या दिल्या, आश्वासने दिली, त्यांचे जीवनमान प्रत्येक पावसाळ्यात धोक्यात आल्याने त्यांना प्राधान्याने सदनिका मिळण्याची निर्माण झालेली आवश्यकता, मात्र त्यांना घरे न देता विशेषतः माहिम खाडी, रेल्वे प्रकल्प, मेट्रो प्रकल्प इत्यादी इतर प्रकल्पबाधीत झोपडीधारकांचे स्थलांतरण करण्यात येणे, सदर पात्र झोपडीधारकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जाहीर तीव्र निषेध व्यक्त करून विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील व मिठी नदीपात्रातील पात्र प्रकल्पबाधीतांच्या ४०९२ झोपडीधारकांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांना त्यांच्या हक्काची सदनिका देऊन पुनर्वसन करण्याची शासनाकडे केलेली मागणी, उक्त प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसून त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना"

---

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (AAI), मुंबई व आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) यांच्या दरम्यान दिनांक ०४/०४/२००६ रोजी झालेल्या Operation Management and Development Agreement (OMDA) करारान्वये MIAL यांनी विमानपत्त प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन करून तेथील जागा मोकळी करावयाची आहे. विमानपत्तन प्राधिकरणाच्या मुंबई येथील जागेवरील प्रकल्पबाधित झोपडीधारकांच्या पुनर्वसनाबाबत राज्य शासनाच्या दि. ३० सप्टेंबर, २००५ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची प्रकल्प समन्वयक संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) यांना सहाय्य करण्याकरीता मुंबई आंतरराष्ट्रीय प्रा. लि. व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्यामध्ये दिनांक १२ डिसेंबर, २००६ रोजी करार संमत करण्यात आला. सदर कराराच्या अनुषंगाने मुंबई विमानतळाच्या जागेवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी MIAL कंपनीची असून सदर कंपनीला पुनर्वसनाबाबत सहाय्य करण्याची जबाबदारी नोडल एजन्सी म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) होती.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) व मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) यांच्यात झालेल्या करारातील आर्टिकल-III च्या तरतुदीनुसार पुनर्वसनसाठी आवश्यक सदनिका पायाभूत सुविधांसह उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) कंपनीची आहे.

सद्यस्थितीत नगर विकास विभागाच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (CSMIA) अधिसूचीत क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियामावलीमधील फेरबदलास मंजूरीची कलम ३७(१कक)(ग) खालील अधिसूचना दिनांक २९ जून, २०२१ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (CSMIA) अधिसूचीत क्षेत्रातील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी प्रिमियर कंपाऊंड, कुर्ला (प) येथील सदनिका "जसे आहे तशा" स्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास हस्तांतरित करण्यात आले आहेत. प्राप्त झालेल्या इमारती/ सदनिकांची आवश्यक ती दुरुस्ती करुन पात्र झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्यात येत आहे.

संदेशनगर,क्रांतीनगर येथील एकुन ३७५५ झोपडपट्टी धारकांपैकी १८६५ झोपडपट्टी धारक पात्र ठरले असुन त्यापैकी १२७५ झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

तसेच शिल्लक असलेल्या ५९० पात्र प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही इमारत क्र.१,२९ व ३० मध्ये नियोजन आहे. सदर इमारतींच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असून दुरुस्ती होईल त्याप्रमाणे टप्याटप्याने झाल्यानंतर उर्वरीत ५९० पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे.

*********



एच ६८२-१३अ

विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) यांना सहाय्य करण्याकरीता मुंबई आंतरराष्ट्रीय प्रा. लि. व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्यामध्ये दिनांक १२ डिसेंबर, २००६ रोजी करार संमत करण्यात आला. सदर कराराच्या अनुषंगाने मुंबई विमानतळाच्या जागेवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी MIAL कंपनीची असून सदर कंपनीला पुनर्वसनाबाबत सहाय्य करण्याची जबाबदारी नोडल एजन्सी म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) होती.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) व मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) यांच्यात झालेल्या करारातील आर्टिकल-III च्या तरतुदीनुसार पुनर्वसनसाठी आवश्यक सदनिका पायाभूत सुविधांसह उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) कंपनीची आहे.

सद्यस्थितीत नगर विकास विभागाच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (CSMIA) अधिसूचीत क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियामावलीमधील फेरबदलास मंजूरीची कलम ३७(१कक)(ग) खालील अधिसूचना दिनांक २९ जून, २०२१ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (CSMIA) अधिसूचीत क्षेत्रातील झोपडीधारकांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी प्रिमियर कंपाऊंड, कुर्ला (प) येथील सदनिका "जसे आहे तशा" स्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास हस्तांतरित करण्यात आले आहेत. प्राप्त झालेल्या इमारती/ सदनिकांची आवश्यक ती दुरुस्ती करुन पात्र झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्यात येत आहे.

संदेशनगर,क्रांतीनगर येथील एकुन ३७५५ झोपडपट्टी धारकांपैकी १८६५ झोपडपट्टी धारक पात्र ठरले असुन त्यापैकी १२७५ झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

तसेच शिल्लक असलेल्या ५९० पात्र प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही इमारत क्र.१,२९ व ३० मध्ये नियोजन आहे. सदर इमारतींच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असून दुरुस्ती होईल त्याप्रमाणे टप्याटप्याने झाल्यानंतर उर्वरीत ५९० पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे.

*********



एच ६८२-१ अ

लक्षवेधी सूचना क्रमांक ८८६

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८८६ पुढीलप्रमाणे आहे :-

"सन २००५ मध्ये मुंबई शहरामध्ये झालेल्या महाप्रलयकारी अतिवृष्टीमुळे मिठीनदी शेजारील क्रांतीनगर, संदेशनगर, जरीमरी येथील झोपडीधारकांच्या घरांवरून ७-८ फूट उंचीवरून पाणी वाहून मोठ्याप्रमाणावर जीवित व वित्तीय हानी झालेली असणे, तत्कालीन पंतप्रधान-मुख्यमंत्री यांनी तात्काळ निर्णय घेऊन मिठी नदीपात्रातील व विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील झोपडीधारकांसाठी स्थलांतरणाचा प्रस्ताव मंजूर करून सुमारे ३०-३२ इमारती खाजगी विकासकाकडून एच.डी.आय.एल.संकुल, प्रिमिअर वसाहत, कुर्ला (प) येथे बांधण्यात येणे, सदर झोपडपट्टीचे शासकीय नियमाप्रमाणे स्थलांतरण सर्वेक्षण करून झोपडीधारकांचे पात्रता निश्चित करण्यात येणे, प्रत्यक्षात ज्या झोपडपट्टीधारकांसाठी इमारती बांधल्या, सदनिकांच्या चाव्या दिल्या, आश्वासने दिली, त्यांचे जीवनमान प्रत्येक पावसाळ्यात धोक्यात आल्याने त्यांना प्राधान्याने सदनिका मिळण्याची निर्माण झालेली आवश्यकता, मात्र त्यांना घरे न देता विशेषतः माहिम खाडी, रेल्वे प्रकल्प, मेट्रो प्रकल्प इत्यादी इतर प्रकल्पबाधीत झोपडीधारकांचे स्थलांतरण करण्यात येणे, सदर पात्र झोपडीधारकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जाहीर तीव्र निषेध व्यक्त करून विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील व मिठी नदीपात्रातील पात्र प्रकल्पबाधीतांच्या ४०९२ झोपडीधारकांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांना त्यांच्या हक्काची सदनिका देऊन पुनर्वसन करण्याची शासनाकडे केलेली मागणी, उक्त प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसून त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना"

---

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (AAI), मुंबई व आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) यांच्या दरम्यान दिनांक ०४/०४/२००६ रोजी झालेल्या Operation Management and Development Agreement (OMDA) करारान्वये MIAL यांनी विमानपत्त प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन करून तेथील जागा मोकळी करावयाची आहे. विमानपत्तन प्राधिकरणाच्या मुंबई येथील जागेवरील प्रकल्पबाधित झोपडीधारकांच्या पुनर्वसनाबाबत राज्य शासनाच्या दि. ३० सप्टेंबर, २००५ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची प्रकल्प समन्वयक संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

लक्षवेधी सूचना क्रमांक ११४९

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ११४९ पुढीलप्रमाणे आहे :-

"पिंपरी चिंचवड विकास प्राधीकरण कार्यालयाने प्राधीकरण क्षेत्रातील विविध पेठांमध्ये हुडको अर्थसहायाने मासीक हफ्ते वसुलीने ग्रहयोजना राबवलेली असणे त्याअनुशंगाने सन १९७७ ते १९८० या काळात ३३५५ गाळे व सदनीका बांधले असणे व या मिळकतीचे मासीक हफ्त्याने ने वितरणही केले असणे. सदर सर्व ग्रहयोजनाची मासीक हफ्त्याची मुदत जानेवारी २००६ पुर्वी संपलेली असणे, परंतू अदयापी या गाळाधारकांची हफ्त्याची वसुली पुर्ण झालेली नसणे, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधीकरण सभा क्र. २७७ मधील ठरावानुसार दि. १ जून २००८ ते दि. ३० डिसें २००८ या कालावधीत दंडाच्या रकमेत सुट देणेबाबत अभय योजना राबविण्यात आली असणे त्याअनुशंगाने कांही मिळकतदारांनी थकीत हफ्ते भरलेले असणे, अदयाप १०९८ गाळेधारकांना थकीत हफ्ते व दंडाची रक्कम भरण्याबाबत प्रशासनांकडून नोटीसा येत असणे. काही मिळकत दारांच्या दंडाची रक्कम २५ लाख असणे. याबाबत राज्य शासनाने नवनगर प्राधीकरण यास आदेशीत करुन थकीत हफ्ते व दंड माफ करणेबाबत करावयाची योग्य ती कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

तत्कालिन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना सन १९७२ मध्ये करण्यात आली होती. प्राधिकरणामार्फत एकूण ४२ गृहप्रकल्प राबविण्यात आले असून त्यांतर्गत ११२१३ सदनिका व गाळे बांधण्यात आले आहे. तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने प्राधिकरण क्षेत्रातील विविध पेठांत हुडको अर्थसहाय्याने मासिक हप्ते वसूली पद्धतीने पेठ क्र. २, २१, २५, २७अ व २८ यांमध्ये गृहयोजना राबविलेल्या आहेत. सदर गृहयोजनांतील मासिक हप्त्याची मुदत जानेवारी २००६ पूर्वी संपलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत ३३५५ निवासी सदनिकांचे वाटप करण्यात आले होते. त्यापैकी ४४८ निवासी सदनिका रोखीने विक्री करण्यात आली आहे. २९०७ सदनिकाधारकाना सुलभ हप्त्याने वाटप करण्यात आले होते. या सुलभ हप्त्याने वाटप केलेल्या निवासी धारकांपैकी १८०९ लाभार्थीनी आपले हप्ते नियमित भरले आहेत. शिल्लक १०९८ लाभार्थी यांनी अद्याप पर्यंत कोणतीही परतफेड केलेली नाही. सदर थकबाकीदार लाभार्थी यांनी आपली थकबाकी परफेड करावी यास्तव तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी त्यांच्या स्तरावर थकबाकी धाराकांकरीता दि.०१ जून २००८ ते ३० नोव्हेंबर २००८ या कालावधीत दंडनिय व्याजावर ५०% सुट देण्याची एक अभय योजना राबविण्याचा निर्णय घेतला होता.

सदर अभय योजनेस पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने त्यास एक महिन्याची मुदतवाढ पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने दिली होती. त्यास देखील लाभार्थ्याकडून विशेष असा प्रतिसाद मिळाला नाही.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत आता या शिल्लक १०९८ थकबाकी दारांनी थकबाकी भरावी याकरीता सद्यस्थितीमध्ये भारतीय स्टेट बॅकने घोषीत केलेल्या पीएलआर (PLR) दराप्रमाणे थकीत हप्त्यांची वसूली लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे. या योजनेमध्ये ३६ लाभार्थ्यांनी आपली थकबाकी प्राधिकरणाकडे भरणा केली असून आजमितीस १०६२ लाभार्थी थकबाकीदार आहे. या योजनेस देखील लाभार्थ्याकडून अल्प प्रतिसाद मिळत आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी व लाभार्थी यांचा थकबाकी भरण्यास विरोध असल्याने पुनश्च नाविण्यपुर्ण सुधारीत अभय योजना राबविण्याबाबत सूचना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात येतील.

******

सदर अभय योजनेस पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने त्यास एक महिन्याची मुदतवाढ पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने दिली होती. त्यास देखील लाभार्थ्याकडून विशेष असा प्रतिसाद मिळाला नाही.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत आता या शिल्लक १०९८ थकबाकी दारांनी थकबाकी भरावी याकरीता सद्यस्थितीमध्ये भारतीय स्टेट बॅकने घोषीत केलेल्या पीएलआर (PLR) दराप्रनाणे थकीत हप्त्यांची वसूली लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे. या योजनेमध्ये ३६ लाभार्थ्यांनी आपली थकबाकी प्राधिकरणाकडे भरणा केली असून आजमितीस १०६२ लाभार्थी थकबाकीदार आहे. या योजनेस देखील लाभार्थ्याकडून अल्प प्रतिसाद मिळत आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी व लाभार्थी यांचा थकबाकी भरण्यास विरोध असल्याने पुनश्च नाविण्यपुर्ण सुधारीत अभय योजना राबविण्याबाबत सूचना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात येतील.

******

लक्षवेधी सूचना क्रमांक ११४९

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ११४९ पुढीलप्रमाणे आहे :-

"पिंपरी चिंचवड विकास प्राधीकरण कार्यालयाने प्राधीकरण क्षेत्रातील विविध पेठांमध्ये हुडको अर्थसहायाने मासीक हफ्ते वसुलीने ग्रहयोजना राबवलेली असणे त्याअनुशंगाने सन १९७७ ते १९८० या काळात ३३५५ गाळे व सदनीका बांधले असणे व या मिळकतीचे मासीक हफ्त्याने ने वितरणही केले असणे. सदर सर्व ग्रहयोजनाची मासीक हफ्त्याची मुदत जानेवारी २००६ पुर्वी संपलेली असणे, परंतू अदयापी या गाळाधारकांची हफ्त्याची वसुली पुर्ण झालेली नसणे, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधीकरण सभा क्र. २७७ मधील ठरावानुसार दि. १ जून २००८ ते दि. ३० डिसें २००८ या कालावधीत दंडाच्या रकमेत सुट देणेबाबत अभय योजना राबविण्यात आली असणे त्याअनुशंगाने कांही मिळकतदारांनी थकीत हफ्ते भरलेले असणे, अदयाप १०९८ गाळेधारकांना थकीत हफ्ते व दंडाची रक्कम भरण्याबाबत प्रशासनांकडून नोटीसा येत असणे. काही मिळकत दारांच्या दंडाची रक्कम २५ लाख असणे. याबाबत राज्य शासनाने नवनगर प्राधीकरण यास आदेशीत करुन थकीत हफ्ते व दंड माफ करणेबाबत करावयाची योग्य ती कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

तत्कालिन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना सन १९७२ मध्ये करण्यात आली होती. प्राधिकरणामार्फत एकूण ४२ गृहप्रकल्प राबविण्यात आले असून त्यांतर्गत ११२१३ सदनिका व गाळे बांधण्यात आले आहे. तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने प्राधिकरण क्षेत्रातील विविध पेठांत हुडको अर्थसहाय्याने मासिक हप्ते वसूली पद्धतीने पेठ क्र. २, २१, २५, २७अ व २८ यांमध्ये गृहयोजना राबविलेल्या आहेत. सदर गृहयोजनांतील मासिक हप्त्याची मुदत जानेवारी २००६ पूर्वी संपलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत ३३५५ निवासी सदनिकांचे वाटप करण्यात आले होते. त्यापैकी ४४८ निवासी सदनिका रोखीने विक्री करण्यात आली आहे. २९०७ सदनिकाधारकाना सुलभ हप्त्याने वाटप करण्यात आले होते. या सुलभ हप्त्याने वाटप केलेल्या निवासी धारकांपैकी १८०९ लाभार्थानी आपले हप्ते नियमित भरले आहेत. शिल्लक १०९८ लाभार्थी यांनी अद्याप पर्यंत कोणतीही परतफेड केलेली नाही. सदर थकबाकीदार लाभार्थी यांनी आपली थकबाकी परफेड करावी यास्तव तत्कालीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांनी त्यांच्या स्तरावर थकबाकी धाराकांकरीता दि.०१ जून २००८ ते ३० नोव्हेंबर २००८ या कालावधीत दंडनिय व्याजावर ५०% सुट देण्याची एक अभय योजना राबविण्याचा निर्णय घेतला होता.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. महेश (दादा) किसन लांडगे, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ११५२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील व्यापारी यांना जकात ऐवजी स्थानिक संस्था कर दिनांक ३०/०६/२०१७ अखेर लागू असणे त्याअनुषंगाने शहरातील नोंदणीकृत व्यापारी व व्यावसायिक यांना महापालिकेकडून कर निर्धारण आदेश बजावले असणे. तत्कालीन शासन निर्णयानुसार दि. १/०७/२०१७ पासून स्थानिक संस्था कर हा बंद झाल्याने व्यापारी व व्यावसायीकांनी विविध कारणास्तव कर भरणेस लावलेला विलंब, परिणामी महानगरपालिकेचा कर न भरल्याने मोठया प्रमाणात महसूल कर थकित असणे. नोंदणीकृत व्यापारी व व्यावसायीक यांना कर निर्धारण नोटीस व आदेश महापालिकेकडुन बजावले असता आकारण्यात आलेला कर, शास्ती व व्याज याबाबत विविध प्रकारच्या अडचणी व तक्रारी महापालिकेकडे प्राप्त झाल्या असणे, त्याअनुशंगाने महापालिकेने अभय योजना प्रस्तावीत केलेली असून या योजनेमध्ये नोंदणीकृत व्यापारी व व्यावसायिकांनी विहित कालावधीत कर भरल्यास व्याज आणि दंड १०० टक्के माफ करणेबाबत प्रस्तावीत केलेले असणे, त्यास राज्य शासनाकडून त्वरीत मंजूरीची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**-: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

बृन्हमुंबई महानगरपालिका वगळता राज्यातील २५ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये सन २०११ पासून टप्पाटप्याने स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला. सदर स्थानिक संस्था कर ५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकरिता दि.०१ ऑगस्ट, २०१५ पासून व ५० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकरीता दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून बंद करण्यात आला. स्थानिक संस्था कर नियम २०१० च्या तरतूदीन्वये महानगरपालिका क्षेत्रामधील व्यापाऱ्यांनी त्यांनी केलेल्या उलाढालीचे निर्धारण (Self Assesment) करुन लगतच्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत निर्धारीत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे व आर्थिक वर्ष संपुष्टात आल्यानंतर ९० दिवसाच्या आत स्थानिक संस्था कर विवरण पत्रे महापालिकेकडे सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, ज्या व्यावसायिकांनी कर निर्धारणा न करता महानगरपालिकेकडे स्थानिक संस्था कर जमा केला नाही त्यांना २ टक्के प्रतिमहिना व्याज आकारणी, ज्यांनी महानगरपालिका क्षेत्रामध्ये व्यावसायाची नोंदणी न करता व कर निर्धारण न करता महानगरपालिका क्षेत्रामध्ये व्यवसाय केला आहे अशा व्यापाऱ्यांना ५ पट दंड आकारण्यात येतो. तथापि, स्थानिक संस्था कराचे निर्धारण करणाऱ्या व्यापाऱ्यांचे प्रमाण खूप कमी असल्याने तसेच स्थानिक संस्था कराची वसूली अत्यंत कमी होत असल्याने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० च्या नियम ४८, उपनियम ९ (अ) नुसार दिनांक ०३ जून, २०१५ च्या अधिसूचनेअन्वये स्थानिक संस्था कर अभय योजना दिनांक ०३ जून, २०१५ ते ३१ ऑगस्ट, २०१५ या कालावधीकरीता राबविली. सदर योजनेत स्थानिक संस्था करावरील व्याज व दंड माफ करण्याची तरतूद होती व त्यानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि, ०१ जुलै, २०१७ पासून स्थानिक संस्था कर (LBT) हा पूर्णत: रद्द करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने त्यांच्या कार्यक्षेत्रामधील व्यापाऱ्यांसाठी अभय योजना लागू करणेबाबत प्रस्ताव शासनास सादर केला असून त्याअंतर्गत स्थानिक संस्था कराचे व्याज व शास्ती माफ करण्याची विनंती केली आहे. सदर अभय योजना लागू करणे ही धोरणात्मक बाब असून इतर महानगरपालिकांकडून या संदर्भात प्रस्ताव प्राप्त झाल्यास कायदेशीर बाबी व नियम तपासून त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.

*************************

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने त्यांच्या कार्यक्षेत्रामधील व्यापाऱ्यांसाठी अभय योजना लागू करणेबाबत प्रस्ताव शासनास सादर केला असून त्याअंतर्गत स्थानिक संस्था कराचे व्याज व शास्ती माफ करण्याची विनंती केली आहे. सदर अभय योजना लागू करणे ही धोरणात्मक बाब असून इतर महानगरपालिकांकडून या संदर्भात प्रस्ताव प्राप्त झाल्यास कायदेशीर बाबी व नियम तपासून त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.

**************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. महेश (दादा) किसन लांडगे, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ११५२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील व्यापारी यांना जकात ऐवजी स्थानिक संस्था कर दिनांक ३०/०६/२०१७ अखेर लागू असणे त्याअनुषंगाने शहरातील नोंदणीकृत व्यापारी व व्यावसायिक यांना महापालिकेकडून कर निर्धारण आदेश बजावले असणे. तत्कालीन शासन निर्णयानुसार दि. १/०७/२०१७ पासून स्थानिक संस्था कर हा बंद झाल्याने व्यापारी व व्यावसायीकांनी विविध कारणास्तव कर भरणेस लावलेला विलंब, परिणामी महानगरपालिकेचा कर न भरल्याने मोठया प्रमाणात महसूल कर थकित असणे. नोंदणीकृत व्यापारी व व्यावसायीक यांना कर निर्धारण नोटीस व आदेश महापालिकेकडुन बजावले असता आकारण्यात आलेला कर, शास्ती व व्याज याबाबत विविध प्रकारच्या अडचणी व तक्रारी महापालिकेकडे प्राप्त झाल्या असणे, त्याअनुशंगाने महापालिकेने अभय योजना प्रस्तावीत केलेली असून या योजनेमध्ये नोंदणीकृत व्यापारी व व्यावसायिकांनी विहित कालावधीत कर भरल्यास व्याज आणि दंड १०० टक्के माफ करणेबाबत प्रस्तावीत केलेले असणे, त्यास राज्य शासनाकडून त्वरीत मंजूरीची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

बृन्हमुंबई महानगरपालिका वगळता राज्यातील २५ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये सन २०११ पासून टप्पाटप्याने स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला. सदर स्थानिक संस्था कर ५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकरिता दि.०१ ऑगस्ट, २०१५ पासून व ५० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकरीता दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून बंद करण्यात आला. स्थानिक संस्था कर नियम २०१० च्या तरतूदीन्वये महानगरपालिका क्षेत्रामधील व्यापाऱ्यांनी त्यांनी केलेल्या उलाढालीचे निर्धारण (Self Assesment) करुन लगतच्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत निर्धारीत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे व आर्थिक वर्ष संपुष्टात आल्यानंतर ९० दिवसाच्या आत स्थानिक संस्था कर विवरण पत्रे महापालिकेकडे सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, ज्या व्यावसायिकांनी कर निर्धारणा न करता महानगरपालिकेकडे स्थानिक संस्था कर जमा केला नाही त्यांना २ टक्के प्रतिमहिना व्याज आकारणी, ज्यांनी महानगरपालिका क्षेत्रामध्ये व्यावसायाची नोंदणी न करता व कर निर्धारण न करता महानगरपालिका क्षेत्रामध्ये व्यवसाय केला आहे अशा व्यापाऱ्यांना ५ पट दंड आकारण्यात येतो. तथापि, स्थानिक संस्था कराचे निर्धारण करणाऱ्या व्यापाऱ्यांचे प्रमाण खुप कमी असल्याने तसेच स्थानिक संस्था कराची वसूली अत्यंत कमी होत असल्याने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० च्या नियम ४८, उपनियम ९ (अ) नुसार दिनांक ०३ जून, २०१५ च्या अधिसूचनेअन्वये स्थानिक संस्था कर अभय योजना दिनांक ०३ जून, २०१५ ते ३१ ऑगस्ट, २०१५ या कालावधीकरीता राबविली. सदर योजनेत स्थानिक संस्था करावरील व्याज व दंड माफ करण्याची तरतूद होती व त्यानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि, ०१ जुलै, २०१७ पासून स्थानिक संस्था कर (LBT) हा पूर्णत: रद्द करण्यात आला आहे.

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र. १३८०

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. प्रमोद (राजू) रतन पाटील, श्री. किसन कथोरे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १३८० पुढीलप्रमाणे** आहे:-

"“माहे नोव्हेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात कल्याण-डोंबिवली मनपातून २७ गावे वगळून त्यांची स्वतंत्र नगरपालिका स्थापन करणेबाबत गेल्या अनेक वर्षापासून या गावातील नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार यांनी शासन दरबारी वारंवार केलेली मागणी, महाविकास आघाडी सरकारने २७ पैकी १८ गावे वगळून त्यांची स्वतंत्र नगरपालिका तयार करण्याचे जाहिर करणे, सरकारच्या या निर्णयाला न्यायालयात दिले गेलेली आव्हान, संघर्ष समितीच्या मागणीनुसार २७ पैकी १८ गावे न वगळता सर्वच गावे वगळण्यात यावीत व नवीन सरकारने २७ गावांसाठी विकासाचे पॅकेज जाहिर करावे अशी मागणी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांची भेट घेऊन त्यांच्याकडेही केल्याची बाब उघडकीस येणे, गेली अनेक वर्षे एकच मागणी या २७ गावांतील नागरिक व लोकप्रतिनिधीन शासन दरबारी करत असताना कोणतेही राज्य शासन या मागणीनुसार २७ गावांची नगरपालिका घोषित करत नसल्याने, शासन हेतूत: वेळकाढूपणा करीत असून, या २७ गावांतील नागरिकांना नैसर्गिक न्यायापासून वंचित ठेवण्याचे धोरण गेली अनेक वर्षापासून अवलंबिण्यात आल्याचे अनुभवास येणे, शासनाचे २७ गावांतील नागरीकांच्या मागणीकडे वर्षानुवर्षे हेतुत: दुर्लक्ष होत असल्याने या २७ गावांतील रहिवाशांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”"

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची स्थापना दि.०१.१०.१९८३ रोजी झालेली असून, या महानगरपालिकेच्या हद्दीत कल्याण नगरपालिका, अंबरनाथ नगरपालिका, डोंबिवली नगरपालिका व कल्याण तहसिलमधील ५६ गावे व उल्हासनगर तहसिलमधील २५ गावांचा समावेश करण्यात आला. तद्नंतर दि.१२/०७/२००२ रोजीच्या अधिसूचनेन्वये कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून २७ गावे (कल्याण तालुक्यातील १९ व अंबरनाथ तालुक्यातील ८ गावे) वगळण्यात आली.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून उक्त २७ गावे वगळल्याने या गावांच्या नियोजनबद्ध विकासावर प्रतिकूल परिणाम झाला. या भागाच्या विकासाच्या नियोजनाअभावी तसेच अनधिकृत बांधकामांमुळे या भागात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे अवघड झाले. याखेरीज या २७ गावांपैकी काही क्षेत्रांमध्ये औद्योगिक विकास झपाट्याने होत असून हा भाग महानगरपालिकेतून वगळण्यात आल्याने ही बाब औद्योगिक विकासास मारक ठरली.

त्यामुळे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून वगळण्यात आलेली २७ गावे पुनश्च कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात यावीत. तसेच या गावांचा विकास करण्याच्या दृष्टीने कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात यावा, अशी शिफारस विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या दि.०३/०३/२०१५ च्या अहवालाद्वारे केली होती. याकरीता या गावांचा कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात समावेश करणे किंवा या गावांकरीता स्वतंत्र नगरपरिषद गठित करणे असे दोन पर्याय शासनापुढे उपलब्ध होते. ही २७ गावे यापूर्वी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राचाच एक भाग असल्याने राज्य शासनाने शासन अधिसूचना दि.१४/०५/२०१५ अन्वये

कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रात दि.०१/०६/२०१५ पासून सदर गावांचा समावेश केला. परंतु तद्नंतर या २७ गावांत कार्यरत असलेली सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समिती आणि स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच, २७ गावांमधील नागरिकांनी या २७ गावांकरिता स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्यात यावी, अशी मागणी केली.

त्यासअनुसरून दि.०७/०९/२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये उक्त २७ गावांच्या क्षेत्राकरिता नगरपरिषद घटित करण्यासाठी व उक्त क्षेत्र कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातून वगळून कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्राच्या सीमांत फेरफार करण्याच्या दृष्टीने उद्घोषणा प्रसिद्ध केली गेली. याबाबत प्राप्त हरकतींवर विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडे दि. ११.०३.२०२० व दि.१२.०३.२०२० रोजी सुनावण्या घेण्यात आल्या. विभागीय आयुक्तांनी शिफारस केल्याप्रमाणे दि.२४.०६.२०२० च्या अधिसूचनेन्वये, सदर २७ गावांपैकी १८ गावे (घेसर, हेदुटणे, उंब्रोली, भाल, द्वारली, माणेरे, वसार, आशेळे, नांदिवली तर्फे अंबरनाथ, आडिवली-ढोकली, दावडी, चिंचपाडा, पिसवली, गोळीवली, माणगांव, निळजे, सोनारपाडा व कोळे) महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यात आली व सदर गावांकरीता "कल्याण उपनगर नगरपरिषद" या नावाने नगरपरिषद गठीत करण्यात आली. उर्वरित ९ गावे (आजदे, सागाव, नांदिवली पंचानंद, धारीवली, संदप, उसरघर, काटई, भोपर व देसलपाडा) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात कायम ठेवण्यात आली.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून १८ गावे वगळण्याबाबत व या १८ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याबाबत काढलेली अंतिम व प्राथमिक अधिसूचना रद्द करण्याबाबत श्री.पांडुरंग पाटील यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. सदर याचिकेवर निर्णय देतांना मा. उच्च न्यायालयाने शासनाने काढलेल्या अधिसूचना रद्द बादल केल्या. मा. उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरूध्द शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल केली असून, सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

*********

कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रात दि.०१/०६/२०१५ पासून सदर गावांचा समावेश केला. परंतु तद्नंतर या २७ गावांत कार्यरत असलेली सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समिती आणि स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच, २७ गावांमधील नागरिकांनी या २७ गावांकरिता स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्यात यावी, अशी मागणी केली.

त्यासअनुसरून दि.०७/०९/२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये उक्त २७ गावांच्या क्षेत्राकरिता नगरपरिषद घटित करण्यासाठी व उक्त क्षेत्र कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातून वगळून कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्राच्या सीमांत फेरफार करण्याच्या दृष्टीने उद्घोषणा प्रसिद्ध केली गेली. याबाबत प्राप्त हरकतींवर विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडे दि. ११.०३.२०२० व दि.१२.०३.२०२० रोजी सुनावण्या घेण्यात आल्या. विभागीय आयुक्तांनी शिफारस केल्याप्रमाणे दि.२४.०६.२०२० च्या अधिसूचनेन्वये, सदर २७ गावांपैकी १८ गावे (घेसर, हेदुटणे, उंब्रोली, भाल, द्वारली, माणेरे, वसार, आशेळे, नांदिवली तर्फे अंबरनाथ, आडिवली-ढोकली, दावडी, चिंचपाडा, पिसवली, गोळीवली, माणगांव, निळजे, सोनारपाडा व कोळे) महानगरपालिका क्षेत्रातून वगळण्यात आली व सदर गावांकरीता "कल्याण उपनगर नगरपरिषद" या नावाने नगरपरिषद गठीत करण्यात आली. उर्वरित ९ गावे (आजदे, सागाव, नांदिवली पंचानंद, धारीवली, संदप, उसरघर, काटई, भोपर व देसलपाडा) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात कायम ठेवण्यात आली.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून १८ गावे वगळण्याबाबत व या १८ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याबाबत काढलेली अंतिम व प्राथमिक अधिसूचना रद्द करण्याबाबत श्री.पांडुरंग पाटील यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. सदर याचिकेवर निर्णय देतांना मा. उच्च न्यायालयाने शासनाने काढलेल्या अधिसूचना रद्द बादल केल्या. मा. उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरूध्द शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल केली असून, सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

*********

## महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र. १३८०

सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. प्रमोद (राजू) रतन पाटील, श्री. किसन कथोरे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १३८० पुढीलप्रमाणे आहे:-**

"“माहे नोव्हेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात कल्याण-डोंबिवली मनपातून २७ गावे वगळून त्यांची स्वतंत्र नगरपालिका स्थापन करणेबाबत गेल्या अनेक वर्षापासून या गावातील नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार यांनी शासन दरबारी वारंवार केलेली मागणी, महाविकास आघाडी सरकारने २७ पैकी १८ गावे वगळून त्यांची स्वतंत्र नगरपालिका तयार करण्याचे जाहिर करणे, सरकारच्या या निर्णयाला न्यायालयात दिले गेलेली आव्हान, संघर्ष समितीच्या मागणीनुसार २७ पैकी १८ गावे न वगळता सर्वच गावे वगळण्यात यावीत व नवीन सरकारने २७ गावांसाठी विकासाचे पॅकेज जाहिर करावे अशी मागणी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांची भेट घेऊन त्यांच्याकडेही केल्याची बाब उघडकीस येणे, गेली अनेक वर्षे एकच मागणी या २७ गावांतील नागरिक व लोकप्रतिनिधीन शासन दरबारी करत असताना कोणतेही राज्य शासन या मागणीनुसार २७ गावांची नगरपालिका घोषित करत नसल्याने, शासन हेतूत: वेळकाढूपणा करीत असून, या २७ गावांतील नागरिकांना नैसर्गिक न्यायापासून वंचित ठेवण्याचे धोरण गेली अनेक वर्षापासून अवलंबिण्यात आल्याचे अनुभवास येणे, शासनाचे २७ गावांतील नागरीकांच्या मागणीकडे वर्षानुवर्षे हेतुत: दुर्लक्ष होत असल्याने या २७ गावांतील रहिवाशांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”"

### मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची स्थापना दि.०१.१०.१९८३ रोजी झालेली असून, या महानगरपालिकेच्या हद्दीत कल्याण नगरपालिका, अंबरनाथ नगरपालिका, डोंबिवली नगरपालिका व कल्याण तहसिलमधील ५६ गावे व उल्हासनगर तहसिलमधील २५ गावांचा समावेश करण्यात आला. तद्नंतर दि.१२/०७/२००२ रोजीच्या अधिसूचनेन्वये कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून २७ गावे (कल्याण तालुक्यातील १९ व अंबरनाथ तालुक्यातील ८ गावे) वगळण्यात आली.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातून उक्त २७ गावे वगळल्याने या गावांच्या नियोजनबद्ध विकासावर प्रतिकूल परिणाम झाला. या भागाच्या विकासाच्या नियोजनाअभावी तसेच अनधिकृत बांधकामांमुळे या भागात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे अवघड झाले. याखेरीज या २७ गावांपैकी काही क्षेत्रांमध्ये औद्योगिक विकास झपाट्याने होत असून हा भाग महानगरपालिकेतून वगळण्यात आल्याने ही बाब औद्योगिक विकासास मारक ठरली.

त्यामुळे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून वगळण्यात आलेली २७ गावे पुनश्च कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात यावीत. तसेच या गावांचा विकास करण्याच्या दृष्टीने कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात यावा, अशी शिफारस विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या दि.०३/०३/२०१५ च्या अहवालाद्वारे केली होती. याकरीता या गावांचा कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात समावेश करणे किंवा या गावांकरीता स्वतंत्र नगरपरिषद गठित करणे असे दोन पर्याय शासनापुढे उपलब्ध होते. ही २७ गावे यापूर्वी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राचाच एक भाग असल्याने राज्य शासनाने शासन अधिसूचना दि.१४/०५/२०१५ अन्वये

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १८७०**

अ‍ॅड. आकाश फुंडकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८७० पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्व एलईडी बल्ब पथदिवे हे EESL(एनर्जी इफीसीयन्सी सर्व्हिस लिमिटेड) या कंपनीकडून खरेदी करण्याचे बंधन घालण्यात आले असणे, दि. १२ जानेवारी २०१८ रोजी शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१८३/नवि-२० नुसार राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांना एलईडी पथ दिव्यांसाठी वैशिष्टयपुर्ण योजना किंवा अन्य योजनेंतून खर्च न करण्याबाबत प्रतिबंध केला असणे, उपरोक्त कंपनी ही देखभाल दुरुस्तीसाठी पथदिवे राखीव ठेवणे आवश्यक असतांना देखील राखीव पथदिवे ठेवत नसणे, पथ दिव्यांचे संख्येचे प्रमाणानुसार अपुरे मनुष्यबळ या कंपनीकडे असल्यामुळे पथदिवे दुरुस्तीस विलंब होत असणे, खामगांव शहरातील न. प. हददीतील नवीन वस्त्यांमध्ये पथ दिव्यांची मोठया प्रमाणात आवश्यकता असणे, तसचे खामगांव शहराची हददवाढीचा प्रस्ताव देखील असल्यामुळे अतिरिक्त पथदिव्यांची आवश्यकता भासणार असणे, याकरीता जवळपास ५००० नवीन पथदिव्यांची आवश्यकता असणे, EESL ( एनर्जी इफीसीयन्सी सर्व्हिस लिमिटेड) या कंपनीचा करार सन २०२५ मध्ये संपणार असणे, सदरची कंपनी नवीन पथदिवे देण्यास टाळाटाळ करीत असणे, तसेच EESL (एनर्जी इफीसीयन्सी सर्व्हिस लिमिटेड) या कंपनीने पथदिवे देऊन त्यांचा करार संपुष्टात आल्यास त्यांची दुरुस्तीच्या हमीबाबत प्रश्न निर्माण होणार असणे, EESL (एनर्जी इफीसीयन्सी सर्व्हिस लिमिटेड) कंपनीने लावलेल्या पथदिव्यांचे दुरुस्तीचे साहित्य खुल्या बाजार पेठेत मिळत नसणे, यामुळे सामान्य जनता त्रस्त झाली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

राज्य शासनाच्या उर्जा विभागाच्या, उर्जा संवर्धन धोरण, २०१७ नुसार सर्व नागरी स्वराज्य संस्थांना पथदिवे बसविताना फक्त एलईडी पथदिवे बसविणे बंधनकारक आहे. हे धोरण नगर विकास विभागाच्या वतीने स्वीकृत करून राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

त्या अनुषंगाने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रम असलेल्या एनर्जी एफिशिएन्सी सर्विसेस लिमिटेड म्हणजेच EESL च्या माध्यमातून एस्को तत्वावर एलईडी पथदिवे बसविण्यासाठी राज्य शासनाने EESL सोबत सर्वसाधारण करारनामा केला आहे. तसेच संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या क्षेत्रात EESL च्या माध्यमातून पथदिव्यांसाठी फक्त एलईडी दिवे बसविणे व त्यासाठी EESL सोबत करारनामा करणे त्यांच्यावर बंधनकारक करण्यात आले. त्यामुळे एलईडी पथदिव्यांवर एकरकमी भांडवली गुंतवणूक करण्याचा आर्थिक ताण नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवरील कमी झाला. एलईडी पथदिव्यांवरील भांडवली गुंतवणूक करावी लागणार नसल्याने राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेतून अथवा स्वनिधीतून त्यावर खर्च करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व EESL यांच्यामधील करारनामा व त्यात विहित केलल्या अटींचे पालन करणे हे दोन्ही संस्थांना क्रमप्राप्त आहे. त्यानुसार एलईडी दिव्यांचा पुरवठा योग्य प्रमाणात

४३



व त्यांची देखाभाल दुरुस्ती करणे तसेच त्याबाबत कंपनीची देयके विहित वेळेत अदा करणे या बाबींचे पालन दोन्ही घटकांकडून होणे आवश्यक आहे. तथापि, एलईडी दिव्यांचा पुरवठा व त्यांची देखभाल दुरुस्ती कंपनीकडून विहित कालावधीत होत नसल्याचे नागरी थानिक स्वराज्य संस्थांनी तर संबंधित संस्थांकडून देयके अदा केली जात नसल्याची बाब EESL कंपनीकडून शासनाच्या निदर्शनास आणली आहे.

शासनाच्या उर्जा सवर्धनाच्या धोरणास अनुसरुन खामगांव नगरपरिषद यांनी दिनांक २९.०६.२०१८ रोजी EESL सोबत करारानामा केला असून त्याचा कालावधी सन २०२५ पर्यंत आहे. प्रस्तुत करारानंतर नगरपरिषदेच्या क्षेत्रात नवीन वस्त्या निर्माण झाल्या असून तेथे अधिकच्या एलईडी दिव्यांची आवश्यकता त्याचप्रमाणे खामगांव नगरपरिषदेने हद्दवाढीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून भविष्यात नव्याने समाविष्ट होणाऱ्या भागासाठीदेखील ५००० एलईडी दिव्यांची गरज असल्याचे नगरपरिषदेने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे. करारनाम्याचा कालावधी संपूष्टात आल्यानंतर एलईडी पथदिव्यांची देखभाल संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वत: करणे क्रमप्राप्त आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात पथ दिव्याअभावी रात्रीच्या वेळेस अंधारास सामारे जावे लागत असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधीकडून शासनास प्राप्त झाल्या आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व EESL यांच्यातील करारानाम्यात सदर करारानामा रद्द करण्याची तरतूद अंतर्भूत असून सदर तरतूदींचा अवलंब करुन दोन्ही घटकांना करारानामा मुदतपूर्व रद्द करता येईल. तथापि, त्याबाबतची कार्यवाही EESL व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां यांनी करणे क्रमप्राप्त आहे. सदर करारनामा रद्द करण्याची नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त विनंतीच्या अनुषंगाने करारनाम्यातील तरतूदीचा अवलंब करुन करारनामा रद्द करण्याची कार्यवाही करण्याबाबत त्यांना शासनस्तरावरुन वेळोवळी कळविण्यात आले आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडील प्रलंबित देयके अदा करण्याबाबत EESL ने शासनास विनंती केली आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय दिनांक ०४.०६.२०१८ च्या तरतूदीनुसार नागरी स्थनिक स्वराज्य संस्थांना देय शासन अनुदानातून EESL ची वैध प्रलंबित देयके शासनस्तरावरुन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

----------

व त्यांची देखाभाल दुरुस्ती करणे तसेच त्याबाबत कंपनीची देयके विहित वेळेत अदा करणे या बाबींचे पालन दोन्ही घटकांकडून होणे आवश्यक आहे. तथापि, एलईडी दिव्यांचा पुरवठा व त्यांची देखभाल दुरुस्ती कंपनीकडून विहित कालावधीत होत नसल्याचे नागरी थानिक स्वराज्य संस्थांनी तर संबंधित संस्थांकडून देयके अदा केली जात नसल्याची बाब EESL कंपनीकडून शासनाच्या निदर्शनास आणली आहे.

शासनाच्या उर्जा सवंर्धनाच्या धोरणास अनुसरुन खामगांव नगरपरिषद यांनी दिनांक २९.०६.२०१८ रोजी EESL सोबत करारानामा केला असून त्याचा कालावधी सन २०२५ पर्यंत आहे. प्रस्तुत करारानंतर नगरपरिषदेच्या क्षेत्रात नवीन वस्त्या निर्माण झाल्या असून तेथे अधिकच्या एलईडी दिव्यांची आवश्यकता त्याचप्रमाणे खामगांव नगरपरिषदेने हद्दवाढीचा प्रस्ताव शासनास सादर केला असून भविष्यात नव्याने समाविष्ट होणाऱ्या भागासाठीदेखील ५००० एलईडी दिव्यांची गरज असल्याचे नगरपरिषदेने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे. करारनाम्याचा कालावधी संपूष्टात आल्यानंतर एलईडी पथदिव्यांची देखभाल संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वत: करणे क्रमप्राप्त आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात पथ दिव्याअभावी रात्रीच्या वेळेस अंधारास सामारे जावे लागत असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधीकडून शासनास प्राप्त झाल्या आहेत. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व EESL यांच्यातील करारानाम्यात सदर करारानामा रद्द करण्याची तरतूद अंतर्भूत असून सदर तरतूदींचा अवलंब करुन दोन्ही घटकांना करारानामा मुदतपूर्व रद्द करता येईल. तथापि, त्याबाबतची कार्यवाही EESL व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां यांनी करणे क्रमप्राप्त आहे. सदर करारनामा रद्द करण्याची नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त विनंतीच्या अनुषंगाने करारनाम्यातील तरतूदीचा अवलंब करुन करारनामा रद्द करण्याची कार्यवाही करण्याबाबत त्यांना शासनस्तरावरुन वेळोवळी कळविण्यात आले आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडील प्रलंबित देयके अदा करण्याबाबत EESL ने शासनास विनंती केली आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय दिनांक ०४.०६.२०१८ च्या तरतूदीनुसार नागरी स्थनिक स्वराज्य संस्थांना देय शासन अनुदानातून EESL ची वैध प्रलंबित देयके शासनस्तरावरुन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

----------

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १८७०**

ॲड. आकाश फुंडकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८७० पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्व एलईडी बल्ब पथदिवे हे EESL(एनर्जी इफीसीयन्सी सर्व्हिस लिमिटेड) या कंपनीकडून खरेदी करण्याचे बंधन घालण्यात आले असणे, दि. १२ जानेवारी २०१८ रोजी शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१८३/नवि-२० नुसार राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांना एलईडी पथ दिव्यांसाठी वैशिष्टयपुर्ण योजना किंवा अन्य योजनेंतून खर्च न करण्याबाबत प्रतिबंध केला असणे, उपरोक्त कंपनी ही देखभाल दुरुस्तीसाठी पथदिवे राखीव ठेवणे आवश्यक असतांना देखील राखीव पथदिवे ठेवत नसणे, पथ दिव्यांचे संख्येचे प्रमाणानुसार अपुरे मनुष्यबळ या कंपनीकडे असल्यामुळे पथदिवे दुरुस्तीस विलंब होत असणे, खामगांव शहरातील न. प. हददीतील नवीन वस्त्यांमध्ये पथ दिव्यांची मोठया प्रमाणात आवश्यकता असणे, तसचे खामगांव शहराची हददवाढीचा प्रस्ताव देखील असल्यामुळे अतिरिक्त पथदिव्यांची आवश्यकता भासणार असणे, याकरीता जवळपास ५००० नवीन पथदिव्यांची आवश्यकता असणे, EESL ( एनर्जी इफीसीयन्सी सर्व्हिस लिमिटेड) या कंपनीचा करार सन २०२५ मध्ये संपणार असणे, सदरची कंपनी नवीन पथदिवे देण्यास टाळाटाळ करीत असणे, तसेच EESL (एनर्जी इफीसीयन्सी सर्व्हिस लिमिटेड) या कंपनीने पथदिवे देऊन त्यांचा करार संपुष्टात आल्यास त्यांची दुरुस्तीच्या हमीबाबत प्रश्न निर्माण होणार असणे, EESL (एनर्जी इफीसीयन्सी सर्व्हिस लिमिटेड) कंपनीने लावलेल्या पथदिव्यांचे दुरुस्तीचे साहित्य खुल्या बाजार पेठेत मिळत नसणे, यामुळे सामान्य जनता त्रस्त झाली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

<u>मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

राज्य शासनाच्या उर्जा विभागाच्या, उर्जा संवर्धन धोरण, २०१७ नुसार सर्व नागरी स्वराज्य संस्थांना पथदिवे बसविताना फक्त एलईडी पथदिवे बसविणे बंधनकारक आहे. हे धोरण नगर विकास विभागाच्या वतीने स्वीकृत करून राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

त्या अनुषंगाने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रम असलेल्या एनर्जी एफिशिएन्सी सर्विसेस लिमिटेड म्हणजेच EESL च्या माध्यमातून एस्को तत्वावर एलईडी पथदिवे बसविण्यासाठी राज्य शासनाने EESL सोबत सर्वसाधारण करारनामा केला आहे. तसेच संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या क्षेत्रात EESL च्या माध्यमातून पथदिव्यांसाठी फक्त एलईडी दिवे बसविणे व त्यासाठी EESL सोबत करारनामा करणे त्यांच्यावर बंधनकारक करण्यात आले. त्यामुळे एलईडी पथदिव्यांवर एकरकमी भांडवली गुंतवणूक करण्याचा आर्थिक ताण नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवरील कमी झाला. एलईडी पथदिव्यांवरील भांडवली गुंतवणूक करावी लागणार नसल्याने राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेतून अथवा स्वनिधीतून त्यावर खर्च करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व EESL यांच्यामधील करारनामा व त्यात विहित केलल्या अटींचे पालन करणे हे दोन्ही संस्थांना क्रमप्राप्त आहे. त्यानुसार एलईडी दिव्यांचा पुरवठा योग्य प्रमाणात

गृह विभाग

लक्षवेधी सूचना क्रमांक : ३६९

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.अबू आजमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा यांच्या लक्षवेधी सूचना क्र. ३६९ वरील निवेदन उप मुख्यमंत्री सभागृहासमोर ठेवतील :-

"घरातील विजेचे बिल जास्त आल्याबद्दल जाब विचारण्यास गेलेल्या ग्राहकाने मोरगाव (ता.बारामती) येथील महावितरण कार्यालयात महिला कर्मचाऱ्यावर कोयत्याने १६ वार करून तीची हत्या केली असल्याची धक्कादायक बाब दिनांक २५ एप्रिल, २०२४ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, महिला कर्मचारी कार्यालयात एकटेच असतांना हल्लेखोराने बिल जास्त आल्याचा जाब विचाराला असता बोलत असतांनाच महिला कर्मचारीच्या हात, पाय आणि तोंडावर आरोपीने कोयत्याने १६ वार केले असता रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या महिला कर्मचारी यांना मोरगावात प्रथमोपचार करून पुण्यातील खासगी रुग्णालयात धाखल करण्यात आले व उपचारदरम्यान त्यांचा मृत्यू झाला असल्याचे हि निदर्शनास येणे, सदर विषयी संबंधित आरोपीवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---------------------------------

## मा.उप मुख्यमंत्री यांचे निवेदन

घरातील विजेचे बिल जास्त आल्याबद्दल जाब विचारण्यास गेलेल्या ग्राहकाने दिनांक २४.०४.२०२४ रोजी मोरगाव (ता. बारामती) येथील महावितरण कार्यालयात महिला कर्मचाऱ्यावर त्याचे हातातील कोयत्याने महिला कर्मचाऱ्याच्या डोक्यामध्ये, तोंडावर, कानाजवळ वार केले. त्यानंतर सदर महिला कर्मचाऱ्यास प्राथमिक औषधोपचाराकामी मोरगाव येथील मयुरेश्वर मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पीटलला नेले व त्यानंतर सदर महिलेला पुढील उपचारासाठी सह्याद्री हॉस्पिटल, हडपसर, पुणे येथे नेले असता त्या औषधोपचारादरम्यान संबंधित महिला मयत झाली. याप्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन सुपा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१३७/२०२४ भा.दं.वि. क. ३०२, ३०७, ३३२, ३३३, ३५३ आर्म अॅक्ट ४, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यामध्ये एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झालेला असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

-----------------------

**लक्षवेधी सूचना क्र. ११७१** **गृह विभाग**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुनिल कांबळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ११७१ पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत हुक्का पार्लरचा प्रश्न ऐरणीवर आला असणे, या हुक्का पार्लरमुळे काही दिवसापूर्वी मुंबईत लागलेल्या आगीप्रमाणे पुण्यातही आग लागण्याची घटना घडू शकते. त्यामुळे वेळीच अशा बेकायदा हुक्कापार्लरवर कारवाई आवश्यकता. पुणे शहरात कोरेगांव पार्क, मुंढवा, हडपसर, कोंढवा या परिसरात अनेक नामांकित हॉटेल्स व पबमध्ये हुक्कापार्लर चालू असणे. पोलिसांकडून काही प्रमाणात कारवाई केली जाते. मात्र, त्यानंतर ही हुक्का पार्लर पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी छुप्या तर कुठे उघड पद्धतीने ही हुक्का पार्लर सुरू आहेत. त्यामुळे अशा हुक्का पार्लरवर वेळीच कारवाई करण्याची आवश्यकता असणे. तरुणाईमध्ये हुक्क्यांची मोठी क्रेझ आहे. पुणे शहरातही हुक्का पार्लरमध्ये तरुणाईची मोठी गर्दी असते. पुण्यात हुक्क्यासाठीचे ५२ प्रकारचे फ्लेवर मिळत असून, तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची माहिती समोर आली असणे. त्यामुळे पालकांसाठी हुक्का पार्लर ही मोठी डोकेदुखी ठरत आहे. हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करून दिला जातो. दुर्दैवाने त्या ठिकाणी आगीसारखा प्रकार घडला तर मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे पोलिसांनी वेळीच जागे होऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागिरकांकडून केली जात असणे यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

केंद्र शासनाच्या सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादन (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये राज्य शासनाने सुधारणा करुन सदर अधिनियमात हुक्का पार्लरचा समावेश केला आहे. सदर (सुधारित) अधिनियम, २०१८ दिनांक ०४.१०.२०१८ पासून अस्तित्वात आला असून, राज्यामध्ये हुक्का पार्लरवर बंदी लागू करण्यात आली आहे. पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत पोलिसांमार्फत हुक्का पार्लर चालविण्यासाठीचा परवाना देण्यात येत नाही. पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत अनधिकृत हुक्का पार्लरबाबत पोलीस ठाणे स्तरावर तसेच गुन्हे शाखा यांचेकडून माहिती घेण्यात येते. तसेच, नागरिकांकडून व गुप्त बातमीदारांकडून प्राप्त माहितीची खातरजमा करून हुक्का पार्लरवर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येतात. आगीसारख्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी हॉटेल मालक / चालक यांना प्रशिक्षण देऊन वेळोवेळी दक्षता घेण्याबाबत मार्गदर्शन करून सूचना देण्यात येतात.

पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात बंडगार्डन, डेक्कन, कोरेगांव पार्क, हडपसर, मुंढवा, कोंढवा, मार्केटयार्ड, सिंहगड रोड तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात देहु रोड, हिंजवडी, पिंपरी, रावेत या परिसरात हॉटेल्स, पब किंवा ढाबे या ठिकाणी अनधिकृतपणे ग्राहक तंबाखूजन्य पदार्थ वा हुक्काजन्य पदार्थांचे सेवन करताना आढळून आल्याने सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ (सुधारित) अधिनियम, २०१८ अंतर्गत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यक्षेत्र**

| सन | दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २०२२ | ३७ | ९८ | -/६,८०,८९० |
| २०२३ | ४६ | ५६ | ३,००,२९९/- |
| माहे जून २०२४ पर्यंत | २५ | ६१ | २८,८३,०५९/- |

**पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्र**

| सन | दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २०२२ | ३६ | ४२ | ८,०६,५५८/- |
| २०२३ | ०७ | १५ | ८०,१०८/- |
| माहे जून २०२४ पर्यंत | ०३ | ०७ | ८५,४००/- |

सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ (सुधारित) अधिनियम, २०१८ चे कलम ४, २१ नुसार हुक्का पार्लर चालक, सेवन करणारे, हुक्का पुरविणारे, बनविणारे, विक्री करणारे यांचेविरूध्द गुन्हे दाखल करून, त्यांना गुन्ह्यात अटक करून कायदेशीर कारवाई करण्यात येते. राज्यात काही भागांमध्ये सर्रास अंमली पदार्थ / तंबाखूजन्य पदार्थ / हुक्का पार्लरचा धंदा वा सेवन करीत असल्याचे आढळल्यास किंवा तसे धंदे चालत असल्यास संबंधित ठिकाणच्या पोलिस अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल आणि त्या भागामध्ये त्या पोलिस स्टेशनच्या अंतर्गत जर अशा पध्दतीने गैर व अवैध व्यवसाय चालत असेल तर संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशा सूचना राज्यातील सर्व पोलिस घटक प्रमुखांना दिनांक १८.०३.२०२१ व दिनांक १५.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

कोटपा सुधारित अधिनियम, २०१८ मधील कलम ४ क नुसार "कोणतीही व्यक्ती स्वत:हून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या वतीने, खाद्यगृहाच्या जागेसह कोणत्याही जागी हुक्का बार सुरु करणार नाही किंवा चालवणार नाही" तसेच, २१-क नुसार कलम ४ क च्या तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्यास एक ते तीन वर्षे पर्यंत कारावासाची आणि रुपये पन्नास हजार ते एक लाख रुपयांपर्यंत एवढया द्रव्यदंडाच्या शिक्षेची तसेच, कलम २७- क नुसार कलम ४-क खालील अपराध दखलपात्र असतील, अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

पुण्यात हुक्क्यासाठीचे ५२ प्रकारचे फ्लेवर मिळत असल्याची व तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची बाब निर्दशनास आलेली नाही. नमूद गुन्ह्यांमध्ये पुण्यात हुक्यासाठीचे १० तसेच पिंपरी-चिंचवड मध्ये ०७ प्रकारचे फ्लेवर्स मिळून आल्याने ते जप्त करुन आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करून दिल्याची बाब निर्दशनास आलेली नसून अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये सुधारणा करून सुधारित अधिनियम २०१८ अन्वये संपूर्ण राज्यात हुक्का पार्लरवर बंदी घातली असल्याने सदर तरतुदीचे उल्लंघन होत असल्यास वा तसे निष्पन्न झाल्यास हुक्का चालक/मालक व संबंधित ग्राहकांवर योग्य कलमांद्वारे पोलिस यंत्रणेमार्फत वेळीच कारवाई करण्यात येते आणि अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यादृष्टीने पोलिस प्रशासनाकडून सायकल रॅलीद्वारे जनजागृती करणे, यापदार्थांच्या व्यसनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन करणे, शाळा कॉलेज परिसरात, सोसायट्या, झोपडपट्टी अशा ठिकाणी प्रबोधन करणे, पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांना हुक्का सेवनाच्या दुष्परिणामांबाबत माहिती देऊन त्यापासून नागरिकांना परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत सूचना दिल्या जातात व त्याद्वारे व्यसनांच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे समुपदेशन, जनजागृती केली जाते. तंबाखूजन्य व हुक्का यासारख्या व्यसनांना बळी न पडण्याचे आवाहन करून आवश्यक अशा उपाययोजना करण्यात येत आहेत.

-------------------

**पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्र**

| सन | दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २०२२ | ३६ | ४२ | ८,०६,५५८/- |
| २०२३ | ०७ | १५ | ८०,१०८/- |
| माहे जून २०२४ पर्यंत | ०३ | ०७ | ८५,४००/- |

सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ (सुधारित) अधिनियम, २०१८ चे कलम ४, २१ नुसार हुक्का पार्लर चालक, सेवन करणारे, हुक्का पुरविणारे, बनविणारे, विक्री करणारे यांचेविरूध्द गुन्हे दाखल करून, त्यांना गुन्ह्यात अटक करून कायदेशीर कारवाई करण्यात येते. राज्यात काही भागांमध्ये सर्रास अंमली पदार्थ / तंबाखूजन्य पदार्थ / हुक्का पार्लरचा धंदा वा सेवन करीत असल्याचे आढळल्यास किंवा तसे धंदे चालत असल्यास संबंधित ठिकाणच्या पोलिस अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल आणि त्या भागामध्ये त्या पोलिस स्टेशनच्या अंतर्गत जर अशा पध्दतीने गैर व अवैध व्यवसाय चालत असेल तर संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशा सूचना राज्यातील सर्व पोलिस घटक प्रमुखांना दिनांक १८.०३.२०२१ व दिनांक १५.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

कोटपा सुधारित अधिनियम, २०१८ मधील कलम ४ क नुसार "कोणतीही व्यक्ती स्वत:हून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या वतीने, खाद्यगृहाच्या जागेसह कोणत्याही जागी हुक्का बार सुरु करणार नाही किंवा चालवणार नाही" तसेच, २१-क नुसार कलम ४ क च्या तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्यास एक ते तीन वर्षे पर्यंत कारावासाची आणि रुपये पन्नास हजार ते एक लाख रुपयांपर्यंत एवढया द्रव्यदंडाच्या शिक्षेची तसेच, कलम २७- क नुसार कलम ४-क खालील अपराध दखलपात्र असतील, अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

पुण्यात हुक्क्यासाठीचे ५२ प्रकारचे फ्लेवर मिळत असल्याची व तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची बाब निर्दशनास आलेली नाही. नमूद गुन्ह्यांमध्ये पुण्यात हुक्यासाठीचे १० तसेच पिंपरी-चिंचवड मध्ये ०७ प्रकारचे फ्लेवर्स मिळून आल्याने ते जप्त करुन आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करून दिल्याची बाब निर्दशनास आलेली नसून अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये सुधारणा करून सुधारित अधिनियम २०१८ अन्वये संपूर्ण राज्यात हुक्का पार्लरवर बंदी घातली असल्याने सदर तरतुदीचे उल्लंघन होत असल्यास वा तसे निष्पन्न झाल्यास हुक्का चालक/मालक व संबंधित ग्राहकांवर योग्य कलमांद्वारे पोलिस यंत्रणेमार्फत वेळीच कारवाई करण्यात येते आणि अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यादृष्टीने पोलिस प्रशासनाकडून सायकल रॅलीद्वारे जनजागृती करणे, यापदार्थांच्या व्यसनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन करणे, शाळा कॉलेज परिसरात, सोसायट्या, झोपडपट्टी अशा ठिकाणी प्रबोधन करणे, पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांना हुक्का सेवनाच्या दुष्परिणामांबाबत माहिती देऊन त्यापासून नागरिकांना परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत सूचना दिल्या जातात व त्याद्वारे व्यसनांच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे समुपदेशन, जनजागृती केली जाते. तंबाखूजन्य व हुक्का यासारख्या व्यसनांना बळी न पडण्याचे आवाहन करून आवश्यक अशा उपाययोजना करण्यात येत आहेत.

-----------------

**लक्षवेधी सूचना क्र. ११७१** **गृह विभाग**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुनिल कांबळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ११७१ पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत हुक्का पार्लरचा प्रश्न ऐरणीवर आला असणे, या हुक्का पार्लरमुळे काही दिवसापूर्वी मुंबईत लागलेल्या आगीप्रमाणे पुण्यातही आग लागण्याची घटना घडू शकते. त्यामुळे वेळीच अशा बेकायदा हुक्कापार्लरवर कारवाई आवश्यकता. पुणे शहरात कोरेगांव पार्क, मुंढवा, हडपसर, कोंढवा या परिसरात अनेक नामांकित हॉटेल्स व पबमध्ये हुक्कापार्लर चालू असणे. पोलिसांकडून काही प्रमाणात कारवाई केली जाते. मात्र, त्यानंतर ही हुक्का पार्लर पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी छुप्या तर कुठे उघड पद्धतीने ही हुक्का पार्लर सुरू आहेत. त्यामुळे अशा हुक्का पार्लरवर वेळीच कारवाई करण्याची आवश्यकता असणे. तरुणाईमध्ये हुक्क्यांची मोठी क्रेझ आहे. पुणे शहरातही हुक्का पार्लरमध्ये तरुणाईची मोठी गर्दी असते. पुण्यात हुक्क्यासाठीचे ५२ प्रकारचे फ्लेवर मिळत असून, तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची माहिती समोर आली असणे. त्यामुळे पालकांसाठी हुक्का पार्लर ही मोठी डोकेदुखी ठरत आहे. हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करून दिला जातो. दुर्दैवाने त्या ठिकाणी आगीसारखा प्रकार घडला तर मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे पोलिसांनी वेळीच जागे होऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागिरकांकडून केली जात असणे यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

केंद्र शासनाच्या सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादन (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये राज्य शासनाने सुधारणा करुन सदर अधिनियमात हुक्का पार्लरचा समावेश केला आहे. सदर (सुधारित) अधिनियम, २०१८ दिनांक ०४.१०.२०१८ पासून अस्तित्वात आला असून, राज्यामध्ये हुक्का पार्लरवर बंदी लागू करण्यात आली आहे. पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत पोलिसांमार्फत हुक्का पार्लर चालविण्यासाठीचा परवाना देण्यात येत नाही. पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत अनधिकृत हुक्का पार्लरबाबत पोलीस ठाणे स्तरावर तसेच गुन्हे शाखा यांचेकडून माहिती घेण्यात येते. तसेच, नागरिकांकडून व गुप्त बातमीदारांकडून प्राप्त माहितीची खातरजमा करून हुक्का पार्लरवर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येतात. आगीसारख्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी हॉटेल मालक / चालक यांना प्रशिक्षण देऊन वेळोवेळी दक्षता घेण्याबाबत मार्गदर्शन करून सूचना देण्यात येतात.

पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात बंडगार्डन, डेक्कन, कोरेगांव पार्क, हडपसर, मुंढवा, कोंढवा, मार्केटयार्ड, सिंहगड रोड तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात देहु रोड, हिंजवडी, पिंपरी, रावेत या परिसरात हॉटेल्स, पब किंवा ढाबे या ठिकाणी अनधिकृतपणे ग्राहक तंबाखूजन्य पदार्थ वा हुक्काजन्य पदार्थांचे सेवन करताना आढळून आल्याने सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ (सुधारित) अधिनियम, २०१८ अंतर्गत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यक्षेत्र**

| सन | दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २०२२ | ३७ | ९८ | -/६,८०,८९० |
| २०२३ | ४६ | ५६ | ३,००,२९९/- |
| माहे जून २०२४ पर्यंत | २५ | ६१ | २८,८३,०५९/- |

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी (तिसरे) अधिवेशन

ॲड. आकाश फुंडकर, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १२४३ पुढीप्रमाणे आहे :

" ज्याअर्थी, बुलढाणा जिल्हयाती लखामगांव तालुक्यातील शहापूर येथील तलाठी कार्यालयात कोतवाल असलेल्या सुनिल हरिदास पारखेडे,व गणेश हरिदास पारखेडे, हरिदास (हरिभाऊ) दौलत पारखेडे यांनी शहापूर व परिसरातील वाहाळा, बोथाकाजी, बोरी अडगांव येथील असंख्य शेतकऱ्यांकडून सोयाबीन, हरभरा व तूर बाजार भावापेक्षाजास्त दराने खरेदी करण्याचे आमिष दाखवत उपरोक्त धान्य १५ दिवसाचे वेळ मागून खरेदी करण्याचे बोलणी करुन या शेतकऱ्यांची रु.१ कोटीपेक्षा जास्त रक्कमेची फसवणुक केली असणे, याबाबत खामगांव ग्रामीण पोलीस स्टेशनला १४ तक्रार दि. ०१ एप्रिल २०२४ रोजी नोंदविली असणे, मागील ३ महिन्यापासून तक्रार नोंदवलीअसून आतापर्यत ३३ शेतकऱ्यांची फसवणुक झाली असल्याचे स्पष्ट झाले असणे, परंतु तीन महिनेउलटूनही मुख्य आरोपी फरार असणे, याबाबतचा तपास आर्थीक गुन्हे शाखेकडे सोपविला असणे,परंतु तपास अत्यंत धिम्या गतीने सुरु असणे, पोलीस प्रशासनाकडून वेळखाऊ धोरण अवलंबल्याजात असणे, यामुळे उपरोक्त गावातील शेतकऱ्यांनी उपरोषण व आंदोलन करुन आरोपींना अटककरुन न्याय मिळवून देण्याची आवश्यकता असणे,याबाबत तपासाबाबत संबंधीतांना कठोर निर्देश देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

आरोपी सुनिल हरीदास पारखडे याने शहापूर व आजूबाजूच्या खेड्यामधील शेतक-यांचा विश्वास संपादन करून त्यांना बाजार भावापेक्षा जादा दर देण्याचे आमिष दाखवून ठरावीक मुदतीनंतर पैसे देण्याची बोलणी करून शेतक-यांकडून खरीप हंगामातील दि. ०१.१०.२०२३ ते २४.०३.२०२४ या कालावधीमध्ये एकुण रु. ८१,०९,८७४/- रुपयाचा शेतमाल खरेदी केला. तथापि, सदर मालाचे पैसे विहीत मुदतीनंतरही न दिल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादी व इतर शेतक-यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पो.स्टे. खामगांव ग्रामीण येथे दिनांक ०१.०४.२०२४ रोजी गु.र.नं. १५२/२०२४ कलम ४०६, ४२० भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या दिनांक ०२.०४.२०२४ रोजीच्या आदेशानुसार सदर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा, बुलढाणा यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

गुन्ह्याच्या तपासामध्ये शहापूर येथील ३४ पीडीत शेतक-यांचे जबाब नोंदविण्यात आले असता, आरोपी क्र. (१) सुनिल हरीदास पारखडे (२) हरीदास दोलत पारखडे (३) गणेश हरीदास पारखडे (४) केशव गजानन मारोडकर यांनी शहापुर येथील शेतक-यांकडून मागील ३ वर्षापर्यंत शेतमाल खरेदी

करुन त्यांना जादा दराने व ठरलेल्या मुदतीत मालाची रक्कम चेकद्वारे व रोख स्वरुपात देऊन त्यांचा विश्वास संपादन केला असल्याचे शेतक-यांनी नमूद केले आहे. परंतू, सन २०२३-२४ मध्ये आरोपींनी सुनियोजितपणे कट रचून शेतक-यांना जादा भाव देण्याचे आमीष दाखवून ३४ शेतक-यांकडून खरीप हंगामातील रु. १,१७,१७,२२२/- किंमतीचा शेतमाल खरेदी करुन त्यापैकी काही शेतक-यांना ७,३१,८००/- रुपये दिले असून उर्वरीत १,०९,८५,४२२/- रुपये न देता फसवणूक केल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्याने उपरोक्त नमूद गु.र.नं. १५२/२०२४ मध्ये मुख्य आरोपी (१) सुनिल हरीदास पारखडे याच्यासह (२) हरीदास दोलत पारखडे (३) गणेश हरीदास पारखडे (४) केशव गजानन मारोडकर यांना कलम १२० (ब) भादवि प्रमाणे आरोपी करण्यात आले.

सदर गुन्ह्यातील आरोपी क्र. (२) (३) (४) यांना दि.१२.०४.२०२४ रोजी १६.३३ वा. अटक करण्यात आली होती. सद्यस्थितीमध्ये आरोपींना जामीन मंजूर करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी सुनिल हरीदास पारखडे हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार झाला होता. गोपनीय माहितीच्या आधारे सदर आरोपीस दि. १८.०६.२०२४ रोजी १८.४३ वाजता अटक करण्यात आली असून दिनांक ०१.०७.२०२४ पासून बुलढाणा जिल्हा कारागृहामध्ये आहे.

गुन्ह्यात निष्पन्न झालेल्या एकूण ०४ आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

******

करुन त्यांना जादा दराने व ठरलेल्या मुदतीत मालाची रक्कम चेकद्वारे व रोख स्वरुपात देऊन त्यांचा विश्वास संपादन केला असल्याचे शेतक-यांनी नमूद केले आहे. परंतू, सन २०२३-२४ मध्ये आरोपींनी सुनियोजितपणे कट रचून शेतक-यांना जादा भाव देण्याचे आमीष दाखवून ३४ शेतक-यांकडून खरीप हंगामातील रु. १,१७,१७,२२२/- किंमतीचा शेतमाल खरेदी करुन त्यापैकी काही शेतक-यांना ७,३१,८००/- रुपये दिले असून उर्वरीत १,०९,८५,४२२/- रुपये न देता फसवणूक केल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्याने उपरोक्त नमूद गु.र.नं. १५२/२०२४ मध्ये मुख्य आरोपी (१) सुनिल हरीदास पारखडे याच्यासह (२) हरीदास दोलत पारखडे (३) गणेश हरीदास पारखडे (४) केशव गजानन मारोडकर यांना कलम १२० (ब) भादवि प्रमाणे आरोपी करण्यात आले.

बुडीत क्षेत्रातील उर्वरीत दोन गावठाणे सावरखेडा व ततारपूर यांचे शासन निर्णय दिनांक १७.०२.२०२१ नुसार २५ वर्ष वारंवारितेच्या पूरपरिमाणावर आधारित पाश्चजल अभ्यासानुसार १०० % पुनर्वसनास दि.२०.१०.२०२३ रोजी शासन स्तरावरील मान्यता प्राप्त आहे. सदर गावठाणाचा भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आलेला असून भुसंपादन प्रक्रिया प्रगतिपथावर आहे. सदर गावाच्या पुनर्वसनाकरिता ग्रामपंचायत कुंडखुर्द यांनी दिलेल्या ग्रामसभेच्या ठरावानुसार मौजा वलगाव येथील कृषि विभागाच्या ताब्यात असलेली जमीन उपलब्ध करुन देणेबाबत आग्रही मागणी केली आहे. सदर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास दि.२९.०१.२०२४ अन्वये कळविण्यात आले आहे. जिल्हा कृषि अधीक्षक, अमरावती यांनी दि.१२.०२.२०२४ रोजीच्या पत्रानुसार सदर जमीन देण्यास नकार दर्शविला असून प्रकल्पग्रस्तांची आग्रही मागणी असल्याकारणाने जिल्हाधिकारी कार्यालयास कृषी विभागाची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत पुनःश्च कळविले असून याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

मौजा वासेवाडी, निंभा, नारायणपूर, गणोजा देवी ही गावे निम्न पेढी धरणाच्या बुडीत क्षेत्रात येत नसून धरणाच्या निम्न (खालील) बाजूस येत आहेत. त्यामुळे निम्न पेढी प्रकल्पांतर्गत पुनर्वसन करता येणार नाही.

यावर्षी शिर्ष पातळी (Crest Level) पर्यंत पाणीसाठी करण्याचे नियोजन आहे. यामध्ये बुडीत क्षेत्रातील गावे /घरे बाधित होत नाहीत. महसूल प्रशासन तसेच जिल्हा परिषद, अमरावती यांनी नागरी सुविधा पूर्ण झालेल्या हस्तांतरित गावठाणांमध्ये प्रकल्पग्रस्तांचे स्थलांतरण पूर्ण केल्याशिवाय धरणाच्या द्वार आड (Gate Against) पाणीसाठा केला जाणार नाही.

************

करण्यात आली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना जिल्हाधिकारी कार्यालयाचे दि.१३.०७.२०२२ व दि.२५.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत.

जलसंपदा विभागाच्या दि.३१.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुनर्वसीत गावठाणातील नागरी सुविधेच्या दुरुस्तीसाठी नागरी सुविधांवर झालेल्या खर्चाच्या २०% रक्कम सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांच्या संयुक्त खात्यात एकूण रक्कम ८.०७ कोटी जमा करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधांची दुरुस्ती जिल्हा परिषद अमरावती यांच्यामार्फत होण्यासाठी उचित कार्यवाही सुरु आहे.

बुडीत क्षेत्रातील उर्वरीत दोन गावठाणे सावरखेडा व ततारपूर यांचे शासन निर्णय दिनांक १७.०२.२०२१ नुसार २५ वर्ष वारंवारितेच्या पूरपरिमाणावर आधारित पाश्चजल अभ्यासानुसार १०० % पुनर्वसनास दि.२०.१०.२०२३ रोजी शासन स्तरावरील मान्यता प्राप्त आहे. सदर गावठाणाचा भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आलेला असून भुसंपादन प्रक्रिया प्रगतिपथावर आहे. सदर गावाच्या पुनर्वसनाकरिता ग्रामपंचायत कुंडखुर्द यांनी दिलेल्या ग्रामसभेच्या ठरावानुसार मौजा वलगाव येथील कृषि विभागाच्या ताब्यात असलेली जमीन उपलब्ध करुन देणेबाबत आग्रही मागणी केली आहे. सदर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास दि.२९.०१.२०२४ अन्वये कळविण्यात आले आहे. जिल्हा कृषि अधीक्षक, अमरावती यांनी दि.१२.०२.२०२४ रोजीच्या पत्रानुसार सदर जमीन देण्यास नकार दर्शविला असून प्रकल्पग्रस्तांची आग्रही मागणी असल्याकारणाने जिल्हाधिकारी कार्यालयास कृषी विभागाची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत पुनःश्च कळविले असून याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

मौजा वासेवाडी, निंभा, नारायणपूर, गणोजा देवी ही गावे निम्न पेढी धरणाच्या बुडीत क्षेत्रात येत नसून धरणाच्या निम्न (खालील) बाजूस येत आहेत. त्यामुळे निम्न पेढी प्रकल्पांतर्गत पुनर्वसन करता येणार नाही.

यावर्षी शिर्ष पातळी (Crest Level) पर्यंत पाणीसाठी करण्याचे नियोजन आहे. यामध्ये बुडीत क्षेत्रातील गावे /घरे बाधित होत नाहीत. महसूल प्रशासन तसेच जिल्हा परिषद, अमरावती यांनी नागरी सुविधा पूर्ण झालेल्या हस्तांतरित गावठाणांमध्ये प्रकल्पग्रस्तांचे स्थलांतरण पूर्ण केल्याशिवाय धरणाच्या द्वार आड (Gate Against) पाणीसाठा केला जाणार नाही.

************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

**श्री. रवि राणा, वि.स.स. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ८९१ पुढीलप्रमाणे:-**

"जिल्हाधिकारी अमरावती यांचे अध्यक्षतेखाली दि.१८/०६/२०२४ रोजीच्या दरम्यान अमरावती जिल्हायामध्ये शासनाकडुन मंजुर असलेले पेढी प्रकल्प, निम्न पेढी प्रकल्प ता. भातकुली व अमरावती व इतर प्रकल्प जे प्रकल्प पुर्ण करण्यासाठी शासनाकडुन निधीची तरतुद केली असणे, तरी सुध्दा निम्न पेढी व पेढी प्रकल्प अंतर्गत गावे वासेवाडी, निंभा, अळणगांव, नारायणपुर, सावरखेड, गणोजा, व इतर गांवे या गावाच्या समस्या संबधी उपाययोजना करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी बैठक झाली असणे, त्या बैठकीमध्ये वरील प्रकल्पाच्या यंत्रणेचे सर्वच अधिकारी उपस्थित असूनही उपास्थित नागरीकांच्या व प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणताही आराखडा उपाययोजना अधिकाऱ्यांनी केले नसणे, ज्यामुळे आता काही दिवसांनंतरच जोरदार पावसाला सुरुवात होत असून, वरील प्रकल्पाचे पाणी वरील गावांमध्ये शिरुन लोकजीवन विस्कळीत होण्याची शक्यता असणे, तसेच जिवीतहाणी होण्याची शक्यता असणे, यासाठी शासनस्तरावरुन तातडीने गावाचे पुनवर्सन तसेच मुलभुत सुविधा, गावरस्ते, स्ट्रिट लाईट इतर विकास कामे करण्यासाठी युध्दस्तरावर शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, वरील प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

<u>मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन</u>

निम्न पेढी मोठा प्रकल्प हा अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यातील मौजे निंभा गावाजवळ पेढी नदीवर बांधण्यात येत आहे. निम्न पेढी प्रकल्पास दि.१२.०८.२००४ रोजी मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त असून रु.१६३९.४३ कोटी किंमतीस दि.०१.०९.२०१८ रोजी अद्यावत द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर प्रकल्प मा.राज्यपाल यांच्या अनुशेष निर्मुलन व प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजने मध्ये २००८ पासून अंतर्भूत आहे. निम्न पेढी प्रकल्पाद्वारे ७५.२६६ दलघमी पाणीसाठा निर्मिती होणार असून सुमारे १०१९२ हे. लाभक्षेत्राला सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा लाभ होणार आहे. प्रकल्पाचे कामास २००६ मध्ये सुरुवात झाली असून अद्यापपर्यंत माती धरणाचे काम ९५%, सांडव्याचे काम ९०% व वितरण व्यवस्थेचे काम १८ हे. च्या चक निर्गमापर्यंत ८४% पूर्ण झालेले आहे. निम्न पेढी धरणाचे उर्वरित काम जून-२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

निम्न पेढी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात (मौजा अळणगाव, गोपगव्हाण, हातुर्णा, कुंड खुर्द, कुंडसर्जापूर, सावरखेडा व ततारपुर ) एकूण ७ गावांचा समावेश आहे. त्यापैकी मौजा अळणगाव, गोपगव्हाण, हातुर्णा, कुंड खुर्द व कुंडसर्जापुर असे एकूण ५ गावांच्या नागरी सुविधांची कामे पूर्ण

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

श्री. दादाराव केचे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९६६ पुढीलप्रमाणे:-

आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी, तालुक्यातील शेतकऱ्यांचे जिवनमान उच्चावण्यासाठी शासनाने निम्न वर्धा प्रकल्पावर आर्वी उपसा सिंचन योजना सन २०१८-१९ मध्ये किंमत २५१ कोटी रूपये मंजुर करणे, व जैन इरिगेशन कंपनी सिस्टीम ली. जळगांव यांना दि. २०/०६/२०१८ ला कार्यारंभ आदेश देणे, दि.१९/०६/२०२० पर्यत काम पुर्ण करण्याचा करार करण्यात आलेला असणे, परंतु आजपर्यत ३२ % काम झालेले असणे, व ६७% काम होणे बाकी असणे, पाच वर्षाचा कालावधी होवुन दिरंगाई करणाऱ्या जैल इरिगेशन कंपनी सिस्टीम ली. जळगांव या कंत्राटदारावर कार्यवाही करणे गरजेचे असतांनी अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व कंत्राटदार यांनी संगनमत करून देयकाची उचल केलेली असणे, तसेच नालीचे खोदकाम अत्यंत कमी खोलीचे करणे, व कमी जाडीचे पाईप वापरणे, काम पुर्ण न झाल्यामुळे तालुक्यातील १६ गावातील ५६५९ शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असणे, पाच वर्षाच्या कालावधीत एकाही शेतकऱ्यांच्या शेतापर्यत पाणी न पोहचणे, त्यामुळे आर्वी उपसा सिंचन योजनेस दिरंगाई करणाऱ्या अधीकारी व कंत्राटदाराची उच्च स्तरिय चौकशी करून कंत्राटदारास काळ्या यादीमध्ये टाकून त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना, यावर शासनाची प्रतिक्रीया.

मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन

निम्न वर्धा प्रकल्प हा वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील धनोडी गावाच्या उत्तरेकडील बाजूस वर्धा नदीवर बांधण्यात आलेला आहे. या प्रकल्पामुळे वर्धा जिल्ह्यात ६३३३३ हे. सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. सद्य:स्थितीत ५९१८५ हे.सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सदर प्रकल्प हा केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये समाविष्ट आहे.

आर्वी उपसा सिंचन योजना निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणारी एक योजना आहे. ज्याचे उद्दिष्ट निम्न वर्धा धरणाच्या बुडीत क्षेत्रामधून वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील ८४०० हे. क्षेत्रफळावर सिंचन करणे आहे. योजनेला निम्न वर्धा प्रकल्पाच्या पाणीसाठ्यातून २५.७४ दलघमी इतके पाणी आरक्षित असून सदर पाण्याचा वापर करून, वर्धा जिल्ह्यांतर्गत आर्वी तालुक्यातील १६ गावांतील ८४०० हेक्टर क्षेत्राकरिता (CCA) लागवडीलायक क्षेत्र सूक्ष्म सिंचनाद्वारे स्वयंचलित पद्धतीने पाणी देण्याचे नियोजित आहे. या योजनेमुळे एकूण ५६६९ शेतकाऱ्यांना लाभ होणार आहे. या योजने अंतर्गत ब्लॉक १ (आर्वी) एकूण सिंचन २२४३ हे., ब्लॉक २ (धनोडी) एकूण सिंचन २२८८ हे., ब्लॉक ३ (रोहणा) एकूण सिंचन ३८७१ हे. असे एकूण ८४०० हे. सिंचन सूक्ष्म सिंचनाद्वारे करणे नियोजित असून, या योजनेमध्ये ६८% कामे AIBP व ३२% कामे CADWMची आहेत.

सदर योजनेचे काम रु.२३९.१७ कोटी (४.९९ टक्के कमी दराने) ईपीसी (Engineering procurement & construction) तत्वावर मे.जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड, जळगाव यांना कार्यारंभ आदेश क्र.१८४५ दि. २०.०६.२०१८ रोजीच्या करारनामा क्र. ईपीसी/निवप्र/०१/ २०१८-१९ अन्वये आवंटित करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत सदर योजनेचे एप्रिल,२०२४ अखेर ४३% काम झालेले असून झालेल्या कामाचे देयक करारनाम्याप्रमाणे कंत्राटदाराला अदा करण्यात आलेले आहे.

सदरील योजनेचे ५७% काम शिल्लक आहे. योजनेअंतर्गत एकूण ८४०० हे. सिंचन क्षमता असून जुलै, २०२४ अखेर पर्यंत ५४७७ सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. त्या अंतर्गत १६ गावातील ५६६९ शेतक-यापैकी १० गावातील ३८६१ शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होणार आहे. व उर्वरित २७२३ हे. सिंचन क्षमता निर्मितीचे काम जून, २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित असून त्यामध्ये ६ गावातील १८०८ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

या कामाबाबत करारनामा कोविड-१९ पूर्वी झालेला असून सन २०२०-२०२१ मध्ये कोविड प्रादुर्भाव असल्यामुळे संबंधित कामे बंद होती. कंत्राटदाराने मंजूर नियोजनाप्रमाणे कामे करणे आवश्यक होते. परंतु कंत्राटदाराने करारनाम्याप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे व कामाची गती संथ असल्यामुळे मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, ज.सं. नागपूर यांनी दंड आकारणी सुरू केली आहे. कंत्राटदारास वेळोवेळी कामे विहित वेळेत गतीने पूर्ण करण्याकरिता पत्राद्वारे व प्रत्यक्ष निर्देश देण्यात आले आहेत. आर्वी उपसा सिंचन योजना जून, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**********

सद्य:स्थितीत सदर योजनेचे एप्रिल,२०२४ अखेर ४३% काम झालेले असून झालेल्या कामाचे देयक करारनाम्याप्रमाणे कंत्राटदाराला अदा करण्यात आलेले आहे.

सदरील योजनेचे ५७% काम शिल्लक आहे. योजनेअंतर्गत एकूण ८४०० हे. सिंचन क्षमता असून जुलै, २०२४ अखेर पर्यंत ५४७७ सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. त्या अंतर्गत १६ गावातील ५६६९ शेतक-यापैकी १० गावातील ३८६१ शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होणार आहे. व उर्वरित २७२३ हे. सिंचन क्षमता निर्मितीचे काम जून, २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित असून त्यामध्ये ६ गावातील १८०८ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

या कामाबाबत करारनामा कोविड-१९ पूर्वी झालेला असून सन २०२०-२०२१ मध्ये कोविड प्रादुर्भाव असल्यामुळे संबंधित कामे बंद होती. कंत्राटदाराने मंजूर नियोजनाप्रमाणे कामे करणे आवश्यक होते. परंतु कंत्राटदाराने करारनाम्याप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे व कामाची गती संथ असल्यामुळे मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, ज.सं. नागपूर यांनी दंड आकारणी सुरू केली आहे. कंत्राटदारास वेळोवेळी कामे विहित वेळेत गतीने पूर्ण करण्याकरिता पत्राद्वारे व प्रत्यक्ष निर्देश देण्यात आले आहेत. आर्वी उपसा सिंचन योजना जून, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

श्री. दादाराव केचे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९६६ पुढीलप्रमाणे:-

आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी, तालुक्यातील शेतकऱ्यांचे जिवनमान उच्चावण्यासाठी शासनाने निम्न वर्धा प्रकल्पावर आर्वी उपसा सिंचन योजना सन २०१८-१९ मध्ये किंमत २५१ कोटी रूपये मंजुर करणे, व जैन इरिगेशन कंपनी सिस्टीम ली. जळगांव यांना दि. २०/०६/२०१८ ला कार्यारंभ आदेश देणे, दि.१९/०६/२०२० पर्यत काम पुर्ण करण्याचा करार करण्यात आलेला असणे, परंतु आजपर्यंत ३२ % काम झालेले असणे, व ६७% काम होणे बाकी असणे, पाच वर्षाचा कालावधी होवुन दिरंगाई करणाऱ्या जैल इरिगेशन कंपनी सिस्टीम ली. जळगांव या कंत्राटदारावर कार्यवाही करणे गरजेचे असतांनी अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व कंत्राटदार यांनी संगनमत करून देयकाची उचल केलेली असणे, तसेच नालीचे खोदकाम अत्यंत कमी खोलीचे करणे, व कमी जाडीचे पाईप वापरणे, काम पुर्ण न झाल्यामुळे तालुक्यातील १६ गावातील ५६५९ शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असणे, पाच वर्षाच्या कालावधीत एकाही शेतकऱ्यांच्या शेतापर्यत पाणी न पोहचणे, त्यामुळे आर्वी उपसा सिंचन योजनेस दिरंगाई करणाऱ्या अधीकारी व कंत्राटदाराची उच्च स्तरिय चौकशी करून कंत्राटदारास काळ्या यादीमध्ये टाकून त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना, यावर शासनाची प्रतिक्रीया.

मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन

निम्न वर्धा प्रकल्प हा वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील धनोडी गावाच्या उत्तरेकडील बाजूस वर्धा नदीवर बांधण्यात आलेला आहे. या प्रकल्पामुळे वर्धा जिल्ह्यात ६३३३३ हे. सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. सद्य:स्थितीत ५९१८५ हे.सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सदर प्रकल्प हा केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये समाविष्ट आहे.

आर्वी उपसा सिंचन योजना निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणारी एक योजना आहे. ज्याचे उद्दिष्ट निम्न वर्धा धरणाच्या बुडीत क्षेत्रामधून वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील ८४०० हे. क्षेत्रफळावर सिंचन करणे आहे. योजनेला निम्न वर्धा प्रकल्पाच्या पाणीसाठ्यातून २५.७४ दलघमी इतके पाणी आरक्षित असून सदर पाण्याचा वापर करून, वर्धा जिल्ह्यांतर्गत आर्वी तालुक्यातील १६ गावांतील ८४०० हेक्टर क्षेत्राकरिता (CCA) लागवडीलायक क्षेत्र सूक्ष्म सिंचनाद्वारे स्वयंचलित पद्धतीने पाणी देण्याचे नियोजित आहे. या योजनेमुळे एकूण ५६६९ शेतकाऱ्यांना लाभ होणार आहे. या योजने अंतर्गत ब्लॉक १ (आर्वी) एकूण सिंचन २२४३ हे., ब्लॉक २ (धनोडी) एकूण सिंचन २२८८ हे., ब्लॉक ३ (रोहणा) एकूण सिंचन ३८७१ हे. असे एकूण ८४०० हे. सिंचन सूक्ष्म सिंचनाद्वारे करणे नियोजित असून, या योजनेमध्ये ६८% कामे AIBP व ३२% कामे CADWMची आहेत.

सदर योजनेचे काम रु.२३९.१७ कोटी (४.९९ टक्के कमी दराने) ईपीसी (Engineering procurement & construction) तत्वावर मे.जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड, जळगाव यांना कार्यारंभ आदेश क्र.१८४५ दि. २०.०६.२०१८ रोजीच्या करारनामा क्र. ईपीसी/निवप्र/०१/ २०१८-१९ अन्वये आवंटित करण्यात आले आहे.

लक्षवेधी सूचना क्रमांक १२६३.

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये

**श्री. सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील चंद्रपूर जिल्हा स्थित कोरपना तालुक्यात अस्तित्वात असलेल्या अल्ट्राटेक सिमेंट, आवाळपुर युनिटद्वारे मोठ्या प्रमाणात चुनखडीचे उत्खनन केले जात असल्यामुळे परिसरात मोठ-मोठे खड्डे निर्माण होऊन खड्ड्यांमध्ये अमलनाला धरणाचे लाभ क्षेत्रातील झिरपाई द्वारे लाखो लिटर पाणी जमा होत असणे, पाटबंधारे विभागाकडून कोणतीही परवानगी न घेता अवैधरित्या ४० लक्ष लिटर पाणी दैनदिन उपसा सदरहू कंपनी करीत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, याप्रकरणी पाटबंधारे विभागाचे अधिकारी तपासणीसाठी गेले असता घटनास्थळाची पाहाणी करण्यास मनाई केली जाणे, एकीकडे शेतकऱ्यांच्या शेतीकरीता पाणी वापरास निर्बंध आहे मात्र परीसरातील मोठ-मोठ्या कंपन्यांवर कोणतेही निर्बंध नसणे, शाखा अधिकारी, गडचांदुर व विभागीय कार्यालयाचे राजस्व शाखेतील वरिष्ठ दफ्तर कारकुन यांनी दिनांक १०/०१/२०२४ रोजी वर्धा नदी व अमलनालावरील मिटर कॅलीब्रेशन करण्याकरीता गेले असतांना माईन्स मधुन पाणी उचल करत असल्याची शंका आल्याने त्यांनी कंपनीमधील युनिट हेडला माईन्स बघण्याची मागणी केली परंतु माईन्समध्ये पाणी उचल होत नसल्याचे सांगून माईन्स दाखविण्यास मनाई करण्यात येणे, अखेर संबधित अधिकारी यांनी ड्रोनव्दारे माईन्सची सुटींग केली असता त्यामध्ये सदर कंपनीकडुन पाणी उचल करीत असल्याचे दृष्टीपत्थीस येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन.

महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर जिल्हयातील कोरपणा तालुक्यात अल्ट्राटेक सिमेंट कंपनी, आवारपुर येथे अस्तित्वात आहे. तसेच त्यासाठी लागणारा ७१ मेगावॅट चे औष्णिक वीज केंद्र आहे. कंपनीस लागणाऱ्या पाण्यासाठी अंमलनाला प्रकल्पातुन १.४६ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण मंजुर आहे. तसेच वर्धा नदीवरुन १.४६ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण मंजुर आहे.

अल्ट्राटेक सिमेंट कंपनीने अंमलनाला प्रकल्पातुन मंजुर पाणी आरक्षण १.४६ द.ल.घ.मी. पैकी ०.७३ द.ल.घ.मी. व वर्धा नदीतुन मंजुर पाणी आरक्षण १.४६ द.ल.घ.मी. पैकी ०.७३ द.ल.घ.मी. असे एकुण १.४६ द.ल.घ.मी. पाणी कमी करण्याचा प्रस्ताव संबंधित क्षेत्रीय कार्यालयास सादर केला होता.

त्यासाठी विभागाने पाणी कमी वापराचे कारणमिमांसा देण्यासाठी कळविले असता, त्यांनी त्यांच्या खदानीमधुन उपलब्ध होणारे पाणी वापरणार असल्याचे कळविले आहे. त्याप्रमाणे, खदानीमधून पाणी वापरासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे कळविले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच नेहमीसाठी अंमलनाला प्रकल्प व वर्धा नदीमधून पाणी साठा कमी करण्याचा प्रस्ताव विचारात घेता येईल, असे कंपनीला कळविण्यात आले होते.

कंपनीकडून होणाऱ्या पाणी वापराची शहानिशा करण्याकरिता क्षेत्रीय अधिकारी दिनांक ०३/०१/२०२४ रोजी खाणीची पाहणी करण्याकरिता गेले होते. मात्र त्या पाहणी दरम्यान पाणी वापराचा नेमका स्त्रोत काय आहे याची खातरजमा करता आली नाही. त्यामुळे दि.०८.०२.२०२४ ला उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, चंद्रपुर शाखाधिकारी, सिंचन शाखा गडचांदुर, संबंधित दप्तर कारकुन व मोजणीदार यांनी युनिट हेडला खाण बघण्याची मागणी केली असता, त्यांना नकार देण्यांत आला. त्यामुळे ड्रोनद्वारे खाणीचे ड्रोन शुटींग केले असता दोन्ही खाणीमध्ये फ्लोटींग पॉन्टुनवर गतिपंप आढळुन आले व पंप सुरु करण्याकरीता वापरण्यांत येणारी बोटसुद्धा आढळली. परंतु सद्य:स्थितीत खाणीमधुन पाणी वापर नेमका किती होत आहे याची खातरजमा झालेली नाही. अंमलनाला प्रकल्प व वर्धा नदीवरील पाणी वापरासाठी मिटर लावलेले असून त्याप्रमाणे व कंपनीचा मंजूर पाणी वापराच्या कररनामा शर्ती व अटीनुसार आकारणी करुन वसुली करण्यांत येते. तसेच मार्च, २०२४ पर्यंत आकारणी रु.५.७१ कोटी असून ४.२८ कोटी वसुली झाली आहे. उर्वरित रकमेकरीता कंपनीस विभागीय कार्यालयामार्फत नोटीस देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत कंपनीस आरक्षित असलेले पाणी १.४६ + १.४६ = २.९२ द.ल.घ.मी. एवढे आहे. त्यामुळे कंपनी आरक्षित कोट्यानुसार पाणी वापरीत नसेल तरी सुध्दा करारनाम्याप्रमाणे ९०% पाणी वापर धरुन पाणीपट्टी आकारण्यात येते. यास्तव सद्य:स्थितीत शासनाचे आर्थिक नुकसान होत नाही.

-----//-----//------

त्यासाठी विभागाने पाणी कमी वापराचे कारणमिमांसा देण्यासाठी कळविले असता, त्यांनी त्यांच्या खदानीमधुन उपलब्ध होणारे पाणी वापरणार असल्याचे कळविले आहे. त्याप्रमाणे, खदानीमधून पाणी वापरासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे कळविले आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच नेहमीसाठी अंमलनाला प्रकल्प व वर्धा नदीमधून पाणी साठा कमी करण्याचा प्रस्ताव विचारात घेता येईल, असे कंपनीला कळविण्यात आले होते.

कंपनीकडून होणाऱ्या पाणी वापराची शहानिशा करण्याकरिता क्षेत्रीय अधिकारी दिनांक ०३/०१/२०२४ रोजी खाणीची पाहणी करण्याकरिता गेले होते. मात्र त्या पाहणी दरम्यान पाणी वापराचा नेमका स्त्रोत काय आहे याची खातरजमा करता आली नाही. त्यामुळे दि.०८.०२.२०२४ ला उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, चंद्रपुर शाखाधिकारी, सिंचन शाखा गडचांदुर, संबंधित दप्तर कारकुन व मोजणीदार यांनी युनिट हेडला खाण बघण्याची मागणी केली असता, त्यांना नकार देण्यांत आला. त्यामुळे ड्रोनद्वारे खाणीचे ड्रोन शुटींग केले असता दोन्ही खाणीमध्ये फ्लोटींग पॉन्टुनवर गतिपंप आढळुन आले व पंप सुरु करण्याकरीता वापरण्यांत येणारी बोटसुद्धा आढळली. परंतु सद्य:स्थितीत खाणीमधुन पाणी वापर नेमका किती होत आहे याची खातरजमा झालेली नाही. अंमलनाला प्रकल्प व वर्धा नदीवरील पाणी वापरासाठी मिटर लावलेले असून त्याप्रमाणे व कंपनीचा मंजूर पाणी वापराच्या करारनामा शर्ती व अटीनुसार आकारणी करुन वसुली करण्यांत येते. तसेच मार्च, २०२४ पर्यंत आकारणी रु.५.७१ कोटी असून ४.२८ कोटी वसुली झाली आहे. उर्वरित रकमेकरीता कंपनीस विभागीय कार्यालयामार्फत नोटीस देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत कंपनीस आरक्षित असलेले पाणी १.४६ + १.४६ = २.९२ द.ल.घ.मी. एवढे आहे. त्यामुळे कंपनी आरक्षित कोट्यानुसार पाणी वापरीत नसेल तरी सुध्दा करारनाम्याप्रमाणे ९०% पाणी वापर धरुन पाणीपट्टी आकारण्यात येते. यास्तव सद्य:स्थितीत शासनाचे आर्थिक नुकसान होत नाही.

-----//-----//------

लक्षवेधी सूचना क्रमांक १२६३.

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये

**श्री. सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील चंद्रपूर जिल्हा स्थित कोरपना तालुक्यात अस्तित्वात असलेल्या अल्ट्राटेक सिमेंट, आवाळपुर युनिटद्वारे मोठ्या प्रमाणात चुनखडीचे उत्खनन केले जात असल्यामुळे परिसरात मोठ-मोठे खड्डे निर्माण होऊन खड्ड्यांमध्ये अमलनाला धरणाचे लाभ क्षेत्रातील झिरपाई द्वारे लाखो लिटर पाणी जमा होत असणे, पाटबंधारे विभागाकडून कोणतीही परवानगी न घेता अवैधरित्या ४० लक्ष लिटर पाणी दैनदिन उपसा सदरहू कंपनी करीत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, याप्रकरणी पाटबंधारे विभागाचे अधिकारी तपासणीसाठी गेले असता घटनास्थळाची पाहाणी करण्यास मनाई केली जाणे, एकीकडे शेतकऱ्यांच्या शेतीकरीता पाणी वापरास निर्बंध आहे मात्र परीसरातील मोठ-मोठ्या कंपन्यांवर कोणतेही निर्बंध नसणे, शाखा अधिकारी, गडचांदुर व विभागीय कार्यालयाचे राजस्व शाखेतील वरिष्ठ दफ्तर कारकुन यांनी दिनांक १०/०१/२०२४ रोजी वर्धा नदी व अमलनालावरील मिटर कॅलीब्रेशन करण्याकरीता गेले असतांना माईन्स मधुन पाणी उचल करत असल्याची शंका आल्याने त्यांनी कंपनीमधील युनिट हेडला माईन्स बघण्याची मागणी केली परंतु माईन्समध्ये पाणी उचल होत नसल्याचे सांगून माईन्स दाखविण्यास मनाई करण्यात येणे, अखेर संबधित अधिकारी यांनी ड्रोनव्दारे माईन्सची सुटींग केली असता त्यामध्ये सदर कंपनीकडुन पाणी उचल करीत असल्याचे दृष्टीपत्थीस येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन.

महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर जिल्हयातील कोरपणा. तालुक्यात अल्ट्राटेक सिमेंट कंपनी, आवारपुर येथे अस्तित्वात आहे. तसेच त्यासाठी लागणारा ७१ मेगावॅट चे औष्णिक वीज केंद्र आहे. कंपनीस लागणाऱ्या पाण्यासाठी अंमलनाला प्रकल्पातुन १.४६ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण मंजुर आहे. तसेच वर्धा नदीवरुन १.४६ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण मंजुर आहे.

अल्ट्राटेक सिमेंट कंपनीने अंमलनाला प्रकल्पातुन मंजुर पाणी आरक्षण १.४६ द.ल.घ.मी. पैकी ०.७३ द.ल.घ.मी. व वर्धा नदीतुन मंजुर पाणी आरक्षण १.४६ द.ल.घ.मी. पैकी ०.७३ द.ल.घ.मी. असे एकुण १.४६ द.ल.घ.मी. पाणी कमी करण्याचा प्रस्ताव संबंधित क्षेत्रीय कार्यालयास सादर केला होता.

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. आशुतोष काळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१६७८ खालीलप्रमाणे आहे :-**

"गोदावरील कालव्यांचा कालवा सल्लागार समितीच्या उन्हाळा हंगाम सन २०२३-२४ बैठकीमध्ये गोदावरी कालव्यासाठी नांदुर मध्येश्वर बंधारा स्थळी उपलब्ध होणारे पाणी व प्रत्यक्षात आवर्तनात कालव्यांना वापरण्यात आलेले पाणी यामध्ये मोठयाप्रमाणात तफावत असल्याचे निदर्शनास येणे, गोदावरी कालवे आवर्तन सुरु करणेपुर्वी सदर तफावत कालव्या सल्लागार समितीच्या सदस्यांचे निदर्शनास न येणे, त्यामुळे फेरनियोजनास कालवा सल्लागार समितीची मान्यता घेण्यात आलेली नसल्याचेही निदर्शनास येणे, तसेच उन्हाळा हंगाम २०२४ मधील आर्वतनाचे दोन वेगवेगळे जाहीर प्रगटन काढण्यात आलेले असणे, गोदावरील कालव्यांचे सन २०२३-२४ मध्ये देखभाल दुरुस्तीचे कामे न करतां त्या कामांमध्ये मोठया प्रमाणात झालेला भ्रष्टाचार त्यामुळे मोठया प्रमाणात शेतकरी सिंचनाचे पाण्यापासुन वंचित राहिलेला असणे, त्यामुळे कालवा सल्लागार समितीच्या सदस्यांसमोर गोदावरी कालव्यासाठी नांदुर मध्यमेश्वर बंधारा स्थळी उपलबध होणारे पाण्याबद्दल चुकीची माहिती देणाऱ्या श्रीमती सोनल शहाणे, कार्यकारी अभियंता नाशिक पाटबंधारे विभाग यांनी चुकीची माहिती देण्यात येणे, त्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी करण्यांत येणे, परंतु त्याबाबत अद्याप कारवाई झालेली नसणे, परिणामी उन्हाळा हंगाम २०२४ मधील आवर्तनाचे जाहीर प्रगटनामध्ये नमुद करण्यांत आलेले प्रथम २० टक्के व नंतर मर्यादित क्षेत्र यामुळे शेतकऱ्यांमध्ये माठया प्रमाणात निर्माण झालेला असंतोष व रोषाची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन:-**

गोदावरी कालवे सन २०२३-२४ च्या रब्बी हंगाम आवर्तनासंबंधी कालवा सल्लागार समितीची बैठक दि.१६/११/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर पालकमंत्री , अहमदनगर तथा मंत्री, महसुल, पशुसंवर्धन व दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये दारणा धरण समुहातील धरणांमधुन गोदावरी कालव्यांना उपलब्ध होणा-या पाण्यातून गोदावरी कालव्यांचे रब्बी व उन्हाळा हंगामाचे आवर्तनाचे नियोजन करण्यात आले.

जायकवाडी धरणात पाणी सोडावयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन रब्बी हंगाम व उन्हाळी हंगाम २०२३-२४ मध्ये सादर केलेल्या नियोजनामध्ये अंशतः बदल करुन पाणी वाचल्यास व प्रत्यक्ष क्षेत्रीय परिस्थितीनुसार सिंचन व बिगर सिंचन आवर्तन सोडण्यात यावे, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. त्यामध्ये जायकवाडी साठी पाणी सोडावे लागल्यास द्यावे लागणारे आवर्तन व पाणी सोडण्याचे रद्द झाल्यास द्यावे लागणारे आवर्तन याप्रमाणे प्लॅन A आणि प्लॅन B तयार करण्यात यावा व त्यानुसार आवर्तन देण्यात यावे. तसेच रब्बी हंगामाचे पहिले आवर्तन सोडण्याच्या दिनांकाविषयी चर्चा करुन आवर्तन दिनांक कळविण्यात येईल, असा निर्णय झाला.

मा. अध्यक्ष, गोदावरी कालवे सल्लागार समिती तथा मा. मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा यांनी समिती सदस्यांशी झालेल्या चर्चेनुसार शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने रब्बी हंगामातील उभ्या पिकांसाठी फायदा होऊ शकेल, असे सुचित करुन रब्बी

हंगामाचे पहिले आवर्तन दि. ०२/१२/२०२३ रोजी व दुसरे आवर्तन दि. १०/२/२०२४ रोजी सोडणेबाबत चर्चा झाली तथापि मा. अध्यक्ष यांनी रब्बी हंगामाचे पहिले आवर्तन सोडण्याचे दिनांकाविषयी चर्चा करुन आवर्तन दिनांक कळविले जाईल, असा निर्णय सर्वानुमते दिला.

दारणा प्रकल्पाच्या गोदावरी डावा व उजव्या कालव्यावर उन्हाळ हंगाम २०२३ -२४ मध्ये सिंचन आवर्तनाचे नियोजन करण्यात आलेले नाही, मात्र या हंगामात पिण्याचे पाण्याचे एक आवर्तन निश्चित केले असल्याचे सदस्य सचिव यांनी समिती सदस्यांचे निर्दशनास आणून दिले.

वरीलप्रमाणे रब्बी हंगामातील सिंचन आवर्तनात पाण्याची बचत करुन उन्हाळ हंगामात एक सिंचन आवर्तन देता येईल याबाबत विभागाने प्रयत्न करावेत. त्यासाठी कालव्यावरील अनधिकृत उपसा रोखण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडून नदी व कालव्याचे दोन्ही काठावरील गावांसाठी वीजबंदी आदेश घेण्याचे निर्देशीत केले, तसेच आवर्तन काळात स्वतंत्र पथके स्थापन करावीत व आपत्कालीन परिस्थितीत पोलीस बंदोबस्त घेणेबाबत, मा. अध्यक्ष यांनी सुचना केल्या.

पाणी आवर्तनाविषयी झालेल्या निर्णयानुसार कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी सिंचन कार्यक्रम व पिण्याचे पाण्याचे नियोजन करावे, असा निर्णय झाला. त्यानुषंगाने, मा. पालकमंत्री यांचेशी झालेल्या चर्चेनुसार आवर्तन नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी खालीलप्रमाणे आहे-

- रब्बी हंगाम प्रथम आवर्तन- अपेक्षित पाणीवापर- ३६०० दलघफू व प्रत्यक्ष पाणीवापर- २७६२ दलघफू
- रब्बी हंगाम द्वितीय आवर्तन- अपेक्षित पाणीवापर- ३४५० दलघफू व प्रत्यक्ष पाणीवापर- ३२०० दलघफू

एकुण रब्बी हंगाम - अपेक्षित पाणीवापर- ७०५० दलघफू व प्रत्यक्ष पाणीवापर- ५९६२ दलघफू

उपरोक्त निर्णयानुसार गोदावरी कालव्यांचे रब्बी हंगामाची दोन्ही आवर्तने नियोजनानुसार सुरळीत पार पडुन १०८८ दलघफू पाणी बचतही झाली. सदर आवर्तनात बचत झाल्याने व उन्हाळा हंगाम २०२४ चे फेर नियोजन करणे आवश्यक असल्याने मा. अध्यक्ष गोदावरी कालवे सल्लागार समिती तथा मा. मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली दि. ११/०३/२०२४ रोजी कालवा सल्लागार समितीची ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील सूचनांप्रमाणे खालीलप्रमाणे उन्हाळ हंगामाच्या आवर्तनाची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामध्ये उन्हाळी हंगामासाठी ३४५० दलघफू पाणी वापर झालेला आहे.

मा. पालकमंत्री यांनी दि. ११/०३/२०२४ रोजी कालवा सल्लागार समितीच्या ऑनलाईन बैठकीत चालु असलेल्या रब्बी आवर्तनात पाण्याची काटकसर करुन उन्हाळा हंगामात सिंचानासाठी पाणी देण्याच्या सुचनांच्या अनुषंगाने उन्हाळी हंगामासाठी जाहीर प्रकटन दि. २९/०४/ २०२४ रोजी काढण्यात आले होते.

सन २०२३-२४ हे दुष्काळी वर्ष असल्याने व यावर्षी वरील जलाशयांमधून जायकवाडीसाठी सुमारे २७४२ दलघफू इतके पाणी सोडावे लागल्याने मागील वर्षांचा (सन २०१५-१६ व सन २०१८-१९ ) अनुभव बघता उन्हाळा हंगाम आवर्तन देणे अतिशय अवघड होते. त्यास अनुसरुन मागील अनुभवाप्रमाणे काढण्यात आलेल्या सदर प्रकटनानुसार उन्हाळा हंगामाचे जाहीर प्रकटन बारमाही उभ्या पिकांसाठी एकुण पाणी मागणी अंदाजीत अर्जांच्या २०% क्षेत्रासाठी (उस व फळबागा) काढण्यात आले होते. तथापी मा. लोकप्रतिनिधी व स्थानिक लाभधारक शेतकरी यांच्या मागणीनुसार व पाण्यात होऊ शकणारी संभाव्य बचत गृहीत धरुन २० % क्षेत्राची मर्यादा शिथील करण्याबाबतचे शुद्धीपत्रक काढुन दि. ३०/०४/२०२४ रोजीच सुधारीत जाहिर प्रकटन तात्काळ काढण्यात आलेले होते. याबाबत क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणीही करण्यात आली. सबब उन्हाळ हंगामासाठी एकच जाहिर प्रकटन काढण्यात आलेले होते, काढण्यात आलेल्या जाहीर प्रकटनात दुरुस्ती/बदल असल्याने सुधारित जाहिर प्रकटन काढण्यात आले होते.

**अ)** सन २०२३-२४ पावसाळापूर्व कालावधीसाठी गोदावरी डावा व उजवा कालव्यासाठी खालीलप्रमाणे कामे मंजुर आहेत.

हंगामाचे पहिले आवर्तन दि. ०२/१२/२०२३ रोजी व दुसरे आवर्तन दि. १०/२/२०२४ रोजी सोडणेबाबत चर्चा झाली तथापि मा. अध्यक्ष यांनी रब्बी हंगामाचे पहिले आवर्तन सोडण्याचे दिनांकाविषयी चर्चा करुन आवर्तन दिनांक कळविले जाईल, असा निर्णय सर्वानुमते दिला.

दारणा प्रकल्पाच्या गोदावरी डावा व उजव्या कालव्यावर उन्हाळ हंगाम २०२३ -२४ मध्ये सिंचन आवर्तनाचे नियोजन करण्यात आलेले नाही, मात्र या हंगामात पिण्याचे पाण्याचे एक आवर्तन निश्चित केले असल्याचे सदस्य सचिव यांनी समिती सदस्यांचे निर्दशनास आणून दिले.

वरीलप्रमाणे रब्बी हंगामातील सिंचन आवर्तनात पाण्याची बचत करुन उन्हाळ हंगामात एक सिंचन आवर्तन देता येईल याबाबत विभागाने प्रयत्न करावेत. त्यासाठी कालव्यावरील अनधिकृत उपसा रोखण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडून नदी व कालव्याचे दोन्ही काठावरील गावांसाठी वीजबंदी आदेश घेण्याचे निर्देशीत केले, तसेच आवर्तन काळात स्वतंत्र पथके स्थापन करावीत व आपत्कालीन परिस्थितीत पोलीस बंदोबस्त घेणेबाबत, मा. अध्यक्ष यांनी सुचना केल्या.

पाणी आवर्तनाविषयी झालेल्या निर्णयानुसार कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी सिंचन कार्यक्रम व पिण्याचे पाण्याचे नियोजन करावे, असा निर्णय झाला. त्यानुषंगाने, मा. पालकमंत्री यांचेशी झालेल्या चर्चेनुसार आवर्तन नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी खालीलप्रमाणे आहे-

- ❖ रब्बी हंगाम प्रथम आवर्तन- अपेक्षित पाणीवापर- ३६०० दलघफू व प्रत्यक्ष पाणीवापर- २७६२ दलघफू
- ❖ रब्बी हंगाम द्वितीय आवर्तन- अपेक्षित पाणीवापर- ३४५० दलघफू व प्रत्यक्ष पाणीवापर- ३२०० दलघफू

एकुण रब्बी हंगाम - अपेक्षित पाणीवापर- ७०५० दलघफू व प्रत्यक्ष पाणीवापर- ५९६२ दलघफू

उपरोक्त निर्णयानुसार गोदावरी कालव्यांचे रब्बी हंगामाची दोन्ही आवर्तने नियोजनानुसार सुरळीत पार पडुन १०८८ दलघफू पाणी बचतही झाली. सदर आवर्तनात बचत झाल्याने व उन्हाळा हंगाम २०२४ चे फेर नियोजन करणे आवश्यक असल्याने मा. अध्यक्ष गोदावरी कालवे सल्लागार समिती तथा मा. मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली दि. ११/०३/२०२४ रोजी कालवा सल्लागार समितीची ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील सूचनांप्रमाणे खालीलप्रमाणे उन्हाळ हंगामाच्या आवर्तनाची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामध्ये उन्हाळी हंगामासाठी ३४५० दलघफू पाणी वापर झालेला आहे.

मा. पालकमंत्री यांनी दि. ११/०३/२०२४ रोजी कालवा सल्लागार समितीच्या ऑनलाईन बैठकीत चालु असलेल्या रब्बी आवर्तनात पाण्याची काटकसर करुन उन्हाळा हंगामात सिंचानासाठी पाणी देण्याच्या सुचनांच्या अनुषंगाने उन्हाळी हंगामासाठी जाहीर प्रकटन दि. २९/०४/ २०२४ रोजी काढण्यात आले होते.

सन २०२३-२४ हे दुष्काळी वर्ष असल्याने व यावर्षी वरील जलाशयांमधून जायकवाडीसाठी सुमारे २७४२ दलघफू इतके पाणी सोडावे लागल्याने मागील वर्षांचा (सन २०१५-१६ व सन २०१८-१९ ) अनुभव बघता उन्हाळा हंगाम आवर्तन देणे अतिशय अवघड होते. त्यास अनुसरुन मागील अनुभवाप्रमाणे काढण्यात आलेल्या सदर प्रकटनानुसार उन्हाळा हंगामाचे जाहीर प्रकटन बारमाही उभ्या पिकांसाठी एकुण पाणी मागणी अंदाजीत अर्जाच्या २०% क्षेत्रासाठी (उस व फळबागा) काढण्यात आले होते. तथापी मा. लोकप्रतिनिधी व स्थानिक लाभधारक शेतकरी यांच्या मागणीनुसार व पाण्यात होऊ शकणारी संभाव्य बचत गृहीत धरुन २० % क्षेत्राची मर्यादा शिथील करण्याबाबतचे शुद्धीपत्रक काढुन दि. ३०/०४/२०२४ रोजीच सुधारीत जाहिर प्रकटन तात्काळ काढण्यात आलेले होते. याबाबत क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणीही करण्यात आली. सबब उन्हाळ हंगामासाठी एकच जाहिर प्रकटन काढण्यात आलेले होते, काढण्यात आलेल्या जाहीर प्रकटनात दुरुस्ती/बदल असल्याने सुधारित जाहिर प्रकटन काढण्यात आले होते.

**अ)** सन २०२३-२४ पावसाळापूर्व कालावधीसाठी गोदावरी डावा व उजवा कालव्यासाठी खालीलप्रमाणे कामे मंजुर आहेत.

 ९१८.

**श्री. आशुतोष काळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१६७८ खालीलप्रमाणे आहे :-**

"गोदावरील कालव्यांचा कालवा सल्लागार समितीच्या उन्हाळा हंगाम सन २०२३-२४ बैठकीमध्ये गोदावरी कालव्यासाठी नांदुर मध्येश्वर बंधारा स्थळी उपलब्ध होणारे पाणी व प्रत्यक्षात आवर्तनात कालव्यांना वापरण्यात आलेले पाणी यामध्ये मोठयाप्रमाणात तफावत असल्याचे निदर्शनास येणे, गोदावरी कालवे आवर्तन सुरु करणेपुर्वी सदर तफावत कालव्या सल्लागार समितीच्या सदस्यांचे निदर्शनास न येणे, त्यामुळे फेरनियोजनास कालवा सल्लागार समितीची मान्यता घेण्यात आलेली नसल्याचेही निदर्शनास येणे, तसेच उन्हाळा हंगाम २०२४ मधील आर्वतनाचे दोन वेगवेगळे जाहीर प्रगटन काढण्यात आलेले असणे, गोदावरील कालव्यांचे सन २०२३-२४ मध्ये देखभाल दुरुस्तीचे कामे न करतां त्या कामांमध्ये मोठया प्रमाणात झालेला भ्रष्टाचार त्यामुळे मोठया प्रमाणात शेतकरी सिंचनाचे पाण्यापासुन वंचित राहिलेला असणे, त्यामुळे कालवा सल्लागार समितीच्या सदस्यांसमोर गोदावरी कालव्यासाठी नांदुर मध्यमेश्वर बंधारा स्थळी उपलबध होणारे पाण्याबद्दल चुकीची माहिती देणाऱ्या श्रीमती सोनल शहाणे, कार्यकारी अभियंता नाशिक पाटबंधारे विभाग यांनी चुकीची माहिती देण्यात येणे, त्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी करण्यांत येणे, परंतु त्याबाबत अद्याप कारवाई झालेली नसणे, परिणामी उन्हाळा हंगाम २०२४ मधील आवर्तनाचे जाहीर प्रगटनामध्ये नमुद करण्यांत आलेले प्रथम २० टक्के व नंतर मर्यादित क्षेत्र यामुळे शेतकऱ्यांमध्ये माठया प्रमाणात निर्माण झालेला असंतोष व रोषाची भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन:-**

गोदावरी कालवे सन २०२३-२४ च्या रब्बी हंगाम आवर्तनासंबंधी कालवा सल्लागार समितीची बैठक दि.१६/११/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर पालकमंत्री , अहमदनगर तथा मंत्री, महसुल, पशुसंवर्धन व दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये दारणा धरण समुहातील धरणांमधुन गोदावरी कालव्यांना उपलब्ध होणा-या पाण्यातून गोदावरी कालव्यांचे रब्बी व उन्हाळा हंगामाचे आवर्तनाचे नियोजन करण्यात आले.

जायकवाडी धरणात पाणी सोडावयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन रब्बी हंगाम व उन्हाळी हंगाम २०२३-२४ मध्ये सादर केलेल्या नियोजनामध्ये अंशत: बदल करुन पाणी वाचल्यास व प्रत्यक्ष क्षेत्रीय परिस्थितीनुसार सिंचन व बिगर सिंचन आवर्तन सोडण्यात यावे, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. त्यामध्ये जायकवाडी साठी पाणी सोडावे लागल्यास द्यावे लागणारे आवर्तन व पाणी सोडण्याचे रद्द झाल्यास द्यावे लागणारे आवर्तन याप्रमाणे प्लॅन A आणि प्लॅन B तयार करण्यात यावा व त्यानुसार आवर्तन देण्यात यावे. तसेच रब्बी हंगामाचे पहिले आवर्तन सोडण्याच्या दिनांकाविषयी चर्चा करुन आवर्तन दिनांक कळविण्यात येईल, असा निर्णय झाला.

मा. अध्यक्ष, गोदावरी कालवे सल्लागार समिती तथा मा. मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा यांनी समिती सदस्यांशी झालेल्या चर्चेनुसार शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने रब्बी हंगामातील उभ्या पिकांसाठी फायदा होऊ शकेल, असे सुचित करुन रब्बी

१) गोदावरी डावा कालवा उपविभाग कोपरगांव रु. २० लक्ष/- २) गोदावरी उजवा कालवा उपविभाग राहाता रु. ४.० लक्ष/- गोदावरी डावा तट कालवा कामे करण्यात आलेली असुन, गोदावरी उजवा तट कालव्यावरील दोन कामे करण्यात आलेली नाहीत.

ब) सन २०२३-२४ पावसाळोत्तर कालावधीसाठी गोदावरी डावा व उजवा कालव्यासाठी खालीलप्रमाणे कामे मंजुर आहेत.

१) गोदावरी डावा कालवा रु. ७०.७५ लक्ष/-२) गोदावरी उजवा कालवा रु. ८२.७१ लक्ष/- वरील आराखड्यातील कामे करण्यात येऊन रब्बी व उन्हाळा हंगामातील आवर्तने सुरळीत पार पडलेली आहेत.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण केस क्र. १/२०१४ निकाल दि. १९/९/२०१४ व मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र १७३/२०१६ निकाल दि. २३/०९/२०१६ अन्वये जायकवाडी उपखोऱ्यासाठी समन्यायी पाणीवाटप कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे लागु करण्यात आलेली आहे. जायकवाडीकरिता पाणी सोडणेबाबतच्या स्ट्रॅटेजी - III नुसार खरीप हंगामासाठी ८० % क्षेत्रासाठी , रब्बी हंगामासाठी ५२ % सिंचनक्षेत्राला पाणी देय असुन उन्हाळा हंगामात सिंचनासाठी पाणी देय नाही. पिण्यासाठी व औद्योगिक प्रयोजनासाठी ८० % पाणी देय आहे. सन २०२३-२४ हेही वर्ष स्ट्रॅटेजी - III असुन या वर्षी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत त्यानुसारच उन्हाळा हंगामात पाणी न देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापी लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार व मा. पालकमंत्री यांचे दि. ११/०३/२०२४ रोजीच्या ऑन लाईन बैठकीतील सुचनेनुसार क्षेत्रिय कर्मचारी/ अधिकारी यांनी अथक प्रयत्न करुन रब्बी हंगामातील दोन आवर्तनात बचत झाल्याने उन्हाळ हंगामात तिसरे आवर्तन बिगरसिंचन व सिंचन (संरक्षित) घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला, तथापी तीव्र उन्हाळा असल्याने व मागील अनुभव बघता उन्हाळा हंगामाचे संपुर्ण क्षेत्रास पाणी देता येणे शक्य नसल्याने एकुण मागणी क्षेत्राच्या २०% क्षेत्रास पाणी देण्याची अट जाहीर प्रकटनात टाकण्यात आली होती. तथापी मा. लोकप्रतिनिधींच्या सुचनेनुसार त्यात बदल करुन पुन्हा नव्याने शुद्धीपत्रक व जाहिर प्रकटन काढुन जास्त क्षेत्राची मागणी आल्यास काही ठराविक क्षेत्राची कपात करुन पाणी देण्यात येईल, हे स्पष्ट केले होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापुर व वैजापुर तालुक्यांतील अभुतपुर्व पाणीटंचाई निर्माण झाल्याने जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी या तालुक्यातील १०२ गावांसाठी पिण्याच्या पाण्याची मागणीबाबत सुतोवाच केले. त्यानुषंगाने कार्यकारी संचालक यांनी दि. ०३/०५/२०२४ रोजी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन गोदावरी कालव्याचे नियोजनाप्रमाणेचा बिगर सिंचन व सिंचन नियोजनाचा आढावा घेऊन नांदुर मधमेश्वर कालव्याद्वारे (पिण्याचे पाण्यासाठी) उपलब्ध करुन देण्याचे ठरविले. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दि. ०७/०५/२०२४ रोजी रितसर १५०० दलघफू पिण्यासाठी मागणी केली. त्यानुसार कार्यकारी संचालक यांनी शासन निर्णयातील निर्देशांनुसार ८०० दलघफू पाणी कालवा मुखाशी देण्याचे आदेश निर्गमित केले. त्यानुसार गोदावरी डावा व उजव्या कालव्याचे आवर्तन अनुक्रमे दि. १२/०५/२०२४ ते दि. ०५/०६/२०२४ (२५ दिवस) व दि. १२/०५/२०२४ ते दि. ११/०६/२०२४ (३१ दिवस) घेण्यात आलेल्या आवर्तनासोबत नांदुर मधमेश्वर कालव्याचे दि. २५/०५/२०२४ ते दि. ०५/०६/२०२४ या कालावधीत आवर्तन घेण्यात आले. तसेच गंगापुर व वैजापुर तालुक्यांसाठी ६८५ दलघफू पाणी देण्यात आले. अशा रितीने सर्व सिंचन/ बिगर सिंचनासाठी पाणी देण्यात आले.

कार्यकारी अभियंता यांनी योग्य नियोजन करुन उपलब्ध पाण्यात व उपलब्ध कमी कर्मचा-यांमधुन दुष्काळी परीस्थितीत उन्हाळ हंगामात जास्तीत जास्त बारामाही फळ बागांचे सिंचन करण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देऊन सुमारे १००० हे. क्षेत्रास त्याचा फायदा झाला आहे. तसेच दोन्ही कालव्यांवरील सुमारे ९२ बिगरसिंचन योजनांना पुर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

****************

**लक्षवेधी सूचना क्र. १७१८**

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय ( पावसाळी ) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्रीमती. सरोज आहिरे, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे :-

"नाशिक तालुक्यातील धोंडेगाव/देवरगाव येथे शासनाने सन १९९२-९३ मध्ये कश्यपी धरण बांधणे, या धरणासाठी या तालुक्यातील ६० ते ७० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यांत येणे, बहुतांश शेतकरी आदिवासी व अशिक्षित असल्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना त्यांच्या कुटुंबांतील एका व्यक्तीस शासकीय नोकरी देण्याचे आश्वासन देणे तसेंच त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन देणे, धरण पूर्ण होऊन कार्यान्वीत झालेले असूनसुध्दा अद्यापही शासनाने आश्वासनाची पूर्तता केलेली नसणे, मूळ प्रकल्पात ६० ते ७० शेतकऱ्यांच्या संपादन करण्यात येऊन शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन ३०० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या असणे, त्यांना सुध्दा जमिनीचा मोबदला व इतर लाभ देण्यांत आलेला नसणे, जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची परिस्थिती उद्भवणे, यासंदर्भात या शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री,मा.उपमुख्यमंत्री,मा.उपाध्यक्ष विधानसभा यांना पत्राद्वारे दि.२१/१२/२०२३ रोजी दिलेले सदर निवेदनावर शेतकऱ्यांच्या मागण्या त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

**श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री ( जलसंपदा ) यांचे निवेदन**

कश्यपी मध्यम प्रकल्प हा कश्यपी नदीवर मौजे धोंडेगाव, ता.जि.नाशिक येथे बांधण्यात आलेला असून सन २००३ पासून धरणात १०० टक्के पाणीसाठा करण्यात येत आहे. कश्यपी मध्यम प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा ५३.४३ दलघमी इतका असून याद्वारे ५८१७ हे. सिंचन क्षमता पुर्नस्थापित झाली आहे.

कश्यपी मध्यम प्रकल्पाकरिता एकूण ५४०.७८ हे. खाजगी क्षेत्र भूसंपादन कायद्यान्वये संपादित केलेली असून या सर्व क्षेत्राचा अंतिम निवाड्याप्रमाणेचा मोबदला यापूर्वीच अदा केलेला आहे. भूधारकांनी भूसंपादन कायदा कलम १८ अन्वये वाढीव मोबदल्याकरिता जिल्हा न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत. अशी एकूण ३१६ प्रकरणे होती, त्यापैकी २९८ प्रकरणांचा निकाल लागला असून निकालाप्रमाणे वाढीव मोबदल्याची रक्कम २२.२२ कोटी इतकी होती. मा. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे विभागाने रु. २२.२२ कोटी रक्कम जिल्हा न्यायालयात जमा केलेली आहे.

मौजे खड्याची वाडी व देवरगाव येथील प्रकल्प बाधीतांना पुनर्वसनासाठीच्या सर्व देय सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तसेच पुनर्वसन गावठाणातील देय नागरी सुविधांची कामे सन १९९९-२००० मध्ये पूर्ण करुन कामे पंचायत समिती, नाशिक यांचेकडे हस्तांतरीत केलेली आहेत.

कश्यपी प्रकल्पबाधितांना नशिक महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्याचा विषय नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे कार्यालयाशी संबंधित आहे. त्या अनुषंगाने पहिल्या टप्प्यात जमिनी संपादीत केलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या कुटूंबातील २४ व्यक्तींना महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्र. १२२ दि. २०/०६/१९९५ व महासभा ठराव क्र. १८७७ दि. ०९/०१/१९९६ अन्वये महानगरपालिकेच्या नियमित सेवेत नेमणूक देण्यात आली आहे. तसेच उर्वरीत ३६ प्रकल्पग्रस्तांचे बाबतीत उप आयुक्त (प्रशासन) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्या कार्यालयाचे पत्र दि.२५/०८/२०२२, अन्वये "उर्वरित ३६ प्रकल्पग्रस्तांना नाशिक महानगरपालिकेत नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

**********

कश्यपी प्रकल्पबाधितांना नशिक महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्याचा विषय नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे कार्यालयाशी संबंधित आहे. त्या अनुषंगाने पहिल्या टप्प्यात जमिनी संपादीत केलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या कुटूंबातील २४ व्यक्तींना महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्र. १२२ दि. २०/०६/१९९५ व महासभा ठराव क्र. १८७७ दि. ०९/०१/१९९६ अन्वये महानगरपालिकेच्या नियमित सेवेत नेमणूक देण्यात आली आहे. तसेच उर्वरीत ३६ प्रकल्पग्रस्तांचे बाबतीत उप आयुक्त (प्रशासन) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांच्या कार्यालयाचे पत्र दि.२५/०८/२०२२, अन्वये "उर्वरित ३६ प्रकल्पग्रस्तांना नाशिक महानगरपालिकेत नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

**********

**लक्षवेधी सूचना क्र. १७१८**

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय ( पावसाळी ) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्रीमती. सरोज आहिरे, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे :-

"नाशिक तालुक्यातील धोंडेगाव/देवरगाव येथे शासनाने सन १९९२-९३ मध्ये कश्यपी धरण बांधणे, या धरणासाठी या तालुक्यातील ६० ते ७० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यांत येणे, बहुतांश शेतकरी आदिवासी व अशिक्षित असल्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी देण्याचे आश्वासन देणे तसेंच त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन देणे, धरण पूर्ण होऊन कार्यान्वीत झालेले असूनसुध्दा अद्यापही शासनाने आश्वासनाची पूर्तता केलेली नसणे, मूळ प्रकल्पात ६० ते ७० शेतकऱ्यांच्या संपादन करण्यात येऊन शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन ३०० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या असणे, त्यांना सुध्दा जमिनीचा मोबदला व इतर लाभ देण्यांत आलेला नसणे, जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची परिस्थिती उद्भवणे, यासंदर्भात या शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री,मा.उपमुख्यमंत्री,मा.उपाध्यक्ष विधानसभा यांना पत्राद्वारे दि.२१/१२/२०२३ रोजी दिलेले सदर निवेदनावर शेतकऱ्यांच्या मागण्या त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री ( जलसंपदा ) यांचे निवेदन

कश्यपी मध्यम प्रकल्प हा कश्यपी नदीवर मौजे धोंडेगाव, ता.जि.नाशिक येथे बांधण्यात आलेला असून सन २००३ पासून धरणात १०० टक्के पाणीसाठा करण्यात येत आहे. कश्यपी मध्यम प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा ५३.४३ दलघमी इतका असून याद्वारे ५८१७ हे. सिंचन क्षमता पुर्नस्थापित झाली आहे.

कश्यपी मध्यम प्रकल्पाकरिता एकूण ५४०.७८ हे. खाजगी क्षेत्र भूसंपादन कायद्यान्वये संपादित केलेली असून या सर्व क्षेत्राचा अंतिम निवाड्याप्रमाणेचा मोबदला यापूर्वीच अदा केलेला आहे. भूधारकांनी भूसंपादन कायदा कलम १८ अन्वये वाढीव मोबदल्याकरिता जिल्हा न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत. अशी एकूण ३१६ प्रकरणे होती, त्यापैकी २९८ प्रकरणांचा निकाल लागला असून निकालाप्रमाणे वाढीव मोबदल्याची रक्कम २२.२२ कोटी इतकी होती. मा. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे विभागाने रु. २२.२२ कोटी रक्कम जिल्हा न्यायालयात जमा केलेली आहे.

मौजे खड्याची वाडी व देवरगाव येथील प्रकल्प बाधीतांना पुनर्वसनासाठीच्या सर्व देय सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तसेच पुनर्वसन गावठाणातील देय नागरी सुविधांची कामे सन १९९९-२००० मध्ये पूर्ण करुन कामे पंचायत समिती, नाशिक यांचेकडे हस्तांतरीत केलेली आहेत.

लक्षवेधी सूचना क्र. १८१९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय ( पावसाळी ) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्रीमती. मोनिका राजळे, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे :-

"अहमदनगर जिल्हयातील शेवगांव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळयाचा विषय असलेल्या ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा २ चे काम सन २०११ पासून अत्यंत संथगतीने होत असणे, जून २०११ ला योजनेचे काम सुरु झालेले असणे, या योजनेमध्ये शेतकऱ्यांच्या ६९६० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार असणे, परंतू २०१४ ते २०२३ पर्यंत सुमारे २४७.६१ कोटी रुपयांची तरतूद शासनाकडून होवूनही, व सुमारे ११० कोटी रुपयांचा खर्च झालेला असूनही ही योजना शेतकऱ्यांच्या शेताला पाणी देण्यासाठी पूर्ण झालेली नसणे, यामुळे शेवगांव तालुक्यातील सुमारे २० गावातील लाभार्थी शेतकरी ही योजना पूर्ण होण्याची प्रतिक्षा करीत असणे, परंतू प्रशासन व यंत्रणा यांचेकडून कामात होत असलेली दिरगाई, यामुळे शेतकऱ्यांच्या भावना तीव्र झालेल्या असणे, शेतकऱ्यांच्या मनात शासन व प्रशासनाविषयी तीव्र असंतोष पसरणे, त्यामुळे ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा २ चे काम युध्दपातळीवर पूर्ण करण्याबाबत शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना".

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री ( जलसंपदा ) यांचे निवेदन

ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा-२ ता. शेवगाव जि. अहमदनगर ही योजना जायकवाडी प्रकल्पाच्या जलाशयामूळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना सिंचनाचा लाभ देणेसाठी हाती घेण्यात आलेली आहे. ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-१ व टप्पा- २ प्रकल्पास शासन निर्णय क्र. सुप्रमा-२००९/२६/(१७/०९)/मध्यम प्रकल्प मंत्रालय दि.०१/०७/२००९ अन्वये रुपये ४३८.७० कोटी इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त असून त्यापैकी ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा-२ या योजनेसाठी रुपये ३९५.४८ कोटी इतकी तरतूद आहे.

सदरील योजनेसाठी जायकवाडी प्रकल्पात ६१.४१ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित असून त्याद्वारे अहमदनगर जिल्ह्यातील शेवगांव तालूक्यातील २० गावातील (खानापूर, अंतरवली, घोटण, बाभुळगांव, राक्षी, कुरुडगांव, रायतळे, मळेगांव, गदेवाडी, ठाकूर निमगांव, सोनेसांगवी, कोळगांव, हसनापूर, वरखेड, चापडगांव, दहिगावंशे, प्रभुवडगांव, मंगरुळ (खु.) ,मंगरुळ (बु.), अंतरवली (बु.)) ६९६० हेक्टर क्षेत्रास ठिबक सिंचनाद्वारे सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

सदर योजनेच्या पोहोच कालवा, मुख्य पंपगृह, उर्ध्वगामी नलिका-१, २ व ३, वितरणकुंडे (एकूण ५) व विद्युत घटकांची कामे करणे यासाठी सन २०११ मध्ये ब-१/१/सन २०११-१२ या निविदे अतंर्गत कामे करण्याबाबत कार्यारंभ आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार जून २०११ पासून कामे हाती घेण्यात आली

असून पोहोच कालवा, मुख्य पंपगृह, उर्ध्वगामी नलिका इत्यादी कामे सन २०१५-१६ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहेत. परंतु शेतक-यांच्या विरोधामुळे उर्ध्वगामी नलिकाचे उर्वरीत कामे व भूसंपादना अभावी वितरण कुंड व स्विच यार्ड कामे करण्यास विलंब झाला.

सद्यस्थितीत आवश्यक सर्व कामे पुर्ण झाले असून मुख्य पंपगृहातील पंप सुरु करून सर्व उर्ध्व गामी नलिका व वितरण कुंडांची चाचणी घेण्यात आलेली आहे. योजनेची उर्वरित विद्युत कामे ९० % पूर्ण झालेली असून उर्वरित कामे सप्टेंबर २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

या योजनेचा ६९६० हे. सिंचन क्षेत्रास लाभ होणार असल्याने शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी वितरण कुंडा पुढील पाईप वितरण व्यवस्थेच्या (PDN) कामांची "क" निविदा ०७/०६/२०२१ रोजी मे.डब्लु.पी.आय.एल. कोलकत्ता या अभिकरणास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत योजनेच्या प्राथमिक वितरण व्यवस्थेची कामे ६५% पूर्ण असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. योजनेचे पाईप वितरण व्यवस्थेच्या कामासाठी भूसंपादन न करता कामे करावयाचे असल्याने कामे करताना शेतकऱ्यांचे क्षेत्रात उभी पिके असल्याने आवश्यकते नुसार पिकपंचनामे करुन व त्यांच्या सहकार्याने कामे करावी लागत आहेत. त्यामुळे कार्य क्षेत्रामध्ये कामासाठी जमिन उपलब्ध न झाल्यामुळे काही प्रमाणात कामास विलंब होत आहे. अशा सर्व लाभधारक शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन कामे पुर्ण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

सद्यस्थितीत योजनेच्या वितरण व्यवस्थेचे एकूण ६९६० हेक्टर पैकी ३७२० हेक्टर इतके सिंचन क्षेत्रावरील कामे पूर्ण झालेली आहे. सदर योजनेवर जून २०२४ अखेर रुपये १६१.१० कोटी इतका खर्च झालेला आहे.

सदर योजनेची उर्वरित कामे जुन-२०२५ अखेर पुर्ण करून योजना कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

****

असून पोहोच कालवा, मुख्य पंपगृह, उर्ध्वगामी नलिका इत्यादी कामे सन २०१५-१६ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहेत. परंतु शेतक-यांच्या विरोधामुळे उर्ध्वगामी नलिकाचे उर्वरीत कामे व भूसंपादना अभावी वितरण कुंड व स्विच यार्ड कामे करण्यास विलंब झाला.

सद्यस्थितीत आवश्यक सर्व कामे पुर्ण झाले असून मुख्य पंपगृहातील पंप सुरु करून सर्व उर्ध्व गामी नलिका व वितरण कुंडांची चाचणी घेण्यात आलेली आहे. योजनेची उर्वरित विद्युत कामे ९० % पूर्ण झालेली असून उर्वरित कामे सप्टेंबर २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

या योजनेचा ६९६० हे. सिंचन क्षेत्रास लाभ होणार असल्याने शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी वितरण कुंडा पुढील पाईप वितरण व्यवस्थेच्या (PDN) कामांची "क" निविदा ०७/०६/२०२१ रोजी मे.डब्लु.पी.आय.एल. कोलकत्ता या अभिकरणास कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत योजनेच्या प्राथमिक वितरण व्यवस्थेची कामे ६५% पूर्ण असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. योजनेचे पाईप वितरण व्यवस्थेच्या कामासाठी भूसंपादन न करता कामे करावयाचे असल्याने कामे करताना शेतकऱ्यांचे क्षेत्रात उभी पिके असल्याने आवश्यकते नुसार पिकपंचनामे करुन व त्यांच्या सहकार्याने कामे करावी लागत आहेत. त्यामुळे कार्य क्षेत्रामध्ये कामासाठी जमिन उपलब्ध न झाल्यामुळे काही प्रमाणात कामास विलंब होत आहे. अशा सर्व लाभधारक शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन कामे पुर्ण करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

सद्यस्थितीत योजनेच्या वितरण व्यवस्थेचे एकूण ६९६० हेक्टर पैकी ३७२० हेक्टर इतके सिंचन क्षेत्रावरील कामे पूर्ण झालेली आहे. सदर योजनेवर जून २०२४ अखेर रुपये १६१.१० कोटी इतका खर्च झालेला आहे.

सदर योजनेची उर्वरित कामे जुन-२०२५ अखेर पुर्ण करून योजना कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

****

**लक्षवेधी सूचना क्र. १८१९**

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय ( पावसाळी ) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्रीमती. मोनिका राजळे, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे :-

"अहमदनगर जिल्हयातील शेवगांव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळयाचा विषय असलेल्या ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा २ चे काम सन २०११ पासून अत्यंत संथगतीने होत असणे, जून २०११ ला योजनेचे काम सुरु झालेले असणे, या योजनेमध्ये शेतकऱ्यांच्या ६९६० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार असणे, परंतू २०१४ ते २०२३ पर्यंत सुमारे २४७.६१ कोटी रुपयांची तरतूद शासनाकडून होवूनही, व सुमारे ११० कोटी रुपयांचा खर्च झालेला असूनही ही योजना शेतकऱ्यांच्या शेताला पाणी देण्यासाठी पूर्ण झालेली नसणे, यामुळे शेवगांव तालुक्यातील सुमारे २० गावातील लाभार्थी शेतकरी ही योजना पूर्ण होण्याची प्रतिक्षा करीत असणे, परंतू प्रशासन व यंत्रणा यांचेकडून कामात होत असलेली दिरंगाई, यामुळे शेतकऱ्यांच्या भावना तीव्र झालेल्या असणे, शेतकऱ्यांच्या मनात शासन व प्रशासनाविषयी तीव्र असंतोष पसरणे, त्यामुळे ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा २ चे काम युध्दपातळीवर पूर्ण करण्याबाबत शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना".

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री ( जलसंपदा ) यांचे निवेदन

ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा-२ ता. शेवगाव जि. अहमदनगर ही योजना जायकवाडी प्रकल्पाच्या जलाशयामूळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना सिंचनाचा लाभ देणेसाठी हाती घेण्यात आलेली आहे. ताजनापुर उपसा सिंचन योजना टप्पा-१ व टप्पा- २ प्रकल्पास शासन निर्णय क्र. सुप्रमा-२००९/२६/(१७/०९)/मध्यम प्रकल्प मंत्रालय दि.०१/०७/२००९ अन्वये रुपये ४३८.७० कोटी इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त असून त्यापैकी ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा-२ या योजनेसाठी रुपये ३९५.४८ कोटी इतकी तरतूद आहे.

सदरील योजनेसाठी जायकवाडी प्रकल्पात ६१.४१ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित असून त्याद्वारे अहमदनगर जिल्ह्यातील शेवगांव तालूक्यातील २० गावातील (खानापूर, अंतरवली, घोटण, बाभुळगांव, राक्षी, कुरुडगांव, रायतळे, मळेगांव, गदेवाडी, ठाकूर निमगांव, सोनेसांगवी, कोळगांव, हसनापूर, वरखेड, चापडगांव, दहिगावंशे, प्रभुवडगांव, मंगरुळ (खु.) ,मंगरुळ (बु.), अंतरवली (बु.)) ६९६० हेक्टर क्षेत्रास ठिबक सिंचनाद्वारे सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

सदर योजनेच्या पोहोच कालवा, मुख्य पंपगृह, उर्ध्वगामी नलिका-१, २ व ३, वितरणकुंडे (एकूण ५) व विद्युत घटकांची कामे करणे यासाठी सन २०११ मध्ये ब-१/१/सन २०११-१२ या निविदे अतंर्गत कामे करण्याबाबत कार्यारंभ आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार जून २०११ पासून कामे हाती घेण्यात आली

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

मा.डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८५२ पुढीलप्रमाणे:-

बेंबळा प्रकल्प ता.बाभुळगाव जि. यवतमाळ येथील प्रकल्पनिर्मितीसाठी शासनाने जमिन अधिग्रहन करणे प्रकल्पात ज्या शेतकऱ्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत त्यांना आजतागायत मोबदला मिळालेला नसणे प्रकल्पग्रस्तांना प्रमाणपत्र देणे परंतु प्रत्यक्षात लाभ मिळालेला नसणे, पुर्नवसीत गावांमध्ये कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा, आरोग्य सेवा स्मशानभूमी सुविधांपासून प्रकल्पग्रस्त वंचीत असणे, पुर्नवसीत गावांना ग्रामपंचायतीचा दर्जा मिळालेला नसणे त्यामुळे ग्रामपंचायत स्थरावर मिळणारे जन्म मुत्यू नोंद प्रमाणपत्रे त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांकरीता कार्यालयीन दाखले मिळत नसणे, प्रकल्पग्रस्ताचा दाखला असूनही बाधित शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरी देण्याचे आश्वासन शासनाने देऊनही, अद्यापपर्यंत कुठल्याही शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला नोकरी न देणे त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येणे, दहावर्षापेक्षा अधिक काळ होऊनही प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसन न झाल्याने सदर अन्यायाविरुध्द न्यायालयात दाद मागणे न्यालयालयाने निकाल प्रकल्पग्रस्तांच्या बाजूने निकाल देऊनही त्यांना त्याचा लाभ मिळाला नसणे, बेंबळा प्रकल्पाचे जुने कालवे खराब झालेले असणे, अनेक ठिकाणी लिकेज असल्यामुळे पाणी वाहून जाणे, परिणामी शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी न पोहचेणे, त्याचप्रमाणे खर्डा ल.पा. प्रकल्पाचा यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यातील निर्माण झालेल्या तरतुदी व मंजूर प्रमाच्या तुलनेत भूसंपादनातील वाढीमुळे प्रकल्पाचे काम प्रलंबित असणे, त्यामुळे धरणग्रस्तांमध्ये पसरलेली असंतोषाची व चिडीची भावना, याबाबत सदर धरणग्रस्तांच्या हिताच्यादृष्टीने योग्य निर्णय घेऊन शासनाने करावयाची कार्यवारी व उपाययोजना"

<u>मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन</u>

बेंबळा प्रकल्प ता.बाभुळगाव जि. यवतमाळ या प्रकल्पाकरीता बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ अंतर्गत एकूण १०३८०.५० हे. जमीन भूसंपादन कायदा, १८९४ नुसार व ४८.५९ हे. सरळ खरेदीन्वये अशी एकूण १०.४५७.४६ हे. क्षेत्र संपादित करण्यात आली आहे. या प्रकल्पाकरीता सन २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार २७.४८ हे. जमीन संपादित करुन रु.७.२३ कोटी मोबदला वाटप केला आहे. बेंबळा प्रकल्पात संपादित केलेल्या जमीनी व घरे यांचा संपूर्ण मोबदला अदा झालेला आहे.

प्रकल्पग्रस्तांनी वाढीव मोबदल्याकरिता मा.सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि दिवाणी न्यायालय येथे कलम १८ अंतर्गत याचिका दाखल केलेल्या असून सद्यस्थितीत एकूण ६४५ न्यायालयीन प्रकरणे दाखल आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार वेळोवेळी वाढीव मोबदल्याची रक्कम प्रकल्पग्रस्तांना अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

बेंबळा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र महसूल (मदत व पुनर्वसन ) विभागामार्फत वितरीत करण्यात येते. तसेच या प्रमाणपत्रावर शासनाच्या प्रचलित धोरणानुसार लाभ प्रदान करण्यात येतात.

बेंबळा प्रकल्पांतर्गत सर्व पुनर्वसित गावठाणात शासन निर्णयाप्रमाणे नेमून दिलेल्या सर्व १८ नागरी सुविधांच्या सोयी पुरविण्यात आलेल्या असून प्रकल्पामुळे बाधीत यवतमाळ जिल्ह्यातील १६ गावांचे २० पुनर्वसित गावठाणात व अमरावती जिल्ह्यातील ७ गावांचे ७ पुनर्वसित गावठाणांमध्ये मूळ नागरी सुविधांची कामे पूर्ण झाली होती. या दोन्ही जिल्ह्यातील गावांचे पुनर्वसितांचे स्थलांतरण सन २००७ पर्यंत झालेले आहे. पुनर्वसित झालेल्या सर्व गावठाणामधे १०० टक्के स्थलांतर झालेले आहे. यवतमाळ जिल्हयातील २० पुर्नवसित गावठाणाचे दर्जेदार नागरी सुविधांतर्गत १८ गावांचे नागरी सुविधांची कामे पूर्ण व उर्वरीत २ गावांची कामे अंतीम टप्प्यात आहेत. उक्त १८ पैकी १४ गावांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेस पूर्ण झालेले असून उर्वरीत ४ गावांची हस्तांतरणाकरीता जिल्हाधिकारी, यवतमाळ मार्फत स्थापित समीतीद्वारे कामांची पाहणी करण्यात आली असून हस्तांतरण कार्यवाहीत आहे.

पुनर्वसित गांवठाण मौजा कोपरा व मौजा बारड येथील स्मशानभूमी करता जागा उपलब्ध नसल्याने स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध केली नव्हती. सद्यस्थितीत मौजा कोपरा येथील पुनर्वसित गांवठाणा करता स्मशानभूमी करता जागा उपलब्ध झालेली असून निविदा कार्यवाही होऊन काम अंतीम टप्प्यात आहे. तसेच मौजा बारड येथील पुनर्वसित गांवठाणा करता स्मशानभूमी करता जागा उपलब्ध झालेली असून भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होताच निविदा कार्यवाही करून काम हाती घेण्यात येईल.

बेंबळा प्रकल्पाची सिंचन क्षमता ३८८५० हे. असून सन २०११ पासून सिंचनास सुरूवात झाली आहे. मुख्य कालव्यावरील शाखा कालवा, वितरिका, लघुपाट व उप लघुपाट यांची कामे अस्तरीकरण विरहित झालेली असून कालव्याचे लाभक्षेत्र मुख्य कालव्याच्या डावी बाजुकडील ते वर्धा नदी यामध्ये असून सदर कालव्याची कामे ही बऱ्याच भागात काळ्या मातीमधून झालेली आहेत. काळ्या मातीमधून झालेल्या कामाच्या ठिकाणी झाडे-झुडपे वाढणे व पावसामुळे गाळ जमा होतो. कालव्यातून गाळ/ गवत काढणे व त्याची दुरूस्तीबाबतची कामे निधी उपलब्धतेनुसार करण्यात येतात. पाझर व गाळ/गवत इ. समस्येवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी कालवेप्रणाली संधानक अस्तरीकरण करण्याचे प्रस्तावित असून या बाबतचा सुप्रमा अहवाल तयार करण्यात येवुन राज्य तांत्रिक सल्लागार समिति, नाशिक यांच्याकडे सादर आहे. सदर सुप्रमा मंजुरीनंतर कालव्याचे अस्तरीकरणाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे. त्यामुळे कालव्याव्दारे पाणी नाश कमी होऊन शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचणे सुलभ होईल.

खर्डा लघु प्रकल्प ता.बाभुळगांव जि.यवतमाळ या प्रकल्पाचा सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्तावास नियामक मंडळाच्या दिनांक २८.१०.२०२३ रोजीचे बैठकीत मंजुरी प्राप्त झालेली असून प्रस्ताव महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) यांच्या मान्यतेस्तव सादर केला आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुप्रमाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या सुधारीत सर्वेक्षणानुसार प्रकल्प साठवण तलावात रुपांतरीत करण्याचे नियामक मंडळाचे निर्देशानुसार निर्णय घेण्यात आला आहे. लाभधारकांच्या मागणीनुसार लघु प्रकल्प मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार आवश्यक सर्व घटकांचा समावेश करुन पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

*********************

बेंबळा प्रकल्पांतर्गत सर्व पुनर्वसित गावठाणात शासन निर्णयाप्रमाणे नेमून दिलेल्या सर्व १८ नागरी सुविधांच्या सोयी पुरविण्यात आलेल्या असून प्रकल्पामुळे बाधीत यवतमाळ जिल्ह्यातील १६ गावांचे २० पुनर्वसित गावठाणात व अमरावती जिल्ह्यातील ७ गावांचे ७ पुनर्वसित गावठाणांमध्ये मूळ नागरी सुविधांची कामे पूर्ण झाली होती. या दोन्ही जिल्ह्यातील गावांचे पुनर्वसितांचे स्थलांतरण सन २००७ पर्यंत झालेले आहे. पुनर्वसित झालेल्या सर्व गावठाणामधे १०० टक्के स्थलांतर झालेले आहे. यवतमाळ जिल्हयातील २० पुर्नवसित गावठाणाचे दर्जेदार नागरी सुविधांतर्गत १८ गावांचे नागरी सुविधांची कामे पूर्ण व उर्वरीत २ गावांची कामे अंतीम टप्प्यात आहेत. उक्त १८ पैकी १४ गावांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेस पूर्ण झालेले असून उर्वरीत ४ गावांची हस्तांतरणाकरीता जिल्हाधिकारी, यवतमाळ मार्फत स्थापित समीतीद्वारे कामांची पाहणी करण्यात आली असून हस्तांतरण कार्यवाहीत आहे.

पुनर्वसित गांवठाण मौजा कोपरा व मौजा बारड येथील स्मशानभूमी करता जागा उपलब्ध नसल्याने स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध केली नव्हती. सद्यस्थितीत मौजा कोपरा येथील पुनर्वसित गांवठाणा करता स्मशानभूमी करता जागा उपलब्ध झालेली असून निविदा कार्यवाही होऊन काम अंतीम टप्प्यात आहे. तसेच मौजा बारड येथील पुनर्वसित गांवठाणा करता स्मशानभूमी करता जागा उपलब्ध झालेली असून भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होताच निविदा कार्यवाही करून काम हाती घेण्यात येईल.

बेंबळा प्रकल्पाची सिंचन क्षमता ३८८५० हे. असून सन २०११ पासून सिंचनास सुरूवात झाली आहे. मुख्य कालव्यावरील शाखा कालवा, वितरिका, लघुपाट व उप लघुपाट यांची कामे अस्तरीकरण विरहित झालेली असून कालव्याचे लाभक्षेत्र मुख्य कालव्याच्या डावी बाजुकडील ते वर्धा नदी यामध्ये असून सदर कालव्याची कामे ही बऱ्याच भागात काळ्या मातीमधून झालेली आहेत. काळ्या मातीमधून झालेल्या कामाच्या ठिकाणी झाडे-झुडपे वाढणे व पावसामुळे गाळ जमा होतो. कालव्यातून गाळ/ गवत काढणे व त्याची दुरूस्तीबाबतची कामे निधी उपलब्धतेनुसार करण्यात येतात. पाझर व गाळ/गवत इ. समस्येवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी कालवेप्रणाली संधानक अस्तरीकरण करण्याचे प्रस्तावित असून या बाबतचा सुप्रमा अहवाल तयार करण्यात येवुन राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्याकडे सादर आहे. सदर सुप्रमा मंजुरीनंतर कालव्याचे अस्तरीकरणाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे. त्यामुळे कालव्याव्दारे पाणी नाश कमी होऊन शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचणे सुलभ होईल.

खर्डा लघु प्रकल्प ता.बाभुळगांव जि.यवतमाळ या प्रकल्पाचा सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्तावास नियामक मंडळाच्या दिनांक २८.१०.२०२३ रोजीचे बैठकीत मंजुरी प्राप्त झालेली असून प्रस्ताव महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) यांच्या मान्यतेस्तव सादर केला आहे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुप्रमाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या सुधारीत सर्वेक्षणानुसार प्रकल्प साठवण तलावात रुपांतरीत करण्याचे नियामक मंडळाचे निर्देशानुसार निर्णय घेण्यात आला आहे. लाभधारकांच्या मागणीनुसार लघु प्रकल्प मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार आवश्यक सर्व घटकांचा समावेश करुन पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

********************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

**मा.डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८५२ पुढीलप्रमाणे:-**

बेंबळा प्रकल्प ता.बाभुळगाव जि. यवतमाळ येथील प्रकल्पनिर्मितीसाठी शासनाने जमिन अधिग्रहन करणे प्रकल्पात ज्या शेतकऱ्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत त्यांना आजतागायत मोबदला मिळालेला नसणे प्रकल्पग्रस्तांना प्रमाणपत्र देणे परंतु प्रत्यक्षात लाभ मिळालेला नसणे, पुर्नवसीत गावांमध्ये कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा, आरोग्य सेवा स्मशानभूमी सुविधांपासून प्रकल्पग्रस्त वंचीत असणे, पुर्नवसीत गावांना ग्रामपंचायतीचा दर्जा मिळालेला नसणे त्यामुळे ग्रामपंचायत स्थरावर मिळणारे जन्म मुत्यू नोंद प्रमाणपत्रे त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांकरीता कार्यालयीन दाखले मिळत नसणे, प्रकल्पग्रस्ताचा दाखला असूनही बाधित शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरी देण्याचे आश्वासन शासनाने देऊनही, अद्यापपर्यंत कुठल्याही शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला नोकरी न देणे त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येणे, दहावर्षापेक्षा अधिक काळ होऊनही प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसन न झाल्याने सदर अन्यायाविरुध्द न्यायालयात दाद मागणे न्यालयालयाने निकाल प्रकल्पग्रस्तांच्या बाजूने निकाल देऊनही त्यांना त्याचा लाभ मिळाला नसणे, बेंबळा प्रकल्पाचे जुने कालवे खराब झालेले असणे, अनेक ठिकाणी लिकेज असल्यामुळे पाणी वाहून जाणे, परिणामी शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी न पोहचेणे, त्याचप्रमाणे खर्डा ल.पा. प्रकल्पाचा यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यातील निर्माण झालेल्या तरतुदी व मंजूर प्रमाच्या तुलनेत भूसंपादनातील वाढीमुळे प्रकल्पाचे काम प्रलंबित असणे, त्यामुळे धरणग्रस्तांमध्ये पसरलेली असंतोषाची व चिडीची भावना, याबाबत सदर धरणग्रस्तांच्या हिताच्यादृष्टीने योग्य निर्णय घेऊन शासनाने करावयाची कार्यवारी व उपाययोजना"

**मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन**

बेंबळा प्रकल्प ता.बाभुळगाव जि. यवतमाळ या प्रकल्पाकरीता बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ अंतर्गत एकूण १०३८०.५० हे. जमीन भूसंपादन कायदा, १८९४ नुसार व ४८.५९ हे. सरळ खरेदीन्वये अशी एकूण १०.४५७.४६ हे. क्षेत्र संपादित करण्यात आली आहे. या प्रकल्पाकरीता सन २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार २७.४८ हे. जमीन संपादित करुन रु.७.२३ कोटी मोबदला वाटप केला आहे. बेंबळा प्रकल्पात संपादित केलेल्या जमीनी व घरे यांचा संपूर्ण मोबदला अदा झालेला आहे.

प्रकल्पग्रस्तांनी वाढीव मोबदल्याकरिता मा.सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि दिवाणी न्यायालय येथे कलम १८ अंतर्गत याचिका दाखल केलेल्या असून सद्यस्थितीत एकूण ६४५ न्यायालयीन प्रकरणे दाखल आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार वेळोवेळी वाढीव मोबदल्याची रक्कम प्रकल्पग्रस्तांना अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

बेंबळा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र महसूल (मदत व पुनर्वसन ) विभागामार्फत वितरीत करण्यात येते. तसेच या प्रमाणपत्रावर शासनाच्या प्रचलित धोरणानुसार लाभ प्रदान करण्यात येतात.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
तृतीय

**मा. श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८५६ पुढीलप्रमाणे:-**

" गंगाखेड (जिल्हा परभणी) विधानसभा मतदारसंघातील धोंड प्रकल्पासाठी मौजे बनवस तालुका परभणी येथील भूसंपादनासाठी उपअधीक्षक भूमी अभिलेख यांनी भूसंपादन मोजणीची नोटीस येथील रहिवाशांना बजावलेली असणे, या भूसंपादनास मौजे बनवस तालुका पालम येथील शेतकऱ्यांनी आक्षेप नोंदवत अनेक मागण्या केलेल्या असणे, धोंड प्रकल्पासाठी खाजगी जमिनी संपादन करण्यात येत असल्याने या गावातील शेकडो कुटुंबे भूमीहीन होणार असणे, प्रकल्पासाठी बाधित शेतकऱ्यांना देण्यात येणारा मूल्यांकन अहवाल यावा, बाधित शेतकऱ्यांना बाजारभावाने जमिनीला प्रति एकर १५ लक्ष रुपये असणारा भाव विचारात घेऊन त्याच्या सहापट मिळणारा ९० लक्ष एकरी मोबदला द्यावा, मौजे.बनवस या गावातील सर्वच कुटुंबाचे पुनर्वसन व पुनरस्थापना करून या नागरिकांना उपजीविकेसाठी गावातच शेतीसाठी जमीन देऊन बाधित कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी द्यावी, रेडीरेकनरच्या दाराप्रमाणे एकरी १.२५ लक्ष ते १.६० लक्ष दर द्यावेत २०१७ व त्यापूर्वीपासून ओलीताखाली असलेल्या फळबागा, बोरवेल, विहिरीची नोंद असून त्यांचे मूल्यांकन बागायती म्हणून करण्यात यावे, या व अन्य मागण्याची निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री महोदयांना दिलेले असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन**

जायकवाडी प्रकल्प टप्पा -२ अंतर्गत माजलगांव उजवा कालवा कि.मी. १२५ ते १३४ वरील धोंड (बनवस) मार्गस्थ जलाशयाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर योजनेस दि.१६/०७/२००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

धोंड प्रकल्पासाठी मौ. बनवस ता. पालम, जि. परभणी या गावातील एकूण १५८.९४ हेक्टर क्षेत्रासाठी "भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" नुसार संपादित करण्यासाठी जिल्हाधिकारी परभणी यांना प्रस्ताव सादर केला होता. उपविभागीय अधिकारी गंगाखेड यांनी दि.०१/१०/२०२० रोजी कलम-११(१) ची अधिसूचना प्रसिद्ध केली होती. परंतु, "भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" नुसार कलम-११(१) च्या अधिसूचनेस मुदतवाढ देण्याबाबत तरतूद नसल्याने सदरील प्रस्ताव रद्द करून, दि.०३/११/२०२२ रोजी जिल्हाधिकारी परभणी यांना नव्याने फेर प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांनी कलम-११(१) ची अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यापूर्वी

५०% निधीची (रु.१५,०९,६३,३१०/-) मागणी केलेली आहे. निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. सदर संयुक्त मोजणीसाठी भूमी अभिलेख कार्यालय, पालम यांना आदेशित करून त्यानुसार दि.१३/०३/२०२४ पासून प्रत्यक्ष संयुक्त मोजणीस सुरुवात झालेली असून, अद्यापपर्यंत जवळपास १३० हे. क्षेत्राची संयुक्त मोजणी पूर्ण झालेली आहे व उर्वरीत क्षेत्राची मोजणी प्रगतीत आहे.

"भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" मधील कलम २६ ते ३० अनुसूची १ मधील तरतुदीनुसार मोबदला निश्चित करण्याबाबत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती नेमण्यात येवून दिनांक १२/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दर निश्चिती करण्यात येते.

मौजे बनवस गावातील एकूण जमिनीचे क्षेत्र १७२५ हे. एवढे असून, संपादित होणारी जमीन १५८.९४ हे. आहे. तसेच गावठाण क्षेत्रातील कोणतेही रहिवासी घरे बुडित क्षेत्रात जात नाहीत. भूसंपादन प्रस्तावाच्या आधारे एकूण ३०८ भूधारकांपैकी जवळपास ७५ भूधारक भूमिहीन होत आहेत. जमीन संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रकल्पग्रस्त दाखला देणेबाबत कार्यवाही करण्यात येते. जागेवर संयुक्त मोजणी करतांना येणारी झाडे, विहीर पाईपलाईन, बांधकामे यांचे मोजणी करुन त्यांचे मूल्यांकन करून त्यानुसार मोबदला देण्यात येईल. बागायती मूल्यांकनाबाबत महसूल विभागातील अभिलेख जसे ७/१२ व पिक पाहणी अहवाल यांचे आधारे "भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" मधील तरतूदींचा विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

सदर धोंड मार्गस्थ जलाशय हा परभणी व नांदेड जिल्ह्याच्या सीमेवर येत असून या प्रकल्पामुळे पालम व लोहा या दुष्काळ प्रवण तालुक्यास सिंचनाचा लाभ होणार आहे. धोंड मार्गस्थ जलाशयामुळे ९.०१ द.ल.घ.मी. इतका पाणीसाठा निर्माण होणार असून, यामुळे लाभक्षेत्रातील १७५० हे. एवढ्या क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

*******************************************************************

५०% निधीची (रु.१५,०९,६३,३१०/-) मागणी केलेली आहे. निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. सदर संयुक्त मोजणीसाठी भूमी अभिलेख कार्यालय, पालम यांना आदेशित करून त्यानुसार दि.१३/०३/२०२४ पासून प्रत्यक्ष संयुक्त मोजणीस सुरुवात झालेली असून, अद्यापपर्यंत जवळपास १३० हे. क्षेत्राची संयुक्त मोजणी पूर्ण झालेली आहे व उर्वरीत क्षेत्राची मोजणी प्रगतीत आहे.

"भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" मधील कलम २६ ते ३० अनुसूची १ मधील तरतुदीनुसार मोबदला निश्चित करण्याबाबत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती नेमण्यात येवून दिनांक १२/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दर निश्चिती करण्यात येते.

मौजे बनवस गावातील एकूण जमिनीचे क्षेत्र १७२५ हे. एवढे असून, संपादित होणारी जमीन १५८.९४ हे. आहे. तसेच गावठाण क्षेत्रातील कोणतेही रहिवासी घरे बुडित क्षेत्रात जात नाहीत. भूसंपादन प्रस्तावाच्या आधारे एकूण ३०८ भूधारकांपैकी जवळपास ७५ भूधारक भूमिहीन होत आहेत. जमीन संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रकल्पग्रस्त दाखला देणेबाबत कार्यवाही करण्यात येते. जागेवर संयुक्त मोजणी करतांना येणारी झाडे, विहीर पाईपलाईन, बांधकामे यांचे मोजणी करुन त्यांचे मूल्यांकन करून त्यानुसार मोबदला देण्यात येईल. बागायती मूल्यांकनाबाबत महसूल विभागातील अभिलेख जसे ७/१२ व पिक पाहणी अहवाल यांचे आधारे "भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" मधील तरतूदींचा विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

सदर धोंड मार्गस्थ जलाशय हा परभणी व नांदेड जिल्ह्याच्या सीमेवर येत असून या प्रकल्पामुळे पालम व लोहा या दुष्काळ प्रवण तालुक्यास सिंचनाचा लाभ होणार आहे. धोंड मार्गस्थ जलाशयामुळे ९.०१ द.ल.घ.मी. इतका पाणीसाठा निर्माण होणार असून, यामुळे लाभक्षेत्रातील १७५० हे. एवढ्या क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

*****************************************************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
तृतीय

**मा. श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८५६ पुढीलप्रमाणे:-**

" गंगाखेड (जिल्हा परभणी) विधानसभा मतदारसंघातील धोंड प्रकल्पासाठी मौजे बनवस तालुका परभणी येथील भूसंपादनासाठी उपअधीक्षक भूमी अभिलेख यांनी भूसंपादन मोजणीची नोटीस येथील रहिवाशांना बजावलेली असणे, या भूसंपादनास मौजे बनवस तालुका पालम येथील शेतकऱ्यांनी आक्षेप नोंदवत अनेक मागण्या केलेल्या असणे, धोंड प्रकल्पासाठी खाजगी जमिनी संपादन करण्यात येत असल्याने या गावातील शेकडो कुटुंबे भूमीहीन होणार असणे, प्रकल्पासाठी बाधित शेतकऱ्यांना देण्यात येणारा मूल्यांकन अहवाल यावा, बाधित शेतकऱ्यांना बाजारभावाने जमिनीला प्रति एकर १५ लक्ष रुपये असणारा भाव विचारात घेऊन त्याच्या सहापट मिळणारा ९० लक्ष एकरी मोबदला द्यावा, मौजे.बनवस या गावातील सर्वच कुटुंबाचे पुनर्वसन व पुनरस्थापना करून या नागरिकांना उपजीविकेसाठी गावातच शेतीसाठी जमीन देऊन बाधित कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी द्यावी, रेडीरेकनरच्या दाराप्रमाणे एकरी १.२५ लक्ष ते १.६० लक्ष दर द्यावेत २०१७ व त्यापूर्वीपासून ओलीताखाली असलेल्या फळबागा, बोरवेल, विहिरीची नोंद असून त्यांचे मूल्यांकन बागायती म्हणून करण्यात यावे, या व अन्य मागण्याची निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री महोदयांना दिलेले असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन**

जायकवाडी प्रकल्प टप्पा -२ अंतर्गत माजलगांव उजवा कालवा कि.मी. १२५ ते १३४ वरील धोंड (बनवस) मार्गस्थ जलाशयाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर योजनेस दि.१६/०७/२००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

धोंड प्रकल्पासाठी मौ. बनवस ता. पालम, जि. परभणी या गावातील एकूण १५८.९४ हेक्टर क्षेत्रासाठी "भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" नुसार संपादित करण्यासाठी जिल्हाधिकारी परभणी यांना प्रस्ताव सादर केला होता. उपविभागीय अधिकारी गंगाखेड यांनी दि.०१/१०/२०२० रोजी कलम-११(१) ची अधिसूचना प्रसिद्ध केली होती. परंतु, "भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" नुसार कलम-११(१) च्या अधिसूचनेस मुदतवाढ देण्याबाबत तरतूद नसल्याने सदरील प्रस्ताव रद्द करून, दि.०३/११/२०२२ रोजी जिल्हाधिकारी परभणी यांना नव्याने फेर प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांनी कलम-११(१) ची अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करण्यापूर्वी

लक्षवेधी सूचना क्रमांक १८८८.

## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये

**श्री.विक्रमसिंह सावंत विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"म्हैसाळ विस्तारीत योजना मंजूर आहे परंतू ही योजना पुर्ण होईपर्यत बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे पुर्व भाग हा पाण्यापासून पुर्ण वंचित राहणार आहे. त्यामुळे कर्नाटक राज्याकडे आपल्या महाराष्ट्र राज्याने सन २०१६ ते २०२१ मध्ये साधारणात: पावणे आठ टी.एम.टी पाणी सोडले आहे तेच पाणी जत तालुक्यातील पुर्व भागास मिळाले तर पुर्व भाग पाण्यापासून वंचित राहणार नाही. आपले पावणे आठ टी.एम.सी पाणी कर्नाटक राज्याने तुबची बबलेश्वर या योजनेतून पावसाळयामध्ये जतच्या पुर्व भागास सोडावे. याबाबत आपल्या राज्याने कर्नाटक राज्याशी समन्वये साधून उन्हाळयामध्ये कर्नाटकास आपण त्यांना माणूसकीचा धर्म या आधाराव सोडण्यात आले आहे ते पाणी त्यांना देवून पावसाळयातील त्यांच्याकडून तुबची बबळेश्वर या योजनेतून आपणांस घेण्यासंबंधी महाराष्ट्रात व कर्नाटक या राज्यात "सामंजस्य करार" झाल्यास पाणी नियमितपणे दिले व घेतले जाऊ शकते याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन.

सांगली जिल्ह्यातील जत या दुष्काळी तालुक्यातील काही भाग मुळ म्हैसाळ योजनेत समाविष्ट असून तालुक्यातील उर्वरीत भाग बारमाही अवर्षणप्रवण आहे. सदर भागास सिंचनाचा लाभ देण्यासाठी म्हैसाळ विस्तारीत जत योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेची शिर्ष कामे जून, २०२५ पर्यंत व मुख्य प्रवाही नलीकेची कामे जून, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

सन २०१८ मध्ये कर्नाटक शासनास सन २०१६ ते २०१८ या कालावधीत दिलेल्या ६.८६५ अघफू पाण्याच्या बदल्यात सांगली जिल्हयातील जत तालुका व सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट तालुक्यास उपलब्ध करून देणेबाबत लोकप्रतिनिधींनी आग्रही मागणी केली होती. तथापी कर्नाटक शासनाने आतापर्यंत केवळ ०.०७८ अघफू पाणी भीमा नदीतून सोलापूर जिल्हयासाठी दिले आहे. यामधील उर्वरीत ६.७८७ अघफू पाणी तुबची बबलेश्वर योजनेतून जत तालुक्यास देण्याबाबत महाराष्ट्र राज्याकडून कर्नाटक राज्यास वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

तथापि कर्नाटक राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव, कर्नाटक राज्य यांनी दि.०८/१०/२०२० अन्वये प्रधान सचिव, जलसंपदा विभाग महाराष्ट्र राज्य यांना तुबची-बबलेश्वर योजनेमधून जत तालुक्यास पाणी देणे तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असल्याचे व त्याऐवजी पर्यायी व्यवस्थेचा, म्हणजेच बेळगांव जिल्हयातील अथनी तालुक्यातील कोरडवाहू जमिनीकरिता कोट्टलबगी-अम्माजेश्वरी या कर्नाटक राज्याकडून प्रस्तावित असलेल्या योजनेचा विचार करणेबाबत कळविले आहे.

तसेच दि.२३/१०/२०२३ व दि.११/०८/२०२३ रोजी जिल्हाधिकारी सांगली यांच्या समवेत झालेल्या बैठकीमध्ये "महाराष्ट्र राज्याने कर्नाटक राज्यास यापूर्वी दिलेल्या पाण्याच्या बदल्यात कर्नाटक राज्याने तुबची-बबलेश्वर योजनेतून पाणी जत तालुक्यास उपलब्ध करुन देणेबाबत मागणी कर्नाटक राज्याकडे करावी" अशी मागणी मा. लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली होती. त्यानुसार, तुबची-बबलेश्वर योजनेतून जत तालुक्यातील गावांना पाणी सोडण्याबाबत अपर मुख्य सचिव (जसं), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावरुन अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, कर्नाटक राज्य यांना दि.२१.०२.२०२४ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये विनंती करण्यात करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत जत तालुक्यामध्ये टंचाईची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने तुबची-बबलेश्वर योजनेमधून १ अघफू पाणी जत तालुक्यातील पांडोझरी, सिध्दनाथ, भिवर्गी, संखनाला व तिकोंडी या ५ तलावांमध्ये सोडल्यास या गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

उपरोक्त प्रमाणे कर्नाटक राज्यास सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये अनुक्रमे २.३६, २.०० व २.५० अघफू पाणी देण्यात आले आहे. कर्नाटक राज्यास सन २०१६ व २०१७ मध्ये सोडलेल्या एकूण ६.८६५ अघफू पाण्यापैकी आत्तापर्यंत केवळ ०.०७८ अघफू पाणी सोलापूर जिल्ह्यासाठी महाराष्ट्र राज्यास परत दिलेले आहे. सन २०२३ च्या उन्हाळी हंगामामध्ये देखील कर्नाटक राज्यास दि.०१/०५/२०२३ ते ०९/०५/२०२३ या कालावधीमध्ये १ अघफू पाणी देण्यात आले होते. यापूर्वी कर्नाटक राज्यास देण्यात आलेल्या पाण्यापैकी महाराष्ट्र राज्यास परत देण्याचे उर्वरीत राहिलेले ६.७८७ अघफू व मे, २०२३ मध्ये कर्नाटक राज्यासाठी सोडलेले १.० अघफू असे एकूण ७.७८७ पाणी कर्नाटक राज्याकडून महाराष्ट्र राज्यास परत मिळणे आवश्यक आहे. याबाबत कर्नाटक राज्यासमवेत चर्चा करून पुढील दिशा निश्चित करण्याचे नियोजन आहे.

*********

तसेच दि.२३/१०/२०२३ व दि.११/०८/२०२३ रोजी जिल्हाधिकारी सांगली यांच्या समवेत झालेल्या बैठकीमध्ये "महाराष्ट्र राज्याने कर्नाटक राज्यास यापूर्वी दिलेल्या पाण्याच्या बदल्यात कर्नाटक राज्याने तुबची-बबलेश्वर योजनेतून पाणी जत तालुक्यास उपलब्ध करुन देणेबाबत मागणी कर्नाटक राज्याकडे करावी" अशी मागणी मा. लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली होती. त्यानुसार, तुबची-बबलेश्वर योजनेतून जत तालुक्यातील गावांना पाणी सोडण्याबाबत अपर मुख्य सचिव (जसं), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावरुन अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, कर्नाटक राज्य यांना दि.२१.०२.२०२४ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये विनंती करण्यात करण्यात आली आहे.

सद्यःस्थितीत जत तालुक्यामध्ये टंचाईची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने तुबची-बबलेश्वर योजनेमधून १ अघफू पाणी जत तालुक्यातील पांडोझरी, सिध्दनाथ, भिवर्गी, संखनाला व तिकोंडी या ५ तलावांमध्ये सोडल्यास या गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

उपरोक्त प्रमाणे कर्नाटक राज्यास सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये अनुक्रमे २.३६, २.०० व २.५० अघफू पाणी देण्यात आले आहे. कर्नाटक राज्यास सन २०१६ व २०१७ मध्ये सोडलेल्या एकूण ६.८६५ अघफू पाण्यापैकी आत्तापर्यंत केवळ ०.०७८ अघफू पाणी सोलापूर जिल्ह्यासाठी महाराष्ट्र राज्यास परत दिलेले आहे. सन २०२३ च्या उन्हाळी हंगामामध्ये देखील कर्नाटक राज्यास दि.०१/०५/२०२३ ते ०९/०५/२०२३ या कालावधीमध्ये १ अघफू पाणी देण्यात आले होते. यापूर्वी कर्नाटक राज्यास देण्यात आलेल्या पाण्यापैकी महाराष्ट्र राज्यास परत देण्याचे उर्वरीत राहिलेले ६.७८७ अघफू व मे, २०२३ मध्ये कर्नाटक राज्यासाठी सोडलेले १.० अघफू असे एकूण ७.७८७ पाणी कर्नाटक राज्याकडून महाराष्ट्र राज्यास परत मिळणे आवश्यक आहे. याबाबत कर्नाटक राज्यासमवेत चर्चा करून पुढील दिशा निश्चित करण्याचे नियोजन आहे.

*********

लक्षवेधी सूचना क्रमांक १८८८.

## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये

**श्री.विक्रमसिंह सावंत विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"म्हैसाळ विस्तारीत योजना मंजूर आहे परंतू ही योजना पुर्ण होईपर्यत बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे पुर्व भाग हा पाण्यापासून पुर्ण वंचित राहणार आहे. त्यामुळे कर्नाटक राज्याकडे आपल्या महाराष्ट्र राज्याने सन २०१६ ते २०२१ मध्ये साधारणात: पावणे आठ टी.एम.टी पाणी सोडले आहे तेच पाणी जत तालुक्यातील पुर्व भागास मिळाले तर पुर्व भाग पाण्यापासून वंचित राहणार नाही. आपले पावणे आठ टी.एम.सी पाणी कर्नाटक राज्याने तुबची बबलेश्वर या योजनेतून पावसाळयामध्ये जतच्या पुर्व भागास सोडावे. याबाबत आपल्या राज्याने कर्नाटक राज्याशी समन्वये साधून उन्हाळयामध्ये कर्नाटकास आपण त्यांना माणूसकीचा धर्म या आधाराव सोडण्यात आले आहे ते पाणी त्यांना देवून पावसाळयातील त्यांच्याकडून तुबची बबळेश्वर या योजनेतून आपणांस घेण्यासंबंधी महाराष्ट्रात व कर्नाटक या राज्यात "सामंजस्य करार" झाल्यास पाणी नियमितपणे दिले व घेतले जाऊ शकते याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन.

सांगली जिल्ह्यातील जत या दुष्काळी तालुक्यातील काही भाग मुळ म्हैसाळ योजनेत समाविष्ट असून तालुक्यातील उर्वरीत भाग बारमाही अवर्षणप्रवण आहे. सदर भागास सिंचनाचा लाभ देण्यासाठी म्हैसाळ विस्तारीत जत योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेची शिर्ष कामे जून, २०२५ पर्यंत व मुख्य प्रवाही नलीकेची कामे जून, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

सन २०१८ मध्ये कर्नाटक शासनास सन २०१६ ते २०१८ या कालावधीत दिलेल्या ६.८६५ अघफू पाण्याच्या बदल्यात सांगली जिल्हयातील जत तालुका व सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट तालुक्यास उपलब्ध करून देणेबाबत लोकप्रतिनिधींनी आग्रही मागणी केली होती. तथापी कर्नाटक शासनाने आतापर्यंत केवळ ०.०७८ अघफू पाणी भीमा नदीतून सोलापूर जिल्हयासाठी दिले आहे. यामधील उर्वरीत ६.७८७ अघफू पाणी तुबची बबलेश्वर योजनेतून जत तालुक्यास देण्याबाबत महाराष्ट्र राज्याकडून कर्नाटक राज्यास वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

तथापि कर्नाटक राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव, कर्नाटक राज्य यांनी दि.०८/१०/२०२० अन्वये प्रधान सचिव, जलसंपदा विभाग महाराष्ट्र राज्य यांना तुबची-बबलेश्वर योजनेमधून जत तालुक्यास पाणी देणे तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असल्याचे व त्याऐवजी पर्यायी व्यवस्थेचा, म्हणजेच बेळगांव जिल्हयातील अथनी तालुक्यातील कोरडवाहू जमिनीकरिता कोट्टलबगी-अम्माजेश्वरी या कर्नाटक राज्याकडून प्रस्तावित असलेल्या योजनेचा विचार करणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७८५ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित अंतर्गत वीज निर्मिती करण्याकरिता मोठ्या प्रमाणात कोळश्याच्या वापर करण्यात येणे, नागपूर जिल्ह्यातील औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा मार्फत जळालेल्या कोळश्याची राख विसर्जित करण्यात येणे, त्याकरिता राख विसर्जन प्रकल्प उभारण्याकरिता नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील नांदगाव व बखारी गावांच्या परिसरातील ८०० ते ९०० एकर शेतजमीनी शासनाने अत्यंत कमी दरात संपादित करणे, या प्रकल्पाने एकूण १३७ कुटुंबे प्रकल्पग्रस्त होणे, मोबदला कमी असल्याने राख विसर्जन प्रकल्पाचे काम प्रकल्पग्रस्तांकडून थांबविण्यात येणे, वाढीव मोबदला देण्याबाबत तत्कालीन उपमुख्यमंत्री व ऊर्जा मंत्र्यांनी निर्णय घेणे, मात्र प्रकल्पाचे काम पुर्ण होऊनही प्रकल्पग्रस्तांना वाढीव मोबदला न मिळणे, संपादित जमीनीच्या बदल्यात १२ प्रकल्पग्रस्तांना महाजनकोने थेट नोकरी सामावून घेणे, अनेक वर्षे लोटुनही उर्वरित १२५ प्रकल्पग्रस्त कुटुंबे नोकरीपासून वंचित असणे, प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचे वारंवार आश्वासन देण्यात येणे, नोकरी देण्यात न आल्याने व शेतजमीनी संपादित झाल्याने उदरनिर्वाहाचे स्त्रोत हरविणे, वाढत्या महागाईत कुटुंबातील प्रपंच चालविण्याबाबत प्रकल्पग्रस्तांना उद्भलेले प्रश्न, अनेक प्रकल्पग्रस्तांचे वय बाद होणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाविरोधात निर्माण झालेला प्रचंड असंतोष, नांदगाव-बखारी राख विसर्जन प्रकल्पाने ग्रस्त कुटुंबियांना वाढीव मोबदला व नोकरी देण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा येथे कोळसा आधारीत ५०० मेगा वॅट विद्युत निर्मिती संच असून त्यासाठी अंदाजे ८६०० मेट्रिक टन प्रती दिवस कोळश्याचा वापर केला जातो. त्यातून निर्माण होणाऱ्या राखेचे व्यवस्थापन करण्यासाठी भूसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत नागपूर जिल्हयातील पारशिवनी तालुक्यातील नांदगाव बखारी गावासह सहा गावातील एकूण ६२०.३८ एकर क्षेत्र जमीन संपादनाची सुरुवात सन १९९६-९८ पासून करण्यात येऊन सन २००१-२००३ या कालावधीत संपादन पुर्ण करण्यात आले. यात नांदगाव येथील १३८.०५ हेक्टर व बखारी येथील ९६.१६ हेक्टरचा समावेश आहे.

सदरील जमिनींचे संपादन भूसंपादन अधिनियम १८९४ नुसार तत्कालीन भूसंपादन अधिकारी, नागपूर यांनी ठरवून दिलेल्या दरांनुसार मोबदला देऊन करण्यात आले आहे. यामध्ये नांदगाव गावातील ८५ प्रकल्पग्रस्तांना रु. २.०४ कोटी, बखारी गावातील ५५ प्रकल्पग्रस्तांना १.२४ कोटी व इतर ४ गावातील ७९ प्रकल्पग्रस्तांना रु.०.२३ कोटी असे २१९ प्रकल्पग्रस्तांना एकुण रू. ३.५१ कोटी इतकी रक्कम विशेष भूसंपादन अधिकारी (सामान्य) नागपूर यांचेमार्फत संबंधितांना अदा करण्यात आलेली आहे.

प्रकल्पग्रस्तांकडून वेळोवेळी वाढीव मोबदल्याच्या मागण्या होत होत्या. तसेच लोकप्रतिनिधीसोबत मागण्या व बैठकांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नागपूर यांनी याबाबत दिनांक ०१.०८.२०१२ च्या पत्रान्वये ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासनास अहवाल सादर केला होता. सदरील अहवालाच्या अनुषंगाने ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पत्र दिनांक २२.०८.२०१३ अन्वये महानिर्मिती कंपनीने संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला देण्याचा प्रस्ताव शासनाने अमान्य केला असल्याबाबत कळविले. तद्नंतर नांदगाव-बखारी येथील राख साठवणूक बंधाऱ्याच्या कामासाठी अधिग्रहीत केलेल्या (भूसंपादित) जमिनीच्या वाढीव मोबदल्यासंदर्भात तत्कालीन मा.मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०५.२०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने, प्रस्ताव महसूल व वन विभागास सादर करण्यात आला. सदर जमीन ही सन २००३ साली भुसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत संपादित केली असल्याने वाढीव मोबदल्यासाठी अधिनियमाच्या तरतुदीनुसार न्यायालयात अर्ज दाखल करुन घ्यावा लागत असल्याने, मा. न्यायालयात दाखल असलेल्या भूसंदर्भ प्रकरणे, लोक न्यायालयाद्वारे निकाली काढण्याबाबत महसूल व वन विभागाचा प्राप्त सल्ला ऊर्जा विभागाव्दारे महानिर्मितीस दिनांक २८.०२.२०२३ च्या पत्रांन्वये अवगत करण्यात आला आहे. दरम्यान श्री रमेश मोतीराम माहुरकर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ७७/२०२० दाखल केली होती. मा. न्यायालयाकडून शासनाची भूमिका विचारात घेऊन याचिका खारीज करण्यात आली आहे. तसेच ज्या ३१ प्रकल्पग्रस्तांनी वाढीव मोबदला मिळण्याबाबत मा. दिवाणी न्यायालय रामटेक, जिल्हा नागपूर येथे दिवाणी खटला दाखल केला होता, त्यापैकी ०३ प्रकल्पग्रस्तांच्या प्रकरणी वाढीव मोबदला देण्याबाबत मा. दिवाणी न्यायालयाने निर्णय दिला असून उर्वरित २८ शेतकऱ्यांच्या वाढीव मोबदल्याबाबतची प्रकरणे सद्यःस्थितीत मा. दिवाणी न्यायालय रामटेक, जिल्हा नागपूर यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. न्याय निर्णयानुसार ३ प्रकल्पग्रस्तांना वाढीव मोबदला देण्यात आला आहे.

दिनांक १३.११.२०२१ रोजी पासून नांदगाव राख बंधारा औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा येथील प्रकल्पासाठी वापरावयास सुरुवात केली होती. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून दिनांक ०१.०२.२०२२ रोजीच्या प्राप्त सूचनेनुसार महानिर्मितीद्वारे दिनांक ०४.०२.२०२२ पासून नांदगाव राख बंधाऱ्याचा वापर बंद करण्यात येऊन वारेगाव राख बंधारा येथे राखेचे व्यवस्थापन करण्यात येत आहे.

महानिर्मिती कंपनीकडून महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्तांसाठी विविध योजना राबविण्यात येत असतात. त्यानुसार आयटीआय अर्हताधारक प्रकल्पग्रस्तांच्या प्रशिक्षणाच्या काळात त्यांना प्रतिमाह रुपये १४००० ते १६००० रुपये विद्यावेतन अदा करण्यात येते. तसेच विगर आयटीआय अर्हताधारक प्रकल्पग्रस्तांसाठी देखील "सर्व समावेशक प्रगत कुशल व प्रशिक्षण योजना" अंतर्गत प्रकल्पग्रस्तांना प्रतिमाह शैक्षणिक अहर्तेनुसार रुपये १४००० ते १६००० प्रतिमाह विद्यावेतन अदा करण्यात येते. त्यात प्रतिवर्ष रुपये ५००/- वाढ करण्यात येते. याशिवाय आयटीआय अर्हता धारक पात्र प्रगत कुशल प्रशिक्षणार्थीसाठी महानिर्मिती कंपनीच्या तंत्रज्ञ -३ पदासाठीच्या सरळ सेवा भरती अंतर्गत रिक्त पदांपैकी ५०% टक्के पदे ही राखीव ठेवण्यात येतात. सदरील प्रकल्पग्रस्तांना प्रशिक्षणाच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी ५ गुण असे कमाल २५ गुण सरळसेवा भरतीवेळी बहाल करण्यात येतात. याशिवाय सर्वसमावेशक योजने अंतर्गत रुजू करून घेण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्तांना अतांत्रिक पदाच्या भरतीवेळी प्रशिक्षणाच्या प्रत्येक वर्षासाठी किमान ५ गुण असे कमाल २५ गुण सरळ सेवा भरती वेळी अतिरिक्त बहाल करण्यात येतात.

प्रकल्पग्रस्तांकडून वेळोवेळी वाढीव मोबदल्याच्या मागण्या होत होत्या. तसेच लोकप्रतिनिधीसोबत मागण्या व बैठकांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नागपूर यांनी याबाबत दिनांक ०१.०८.२०१२ च्या पत्रान्वये ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासनास अहवाल सादर केला होता. सदरील अहवालाच्या अनुषंगाने ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पत्र दिनांक २२.०८.२०१३ अन्वये महानिर्मिती कंपनीने संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला देण्याचा प्रस्ताव शासनाने अमान्य केला असल्याबाबत कळविले. तद्नंतर नांदगाव-बखारी येथील राख साठवणूक बंधाऱ्याच्या कामासाठी अधिग्रहीत केलेल्या (भूसंपादित) जमिनीच्या वाढीव मोबदल्यासंदर्भात तत्कालीन मा.मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०५.२०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने, प्रस्ताव महसूल व वन विभागास सादर करण्यात आला. सदर जमीन ही सन २००३ साली भुसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत संपादित केली असल्याने वाढीव मोबदल्यासाठी अधिनियमाच्या तरतुदीनुसार न्यायालयात अर्ज दाखल करुन घ्यावा लागत असल्याने, मा. न्यायालयात दाखल असलेल्या भूसंदर्भ प्रकरणे, लोक न्यायालयाद्वारे निकाली काढण्याबाबत महसूल व वन विभागाचा प्राप्त सल्ला ऊर्जा विभागाव्दारे महानिर्मितीस दिनांक २८.०२.२०२३ च्या पत्रांन्वये अवगत करण्यात आला आहे. दरम्यान श्री रमेश मोतीराम माहुरकर यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ७७/२०२० दाखल केली होती. मा. न्यायालयाकडून शासनाची भूमिका विचारात घेऊन याचिका खारीज करण्यात आली आहे. तसेच ज्या ३१ प्रकल्पग्रस्तांनी वाढीव मोबदला मिळण्याबाबत मा. दिवाणी न्यायालय रामटेक, जिल्हा नागपूर येथे दिवाणी खटला दाखल केला होता, त्यापैकी ०३ प्रकल्पग्रस्तांच्या प्रकरणी वाढीव मोबदला देण्याबाबत मा. दिवाणी न्यायालयाने निर्णय दिला असून उर्वरित २८ शेतकऱ्यांच्या वाढीव मोबदल्याबाबतची प्रकरणे सद्यःस्थितीत मा. दिवाणी न्यायालय रामटेक, जिल्हा नागपूर यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. न्याय निर्णयानुसार ३ प्रकल्पग्रस्तांना वाढीव मोबदला देण्यात आला आहे.

दिनांक १३.११.२०२१ रोजी पासून नांदगाव राख बंधारा औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा येथील प्रकल्पासाठी वापरावयास सुरुवात केली होती. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून दिनांक ०१.०२.२०२२ रोजीच्या प्राप्त सूचनेनुसार महानिर्मितीद्वारे दिनांक ०४.०२.२०२२ पासून नांदगाव राख बंधाऱ्याचा वापर बंद करण्यात येऊन वारेगाव राख बंधारा येथे राखेचे व्यवस्थापन करण्यात येत आहे.

महानिर्मिती कंपनीकडून महानिर्मिती कंपनीच्या पात्र प्रकल्पग्रस्तांसाठी विविध योजना राबविण्यात येत असतात. त्यानुसार आयटीआय अर्हताधारक प्रकल्पग्रस्तांच्या प्रशिक्षणाच्या काळात त्यांना प्रतिमाह रुपये १४००० ते १६००० रुपये विद्यावेतन अदा करण्यात येते. तसेच विगर आयटीआय अर्हताधारक प्रकल्पग्रस्तांसाठी देखील "सर्व समावेशक प्रगत कुशल व प्रशिक्षण योजना" अंतर्गत प्रकल्पग्रस्तांना प्रतिमाह शैक्षणिक अहर्तेनुसार रुपये १४००० ते १६००० प्रतिमाह विद्यावेतन अदा करण्यात येते. त्यात प्रतिवर्ष रुपये ५००/- वाढ करण्यात येते. याशिवाय आयटीआय अर्हता धारक पात्र प्रगत कुशल प्रशिक्षणार्थींसाठी महानिर्मिती कंपनीच्या तंत्रज्ञ -३ पदासाठीच्या सरळ सेवा भरती अंतर्गत रिक्त पदांपैकी ५०% टक्के पदे ही राखीव ठेवण्यात येतात. सदरील प्रकल्पग्रस्तांना प्रशिक्षणाच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी ५ गुण असे कमाल २५ गुण सरळसेवा भरतीवेळी बहाल करण्यात येतात. याशिवाय सर्वसमावेशक योजने अंतर्गत रुजू करून घेण्यात आलेल्या प्रकल्पग्रस्तांना अतांत्रिक पदाच्या भरतीवेळी प्रशिक्षणाच्या प्रत्येक वर्षासाठी किमान ५ गुण असे कमाल २५ गुण सरळ सेवा भरती वेळी अतिरिक्त बहाल करण्यात येतात.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७८५ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित अंतर्गत वीज निर्मिती करण्याकरिता मोठ्या प्रमाणात कोळश्याच्या वापर करण्यात येणे, नागपूर जिल्ह्यातील औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा मार्फत जळालेल्या कोळश्याची राख विसर्जित करण्यात येणे, त्याकरिता राख विसर्जन प्रकल्प उभारण्याकरिता नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील नांदगाव व बखारी गावांच्या परिसरातील ८०० ते ९०० एकर शेतजमीनी शासनाने अत्यंत कमी दरात संपादित करणे, या प्रकल्पाने एकूण १३७ कुटुंबे प्रकल्पग्रस्त होणे, मोबदला कमी असल्याने राख विसर्जन प्रकल्पाचे काम प्रकल्पग्रस्तांकडून थांबविण्यात येणे, वाढीव मोबदला देण्याबाबत तत्कालीन उपमुख्यमंत्री व ऊर्जा मंत्र्यांनी निर्णय घेणे, मात्र प्रकल्पाचे काम पुर्ण होऊनही प्रकल्पग्रस्तांना वाढीव मोबदला न मिळणे, संपादित जमीनीच्या बदल्यात १२ प्रकल्पग्रस्तांना महाजनकोने थेट नोकरी सामावून घेणे, अनेक वर्षे लोटुनही उर्वरित १२५ प्रकल्पग्रस्त कुटुंबे नोकरीपासून वंचित असणे, प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचे वारंवार आश्वासन देण्यात येणे, नोकरी देण्यात न आल्याने व शेतजमीनी संपादित झाल्याने उदरनिर्वाहाचे स्त्रोत हरविणे, वाढत्या महागाईत कुटुंबातील प्रपंच चालविण्याबाबत प्रकल्पग्रस्तांना उद्भलेले प्रश्न, अनेक प्रकल्पग्रस्तांचे वय बाद होणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाविरोधात निर्माण झालेला प्रचंड असंतोष, नांदगाव-बखारी राख विसर्जन प्रकल्पाने ग्रस्त कुटुंबियांना वाढीव मोबदला व नोकरी देण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडा येथे कोळसा आधारीत ५०० मेगा वॅट विद्युत निर्मिती संच असून त्यासाठी अंदाजे ८६०० मेट्रिक टन प्रती दिवस कोळश्याचा वापर केला जातो. त्यातून निर्माण होणाऱ्या राखेचे व्यवस्थापन करण्यासाठी भूसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत नागपूर जिल्हयातील पारशिवनी तालुक्यातील नांदगाव बखारी गावासह सहा गावातील एकूण ६२०.३८ एकर क्षेत्र जमीन संपादनाची सुरुवात सन १९९६-९८ पासून करण्यात येऊन सन २००१-२००३ या कालावधीत संपादन पुर्ण करण्यात आले. यात नांदगाव येथील १३८.०५ हेक्टर व बखारी येथील ९६.१६ हेक्टरचा समावेश आहे.

सदरील जमिनींचे संपादन भूसंपादन अधिनियम १८९४ नुसार तत्कालीन भूसंपादन अधिकारी, नागपूर यांनी ठरवून दिलेल्या दरांनुसार मोबदला देऊन करण्यात आले आहे. यामध्ये नांदगाव गावातील ८५ प्रकल्पग्रस्तांना रु. २.०४ कोटी, बखारी गावातील ५५ प्रकल्पग्रस्तांना १.२४ कोटी व इतर ४ गावातील ७९ प्रकल्पग्रस्तांना रु.०.२३ कोटी असे २१९ प्रकल्पग्रस्तांना एकुण रू. ३.५१ कोटी इतकी रक्कम विशेष भूसंपादन अधिकारी (सामान्य) नागपूर यांचेमार्फत संबंधितांना अदा करण्यात आलेली आहे.

प्रशिक्षणाच्या कालावधीत ज्या प्रकल्पग्रस्तांचे वय ४५ वर्ष म्हणजेच शासकीय नोकरीत रुजू होण्याच्या कमाल वयोमर्यादेपेक्षा अधिक होते, अशा प्रकल्पग्रस्तांसाठी देखील निर्वाह भत्ताधारक प्रशिक्षण योजना राबविण्यात येते. त्यानुसार सदरील प्रकल्पग्रस्ताने विनंती सादर केल्यास महानिर्मिती कंपनीकडून सदर प्रशिक्षणार्थीस नोकरीच्या बदल्यात वयाच्या ५८ वर्षापर्यंत प्रगत कुशल प्रशिक्षण देण्यात येते. सदरील प्रशिक्षण कालावधीत प्रकल्पग्रस्तास प्रतिमाह रुपये १६०००/- निर्वाह भत्ता आणि त्यात वार्षिक रुपये ५००/- ची वाढ अशी अदा करण्यात येते.

औष्णिक विद्युत केंद्र, खापरखेडाच्या राख बंधारा उभारणीमुळे नांदगाव येथील ८५, बखारी येथील ५५, गरांडा येथील २८, हिंगणा येथील २३, साहोली येथील १० आणि सिंगोरी येथील १८ असे एकूण प्रकल्पग्रस्तांची संख्या २१९ आहे. महानिर्मिती तर्फे आतापर्यंत राख बंधाऱ्यासाठी संपादित केलेल्या एकूण २१९ प्रकल्पग्रस्तांपैकी २९ प्रकल्पग्रस्तांना तंत्रज्ञः३ पदावर व ४६ प्रकल्पग्रस्तांना प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी असे एकुण ७५ प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्यात आले आहे. त्यापैकी नांदगाव व बखारी येथील १४० प्रकल्पग्रस्तापैकी ५६ प्रकल्पग्रस्तांना (२८- तंत्रज्ञः३ पदावर व २८- प्रगत कुशल ) प्रशिक्षणार्थी म्हणून सामावून घेतले आहे. याशिवाय साहोली गावातील-४, गरांडा गावातील-१, सिंगोरी गावातील-१ प्रकल्पग्रस्तांनी प्रगत कुशल / सर्वसमावेशक योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थी म्हणून अर्ज दाखल केलेले असून त्यांना सामावून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच उर्वरित प्रकल्पग्रस्तांनी प्रगतकुशल योजने अंतर्गत प्रशिक्षणासाठी अर्ज सादर केल्यानंतर महानिर्मितीच्या या संदर्भातील वरील धोरणानुसार त्यांच्या पात्रता, अनुज्ञेयतेनुसार त्यांना रुजू करून घेण्याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

...................

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती लताबाई सोनवणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०६१ पुढीलप्रमाणे आहे:-

" धानोरा १३२ के.व्ही. स्टेशनचे काम मंजूर असून Mesars Bhuvneshwari electrical & amp; Contractor यांना या कामाचा दि. १ एप्रिल, २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असणे, तद्नंतर ही सदरचे कंत्राटदार काम सुरु करण्यास टाळाटाळ करत असणे, सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता (प्रकल्प) अउदा बांधकाम विभाग म.रा. विद्युत पारेषण कंपनी, मर्यादित जळगांव, व कार्यकारी अभियंता (स्था.) अउदा स्था. बां.व.सु. विभाग, जळगांव यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिधींनी वारंवार तोंडी व लेखी सुचना देवूनही संबंधीतांनी कार्यवाहीस होत असलेले दुर्लक्ष व कंत्राटदारास पाठीशी घालण्यात येणे, तथापी कार्यकारी अभियंता (स्था.) अउदा स्था. बां.व.सु. विभाग, जळगांव यांनी दि. ३१.१०.२०२३ रोजी चे पत्राद्वारे संबंधीत कंत्राटदार यांनी वैयक्तिक अडचणीमुळे हे काम करण्यास असमर्थता दर्शवून काम वेळे आधी बंद करण्याबाबत विनंती केलेली असणे, तसेच सदरचा कंत्राट रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यालय महापारेषण मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेली असणे, शासनाने उक्त प्रकरणी संबंधित अधिका-यांची व ठेकेदाराची चौकशी करुन दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच धानोरा १३२ के.व्ही. स्टेशनचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना..."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

जळगांव जिल्ह्याच्या चोपडा तालुक्यातील विद्यमान व भविष्यातील संभाव्य वीज भाराची पूर्तता करण्यासाठी व योग्य दाबाने अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी धानोरा येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्यास महापारेषण कंपनीतर्फे दिनांक २९.०५.२०२० रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर योजनेत २ x ५० एम.व्ही.ए (मेगा व्होल्ट ॲम्पियर), १३२/३३ के.व्ही. रोहित्रे उभारणे, १३२ के.व्ही. यावल-चोपडा एकपथ वाहिनीचे द्विपथ वाहिनीत रुपांतरण करणे, १३२ के.व्ही. यावल-चोपडा वाहिनीच्या एका पथावर नियोजित १३२ के.व्ही. धानोरा उपकेंद्रासाठी लिलो पद्धतीने वाहिनी उभारणे - ४ (कि.मी.), ३३ के.व्ही. आऊटलेट्स उभारणे - ८ (संख्या) व १३२ के.व्ही., १५ एम.व्ही.ए.आर कॅपॅसिटर बँक उभारणे - २ (संख्या) या कामाचा समावेश आहे.

उपकेंद्र उभारणीसाठी ४.५४ हेक्टर शासकीय जमीन माहे मे, २०१९ पासून महापारेषण कंपनीच्या ताब्यात असून उपकेंद्राच्या प्रस्तावास मा. वीज नियामक आयोगाची मंजुरी ई-पत्र दिनांक २१.०७.२०२१ अन्वये प्राप्त झाली. तद्नुसार महापारेषणद्वारा निविदा प्रक्रिया राबविण्यात आली व कंत्राटदार मे. भुवनेश्वरी, नंदुरबार यांना दिनांक ०१.०४.२०२२ अन्वये कार्यादेश देण्यात आला. दिनांक २५.०४.२०२२ रोजी उपकेंद्र उभारणीसाठीची जमीन कंत्राटदाराच्या ताब्यात प्रत्यक्ष काम सुरु करण्याकरिता देण्यात आली. तथापि, काम सुरु झाल्यानंतर स्थानिक पातळीवर कामास वारंवार होणाऱ्या प्रखर विरोधामुळे प्रत्यक्ष काम सुरु करण्यास विलंब झाला.

दरम्यान काम सुरु असताना दिनांक १५.०३.२०२३ रोजी काही अज्ञात इसमांनी, कंत्राटदाराच्या कामगारांना मारहाण करून काम बंद पाडले. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांच्यासमवेत महापारेषण कंपनीने बैठक घेऊन काम सुरु करण्यासाठी मदत करण्याबाबत पाठपुरावा केला. तसेच काम पुन्हा सुरु ठेवण्यासाठी महापारेषण कंपनीतर्फे मा. जिल्हाधिकारी जळगाव यांना दिनांक २८.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक रहिवाश्यांना त्यांच्या स्तरावर सहकार्य करण्याकरिता निर्देश देण्याबाबत विनंती करण्यात आली. त्याचबरोबर दिनांक २३.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पोलीस संरक्षण मिळण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाला विनंती करण्यात आली.

वस्तुस्थितीनुसार कंत्राटदार मे. भुवनेश्वरी यांनी त्यांच्या कामात कोणतीही टाळाटाळ अथवा दुर्लक्ष केलेले दिसत नसून महापारेषण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना पाठिशी घालण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच या संपूर्ण प्रकरणात संबंधित कंत्राटदार अथवा महापारेषण कंपनीचे अधिकारी यांचा दोष नाही.

मे. भुवनेश्वरी यांना १३२ के.व्ही. धानोरा उपकेंद्र व्यतिरिक्त बिबवेवाडी, जि. पुणे येथे १३२/२२ के.व्ही. उपकेंद्राचे कामही दिनांक ३०.०६.२०२२ रोजी आदेशीत करण्यात आले होते. १३२ के.व्ही. बिबवेबाडी उपकेंद्रात ५० एम.व्ही.ए, १३२/२२ केव्ही चे एक रोहित्र दिनांक २९.०३.२०२४ रोजी कार्यान्वित झाले असून दुसऱ्या रोहित्राचे काम प्रगतीपथावर आहे.

सुरुवातीपासून कामास होणारा अत्यंतीक विरोध व धमक्यांमुळे कंत्राटदार मे. भुवनेश्वरी यांनी कंत्राट मुदतपूर्व थांबविण्याबाबत स्थानिक कार्यालयास केलेल्या विनंतीस अनुसरुन स्थानिक कार्यालयाने सदर कंत्राट मुदतपूर्व थांबविण्याचा प्रस्ताव सांघिक कार्यालयास पाठवलेला आहे. सांघिक कार्यालयाने सदर कंत्राटदाराशी संवाद साधून त्यास सदर काम पुर्ण करण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

******************

दरम्यान काम सुरु असताना दिनांक १५.०३.२०२३ रोजी काही अज्ञात इसमांनी, कंत्राटदाराच्या कामगारांना मारहाण करून काम बंद पाडले. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांच्यासमवेत महापारेषण कंपनीने बैठक घेऊन काम सुरु करण्यासाठी मदत करण्याबाबत पाठपुरावा केला. तसेच काम पुन्हा सुरु ठेवण्यासाठी महापारेषण कंपनीतर्फे मा. जिल्हाधिकारी जळगाव यांना दिनांक २८.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक रहिवाश्यांना त्यांच्या स्तरावर सहकार्य करण्याकरिता निर्देश देण्याबाबत विनंती करण्यात आली. त्याचबरोबर दिनांक २३.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पोलीस संरक्षण मिळण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाला विनंती करण्यात आली.

वस्तुस्थितीनुसार कंत्राटदार मे. भुवनेश्वरी यांनी त्यांच्या कामात कोणतीही टाळाटाळ अथवा दुर्लक्ष केलेले दिसत नसून महापारेषण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना पाठिशी घालण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच या संपूर्ण प्रकरणात संबंधित कंत्राटदार अथवा महापारेषण कंपनीचे अधिकारी यांचा दोष नाही.

मे. भुवनेश्वरी यांना १३२ के.व्ही. धानोरा उपकेंद्र व्यतिरिक्त बिबवेवाडी, जि. पुणे येथे १३२/२२ के.व्ही. उपकेंद्राचे कामही दिनांक ३०.०६.२०२२ रोजी आदेशीत करण्यात आले होते. १३२ के.व्ही. बिबवेवाडी उपकेंद्रात ५० एम.व्ही.ए, १३२/२२ केव्ही चे एक रोहित्र दिनांक २९.०३.२०२४ रोजी कार्यान्वित झाले असून दुसऱ्या रोहित्राचे काम प्रगतीपथावर आहे.

सुरुवातीपासून कामास होणारा अत्यंतीक विरोध व धमक्यांमुळे कंत्राटदार मे. भुवनेश्वरी यांनी कंत्राट मुदतपूर्व थांबविण्याबावत स्थानिक कार्यालयास केलेल्या विनंतीस अनुसरुन स्थानिक कार्यालयाने सदर कंत्राट मुदतपूर्व थांबविण्याचा प्रस्ताव सांघिक कार्यालयास पाठवलेला आहे. सांघिक कार्यालयाने सदर कंत्राटदाराशी संवाद साधून त्यास सदर काम पुर्ण करण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

******************

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती लताबाई सोनवणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०६१ पुढीलप्रमाणे आहे:-

" धानोरा १३२ के.व्ही. स्टेशनचे काम मंजूर असून Mesars Bhuvneshwari electrical & amp; Contractor यांना या कामाचा दि. १ एप्रिल, २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असणे, तद्नंतर ही सदरचे कंत्राटदार काम सुरु करण्यास टाळाटाळ करत असणे, सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता (प्रकल्प) अउदा बांधकाम विभाग म.रा. विद्युत पारेषण कंपनी, मर्यादित जळगांव, व कार्यकारी अभियंता (स्था.) अउदा स्था. बां.व.सु. विभाग, जळगांव यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिधींनी वारंवार तोंडी व लेखी सुचना देवूनही संबंधीतांनी कार्यवाहीस होत असलेले दुर्लक्ष व कंत्राटदारास पाठीशी घालण्यात येणे, तथापी कार्यकारी अभियंता (स्था.) अउदा स्था. बां.व.सु. विभाग, जळगांव यांनी दि. ३१.१०.२०२३ रोजी चे पत्राद्वारे संबंधीत कंत्राटदार यांनी वैयक्तिक अडचणीमुळे हे काम करण्यास असमर्थता दर्शवून काम वेळे आधी बंद करण्याबाबत विनंती केलेली असणे, तसेच सदरचा कंत्राट रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यालय महापारेषण मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेली असणे, शासनाने उक्त प्रकरणी संबंधित अधिका-यांची व ठेकेदाराची चौकशी करुन दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच धानोरा १३२ के.व्ही. स्टेशनचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना..."

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री ( ऊर्जा ) यांचे निवेदन

जळगांव जिल्ह्याच्या चोपडा तालुक्यातील विद्यमान व भविष्यातील संभाव्य वीज भाराची पूर्तता करण्यासाठी व योग्य दाबाने अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी धानोरा येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्यास महापारेषण कंपनीतर्फे दिनांक २९.०५.२०२० रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर योजनेत २ x ५० एम.व्ही.ए (मेगा व्होल्ट ॲम्पियर), १३२/३३ के.व्ही. रोहित्रे उभारणे, १३२ के.व्ही. यावल-चोपडा एकपथ वाहिनीचे द्विपथ वाहिनीत रुपांतरण करणे, १३२ के.व्ही. यावल-चोपडा वाहिनीच्या एका पथावर नियोजित १३२ के.व्ही. धानोरा उपकेंद्रासाठी लिलो पद्धतीने वाहिनी उभारणे - ४ (कि.मी.), ३३ के.व्ही. आऊटलेट्स उभारणे - ८ (संख्या) व १३२ के.व्ही., १५ एम.व्ही.ए.आर कपॅसिटर बँक उभारणे - २ (संख्या) या कामाचा समावेश आहे.

उपकेंद्र उभारणीसाठी ४.५४ हेक्टर शासकीय जमीन माहे मे, २०१९ पासून महापारेषण कंपनीच्या ताब्यात असून उपकेंद्राच्या प्रस्तावास मा. वीज नियामक आयोगाची मंजुरी ई-पत्र दिनांक २१.०७.२०२१ अन्वये प्राप्त झाली. तद्नुसार महापारेषणद्वारा निविदा प्रक्रिया राबविण्यात आली व कंत्राटदार मे. भुवनेश्वरी, नंदुरबार यांना दिनांक ०१.०४.२०२२ अन्वये कार्यादेश देण्यात आला. दिनांक २५.०४.२०२२ रोजी उपकेंद्र उभारणीसाठीची जमीन कंत्राटदाराच्या ताब्यात प्रत्यक्ष काम सुरु करण्याकरिता देण्यात आली. तथापि, काम सुरु झाल्यानंतर स्थानिक पातळीवर कामास वारंवार होणाऱ्या प्रखर विरोधामुळे प्रत्यक्ष काम सुरु करण्यास विलंब झाला.

**लक्षवेधी सूचना क्र.१२५०**

**"महाराष्ट्र विधानसभा, सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन लक्षवेधी सूचना"**

**ॲड. आकाश फुंडकर मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार तृतीय (पावसाळी) अधिवेशनामध्ये उपस्थित केलेली विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.१२५० पुढीलप्रमाणे आहे.**

" राज्यात जिल्हानिहाय अन्नधान्य वाहतूक कंत्राट निश्चितीसाठी पुरवठाविभागाद्वारे शासननिर्णय दिनांक १५ जानेवारी, २०२१ निर्गमित करणे, निविदाकार सिल्वर रोडलाइन्स नेमून दिलेल्या अटीशर्तीची पूर्तता करत नसताना या विशिष्ट निविदाकारासाठी अटीशर्ती बदल/शिथील करून त्याला ५ जिल्ह्यात शासनस्तरावरून कंत्राटे प्रदान करण्यात येणे, या सर्व बाबी २०२३ तिसरे (अधिवेशन) मधे विधानसभा लक्षवेधी सूचना क्रमांक १२१७ द्वारे सभागृहात उपस्तित करण्यात येणे, सदर प्रकरणी अटीशर्तीचा भंग झाले असल्यास सदर कंत्राटदार विरुद्ध कार्यवाई करून त्याला ब्लॅकलिस्ट करण्यात येईल व दोषी अधिकारींविरुद्ध कारवाई करण्यात येईल हे आश्वासन मा. मंत्री द्वारे सभागृहास देण्यात आले असणे, त्यानुसार निर्देश मा. मंत्री द्वारे विभागाच्या सचिवाना पुरावेसह सविस्तर निवेदन विभागास दिले असणे, सिल्वर रोडलाइन्स, किसनलाल घईराम व विभागाच्या अधिकाऱ्यानी संगनमत करून शासनाची फसवणूक केली असल्याचे सुद्धा सिद्ध झाले असणे, असे असताना व सभागृहात दिलेल्या आश्वासना विरुद्ध विभागा द्वारे सदरप्रकरणी मागील ६ महिन्या पासून चालढकल करून कंत्राटदाराची पाठराखण करून त्याचे अवैध कंत्राटे सुरू ठेवणे, कंत्रटदार व विभागाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध तात्काल कारवाई होण्याची आवश्यकता असणे व वेळ वाया घालविणाऱ्या विभागाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध सुद्धा सख्त कारवाई करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाचे तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

**मा.मंत्री (अ.ना.पु व ग्रा.सं.) यांचे निवेदन**

लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राज्यातील अन्नधान्य वितरणाच्या अनुषंगाने मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेअंती शासन निर्णय दि. १५ जानेवारी, २०२१ निर्गमित करण्यात येऊन त्यान्वये निविदा प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या अटी व शर्तीविरुद्ध विविध याचिकाकर्त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्या होत्या. यानुषंगाने रिट याचिका क्र.७५०/२०२१ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२८.०६.२०२१ रोजी सर्व रिट याचिका निकाली काढून शासन निर्णयातील तरतूदी योग्य असल्याचा निर्णय दिलेला आहे. सदर निर्णयाविरूध्द याचिकाकर्त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. ८६८२/२०२१ दाखल केली होती. ती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१२.०७.२०२१ रोजी खारीज केली आहे.

शासन निर्णय दि.१५ जानेवारी, २०२१ नुसार राज्यातील ३४ जिल्हे व मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रातील ५ परिमंडळांमध्ये अन्नधान्य वाहतूक कंत्राटे कार्यान्वित करण्याकरीता दि.२१ मे,२०२१ पासून ऑनलाईन निविदा प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आलेले होती. सदर निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेल्या सर्व निविदांची शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे यथायोग्य छाननी करण्यात आली. छाननीअंती जे निविदाकार शासन निर्णयातील तरतूदींचे पालन करण्यास अपयशी ठरले त्या निविदाकारांना अपात्र घोषित करण्यात आले. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या याचिकांपैकी ज्या याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाकडून स्थगिती आदेश प्राप्त झाले होते असे जिल्हे वगळता उर्वरित एकूण २४ परिमंडळातील न्युनतम निविकारांना शासनाची अंतिम मान्यता दि. २४ डिसेंबर, २०१५ रोजी मिळाल्यानंतर संबंधीत २४ जिल्हे परिमंडळातील न्यूनतम निविदाकारांसोबत करारनामा करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत संबंधीत सर्व जिल्हाधिकारी यांना दि.२४ डिसेंबर, २०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

शासन निर्णयातील परि.क्र. ५.१७ नुसार "जे निविदाकार एकापेक्षा जास्त जिल्हे किंवा परिमंडळामध्ये ज्या कागदपत्रांच्या आधारे निविदा भरतील असे निविदाकार एका पेक्षा जास्त ठिकाणी न्यूनतम निविदाकार ठरल्यास एका ठिकाणची निविदा वगळता उर्वरित ठिकाणच्या निविदाप्रित्यर्थ तितक्या क्षमतेची जास्तीची

स्वमालकीची व नियंत्रणाखालील वाहने त्यांना सात दिवसांत उपलब्ध करुन द्यावी लागतील." अशी तरतुद करण्यात आली आहे. या अटीमागे शुद्ध हेतू हा आहे की, निविदाकार एकाच कागदपत्रांच्या आधारे अनेक ठिकाणी निविदा भरतात त्यामध्ये ते एकापेक्षा अधिक ठिकाणी ते न्यूनतम निविदाकार ठरले तर, तितकी वाहने त्यांच्याकडे नसल्याने एका जिल्ह्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणची कामे उप कंत्राटदारामार्फत पार पाडतात. ही अनैतिकता असल्याने याला अटकाव करण्यासाठी विभागाने ही अट विहित केलेली आहे. तसेच परि. क्र.१०.६ मध्ये "तथापि काही तांत्रिक कारणांस्तव प्रथम न्युनतम निविदाकार विहित मुदतीत करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास व विहित मुदतीनंतर परंतु नविन निविदा प्रक्रिया चालू होण्यापूर्वी सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन न्युनतम निविदाकार करारनामा करण्यास तयार असल्यास अशा निविदाकाराशी करारनामा करण्यात यावा," अशी तरतूद करण्यात आली आहे.

निविदाकार सिल्व्हर रोडलाईन्स हे पुणे, यवतमाळ, चंद्रपूर, बुलडाणा व अमरावती या ५ जिल्ह्यात न्युनतम निविदाकार ठरले आहेत. त्याअनुषंगाने त्यांनी निविदा सादर करताना दाखल केलेल्या कागदपत्रांची यथायोग्य तपासणी केल्यानंतरच त्यांनी सादर केलेल्या दरांना शासनाची अंतिम मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन संबंधीत जिल्हाधिकारी यांना निविदाकार सिल्व्हर रोडलाईन्स यांच्यासोबत अन्नधान्य वाहतूकीचा करारनामा करण्याबाबत शासनाच्या दि. २४.१२.२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात येऊन शासन निर्णयातील विहित अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यास संबंधीत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले होते. तसेच, ज्या जिल्ह्यांमध्ये शासनाच्या पत्रानंतरही करारनामा करुन कार्यारंभ आदेश देण्यात आलेला नव्हता, अशा जिल्ह्यांमध्ये तात्काळ करारनामा करण्यात येऊन कार्यारंभ आदेश देण्याबाबत व विलंबाची कारणमिमांसा सादर करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना दि. १७ जानेवारी, २०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

या प्रकरणी नमूद करण्यात येते की, शासन निर्णय दि. १५.०१.२०२१ नुसार कार्यान्वित करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याच निविदाकारास शासन निर्णयान्वये घालून दिलेल्या अटी व शर्तीमध्ये शिथिलता देण्यात आलेली नाही. न्यूनतम निविदाकार सिल्व्हर रोडलाईन्स यांनी प्रस्तुत निविदा प्रक्रियेमध्ये १० जिल्ह्यांसाठी निविदा दाखल केल्या होत्या. त्यामध्ये ते केवळ पुणे, चंद्रपूर, बुलडाणा, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यांसाठी न्युनतम निविदाकार ठरलेले आहेत. सदर प्रकरणी शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने कार्यान्वित करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेतील अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात आलेली असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे, चंद्रपूर, बुलढाणा, अमरावती व यवतमाळ यांनी कळविले आहे.

याप्रकरणी महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशामध्ये उपस्थित लक्षवेधी सूचना क्र.१२१७ च्या अनुषंगाने मा. विधानमंडळात मा.मंत्री, अ.ना.पु. व ग्रा.सं. यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने मा.वि.स.स. यांनी दि.२०.१२.२०२३ रोजी विभागास आश्वासन पूर्ततेबाबत पत्र दिले होते. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणातील मुद्देनिहाय सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे, चंद्रपूर, बुलडाणा, अमरावती व यवतमाळ यांना शासन पत्र दि. २२.१२.२०२३ अन्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने संबंधीत सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने सर्व संबंधीतांची बैठक आयोजित करण्याबाबत तत्कालिन सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं. यांनी सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने दि.२१.०२.२०२४ व दि.०७.०३.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतु, दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र विधानमंडळाच्या विशेष व अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या तसेच, सार्वत्रिक लोकसभा निवडणूक, २०२४ च्या पार्श्वभूमीवर सदर बैठक वेळोवेळी पुढे ढकलण्यात आली आहे. सबब, मा.वि.स.स. यांनी सदर प्रकरणी मागील ६ महिन्यांपासून चालढकल करुन कंत्राटदाराची पाठराखण केली असल्याबाबत नमूद केलेली बाब वस्तुस्थितीदर्शक नाही.

*********

स्वमालकीची व नियंत्रणाखालील वाहने त्यांना सात दिवसांत उपलब्ध करुन द्यावी लागतील." अशी तरतुद करण्यात आलो आहे. या अटीमागे शुद्ध हेतू हा आहे की, निविदाकार एकाच कागदपत्रांच्या आधारे अनेक ठिकाणी निविदा भरतात त्यामध्ये ते एकापेक्षा अधिक ठिकाणी ते न्यूनतम निविदाकार ठरले तर, तितकी वाहने त्यांच्याकडे नसल्याने एका जिल्ह्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणची कामे उप कंत्राटदारामार्फत पार पाडतात. ही अनैतिकता असल्याने याला अटकाव करण्यासाठी विभागाने ही अट विहित केलेली आहे. तसेच परि. क्र.१०.६ मध्ये "तथापि काही तांत्रिक कारणांस्तव प्रथम न्युनतम निविदाकार विहित मुदतीत करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास व विहित मुदतीनंतर परंतु नविन निविदा प्रक्रिया चालू होण्यापूर्वी सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन न्युनतम निविदाकार करारनामा करण्यास तयार असल्यास अशा निविदाकाराशी करारनामा करण्यात यावा," अशी तरतूद करण्यात आली आहे.

निविदाकार सिल्व्हर रोडलाईन्स हे पुणे, यवतमाळ, चंद्रपूर, बुलडाणा व अमरावती या ५ जिल्ह्यात न्युनतम निविदाकार ठरले आहेत. त्याअनुषंगाने त्यांनी निविदा सादर करताना दाखल केलेल्या कागदपत्रांची यथायोग्य तपासणी केल्यानंतरच त्यांनी सादर केलेल्या दरांना शासनाची अंतिम मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन संबंधीत जिल्हाधिकारी यांना निविदाकार सिल्व्हर रोडलाईन्स यांच्यासोबत अन्नधान्य वाहतूकीचा करारनामा करण्याबाबत शासनाच्या दि. २४.१२.२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात येऊन शासन निर्णयातील विहित अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यास संबंधीत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले होते. तसेच, ज्या जिल्ह्यांमध्ये शासनाच्या पत्रानंतरही करारनामा करुन कार्यारंभ आदेश देण्यात आलेला नव्हता, अशा जिल्ह्यांमध्ये तात्काळ करारनामा करण्यात येऊन कार्यारंभ आदेश देण्याबाबत व विलंबाची कारणमिमांसा सादर करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना दि. १७ जानेवारी, २०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

या प्रकरणी नमूद करण्यात येते की, शासन निर्णय दि. १५.०१.२०२१ नुसार कार्यान्वित करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याच निविदाकारास शासन निर्णयान्वये घालून दिलेल्या अटी व शर्तीमध्ये शिथिलता देण्यात आलेली नाही. न्यूनतम निविदाकार सिल्व्हर रोडलाईन्स यांनी प्रस्तुत निविदा प्रक्रियेमध्ये १० जिल्ह्यांसाठी निविदा दाखल केल्या होत्या. त्यामध्ये ते केवळ पुणे, चंद्रपूर, बुलडाणा, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यांसाठी न्युनतम निविदाकार ठरलेले आहेत. सदर प्रकरणी शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने कार्यान्वित करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेतील अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात आलेली असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे, चंद्रपूर, बुलढाणा, अमरावती व यवतमाळ यांनी कळविले आहे.

याप्रकरणी महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशामध्ये उपस्थित लक्षवेधी सूचना क्र.१२१७ च्या अनुषंगाने मा. विधानमंडळात मा.मंत्री, अ.ना.पु. व ग्रा.सं. यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने मा.वि.स.स. यांनी दि.२०.१२.२०२३ रोजी विभागास आश्वासन पूर्ततेबाबत पत्र दिले होते. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणातील मुद्देनिहाय सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे, चंद्रपूर, बुलडाणा, अमरावती व यवतमाळ यांना शासन पत्र दि. २२.१२.२०२३ अन्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने संबंधीत सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने सर्व संबंधीतांची बैठक आयोजित करण्याबाबत तत्कालिन सचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं. यांनी सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने दि.२१.०२.२०२४ व दि.०७.०३.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतु, दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र विधानमंडळाच्या विशेष व अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या तसेच, सार्वत्रिक लोकसभा निवडणूक, २०२४ च्या पार्श्वभूमीवर सदर बैठक वेळोवेळी पुढे ढकलण्यात आली आहे. सबब, मा.वि.स.स. यांनी सदर प्रकरणी मागील ६ महिन्यांपासून चालढकल करुन कंत्राटदाराची पाठराखण केली असल्याबाबत नमूद केलेली बाब वस्तुस्थितीदर्शक नाही.

*********

**"महाराष्ट्र विधानसभा, सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन लक्षवेधी सूचना"**

**ॲड. आकाश फुंडकर मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार तृतीय (पावसाळी) अधिवेशनामध्ये उपस्थित केलेली विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.१२५० पुढीलप्रमाणे आहे.**

" राज्यात जिल्हानिहाय अन्नधान्य वाहतूक कंत्राट निश्चितीसाठी पुरवठाविभागाद्वारे शासननिर्णय दिनांक १५ जानेवारी, २०२१ निर्गमित करणे, निविदाकार सिल्वर रोडलाइन्स नेमून दिलेल्या अटीशर्तीची पूर्तता करत नसताना या विशिष्ट निविदाकारासाठी अटीशर्ती बदल/शिथील करून त्याला ५ जिल्ह्यात शासनस्तरावरून कंत्राटे प्रदान करण्यात येणे, या सर्व बाबी २०२३ तिसरे (अधिवेशन) मधे विधानसभा लक्षवेधी सूचना क्रमांक १२१७ द्वारे सभागृहात उपस्तित करण्यात येणे, सदर प्रकरणी अटीशर्तीचा भंग झाले असल्यास सदर कंत्राटदार विरुद्ध कार्यवाई करून त्याला ब्लॅकलिस्ट करण्यात येईल व दोषी अधिकारींविरुद्ध कारवाई करण्यात येईल हे आश्वासन मा. मंत्री द्वारे सभागृहास देण्यात आले असणे, त्यानुसार निर्देश मा. मंत्री द्वारे विभागाच्या सचिवाना पुरावेसह सविस्तर निवेदन विभागास दिले असणे, सिल्वर रोडलाइन्स, किसनलाल घईराम व विभागाच्या अधिकाऱ्यानी संगनमत करून शासनाची फसवणूक केली असल्याचे सुद्धा सिद्ध झाले असणे, असे असताना व सभागृहात दिलेल्या आश्वासना विरुद्ध विभागा द्वारे सदरप्रकरणी मागील ६ महिन्या पासून चालढकल करून कंत्राटदाराची पाठराखण करून त्याचे अवैध कंत्राटे सुरू ठेवणे, कंत्रटदार व विभागाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध तात्काल कारवाई होण्याची आवश्यकता असणे व वेळ वाया घालविणाऱ्या विभागाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध सुद्धा सख्त कारवाई करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाचे तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

**मा.मंत्री (अ.ना.पु व ग्रा.सं.) यांचे निवेदन**

लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राज्यातील अन्नधान्य वितरणाच्या अनुषंगाने मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेअंती शासन निर्णय दि. १५ जानेवारी, २०२१ निर्गमित करण्यात येऊन त्यान्वये निविदा प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या अटी व शर्तीविरुद्ध विविध याचिकाकर्त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्या होत्या. यानुषंगाने रिट याचिका क्र.७५०/२०२१ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२८.०६.२०२१ रोजी सर्व रिट याचिका निकाली काढून शासन निर्णयातील तरतूदी योग्य असल्याचा निर्णय दिलेला आहे. सदर निर्णयाविरूध्द याचिकाकर्त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र. ८६८२/२०२१ दाखल केली होती. ती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१२.०७.२०२१ रोजी खारीज केली आहे.

शासन निर्णय दि.१५ जानेवारी, २०२१ नुसार राज्यातील ३४ जिल्हे व मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रातील ५ परिमंडळांमध्ये अन्नधान्य वाहतूक कंत्राटे कार्यान्वित करण्याकरीता दि.२१ मे,२०२१ पासून ऑनलाईन निविदा प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आलेले होती. सदर निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेल्या सर्व निविदांची शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे यथायोग्य छाननी करण्यात आली. छाननीअंती जे निविदाकार शासन निर्णयातील तरतूदींचे पालन करण्यास अपयशी ठरले त्या निविदाकारांना अपात्र घोषित करण्यात आले. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या याचिकांपैकी ज्या याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाकडून स्थगिती आदेश प्राप्त झाले होते असे जिल्हे वगळता उर्वरित एकूण २४ परिमंडळातील न्युनतम निविकारांना शासनाची अंतिम मान्यता दि. २४ डिसेंबर, २०१५ रोजी मिळाल्यानंतर संबंधीत २४ जिल्हे परिमंडळातील न्यूनतम निविदाकारांसोबत करारनामा करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत संबंधीत सर्व जिल्हाधिकारी यांना दि.२४ डिसेंबर, २०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

शासन निर्णयातील परि.क्र. ५.१७ नुसार "जे निविदाकार एकापेक्षा जास्त जिल्हे किंवा परिमंडळामध्ये ज्या कागदपत्रांच्या आधारे निविदा भरतील असे निविदाकार एका पेक्षा जास्त ठिकाणी न्यूनतम निविदाकार ठरल्यास एका ठिकाणची निविदा वगळता उर्वरित ठिकाणच्या निविदाप्रित्यर्थ तितक्या क्षमतेची जास्तीची

विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना.
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६२४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील चंद्रपूर जिल्हा स्थित राजुरा तालुक्यातील राजुरा शहरातील सर्व्हे क्र. १४९/१९ आराजी ४.०५ हे. आर पैकी ०.४० आर सरकार जमा झालेल्या कोट्यावधी रूपये किंमतीच्या जमिनीवर शहरातील एक धनदांडग्या व्यक्तीकडून अतिक्रमण करून जागा हडप करण्याचा प्रयत्न होत असल्याची बाब माहे एप्रिल २०२४ मध्ये वा त्या दरम्यान उघडकिस येणे, सदर जागेवरील अतिक्रमण हटवून सरकारी कामकाजाकरीता राजुरा नगर परिषदेला रितसर हस्तांतरित करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत विभागीय आयुक्त, नागपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना माहे नोव्हेंबर २०२३ व जानेवारी २०२४ मध्ये वा त्या दरम्यान देण्यात येणे, सदर जागेवरील अतिक्रमण निष्कासित करून नाट्यगृहाचे बांधकाम करणेकामी जागा उपलब्ध करून देण्यास स्थानिक प्रशासन वेळकाढुपणा करीत असल्याने विभागातील नागरिकांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री.राधाकृष्ण विखे पाटील, मा.मंत्री, महसूल यांचे निवेदन.**

राजुरा शहरातील सर्व्हे क्र. १४९/१९ आराजी ४.०५ हे. आर. पैकी ०.४० हे. आर. जमिनीवर श्री. विनोद नरेंदुलवार, रा. जवाहर नगर, राजुरा हे अनधिकृत बांधकाम करीत असल्याबाबत मुख्याधिकारी, राजुरा यांनी दिनांक २२/११/२०२३ च्या पत्रान्वये तहसीलदार राजुरा व जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयास कळविले आहे. याअनुषंगाने सदर जमिनीवरील चालु असलेले अनधिकृत बांधकाम काढुन घेण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयाने दिनांक २६/१२/२०२३ च्या पत्रान्वये तहसीलदार राजुरा यांना कळविण्यात आले.

तहसीलदार राजुरा यांनी सर्व्हे क्र. १४९/१९ आराजी ४.०५ हे. आर. पैकी ०.४० हे. आर. जमिनीवरील दिनांक ७/०३/२०२४ रोजी अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत निश्चित करण्यात आले होते. परंतु दिनांक १२/०३/२०२४ रोजी मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांचा चंद्रपुर येथे उदघाटन दौरा तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक पेपर बंदोबस्त असल्याने पोलीस बंदोबस्त मिळाला नाही. तसेच लोकसभा निवडणुक कार्यबाहुल्यामुळे सदर कार्यवाही पुर्ण होऊ शकली नाही.

सदर जागेवरील अतिक्रमण हटवून सरकारी कामकाजाकरीता राजुरा नगर परिषदेला सदर जागा रितसर हस्तांतरित करणेबाबतचे निवेदन मा. श्री. सुभाष धोटे, विधानसभा सदस्य, राजुरा विधानसभा क्षेत्र यांनी त्यांचे दिनांक २९/०१/२०२४ अन्वये तहसीलदार राजुरा यांना दिलेले आहे.

मौजा राजुरा येथील भूखंड क्र. १४९/१९ आराजी ४.०५ हे.आर जमीन ग्रामीण सहकारी शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर व्दारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले राजुरा यांना शेक्षणिक प्रयोजनाकरिता प्रदान करण्यात आली होती.

परंतु तद्नंतर ग्रामीण सहकारी शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर यांनी श्री.विजय नरेंदुलवार, राजुरा यांना त्यापैकी ०.४० हे.आर जमीन वाणिज्य वापराकरिता परस्पर दिली त्यामुळे शर्तभंग झाल्याचे दिसून आल्याने उपविभागीय अधिकारी, राजुरा यांनी दिनांक ०८.०२.२०२२ मध्ये सदर जागा शासन जमा करण्याचा आदेश पारीत केला. व त्याप्रमाणे ७/१२ वर सरकार जमा अशी नोंद घेण्यात आली आहे.

प्रकरणात उपविभागीय अधिकारी, राजुरा यांचे दिनांक ०८.०२.२०२२ च्या आदेशाविरुध्द मुळ भोगवटादार या नात्याने ग्रामीण सहकारी शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर तर्फे श्री.जयंत साळवे याने अपर आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे न्यायालयात अपील दाखल केलेले होते. तद्नुषंगाने सदर प्रकरणात अपर आयुक्त, नागपूर यांनी निर्णय होईपर्यंत प्रकरणात दिनांक ०१/०४/२०२४ रोजी स्थगन आदेश दिला असल्याने प्रकरणात पुढील कार्यवाही होवु शकली नाही.

श्री.नरेंदुलवार रा.जवाहर नगर, राजुरा यांनी स.क्र. १४९/१९ आराजी ०.४० हे.आर बाबत मा.कोर्ट विद्यमान दुसरे सहदिवाणी न्यायाधीश, चंद्रपूर दावा क्र. ६९/२०२३ अन्वये दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) चंद्रपूर येथे दावा दाखल केला आहे. मा.न्यायालयाकडून कोणतेही आदेश अद्यापही प्राप्त झालेले नाही.

*********

लक्षवेधी सूचना क्रमांक ८२९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.संदिप क्षिरसागर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८२९ पुढीलप्रमाणे आहे.

" बीड महसूल मंडळाअंतर्गत २०२१ पासून मंडळ अधिकारी सचिन सानप हे नियमित कार्यरत असणे, त्यांचे अखत्यारीत असलेले पिंगळे तरफ, बलगुजर तरफ, खोड तरफ हे सानप मंडळ अधिकारी म्हणून त्यांचे कार्यक्षेत्रात असणे, मे २०२१ ते जुलै २०२३ सदरील मंडळ अधिकारी तलाठी यांनी मोठ्या प्रमाणावर फेरफार अफरा-तफर केल्याच्या तक्रारी आजतागायत देखिल शासनाकडे करण्यात आलेल्या असणे, त्यामध्ये फेरफार नं.३०५० सर्व्हे नं.१५० अ मौजे वासनवाडी येथे २९ गुंठे फेरफारमध्ये अनियमितता व आर्थिक घोटाळा करण्यात येणे, त्याप्रकरणी मे २०२१ ते जुलै २०२३ या कालावधीमध्ये झालेल्या खरेदी खताची, त्यावर झालेल्या फेरफाराची चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसुलमंत्री तसेच अप्पर मुख्य सचिव (महसुल) यांचेकडे पत्राद्वारे केलेली असणे, त्यानुसार मा. जिल्हाधिकारी बीड यांनी २१ मार्च, २०२३ रोजी प्रकरणाचा स्वयंस्पष्ट अहवाल दोन महिन्यात सादर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी यांना आदेश देण्यात येणे, परंतु, आदेशाला उपविभागीय अधिकारी यांनी न जुमानणे, सदरील मंडळ अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर या फेरफार प्रकरणामध्ये अनियमितता, मुरूम उत्खननासाठी कंत्राटदार, खड्री क्रेशर चालक व नागरिकांकडून आर्थिक फायदा करून घेणे, यात शासनाचे मोठे नुकसान होणे, परिणामी त्या परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व संशयात्मक भावना, तात्काळ कारवाई होणे, त्याबाबत शासनाची भुमिका."

---

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

माहे मे, २०२१ पासून श्री.सचिन सानप हे मंडळ अधिकारी, बीड या पदावर कार्यरत असून त्यांच्याकडे बीड मंडळ अंतर्गत बीड तरफ पिंगळे, बीड तरफ बलगुजर व बीड तरफ खोड हे तीन सज्जा येतात. माहे मे, २०२१ ते जुलै, २०२३ या कालावधीमध्ये मंडळ अधिकारी, बीड यांच्याविरूध्द ०४ तक्रारी प्राप्त झाल्या असून, यापैकी ०३ तक्रारी ह्या मौजे वासनवाडी, ता. व जि. बीड येथील फेरफार नं.३०५०, सर्व्हे नं.१५०-अ मधील फेरफारात अनियमितता झाल्याबाबतच्या आहेत.

मंडळ अधिकारी, बीड यांच्याविरूध्द तत्कालीन विधान परिषद सदस्य यांनी दि.२१.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये फेरफार व इतर बाबत केलेल्या तक्रारीस अनुसरून उपविभागीय अधिकारी, बीड यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून, चौकशीअंती तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडलेले असून कुठेही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले नाही असे दिसून आले आहे. त्याप्रमाणे तत्कालीन विधान परिषद सदस्य यांना जिल्हाधिकारी, बीड कार्यालयामार्फत दि.२७.०७.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

मौजे वासनवाडी, ता. व जि. बीड येथील फेरफार नं.३०५० व ३०५२, सर्व्हे नं.१५०-अ मधील फेरफारात अनियमितता झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच अन्य नागरिकांकडून प्राप्त तक्रारींची सखोल चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी,

बीड यांनी दि.२२.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपर जिल्हाधिकारी, बीड यांना निर्देश दिले होते. त्यावर अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.११.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, संबंधित मंडळ अधिकारी, बीड यांनी उपरोक्त फेरफाराबाबत निर्गमित केलेले दि.०७.०६.२०२३ रोजीचे आदेश हे अर्धन्यायिक स्वरूपाचे असून, उपविभागीय अधिकारी, बीड यांचेकडे त्यावरील अपील प्रकरण सुरू असल्याने मंडळ अधिकारी, बीड यांच्याकडून अनियमितता झाली किंवा नाही याबाबत उपविभागीय अधिकारी, बीड यांचे अभिप्राय घेणे योग्य राहील असे जिल्हाधिकारी, बीड यांना कळविले. त्यानुसार जिल्हाधिकारी बीड यांनी दि.२१.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मौजे वासनवाडी, ता. व जि.बीड येथील स.नं.१५०/अ मधील फेरफार क्र.३०५० व ३०५२ बाबत अनियमिततेच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, बीड यांच्याकडून अनियमितता झाली आहे किंवा कसे याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी, बीड यांना निर्देश दिले होते.

उपविभागीय अधिकारी, बीड यांचेकडून दि.१६.०५.२०२४ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार, तहसिलदार, बीड यांच्या दि.१७.०५.२०२३ रोजीच्या आदेशास अनुसरून मंडळ अधिकारी, बीड यांनी दि.०७.०६.२०२३ रोजी दिलेले आदेश हे अर्धन्यायिक स्वरूपाचे असून त्यामध्ये उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे सदरचे आदेश पारीत केलेले असल्यामुळे त्यांच्याकडून अनियमितता झाली नाही असे कळविले आहे.

मंडळ अधिकारी, बीड यांच्या दि.०७.०६.२०२३ रोजीच्या आदेशाविरूध्द उपविभागीय अधिकारी, बीड यांच्याकडे दाखल अपीलावर, प्रकरणात मंडळ अधिकारी, बीड यांनी स.नं.१५०/अ मधील सर्व हित संबंधितांस सुनावणीची नोटीस देऊन लेखी म्हणणे किंवा दस्तावेज सादर करण्यास संधी दिली नसल्याचे दिसून येते तसेच प्रकरणात क्षेत्र दुरूस्ती किंवा क्षेत्र बदलणे किंवा लेखन प्रमाद दुरूस्तीचे आदेश पारीत करण्याचे अधिकार हे तहसिलदार यांचे असून मंडळ अधिकारी, बीड यांनी तहसिलदार यांच्या अधिकाराचा गैरवापर करून कलम १५५ अन्वये आदेश पारीत केल्याचे दिसून येते इ. बाबी नमूद करून उपविभागीय अधिकारी, बीड यांनी दि.१५.०३.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मंडळ अधिकारी, बीड यांचे दि.०७.०६.२०२३ रोजीचे आदेश रद्द करून प्रकरण तहसिलदार, बीड यांच्याकडे वर्ग केले आहे. आता प्रस्तुत मौजे वासनवाडी, ता. व जि.बीड येथील स.नं.१५०/अ या प्रकरणांत उपविभागीय अधिकारी, बीड यांच्या दि.१५.०३.२०२४ रोजीच्या आदेशाविरूध्द अपर जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे अपील दाखल करण्यात आले असून, सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मंडळ अधिकारी, बीड यांनी मुरूम उत्खननासाठी कंत्राटदार, खड्री क्रेशर चालक व नागरिकांकडून आर्थिक फायदा करून घेणे यासंदर्भात मंडळ अधिकारी, गट-क संवर्गाचे शिस्तभंगविषयक प्राधिकारी हे जिल्हाधिकारी असल्याने प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याकरिता जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयामार्फत निवासी नायब तहसिलदार, बीड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर चौकशीत निष्पन्न होणाऱ्या बाबींनुसार कारवाई करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, बीड कार्यालयामार्फत घेण्यात येत आहे.

***********

बीड यांनी दि.२२.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपर जिल्हाधिकारी, बीड यांना निर्देश दिले होते. त्यावर अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.११.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, संबंधित मंडळ अधिकारी, बीड यांनी उपरोक्त फेरफाराबाबत निर्गमित केलेले दि.०७.०६.२०२३ रोजीचे आदेश हे अर्धन्यायिक स्वरूपाचे असून, उपविभागीय अधिकारी, बीड यांचेकडे त्यावरील अपील प्रकरण सुरू असल्याने मंडळ अधिकारी, बीड यांच्याकडून अनियमितता झाली किंवा नाही याबाबत उपविभागीय अधिकारी, बीड यांचे अभिप्राय घेणे योग्य राहील असे जिल्हाधिकारी, बीड यांना कळविले. त्यानुसार जिल्हाधिकारी बीड यांनी दि.२१.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मौजे वासनवाडी, ता. व जि.बीड येथील स.नं.१५०/अ मधील फेरफार क्र.३०५० व ३०५२ बाबत अनियमिततेच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, बीड यांच्याकडून अनियमितता झाली आहे किंवा कसे याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी, बीड यांना निर्देश दिले होते.

उपविभागीय अधिकारी, बीड यांचेकडून दि.१६.०५.२०२४ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार, तहसिलदार, बीड यांच्या दि.१७.०५.२०२३ रोजीच्या आदेशास अनुसरून मंडळ अधिकारी, बीड यांनी दि.०७.०६.२०२३ रोजी दिलेले आदेश हे अर्धन्यायिक स्वरूपाचे असून त्यामध्ये उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे सदरचे आदेश पारीत केलेले असल्यामुळे त्यांच्याकडून अनियमितता झाली नाही असे कळविले आहे.

मंडळ अधिकारी, बीड यांच्या दि.०७.०६.२०२३ रोजीच्या आदेशाविरूध्द उपविभागीय अधिकारी, बीड यांच्याकडे दाखल अपीलावर, प्रकरणात मंडळ अधिकारी, बीड यांनी स.नं.१५०/अ मधील सर्व हित संबंधितांस सुनावणीची नोटीस देऊन लेखी म्हणणे किंवा दस्तावेज सादर करण्यास संधी दिली नसल्याचे दिसून येते तसेच प्रकरणात क्षेत्र दुरूस्ती किंवा क्षेत्र बदलणे किंवा लेखन प्रमाद दुरूस्तीचे आदेश पारीत करण्याचे अधिकार हे तहसिलदार यांचे असून मंडळ अधिकारी, बीड यांनी तहसिलदार यांच्या अधिकाराचा गैरवापर करून कलम १५५ अन्वये आदेश पारीत केल्याचे दिसून येते इ. बाबी नमूद करून उपविभागीय अधिकारी, बीड यांनी दि.१५.०३.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मंडळ अधिकारी, बीड यांचे दि.०७.०६.२०२३ रोजीचे आदेश रद्द करून प्रकरण तहसिलदार, बीड यांच्याकडे वर्ग केले आहे. आता प्रस्तुत मौजे वासनवाडी, ता. व जि.बीड येथील स.नं.१५०/अ या प्रकरणांत उपविभागीय अधिकारी, बीड यांच्या दि.१५.०३.२०२४ रोजीच्या आदेशाविरूध्द अपर जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे अपील दाखल करण्यात आले असून, सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मंडळ अधिकारी, बीड यांनी मुरूम उत्खननासाठी कंत्राटदार, खड्डी क्रेशर चालक व नागरिकांकडून आर्थिक फायदा करून घेणे यासंदर्भात मंडळ अधिकारी, गट-क संवर्गाचे शिस्तभंगविषयक प्राधिकारी हे जिल्हाधिकारी असल्याने प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याकरिता जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयामार्फत निवासी नायब तहसिलदार, बीड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर चौकशीत निष्पन्न होणाऱ्या बाबींनुसार कारवाई करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, बीड कार्यालयामार्फत घेण्यात येत आहे.

***********

लक्षवेधी सूचना क्रमांक ८२९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.संदिप क्षिरसागर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८२९ पुढीलप्रमाणे आहे.**

" बीड महसूल मंडळाअंतर्गत २०२१ पासून मंडळ अधिकारी सचिन सानप हे नियमित कार्यरत असणे, त्यांचे अखत्यारीत असलेले पिंगळे तरफ, बलगुजर तरफ, खोड तरफ हे सानप मंडळ अधिकारी म्हणून त्यांचे कार्यक्षेत्रात असणे, मे २०२१ ते जुलै २०२३ सदरील मंडळ अधिकारी तलाठी यांनी मोठ्या प्रमाणावर फेरफार अफरा-तफर केल्याच्या तक्रारी आजतागायत देखिल शासनाकडे करण्यात आलेल्या असणे, त्यामध्ये फेरफार नं.३०५० सर्व्हे नं.१५० अ मौजे वासनवाडी येथे २९ गुंठे फेरफारमध्ये अनियमितता व आर्थिक घोटाळा करण्यात येणे, त्याप्रकरणी मे २०२१ ते जुलै २०२३ या कालावधीमध्ये झालेल्या खरेदी खताची, त्यावर झालेल्या फेरफाराची चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसुलमंत्री तसेच अप्पर मुख्य सचिव (महसुल) यांचेकडे पत्राद्वारे केलेली असणे, त्यानुसार मा. जिल्हाधिकारी बीड यांनी २१ मार्च, २०२३ रोजी प्रकरणाचा स्वयंस्पष्ट अहवाल दोन महिन्यात सादर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी यांना आदेश देण्यात येणे, परंतु, आदेशाला उपविभागीय अधिकारी यांनी न जुमानणे, सदरील मंडळ अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर या फेरफार प्रकरणामध्ये अनियमितता, मुरूम उत्खननासाठी कंत्राटदार, खड्डी क्रेशर चालक व नागरिकांकडून आर्थिक फायदा करून घेणे, यात शासनाचे मोठे नुकसान होणे, परिणामी त्या परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व संशयात्मक भावना, तात्काळ कारवाई होणे, त्याबाबत शासनाची भुमिका."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

माहे मे, २०२१ पासून श्री.सचिन सानप हे मंडळ अधिकारी, बीड या पदावर कार्यरत असून त्यांच्याकडे बीड मंडळ अंतर्गत बीड तरफ पिंगळे, बीड तरफ बलगुजर व बीड तरफ खोड हे तीन सज्जा येतात. माहे मे, २०२१ ते जुलै, २०२३ या कालावधीमध्ये मंडळ अधिकारी, बीड यांच्याविरूध्द ०४ तक्रारी प्राप्त झाल्या असून, यापैकी ०३ तक्रारी ह्या मौजे वासनवाडी, ता. व जि. बीड येथील फेरफार नं.३०५०, सर्व्हे नं.१५०-अ मधील फेरफारात अनियमितता झाल्याबाबतच्या आहेत.

मंडळ अधिकारी, बीड यांच्याविरूध्द तत्कालीन विधान परिषद सदस्य यांनी दि.२१.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये फेरफार व इतर बाबत केलेल्या तक्रारीस अनुसरून उपविभागीय अधिकारी, बीड यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून, चौकशीअंती तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडलेले असून कुठेही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले नाही असे दिसून आले आहे. त्याप्रमाणे तत्कालीन विधान परिषद सदस्य यांना जिल्हाधिकारी, बीड कार्यालयामार्फत दि.२७.०७.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

मौजे वासनवाडी, ता. व जि. बीड येथील फेरफार नं.३०५० व ३०५२, सर्व्हे नं.१५०-अ मधील फेरफारात अनियमितता झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच अन्य नागरिकांकडून प्राप्त तक्रारींची सखोल चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी,

लक्षवेधी सूचना क्रमांक-११६०

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री.रवि राणा, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ११६० पुढीलप्रमाणे आहे :-

"जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) अमरावती जिल्हा या समितीची बैठक दि. १०/०३/२०२३ रोजी च्या दरम्यान जिल्हाधिकारी अमरावती यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली असणे विशेषता जिल्हाधिकारी हे या बैठकीचे सदस्य सचिव असणे या बैठकीमध्ये अमरावती जिल्ह्यातील विविध विकास कामांचे संबंधी व इतर विषयवार निर्णय घेण्यासाठी ज्या ज्या मुद्यांवर लोकप्रतिनिधी यांनी चर्चा करून निर्णय घेतला गेला त्या निर्णयाचे इतिवृत्त तयार होऊन त्या विषयाचे प्रोसिडीगवर जिल्हाधिकारी अमरावती यांची स्वाक्षरी होऊन सदरचे विषयवार अंमलबजावणी करुन त्या त्या यंत्रणा नी केलेल्या कारवाईचा अहवाल संबधित यंत्रणा कडून मागविला असणे. पण तो प्राप्त झाला नसणे. म्हणून पुन्हा दिशा समिती कडून त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक. ८५४/२०२३ दि.२७/१०/२०२३, रोजी अमरावती जिल्ह्यातील संबधित यंत्रणा प्रमुखांना पाठवुन ते त्यांना प्राप्त झाले असणे. एवढा मोठा कालावधी झाल्यानंतरही अंमलबजावणी झाली नसणे ज्यामुळे अनेक विकासाचे, धोरणात्मक विषय दिशा समिती ला अधिकार असूनही प्रलंबित असणे. या संबंधाने संबंधित लोकप्रतिनिधी यांनी शासनाच्या विविध यंत्रणांचे मंत्रालयीन विभाग प्रमुख यांना वरील संबंधाने निर्देश देण्याची मागणी केली असणे. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयान्वये केंद्र शासन पुरस्कृत योजनांसाठी जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (DISHA) ची स्थापना करण्यात आली आहे. केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यावर राज्य घटनेच्या चौकटीत सोपविलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये समन्वय व सनियंत्रण ठेवणे ही या समितीच्या स्थापनेची पार्श्वभूमी आहे.

अमरावती जिल्हयातील "जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती"(दिशा) या समितीची बैठक दि.१० मार्च, २०२३ रोजी मा.खासदार श्रीमती नवनीत राणा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये समितीचे सदस्य सचिव म्हणुन जिल्हाधिकारी, अमरावती व इतर पदाधिकारी देखील उपस्थित होते. केंद्र जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) या बैठकीत अध्यक्षांनी जिल्हाधिकारी अमरावती तथा सदस्य सचिव यांच्या उपस्थितीत अमरावती जिल्हयातील विविध विकास कामासंबंधी विषयवार चर्चा करुन निर्देश देण्यात आले. त्यानुषंगाने या सभेचे इतिवृत्त निर्गमित करण्यात आले आहे.

त्यानुसार दि.१०.०३.२०२३ रोजी झालेल्या जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) समितीच्या इतिवृत्तातील मुद्यांच्या अनुषंगाने संबधित विभागांनी केलेली कार्यवाही थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

> **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) :-**

**उपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावती व उपमुख्य कार्यकारी अधिकारी मग्रारोहयो जि.प.अमरावती** यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार या योजनेंतर्गत सन २०२२-२३ अमरावती जिल्हयातील ३११४३.५६ लक्ष खर्च झालेले असुन रस्ता कामावर ७५१५.८४ लक्ष व रोपवाटिका व वृक्षलागवड रु.६१४४.४५ लक्ष खर्च करण्यात आलेले असुन मग्रारोहयो अंतर्गत कामाच्या एकुण २३५९३ मत्ता निर्माण झालेल्या आहेत. मेळघाटातील मजुरांना मजुरीचे पैसे देण्यात आलेले आहेत. २०२०-२१ मध्ये पालकमंत्री पांदन रस्ते कामे पुर्ण झालेल्या कामांचे वेतन अदा करण्यात आलेले आहे. कामाच्या भेटीचे रजिस्टर यंत्रणा स्तरावर ठेवण्यात आले आहे. जिल्हा स्तरावरुन सदर कामांना मंजुरी दिली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे

> **प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) :-**

**कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, अमरावती यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार** प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत शिवणगाव,शिरसगाव मोजरी प्रस्ताव पुर्ण केलेला असुन येथे व निभोंरा-बोरगाव येथील रस्त्यावर आवश्यक ठिकाणी पाईप टाकुन देण्यात आले आहेत तसेच प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यात आले आहे.उईखेड-अंबाडा रस्त्याच्या कामाचा गुणवत्ता नियंत्रक यांनी समाधानकारक शेरा दिला आहे. नेरपिंगळाई ते आखातवाडा रस्त्यावरील अतिक्रमण काढुन रस्ता रुंदीकरणाची कार्यवाही झालेली आहे.

> **केंद्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम (NSAP) :-**

निवासी उपजिल्हाधिकारी,अमरावती,यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार केंद्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम (NSAP) या योजनेतंर्गत विविध योजनेचे ऑनलाईन अर्ज स्वीकारुन दरमहा मासिक सभेत पात्र अर्ज मंजुर केले जातात. विविध योजनांतर्गत निधी उपलब्ध नसल्यामुळे अनुदानाचे वितरण केलेले नाही , निधीची मागणी केली असुन निधी उपलब्ध झाल्यास तात्काळ वितरण केले जाईल.

> **प्रधानमंत्री आवास योजना(सर्वासांठी घरे) :-**

**उपअभियंता, प्रधानमंत्री आवास योजना व मुख्याधिकारी ,नगर परिषद,भातुकली यांच्याकडुन प्राप्त अनुपालन अहवालानुसार** BLC घटक क्र.४ अंतर्गत DPR १ ते ७ लाभार्थी संख्या ८०३६ प्रकल्पाचे निधी प्राप्त असुन एकुण २९०० घरकुलाची कामे पुर्ण झाली आहेत.सदरच्या योजनेंतर्गत ८६० मंजुर सदनिकांपैकी २५० सदनिकांचा ताबा देण्यात आला असुन ६१० सदनिकांची प्रगती समाधानकारक नसल्याने विकासकास दि.०१.०४.२०२४ पासुन रद्द करण्यात आले आहे. नगरपंचायत भातुकली येथील श्री.महादेव ढोणे व श्री गणेश ढोणे यांना घरकुल बांधकाम करण्यासाठी जागा नियमाकुल करण्याची कार्यवाही शासनांच्या वेळोवळी प्राप्त निर्देशानुसार कार्यवाही सुरु आहे.

**उपअधिक्षक, भुमीअभिलेख, ता.भातुकली यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार** मुख्याधिकारी,नगर पंचायत, भातुकली यांच्याकडुन शासकीय जागेवर रहात असलेल्या मालमत्ता धारक यांच्या जागेचे सर्वेक्षण करुन समन्वय साधुन पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

एच ६६१-१अ

➢ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) :-

उपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावती व उपमुख्य कार्यकारी अधिकारी मग्रारोहयो जि.प.अमरावती यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार या योजनेंतर्गत सन २०२२-२३ अमरावती जिल्हयातील ३१९४३.५६ लक्ष खर्च झालेले असुन रस्ता कामावर ७५१५.८४ लक्ष व रोपवाटिका व वृक्षलागवड रु.६१४४.४५ लक्ष खर्च करण्यात आलेले असुन मग्रारोहयो अंतर्गत कामाच्या एकुण २३५९३ मत्ता निर्माण झालेल्या आहेत. मेळघाटातील मजुरांना मजुरीचे पैसे देण्यात आलेले आहेत. २०२०-२१ मध्ये पालकमंत्री पांदन रस्ते कामे पुर्ण झालेल्या कामांचे वेतन अदा करण्यात आलेले आहे. कामाच्या भेटीचे रजिस्टर यंत्रणा स्तरावर ठेवण्यात आले आहे. जिल्हा स्तरावरुन सदर कामांना मंजुरी दिली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे

➢ प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY) :-

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, अमरावती यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत शिवणगाव,शिरसगाव मोजरी प्रस्ताव पुर्ण केलेला असुन येथे व निभोंरा-बोरगाव येथील रस्त्यावर आवश्यक ठिकाणी पाईप टाकुन देण्यात आले आहेत तसेच प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यात आले आहे.उईखेड-अंबाडा रस्त्याच्या कामाचा गुणवत्ता नियंत्रक यांनी समाधानकारक शेरा दिला आहे. नेरपिंगळाई ते आखातवाडा रस्त्यावरील अतिक्रमण काढुन रस्ता रुंदीकरणाची कार्यवाही झालेली आहे.

➢ केंद्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम (NSAP) :-

निवासी उपजिल्हाधिकारी,अमरावती,यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार केंद्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम (NSAP) या योजनेतंर्गत विविध योजनेचे ऑनलाईन अर्ज स्वीकारुन दरमहा मासिक सभेत पात्र अर्ज मंजुर केले जातात. विविध योजनांतर्गत निधी उपलब्ध नसल्यामुळे अनुदानाचे वितरण केलेले नाही , निधीची मागणी केली असुन निधी उपलब्ध झाल्यास तात्काळ वितरण केले जाईल.

➢ प्रधानमंत्री आवास योजना(सर्वासांठी घरे) :-

उपअभियंता, प्रधानमंत्री आवास योजना व मुख्याधिकारी ,नगर परिषद,भातुकली यांच्याकडुन प्राप्त अनुपालन अहवालानुसार BLC घटक क्र.४ अंतर्गत DPR १ ते ७ लाभार्थी संख्या ८०३६ प्रकल्पाचे निधी प्राप्त असुन एकुण २९०० घरकुलाची कामे पुर्ण झाली आहेत.सदरच्या योजनेंतर्गत ८६० मंजुर सदनिकांपैकी २५० सदनिकांचा ताबा देण्यात आला असुन ६१० सदनिकांची प्रगती समाधानकारक नसल्याने विकासकास दि.०१.०४.२०२४ पासुन रद्द करण्यात आले आहे. नगरपंचायत भातुकली येथील श्री.महादेव ढोणे व श्री गणेश ढोणे यांना घरकुल बांधकाम करण्यासाठी जागा नियमाकुल करण्याची कार्यवाही शासनांच्या वेळोवळी प्राप्त निर्देशानुसार कार्यवाही सुरु आहे.

उपअधिक्षक, भुमीअभिलेख, ता.भातुकली यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार मुख्याधिकारी,नगर पंचायत, भातुकली यांच्याकडुन शासकीय जागेवर रहात असलेल्या मालमत्ता धारक यांच्या जागेचे सर्वेक्षण करुन समन्वय साधुन पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

एच ६६१-१३अ

लक्षवेधी सूचना क्रमांक-११६०

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री.रवि राणा, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ११६० पुढीलप्रमाणे आहे :-

"जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) अमरावती जिल्हा या समितीची बैठक दि. १०/०३/२०२३ रोजी च्या दरम्यान जिल्हाधिकारी अमरावती यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली असणे विशेषता जिल्हाधिकारी हे या बैठकीचे सदस्य सचिव असणे या बैठकीमध्ये अमरावती जिल्ह्यातील विविध विकास कामांचे संबंधी व इतर विषयवार निर्णय घेण्यासाठी ज्या ज्या मुद्यांवर लोकप्रतिनिधी यांनी चर्चा करून निर्णय घेतला गेला त्या निर्णयाचे इतिवृत्त तयार होऊन त्या विषयाचे प्रोसिडीगवर जिल्हाधिकारी अमरावती यांची स्वाक्षरी होऊन सदरचे विषयवार अंमलबजावणी करुन त्या त्या यंत्रणा नी केलेल्या कारवाईचा अहवाल संबधित यंत्रणा कडून मागविला असणे. पण तो प्राप्त झाला नसणे. म्हणून पुन्हा दिशा समिती कडून त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक. ८५४/२०२३ दि.२७/१०/२०२३, रोजी अमरावती जिल्ह्यातील संबधित यंत्रणा प्रमुखांना पाठवुन ते त्यांना प्राप्त झाले असणे. एवढा मोठा कालावधी झाल्यानंतरही अंमलबजावणी झाली नसणे ज्यामुळे अनेक विकासाचे, धोरणात्मक विषय दिशा समिती ला अधिकार असूनही प्रलंबित असणे. या संबंधाने संबंधित लोकप्रतिनिधी यांनी शासनाच्या विविध यंत्रणांचे मंत्रालयीन विभाग प्रमुख यांना वरील संबंधाने निर्देश देण्याची मागणी केली असणे. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयान्वये केंद्र शासन पुरस्कृत योजनांसाठी जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (DISHA) ची स्थापना करण्यात आली आहे. केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यावर राज्य घटनेच्या चौकटीत सोपविलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये समन्वय व सनियंत्रण ठेवणे ही या समितीच्या स्थापनेची पार्श्वभूमी आहे.

अमरावती जिल्हयातील "जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती"(दिशा) या समितीची बैठक दि.१० मार्च, २०२३ रोजी मा.खासदार श्रीमती नवनीत राणा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये समितीचे सदस्य सचिव म्हणुन जिल्हाधिकारी, अमरावती व इतर पदाधिकारी देखील उपस्थित होते. केंद्र जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) या बैठकीत अध्यक्षांनी जिल्हाधिकारी अमरावती तथा सदस्य सचिव यांच्या उपस्थितीत अमरावती जिल्हयातील विविध विकास कामासंबंधी विषयवार चर्चा करुन निर्देश देण्यात आले. त्यानुषंगाने या सभेचे इतिवृत्त निर्गमित करण्यात आले आहे.

त्यानुसार दि.१०.०३.२०२३ रोजी झालेल्या जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) समितीच्या इतिवृत्तातील मुद्यांच्या अनुषंगाने संबधित विभागांनी केलेली कार्यवाही थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

➢ <u>प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण ) :-</u>

**प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,अमरावती यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार** २०११ मध्ये अपात्र लाभार्थ्यांचे केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे ग्रामपंचायतच्या पात्र लाभार्थ्यांचा ठराव घेऊन प्राधान्याने राज्य पुरस्कृत योजनेमधुन लाभ देण्यात येत आहे. आदिवासी लाभार्थ्यांकरिता शबरी आवास योजना स्वतंत्र असल्यामुळे त्यातुन त्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

**प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विभाग,धारणी यांच्या अहवालानुसार आदिवासींच्या** प्रथेनुसार अभिलेखात नोंद घेण्याची कार्यवाही महसुल विभागामार्फत घेण्यात येते.

➢ <u>राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) :-</u>

**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या योजनेअंतर्गत** टंचाई आराखडा २०२२ अंतर्गत मंजुर झालेल्या योजनांचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

➢ <u>मातोश्री पाणंद रस्ते</u>-:

**कार्यकारी अभियंता, बांधकाम, अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या योजनेअंतर्गत विविध** गावातील पाईप लाईनची कामे सुरु असुन उर्वरित पाईप लाईन जोडणीची कामे प्रगतीत आहेत. रस्त्यांचे सीमांकन व ग्रामपंचायतीकडून ना हरकत ठराव प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

➢ <u>स्वच्छ भारत मिशन (SBM) शहरी:-</u>

**वैद्यकीय अधिकारी, म.न.पा. अमरावती स्वच्छ भारत मिशन यांचेकडील प्राप्त अहवालानुसार** या योजनेतंर्गत स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ बाबत महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

➢ <u>स्वच्छ भारत मिशन (SBM)</u> :-

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती, स्वच्छ भारत मिशन यांचेकडील प्राप्त अहवालानुसार** या ग्रामीण योजनेंतर्गत शौचालय नसलेले लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

➢ <u>प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन</u> :-

**जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार** या कार्यक्रमांतर्गत ३ क्लस्टर निवडण्यात आले असुन नाला खोलीकरण,ढाळीचे बांध, गॅबीयन बंधारे इ. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मध्ये प्रस्तावित केले आहे.

➢ <u>डिजीटल भारत भु-अभिलेख आधुनिकीकरण</u> :-

**जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख यांचेकडील प्राप्त अनुपालन अहवालानुसार** या कार्यक्रमांतर्गत NLRMP प्रकल्पांतील अभिलेखांचे नुतनीकरण व सुरक्षिततेसाठीची कार्यवाही सुरु आहे.

➢ <u>दिन दयाल उपाध्याय-ग्रामीण ज्योती योजना (DDU-GJY) :-</u>

**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण, अमरावती यांचेकडील प्राप्त अनुपालन अहवालानुसार** सदर योजनेंतर्गत अमरावती जिल्हयात रु.७५.९३ कोटी इतका खर्च झालेला असुन कार्यवाही पुर्ण झाली आहे.

> प्रधानमंत्री पिक विमा योजना :-

जिल्हा अधिक्षक ,कृषी अधिकारी,अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या योजनेअंतर्गत अपात्र शेतक-यांबाबत जिल्हाधिकारी यांनी शेतक-यांचे सर्वेक्षण करुन निर्णय घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या असुन याबाबत कार्यवाही सुरु आहे.

> राष्ट्रीय आरोग्य अभियानः-

सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय व जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या अंतर्गत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असुन कोरोना काळातील वैद्यकीय साधने व औषधांच्या खरेदीबाबत केंद्र शासनाच्या दि.०५.०४.२०२२ ते जून २०२२ या कालावधी मध्ये लेखा परीक्षण झालेले असुन अभिलेखे व नस्तीच्या लेखापरीक्षणा दरम्यान कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार झाल्याचे आक्षेप घेतलेले नाही.

> सर्व शिक्षा अभियान (SSA):-

शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ), जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार स्मार्ट क्लासरुम ५९ शाळांमध्ये केले असुन उर्वरितची मागणी केली आहे. जळका, शहापुर ६ वर्गशाळा पैकी २ वर्गशाळा सुस्थितीत चालु आहेत २ किरकोळ दुरुस्ती व २ निर्लेखनास प्रस्तावित केल्या आहेत. शाळेजवळील मुरमाच्या खदानीकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे गरजेचे आहे. शाळा रस्त्याच्या विरुध्द दिशेला असल्याने इतरत्र स्थानांतर न करता त्याच ठिकाणी कायम ठेवण्यात यावी, असे ग्राम शिक्षण समिती तसेच गट शिक्षण अधिका-यांचे अभिप्राय आहेत. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शाळा स्थानांतरण न करता जळका , शहापुर येथील शाळेला २ वर्गखोल्या सन २०२४-२५ च्या वार्षिक नियोजनात प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

> समेकित बाल विकास योजना (ICDS) :-

महिला व बालविकास विभाग व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास), जि.प.अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या योजनेंतर्गत माझी कन्या भाग्यश्री योजनेमधुन १७५६ लाभार्थ्यांना व नंतर प्रलंबित असलेल्या १३३ लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे.

---

एच ६६१-२अ

➢ प्रधानमंत्री पिक विमा योजना :-

जिल्हा अधिक्षक ,कृषी अधिकारी,अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या योजनेअंतर्गत अपात्र शेतक-यांबाबत जिल्हाधिकारी यांनी शेतक-यांचे सर्वेक्षण करुन निर्णय घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या असुन याबाबत कार्यवाही सुरु आहे.

➢ राष्ट्रीय आरोग्य अभियान:-

सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय व जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या अंतर्गत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असुन कोरोना काळातील वैद्यकीय साधने व औषधांच्या खरेदीबाबत केंद्र शासनाच्या दि.०५.०४.२०२२ ते जून २०२२ या कालावधी मध्ये लेखा परीक्षण झालेले असुन अभिलेखे व नस्तीच्या लेखापरीक्षणा दरम्यान कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार झाल्याचे आक्षेप घेतलेले नाही.

➢ सर्व शिक्षा अभियान (SSA):-

शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ), जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार स्मार्ट क्लासरुम ५९ शाळांमध्ये केले असुन उर्वरितची मागणी केली आहे. जळका, शहापुर ६ वर्गशाळा पैकी २ वर्गशाळा सुस्थितीत चालु आहेत २ किरकोळ दुरुस्ती व २ निर्लेखनास प्रस्तावित केल्या आहेत. शाळेजवळील मुरमाच्या खदानीकडे जाणारा रस्ता काँक्रीटीकरण करणे गरजेचे आहे. शाळा रस्त्याच्या विरुध्द दिशेला असल्याने इतरत्र स्थानांतर न करता त्याच ठिकाणी कायम ठेवण्यात यावी, असे ग्राम शिक्षण समिती तसेच गट शिक्षण अधिका-यांचे अभिप्राय आहेत. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शाळा स्थानांतरण न करता जळका , शहापुर येथील शाळेला २ वर्गखोल्या सन २०२४-२५ च्या वार्षिक नियोजनात प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

➢ समेकित बाल विकास योजना (ICDS) :-

महिला व बालविकास विभाग व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास), जि.प.अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या योजनेंतर्गत माझी कन्या भाग्यश्री योजनेमधुन १७५६ लाभार्थ्यांना व नंतर प्रलंबित असलेल्या १३३ लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे.

---

एच ६६१-२३त

➢ <u>प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण ) :-</u>

**प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,अमरावती यांच्या प्राप्त अनुपालन अहवालानुसार** २०११ मध्ये अपात्र लाभार्थ्याचे केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे ग्रामपंचायतच्या पात्र लाभार्थ्याचा ठराव घेऊन प्राधान्याने राज्य पुरस्कृत योजनेमधुन लाभ देण्यात येत आहे. आदिवासी लाभार्थ्यांकरिता शबरी आवास योजना स्वतंत्र असल्यामुळे त्यातुन त्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

**प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विभाग,धारणी यांच्या अहवालानुसार आदिवासींच्या** प्रथेनुसार अभिलेखात नोंद घेण्याची कार्यवाही महसुल विभागामार्फत घेण्यात येते.

➢ <u>राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) :-</u>

**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या योजनेअंतर्गत** टंचाई आराखडा २०२२ अंतर्गत मंजुर झालेल्या योजनांचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

➢ <u>मातोश्री पाणंद रस्ते</u>-:

**कार्यकारी अभियंता, बांधकाम, अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार या योजनेअंतर्गत विविध** गावातील पाईप लाईनची कामे सुरु असुन उर्वरित पाईप लाईन जोडणीची कामे प्रगतीत आहेत. रस्त्यांचे सीमांकन व ग्रामपंचायतीकडून ना हरकत ठराव प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

➢ <u>स्वच्छ भारत मिशन (SBM) शहरी:-</u>

**वैद्यकीय अधिकारी, म.न.पा. अमरावती स्वच्छ भारत मिशन यांचेकडील प्राप्त अहवालानुसार** या योजनेतंर्गत स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ बाबत महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

➢ <u>स्वच्छ भारत मिशन (SBM)</u> :-

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती, स्वच्छ भारत मिशन यांचेकडील प्राप्त अहवालानुसार** या ग्रामीण योजनेंतर्गत शौचालय नसलेले लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

➢ <u>प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन</u> :-

**जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, अमरावती यांचेकडील प्राप्त अहवालानुसार** या कार्यक्रमांतर्गत ३ क्लस्टर निवडण्यात आले असुन नाला खोलीकरण,ढाळीचे बांध, गॅबीयन बंधारे इ. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मध्ये प्रस्तावित केले आहे.

➢ <u>डिजीटल भारत भु-अभिलेख आधुनिकीकरण</u> :-

**जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख यांचेकडील प्राप्त अनुपालन अहवालानुसार** या कार्यक्रमांतर्गत NLRMP प्रकल्पांतील अभिलेखांचे नुतनीकरण व सुरक्षिततेसाठीची कार्यवाही सुरु आहे.

➢ <u>दिन दयाल उपाध्याय-ग्रामीण ज्योती योजना (DDU-GJY) :-</u>

**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण, अमरावती यांचेकडील प्राप्त अनुपालन अहवालानुसार** सदर योजनेंतर्गत अमरावती जिल्हयात रु.७५.९३ कोटी इतका खर्च झालेला असुन कार्यवाही पुर्ण झाली आहे.

एच ६६१-२

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- १४५**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

श्री. अबू आजमी, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. जयंत पाटील, श्री. चेतन तुपे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४५ पुढीलप्रमाणे आहे :-

"एकीकडे वाघांची राज्यातील संख्या वाढत असली तरी त्याच तुलनेत मृत्यूचा आकडा देखील वाढत असून माहे मार्च अखेर ते एप्रिलच्या सुरुवातीच्या १० दिवसांमध्ये विदर्भात तीन वाघांचा संशयास्पद मृत्यू होणे, नागपूर शहरापासून काही अंतरावरील रुई गावात व गोंदिया वन विभागात अंतर्गत देवरी वनक्षेत्रात अनुक्रमे दिनांक २१ मार्च व ३० मार्च रोजी मृतावस्थेत आढळलेल्या वाघांच्या पायांची नखे व पंजे गायब होणे, सदर मृत वाघांचे अवशेष न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवून त्याबाबत सखोल तपास करण्याची मागणी करण्यात येणे, सन २०२३ या वर्षी जवळपास ५२ वाघांची मृत्यू झाले असतानाच नागपूर, भंडारा व गोंदिया वनविभागातील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे वाघाच्या शिकारी वाढणे, सदर प्रकरणी संबंधित वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

### निवेदन

राज्यात एकूण ६१९९१.८९ चौ.कि.मी. वनक्षेत्र असून त्याचे व्यवस्थापन करण्याकरीता एकूण ११ प्रादेशिक वनवृत्त व २ वन्यजीव वनवृत्त आहेत. तसेच वन्यजीव संरक्षणाकरीता राज्यात ६ राष्ट्रीय उद्याने, ५२ वन्यजीव अभयारण्ये व २८ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित करण्यात आली आहेत. त्यापैकी ५ राष्ट्रीय उद्याने व १५ वन्यजीव अभयारण्यांचा समावेश करुन ६ व्याघ्र प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यात वन व वन्यप्राण्यांना उत्तम संरक्षण व संवर्धनामुळे वाघांच्या संख्येत व्याघ्र गणननेनुसार सन २००६, २०१०, २०१४, २०१८ व २०२२ मध्ये अनुकमे १०३, १६९, १९०, ३१२ व ४४४ वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

राज्यात मार्च अखेर ते एप्रिलच्या सुरुवातीच्या १० दिवसांमध्ये खालीलप्रमाणे एकुण ४ वाघाच्या मृत्यूच्या घटना निदर्शनास आल्या आहेत:-

- सन २०२४ मध्ये नागपूर वनविभागातील सेमीनरी हिल्स, नागपूर वनपरिक्षेत्रातील आयसीडी अजनी अंतर्गत मौजा रुई या गावामध्ये ईडन पार्कजवळ दिनांक २०.०३.२०२४ रोजी वाघाचे शव कुजलेल्या अवस्थेत आढळून आले आहे. सदर वाघाच्या डोक्याचे हाड मोडल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे. या आधारावर प्राथमिक चौकशीत सदर वाघाच्या मृत्युचे संभावित कारण अपघात नोंदविण्यात आले आहे. सदर वाघाच्या मागील डाव्या पायाची २ नखे आढळून आली नाही. सदर नखे अपघाताने तुटली असावीत असे प्राथमिक तपासणीत निदर्शनास आले आहे. सदर वाघाचे अवयाचे नमूने न्यायवैद्यक प्रयोग शाळेत पाठविण्यात आले असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. प्रस्तुत प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.
- भंडारा वनविभागातील लेंडेझरी वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र लेंडेझरी-२ येथे दिनांक २७.०३.२०२४ रोजी एक नर वाघ मृत अवस्थेत आढळून आला असून त्याचे सर्व अवयव शाबुत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर वाघाचा मृत्यु हा दोन वाघांच्या आपसी झुंजीत झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.
- गोंदिया वनविभागातील देवरी वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र रोपा यथील कक्ष क्रमांक ९८ (राखीव वन) येथे दिनांक २९.०३.२०२४ रोजी वनकर्मचाऱ्यांना गस्ती दरम्यान वाघाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला आहे. प्रस्तुत प्रकरणाची माहिती मिळताच वन अधिकारी / कर्मचारी,

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांचे प्रतिनिधी, मानद वन्यजीव रक्षक गोंदिया, सहाय्यक आयुक्त पशु संवर्धन देवरी, पशु अधिकारी देवरी व इतर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता नाल्याच्या काठावर खड्यासारख्या ठिकाणी मृत वाघाचे केस व विखुरलेल्या अवस्थेत शरीर / अवयव आढळून आहे. राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरणाने जारी केलेल्या SOP अवलंब करुन वाघाच्या अवयवाचे नमूने गोळा करुन न्यायवैद्यक प्रयोगशाळा, नागपूर येथे पाठविण्यात आले असून उर्वरित अवयव जाळून नष्ट करण्यात आले आहेत.

- दिनांक ०१/०४/२०२४ रोजी पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर येथील कक्ष क्रमांक ५३१ RF (राखीव वन) येथे नैसर्गिक (Illness) कारणाने एक वाघीण मृत अवस्थेत आढळून आली आहे. मृत वाघाचे अवशेषांच्या तपासणी करीता न्यायवैदयक प्रयोगशाळेत पाठविण्यांत येऊन, सदर मृत वाघाचा राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने दिलेल्या प्रमाणभूत कार्यपध्दतीनुसार पुढिल कार्यवाही करण्यात आली.

**वरील वाघ मृत्यूच्या घटनेतील समान ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.**

१. सादर वाघांचा मृत्यू हा अपघाताने किंवा नैसर्गीक कारणाने झालेला आहे. या घटनेत कोणत्याही प्रकरचे शिकार किंवा विषबाधा झालेली नाही.

२. सर्व मृत्यू ही वन कर्मचा-यांनीच नियमित गस्ती दरम्यान लक्षात आणुन दिल्यामुळे वन कर्मचा-यांच्या निष्काळजीपणाने शिकार झाली असे म्हणने संयुक्तीक नाही.

३. वाघाचे शावक हे मोठे होत असतांना आपले नविन क्षेत्र निश्चित करतांना अपघाताची संभावना जास्त असते. अशा क्षेत्रात अगा्रदर पासुन असलेले अधिक मोठे नर वाघ असल्याने नविन शावकांना त्यांचेच कार्यक्षेत्रात (Territory) मध्ये प्रवेश करु देत नाही.

४. मृत वाघांच्या शवाचे काही नमुणे न्यायवैदयकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेले होते. न्यायवैदयकीय प्रयोगशाळेकडुन सदर नमुणे तपासले असुन त्यामध्ये कुठल्याही प्रकारची विषबाधा झालेली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

सन २०२३ मध्ये राज्यात एकुण ५१ वाघाचा मृत्यू झालेला असून त्यापैकी २६ वाघ नैसर्गिक कारणाने, १० वाघ अपघातात २ वाघ विषबाधेमूळे, ९ वाघ विदयुत प्रवाहामुळे व ४ वाघ शिकारीच्या फाश्यामूळे मृत्यू झालेला आहे.

वाघांच्या संरक्षणार्थ क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते.
- विद्युत प्रवाहामुळे वाघांचे व अन्य वन्य प्राण्यांचे मृत्यू होऊ नये म्हणून वनविभाग व म.रा.वि.वि. महामंडळ मिळून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांद्वारे सनियंत्रण करण्यात येते.
- अवैध शिकाऱ्यांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी गुप्त सेवा निधीचा वापर करण्यात येतो.
- विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते. M-Stripes प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना करण्यात आला असून त्याद्वारे संशयास्पद गतीविधींवर लक्ष ठेवण्यात येते.
- अतिसंवेदशिल क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी व निरीक्षण मनोरे तयार करण्यात आले आहेत.
- राज्यातील वन्यप्राण्यांबाबत गुन्हे प्रकरणांची अद्यावत माहिती ठेवणेकरीता वन्यजीव गुन्हे कक्ष Wildlife Crime Cell प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर येथे तयार करण्यात आला आहे व

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांचे प्रतिनिधी, मानद वन्यजीव रक्षक गोंदिया, सहाय्यक आयुक्त पशु संवर्धन देवरी, पशु अधिकारी देवरी व इतर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता नाल्याच्या काठावर खड्यासारख्या ठिकाणी मृत वाघाचे केस व विखुरलेल्या अवस्थेत शरीर / अवयव आढळून आहे. राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरणाने जारी केलेल्या SOP अवलंब करुन वाघाच्या अवयवाचे नमूने गोळा करुन न्यायवैद्यक प्रयोगशाळा, नागपूर येथे पाठविण्यात आले असून उर्वरित अवयव जाळून नष्ट करण्यात आले आहेत.

- दिनांक ०१/०४/२०२४ रोजी पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर येथील कक्ष क्रमांक ५३१ RF (राखीव वन) येथे नैसर्गिक (Illness) कारणाने एक वाघीण मृत अवस्थेत आढळून आली आहे. मृत वाघाचे अवशेषांच्या तपासणी करीता न्यायवैदयक प्रयोगशाळेत पाठविण्यांत येऊन, सदर मृत वाघाचा राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने दिलेल्या प्रमाणभूत कार्यपध्दतीनुसार पुढिल कार्यवाही करण्यात आली.

**वरील वाघ मृत्यूच्या घटनेतील समान ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.**

१. सादर वाघांचा मृत्यू हा अपघाताने किंवा नैसर्गीक कारणाने झालेला आहे. या घटनेत कोणत्याही प्रकरचे शिकार किंवा विषबाधा झालेली नाही.

२. सर्व मृत्यू ही वन कर्मचा-यांनीच नियमित गस्ती दरम्यान लक्षात आणुन दिल्यामुळे वन कर्मचा-यांच्या निष्काळजीपणाने शिकार झाली असे म्हणने संयुक्तीक नाही.

३. वाघाचे शावक हे मोठे होत असतांना आपले नविन क्षेत्र निश्चित करतांना अपघाताची संभावना जास्त असते. अशा क्षेत्रात अगा्रदर पासुन असलेले अधिक मोठे नर वाघ असल्याने नविन शावकांना त्यांचेच कार्यक्षेत्रात (Territory) मध्ये प्रवेश करु देत नाही.

४. मृत वाघांच्या शवाचे काही नमुणे न्यायवैदयकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेले होते. न्यायवैदयकीय प्रयोगशाळेकडुन सदर नमुणे तपासले असुन त्यामध्ये कुठल्याही प्रकारची विषबाधा झालेली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

सन २०२३ मध्ये राज्यात एकुण ५१ वाघाचा मृत्यू झालेला असून त्यापैकी २६ वाघ नैसर्गिक कारणाने, १० वाघ अपघातात २ वाघ विषबाधेमूळे, ९ वाघ विदयुत प्रवाहामुळे व ४ वाघ शिकारीच्या फाश्यामूळे मृत्यू झालेला आहे.

वाघांच्या संरक्षणार्थ क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- जिल्हास्तरीय व्याघ्र संमितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते.
- विद्युत प्रवाहामुळे वाघांचे व अन्य वन्य प्राण्यांचे मृत्यू होऊ नये म्हणून वनविभाग व म.रा.वि.वि. महामंडळ मिळून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांद्वारे सनियंत्रण करण्यात येते.
- अवैध शिकाऱ्यांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी गुप्त सेवा निधीचा वापर करण्यात येतो.
- विशेष व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गत सुध्दा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते. M-Stripes प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना करण्यात आला असून त्याद्वारे संशयास्पद गतीविधींवर लक्ष ठेवण्यात येते.
- अतिसंवेदशिल क्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी व निरीक्षण मनोरे तयार करण्यात आले आहेत.
- राज्यातील वन्यप्राण्यांबाबत गुन्हे प्रकरणांची अद्यावत माहिती ठेवणेकरीता वन्यजीव गुन्हे कक्ष Wildlife Crime Cell प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर येथे तयार करण्यात आला आहे व

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- १४५**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

श्री. अबू आजमी, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. जयंत पाटील, श्री. चेतन तुपे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४५ पुढीलप्रमाणे आहे :-

"एकीकडे वाघांची राज्यातील संख्या वाढत असली तरी त्याच तुलनेत मृत्यूचा आकडा देखील वाढत असून माहे मार्च अखेर ते एप्रिलच्या सुरुवातीच्या १० दिवसांमध्ये विदर्भात तीन वाघांचा संशयास्पद मृत्यू होणे, नागपूर शहरापासून काही अंतरावरील रुई गावात व गोंदिया वन विभागात अंतर्गत देवरी वनक्षेत्रात अनुक्रमे दिनांक २१ मार्च व ३० मार्च रोजी मृतावस्थेत आढळलेल्या वाघांच्या पायांची नखे व पंजे गायब होणे, सदर मृत वाघांचे अवशेष न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवून त्याबाबत सखोल तपास करण्याची मागणी करण्यात येणे, सन २०२३ या वर्षी जवळपास ५२ वाघांची मृत्यू झाले असतानाच नागपूर, भंडारा व गोंदिया वनविभागातील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे वाघाच्या शिकारी वाढणे, सदर प्रकरणी संबंधित वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

**निवेदन**

राज्यात एकूण ६१९९१.८९ चौ.कि.मी. वनक्षेत्र असून त्याचे व्यवस्थापन करण्याकरीता एकूण ११ प्रादेशिक वनवृत्त व २ वन्यजीव वनवृत्त आहेत. तसेच वन्यजीव संरक्षणाकरीता राज्यात ६ राष्ट्रीय उद्याने, ५२ वन्यजीव अभयारण्ये व २८ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित करण्यात आली आहेत. त्यापैकी ५ राष्ट्रीय उद्याने व १५ वन्यजीव अभयारण्यांचा समावेश करुन ६ व्याघ्र प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यात वन व वन्यप्राण्यांना उत्तम संरक्षण व संवर्धनामुळे वाघांच्या संख्येत व्याघ्र गणननेनुसार सन २००६, २०१०, २०१४, २०१८ व २०२२ मध्ये अनुकमे १०३, १६९, १९०, ३१२ व ४४४ वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

राज्यात मार्च अखेर ते एप्रिलच्या सुरुवातीच्या १० दिवसांमध्ये खालीलप्रमाणे एकुण ४ वाघाच्या मृत्यूच्या घटना निदर्शनास आल्या आहेत:-

- सन २०२४ मध्ये नागपूर वनविभागातील सेमीनरी हिल्स, नागपूर वनपरिक्षेत्रातील आयसीडी अजनी अंतर्गत मौजा रुई या गावामध्ये ईडन पार्कजवळ दिनांक २०.०३.२०२४ रोजी वाघाचे शव कुजलेल्या अवस्थेत आढळून आले आहे. सदर वाघाच्या डोक्याचे हाड मोडल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे. या आधारावर प्राथमिक चौकशीत सदर वाघाच्या मृत्युचे संभावित कारण अपघात नोंदविण्यात आले आहे. सदर वाघाच्या मागील डाव्या पायाची २ नखे आढळून आली नाही. सदर नखे अपघाताने तुटली असावीत असे प्राथमिक तपासणीत निदर्शनास आले आहे. सदर वाघाचे अवयाचे नमूने न्यायवैद्यक प्रयोग शाळेत पाठविण्यात आले असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. प्रस्तुत प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.
- भंडारा वनविभागातील लेंडेझरी वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र लेंडेझरी-२ येथे दिनांक २७.०३.२०२४ रोजी एक नर वाघ मृत अवस्थेत आढळून आला असून त्याचे सर्व अवयव शाबुत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर वाघाचा मृत्यु हा दोन वाघांच्या आपसी झुंजीत झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.
- गोंदिया वनविभागातील देवरी वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र रोपा यथील कक्ष क्रमांक ९८ (राखीव वन) येथे दिनांक २९.०३.२०२४ रोजी वनकर्मचाऱ्यांना गस्ती दरम्यान वाघाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला आहे. प्रस्तुत प्रकरणाची माहिती मिळताच वन अधिकारी / कर्मचारी,

सदर कक्षाचे बळकटीकरण करण्यात येत आहे. तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तयार करण्यात आलेल्या सायबर सेलच्या माध्यमातून शिकारीच्या घटनांमधील आरोपींचा शोध घेण्यात येतो.

- अतिसंवेदशिल क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके तयार करण्यात आले असून त्याद्वारे, येणा-या जाणा-या वाहनांची नियमित तपासणी करण्यात येते.
- परिक्षेत्र स्तरावर वाघ व बिबट या वन्यप्राण्यांचे मागोव्याचा पंधरवडी कार्यक्रम राबवून त्यांच्या अस्तित्वाबाबतची माहिती घेण्यात येते. गावालगत असलेल्या मुसाफिर लोकांचे डेरे तपासणी करण्यात येते व त्यांचे हालाचालींवर लक्ष ठेवण्यात येते.
- वाघाचे भ्रमणमार्ग,पाणवठे व महत्वाचे ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून संशयास्पद हालचालीवर पाळत ठेवण्यात येते. तसेच पाण्यामध्ये विष प्रयोग होऊ नये याकरीता नियमीत पाणवठ्याची तपासणी केली जाते. या व्यतिरीक्त मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने पाणवठ्याकडे जाणा-या मार्गावर शिकारी लोकांव्दारे लोखंडी ट्रॅप लावले नसल्याची खातरजमा करण्यात येते.

*******

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- १६८७**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

डॉ. आशिष जयस्वाल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १६८७ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात विशेषत: विदर्भात वाघांच्या संख्येत झालेली वाढ, वाघांना अधिवासासाठी क्षेत्र (Territory) नसल्याने सातत्याने गावा-गावात वाघांचा प्रवेश होणे, शेतकरी, गुराखी यांच्यावर वारंवार हल्ला होणे व निरपराध लोकांचा जीव गमावणे, वाघांच्या दहशतीमुळे शेतकरी व शेतमजुर यांनी शेतात जाणे सोडणे, त्यामुळे आर्थिक प्रगती थांबणे, मनुष्य वन्यजीव संघर्षामुळे गावातील नागरिक व वनविभागाचे अधिकारी यांच्यामध्ये सातत्याने वाद निर्माण होणे, वारंवार वाघाच्या हल्ल्यामुळे मृत व्यक्तींच्या संख्येत वाढ होत असल्याने मृत्युनंतर शवविच्छेदनासाठी नेताना व अंत्येष्टी दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, सातत्याने वन्यप्राण्यांच्या हैदोसामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे होत असलेले नुकसान व त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनावर होत असलेला आघात, प्रत्येक वर्षी या प्रश्नाचे गांभीर्य वाढत असल्याने या प्रकरणी वेळीच योग्य उपाययोजना करण्याची आवश्यकता, राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य हे बफर क्षेत्रातील गावालगत असल्याने सामान्य नागरिकांची जीवाची सुरक्षा करणे व त्यासाठी शासनाने धोरण ठरविण्याची आवश्यकता, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे जीव गमावलेल्या कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्याची आवश्यकता, वन्यप्राण्यांमुळे ज्यांच्यावर विपरीत आघात होत आहे त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी व दरडोई उत्पन्न वाढीसाठी शासनाने विशेष कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता, नागरिकांमध्ये परसलेले दहशतीचे वातावरण व संतापाची लाट याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

### निवेदन

राज्यात एकूण ६१९९१.८९ चौ.कि.मी. वनक्षेत्र असून त्याचे व्यवस्थापन करण्याकरीता एकूण ११ प्रादेशिक वनवृत्त व २ वन्यजीव वनवृत्त आहेत. तसेच वन्यजीव संरक्षणाकरीता राज्यात ६ राष्ट्रीय उद्याने, ५२ वन्यजीव अभयारण्ये व २८ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित करण्यात आली आहेत. त्यापैकी ५ राष्ट्रीय उद्याने व १५ वन्यजीव अभयारण्यांचा समावेश करुन ६ व्याघ्र प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली आहे.

राज्यातील व्याघ्र प्रकल्पांशिवाय वन्यजीव अभयारण्याचे तसेच प्रादेशिक वनविभाग व महाराष्ट्र वनविकास महामंडळ यांचे अधिनस्त असलेल्या वनक्षेत्रात सुध्दा वाघांचा नैसर्गिक अधिवास आहे. वाघांचे अधिवास क्षेत्र कायम स्वरुपी राहत नसुन त्यांचे स्थानांतरण होणे ही नैसर्गिक बाब आहे. तसेच प्रत्येक वाघ स्वत:चे स्वतंत्र अधिवास क्षेत्र ठेवत असल्याने वाघाचे बछडे मोठे झाल्यावर वाघिणीच्या अधिवास क्षेत्रातून नविन अधिवासाच्या शोधात असतात. सद्यस्थितीत व्याघ प्रकल्प व इतर अधिवास क्षेत्रामध्ये वाघांची संख्या वाढत असल्याने नविन तरुण वाघांना अधिवास क्षेत्र कमी पडत असून सदर वाघ भ्रमणमार्गाद्वारे व्याघ्र प्रकल्पाबाहेर पडून अधिवासाच्या शोधात संचार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. सन २०२२ च्या व्याघ्र गणनेनुसार राज्यामध्ये वाघांची एकूण संख्या ४४४ इतकी आहेत. व्याघ्र प्रकल्पात वाघांच्या वाढत्या संख्येमुळे वाघांचे परिभ्रमण व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातही वाढले आहे. अशावेळी बऱ्याचदा मानव-वन्यप्राणी संघर्षाची परिस्थिती उदभवल्याचे निदर्शनास आले आहे. वाघाच्या हल्ल्यामध्ये राज्यात सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षामध्ये अनुक्रमे ५३, ८१ व ३९ इतक्या मनुष्य हानीच्या घटना झाल्याचे निदर्शनास आले आहे.

मानव-वन्यजीव संघर्षाच्या परिस्थितीमुळे नागरिकांचे होणारे नुकसान पाहता शासनाकडून नुकसान भरपाई अदा करण्याची योजना राबविण्यात येते. याकरिता महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा

किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ हा कायदा करण्यात आला आहे. सदर अधिनियमांतर्गत शासन अधिसूचना दिनांक ३०.०१.२०२४ अन्वये विविध प्राणी तसेच विविध प्रकारच्या नुकसानाकरिता द्यावयाचे अर्थसहाय्याचे दर शासनाने निश्चित केले आहेत. तसेच अर्थसहाय्याच्या रक्कमेमध्ये शासनाकडून वेळोवेळी वाढ देखील करण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत नुकसान भरपाई अदा करण्याकरिता उणे प्राधिकाराची सुविधा देखील उपलब्ध करण्यात आली असून त्यामुळे अनुदान अनुपलब्धतेची अडचण विभागास येत नाही.

वन व वन्यप्राण्यांना उत्तम संरक्षण व संवर्धनामुळे वाघ व इतर वन्यप्राण्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून आले आहे. वाढलेले शहरीकरण, वाढलेली लोकसंख्या, विकास कामांसाठी वन जमिनीच्या वापरामुळे वन क्षेत्राचे विखंडन (Fragmentation) झाल्याने वन्यप्राण्यांचे अधिवास खंडीत / संकुचीत झाले आहेत. त्यामुळे मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या घटनांमध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे जीव गमावलेल्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

**मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-**

- वनक्षेत्रात गवत, कुरण व इतर मृद व जलसंधारणाची कामे करुन त्या ठिकाणी गवत व इतर चराई योग्य प्रजाती याची लागवड करुन वन्यजीव/ तृणभक्षी प्राण्यांसाठी कुरण निर्मिती केली जात आहे.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात कृत्रीम पाणवठे निर्माण करुन पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- क्षेत्रीय अधिकारी/वनकर्मचाऱ्यांकडून संरक्षित क्षेत्रात नियमितपणे पायी तसेच वाहनाद्वारे गस्त घालण्यात येते.
- वाघ, बिबट व इतर वन्यप्राणी यांना नागरी वस्तीत येण्यापासून रोखण्यासाठी कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे गट तयार करण्यात येवून त्यांचे हालचालीचे सनियंत्रण करण्यात येते.
- मानव-वन्यजीव संघर्ष प्रकरणात तात्काळ कार्यवाहीसाठी संवेदनशील क्षेत्रात जलद बचाव पथक, प्राथमिक बचाव दल तयार करण्यात आले आहेत.
- वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात नुकसान झाल्यास प्रचलित कायदातील तरतूदीनुसार संबंधितास तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- मानवी जिवितास धोकादायक ठरणाऱ्या वाघास प्रचलित नियमाचे पालन करुन जेरबंद करण्यात येते.
- वाघाचे अस्तित्व असलेल्या जंगल क्षेत्रात ट्रॅप कॅमेरा लावून वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी व निरीक्षण मनोरे उभारलेले असून गस्त करणारे वनकर्मचारी त्या ठिकाणी मुक्काम करतात.
- ग्रामस्थांचे वनांवरील अवलंबन कमी व्हावे याकरिता डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजना राबविण्यात येत असून त्याद्वारे रोजगार प्रशिक्षण, गॅस वाटप, बायोगॅस, सोलर दिवे, सोलर फेनसिंग इत्यादी उपक्रम करण्यात येतात.

*******

किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ हा कायदा करण्यात आला आहे. सदर अधिनियमांतर्गत शासन अधिसूचना दिनांक ३०.०१.२०२४ अन्वये विविध प्राणी तसेच विविध प्रकारच्या नुकसानाकरिता द्यावयाचे अर्थसहाय्याचे दर शासनाने निश्चित केले आहेत. तसेच अर्थसहाय्याच्या रक्कमेमध्ये शासनाकडून वेळोवेळी वाढ देखील करण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत नुकसान भरपाई अदा करण्याकरिता उणे प्राधिकाराची सुविधा देखील उपलब्ध करण्यात आली असून त्यामुळे अनुदान अनुपलब्धतेची अडचण विभागास येत नाही.

वन व वन्यप्राण्यांना उत्तम संरक्षण व संवर्धनामुळे वाघ व इतर वन्यप्राण्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून आले आहे. वाढलेले शहरीकरण, वाढलेली लोकसंख्या, विकास कामांसाठी वन जमिनीच्या वापरामुळे वन क्षेत्राचे विखंडन (Fragmentation) झाल्याने वन्यप्राण्यांचे अधिवास खंडीत / संकुचीत झाले आहेत. त्यामुळे मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या घटनांमध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे जीव गमावलेल्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

**मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-**

- वनक्षेत्रात गवत, कुरण व इतर मृद व जलसंधारणाची कामे करुन त्या ठिकाणी गवत व इतर चराई योग्य प्रजाती याची लागवड करुन वन्यजीव/ तृणभक्षी प्राण्यांसाठी कुरण निर्मिती केली जात आहे.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात कृत्रीम पाणवठे निर्माण करुन पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- क्षेत्रीय अधिकारी/वनकर्मचाऱ्यांकडून संरक्षित क्षेत्रात नियमितपणे पायी तसेच वाहनाद्वारे गस्त घालण्यात येते.
- वाघ, बिबट व इतर वन्यप्राणी यांना नागरी वस्तीत येण्यापासून रोखण्यासाठी कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे गट तयार करण्यात येवून त्यांचे हालचालींचे सनियंत्रण करण्यात येते.
- मानव-वन्यजीव संघर्ष प्रकरणात तात्काळ कार्यवाहीसाठी संवेदनशील क्षेत्रात जलद बचाव पथक, प्राथमिक बचाव दल तयार करण्यात आले आहेत.
- वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात नुकसान झाल्यास प्रचलित कायदातील तरतूदीनुसार संबंधितास तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- मानवी जिवितास धोकादायक ठरणाऱ्या वाघास प्रचलित नियमाचे पालन करुन जेरबंद करण्यात येते.
- वाघाचे अस्तित्व असलेल्या जंगल क्षेत्रात ट्रॅप कॅमेरा लावून वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करण्यासाठी संरक्षण कुटी व निरीक्षण मनोरे उभारलेले असून गस्त करणारे वनकर्मचारी त्या ठिकाणी मुक्काम करतात.
- ग्रामस्थांचे वनांवरील अवलंबन कमी व्हावे याकरिता डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजना राबविण्यात येत असून त्याद्वारे रोजगार प्रशिक्षण, गॅस वाटप, बायोगॅस, सोलर दिवे, सोलर फेनसिंग इत्यादी उपक्रम करण्यात येतात.

*******

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- १६८७**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

डॉ. आशिष जयस्वाल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १६८७ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात विशेषत: विदर्भात वाघांच्या संख्येत झालेली वाढ, वाघांना अधिवासासाठी क्षेत्र (Territory) नसल्याने सातत्याने गावा-गावात वाघांचा प्रवेश होणे, शेतकरी, गुराखी यांच्यावर वारंवार हल्ला होणे व निरपराध लोकांचा जीव गमावणे, वाघांच्या दहशतीमुळे शेतकरी व शेतमजुर यांनी शेतात जाणे सोडणे, त्यामुळे आर्थिक प्रगती थांबणे, मनुष्य वन्यजीव संघर्षामुळे गावातील नागरिक व वनविभागाचे अधिकारी यांच्यामध्ये सातत्याने वाद निर्माण होणे, वारंवार वाघाच्या हल्ल्यामुळे मृत व्यक्तींच्या संख्येत वाढ होत असल्याने मृत्युनंतर शवविच्छेदनासाठी नेताना व अंत्येष्टी दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, सातत्याने वन्यप्राण्यांच्या हैदोसामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे होत असलेले नुकसान व त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनावर होत असलेला आघात, प्रत्येक वर्षी या प्रश्नाचे गांभीर्य वाढत असल्याने या प्रकरणी वेळीच योग्य उपाययोजना करण्याची आवश्यकता, राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य हे बफर क्षेत्रातील गावालगत असल्याने सामान्य नागरिकांची जीवाची सुरक्षा करणे व त्यासाठी शासनाने धोरण ठरविण्याची आवश्यकता, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे जीव गमावलेल्या कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्याची आवश्यकता, वन्यप्राण्यांमुळे ज्यांच्यावर विपरीत आघात होत आहे त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी व दरडोई उत्पन्न वाढीसाठी शासनाने विशेष कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता, नागरिकांमध्ये परसलेले दहशतीचे वातावरण व संतापाची लाट याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

**निवेदन**

राज्यात एकूण ६१९९१.८९ चौ.कि.मी. वनक्षेत्र असून त्याचे व्यवस्थापन करण्याकरीता एकूण ११ प्रादेशिक वनवृत्त व २ वन्यजीव वनवृत्त आहेत. तसेच वन्यजीव संरक्षणाकरीता राज्यात ६ राष्ट्रीय उद्याने, ५२ वन्यजीव अभयारण्ये व २८ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित करण्यात आली आहेत. त्यापैकी ५ राष्ट्रीय उद्याने व १५ वन्यजीव अभयारण्यांचा समावेश करुन ६ व्याघ्र प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली आहे.

राज्यातील व्याघ्र प्रकल्पांशिवाय वन्यजीव अभयारण्याचे तसेच प्रादेशिक वनविभाग व महाराष्ट्र वनविकास महामंडळ यांचे अधिनस्त असलेल्या वनक्षेत्रात सुध्दा वाघांचा नैसर्गिक अधिवास आहे. वाघांचे अधिवास क्षेत्र कायम स्वरुपी राहत नसुन त्यांचे स्थानांतरण होणे ही नैसर्गिक बाब आहे. तसेच प्रत्येक वाघ स्वत:चे स्वतंत्र अधिवास क्षेत्र ठेवत असल्याने वाघाचे बछडे मोठे झाल्यावर वाघिणीच्या अधिवास क्षेत्रातून नविन अधिवासाच्या शोधात असतात. सद्यस्थितीत व्याघ प्रकल्प व इतर अधिवास क्षेत्रामध्ये वाघांची संख्या वाढत असल्याने नविन तरुण वाघांना अधिवास क्षेत्र कमी पडत असून सदर वाघ भ्रमणमार्गाद्वारे व्याघ्र प्रकल्पाबाहेर पडून अधिवासाच्या शोधात संचार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. सन २०२२ च्या व्याघ्र गणनेनुसार राज्यामध्ये वाघांची एकूण संख्या ४४४ इतकी आहेत. व्याघ्र प्रकल्पात वाघांच्या वाढत्या संख्येमुळे वाघांचे परिभ्रमण व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातही वाढले आहे. अशावेळी बऱ्याचदा मानव-वन्यप्राणी संघर्षाची परिस्थिती उदभवल्याचे निदर्शनास आले आहे. वाघाच्या हल्ल्यामध्ये राज्यात सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षामध्ये अनुक्रमे ५३, ८१ व ३९ इतक्या मनुष्य हानीच्या घटना झाल्याचे निदर्शनास आले आहे.

मानव-वन्यजीव संघर्षाच्या परिस्थितीमुळे नागरिकांचे होणारे नुकसान पाहता शासनाकडून नुकसान भरपाई अदा करण्याची योजना राबविण्यात येते. याकरिता महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- १७७१**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

डॉ. विनय कोरे (सावकर), विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७७१ पुढीलप्रमाणे आहे :-

"चांदोली अभयारण्यप्रकल्प बाधितांचे महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाच्या दिनांक ३१ मार्च १९९५ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोल्हापूर, सांगली, सातारा व रत्नागिरी जिल्ह्यातील मिळून २१ गावांचे कुटुंब संख्या अंदाजे १७०० इतकी स्थलांतर करून पुनर्वसन त्या त्या जिल्ह्यात करणे, प्रकल्प बाधितांना स्थलांतरित ठिकाणी पुनर्वसन कायद्याप्रमाणे भूखंड व नागरी सुविधा काही प्रमाणात गावठाण करून पुरवण्यात आलेल्या असणे, प्रकल्प बाधितांमधील ७० टक्के लोकांना महसूल व वन विभागातील अधिकाऱ्यांच्या समन्वयाअभावी व पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम ११ व कलम १३ अधिसूचना नसल्यामुळे ३० वर्षे होत आली तरी जमिनीची व नागरी सुविधांची पूर्तता झालेली नसणे, सन २०२१ पर्यंत पाटबंधारेमधील वारणा व दूधगंगा प्रकल्पातील जमिनी वाटप करण्यात आलेल्या असणे, सदर प्रकल्प हा सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये समाविष्ट झाल्यामुळे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची अधिसूचना लागू करणे आवश्यक असणे, परंतु महसूल व वन विभागातील अधिकारी यांच्यातील योग्य समन्वयाअभावी प्रकल्पाचे पुनर्वसनाचे काम प्रशासकीय स्तरावर थांबलेले असणे, त्यामुळे प्रकल्पबाधितांमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, या प्रकरणात शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची व पुनर्वसन प्रक्रिया गतिमान करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

### निवेदन

चांदोली वन्यजीव अभयारण्य हे दिनांक १६.०९.१९८५ च्या शासन अधिसूचने अन्वये घोषित करण्यात आले असून त्यामध्ये सांगली, सातारा, कोल्हापूर आणि रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण ३२ गावांचा समावेश आहे. तद्नंतर चांदोली वन्यजीव अभयारण्यास दिनांक १४.०५.२००४ रोजीच्या शासन अधिसूचने अन्वये ३२ गावांसह मौजे आंबोली ता. शाहुवाडी या गावाचा समावेश करून राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानंतर सन २०१० मध्ये चांदोली राष्ट्रीय उद्यान व कोयना वन्यजीव अभयारण्य यांचा समावेश करून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली आहे.

चांदोली वन्यजीव अभयारण्यात समाविष्ट असलेल्या ३२ गावांपैकी सांगली जिल्ह्यातील ५ तर कोल्हापूर जिल्ह्यातील ३ गावांचे पुनर्वसन पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले आहे. वारणा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मौजे पेटलोंड ही मुख्य बाजारपेठ, वाहतुकीचे रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे आणि भूकंपाचे धक्के बसत असल्याच्या पार्श्वभूमीवर उर्वरित २४ गावांकडून पुनर्वसन करण्याची मागणी करण्यात येत होती. तथापि, तत्कालीन परिस्थितीत वन विभागाचे पुनर्वसन धोरण नसल्यामुळे तसेच सदर गावे वारणा प्रकल्पाच्या पुनर्वसन निकषांमध्ये बसत नसल्यामुळे सदर गावांचे पुनर्वसन करण्याकरीता दिनांक ३१.०३.१९९५ रोजीच्या शासन निर्णया अन्वये एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली.

सदर शासन निर्णयानुसार उपरोक्त २४ गावांचे पुनर्वसन सोलापूर जिल्ह्यातील उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये करणे प्रस्तावित होते व त्याकरीता आवश्यक रु. ३२.८४ कोटी निधीची तरतूद पाटबंधारे विभागाकरिता करण्यात आली होती. तसेच सदर २४ गावांचे पुनर्वसनाची प्रक्रिया पाटबंधारे विभागाच्या प्रकल्प अधिकाऱ्याकडून करणे नियोजित होते. यानुसार सन २०१६ पर्यंत प्रकल्पग्रस्तांची संकलन यादी

तयार करणे, ॲवार्ड जाहिर करणे, गावठाण तयार करणे, भुखंड वाटप, गावठाणातील सुविधा, शेतीसाठी जमीन वाटप करणे इत्यादि बाबी कार्यकारी अभियंता, वारणा यांचेमर्फत हाताळण्यात येत होते. तथापि, सन २०१६ पासून सदर प्रक्रिया वन विभागाकडून हाताळण्यात येत असून संबंधित उपवनसंरक्षक (प्रादेशिक) हे प्रकल्प अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

या अनुषंगाने पुनर्वसनाची कामे पूर्ण करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी बैठका आयोजित करून प्रकल्पग्रस्तांना त्यांचे अनुज्ञेय लाभ देऊन पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता कार्यवाही करण्यात येत आहे.

मात्र, अलीकडच्या काळात सदर गावांकरीता महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील कलम ११ ते १३ बाबत कार्यवाही झाली नसल्याचा मुद्दा उपस्थित झाल्यामुळे उक्त अधिनियमाच्या तरतुदी या गावांना लागू होत नसून वारणा प्रकल्पातील जमीन वाटप करणे अथवा प्रकल्पग्रस्तांना दाखला देणे शक्य आहे किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी यांचे स्तरावर संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. या कारणास्तव पर्यायी जमीन मिळणे, प्रकल्पग्रस्त दाखला मिळणे इत्यादि करीता प्रकल्पग्रस्तांना अडचणी येत आहेत.

त्यामुळे दिनांक ३१.०३.१९९५ रोजीच्या शासन निर्णया अन्वये विशेष बाब म्हणून पुनर्वसन करणेबाबत घेतलेल्या निर्णयानुसार सदर गावातील प्रकल्पग्रस्तांना महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील कलम ११ च्या अधिसूचनेअभावी देखील पुनर्वसन धोरणाप्रमाणे लाभ देण्याबाबत स्पष्ट निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्याबाबत पडताळणी करण्याची विनंती मदत व पुनर्वसन विभागास करण्यात आली आहे. तथापि, प्रचलित तरतुदीनुसार सदर बाब शक्य नसल्यास प्रकल्पग्रस्तांना त्यांचे अनुज्ञेय लाभ मिळावेत यासाठी मदत व पुनर्वसन विभागाच्या समन्वयाने धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

*****

तयार करणे, अॅवार्ड जाहिर करणे, गावठाण तयार करणे, भुखंड वाटप, गावठाणातील सुविधा, शेतीसाठी जमीन वाटप करणे इत्यादि बाबी कार्यकारी अभियंता, वारणा यांचेमर्फत हाताळण्यात येत होते. तथापि, सन २०१६ पासून सदर प्रक्रिया वन विभागाकडून हाताळण्यात येत असून संबंधित उपवनसंरक्षक (प्रादेशिक) हे प्रकल्प अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

या अनुषंगाने पुनर्वसनाची कामे पूर्ण करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी बैठका आयोजित करून प्रकल्पग्रस्तांना त्यांचे अनुज्ञेय लाभ देऊन पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता कार्यवाही करण्यात येत आहे.

मात्र, अलीकडच्या काळात सदर गावांकरीता महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील कलम ११ ते १३ बाबत कार्यवाही झाली नसल्याचा मुद्दा उपस्थित झाल्यामुळे उक्त अधिनियमाच्या तरतुदी या गावांना लागू होत नसून वारणा प्रकल्पातील जमीन वाटप करणे अथवा प्रकल्पग्रस्तांना दाखला देणे शक्य आहे किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी यांचे स्तरावर संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. या कारणास्तव पर्यायी जमीन मिळणे, प्रकल्पग्रस्त दाखला मिळणे इत्यादि करीता प्रकल्पग्रस्तांना अडचणी येत आहेत.

त्यामुळे दिनांक ३१.०३.१९९५ रोजीच्या शासन निर्णया अन्वये विशेष बाब म्हणून पुनर्वसन करणेबाबत घेतलेल्या निर्णयानुसार सदर गावातील प्रकल्पग्रस्तांना महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील कलम ११ च्या अधिसूचनेअभावी देखील पुनर्वसन धोरणाप्रमाणे लाभ देण्याबाबत स्पष्ट निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना देण्याबाबत पडताळणी करण्याची विनंती मदत व पुनर्वसन विभागास करण्यात आली आहे. तथापि, प्रचलित तरतुदीनुसार सदर बाब शक्य नसल्यास प्रकल्पग्रस्तांना त्यांचे अनुज्ञेय लाभ मिळावेत यासाठी मदत व पुनर्वसन विभागाच्या समन्वयाने धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

*****

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- १७७१**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

डॉ. विनय कोरे (सावकर), विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७७१ पुढीलप्रमाणे आहे :-

"चांदोली अभयारण्यप्रकल्प बाधितांचे महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाच्या दिनांक ३१ मार्च १९९५ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोल्हापूर, सांगली, सातारा व रत्नागिरी जिल्ह्यातील मिळून २१ गावांचे कुटुंब संख्या अंदाजे १७०० इतकी स्थलांतर करून पुनर्वसन त्या त्या जिल्ह्यात करणे, प्रकल्प बाधितांना स्थलांतरित ठिकाणी पुनर्वसन कायद्याप्रमाणे भूखंड व नागरी सुविधा काही प्रमाणात गावठाण करून पुरवण्यात आलेल्या असणे, प्रकल्प बाधितांमधील ७० टक्के लोकांना महसूल व वन विभागातील अधिकाऱ्यांच्या समन्वयाअभावी व पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम ११ व कलम १३ अधिसूचना नसल्यामुळे ३० वर्षे होत आली तरी जमिनीची व नागरी सुविधांची पूर्तता झालेली नसणे, सन २०२१ पर्यंत पाटबंधारेमधील वारणा व दूधगंगा प्रकल्पातील जमिनी वाटप करण्यात आलेल्या असणे, सदर प्रकल्प हा सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये समाविष्ट झाल्यामुळे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची अधिसूचना लागू करणे आवश्यक असणे, परंतु महसूल व वन विभागातील अधिकारी यांच्यातील योग्य समन्वयाअभावी प्रकल्पाचे पुनर्वसनाचे काम प्रशासकीय स्तरावर थांबलेले असणे, त्यामुळे प्रकल्पबाधितांमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, या प्रकरणात शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची व पुनर्वसन प्रक्रिया गतिमान करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

### निवेदन

चांदोली वन्यजीव अभयारण्य हे दिनांक १६.०९.१९८५ च्या शासन अधिसूचने अन्वये घोषित करण्यात आले असून त्यामध्ये सांगली, सातारा, कोल्हापूर आणि रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण ३२ गावांचा समावेश आहे. तद्नंतर चांदोली वन्यजीव अभयारण्यास दिनांक १४.०५.२००४ रोजीच्या शासन अधिसूचने अन्वये ३२ गावांसह मौजे आंबोली ता. शाहुवाडी या गावाचा समावेश करून राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानंतर सन २०१० मध्ये चांदोली राष्ट्रीय उद्यान व कोयना वन्यजीव अभयारण्य यांचा समावेश करून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली आहे.

चांदोली वन्यजीव अभयारण्यात समाविष्ट असलेल्या ३२ गावांपैकी सांगली जिल्ह्यातील ५ तर कोल्हापूर जिल्ह्यातील ३ गावांचे पुनर्वसन पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले आहे. वारणा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मौजे पेटलोंड ही मुख्य बाजारपेठ, वाहतुकीचे रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे आणि भूकंपाचे धक्के बसत असल्याच्या पार्श्वभूमीवर उर्वरित २४ गावांकडून पुनर्वसन करण्याची मागणी करण्यात येत होती. तथापि, तत्कालीन परिस्थितीत वन विभागाचे पुनर्वसन धोरण नसल्यामुळे तसेच सदर गावे वारणा प्रकल्पाच्या पुनर्वसन निकषांमध्ये बसत नसल्यामुळे सदर गावांचे पुनर्वसन करण्याकरीता दिनांक ३१.०३.१९९५ रोजीच्या शासन निर्णया अन्वये एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली.

सदर शासन निर्णयानुसार उपरोक्त २४ गावांचे पुनर्वसन सोलापूर जिल्ह्यातील उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये करणे प्रस्तावित होते व त्याकरीता आवश्यक रु. ३२.८४ कोटी निधीची तरतूद पाटबंधारे विभागाकरिता करण्यात आली होती. तसेच सदर २४ गावांचे पुनर्वसनाची प्रक्रिया पाटबंधारे विभागाच्या प्रकल्प अधिकाऱ्याकडून करणे नियोजित होते. यानुसार सन २०१६ पर्यंत प्रकल्पग्रस्तांची संकलन यादी

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे (पावसाळी) अधिवेशन

श्री. रवि राणा, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४९८ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र शासनाचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये या विभागाचे दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता दिली असणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून अमरावती येथे नव्याने सुरु होणे अत्यावश्यक असणे, सुरु होण्यासाठी अध्यापक वर्गाची नेमणूक करणे, अत्यावश्यक पदस्थापना शासनाकडून मंजूर न झाल्यास या वर्षापासून चालू शैक्षणिक वर्षात नवीन कॉलेज सुरु होणार नसल्याचे प्रशासन अधिकारी सांगत असणे, म्हणून राज्य शासनाचा हा ड्रीम प्रोजेक्ट असून महाराष्ट्र राज्य शासनाकडून काही प्रक्रिया पुर्ण करुन इतर प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य सरकारकडून शिफारस करण्याची आवश्यकता असणे, तसेच सदरचे वैद्यकीय महाविद्यालय हे मौजे आलियाबाद सर्वे नंबर ०९/११ येथे पुर्ण क्षमतेने स्थापित होण्यासाठी व शीघ्र गतीने होण्यासाठी नव्याने सदरील बांधकामे स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती यांच्यामार्फत केल्यास सदर कार्य शीघ्रगतीने होईल व या प्रक्रियेवावत स्थानिक लेव्हलवर पाठपुरावा करता येईल या संबंधाने स्थानिक लोकप्रतिनिधींनीही मंत्री वैद्यकीय शिक्षण व उप मुख्यमंत्री यांना दिनांक २५/०६/२४ रोजी पत्र पाठवून अवगत केले असणे, शासनाने पुढाकर घेऊन राज्य सरकारच्या वतीने वेळीच निर्णय घेऊन इतर बाबी संबंधी केंद्र सरकारकडे शिफारस करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांचे निवेदन

राज्यातील अमरावतीसह अन्य आठ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणाऱ्या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्ण खाटांचे रुग्णालय स्थापन करुन सुरु करण्यास दिनांक १४ जुलै, २०२३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच दिनांक ०६ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अमरावती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यांकरीता आवश्यक वर्ग १ वर्ग ४ संवर्गातील एकूण ४४८ पदे चार टप्प्यात निर्माण करण्यांस मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच दिनांक १५ मार्च,२०२४ अन्वये एकूण रुपये ४०३.८९ कोटींचे अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे बांधकाम अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाचा हा ड्रीम प्रोजेक्ट असून राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगास दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी ई-मेल द्वारे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आलेले होते, ज्या अन्वये सदर अध्यापक वर्गाची भरती पदोन्नती, बदली व नवीन भरती करण्यात येणार आहे.

रोटा एच ६५८-१८(००-०e-२०२४ ८ कृ.मा.प.

अमरावती येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्यात आली. सदर शासन निर्णयानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती स्थापन करण्यासाठी महसूल विभागाच्या अखत्यारीतील मौजे आलियाबाद, ता.जि. अमरावती येथील गट नं. ९/१ मधील ११.२९ हे.आर. (ई-क्लास) इतकी जमीन जिल्हाधिकारी, अमरावती यांच्यामार्फत "शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय" या प्रयोजनार्थ नि:शुल्क हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली.

सदर जागेवर काही विटभट्टी धारकांचे अतिक्रमण असून प्रशासनाद्वारे अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यापूर्वी संबंधीत विटभट्टी मालकांनी अमरावती येथील स्थानिक सिव्हील न्यायालयात याचिका दाखल करुन स्टे प्राप्त केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथे १०० विद्यार्थी क्षमता व ४३० खाटांचे रुग्णालय बांधकाम करण्याबाबत दिनांक १५.०३.२०२४ अन्वये रुपये ४०३.८९ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने सदर बांधकामासाठी केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील कंपन्याकडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याबाबत दिनांक १०.०५.२०२४ ते दिनांक ०२.०७.२०२४ या कालावधीत ई-निविदा प्रकियेद्वारे देकार मागविण्यात आले आहेत. सदर देकार उघडण्यात आला असून त्यानुसार बांधकामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करुन त्यांच्या सोबत बांधकामाकरीता सामंजस्य करार करण्यात येईल. त्यानुसार बांधकामास लवकरात लवकर सुरु करण्यात येईल.

तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील विविध रेट्रोफिटिंग चे बांधकाम करण्यासाठी (एकूण ६ कामे) दिनांक १३.०२.२०२४ अन्वये रुपये १२,१९,८६,९००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने सदरील कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांच्याकडून करण्यात येणार आहेत.

*******************

एच ६५८-१अ

अमरावती येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्यात आली. सदर शासन निर्णयानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती स्थापन करण्यासाठी महसूल विभागाच्या अखत्यारीतील मौजे आलियाबाद, ता.जि. अमरावती येथील गट नं. ९/१ मधील ११.२९ हे.आर. (ई-क्लास) इतकी जमीन जिल्हाधिकारी, अमरावती यांच्यामार्फत "शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय" या प्रयोजनार्थ नि:शुल्क हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली.

सदर जागेवर काही विटभट्टी धारकांचे अतिक्रमण असून प्रशासनाद्वारे अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यापूर्वी संबंधीत विटभट्टी मालकांनी अमरावती येथील स्थानिक सिव्हील न्यायालयात याचिका दाखल करुन स्टे प्राप्त केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथे १०० विद्यार्थी क्षमता व ४३० खाटांचे रुग्णालय बांधकाम करण्याबाबत दिनांक १५.०३.२०२४ अन्वये रुपये ४०३.८९ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने सदर बांधकामासाठी केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील कंपन्याकडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याबाबत दिनांक १०.०५.२०२४ ते दिनांक ०२.०७.२०२४ या कालावधीत ई-निविदा प्रकियेद्वारे देकार मागविण्यात आले आहेत. सदर देकार उघडण्यात आला असून त्यानुसार बांधकामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करुन त्यांच्या सोबत बांधकामाकरीता सामंजस्य करार करण्यात येईल. त्यानुसार बांधकामास लवकरात लवकर सुरु करण्यात येईल.

तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील विविध रेट्रोफिटिंग चे बांधकाम करण्यासाठी (एकूण ६ कामे) दिनांक १३.०२.२०२४ अन्वये रुपये १२,१९,८६,९००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने सदरील कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांच्याकडून करण्यात येणार आहेत.

*******************

एच ६५८-१अ

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे (पावसाळी) अधिवेशन

श्री. रवि राणा, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४९८ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र शासनाचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये या विभागाचे दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता दिली असणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून अमरावती येथे नव्याने सुरु होणे अत्यावश्यक असणे, सुरु होण्यासाठी अध्यापक वर्गाची नेमणूक करणे, अत्यावश्यक पदस्थापना शासनाकडून मंजूर न झाल्यास या वर्षापासून चालू शैक्षणिक वर्षात नवीन कॉलेज सुरु होणार नसल्याचे प्रशासन अधिकारी सांगत असणे, म्हणून राज्य शासनाचा हा ड्रीम प्रोजेक्ट असून महाराष्ट्र राज्य शासनाकडून काही प्रक्रिया पुर्ण करुन इतर प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य सरकारकडून शिफारस करण्याची आवश्यकता असणे, तसेच सदरचे वैद्यकीय महाविद्यालय हे मौजे आलियाबाद सर्वे नंबर ०९/११ येथे पुर्ण क्षमतेने स्थापित होण्यासाठी व शीघ्र गतीने होण्यासाठी नव्याने सदरील बांधकामे स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती यांच्यामार्फत केल्यास सदर कार्य शीघ्रगतीने होईल व या प्रक्रियेबाबत स्थानिक लेव्हलवर पाठपुरावा करता येईल या संबंधाने स्थानिक लोकप्रतिनिधींनीही मंत्री वैद्यकीय शिक्षण व उप मुख्यमंत्री यांना दिनांक २५/०६/२४ रोजी पत्र पाठवून अवगत केले असणे, शासनाने पुढाकर घेऊन राज्य सरकारच्या वतीने वेळीच निर्णय घेऊन इतर बाबी संबंधी केंद्र सरकारकडे शिफारस करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांचे निवेदन

राज्यातील अमरावतीसह अन्य आठ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणाऱ्या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्ण खाटांचे रुग्णालय स्थापन करुन सुरु करण्यास दिनांक १४ जुलै, २०२३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच दिनांक ०६ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये अमरावती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यांकरीता आवश्यक वर्ग १ वर्ग ४ संवर्गातील एकूण ४४८ पदे चार टप्प्यात निर्माण करण्यांस मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच दिनांक १५ मार्च,२०२४ अन्वये एकूण रुपये ४०३.८९ कोटींचे अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे बांधकाम अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाचा हा ड्रीम प्रोजेक्ट असून राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगास दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी ई-मेल द्वारे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आलेले होते, ज्या अन्वये सदर अध्यापक वर्गाची भरती पदोन्नती, बदली व नवीन भरती करण्यात येणार आहे.

रोटा एच ६५८-१ (८००-०८-२०२४  ८ क्रु.मा.प.

लक्षवेधी सूचना क्र.१८६०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय अधिवेशन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मा.श्री.रणवीर सावरकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८६०

"श्री संत गाडेबाबा विद्यापीठ अमरावती यांचे अकोला येथे अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्याकरीता विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्याची दीर्घ कालीन मागणी असणे, अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणावर असणे, तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयीन कामाकरीता अमरावती येथे जाण्याकरीता किमान १०० कि.मी. तर कमाल २५०. कि.मी. अंतर असल्याने प्रवासामधील मोठ्या प्रमाणात वेळ खर्च होणे. महाविद्यालयीन प्रशासन, विद्यार्थी व पालक यांना अमरावती येथे जाणे वेळखाऊ आणि आर्थिक खर्चिक असल्याकारणाणे अकोला येथे उपकेंद्र सुरु करण्यासाठी दीर्घकालीन माणणी असणे, सदरचे उपकेंद्र अकोला येथे सुरु करण्यासाठी विद्यापीठाच्या विचाराधीन असणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे निवेदन

राज्यातील विविध अकृषि विद्यापीठांकडून उपपरिसर / उपकेंद्र सरू करणेबाबत शासनास प्रस्ताव प्राप्त होत असतात. उपकेंद्र सरू करण्याबाबतची वाढती मागणी विचारात घेऊन, उपरिसर निर्माण करण्याकरिता सर्व विद्यापीठांकरिता एकसूत्रता ठेवण्यासाटी उपपरिसर निर्मितीसाठी किती निधी ठोक स्वरूपात देता येईल, अटी व शर्ती कशा पध्दतीने निश्चित्त करता येईल, उपकेंद्र सुरू करावयाचे झाल्यास शिक्षक व शिक्षकेत्तर पदे कशी उपलब्ध करुन देता येतील यासाठी निधीची तरतूद कशी असणार आहे, त्याचप्रमाणे जागेची आवश्यकता कशी पूर्ण करता येईल तसेच सदरहू उपरिसर राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या तरतूदींशी कशापद्धतीने सुसंगत असणार आहे याचा सर्वसमावेशक अभ्यास करुन उपपरिसरा संदर्भात सुसंगत धोरण तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या शिफारशी शासनास सादर करण्याकामी विद्यापीठाचे माजी कुलगुरू, कुलसचिव तसेच वित्तीय तज्ञ यांची मदत घेऊन सादर करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण यांना सूचित केले आहे. सदर शासन पत्रानुसार संचालनालयान दिनांक २८ ऑगस्ट २०२३ अन्वये, डॉ. अजय भामरे प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. सदर समितीचे कामकाज सुरू असुन, अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येईल.

*************

**लक्षवेधी सूचना क्र.१९१५**

**महाराष्ट्र विधान सभा**
**सन २०२४ चे तृतीय अधिवेशन**

डॉ. अशोक उईके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १९१५ खालीलप्रमाणे आहे:-

"आदिवासी विभागाच्या शासन पत्र क्र. शाआशा २०२२/ प्र.क्र. २४०/का-१३ दिनांक ५ जुलै, २०२३ च्या पत्रान्वये राज्यातील आश्रमशाळेच्या वेळेत बदल करणे, आश्रमशाळेत अजूनही ८०% विद्यार्थी व ३०% मुली वर्ग खोल्यांमध्ये झोपत असणे, शिक्षण तज्ञांच्या मते सकाळी ११.०० ते सायं. ५.०० हा कालावधी अध्ययन, अध्यापन व ज्ञान आत्मसात करण्यासाठी सर्वोत्तम असणे, पेसा कायदा राज्यात सन २०१४ रोजी अस्तित्वात येणे, तेव्हापासून पेसा अंतर्गत होणारी नोकरी भरती बरेच वर्षापासून प्रलंबित असणे, त्यामुळे आदिवासी तरुणांमध्ये असंतोषाचे वातावरण, राज्यातील आदिवासी बहुल जिल्हयात १७ संवर्गाची पेसा भरती तात्काळ सुरु करण्याबाबत, सर्वोच्च न्यायालयाचा प्रलंबित खटला डायरी नं.४०५२४/२०२३ file on date 30.9.2023 case no slp (C) No.०२२१०९/२०२३ Regi. no.३०.१०.२०२३ मध्ये सदर पेसा भरतीला कोणत्याही प्रकारची स्थगिती दिलेली नसणे, शासनाने विशेष लक्ष देऊन तात्काळ प्रकरण निकाली काढण्यासाठी लक्ष देणे, तसेच उर्वरित पेसा नोकरी भरती तात्काळ करुन आदिवासी युवक/ युवतींना न्याय देण्याबाबत कार्यवाही करणे, काम नाही वेतन नाही, संबंधित कार्यालय वेळेत समायोजन करीत नसणे, त्यामुळे त्यांचा प्रतिक्षा कालावधी वाढणे, सदर शासन निर्णय फक्त आदिवासी विभागाला लागू असणे, अनुदानीत आश्रमशाळेमध्ये रिक्त जागा नसल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून शासकीय आश्रम शाळेत व्यवस्था करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन.**

शासकीय /अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये एकसमान शाळेचे वेळापत्रक आवश्यक असल्याने तसेच संध्याकाळचे खेळ /स्वयं अध्ययनच्या वेळेच्या उपलब्धतेसाठी शाळेच्या नियमित वेळेमध्ये बदल करुन शासकीय व अनुदानित आदिवासी निवासी आश्रमशाळेची वेळ आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सकाळी ८.४५ वाजता ते दुपारी ४.३० वाजता अशी करण्यात आलेली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना सायंकाळी खेळासाठी व स्वयंअध्ययनासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होणार आहे. शासकीय व अनुदानित आश्रमशाळा निवासी असल्याने शिक्षकांनी

रोटा M/800 (800-7-25)

शाळेच्या मुख्यालयाच्या ठिकाणी राहणे आवश्यक आहे. तसेच शाळेच्या वेळेनंतरदेखील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाकडे आवश्यकतेप्रमाणे लक्ष देणे अपेक्षित आहे.

आदिवासी विकास विभागांर्तगत ४९७ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून त्यापैकी ४५७ आश्रमशाळा स्वमालकीच्या इमारतीत असून उर्वरित ४० आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीत भरत आहे. स्वमालकीच्या ४५७ आश्रमशाळापैकी २५३ आश्रमशाळामध्ये मुलींचे व २१२ आश्रमशाळांमध्ये मुलांचे वस्तीगृह आहे. १३७ आश्रमशाळांमध्ये मुलींचे व ५६ आश्रमशाळांमध्ये मुलांचे वसतीगृहाचे काम प्रगतीपथावर आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित मुलींच्या व मुलांच्या वसतीगृहाचे कामे हाती घेण्यात येणार आहेत. वसतीगृहाचे बांधकाम करताना विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक सोयी-सुविधा मिळतील याबाबत काळजी घेण्यात येत आहे. येत्याकाळात शासकीय आश्रमशाळेतील कोणत्याही विद्यार्थ्यांला / विद्यार्थीनीला वर्ग खोल्यात झोपावे लागणार नाही.

मा. राज्यपाल महोदयांनी भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या परि. ५ च्या उप-परि. (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीतील शिफारस क. ३४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्रातील) अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्याबाबत दि. २९.०८.२०१९ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने दि. ०१.०२.२०२३ च्या शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

दिनांक २९.०८.२०१९ रोजीची अधिसूचना व त्याअनुषंगाने निर्गमित करण्यात आलेला दिनांक ०१.०२.२०२३ चा शासन निर्णय व दिनांक २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकास बिगर आदिवासी आरक्षण हक्क बचाव संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २५४८/२०२३ (IA No. १४५९५/२०२३) द्वारे आव्हान दिले होते. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. २७.०९.२०२३ रोजीच्या न्याय निर्णयान्वये उपरोक्त याचिका त्यांच्या अधिकार क्षेत्रातील बाब नसल्याचे नमूद करून खारिज केली व या प्रकरणी याचिकाकर्त्यांना मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात अपील करण्याची मुभा देण्यात आली आहे.

तद्नंतर, याप्रकरणी सामाजिक विकास प्रबोधिनी या संस्थेने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ द्वारे आव्हान दिलेले आहे. याप्रकरणी राज्य शासनाने शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात दि. १३.१०.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान शासनातर्फे मा. महाधिवक्ता यांनी शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना पेसा क्षेत्रातील पदभरतीच्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या पुढील निर्देशापर्यंत पेसा क्षेत्रातील कोणत्याही पदांबाबतच्या नियुक्तीची कार्यवाही करणार नाही, असे मा. न्यायालयास आश्वासित केले. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २०.१०.२०२३ रोजीच्या

शाळेच्या मुख्यालयाच्या ठिकाणी राहणे आवश्यक आहे. तसेच शाळेच्या वेळेनंतरदेखील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाकडे आवश्यकतेप्रमाणे लक्ष देणे अपेक्षित आहे.

आदिवासी विकास विभागांर्तगत ४९७ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून त्यापैकी ४५७ आश्रमशाळा स्वमालकीच्या इमारतीत असून उर्वरित ४० आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीत भरत आहे. स्वमालकीच्या ४५७ आश्रमशाळापैकी २५३ आश्रमशाळामध्ये मुलींचे व २१२ आश्रमशाळांमध्ये मुलांचे वस्तीगृह आहे. १३७ आश्रमशाळांमध्ये मुलींचे व ५६ आश्रमशाळांमध्ये मुलांचे वसतीगृहाचे काम प्रगतीपथावर आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित मुलींच्या व मुलांच्या वसतीगृहाचे कामे हाती घेण्यात येणार आहेत. वसतीगृहाचे बांधकाम करताना विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक सोयी-सुविधा मिळतील याबाबत काळजी घेण्यात येत आहे. येत्याकाळात शासकीय आश्रमशाळेतील कोणत्याही विद्यार्थ्याला / विद्यार्थीनीला वर्ग खोल्यात झोपावे लागणार नाही.

मा. राज्यपाल महोदयांनी भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचिच्या परि. ५ च्या उप-परि. (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीतील शिफारस क. ३४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील (पेसा क्षेत्रातील) अधिसूचित १७ संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्याबाबत दि. २९.०८.२०१९ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने दि. ०१.०२.२०२३ च्या शासन निर्णय व दि. २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

दिनांक २९.०८.२०१९ रोजीची अधिसूचना व त्याअनुषंगाने निर्गमित करण्यात आलेला दिनांक ०१.०२.२०२३ चा शासन निर्णय व दिनांक २८.०२.२०२३ च्या शासन शुध्दीपत्रकास बिगर आदिवासी आरक्षण हक्क बचाव संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. २५४८/२०२३ (IA No. १४५९५/२०२३) द्वारे आव्हान दिले होते. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. २७.०९.२०२३ रोजीच्या न्याय निर्णयान्वये उपरोक्त याचिका त्यांच्या अधिकार क्षेत्रातील बाब नसल्याचे नमूद करून खारिज केली व या प्रकरणी याचिकाकर्त्यांना मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात अपील करण्याची मुभा देण्यात आली आहे.

तद्नंतर, याप्रकरणी सामाजिक विकास प्रबोधिनी या संस्थेने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३ द्वारे आव्हान दिलेले आहे. याप्रकरणी राज्य शासनाने शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात दि. १३.१०.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान शासनातर्फे मा. महाधिवक्ता यांनी शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना पेसा क्षेत्रातील पदभरतीच्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या पुढील निर्देशापर्यंत पेसा क्षेत्रातील कोणत्याही पदांबाबतच्या नियुक्तीची कार्यवाही करणार नाही, असे मा. न्यायालयास आश्वासित केले. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २०.१०.२०२३ रोजीच्या

**लक्षवेधी सूचना क्र.१९१५**

## महाराष्ट्र विधान सभा
## सन २०२४ चे तृतीय अधिवेशन

डॉ. अशोक उईके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १९१५ खालीलप्रमाणे आहे:-

"आदिवासी विभागाच्या शासन पत्र क्र. शाआशा २०२२/ प्र.क्र. २४०/का-१३ दिनांक ५ जुलै, २०२३ च्या पत्रान्वये राज्यातील आश्रमशाळेच्या वेळेत बदल करणे, आश्रमशाळेत अजूनही ८०% विद्यार्थी व ३०% मुली वर्ग खोल्यांमध्ये झोपत असणे, शिक्षण तज्ञांच्या मते सकाळी ११.०० ते सायं. ५.०० हा कालावधी अध्ययन, अध्यापन व ज्ञान आत्मसात करण्यासाठी सर्वोत्तम असणे, पेसा कायदा राज्यात सन २०१४ रोजी अस्तित्वात येणे, तेव्हापासून पेसा अंतर्गत होणारी नोकरी भरती बरेच वर्षापासून प्रलंबित असणे, त्यामुळे आदिवासी तरुणांमध्ये असंतोषाचे वातावरण, राज्यातील आदिवासी बहुल जिल्हयात १७ संवर्गाची पेसा भरती तात्काळ सुरु करण्याबाबत, सर्वोच्च न्यायालयाचा प्रलंबित खटला डायरी नं.४०५२४/२०२३ file on date 30.9.2023 case no slp (C) No.०२२१०९/२०२३ Regi. no.३०.१०.२०२३ मध्ये सदर पेसा भरतीला कोणत्याही प्रकारची स्थगिती दिलेली नसणे, शासनाने विशेष लक्ष देऊन तात्काळ प्रकरण निकाली काढण्यासाठी लक्ष देणे, तसेच उर्वरित पेसा नोकरी भरती तात्काळ करुन आदिवासी युवक/ युवतींना न्याय देण्याबाबत कार्यवाही करणे, काम नाही वेतन नाही, संबंधित कार्यालय वेळेत समायोजन करीत नसणे, त्यामुळे त्यांचा प्रतिक्षा कालावधी वाढणे, सदर शासन निर्णय फक्त आदिवासी विभागाला लागू असणे, अनुदानीत आश्रमशाळेमध्ये रिक्त जागा नसल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून शासकीय आश्रम शाळेत व्यवस्था करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन.

शासकीय /अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये एकसमान शाळेचे वेळापत्रक आवश्यक असल्याने तसेच संध्याकाळचे खेळ /स्वयं अध्ययनच्या वेळेच्या उपलब्धतेसाठी शाळेच्या नियमित वेळेमध्ये बदल करुन शासकीय व अनुदानित आदिवासी निवासी आश्रमशाळेची वेळ आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सकाळी ८.४५ वाजता ते दुपारी ४.३० वाजता अशी करण्यात आलेली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना सायंकाळी खेळासाठी व स्वयंअध्ययनासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होणार आहे. शासकीय व अनुदानित आश्रमशाळा निवासी असल्याने शिक्षकांनी

शासन पत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत पेसा क्षेत्रातील विहित करण्यात आलेल्या १७ संवर्गात पदभरतीच्या अनुषंगाने निवडप्रक्रिया/नियुक्तीसंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये अशा सूचना सर्व संबंधित विभागांना देण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी दि. ५ ऑगस्ट, २०२४ रोजी होणार आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये श्री सिध्दार्थ धर्माधिकारी, सरकारी वकील महाराष्ट्र शासन यांना पेसा क्षेत्रातील शिक्षक, सहाय्यकारी परिचारिका व प्रसविका आणि बहुउद्देशिय आरोग्य सेवक या संवर्गातील पदभरती करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात Interim Application दाखल करून त्यांच्या नियुक्तीसाठी शिक्षणावर/आरोग्यसेवेवर विपरीत परिणाम होऊ नये यास्तव मा. न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

अनुदानित आश्रमशाळा या स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जातात. सोयी-सुविधा, कमी विद्यार्थी संख्या इत्यादी कारणांमुळे अनुदानित आश्रमशाळा बंद केल्यास त्या आश्रमशाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अन्यत्र समायोजन केले जाते. दिनांक ०८.०६.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये काम नाही वेतन नाही हे धोरण लागू करण्यात आले आहे. अनुदानित आश्रमशाळा बंद झाल्यास त्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अन्य अनुदानित आश्रमशाळेतील रिक्त पदावर तातडीने समायोजन करण्याबाबत सूचना आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना देण्यात आलेल्या आहेत. शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळा यांच्या सेवा शर्ती नियमांमध्ये फरक असल्याने अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे शासकीय आश्रमशाळांमध्ये समायोजन करता येत नाही.

*************************

(सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन)

**मा.** अॅड. **माणिकराव कोकाटे व श्री दिलीपराव बनकर, विधानसभा सदस्य** यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र. ५९६** खालीलप्रमाणे आहे-

केंद्र शासनाने दि.०८.०३.२०२४ तसेच दि.३०.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये खरीप २०२३ पासून एकापेक्षा जास्त जोखीम बाबींच्या नुकसान भरपाईची परिगणना व वाटपाबाबतच्या कार्यपद्धतीबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सुधारीत बदलांनुसार स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत १००% उत्पादन खर्च गृहीत धरल्यास वैयक्तिक स्वरुपाच्या सुचनांकरीता पूर्वी दिलेल्या नुकसान भरपाई मध्ये वाढ होणार आहे, तर विस्तृत (wide Spread) स्वरुपाच्या सुचनांकरीता शेतकऱ्यांना देय नुकसान भरपाईच्या २५ टक्के अग्रिम देऊन उर्वरित नुकसान भरपाई पिक कापणी प्रयोग आधारित देण्याच्या सूचना आहेत. सदर सूचनांनुसार स्थानिक नैसर्गिक आपत्ती मध्ये wide Spread calamity अंतर्गत पात्र सूचनांना यापूर्वीच देय नुकसान भरपाईच्या २५ टक्के अग्रिम नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. तथापि, धाराशिव जिल्ह्यामध्ये सोयाबीन पिकासाठी पिक कापणी प्रयोगानुसार सरासरी उत्पादनाच्या तुलनेत घट आढळून आलेली नसल्याने सोयाबीन पिकासाठी पिक कापणी प्रयोग आधारित नुकसान भरपाई देय होत नाही. आता धाराशिव जिल्ह्यात केवळ तूर व कापूस पिकासाठी पिक कापणी प्रयोगानुसार सरासरी उत्पादनाच्या तुलनेत आढळून आलेली घट विचारात घेऊन अंतिम नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार अंतिम नुकसान भरपाईतून वैयक्तिक व विस्तृत (wide Spread) स्वरुपाच्या सुचनांकरीता पूर्वी दिलेली नुकसान भरपाई समायोजीत करुन उर्वरीत नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

केंद्र शासनाच्या सुधारीत सूचनांनुसार स्थानिक नैसर्गिक आपत्ती याबाबी अंतर्गत वैयक्तिक पातळीवर नुकसान भरपाई व विस्तृत (Wide Spread Calamity) अंतर्गत नुकसानीची भरपाई निश्चित झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई रकमेत मोठी तफावत निर्माण होत असल्याने राज्य शासनाकडे स्थानिक नैसर्गिक आपत्ती याबाबी अंतर्गत जुन्याच पद्धतीने नुकसान भरपाई परीगणना व वाटप करण्याची लोकप्रतिनिधींची मागणी आहे. याबाबत राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीच्या दि.०४.०७.२०२४ रोजीच्या बैठकीत चर्चा होऊन सदर बाब केंद्र शासनाचे निदर्शनास आणणे व स्थानिक नैसर्गिक आपत्ती याबाबी अंतर्गत जुन्या पद्धतीनेच नुकसान भरपाई अदा करण्यास मान्यता देणेबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात येत आहे.

***********

H-644-1A

त्यापैकी १.७२ लाख शेतकऱ्यांना रु.३९.५३ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आलेली आहे. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासनाने दि.०८.०३.२०२४ तसेच दि.३०.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये खरीप २०२३ पासून एकापेक्षा जास्त जोखीम बाबींच्या नुकसान भरपाईची परिगणना व वाटपाबाबतच्या कार्यपद्धतीबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सुधारीत बदलांनुसार स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत १००% उत्पादन खर्च गृहीत धरल्यास वैयक्तिक स्वरुपाच्या सुचनांकरीता पूर्वी दिलेल्या नुकसान भरपाई मध्ये वाढ होणार आहे, तर विस्तृत (wide Spread) स्वरुपाच्या सुचनांकरीता शेतकऱ्यांना देय नुकसान भरपाईच्या २५ टक्के अग्रिम देऊन उर्वरित नुकसान भरपाई पिक कापणी प्रयोग आधारित देण्याच्या सूचना आहेत. सदर सूचनांनुसार स्थानिक नैसर्गिक आपत्ती मध्ये wide Spread calamity अंतर्गत पात्र सूचनांना यापूर्वीच देय नुकसान भरपाईच्या २५ टक्के अग्रिम नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. तथापि, धाराशिव जिल्ह्यामध्ये सोयाबीन पिकासाठी पिक कापणी प्रयोगानुसार सरासरी उत्पादनाच्या तुलनेत घट आढळून आलेली नसल्याने सोयाबीन पिकासाठी पिक कापणी प्रयोग आधारित नुकसान भरपाई देय होत नाही. आता धाराशिव जिल्ह्यात केवळ तूर व कापूस पिकासाठी पिक कापणी प्रयोगानुसार सरासरी उत्पादनाच्या तुलनेत आढळून आलेली घट विचारात घेऊन अंतिम नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार अंतिम नुकसान भरपाईतून वैयक्तिक व विस्तृत (wide Spread) स्वरुपाच्या सुचनांकरीता पूर्वी दिलेली नुकसान भरपाई समायोजीत करुन उर्वरीत नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

केंद्र शासनाच्या सुधारीत सूचनांनुसार स्थानिक नैसर्गिक आपत्ती याबाबी अंतर्गत वैयक्तिक पातळीवर नुकसान भरपाई व विस्तृत (Wide Spread Calamity) अंतर्गत नुकसानीची भरपाई निश्चित झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई रकमेत मोठी तफावत निर्माण होत असल्याने राज्य शासनाकडे स्थानिक नैसर्गिक आपत्ती याबाबी अंतर्गत जुन्याच पद्धतीने नुकसान भरपाई परीगणना व वाटप करण्याची लोकप्रतिनिधींची मागणी आहे. याबाबत राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीच्या दि.०४.०७.२०२४ रोजीच्या बैठकीत चर्चा होऊन सदर बाब केंद्र शासनाचे निदर्शनास आणणे व स्थानिक नैसर्गिक आपत्ती याबाबी अंतर्गत जुन्या पद्धतीनेच नुकसान भरपाई अदा करण्यास मान्यता देणेबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात येत आहे.

***********

H-644-1A

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१५५७**

मा. श्री. राणाजगजीतसिंह पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५५७ पुढीलप्रमाणे आहे:-

"धाराशिव जिल्हयात खरीप २०२३ मध्ये सलग २१ दिवस पावसाचा खंड पडला असणे, त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी ५७ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रिम रक्कम नुकसान भरपाई पोटी देण्याची अधिसूचना काढणे, त्यानुसार ५७ पैकी २५ महसूल मंडळात २५% प्रमाणे २५४ कोटी अग्रीम रक्कम वाटपही करण्यात आली असणे, तसेच हंगामात अवेळी पावसाने झालेल्या नुकसानी पोटी २५ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना रु. ३७ कोटी वितरीत करण्यात आले असणे, मात्र केंद्र सरकारच्या दि.३० एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्राचा संदर्भ देत जिल्हयातील उर्वरीत ३७ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई दिली जात नसणे, या नवीन परिपत्रकामुळे जिल्हयातील आणि राज्यातील नैसर्गिक आपत्तीने बाधित शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्यासाठी अडचणी उभ्या ठाकल्या असणे, नुकसान भरपाईचे नवीन निकष रद्द करुन जुन्या निकषानुसारचं नुकसानग्रस्तांना दिलासा देणे आवश्यक असणे, ही बाब स्थानिक लोकप्रतिनिधीनी राज्याचे कृषि मंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली असणे, या परिपत्रकातील निकष बदलण्याचा अधिकार केंद्र सरकारकडे असणे, त्यानुसार केंद्र शासनाकडे राज्य शासनाच्या माध्यमातून पाठपुरावा करुन नवीन निकष रद्द करण्यासाठी रितसर मागणी करण्याची विनंती स्थानिक प्रतिनिधींनी केली असणे, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

****************************************

## मा.मंत्री (कृषी) यांचे निवेदन

प्रधानमंत्री पीक विमा योजना ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात खरीप हंगाम २०१६ पासून राबविण्यात येत आहे. वातावरण बदलाच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांचे आर्थिक संरक्षण करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र शासनाने खरीप २०२३ पासून शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा योजनेची अंमलबजावणी सुरू केली आहे. सदर योजना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी, कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. योजनेअंतर्गत प्रतिकूल हवामान घटकांमुळे पेरणी/ लावणी/ उगवण न होणे, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, पीक पेरणी पासून काढणी कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट, स्थानिक नैसर्गिक आपत्ती (गारपीट, भूस्खलन,जलमय क्षेत्र, ढगफुटी, वीज कोसळणे), काढणी पश्चात नुकसान (गारपीट,चक्रीवादळ व बिगर मोसमी पाऊस) याबाबींचा समावेश होतो.

सन खरीप २०२३ मध्ये धाराशिव जिल्ह्यात प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अंमलबजावणी एचडीएफसी इर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत करण्यात असून योजनेअंतर्गत खरीप २०२३ मध्ये पावसातील खंडामुळे ५७ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना मध्य हंगाम प्रतिकुल परिस्थिती अतर्गत २५ टक्के अग्रिम रक्कम नुकसान भरपाई अंतर्गत ५.५४ लाख शेतकऱ्यांना रु.२५७.६४ कोटी नुकसान भरपाई निश्चित झालेली आहे. त्यापैकी ५.४६ लाख शेतकऱ्यांना रु.२५६.५१ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आलेली आहे. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबींकरीता १.९४ लाख शेतकऱ्यांना रु.४१.१७ कोटी नुकसान भरपाई निश्चित झालेली आहे.

पु.पा.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १८७६

**श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १८७६ पुढील प्रमाणे आहे:-**

"कंपनी आर. सी. एफ. चेंबुर, मुंबई -४०० ०७० मुंबईतील, चेंबुर स्थित आर. सी. एफ. कंपनीला मुंबई उच्च न्यायालयाने Write Petition ३२६७/२०२३ च्या आदेशाची अवमान करीत रेल्वे माथाडी मंडळाला न कळविता प्रवेश परवाना प्रक्रियेमध्ये बदल करुन रेल्वे मंडळ टोळी क्र.१९५ मधील मागास वर्गीय जातीचे कामगारांना मागील ८ महिन्यांपासून बेकायदेशीर रित्या प्रवेश परवाना रोखून कामगारांवर अन्याय सुरू असणे. तरी उच्च न्यायालयाच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन प्रवेश नुकसान भरपाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन**

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमाच्या कलम-४ अन्वये तयार केलेली दि रेल्वे गुडस क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डीग असंरक्षित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, १९७६ बृहन्मुंबई, ठाणे, पालघर व रायगड या जिल्हा क्षेत्रास लागू केली आहे.

मे.आर.सी.एफ.लि., चेंबूर, मुंबई ही आस्थापना मंडळात नोंदीत असून माथाडी स्वरुपाच्या कामाकरीता थेट नेमून दिलेले ४९३ व ठेकेदारामार्फत नेमून दिलेले १०५ कामगार असे एकूण ५९८ कामगार सदरहू आस्थापनेत कार्यरत आहेत.

कंपनी आवारातील जिप्सम पॉन्डमध्ये ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले १०५ कामगार (टोळी क्र. १९० ते १९५) सन २०१८ पासून जिप्सम पॉन्डमधील काम कमी झाल्याने कंपनी आवारातील बदली कामगार म्हणून तसेच इतर माथाडी स्वरुपाच्या उपलब्ध कामावर कार्यरत होते.

जिप्सम पॉन्डमधील एकूण कामगारांपैकी सुमारे ८९ कामगारांचे प्रतिनिधीत्व महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन व सुमारे १६ कामगारांचे प्रतिनिधीत्व नविन अखिल महाराष्ट्र माथाडी वाहतूक आणि जनरल कामगार संघटना करत आहेत.

उपरोक्त टोळी क्र.१९५ मधील कामगारांनी त्यांना पुरेसे काम व कंत्राटदारामार्फत प्रवेश मिळण्याऐवजी कंपनीमार्फत प्रवेश परवाने मिळावे, या मागणीच्या अनुषंगाने आंदोलन केले होते. तथापी, सदर आंदोलनाच्या अनुषंगाने आर.सी.एफ. या व्यवस्थापनाने मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. (L) १३४०३/२०२२ दाखल केली होती. सदर याचिकेतील

निर्देशानुसार मंडळाने सर्व संबंधीतांना सुनावणीची संधी दिली होती. त्या अनुषंगाने दि. २६/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दि रेल्वे गुडस क्लिअरींग अॅण्ड फॉरवर्डीग असंरक्षित कामगार मंडळाने "श्री. सदाशिव नारायण पुकळे व श्री. रमेश तुकाराम नांगरे यांचेसह मंडळाने नेमून दिलेल्या व प्रवेश परवाने प्रलंबित असलेल्या एकूण १३ कामगारांना प्रवेश द्यावेत. तसेच यापुढे मंडळाने नेमून दिलेल्या कामगारांना व्यवस्थापनाने विना अट प्रवेश परवाने द्यावेत, या व्यतिरिक्त प्रवेश परवान्याबाबत मंडळाच्या लेखी परवानगी शिवाय कंपनीने परस्पर निकषामध्ये कोणतेही बदल करू नये," असे कळविले आहे.

मंडळाच्या उपरोक्त दिलेल्या दि.२६/०५/२०२२ रोजीच्या निर्णयास व्यवस्थापनाने याचिका क्र.३२६७/२०२२ दाखल करुन आव्हानीत केले होते. सदर याचिका दि. ११/११/२०२२ रोजीच्या निर्णयाद्वारे मा.उच्च न्यायालयात निकाली काढण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयास अनुसरून उपस्थित १३ कामगारांपैकी याचिकेतील नमुद कामगार श्री.सदाशिव नारायण पुकळे, श्री.रमेश तुकाराम नांगरे व इतर कामगारांना ते कामाकरीता नियमित उपस्थित राहतील या अटीवर प्रवेश परवाने देण्यात आलेले आहेत. व उर्वरीत ३ कामगारांना यापूर्वीच परवाने दिलेले आहेत.

मंडळाने टोळी क्र. १९५ व त्यांच्या संघटनेने केलेल्या तक्रारीबाबत मंडळ स्तरावर बैठक आयोजित केली होती. त्यास अनुसरून कंपनी व्यवस्थापनाने त्यांच्या दि.१६/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये जिप्सम पॉन्डमधील कोविड स्थित कामगारांना मानवतावाद दृष्टीकोनातून प्रवेश परवाने दिले होते. सदर कामगार कंपनीच्या सरळसेवेतील नसल्याने व त्यांची नियुक्ती ठेकेदारामार्फत असल्याने त्यांना कंत्राटदारामार्फत कामावर येण्यासाठी कंपनीने कळविले आहे. या भूमिकेवर व्यवस्थापन ठाम आहे.

वरील स्थितीत टोळी क्र.१९५ मधील कामगारांची संघटना नविन अखिल महाराष्ट्र माथाडी वाहतूक आणि जनरल कामगार संघटना यांनी कंपनीमार्फत प्रवेश परवान्यासह पुरेसे काम मिळावे या मागणीची पूर्तता न झाल्याने आझाद मैदान येथे फेब्रुवारी २०२४ दरम्यान आंदोलन केले होते. सदर आंदोलनाच्या अनुषंगाने दि.०१/०३/२०२४ रोजी कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधीतांची बैठक घेण्यात आली होती. बैठकीच्या अनुषंगाने माथाडी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी उपोषण स्थळी भेट देऊन आंदोलन थांबविण्यासाठी प्रयत्न केले. परंतु त्यास कामगार व त्यांच्या संघटनेकडून उचित प्रतिसाद मिळाला नाही.

वरील सर्व स्थितीत संबंधीत कामगार व त्यांची संघटना कंपनीमार्फत प्रवेश परवानेसह पुरेसे काम मिळावे या मागणी वर ठाम असून कामगारांना नेमून दिलेल्या कामावर कामगार अनुपस्थितीत आहेत, याप्रकरणी सुयोग्य तोडगा निघण्याच्या दृष्टीने माथाडी मंडळ, कामगार आयुक्त यांचेमार्फत संयुक्त बैठका व लेखी सूचनांव्दारे वेळोवेळी प्रयत्न केलेले आहेत.

*****

निर्देशानुसार मंडळाने सर्व संबंधीतांना सुनावणीची संधी दिली होती. त्या अनुषंगाने दि. २६/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दि रेल्वे गुडस क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डीग असंरक्षित कामगार मंडळाने "श्री. सदाशिव नारायण पुकळे व श्री. रमेश तुकाराम नांगरे यांचेसह मंडळाने नेमून दिलेल्या व प्रवेश परवाने प्रलंबित असलेल्या एकूण १३ कामगारांना प्रवेश द्यावेत, तसेच यापुढे मंडळाने नेमून दिलेल्या कामगारांना व्यवस्थापनाने विना अट प्रवेश परवाने द्यावेत, या व्यतिरिक्त प्रवेश परवान्याबाबत मंडळाच्या लेखी परवानगी शिवाय कंपनीने परस्पर निकषामध्ये कोणतेही बदल करू नये," असे कळविले आहे.

मंडळाच्या उपरोक्त दिलेल्या दि.२६/०५/२०२२ रोजीच्या निर्णयास व्यवस्थापनाने याचिका क्र.३२६७/२०२२ दाखल करुन आव्हानीत केले होते. सदर याचिका दि. ११/११/२०२२ रोजीच्या निर्णयाद्वारे मा.उच्च न्यायालयात निकाली काढण्यात आली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयास अनुसरून उपस्थित १३ कामगारांपैकी याचिकेतील नमुद कामगार श्री.सदाशिव नारायण पुकळे, श्री.रमेश तुकाराम नांगरे व इतर कामगारांना ते कामाकरीता नियमित उपस्थित राहतील या अटीवर प्रवेश परवाने देण्यात आलेले आहेत. व उर्वरीत ३ कामगारांना यापूर्वीच परवाने दिलेले आहेत.

मंडळाने टोळी क्र. १९५ व त्यांच्या संघटनेने केलेल्या तक्रारीबाबत मंडळ स्तरावर बैठक आयोजित केली होती. त्यास अनुसरून कंपनी व्यवस्थापनाने त्यांच्या दि.१६/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये जिप्सम पॉन्डमधील कोविड स्थित कामगारांना मानवतावाद दृष्टीकोनातून प्रवेश परवाने दिले होते. सदर कामगार कंपनीच्या सरळसेवेतील नसल्याने व त्यांची नियुक्ती ठेकेदारामार्फत असल्याने त्यांना कंत्राटदारामार्फत कामावर येण्यासाठी कंपनीने कळविले आहे. या भूमिकेवर व्यवस्थापन ठाम आहे.

वरील स्थितीत टोळी क्र.१९५ मधील कामगारांची संघटना नविन अखिल महाराष्ट्र माथाडी वाहतूक आणि जनरल कामगार संघटना यांनी कंपनीमार्फत प्रवेश परवान्यासह पुरेसे काम मिळावे या मागणीची पूर्तता न झाल्याने आझाद मैदान येथे फेब्रुवारी २०२४ दरम्यान आंदोलन केले होते. सदर आंदोलनाच्या अनुषंगाने दि.०१/०३/२०२४ रोजी कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधीतांची बैठक घेण्यात आली होती. बैठकीच्या अनुषंगाने माथाडी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी उपोषण स्थळी भेट देऊन आंदोलन थांबविण्यासाठी प्रयत्न केले. परंतु त्यास कामगार व त्यांच्या संघटनेकडून उचित प्रतिसाद मिळाला नाही.

वरील सर्व स्थितीत संबंधीत कामगार व त्यांची संघटना कंपनीमार्फत प्रवेश परवानेसह पुरेसे काम मिळावे या मागणी वर ठाम असून कामगारांना नेमून दिलेल्या कामावर कामगार अनुपस्थितीत आहेत, याप्रकरणी सुयोग्य तोडगा निघण्याच्या दृष्टीने माथाडी मंडळ, कामगार आयुक्त यांचेमार्फत संयुक्त बैठका व लेखी सूचनांव्दारे वेळोवेळी प्रयत्न केलेले आहेत.

*****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १८७६**

**श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १८७६ पुढील प्रमाणे आहेः-**

"कंपनी आर. सी. एफ. चेंबुर, मुंबई -४०० ०७० मुंबईतील, चेंबुर स्थित आर. सी. एफ. कंपनीला मुंबई उच्च न्यायालयाने Write Petition ३२६७/२०२३ च्या आदेशाची अवमान करीत रेल्वे माथाडी मंडळाला न कळविता प्रवेश परवाना प्रक्रियेमध्ये बदल करुन रेल्वे मंडळ टोळी क्र.१९५ मधील मागास वर्गीय जातीचे कामगारांना मागील ८ महिन्यांपासून बेकायदेशीर रित्या प्रवेश परवाना रोखून कामगारांवर अन्याय सुरू असणे. तरी उच्च न्यायालयाच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन प्रवेश नुकसान भरपाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन**

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमाच्या कलम-४ अन्वये तयार केलेली दि रेल्वे गुडस क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डीग असंरक्षित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, १९७६ बृहन्मुंबई, ठाणे, पालघर व रायगड या जिल्हा क्षेत्रास लागू केली आहे.

मे.आर.सी.एफ.लि., चेंबूर, मुंबई ही आस्थापना मंडळात नोंदीत असून माथाडी स्वरुपाच्या कामाकरीता थेट नेमून दिलेले ४९३ व ठेकेदारामार्फत नेमून दिलेले १०५ कामगार असे एकूण ५९८ कामगार सदरहू आस्थापनेत कार्यरत आहेत.

कंपनी आवारातील जिप्सम पॉन्डमध्ये ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले १०५ कामगार (टोळी क्र. १९० ते १९५) सन २०१८ पासून जिप्सम पॉन्डमधील काम कमी झाल्याने कंपनी आवारातील बदली कामगार म्हणून तसेच इतर माथाडी स्वरुपाच्या उपलब्ध कामावर कार्यरत होते.

जिप्सम पॉन्डमधील एकूण कामगारांपैकी सुमारे ८९ कामगारांचे प्रतिनिधीत्व महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन व सुमारे १६ कामगारांचे प्रतिनिधीत्व नविन अखिल महाराष्ट्र माथाडी वाहतूक आणि जनरल कामगार संघटना करत आहेत.

उपरोक्त टोळी क्र.१९५ मधील कामगारांनी त्यांना पुरेसे काम व कंत्राटदारामार्फत प्रवेश मिळण्याऐवजी कंपनीमार्फत प्रवेश परवाने मिळावे, या मागणीच्या अनुषंगाने आंदोलन केले होते. तथापी, सदर आंदोलनाच्या अनुषंगाने आर.सी.एफ. या व्यवस्थापनाने मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. (L) १३४०३/२०२२ दाखल केली होती. सदर याचिकेतील

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १९०८

**श्रीमती यामिनी यशवंत जाधव, डॉ.जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९०८ पुढील प्रमाणे आहे:-**

"लोखंड व पोलाद कामगार मंडळ तसेच धातू व कागद बाजार आणि दुकाने माथाडी कामगार मंडळ तसेच धातू व कागद बाजार आणि दुकाने माथाडी कामगार मंडळ या दोन्ही मंडळावर चेअरमन म्हणून श्री दिनेश दाभाडे कार्यरत असल्याने पदाचा उपयोग करुन योजनेचा गैरवापर व माथाडी कायद्याचे उल्लंघन करणे, नोंदणीकृत टोळी/गट कार्यरत कामगारांना कामाचे नियत वाटप न करता मर्जीतील व आर्थिक लाभ प्राप्त होणाऱ्या कामगारांना कामाचे वाटप करणे, यासाठी गुंड प्रवृत्तीच्या श्री.दत्ता पवारांना हाताशी धरणे, शासन दरबारी श्री.दिनेश दाभाडे व श्री.दत्ता पवार यांच्याविरुद्ध तक्रारी करूनही कारवाई न होणे, त्यामुळे अधिकृत कामगारांना रोजगारापासुन वंचित राहावे लागणे, तसेच आस्थापना मालकांना अपप्रवृतीच्या लोकांमुळे त्रास सहन करावा लागणे, अनधिकृत कामगाराना बेकायदेशीर पोलीस संरक्षण देऊ करणे, अधिकृत कामगारांना काम मिळत नसल्यामुळे कामगार व मंडळ यांच्यात तीव्र संघर्ष निर्माण होऊन, सर्वदूर असंतोष पसरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, याबाबत शासनाने वेळीच हस्तक्षेप करण्याची गरज विचारात घेता, शासनाने श्री.दाभाडे यांना बडतर्फ करुन त्यांची सक्षम अधिकाऱ्यांमार्फत चौकशी होण्याबावत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन**

मुंबई लोखंड व पोलाद बाजार मंडळाच्या कार्यक्षेत्रात सद्या कार्यरत मालक ९११ असून २९९९ नोदीत कामगार कार्यरत आहेत. मंडळाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ व मंडळ योजना याची अंमलबजावणी करण्याचे काम मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाद्वारे केले जाते

मंडळाच्या कार्यक्षेत्रातील एकाच आस्थापनेच्या कामावरुन अनेक स्थानिक अनोंदीत कामगार तसेच मंडळातील नोंदीत गट व त्यांच्या संघटनांनी मागणी केल्याने विवाद उपस्थित होत असतात. त्यावर मंडळाच्या अध्यक्षांसमोर सर्व सबंधितांच्या बैठका घेऊन माथाडी अधिनियम व मंडळ योजना यातील कायदेशीर बाबींचा विचार करुन ज्या गटाचा त्या कामावर हक्क पोहचतो त्यास कामाचे आदेश देण्यात येतात. एकाच कामावर अनेकानी दावा सांगितल्याने कोणात्याही एका गटास मंडळाने कामाचे आदेश दिल्यास इतर गट व त्यांची संघटना पदाधिकारी सदर आदेशाबाबत नाखूष झाल्याने विविध स्तरावर नाराजी व्यक्त करतात.

वास्ताविक मंडळाच्या आदेश/निर्णयाने व्यथित झाल्यास त्यावर वरिष्ठांकडे अपील दाखल करणे अथवा सदरच्या आदेशास न्यायालयात दाद मागणे माथाडी अधिनियम व मंडळ योजनेनुसार अपेक्षित आहे.

श्री.दत्ता पवार हे मंडळाचे नोंदीत कामगार नसल्याचे मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, कळंबोली व धातू कागद बाजार माथाडी मंडळ, मुंबई यांच्या अभिलेखावरुन दिसून येते. परंतु, या उपरोक्त मंडळाशी झालेल्या पत्रव्यवहारानुसार ते भूमिपूत्र माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार संघटना, मणीरत्न, दिवे अजूर गांव, पो. अंजूर, पेट्रोल पंपाजवळ, मुंबई नाशिक हायवे, भिवंडी या संघटनेचे कार्याध्यक्ष असल्याचे त्या संघटनेच्या लेटरहेड वरून दिसून येते.

कामगार आयुक्त यांच्या कार्यालयास श्री.दिनेश दाभाडे व श्री.दत्ता पवार यांच्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता, सदरच्या तक्रारी या दोन मंडळातील वाद किंवा विरुद टोळ्यांमधील वाद या स्वरुपाचे असल्याचे आढळून आले आहे. श्री.दत्ता पवार (भालेघरे) हे कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई येथील नोंदीत कामगार आहेत. सदर मंडळाकडे विचारणा केली असता, श्री. दत्ता पवार या नोंदीत माथाडी कामगारांविरुध्द त्यांच्याकडे कोणात्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे कळविले आहे.

*****

वास्ताविक मंडळाच्या आदेश/निर्णयाने व्यथित झाल्यास त्यावर वरिष्ठांकडे अपील दाखल करणे अथवा सदरच्या आदेशास न्यायालयात दाद मागणे माथाडी अधिनियम व मंडळ योजनेनुसार अपेक्षित आहे.

श्री.दत्ता पवार हे मंडळाचे नोंदीत कामगार नसल्याचे मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, कळंबोली व धातू कागद बाजार माथाडी मंडळ, मुंबई यांच्या अभिलेखावरुन दिसून येते. परंतु, या उपरोक्त मंडळाशी झालेल्या पत्रव्यवहारानुसार ते भूमिपूत्र माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार संघटना, मणीरत्न, दिवे अजूर गांव, पो. अंजूर, पेट्रोल पंपाजवळ, मुंबई नाशिक हायवे, भिवंडी या संघटनेचे कार्याध्यक्ष असल्याचे त्या संघटनेच्या लेटरहेड वरून दिसून येते.

कामगार आयुक्त यांच्या कार्यालयास श्री.दिनेश दाभाडे व श्री.दत्ता पवार यांच्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता, सदरच्या तक्रारी या दोन मंडळातील वाद किंवा विरुद टोळयांमधील वाद या स्वरुपाचे असल्याचे आढळून आले आहे. श्री.दत्ता पवार (भालेघरे) हे कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई येथील नोंदीत कामगार आहेत. सदर मंडळाकडे विचारणा केली असता, श्री. दत्ता पवार या नोंदीत माथाडी कामगारांविरुध्द त्यांच्याकडे कोणात्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे कळविले आहे.

*****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १९०८

**श्रीमती यामिनी यशवंत जाधव, डॉ.जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९०८ पुढील प्रमाणे आहे:-**

"लोखंड व पोलाद कामगार मंडळ तसेच धातू व कागद बाजार आणि दुकाने माथाडी कामगार मंडळ तसेच धातू व कागद बाजार आणि दुकाने माथाडी कामगार मंडळ या दोन्ही मंडळावर चेअरमन म्हणून श्री दिनेश दाभाडे कार्यरत असल्याने पदाचा उपयोग करुन योजनेचा गैरवापर व माथाडी कायद्याचे उल्लंघन करणे, नोंदणीकृत टोळी/गट कार्यरत कामगारांना कामाचे नियत वाटप न करता मर्जीतील व आर्थिक लाभ प्राप्त होणाऱ्या कामगारांना कामाचे वाटप करणे, यासाठी गुंड प्रवृत्तीच्या श्री.दत्ता पवारांना हाताशी धरणे, शासन दरबारी श्री.दिनेश दाभाडे व श्री.दत्ता पवार यांच्याविरुद्ध तक्रारी करूनही कारवाई न होणे, त्यामुळे अधिकृत कामगारांना रोजगारापासुन वंचित राहावे लागणे, तसेच आस्थापना मालकांना अपप्रवृतीच्या लोकांमुळे त्रास सहन करावा लागणे, अनधिकृत कामगाराना बेकायदेशीर पोलीस संरक्षण देऊ करणे, अधिकृत कामगारांना काम मिळत नसल्यामुळे कामगार व मंडळ यांच्यात तीव्र संघर्ष निर्माण होऊन, सर्वदूर असंतोष पसरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, याबाबत शासनाने वेळीच हस्तक्षेप करण्याची गरज विचारात घेता, शासनाने श्री.दाभाडे यांना बडतर्फ करुन त्यांची सक्षम अधिकाऱ्यांमार्फत चौकशी होण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (कामगार) यांचे निवेदन**

मुंबई लोखंड व पोलाद बाजार मंडळाच्या कार्यक्षेत्रात सद्या कार्यरत मालक ९११ असून २९९९ नोदीत कामगार कार्यरत आहेत. मंडळाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ व मंडळ योजना याची अंमलबजावणी करण्याचे काम मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाद्वारे केले जाते

मंडळाच्या कार्यक्षेत्रातील एकाच आस्थापनेच्या कामावरुन अनेक स्थानिक अनोंदीत कामगार तसेच मंडळातील नोंदीत गट व त्यांच्या संघटनांनी मागणी केल्याने विवाद उपस्थित होत असतात. त्यावर मंडळाच्या अध्यक्षांसमोर सर्व सबंधितांच्या बैठका घेऊन माथाडी अधिनियम व मंडळ योजना यातील कायदेशीर बाबींचा विचार करुन ज्या गटाचा त्या कामावर हक्क पोहचतो त्यास कामाचे आदेश देण्यात येतात. एकाच कामावर अनेकानी दावा सांगितल्याने कोणात्याही एका गटास मंडळाने कामाचे आदेश दिल्यास इतर गट व त्यांची संघटना पदाधिकारी सदर आदेशाबाबत नाखूष झाल्याने विविध स्तरावर नाराजी व्यक्त करतात.

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. २०४५**

**श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २०४५ पुढील प्रमाणे आहे:-**

"मुंबई लोखंड व पोलाद मंडळामध्ये एल ॲन्ड टी कंपनीने केवळ आस्थापना नोंदणी केली असणे, कंपनीने कोणत्याही टोळीबाबत अधिकृत नोंदणी केली नसणे, अध्यक्ष मुंबई लोखंड व पोलाद मंडळाच्या अध्यक्षांनी माथाडी कायद्याचा धाक दाखवून अध्यक्ष स्वतः निष्क्रीय भागीदार असलेल्या टोळी क्र.४२ ते ५१ यांची नियमबाह्य पध्दतीने नेमणूक करणे, या टोळी क्र.४२ ते ५१ ने कंपनीकडून एक कोटी इतक्या रक्कमेची वसूली केली असणे, याबाबत मंडळ अध्यक्षांनी कंपनीने तक्रार करून ही कार्यवाही न करणे कंपनीस टोळी क्र.४२ ते ५१ नाकारली असतानाही मंडळ अध्यक्ष टोळी क्र.४२ ते ५१ या टोळीची नेमणूक करणे यासर्व प्रकारामुळे माथाडी कामगार व्यवस्था बदनाम होत असणे, तरी मंडळ अध्यक्षांची नियमानुसार काम न करून पदाचा केलेला दुरूपयोग त्यांना पदावरून दूर करण्याची व टोळी क्र.४२ ते ५१ यांची एल ॲन्ड टी कंपनीची नियमबाह्य नेमणूक रद्द करण्याची आवश्यकता विचारात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

### मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

मे.लार्सन ॲण्ड टुब्रो लि., पवई वर्क्स, साकी विहार रोड, मुंबई- ४०००७२ ही आस्थापना मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळात दि.२९.०४.१९७६ रोजी मालक म्हणून नोंदीत झालेली असून तिचा नोंदणी क्रमांक ४९५ आहे. आस्थापनेच्या माथाडी स्वरूपाच्या कामासाठी मंडळाने माथाडी कामगारांच्या गट क्र. ४२ ते ५१ मधील कामगार नेमून दिलेले आहेत. सद्या गट क्र.४२ ते ५१ या गटामध्ये १७१ कामगार कार्यरत आहेत. तसेच सुमारे २९६ आस्थापना सदरच्या गट क्र.४२ ते ५१ ला नोंदीत मालक आहेत. त्यापैकी सद्या केवळ १० आस्थापना कार्यरत असून त्यांची मजूरी व लेव्हीची रक्कम मंडळात जमा होत आहे

माहे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत मे. एल ॲण्ड टी लि., आस्थापनेकडून रु. १,८०,९७,०७५/- एवढी मजूरी व लेव्हीची रक्कम मंडळात जमा झालेली आहे. सदरहू गट क्र.४२ ते ५१ मधील कामगारांना माहे एप्रिल, २०२४ मध्ये रू.२९,११६.६० /- एवढे सरासरी वेतन प्राप्त झालेले आहे.

मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळात मुख्यत्वे नोंदीत बांधकाम मालकांची मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध विभागात कामे सुरू असतात. त्यामध्ये बांधकामाशी अनुसरून लोखंडी सामानाच्या लोडींग-अनलोडींगची कामे केली जातात. सदरच्या कामावर मंडळाने त्या मालकांकरीता नेमून न दिलेला गट, स्थानिक अनोंदीत कामगार

हक्क सांगत असतात. त्यामुळे अशाप्रकरणी मंडळामध्ये विवाद निर्माण होतात. सदरील विवाद हे विहित मार्गदर्शक तत्वांचा वापर करून माथाडी मंडळामार्फत सोडविले जातात. मंडळातील नोंदीत मालकाकडे यापूर्वी नेमून दिलेल्या गटालाच त्या मालकांच्या नवीन ठिकाणी सुरू झालेले काम वाटपाचे आदेश देण्याच्या प्रचलित पध्दतीचा वापर मंडळाने वेळोवेळी केलेला आहे.

याप्रकरणी सुध्दा प्रचलित पध्दतीचा वापर करून मंडळाद्वारे नवीन कामांवर कामगार नेमणूक आदेश दिले आहेत. त्यामुळे मंडळाच्या पूर्वीपासून काम करणाऱ्या गटांना व त्यातील कामगारांना माथाडी अधिनियम व मंडळ योजना यातील तरतूदीच्या लाभाचे संरक्षण मिळत आहे.

मे.एल.ॲण्ड टी.लि., ही आस्थापना मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळातील जुनी नोंदीत मालक असून त्यांच्याद्वारे मंडळाच्या कार्यक्षेत्रक्षात मोठ्या प्रमाणात मुलभूत विकासाची बांधकाम कामे करण्यात येत आहेत. विविध भागातील स्थानिक अनोंदीत कामगार व मंडळातील इतर गट हे त्यांच्या संघटना त्यांच्या माध्यमातून मंडळाच्या परस्पर वर्क ऑर्डर / कामाची पत्रे मिळवून सदरच्या ठिकाणी मंडळाद्वारे कामगार नेमणूकीचे आदेश मिळविण्यासाठी प्रयत्न करत असतात. परंतु मंडळाने मे. एल. ॲण्ड टी. यांना नेमून दिलेला गट क्र.४२ ते ५१ हा गट मंडळातील सुमारे १७१ कामगारांचा मोठा गट आहे व मंडळाच्या माहितीनुसार त्यातील कामगार नेमून दिलेल्या ठिकाणी काम करत असून केलेल्या सर्व मजूरीचा भरणा मंडळात करत आहेत. तसेच मंडळामार्फत माथाडी अधिनियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाते

*****

हक्क सांगत असतात. त्यामुळे अशाप्रकरणी मंडळामध्ये विवाद निर्माण होतात. सदरील विवाद हे विहित मार्गदर्शक तत्वांचा वापर करून माथाडी मंडळामार्फत सोडविले जातात. मंडळातील नोंदीत मालकाकडे यापूर्वी नेमून दिलेल्या गटालाच त्या मालकांच्या नवीन ठिकाणी सुरू झालेले काम वाटपाचे आदेश देण्याच्या प्रचलित पध्दतीचा वापर मंडळाने वेळोवेळी केलेला आहे.

याप्रकरणी सुध्दा प्रचलित पध्दतीचा वापर करून मंडळाद्वारे नवीन कामांवर कामगार नेमणूक आदेश दिले आहेत. त्यामुळे मंडळाच्या पूर्वीपासून काम करणाऱ्या गटांना व त्यातील कामगारांना माथाडी अधिनियम व मंडळ योजना यातील तरतूदीच्या लाभाचे संरक्षण मिळत आहे.

मे.एल.ॲण्ड टी.लि., ही आस्थापना मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळातील जुनी नोंदीत मालक असून त्यांच्याद्वारे मंडळाच्या कार्यक्षेत्रक्षात मोठ्या प्रमाणात मुलभूत विकासाची बांधकाम कामे करण्यात येत आहेत. विविध भागातील स्थानिक अनोंदीत कामगार व मंडळातील इतर गट हे त्यांच्या संघटना त्यांच्या माध्यमातून मंडळाच्या परस्पर वर्क ऑर्डर / कामाची पत्रे मिळवून सदरच्या ठिकाणी मंडळाद्वारे कामगार नेमणूकीचे आदेश मिळविण्यासाठी प्रयत्न करत असतात. परंतु मंडळाने मे. एल. ॲण्ड टी. यांना नेमून दिलेला गट क्र.४२ ते ५१ हा गट मंडळातील सुमारे १७१ कामगारांचा मोठा गट आहे व मंडळाच्या माहितीनुसार त्यातील कामगार नेमून दिलेल्या ठिकाणी काम करत असून केलेल्या सर्व मजूरीचा भरणा मंडळात करत आहेत. तसेच मंडळामार्फत माथाडी अधिनियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाते

*****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २०४५

**श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २०४५ पुढील प्रमाणे आहे:-**

"मुंबई लोखंड व पोलाद मंडळामध्ये एल अॅन्ड टी कंपनीने केवळ आस्थापना नोंदणी केली असणे, कंपनीने कोणत्याही टोळीबाबत अधिकृत नोंदणी केली नसणे, अध्यक्ष मुंबई लोखंड व पोलाद मंडळाच्या अध्यक्षांनी माथाडी कायद्याचा धाक दाखवून अध्यक्ष स्वतः निष्क्रीय भागीदार असलेल्या टोळी क्र.४२ ते ५१ यांची नियमबाह्य पध्दतीने नेमणूक करणे, या टोळी क्र.४२ ते ५१ ने कंपनीकडून एक कोटी इतक्या रक्कमेची वसूली केली असणे, याबाबत मंडळ अध्यक्षांनी कंपनीने तक्रार करून ही कार्यवाही न करणे कंपनीस टोळी क्र.४२ ते ५१ नाकारली असतानाही मंडळ अध्यक्ष टोळी क्र.४२ ते ५१ या टोळीची नेमणूक करणे यासर्व प्रकारामुळे माथाडी कामगार व्यवस्था बदनाम होत असणे, तरी मंडळ अध्यक्षांची नियमानुसार काम न करून पदाचा केलेला दुरूपयोग त्यांना पदावरून दूर करण्याची व टोळी क्र.४२ ते ५१ यांची एल अॅन्ड टी कंपनीची नियमबाह्य नेमणूक रद्द करण्याची आवश्यकता विचारात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

मे.लार्सन अॅण्ड टुब्रो लि., पवई वर्क्स, साकी विहार रोड, मुंबई- ४०००७२ ही आस्थापना मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळात दि.२९.०४.१९७६ रोजी मालक म्हणून नोंदीत झालेली असून तिचा नोंदणी क्रमांक ४९५ आहे. आस्थापनेच्या माथाडी स्वरूपाच्या कामासाठी मंडळाने माथाडी कामगारांच्या गट क्र. ४२ ते ५१ मधील कामगार नेमून दिलेले आहेत. सद्या गट क्र.४२ ते ५१ या गटामध्ये १७१ कामगार कार्यरत आहेत. तसेच सुमारे २९६ आस्थापना सदरच्या गट क्र.४२ ते ५१ ला नोंदीत मालक आहेत. त्यापैकी सद्या केवळ १० आस्थापना कार्यरत असून त्यांची मजूरी व लेव्हीची रक्कम मंडळात जमा होत आहे

माहे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत मे. एल अॅण्ड टी लि., आस्थापनेकडून रु. १,८०,९७,०७५/- एवढी मजूरी व लेव्हीची रक्कम मंडळात जमा झालेली आहे. सदरहू गट क्र.४२ ते ५१ मधील कामगारांना माहे एप्रिल, २०२४ मध्ये रू.२९,११६.६० /- एवढे सरासरी वेतन प्राप्त झालेले आहे.

मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार कामगार मंडळात मुख्यत्वे नोंदीत बांधकाम मालकांची मंडळाच्या कार्यक्षेत्रातींल विविध विभागात कामे सुरू असतात. त्यामध्ये बांधकामाशी अनुसरून लोखंडी सामानाच्या लोडींग-अनलोडींगची कामे केली जातात. सदरच्या कामावर मंडळाने त्या मालकांकरीता नेमून न दिलेला गट, स्थानिक अनोंदीत कामगार

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

२८५.

लक्षवेधी सूचना क्र. २०६८

**श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२०६८ पुढील प्रमाणे आहेः-**

"रेल्वे माथाडी मंडळातील टोळी क्र.४४ मधील माथाडी कामगारांना रेल्वे मंडळाने नोंदी करून रेलनीर पाण्याच्या बाटल्यांच्या वाहतूक व माल हाताळणीकरीता नेमणूक केलेली असून मजूरी व लेव्हीची रक्कम रेल्वे माथाडी मंडळात जमा करण्यात येणे, माथाडी अधिनियमांतर्गत मंडळांना लागू असलेल्या योजनेबाबत वाद उद्भवल्यास अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, राज्य शासन याबाबत सल्लागार समितीशी विचारविनिमय करून अंतिम निर्णय घेण्यास सक्षम आहे, अशी स्पष्ट तरतूद असतानासुध्दा सह आयुक्त, कामगार (माथाडी) यांनी माथाडी अधिनियमाच्या तरतूदींशी विसंगत शासनाची मान्यता न घेता, कलम २ (क) मधील तरतूदींचा संदर्भ देवून परस्पर चुकीचे निर्णय दिले असल्याचे निदर्शनास येणे, सह आयुक्त (कामगार) यांनी रेल्वे गुड्स क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग मंडळ व माल वाहतूक कामगार मंडळ यांची संयुक्त बैठक घेवून अधिनियमाच्या कलम १४ नुसार सल्लागार समितीसमोर उपरोक्त प्रकरण सादर न करता व राज्य शासनाची मान्यता न घेता व्यक्तीगत हितासाठी परस्पर निर्णय देणे, तरी याप्रकरणी माथाडी अधिनियमाच्या कलम २३ नुसार शासनाने चौकशी करून सह आयुक्त, कामगार (माथाडी) यांनी परस्पर दिलेल्या सर्व आदेशांना स्थगिती देवून दोषींविरूध्द चौकशी करून शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

मुंबईतील रेल्वेच्या वेस्टर्न विभागातील उपनगरीय रेल्वे स्थानकांच्या आवारामध्ये रेल्वे फ्लॅटफार्मवर विक्रीसाठी पुरविण्यात येणाऱ्या रेलनीर बॉटल्स (पिण्याचे पाणी) हाताळणीचे कामाचा ठेका मे.शुभम एंटरप्रायजेस यांना मिळाला होता. मे.शुभम एंटरप्रायजेस यांनी १० कामगारांच्या नोंदणीचा प्रस्ताव मंडळाला प्राप्त झाल्यानंतर दि.२०.११.२०१७ रोजी मे.शुभम एंटरप्रायझेस यांची मालक म्हणून व १० कामगारांची माथाडी कामगार म्हणून नोंदणी केली असून दि.२३.११.२०१७ रोजीच्या पत्राद्वारे टोळी क्र.४४ च्या कामगारांचे नियत वाटप करण्यात आले होते.

त्यानंतर डिसेंबर २०१७ व जानेवारी २०१८ या दोन महिन्यांची मजुरी मे.शुभम एंटरप्रायझेस यांच्यावतीने मंडळामध्ये जमा झालेली असून, मजुरीचे वाटप टोळी क्र.४४ च्या कामगारांना करण्यात आलेले आहे. तथापि, जानेवारी २०१८ नंतर सदर टोळीचे काम बंद झाले.

मे.शुभम एंटरप्रायझेस यांनी त्यांच्या मालक नोंदणी अर्जासोबत मे.डारसेल लॉजिस्टिक या रेलनीर बॉटल्सच्या वाहतूक व माल हाताळणींचा ठेका मिळालेल्या आस्थापनेचे ठेकेदार असल्याचे पत्र मंडळात सादर केले होते.

माथाडी अधिनियमांतर्गत तयार केलेली दि रेल्वे गुड्स क्लिअरींग अॅण्ड फॉरवर्डींग एस्टॅब्लिशमेंटस लेबर बोर्ड, मुंबई या मंडळाची योजना, १९७६ मधील तरतुदी आस्थापनेला लागू होतात किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवल्यास ती बाब राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल आणि माथाडी अधिनियमाच्या कलम-१४ अन्वये घटीत केलेल्या सल्लागार समितीशी विचार विनिमय केल्यानंतर शासन यावर निर्णय घेईल व तो निर्णय अंतिम असेल अशी तरतूद माथाडी अधिनियमाच्या कलम-५ मध्ये केलेली आहे.

तथापि, दोन माथाडी मंडळाच्या नोंदीत कामगारांमध्ये निर्माण झालेल्या विवादासंदर्भात औद्योगिक शांतता अबाधित राहण्यासाठी व विवाद सोडविण्यासाठी उभय मंडळांची बैठक बोलावून निर्णय घेण्याचे अधिकार शासनाने दि.१७.०७.२०१४ रोजीच्या पत्राद्वारे सह आयुक्त कामगार (माथाडी) यांना दिलेले आहेत. त्यानुसार दि.१८.०१.२०२२ रोजी उभय मंडळांची बैठक सह आयुक्त कामगार (माथाडी) यांच्याकडे झाली होती. सदर बैठकीतील चर्चा व त्यानुषंगाने रेल्वे माथाडी मंडळाच्या योजनेतील कलम-२ (२) (क) मधील तरतूद विचारात घेवून व संबंधीत बाबी तपासून सह आयुक्त कामगार यांनी दि.१८.०४.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे, सदर आस्थापनेचे काम रेल्वे हद्दीमध्ये होत नसल्याने तसेच सदर कामास माल वाहतूक मंडळाची योजना लागू होत असल्याने रेल्वे मंडळाची योजना लागू होत नसल्याने टोळी क्र.४४ मधील कामगारांचा सदर कामावर हक्क प्रस्तापित होत नाही. अशा स्थितीत माल वाहतूक मंडळातील टोळी क्र.३०१२ चे कामगार रेलनीर बॉटल्स डिलिव्हरी काम करीत असल्याने सदर कामावर त्यांचा कायदेशीर हक्क आहे, अशा सुचना दिलेल्या आहेत. सदर सुचना या शासनाच्या दि.१७.०७.२०१४ च्या पत्रास अनुसरून दिल्याचे दिसून येते.

*****

मे.शुभम एंटरप्रायझेस यांनी त्यांच्या मालक नोंदणी अर्जासोबत मे.डारसेल लॉजिस्टिक या रेलनीर बॉटल्सच्या वाहतूक व माल हाताळणींचा ठेका मिळालेल्या आस्थापनेचे ठेकेदार असल्याचे पत्र मंडळात सादर केले होते.

माथाडी अधिनियमांतर्गत तयार केलेली दि रेल्वे गुड्स क्लिअरींग अँण्ड फॉरवर्डींग एस्टॅब्लिशमेंटस लेबर बोर्ड, मुंबई या मंडळाची योजना, १९७६ मधील तरतुदी आस्थापनेला लागू होतात किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवल्यास ती बाब राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल आणि माथाडी अधिनियमाच्या कलम-१४ अन्वये घटीत केलेल्या सल्लागार समितीशी विचार विनिमय केल्यानंतर शासन यावर निर्णय घेईल व तो निर्णय अंतिम असेल अशी तरतूद माथाडी अधिनियमाच्या कलम-५ मध्ये केलेली आहे.

तथापि, दोन माथाडी मंडळाच्या नोंदीत कामगारांमध्ये निर्माण झालेल्या विवादासंदर्भात औद्योगिक शांतता अबाधित राहण्यासाठी व विवाद सोडविण्यासाठी उभय मंडळांची बैठक बोलावून निर्णय घेण्याचे अधिकार शासनाने दि.१७.०७.२०१४ रोजीच्या पत्राद्वारे सह आयुक्त कामगार (माथाडी) यांना दिलेले आहेत. त्यानुसार दि.१८.०१.२०२२ रोजी उभय मंडळांची बैठक सह आयुक्त कामगार (माथाडी) यांच्याकडे झाली होती. सदर बैठकीतील चर्चा व त्यानुषंगाने रेल्वे माथाडी मंडळाच्या योजनेतील कलम-२ (२) (क) मधील तरतूद विचारात घेवून व संबंधीत बाबी तपासून सह आयुक्त कामगार यांनी दि.१८.०४.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे, सदर आस्थापनेचे काम रेल्वे हद्दीमध्ये होत नसल्याने तसेच सदर कामास माल वाहतूक मंडळाची योजना लागू होत असल्याने रेल्वे मंडळाची योजना लागू होत नसल्याने टोळी क्र.४४ मधील कामगारांचा सदर कामावर हक्क प्रस्तापित होत नाही. अशा स्थितीत माल वाहतूक मंडळातील टोळी क्र.३०१२ चे कामगार रेलनीर बॉटल्स डिलिव्हरी काम करीत असल्याने सदर कामावर त्यांचा कायदेशीर हक्क आहे, अशा सुचना दिलेल्या आहेत. सदर सुचना या शासनाच्या दि.१७.०७.२०१४ च्या पत्रास अनुसरून दिल्याचे दिसून येते.

*****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २०६८

**श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२०६८ पुढील प्रमाणे आहे:-**

"रेल्वे माथाडी मंडळातील टोळी क्र.४४ मधील माथाडी कामगारांना रेल्वे मंडळाने नोंदी करून रेलनीर पाण्याच्या बाटल्यांच्या वाहतूक व माल हाताळणीकरीता नेमणूक केलेली असून मजूरी व लेव्हीची रक्कम रेल्वे माथाडी मंडळात जमा करण्यात येणे, माथाडी अधिनियमांतर्गत मंडळांना लागू असलेल्या योजनेबाबत वाद उद्भवल्यास अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, राज्य शासन याबाबत सल्लागार समितीशी विचारविनिमय करून अंतिम निर्णय घेण्यास सक्षम आहे, अशी स्पष्ट तरतूद असतानासुध्दा सह आयुक्त, कामगार (माथाडी) यांनी माथाडी अधिनियमाच्या तरतूदींशी विसंगत शासनाची मान्यता न घेता, कलम २ (क) मधील तरतूदींचा संदर्भ देवून परस्पर चुकीचे निर्णय दिले असल्याचे निदर्शनास येणे, सह आयुक्त (कामगार) यांनी रेल्वे गुड्स क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग मंडळ व माल वाहतूक कामगार मंडळ यांची संयुक्त बैठक घेवून अधिनियमाच्या कलम १४ नुसार सल्लागार समितीसमोर उपरोक्त प्रकरण सादर न करता व राज्य शासनाची मान्यता न घेता व्यक्तीगत हितासाठी परस्पर निर्णय देणे, तरी याप्रकरणी माथाडी अधिनियमाच्या कलम २३ नुसार शासनाने चौकशी करून सह आयुक्त, कामगार (माथाडी) यांनी परस्पर दिलेल्या सर्व आदेशांना स्थगिती देवून दोषींविरूध्द चौकशी करून शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन**

मुंबईतील रेल्वेच्या वेस्टर्न विभागातील उपनगरीय रेल्वे स्थानकांच्या आवारामध्ये रेल्वे फ्लॅटफार्मवर विक्रीसाठी पुरविण्यात येणाऱ्या रेलनीर बॉटल्स (पिण्याचे पाणी) हाताळणीचे कामाचा ठेका मे.शुभम एंटरप्रायजेस यांना मिळाला होता. मे.शुभम एंटरप्रायजेस यांनी १० कामगारांच्या नोंदणीचा प्रस्ताव मंडळाला प्राप्त झाल्यानंतर दि.२०.११.२०१७ रोजी मे.शुभम एंटरप्रायझेस यांची मालक म्हणून व १० कामगारांची माथाडी कामगार म्हणून नोंदणी केली असून दि.२३.११.२०१७ रोजीच्या पत्राद्वारे टोळी क्र.४४ च्या कामगारांचे नियत वाटप करण्यात आले होते.

त्यानंतर डिसेंबर २०१७ व जानेवारी २०१८ या दोन महिन्यांची मजुरी मे.शुभम एंटरप्रायझेस यांच्यावतीने मंडळामध्ये जमा झालेली असून, मजुरीचे वाटप टोळी क्र.४४ च्या कामगारांना करण्यात आलेले आहे. तथापि, जानेवारी २०१८ नंतर सदर टोळीचे काम बंद झाले.

# महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १६२८**

श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, विधानसभा सदस्ययांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसारदिलेलीलक्षवेधीसूचना क्र.१६२८पुढीलप्रमाणेआहे:-

"जळगावात सर्वसामान्य मालमत्ता धारकाप्रमाणे एमआयडीसीतील उद्योजकाने महापालिकेचे कोट्यावधी रुपये थकवल्याने मनपाच्या मसुलात तुट निर्माण झालेली असणे, मनपा ने उद्योजकांसाठी अभय शास्ती योजना लागू केली परंतु उद्योजकांकडून कर वसुली वसुली करू नये म्हणून शासन दरबारी प्रस्ताव सादर करण्यास केल्याने संभ्रम अवस्था निर्माण झालेली असणे, तसेच या एमआयडीसीतील दररोज पाच वेळा वीज खंडित होत असल्याने अनेक उद्योजक आर्थिक अडचणीत आलेले असणे, जागे अभावी वीज उपकेंद्राची उभारणी रखडलेली असणे, जळगाव एमआयडीसीत लहान मोठे मिळून हजारो उद्योग असून या उद्योगांना जमीन रस्ते पाणीपुरवठा ड्रेनेज सुविधा आणि पथदिवे यासारख्या पायाभूत आणि वाहतूक सुविधा पुरविण्याची जबाबदारी एमआयडीसीची असल्याने एमआयडीसी उद्योजकांकडून साडेचार रुपये प्रति चौरस मीटर याप्रमाणे कराची आकारणी करते त्यामुळे मनपा ने या कराची आकारणी करू नये, असा प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सादर केला असणे, त्यावर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची मागणी उद्योगपतींकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना "

## मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

जळगाव महानगरपालिकेअंतर्गत सन २०२३-२४ तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जळगाव शहरातील एकूण थकीत मालमत्ता कराची रक्कम रुपये २१०.४२ कोटी इतकी असल्याचें दिसून येत आहे. सदर थकीत मालमत्ता कराची वसूली वाढविण्याच्या अनुषंगाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मालमत्ता कराच्या थकीत रकमेवर आकारलेल्या शास्तीस १००% शास्ती माफी देण्यासंदर्भात दि.०४.१२.२०२३ ते दि.३१.१२.२०२३ या कालावधीत जळगाव महानगरपालिकेमार्फत शास्ती अभय योजना राबविण्यात आली होती. या कालावधीत खंडीत कालावधीतील शास्तीची रक्कम भरण्याची मागणी मालमत्ता धारकांकडून महानगरपालिकेमार्फत करण्यात येत होती. त्यामुळे मालमत्ताधारक कराची रक्कम भरण्यास नकार देत व भरणा न करता निघून जात होते. त्यामुळे सदर महानगरपालिकेमार्फत दि.०८.०२.२०२४ ते दि.३१.०३.२०२४ या कालावधीत पुनश्च: शास्ती अभय योजना राबविण्यात आली. वरील दोन्ही कालावधीत एकूण २२०६९ लाभार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घेतला. यामध्ये एकूण रुपये ३७,७२,६९,१९२ /- इतक्या थकीत मालमत्ता कराची वसुली झाली. तसेच सदर योजनेत रुपये १२,२७,७१,४१६/- इतक्या रक्कमेची शास्तीची सूट संबंधित मालमत्ता धारकांना देण्यात आली आहे.

जळगाव शहरात जळगाव महानगरपालिकेमार्फत उद्योजकांकडून कराची वसुली करु नये व नविन टाऊनशिप करीता मंजूरी देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉर्मस इंडस्ट्री ॲन्ड ॲग्रीकल्चर यांचेकडून वारंवार मागणी करण्यात येत होती. यानुषंगाने मा. मंत्री (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली दि.०९.०३.२०२३ व दि.०२.०७.२०२४ रोजी बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

मऔवि महामंडळाने जळगांव येथे ६५८.२१ हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक क्षेत्र विकसित केलेले आहे. गॅझेट क्र. MUB/१७८३/२३७/CR/१७/१३३/UD/८, dated ११.०९.१९८७ नुसार जळगांव शहराची हद्द वाढल्यामुळे जळगांव औद्योगिक क्षेत्र तत्कालीन जळगांव नगरपालिकेच्या हद्दीमधे समाविष्ट झाले.

त्यामुळे जळगांव औद्योगिक क्षेत्रातील अस्तित्वातील रस्ते व पथदिवे वेळोवेळी तत्कालीन जळगांव नगरपालिकेस पुढील देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. कालांतराने जळगाव गरपालिकेचे रुपांतर जळगांव महानगरपालिकेत झाले. प्रस्तुत क्षेत्रात जळगांव महानगरपालिका मालमत्ता कर उद्योजकाकडून वसूल करीत असल्याने सदर रस्त्यांची व पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती जळगांव महानगरपालिकेने करणे अपेक्षीत होते.

परंतु जळगांव महानगरपालिकेतर्फे रस्ते व पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे केली जात नव्हती. म्हणुन दि असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, जळगांव यांनी औद्योगिक क्षेत्रातील रस्ते व पथदिवे देखभाल व दुरुस्ती मऔवि महामंडळानेच करावी अशी याचिका क्र.१०१२ सन२००३ मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केली होती. यावर मा. उच्च न्यायालयाने सदर देखभाल व दुरुस्ती मऔवि महामंडळाने करावी असे निर्देश दि.०९/१०/२००६ रोजी दिले. मऔवि महामंडळाच्या दि.१३/०८/२०१४ रोजी झालेल्या ३५८व्या बैठकीतील ठराव क्र.५३९९ नुसार उद्योगांकडून रु.४.५० प्रती चौ.मी .प्रति वर्ष सेवाशुल्क हे रस्ते व पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्ती पोटी मऔवि महामंडळामार्फत आकारण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सेवाशुल्क आकारण्यात येते.

त्यामुळे मऔवि महामंडळामार्फत जळगांव औद्योगिक क्षेत्रातील रस्ते व पथदिव्यांची देखभाल करण्यात येत असून त्यासाठी महामंडळातर्फे जळगांव औद्योगिक क्षेत्रासाठी रु ४.५० . प्रति चौ.मी .प्रति वर्ष आकारणी करण्यात येते .

मऔवि महामंडळातर्फे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला जळगांव औद्योगिक क्षेत्रात विद्युत उपकेन्द्र उभारण्यासाठी ०५ भूखंड वितरीत करण्यात आलेले असून त्यापैकी चार भुखंडावर विद्युत केंद्रे कार्यान्वित आहेत व १ भुखंड महापारेषण (MSETCL) यांना देण्यात आला आहे.

जळगांव औद्योगिक क्षेत्रात मुबलक विजपुरवठा उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे जळगांव औद्योगिक क्षेत्रात उभारण्यात आलेल्या विद्युत उपकेन्द्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | भूखंड क्र. | क्षेत्रफळ | कार्यान्वित विद्युत केन्द्राची क्षमता |
|---|---|---|---|

जळगाव शहरात जळगाव महानगरपालिकेमार्फत उद्योजकांकडून कराची वसुली करु नये व नविन टाऊनशिप करीता मंजूरी देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉर्मस इंडस्ट्री ॲन्ड ॲग्रीकल्चर यांचेकडून वारंवार मागणी करण्यात येत होती. यानुषंगाने मा. मंत्री (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली दि.०९.०३.२०२३ व दि.०२.०७.२०२४ रोजी बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

मऔवि महामंडळाने जळगांव येथे ६५८.२१ हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक क्षेत्र विकसित केलेले आहे. गॅझेट क्र. MUB/१७८३/२३७/CR/१७/१३३/UD/८, dated ११.०९.१९८७ नुसार जळगांव शहराची हद्द वाढल्यामुळे जळगांव औद्योगिक क्षेत्र तत्कालीन जळगांव नगरपालिकेच्या हद्दीमधे समाविष्ट झाले.

त्यामुळे जळगांव औद्योगिक क्षेत्रातील अस्तित्वातील रस्ते व पथदिवे वेळोवेळी तत्कालीन जळगांव नगरपालिकेस पुढील देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. कालांतराने जळगाव गरपालिकेचे रुपांतर जळगांव महानगरपालिकेत झाले. प्रस्तुत क्षेत्रात जळगांव महानगरपालिका मालमत्ता कर उद्योजकाकडून वसूल करीत असल्याने सदर रस्त्यांची व पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती जळगांव महानगरपालिकेने करणे अपेक्षीत होते.

परंतु जळगांव महानगरपालिकेतर्फे रस्ते व पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे केली जात नव्हती. म्हणुन दि असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज, जळगांव यांनी औद्योगिक क्षेत्रातील रस्ते व पथदिवे देखभाल व दुरुस्ती मऔवि महामंडळानेच करावी अशी याचिका क्र.१०१२ सन२००३ मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केली होती. यावर मा. उच्च न्यायालयाने सदर देखभाल व दुरुस्ती मऔवि महामंडळाने करावी असे निर्देश दि.०९/१०/२००६ रोजी दिले. मऔवि महामंडळाच्या दि.१३/०८/२०१४ रोजी झालेल्या ३५८व्या बैठकीतील ठराव क्र.५३९९ नुसार उद्योगांकडून रु.४.५० प्रती चौ.मी .प्रति वर्ष सेवाशुल्क हे रस्ते व पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्ती पोटी मऔवि महामंडळामार्फत आकारण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सेवाशुल्क आकारण्यात येते.

त्यामुळे मऔवि महामंडळामार्फत जळगांव औद्योगिक क्षेत्रातील रस्ते व पथदिव्यांची देखभाल करण्यात येत असून त्यासाठी महामंडळातर्फे जळगांव औद्योगिक क्षेत्रासाठी रु ४.५० . प्रति चौ.मी .प्रति वर्ष आकारणी करण्यात येते .

मऔवि महामंडळातर्फे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला जळगांव औद्योगिक क्षेत्रात विद्युत उपकेन्द्र उभारण्यासाठी ०५ भूखंड वितरीत करण्यात आलेले असून त्यापैकी चार भुखंडावर विद्युत केंद्रे कार्यान्वित आहेत व १ भुखंड महापारेषण (MSETCL) यांना देण्यात आला आहे.

जळगांव औद्योगिक क्षेत्रात मुबलक विजपुरवठा उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे जळगांव औद्योगिक क्षेत्रात उभारण्यात आलेल्या विद्युत उपकेन्द्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | भूखंड क्र. | क्षेत्रफळ | कार्यान्वित विद्युत केन्द्राची क्षमता |
|---|---|---|---|

# महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १६२८**

श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, विधानसभा सदस्ययांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसारदिलेलीलक्षवेधीसूचना क्र.१६२८पुढीलप्रमाणेआहे:-

"जळगावात सर्वसामान्य मालमत्ता धारकाप्रमाणे एमआयडीसीतील उद्योजकाने महापालिकेचे कोट्यावधी रुपये थकवल्याने मनपाच्या मसुलात तुट निर्माण झालेली असणे, मनपा ने उद्योजकांसाठी अभय शास्ती योजना लागू केली परंतु उद्योजकांकडून कर वसुली वसुली करू नये म्हणून शासन दरबारी प्रस्ताव सादर करण्यास केल्याने संभ्रम अवस्था निर्माण झालेली असणे, तसेच या एमआयडीसीतील दररोज पाच वेळा वीज खंडित होत असल्याने अनेक उद्योजक आर्थिक अडचणीत आलेले असणे, जागे अभावी वीज उपकेंद्राची उभारणी रखडलेली असणे, जळगाव एमआयडीसीत लहान मोठे मिळून हजारो उद्योग असून या उद्योगांना जमीन रस्ते पाणीपुरवठा ड्रेनेज सुविधा आणि पथदिवे यासारख्या पायाभूत आणि वाहतूक सुविधा पुरविण्याची जबाबदारी एमआयडीसीची असल्याने एमआयडीसी उद्योजकांकडून साडेचार रुपये प्रति चौरस मीटर याप्रमाणे कराची आकारणी करते त्यामुळे मनपा ने या कराची आकारणी करू नये, असा प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सादर केला असणे, त्यावर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची मागणी उद्योगपतींकडून होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना "

## मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

जळगाव महानगरपालिकेअंतर्गत सन २०२३-२४ तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जळगाव शहरातील एकूण थकीत मालमत्ता कराची रक्कम रुपये २१०.४२ कोटी इतकी असल्याचें दिसून येत आहे. सदर थकीत मालमत्ता कराची वसूली वाढविण्याच्या अनुषंगाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मालमत्ता कराच्या थकीत रकमेवर आकारलेल्या शास्तीस १००% शास्ती माफी देण्यासंदर्भात दि.०४.१२.२०२३ ते दि.३१.१२.२०२३ या कालावधीत जळगाव महानगरपालिकेमार्फत शास्ती अभय योजना राबविण्यात आली होती. या कालावधीत खंडीत कालावधीतील शास्तीची रक्कम भरण्याची मागणी मालमत्ता धारकांकडून महानगरपालिकेमार्फत करण्यात येत होती. त्यामुळे मालमत्ताधारक कराची रक्कम भरण्यास नकार देत व भरणा न करता निघून जात होते. त्यामुळे सदर महानगरपालिकेमार्फत दि.०८.०२.२०२४ ते दि.३१.०३.२०२४ या कालावधीत पुनश्च: शास्ती अभय योजना राबविण्यात आली. वरील दोन्ही कालावधीत एकूण २२०६९ लाभार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घेतला. यामध्ये एकूण रुपये ३७,७२,६९,१९२ /- इतक्या थकीत मालमत्ता कराची वसुली झाली. तसेच सदर योजनेत रुपये १२,२७,७१,४१६/- इतक्या रक्कमेची शास्तीची सूट संबंधित मालमत्ता धारकांना देण्यात आली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पी-२८ | २०,०००.०० | १० एमव्हीए X २ + ५ एमव्हीए X २<br>= ३० एमव्हीए |
| २ | पी-९६ | ४,०००.०० | १० एमव्हीए X २ + ५ एमव्हीए X १<br>= २५ एमव्हीए |
| ३ | पी-९७ | २,०५७.०० | ५ एमव्हीए X १ = ५ एमव्हीए |
| ४ | बी-१ | ३५,९११.०० | ५ एमव्हीए X १ = ५ एमव्हीए +<br>३.५० एमव्हीए X १ = ८.५० एमव्हीए<br>५० एमव्हीए X २ = १०० एमव्हीए (जळगांव शहरासाठी) |
| ५ | पी-३२ | ८९,८१३.०० | **महापारेषण १३२ केव्ही**<br>५० एमव्हीए X ३ = १५० एमव्हीए |

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उपरोक्त भुखंडामध्ये वाढीव विद्युत संयत्र उभारुन त्याव्दारे जळगांव औद्योगिक क्षेत्राची वाढीव विजेची मागणी पुर्ण करु शकते.

**********************

(लक्षवेधी सूचना क्र.१३५६)

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय अधिवेशन

**श्री.रईस शेख, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३५६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"भिवंडी शहरातील स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात मधील काही विभाग डॉक्टरांअभावी बंद असणे, डॉक्टरांसह अन्य महत्त्वाची पदे रिक्त असणे, रुग्णालयातील मंजूर पदांची संख्या ९४ असणे, या पदामध्ये अनेक महत्त्वाच्या पदांसह इतर पदांचा समावेश असणे, मात्र, सध्या ६१ पदे भरलेली असून ३३ पदे रिक्त असणे, रिक्त पदांमुळे रुग्णांना योग्य प्रकारे सेवा देणे प्रशासनाला शक्य होत नसणे. चारपैकी दोन रुग्णवाहिका चालू असणे, या दोन्ही रुग्णवाहिका अगोदरच रुग्णांना घेऊन गेल्यावर इतर रुग्णांना त्याचा त्रास सहन करावा लागत असणे, तसेच रुग्णालयाच्या २०० खाटांचा पदनिर्मितीचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे प्रलंबित असणे, तसेच रुग्णालय परिसरातील रुग्णांच्या सेवेकरिता अपुरे असून रुग्णालयाच्या दुरावस्थेसह नागरिकांना उत्तम सेवा सुविधा मिळण्याकरिता सदनामध्ये अनेक वेळा विविध आयुध्यांच्या माध्यमातून मागणी करुनही कोणताही न्याय मिळत नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**प्रा.डॉ.तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन.**

शासन निर्णय दि.०८.०२.२०११ अन्वये स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी या रूग्णालयासाठी १०० खाटांचे प्रमाणकानुसार अधिकारी /कर्मचारी यांची एकूण ९४ पदे, अतिदक्षता विभागासाठी १८ पदे व मौखिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत ४ पदे अशी एकूण ११६ नियमित पदे मंजूर आहेत. एकूण ११६ पदांपैकी ९२ पदे भरलेली असून २४ पदे रिक्त आहेत. रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकारी यांची सर्व पदे भरलेली असून रिक्त असलेली वर्ग ३ व वर्ग ४ या संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्यात येत आहेत. रुग्णालयातील काही पदे रिक्त असली तरी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत एकूण ६२ पदे भरण्यात आलेली आहेत.

उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे १०० खाटांचे प्रमाणकानुसार रुग्णालयात तीन रुग्णवाहिका उपलब्ध असून रुग्णांना आवश्यकतेनुसार पुढील वैद्यकीय उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे व कळवा रुग्णालय तसेच मुंबई येथे संदर्भित करण्यात येते. सद्यस्थितीत तीनही रुग्णवाहिका सुस्थितीत सुरु आहेत. तसेच १०८ सुविधेअंतर्गत उपजिल्हा रुग्णालयात १ व भिवंडी तालुक्यात ५ अशा एकूण ६ रुग्णवाहिका उपलब्ध आहेत.

शासन निर्णय, दि.१७.०१.२०१३ अन्वये या रुग्णालयाचे १०० खाटांवरुन २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यात आलेले आहे. त्यानुसार २०० खाटांच्या प्रमाणकानुसार आकृतीबंधानुसार पदे मंजुर करणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

**उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे खालीलप्रमाणे रुग्णसेवा देण्यात येतात-**

- बाह्यरुग्ण विभाग, बालरोग, नेत्ररोग, अस्थीरोग, स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ, कान नाक व घसा तज्ञ, सर्जन, भुलतज्ञ.

- रूग्णालयात मुख्य शस्त्रक्रिया विभागामध्ये सामान्य शस्त्रक्रीया गृह-२ व मॉडयुलर ओटी-३ कार्यान्वित आहेत.
- डिजीटल एक्स-रे/ सोनोग्राफी/ ईसीजी /सीटीस्कॅन/सीटीसी/डायलेसीसविभाग/NCD/ MLC/ फिजीयोथेरपी उपचार/ HIV व ART /SNCU विभाग कार्यान्वीत असून रुग्णांना आवश्यक सेवा देण्यात येतात.
- ७ खाटांचे डायलिसिस विभाग कार्यन्वित आहे.
- कुपोषीत बालकांकरीता सीटीसी विभाग कार्यन्वित आहे.
- क्ष-किरण तसेच सीटी स्कॅन रुग्णांचे टेलेरिपोर्टींग क्रिष्णा डायग्नोस्टीक या संस्थेकडून अद्यावत होतात.
- १६ खाटांची नवजात शिशू विभाग (SNCU) सुविधा उपलब्ध आहे.
- ३६ खाटांचा प्रसूती विभाग पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत आहे.
- रुग्णांकरीता Blood Storage Unit ची सुविधा सुरु आहे.
- रुग्णांकरीता प्रयोगशाळेची सुविधा सुरू आहे. तसेच HLL हिंदलॅब लिमीटेड या संस्थेमार्फत सर्व प्रकारच्या रक्त चाचण्या करण्याची मोफत सुविधा पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत आहे.
- २१ आणि ६ शव क्षमतेचे शवागृह पुर्ण क्षमतेने कार्यान्वीत आहे.
- रुग्णालयातील सर्व प्रकारचे यंत्रसामुग्री व उपकरणांचे मॅपींग AOV कंपनी कडून करण्यात येतात.
- या रुग्णालयात डोळ्यांच्या शस्त्रक्रिया (मोतीबिंदू) नियमित होतात व त्याचबरोबर प्रसुतीचे प्रमाण जिल्हा रुग्णालयाच्या बरोबरीने होते.
- १० KL आणि ६ KL क्षमतेचे लिक्विड मेडिकल ऑक्सिजन टँक उपलब्ध आहे. तसेच १०० जम्बो ऑक्सिजन सिलेंडर उपलब्ध आहेत. १३२० लिटर क्षमतेचे ऑक्सिजन सिलेंडर एकूण ५० आहेत. १७ ऑक्सिजन कॉन्सट्रेटर मशिन उपलब्ध आहेत.

*******************

- रुग्णालयात मुख्य शस्त्रक्रिया विभागामध्ये सामान्य शस्त्रक्रीया गृह-२ व मॉडयुलर ओटी-३ कार्यान्वित आहेत.
- डिजीटल एक्स-रे/ सोनोग्राफी/ ईसीजी /सीटीस्कॅन/सीटीसी/डायलेसीसविभाग/NCD/ MLC/ फिजीयोथेरपी उपचार/ HIV व ART /SNCU विभाग कार्यान्वीत असून रुग्णांना आवश्यक सेवा देण्यात येतात.
- ७ खाटांचे डायलिसिस विभाग कार्यन्वित आहे.
- कुपोषीत बालकांकरीता सीटीसी विभाग कार्यन्वित आहे.
- क्ष-किरण तसेच सीटी स्कॅन रुग्णांचे टेलेरिपोर्टींग क्रिष्णा डायग्नोस्टीक या संस्थेकडून अद्यावत होतात.
- १६ खाटांची नवजात शिशू विभाग (SNCU) सुविधा उपलब्ध आहे.
- ३६ खाटांचा प्रसूती विभाग पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत आहे.
- रुग्णांकरीता Blood Storage Unit ची सुविधा सुरु आहे.
- रुग्णांकरीता प्रयोगशाळेची सुविधा सुरू आहे. तसेच HLL हिंदलॅब लिमीटेड या संस्थेमार्फत सर्व प्रकारच्या रक्त चाचण्या करण्याची मोफत सुविधा पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत आहे.
- २१ आणि ६ शव क्षमतेचे शवागृह पुर्ण क्षमतेने कार्यान्वीत आहे.
- रुग्णालयातील सर्व प्रकारचे यंत्रसामुग्री व उपकरणांचे मॅपींग AOV कंपनी कडून करण्यात येतात.
- या रुग्णालयात डोळ्यांच्या शस्त्रक्रिया (मोतीबिंदू) नियमित होतात व त्याचबरोबर प्रसुतीचे प्रमाण जिल्हा रुग्णालयाच्या बरोबरीने होते.
- १० KL आणि ६ KL क्षमतेचे लिक्विड मेडिकल ऑक्सिजन टँक उपलब्ध आहे. तसेच १०० जम्बो ऑक्सिजन सिलेंडर उपलब्ध आहेत. १३२० लिटर क्षमतेचे ऑक्सिजन सिलेंडर एकूण ५० आहेत. १७ ऑक्सिजन कॉन्सट्रेटर मशिन उपलब्ध आहेत.

*******************

(लक्षवेधी सूचना क्र.१३५६)

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय अधिवेशन

**श्री.रईस शेख, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३५६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"भिवंडी शहरातील स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात मधील काही विभाग डॉक्टरांअभावी बंद असणे, डॉक्टरांसह अन्य महत्त्वाची पदे रिक्त असणे, रुग्णालयातील मंजूर पदांची संख्या ९४ असणे, या पदामध्ये अनेक महत्त्वाच्या पदांसह इतर पदांचा समावेश असणे, मात्र, सध्या ६१ पदे भरलेली असून ३३ पदे रिक्त असणे, रिक्त पदांमुळे रुग्णांना योग्य प्रकारे सेवा देणे प्रशासनाला शक्य होत नसणे. चारपैकी दोन रुग्णवाहिका चालू असणे, या दोन्ही रुग्णवाहिका अगोदरच रुग्णांना घेऊन गेल्यावर इतर रुग्णांना त्याचा त्रास सहन करावा लागत असणे, तसेच रुग्णालयाच्या २०० खाटांचा पदनिर्मितीचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे प्रलंबित असणे, तसेच रुग्णालय परिसरातील रुग्णांच्या सेवेकरिता अपुरे असून रुग्णालयाच्या दुरावस्थेसह नागरिकांना उत्तम सेवा सुविधा मिळण्याकरिता सदनामध्ये अनेक वेळा विविध आयुध्यांच्या माध्यमातून मागणी करुनही कोणताही न्याय मिळत नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## प्रा.डॉ.तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन.

शासन निर्णय दि.०८.०२.२०११ अन्वये स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी या रूग्णालयासाठी १०० खाटांचे प्रमाणकानुसार अधिकारी /कर्मचारी यांची एकूण ९४ पदे, अतिदक्षता विभागासाठी १८ पदे व मौखिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत ४ पदे अशी एकूण ११६ नियमित पदे मंजूर आहेत. एकूण ११६ पदांपैकी ९२ पदे भरलेली असून २४ पदे रिक्त आहेत. रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकारी यांची सर्व पदे भरलेली असून रिक्त असलेली वर्ग ३ व वर्ग ४ या संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्यात येत आहेत. रुग्णालयातील काही पदे रिक्त असली तरी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत एकूण ६२ पदे भरण्यात आलेली आहेत.

उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे १०० खाटांचे प्रमाणकानुसार रुग्णालयात तीन रुग्णवाहिका उपलब्ध असून रुग्णांना आवश्यकतेनुसार पुढील वैद्यकीय उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे व कळवा रुग्णालय तसेच मुंबई येथे संदर्भित करण्यात येते. सद्यस्थितीत तीनही रुग्णवाहिका सुस्थितीत सुरु आहेत. तसेच १०८ सुविधेअंतर्गत उपजिल्हा रुग्णालयात १ व भिवंडी तालुक्यात ५ अशा एकूण ६ रुग्णवाहिका उपलब्ध आहेत.

शासन निर्णय, दि.१७.०१.२०१३ अन्वये या रुग्णालयाचे १०० खाटांवरुन २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यात आलेले आहे. त्यानुसार २०० खाटांच्या प्रमाणकानुसार आकृतीबंधानुसार पदे मंजुर करणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे.

**उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे खालीलप्रमाणे रुग्णसेवा देण्यात येतात-**

- बाह्यरुग्ण विभाग, बालरोग, नेत्ररोग, अस्थीरोग, स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ, कान नाक व घसा तज्ञ, सर्जन, भुलतज्ञ.

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेल्या लक्षवेधी सूचना क्र.१५८४ पुढील प्रमाणे आहे:-**

"राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील मुख्य कार्यकारी अधिकारी, वस्तु खरेदी प्राधिकरण, आरोग्य भवन, मुंबई यांचेतर्फे राष्ट्रीय क्षय रोग निवारण कार्यक्रमांतर्गत क्षय रोग कक्षास आवश्यक असलेले अल्ट्रा पोर्टेबल हँडलेड, डिजीटल एक्सरेच्या ८० मशीन खरेदी करण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत (नि.क्र.GEM/२०२४/B/४९०१९८३) जाचक अटी टाकून मध्य प्रदेश सरकारने काळ्या यादीत टाकलेल्या व निकृष्ट दर्जाच्या मशीनरी पुरविणाऱ्या आपल्या मर्जितील इदुसॉफ्ट हेल्फ केअर प्रा.लि. या कंपनीस कंत्राट देण्याचे आदेश काढण्यात येत असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, मर्जितीली कंपनीला कंत्राट देण्यासाठी सदरहू निविदेत मशीन अंतर्गत स्टोरेजचे १२०० इमजेस करणारी बाजारात कोणतीही मशीन उपलब्ध नसणे, आऊटपूटमध्ये ९० केव्ही किंवा १२० केव्ही मशीनचा फॉरमॅट असताना निविदेत ८० केव्हीचे फॉरमॅट टाकणे आदि जाचक अटींचा समावेश करण्यात येणे, या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.२५.०५.२०२४ रोजी डावलण्यात आलेल्या कंपनीने लेखी तक्रार निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात न येणे, या अगोदर वैद्यकीय शिक्षण विभागाने देखील २३ लाखाची मशीन ५८ लाख इतक्या दुप्पट दराने दोन मशीनी खरेदी करुन आर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, सदरबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकत, या कडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**मा.मंत्री (सा.आ.व.कु.क) महोदय यांचे निवेदन:-**

महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत विवक्षित वैद्यकीय वस्तुंची एकाच ठिकाणी खरेदी आणि परिपूर्ण (टर्न-की) प्रकल्पांची अंमलबजावणी, उच्च दर्जाची पारदर्शकता, निःपक्षता, न्यायबुद्धी आणि योग्य व एकरूप दराने आणि अपेक्षित गुणवत्ता व प्रमाणात राज्य शासनाच्या अखत्यारीतील आरोग्य संस्थासाठी आणि इतर विवक्षित आरोग्य संस्थांसाठी वेळेत पुरवठा करण्याचे सुनिश्चित करण्यासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता अधिनियम २०२३ अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण स्थापन करण्यात आले असुन सदर प्राधिकरण दि.१०.०५.२०२३ पासुन कार्यान्वित झालेले आहे. खरेदी करावयाच्या बाबींच्या अनुषंगाने संबंधित कार्यालय खरेदीची मागणी प्राधिकरणास सादर करते त्याअनुषंगाने खरेदी प्राधिकरणामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील बाबींची तपासणी करुन प्रशासकीय मान्यता देण्यात येते. तदनंतर खरेदी करावयाचे कार्यालय व त्यांनी सादर केलेले तांत्रिक विनिर्देश तसेच प्राधिकरणाच्या तज्ञ समितीने केलेले तांत्रिक विनिर्देश व दि.०१.१२.२०१६ च्या उदयोग,ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदींच्या अधिन राहुन प्राधिकरणामार्फत ई- निविदा राबविण्यात येते.

आरोग्य सेवा आयुक्तालय नियंत्रणाखाली सहसंचालक आरोग्य सेवा (क्षयरोग व कुष्ठरोग) पुणे कार्यालयाकडील अल्ट्रा पोर्टेबल हँडलेड डिजीटल एक्सरेच्या ८० मशीन खरेदीचा प्रस्ताव महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणास दिनांक ०९.०२.२०२४ रोजी प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावासोबत

आरोग्य सेवा आयुक्तालयाने निर्धारीत केलेले तांत्रिक विनिर्देश सादर करुन याप्रमाणे निविदा प्रक्रिया राबविण्याचे कळविले होते. सद्यस्थितीत प्रस्तुत निविदेसाठी सहभागी निविदाकारांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरु असून, एकूण ५ निविदाकारांनी निविदेत सहभाग नोंदविलेला आहे. तसेच निविदेमध्ये मूळ उत्पादकांनी अधिकृत केलेल्या वितरकांना सहभागी होण्याची तरतूद आहे. त्यानुसार सद्यस्थितीत प्रस्तुत निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आलेला असून, निविदेत सहभागी अधिकृत वितरकांनी इदुसॉफ्ट हेल्थ केअर प्रा.लि. या कंपनीच्या उत्पादनाचे अल्ट्रा पोर्टेबल हॅंडलेड डिजीटल एक्सरे मशीन पुरवठ्याबाबत कागदपत्रे सादर केली असल्याने व इदुसॉफ्ट हेल्थ केअर प्रा.लि. या कंपनीस मध्यप्रदेश सरकारने काळ्या यादीत टाकले आहे किंवा कसे याबाबत खातरजमा करुन निविदेसाठी निविदाकारांकडून दाखल दस्तांची प्रत्यक्ष पडताळणी वेळी विशेष दक्षता घेऊन सखोल तपासणीअंती अंतिम निर्णय घेण्यात येईल.तसेच लक्षवेधी सूचनेमध्ये यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे तक्रार केली असल्याचा उल्लेख आहे यासंदर्भात अनौपचारीक रित्या चौकशी केली असता अशी लेखी स्वरुपातील तक्रार केली असल्याचे आढळून आले नाही तथापि सदर तक्रार आढळून आल्यास त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

लक्षवेधी सूचनेमध्ये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने मशीन दुप्पटीने खरेदी केलेला उल्लेख आहे त्याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे असे स्पष्ट करण्यात येते की,दि.२२.१२.२०२३ ते दि.१२.०१.२०२४ या कालावधीत ई-२४(२३-२४) अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आली होती सदर निविदेमध्ये एकूण ८ निविदाकारांनी सहभाग दर्शविला होता त्यापैकी मे.प्रमुख जनरल ट्रेडर ॲण्ड स्पलायर या निविदाकारामार्फत प्राप्त दर रु.५८,२७,६७५/- (सर्वकरासह) हे न्यूनतम आले आहेत. सदर निविदकारामार्फत नमूद केलेल्या मॉडेलचे तांत्रिक समितीमार्फत प्रात्यक्षित घेण्यात आले असून ते समाधानकारक असल्याचे प्रमाणित करण्यात आले आहे. सदर न्यूनतम दराने खरेदी करण्यास राज्यस्तरीय खरेदी समितीने मान्यता दिली त्यानूसार मे.प्रमुख जनरल ट्रेडर ॲण्ड स्पलायर या निविदाकाराच्या बॅटरी ऑपरेटेड एक्स-रे मशीन विथ ऑर्टीफिशीयल इंन्टेलीजन्य सॉफ्टवेअर या यंत्राकरीता प्रतिनग रु. ५८,२७,६७५/- (सर्व करांसह) प्रमाणे एकूण ३४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ६२ नगांकरीता एकूण रु.३६,१३,१५,८५०/- (सर्व करांसह) इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश दि.०४.०३.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील सहसंचालक आरोग्य सेवा (क्षयरोग व कुष्ठरोग) पुणे कार्यालयासाठी करावयाच्या खरेदी संदर्भात महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाकडून अल्ट्रा पोर्टेबल हॅंडलेड डिजीटल एक्सरेच्या ८० मशीन खरेदीसाठीची निविदा GEM/२०२४/४/४९०१९८३ ची प्रक्रिया अद्याप सुरु आहे, यामध्ये सहभागी निविदाकारांची पात्रता /अपात्रता ठरविण्यात आलेली नाही व त्यामुळे खरेदी आदेश निर्गमित करण्यात येत असल्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

आरोग्य सेवा आयुक्तालयाने निर्धारीत केलेले तांत्रिक विनिर्देश सादर करुन याप्रमाणे निविदा प्रक्रिया राबविण्याचे कळविले होते. सद्यस्थितीत प्रस्तुत निविदेसाठी सहभागी निविदाकारांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरु असून, एकूण ५ निविदाकारांनी निविदेत सहभाग नोंदविलेला आहे. तसेच निविदेमध्ये मूळ उत्पादकांनी अधिकृत केलेल्या वितरकांना सहभागी होण्याची तरतूद आहे. त्यानुसार सद्यस्थितीत प्रस्तुत निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आलेला असून, निविदेत सहभागी अधिकृत वितरकांनी इदुसॉफ्ट हेल्थ केअर प्रा.लि. या कंपनीच्या उत्पादनाचे अल्ट्रा पोर्टेबल हॅंडलेड डिजीटल एक्सरे मशीन पुरवठ्याबाबत कागदपत्रे सादर केली असल्याने व इदुसॉफ्ट हेल्थ केअर प्रा.लि. या कंपनीस मध्यप्रदेश सरकारने काळ्या यादीत टाकले आहे किंवा कसे याबाबत खातरजमा करुन निविदेसाठी निविदाकारांकडून दाखल दस्तांची प्रत्यक्ष पडताळणी वेळी विशेष दक्षता घेऊन सखोल तपासणीअंती अंतिम निर्णय घेण्यात येईल.तसेच लक्षवेधी सूचनेमध्ये यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे तक्रार केली असल्याचा उल्लेख आहे यासंदर्भात अनौपचारीक रित्या चौकशी केली असता अशी लेखी स्वरुपातील तक्रार केली असल्याचे आढळून आले नाही तथापि सदर तक्रार आढळून आल्यास त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

लक्षवेधी सूचनेमध्ये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने मशीन दुप्पटीने खरेदी केलेला उल्लेख आहे त्याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे असे स्पष्ट करण्यात येते की,दि.२२.१२.२०२३ ते दि.१२.०१.२०२४ या कालावधीत ई-२४(२३-२४) अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आली होती सदर निविदेमध्ये एकूण ८ निविदाकारांनी सहभाग दर्शविला होता त्यापैकी मे.प्रमुख जनरल ट्रेडर ॲण्ड स्पलायर या निविदाकारामार्फत प्राप्त दर रु.५८,२७,६७५/- (सर्वकरासह) हे न्यूनतम आले आहेत. सदर निविदकारामार्फत नमूद केलेल्या मॉडेलचे तांत्रिक समितीमार्फत प्रात्यक्षित घेण्यात आले असून ते समाधानकारक असल्याचे प्रमाणित करण्यात आले आहे. सदर न्यूनतम दराने खरेदी करण्यास राज्यस्तरीय खरेदी समितीने मान्यता दिली त्यानूसार मे.प्रमुख जनरल ट्रेडर ॲण्ड स्पलायर या निविदाकाराच्या बॅटरी ऑपरेटेड एक्स-रे मशीन विथ ऑर्टीफिशीयल इंन्टेलीजन्य सॉफ्टवेअर या यंत्राकरीता प्रतिनग रु. ५८,२७,६७५/- (सर्व करांसह) प्रमाणे एकूण ३४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ६२ नगांकरीता एकूण रु.३६,१३,१५,८५०/- (सर्व करांसह) इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश दि.०४.०३.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील सहसंचालक आरोग्य सेवा (क्षयरोग व कुष्ठरोग) पुणे कार्यालयासाठी करावयाच्या खरेदी संदर्भात महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाकडून अल्ट्रा पोर्टेबल हॅंडलेड डिजीटल एक्सरेच्या ८० मशीन खरेदीसाठीची निविदा GEM/२०२४/४/४९०१९८३ ची प्रक्रिया अद्याप सुरु आहे, यामध्ये सहभागी निविदाकारांची पात्रता /अपात्रता ठरविण्यात आलेली नाही व त्यामुळे खरेदी आदेश निर्गमित करण्यात येत असल्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेल्या लक्षवेधी सूचना क्र.१५८४ पुढील प्रमाणे आहे:-**

"राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील मुख्य कार्यकारी अधिकारी, वस्तु खरेदी प्राधिकरण, आरोग्य भवन, मुंबई यांचेतर्फे राष्ट्रीय क्षय रोग निवारण कार्यक्रमांतर्गत क्षय रोग कक्षास आवश्यक असलेले अल्ट्रा पोर्टेबल हँडलेड, डिजीटल एक्सरेच्या ८० मशीन खरेदी करण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत (नि.क्र.GEM/२०२४/B/४९०१९८३) जाचक अटी टाकून मध्य प्रदेश सरकारने काळ्या यादीत टाकलेल्या व निकृष्ट दर्जाच्या मशीनरी पुरविणाऱ्या आपल्या मर्जितील इदुसॉफ्ट हेल्फ केअर प्रा.लि. या कंपनीस कंत्राट देण्याचे आदेश काढण्यात येत असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, मर्जितीली कंपनीला कंत्राट देण्यासाठी सदरहू निविदेत मशीन अंतर्गत स्टोरेजचे १२०० इमजेस करणारी बाजारात कोणतीही मशीन उपलब्ध नसणे, आऊटपूटमध्ये ९० केव्ही किंवा १२० केव्ही मशीनचा फॉरमॅट असताना निविदेत ८० केव्हीचे फॉरमॅट टाकणे आदि जाचक अटींचा समावेश करण्यात येणे, या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.२५.०५.२०२४ रोजी डावलण्यात आलेल्या कंपनीने लेखी तक्रार निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात न येणे, या अगोदर वैद्यकीय शिक्षण विभागाने देखील २३ लाखाची मशीन ५८ लाख इतक्या दुप्पट दराने दोन मशीनी खरेदी करुन आर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, सदरबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकत, या कडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**मा.मंत्री (सा.आ.व.कु.क) महोदय यांचे निवेदन:-**

महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत विवक्षित वैद्यकीय वस्तुंची एकाच ठिकाणी खरेदी आणि परिपूर्ण (टर्न-की) प्रकल्पांची अंमलबजावणी, उच्च दर्जाची पारदर्शकता, निःपक्षता, न्यायबुद्धी आणि योग्य व एकरूप दराने आणि अपेक्षित गुणवत्ता व प्रमाणात राज्य शासनाच्या अखत्यारीतील आरोग्य संस्थासाठी आणि इतर विवक्षित आरोग्य संस्थांसाठी वेळेत पुरवठा करण्याचे सुनिश्चित करण्यासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता अधिनियम २०२३ अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण स्थापन करण्यात आले असुन सदर प्राधिकरण दि.१०.०५.२०२३ पासुन कार्यान्वित झालेले आहे. खरेदी करावयाच्या बाबींच्या अनुषंगाने संबंधित कार्यालय खरेदीची मागणी प्राधिकरणास सादर करते त्याअनुषंगाने खरेदी प्राधिकरणामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील बाबींची तपासणी करुन प्रशासकीय मान्यता देण्यात येते. तदनंतर खरेदी करावयाचे कार्यालय व त्यांनी सादर केलेले तांत्रिक विनिर्देश तसेच प्राधिकरणाच्या तज्ञ समितीने केलेले तांत्रिक विनिर्देश व दि.०१.१२.२०१६ च्या उदयोग,ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदींच्या अधिन राहुन प्राधिकरणामार्फत ई- निविदा राबविण्यात येते.

आरोग्य सेवा आयुक्तालय नियंत्रणाखाली सहसंचालक आरोग्य सेवा (क्षयरोग व कुष्ठरोग) पुणे कार्यालयाकडील अल्ट्रा पोर्टेबल हँडलेड डिजीटल एक्सरेच्या ८० मशीन खरेदीचा प्रस्ताव महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणास दिनांक ०९.०२.२०२४ रोजी प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावासोबत

लक्षवेधी सूचना क्र.१५८६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती गीता जैन मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५८६ पुढीलप्रमाणे आहे :-

"सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २०१९ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांची सांगड घालून राज्यात एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला असणे, सन २०२३ मध्ये या निर्णयात सुधारणा करून आरोग्य विमा योजनेचा लाभ हा शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबानासुद्धा देण्यात आलेला असणे, परंतु त्यांना या योजनेचा लाभ देण्याकरीता आणि आयुष्यमान कार्ड तयार करण्यासाठी शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करणे आवश्यक असणे, सरकारने शुभ्र शिधापत्रिकाधारकांसाठी सुद्धा शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्याचे आदेश काढलेले असणे, मात्र याकरीता वाढीव मनुष्यबळ उपलब्ध करून न दिल्याने अनेक ठिकाणी केशरी शिधापत्रिकाधारकांच्या शिधापत्रिका आजमितीस आधार क्रमांकाशी संलग्न झालेल्या नसणे, मीरा-भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या सुमारे १५ ते १६ लाख असून येथे केवळ एकच केंद्र उपलब्ध असणे, त्यामुळे या केंद्रात दररोज शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्यासाठी नागरिकांना तासनतास लाईनीत उभे राहावे लागणे, एवढा त्रास सहन करूनही त्यांचे आधारकार्ड संलग्न होईल याची कोणतीही शाश्वती नसणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला प्रचंड असंतोष व चिडीची भावना, लोकसंख्येच्या प्रमाणात शिधापत्रिका आधार क्रमांकाशी जोडण्यासाठी अनेक ठिकाणी केंद्रे उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची उपाययोजना, कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

<u>प्रा. डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे</u>

### निवेदन

दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांची सांगड घालून राज्यामध्ये एकत्रितपणे दिनांक ३० जून २०२४ पर्यंत राबविण्यात येत होती. यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत प्रामुख्याने पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना व अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबे योजनेचे लाभार्थी होते. तर आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना-२०११ मध्ये नोंदीत कुटुंबांचा तसेच राष्ट्रीय अन्न सूरक्षा अधिनियमामधील अंत्योदय

आणि प्राधान्य गटातील शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा लाभार्थी म्हणून समावेश करण्यात आला होता.

दिनांक २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे विस्तारीकरण करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला. त्यानुसार दिनांक १ जुलै, २०२४ पासून महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना विस्तारित स्वरुपात राबविण्यात येत आहे. या योजनेव्दारे निवडक तज्ञ सेवांमधील उपचारांसाठी अंगीकृत रुग्णालयांत दाखल होण्यापासून ते रुग्णालयातून सुट्टी होईपर्यंत रोख रक्कमरहीत दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिली जाते.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक कुटुंबे वा अधिवास प्रमाणपत्रधारक कुटुंबे, शासकिय आश्रमशाळा / अनाथालयातील मुले, शासकिय महिला आश्रमातील महिला, शासकिय वृद्धाश्रमातील वरिष्ठ नागरिक, पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्य, नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबीत कुटुंबातील सदस्य या व्यतिरीक्त महाराष्ट्र सीमाभागातील रस्ते अपघातात जखमी झालेले महाराष्ट्र व इतर राज्य/ देशाबाहेरील रुग्ण, कर्नाटक सिमा भागातील ८६५ गावांतील अंत्योदया अन्न योजना, प्राधान्य गटातील कुटुंबे व अन्नपुर्णा शिधापत्रिकाधारक मराठी भाषीक कुटुंबे अशा लाभार्थी कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे. तर तर आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना-२०११ मध्ये नोंदीत कुटुंबांचा तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमामधील अंत्योदय आणि प्राधान्य गटातील शिधापत्रिकाधारक अशा ९३.०५ लक्ष कुटुंबांचा लाभार्थी म्हणून समावेश आहे.

विस्तारीत एकत्रित योजनांतर्गत एकुण १३५६ उपचार व २६२ पाठपुरावा सेवांकरीता प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.५ लक्ष रक्कमेचे आरोग्य संरक्षण अंगिकृत १००० रुग्णालयांमधुन पुरविण्यात येत असून रुग्णालयांची ही संख्या १९०० पर्यंत वाढविण्याकरीता अतिरिक्त ९०० रुग्णालये अंगीकृत करण्याची प्रक्रिया राज्य आरोग्य हमी सोसायटी या कार्यालयामार्फत सुरू आहे. या विस्तारित योजनेत राज्यातील २.७२ कोटी कुटुंबांना एकत्रित योजनेमध्ये आरोग्य संरक्षण पुरविण्यात येणार असून साधारणत: १२.५० कोटी वैयक्तिक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ होणार आहे.

आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड आधार क्रमांक अथवा कुटुब आय. डी. च्या आधारे निर्माण करण्यात येत आहे. योजनेच्या सुरवातीच्या टप्यात BIS १.O या प्रणाली आधारे आपले सरकार सेवा केंद्रातील कर्मचा-यांमार्फ़त ९८ लक्ष आयुष्मान कार्डांचे निर्माण करण्यात आले होते. तर माहे सप्टेंबर २०२३

आणि प्राधान्य गटातील शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा लाभार्थी म्हणून समावेश करण्यात आला होता.

दिनांक २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे विस्तारीकरण करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला. त्यानुसार दिनांक १ जुलै, २०२४ पासून महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना विस्तारित स्वरुपात राबविण्यात येत आहे. या योजनेव्दारे निवडक तज्ञ सेवांमधील उपचारांसाठी अंगीकृत रुग्णालयांत दाखल होण्यापासून ते रुग्णालयातून सुट्टी होईपर्यंत रोख रक्कमरहीत दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिली जाते.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक कुटुंबे वा अधिवास प्रमाणपत्रधारक कुटुंबे, शासकिय आश्रमशाळा / अनाथालयातील मुले, शासकिय महिला आश्रमातील महिला, शासकिय वृद्धाश्रमातील वरिष्ठ नागरिक, पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्य, नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबीत कुटुंबातील सदस्य या व्यतिरीक्त महाराष्ट्र सीमाभागातील रस्ते अपघातात जखमी झालेले महाराष्ट्र व इतर राज्य/ देशाबाहेरील रुग्ण, कर्नाटक सिमा भागातील ८६५ गावांतील अंत्योदया अन्न योजना, प्राधान्य गटातील कुटुंबे व अन्नपुर्णा शिधापत्रिकाधारक मराठी भाषीक कुटुंबे अशा लाभार्थी कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे. तर तर आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना-२०११ मध्ये नोंदीत कुटुंबांचा तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमामधील अंत्योदय आणि प्राधान्य गटातील शिधापत्रिकाधारक अशा ९३.०५ लक्ष कुटुंबांचा लाभार्थी म्हणून समावेश आहे.

विस्तारीत एकत्रित योजनांतर्गत एकुण १३५६ उपचार व २६२ पाठपुरावा सेवांकरीता प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.५ लक्ष रक्कमेचे आरोग्य संरक्षण अंगिकृत १००० रुग्णालयांमधुन पुरविण्यात येत असून रुग्णालयांची ही संख्या १९०० पर्यंत वाढविण्याकरीता अतिरिक्त ९०० रुग्णालये अंगीकृत करण्याची प्रक्रिया राज्य आरोग्य हमी सोसायटी या कार्यालयामार्फत सुरू आहे. या विस्तारित योजनेत राज्यातील २.७२ कोटी कुटुंबांना एकत्रित योजनेमध्ये आरोग्य संरक्षण पुरविण्यात येणार असून साधारणत: १२.५० कोटी वैयक्तिक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ होणार आहे.

आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड आधार क्रमांक अथवा कुटुब आय. डी. च्या आधारे निर्माण करण्यात येत आहे. योजनेच्या सुरवातीच्या टप्यात BIS १.0 या प्रणाली आधारे आपले सरकार सेवा केंद्रातील कर्मचा-यांमार्फ़त ९८ लक्ष आयुष्मान कार्डांचे निर्माण करण्यात आले होते. तर माहे सप्टेंबर २०२३

लक्षवेधी सूचना क्र.१५८६

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती गीता जैन मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५८६ पुढीलप्रमाणे आहे :-

"सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २०१९ च्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांची सांगड घालून राज्यात एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला असणे, सन २०२३ मध्ये या निर्णयात सुधारणा करून आरोग्य विमा योजनेचा लाभ हा शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबानासुद्धा देण्यात आलेला असणे, परंतु त्यांना या योजनेचा लाभ देण्याकरीता आणि आयुष्यमान कार्ड तयार करण्यासाठी शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करणे आवश्यक असणे, सरकारने शुभ्र शिधापत्रिकाधारकांसाठी सुद्धा शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्याचे आदेश काढलेले असणे, मात्र याकरीता वाढीव मनुष्यबळ उपलब्ध करून न दिल्याने अनेक ठिकाणी केशरी शिधापत्रिकाधारकांच्या शिधापत्रिका आजमितीस आधार क्रमांकाशी संलग्न झालेल्या नसणे, मीरा-भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या सुमारे १५ ते १६ लाख असून येथे केवळ एकच केंद्र उपलब्ध असणे, त्यामुळे या केंद्रात दररोज शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्यासाठी नागरिकांना तासनतास लाईनीत उभे राहावे लागणे, एवढा त्रास सहन करूनही त्यांचे आधारकार्ड संलग्न होईल याची कोणतीही शाश्वती नसणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला प्रचंड असंतोष व चिडीची भावना, लोकसंख्येच्या प्रमाणात शिधापत्रिका आधार क्रमांकाशी जोडण्यासाठी अनेक ठिकाणी केंद्रे उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची उपाययोजना, कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

<u>प्रा. डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे</u>

निवेदन

दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांची सांगड घालून राज्यामध्ये एकत्रितपणे दिनांक ३० जून २०२४ पर्यंत राबविण्यात येत होती. यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत प्रामुख्याने पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना व अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबे योजनेचे लाभार्थी होते. तर आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना-२०११ मध्ये नोंदीत कुटुंबांचा तसेच राष्ट्रीय अन्न सूरक्षा अधिनियमामधील अंत्योदय

पासून राज्यामध्ये BIS २.० या सुधारीत प्रणाली अंतर्गत १.८० कोटी आयुष्मान कार्ड असे सद्यस्थितीमध्ये एकुण २.७८ कोटी आयुष्मान कार्ड निर्माण करण्यात आले आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत समाविष्ट असलेल्या राज्यातील पिवळी, केशरी, शुभ्र, अंत्योदय अन्न योजना, अन्नपुर्णा योजना या शिधापत्रिकाधारक कुटुंबांना एकसमान आयुष्मान (को-ब्रॅन्डेड) कार्ड वितरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर आयुष्मान कार्ड निर्माण करण्याकरीता अन्न नागरी पुरवठा विभागाकडून पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपुर्णा योजना शिधापत्रिकांचा संगणकीकृत डाटा प्राप्त करुन घेण्यात आला आहे. लाभार्थ्यांची शिधापत्रिका आधार संलग्न असल्यास १२ अंकी कुटूंब आय.डी. तयार होतो व त्या आधारे ई-केवायसी करून आयुष्मान कार्ड निर्माण केले जाते.

शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्याची कार्यवाही अन्न व नागरी पुरवठा कार्यालयाशी संबंधीत आहे. त्यानुसार सदर शिधापत्रिका आधार कार्डसोबत संलग्न करण्याची कार्यवाही करणेकरीता राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यालयाकडून मा. सचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास दि.१६ मे, २०२४ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरून अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून जिल्हा पुरवठा अधिकारी (सर्व), अन्नधान्य वितरण अधिकारी (सर्व), उपनियंत्रक शिधावाटप (सर्व) यांना दिनांक १८ जून, २०२४ रोजीच्या परिपत्रकाद्वारे शुभ्र शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्याबाबत सूचना निर्गमीत केल्या आहेत. शुभ्र शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड निर्माण करण्याकरीता शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे. शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न झाल्यावर आयुष्मान कार्डाची निर्मिती होते. सदर आयुष्मान कार्ड निर्मितीच्या कामाकरिता मिरा - भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जवळपास १२५ आपले सरकार सेवा केंद्रे कार्यरत आहेत. तसेच मिरा - भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत आशा कर्मचारी, स्वस्त धान्य दुकान चालक, योजने अंतर्गत अंगीकृत रुग्णालयातील आरोग्यमित्र यांचेमार्फ़त लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड निर्माणाचे काम सुरू आहे.

राज्यात आजमितीस २,४३,२२,४५४ शिधापत्रिका ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये लाभार्थ्यांची एकूण संख्या ९,६१,५८,६२८ असून त्यापैकी ७,९३,२९,०५८ लाभार्थ्यांचे म्हणजेच८२.५०% लाभार्थ्यांचे आधार शिधापत्रिकेसोबत संलग्न करण्यात आलेले आहे. उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ४१ फ भाईंदर शिधावाटप कार्यालय येते. ४१ फ भाईंदर शिधावाटप कार्यालय क्षेत्रातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत ९९.९९% लाभार्थ्यांचे आधार शिधापत्रिकेस संलग्न करण्यात आले असून शुभ्र शिधापत्रिकांसाठी प्राप्त झालेल्या अर्जापैकी ३२७ अर्ज प्रलंबित आहेत. शुभ्र शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचा लाभ अनुज्ञेय नसल्यामुळे सदर शिधापत्रिकाधारक आधार

संलग्न करण्याकरिता पुर्वी उत्सुक नव्हते. सद्यस्थितीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ शुभ्र शिधापत्रिकांना देखील लागू करण्यात आलेला असल्यामुळे आधार जोडणी इच्छूकांची संख्या अचानक वाढली आहे. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळावर ताण वाढल्याचे दिसून येते. तथापि, लाभार्थ्यांचे आधार विनाविलंब शिधापत्रिकेस संलग्न करण्याची दक्षता क्षेत्रिय कार्यालयामार्फत घेण्यात येत आहे. पुरवठा विभागाकडील ऑनलाईन सेवांची वाढती संख्या विचारात घेता, पुरवठा विभागाकडील तालुकास्तरावर तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी विविध क्षेत्रीय कार्यालयाकडून करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने तालुकास्तरीय कार्यालयास ४०१ तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट असलेल्या पिवळे, केशरी, अंत्योदय, अन्नपूर्णा योजना व शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांना (आधार संलग्न प्रक्रिया पूर्ण झालेल्या) आयुष्मान कार्ड वितरीत करण्यात येत आहे. तथापि, लाभार्थ्यांकडे आयुष्मान कार्ड नसल्यास त्यांच्याकडील शिधापत्रिका व फोटो ओळखपत्राच्या आधारे लाभार्थी योजनेचा लाभ घेऊ शकतात.

विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभ घेण्याकरिता लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड असण्याची सक्ती करण्यात आलेली नाही.

---

संलग्न करण्याकरिता पुर्वी उत्सुक नव्हते. सद्यस्थितीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ शुभ्र शिधापत्रिकांना देखील लागू करण्यात आलेला असल्यामुळे आधार जोडणी इच्छूकांची संख्या अचानक वाढली आहे. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळावर ताण वाढल्याचे दिसून येते. तथापि, लाभार्थ्यांचे आधार विनाविलंब शिधापत्रिकेस संलग्न करण्याची दक्षता क्षेत्रिय कार्यालयामार्फत घेण्यात येत आहे. पुरवठा विभागाकडील ऑनलाईन सेवांची वाढती संख्या विचारात घेता, पुरवठा विभागाकडील तालुकास्तरावर तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी विविध क्षेत्रीय कार्यालयाकडून करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने तालुकास्तरीय कार्यालयास ४०१ तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट असलेल्या पिवळे, केशरी, अंत्योदय, अन्नपूर्णा योजना व शुभ्र शिधापत्रिकाधारक कुटुंबांना (आधार संलग्न प्रक्रिया पूर्ण झालेल्या) आयुष्मान कार्ड वितरीत करण्यात येत आहे. तथापि, लाभार्थ्याकडे आयुष्मान कार्ड नसल्यास त्यांच्याकडील शिधापत्रिका व फोटो ओळखपत्राच्या आधारे लाभार्थी योजनेचा लाभ घेऊ शकतात.

विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभ घेण्याकरिता लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड असण्याची सक्ती करण्यात आलेली नाही.

---

पासून राज्यामध्ये BIS २.० या सुधारीत प्रणाली अंतर्गत १.८० कोटी आयुष्मान कार्ड असे सद्यस्थितीमध्ये एकुण २.७८ कोटी आयुष्मान कार्ड निर्माण करण्यात आले आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत समाविष्ट असलेल्या राज्यातील पिवळी, केशरी, शुभ्र, अंत्योदय अन्न योजना, अन्नपुर्णा योजना या शिधापत्रिकाधारक कुटुंबांना एकसमान आयुष्मान (को-ब्रॅन्डेड) कार्ड वितरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर आयुष्मान कार्ड निर्माण करण्याकरीता अन्न नागरी पुरवठा विभागाकडून पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपुर्णा योजना शिधापत्रिकांचा संगणकीकृत डाटा प्राप्त करुन घेण्यात आला आहे. लाभार्थ्याची शिधापत्रिका आधार संलग्न असल्यास १२ अंकी कुटूंब आय.डी. तयार होतो व त्या आधारे ई-केवायसी करून आयुष्मान कार्ड निर्माण केले जाते.

शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्याची कार्यवाही अन्न व नागरी पुरवठा कार्यालयाशी संबंधीत आहे. त्यानुसार सदर शिधापत्रिका आधार कार्डसोबत संलग्न करण्याची कार्यवाही करणेकरीता राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यालयाकडून मा. सचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास दि.१६ मे, २०२४ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरून अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून जिल्हा पुरवठा अधिकारी (सर्व), अन्नधान्य वितरण अधिकारी (सर्व), उपनियंत्रक शिधावाटप (सर्व) यांना दिनांक १८ जून, २०२४ रोजीच्या परिपत्रकाद्वारे शुभ्र शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न करण्याबाबत सूचना निर्गमीत केल्या आहेत. शुभ्र शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड निर्माण करण्याकरीता शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे. शिधापत्रिका आधार क्रमांकाशी संलग्न झाल्यावर आयुष्मान कार्डाची निर्मिती होते. सदर आयुष्मान कार्ड निर्मितीच्या कामाकरिता मिरा - भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जवळपास १२५ आपले सरकार सेवा केंद्रे कार्यरत आहेत. तसेच मिरा - भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत आशा कर्मचारी, स्वस्त धान्य दुकान चालक, योजने अंतर्गत अंगीकृत रुग्णालयातील आरोग्यमित्र यांचेमार्फ़त लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड निर्माणाचे काम सुरू आहे.

राज्यात आजमितीस २,४३,२२,४५४ शिधापत्रिका ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये लाभार्थ्यांची एकूण संख्या ९,६१,५८,६२८ असून त्यापैकी ७,९३,२९,०५८ लाभार्थ्यांचे म्हणजेच८२.५०% लाभार्थ्यांचे आधार शिधापत्रिकेसोबत संलग्न करण्यात आलेले आहे. उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ४१ फ भाईंदर शिधावाटप कार्यालय येते. ४१ फ भाईंदर शिधावाटप कार्यालय क्षेत्रातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत ९९.९९% लाभार्थ्यांचे आधार शिधापत्रिकेस संलग्न करण्यात आले असून शुभ्र शिधापत्रिकांसाठी प्राप्त झालेल्या अर्जापैकी ३२७ अर्ज प्रलंबित आहेत. शुभ्र शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचा लाभ अनुज्ञेय नसल्यामुळे सदर शिधापत्रिकाधारक आधार

सार्वजनिक आरोग्य विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१६७४

महाराष्ट्र विधानसभा २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. विनोद निकोले वि.स .स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"पालघर जिल्ह्यातील डहाणू विधानसभा क्षेत्रातील आरोग्य व्यवस्था सुधारावी म्हणून राज्य शासनाने माहे फेब्रुवारी २०१९ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र अस्वली येथील मुख्य इमारत व निवासी इमारतीचे बांधकाम करणे करिता ०७ कोटी ७१ लाख ७५ हजार रुपयांचा निधी मंजूर करूनही अद्यापही या कामास कोणत्याही प्रकारची सुरुवात झालेली नसणे, सदर रुग्णालय हे जिल्हा परिषद पालघर च्या आरोग्य विभाग यांच्या अखत्यारीत येत असतानाही प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने त्यांच्यावर ठोस कार्यवाही कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत असणे, आरोग्य विभागाच्या या गलथान कारभारामुळे रुग्णांना मुंबई, गुजरात व केंद्रशासित प्रदेश असलेल्या सिल्वासा या ठिकाणी उपचाराकरिता जावे लागत असणे, तसेच रुग्ण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जात असताना प्रचंड प्रमाणात असलेली वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिनिकेतच रुग्णांचे प्राण जात असणे, त्यामुळे आदिवासी बांधवांमध्ये तसेच सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचंड रोष निर्माण झालेला असणे, उक्त बाबी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सतत राज्य शासनाची पाठपुरावा करत निदर्शनास आणून ही कोणतीच उपाययोजना केलेली नसणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना"

---

## मा.मंत्री सार्व.आरोग्य आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१२/ प्र.क्र. १४१ / आरोग्य ३ दिनांक १७ जानेवारी २०13 अन्वये मौजे अस्वली ता. डहाणू येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापनेस मान्यता मिळाली आहे. त्या अनुषंगाने सदर प्रा.आ. केंद्रासाठी जागा उपलब्धतेची कार्यवाही करण्यास सुरुवात झाली. प्रा.आ. केंद्र इमारत बांधकामासाठी श्री. नरेश कंकारिया रा. बोर्डी यांनी स्वत:च्या मालकीची जागा सर्व्हे नं. २४९/१/४ मधील वरकस क्षेत्र १.६५.०० हे.आर. दानपत्रान्वये देण्यास संमतीपत्र सादर केले. तद्नंतर दिनांक ०७ फेब्रुवारी २०१९ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र अस्वली येथील मुख्य इमारत व निवासस्थाने बांधकाम करणेसाठी रु. ७.७१ कोटी रक्कमेची आदिवासी उपयोजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात आले.

प्रा.आ.केंद्राच्या बांधकामासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या जागेची मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद यांच्या नावे करणेबाबतची प्रक्रिया करणेस तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे तसेच सदर ठिकाणी खाजगी किंवा गावठाण ची जागा उपलब्ध न झाल्यमुळे पंचायत समिती डहाणू येथील सर्वसाधारण सभेमधील ठराव करुन प्रा.आ. केंद्राची ईमारत नजिकच्या गावात मौजे जांबुगाव येथे वन विभागाच्या जागेमध्ये बांधकाम करणेबाबत मागणी करण्यात आली. त्यानुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये सदर प्रा.आ. केंद्र मौजे जांबुगाव येथे स्थलांतर करणेबाबत मंजूरी देण्यात आली. ग्रा. पं. जांबुगाव ने वन विभागाकडे पाठपुरावा केल्याने दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी सर्व्हे क्र. संरक्षित वन स.नं ५१५ मधील ०.३४.६६ हेक्टर क्षेत्र बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात आले. परंतु सदर

वनजमीन परिवर्तन केल्यापासून ज्या प्रयोजनाकरिता परिवर्तन करण्यात आली त्या कामासाठी वापर न केल्यास वनविभागाकडून तिचा विनियोग करण्यात येईल असे मंत्रालयीन पत्रात नमुद असल्याने १ वर्षाच्या आत बांधकाम करण्याबाबत सुचित करणेत आले होते.

प्रा.आ. केंद्र अस्वली बांधकामासाठी,बांधकाम विभाग, जिल्हा परिषद पालघर यांना वन विभागाकडील जागा उपलब्धतेबाबत अवगत करणेत आले होते त्याअनुषंगाने जिल्हा परिषद स्तरावरील विविध मंजुरी घेणे व सदर कामाचे अंदाजपत्रकाची कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांचेकडून तांत्रिक मंजूरी घेणे त्याची पुर्तता करणे इत्यादी बाबींमुळे उपरोक्त मंजूर प्रा.आ.केंद्राचे बांधकाम विहिती मुदतीत सुरु झाले नाही. याबाबत उप अभियंता डहाणू यांनी दि. १३ एप्रिल २०२२ रोजी तांत्रिक मान्यतेसाठी जागेची मालकी कागदपत्रे उपलब्ध करुन देणेबाबत या विभागास कळविले परंतू तोपर्यंत १ वर्षाची मुदत संपुष्टात आलेली होती. दिनांक १९ जुलै २०२२ रोजी आरोग्य विभागडून वन विभागास प्रा.आ.केंद्र बांधकांम करणे गरजेचे असल्याकारणे उपरोक्त मंजूर केलेल्या वनजमीनीस मुदतवाढ देण्याबाबत विनंती करण्यात आली होती . त्याचबरोबर त्यांच्या अटीनुसार मंजूर जागेतील वृक्ष काढून घेण्यासठी रक्कम रु. २६,६८१/- चा डिमांड ड्राफ्ट सुध्दा देण्यात आलेला होता. दिनांक २३ जानेवारी २०२३ व १२ मार्च २०२४ पुन्हा मुदतवाढीसाठी वन विभागास पत्र देण्यात आले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधिल नियम क्र. १०३ अन्वये सदर कामांस ५ वर्षाचा कालावधी नंतर ही प्रवर्तनात नसल्याने दिनांक १४ मार्च २०२४ अन्वये सदर कामाची प्रशासकिय मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

उपवनसंरक्षक वन विभाग डहाणू यांचेकडील प्रत्यक्ष झालेल्या चर्चेनुसार व दिनांक २९ मार्च २०२४ रोजीच्या पत्रान्वये अनुसुचित जमाती व इतर पांरपारिक वन निवासी अधिनियम २००६ नियम २००८ अंतर्गत कलम ३ (२) नुसार प्रस्ताव नव्याने दाखल करेणबाबत कळविले आहे. त्यानुसार तालूका स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. तसेच ग्रामपंचायत अस्वली ता.डहाणू यांच्या दिनांक २२ एप्रिल २०२४ च्या पत्रान्वये प्रा.आ.केंद्रासाठी खाजगी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु असल्याचे कळविले आहे. सन २०२४-२५ च्या आरोग्य विभागाकडील आराखडयामध्ये प्रा.आ. केंद्र अस्वली येथील ईमारत व निवासस्थाने बांधकाम प्रस्तावित करण्यात आले असून जागा उपलब्धतेनुसार नव्याने प्रशासकिय मान्यता आदेश निर्गमित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

****************************************

वनजमीन परिवर्तन केल्यापासून ज्या प्रयोजनाकरिता परिवर्तन करण्यात आली त्या कामासाठी वापर न केल्यास वनविभागाकडून तिचा विनियोग करण्यात येईल असे मंत्रालयीन पत्रात नमुद असल्याने १ वर्षाच्या आत बांधकाम करण्याबाबत सुचित करणेत आले होते.

प्रा.आ. केंद्र अस्वली बांधकामासाठी,बांधकाम विभाग, जिल्हा परिषद पालघर यांना वन विभागाकडील जागा उपलब्धतेबाबत अवगत करणेत आले होते त्याअनुषंगाने जिल्हा परिषद स्तरावरील विविध मंजुरी घेणे व सदर कामाचे अंदाजपत्रकाची कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांचेकडून तांत्रिक मंजूरी घेणे त्याची पुर्तता करणे इत्यादी बाबींमुळे उपरोक्त मंजूर प्रा.आ.केंद्राचे बांधकाम विहिती मुदतीत सुरु झाले नाही. याबाबत उप अभियंता डहाणू यांनी दि. १३ एप्रिल २०२२ रोजी तांत्रिक मान्यतेसाठी जागेची मालकी कागदपत्रे उपलब्ध करुन देणेबाबत या विभागास कळविले परंतू तोपर्यंत १ वर्षाची मुदत संपुष्टात आलेली होती. दिनांक १९ जुलै २०२२ रोजी आरोग्य विभागडून वन विभागास प्रा.आ.केंद्र बांधकाम करणे गरजेचे असल्याकारणे उपरोक्त मंजूर केलेल्या वनजमीनीस मुदतवाढ देण्याबाबत विनंती करण्यात आली होती . त्याचबरोबर त्यांच्या अटीनुसार मंजूर जागेतील वृक्ष काढून घेण्यासठी रक्कम रु. २६,६८१/- चा डिमांड ड्राफ्ट सुध्दा देण्यात आलेला होता. दिनांक २३ जानेवारी २०२३ व १२ मार्च २०२४ पुन्हा मुदतवाढीसाठी वन विभागास पत्र देण्यात आले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधिल नियम क्र. १०३ अन्वये सदर कामांस ५ वर्षाचा कालावधी नंतर ही प्रवर्तनात नसल्याने दिनांक १४ मार्च २०२४ अन्वये सदर कामाची प्रशासकिय मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

उपवनसंरक्षक वन विभाग डहाणू यांचेकडील प्रत्यक्ष झालेल्या चर्चेनुसार व दिनांक २९ मार्च २०२४ रोजीच्या पत्रान्वये अनुसुचित जमाती व इतर पांरपारिक वन निवासी अधिनियम २००६ नियम २००८ अंतर्गत कलम ३ (२) नुसार प्रस्ताव नव्याने दाखल करेणबाबत कळविले आहे. त्यानुसार तालूका स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. तसेच ग्रामपंचायत अस्वली ता.डहाणू यांच्या दिनांक २२ एप्रिल २०२४ च्या पत्रान्वये प्रा.आ.केंद्रासाठी खाजगी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु असल्याचे कळविले आहे. सन २०२४-२५ च्या आरोग्य विभागाकडील आराखडयामध्ये प्रा.आ. केंद्र अस्वली येथील ईमारत व निवासस्थाने बांधकाम प्रस्तावित करण्यात आले असून जागा उपलब्धतेनुसार नव्याने प्रशासकिय मान्यता आदेश निर्गमित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

****************************************

सार्वजनिक आरोग्य विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१६७४

महाराष्ट्र विधानसभा २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. विनोद निकोले वि.स .स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"पालघर जिल्ह्यातील डहाणू विधानसभा क्षेत्रातील आरोग्य व्यवस्था सुधारावी म्हणून राज्य शासनाने माहे फेब्रुवारी २०१९ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र अस्वली येथील मुख्य इमारत व निवासी इमारतीचे बांधकाम करणे करिता ०७ कोटी ७१ लाख ७५ हजार रुपयांचा निधी मंजूर करूनही अद्यापही या कामास कोणत्याही प्रकारची सुरुवात झालेली नसणे, सदर रुग्णालय हे जिल्हा परिषद पालघर च्या आरोग्य विभाग यांच्या अखत्यारीत येत असतानाही प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने त्यांच्यावर ठोस कार्यवाही कारवाई करण्याची मागणी जनतेतून होत असणे, आरोग्य विभागाच्या या गलथान कारभारामुळे रुग्णांना मुंबई, गुजरात व केंद्रशासित प्रदेश असलेल्या सिल्वासा या ठिकाणी उपचाराकरिता जावे लागत असणे, तसेच रुग्ण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जात असताना प्रचंड प्रमाणात असलेली वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिनिकेतच रुग्णांचे प्राण जात असणे, त्यामुळे आदिवासी बांधवांमध्ये तसेच सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचंड रोष निर्माण झालेला असणे, उक्त बाबी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सतत राज्य शासनाची पाठपुरावा करत निदर्शनास आणून ही कोणतीच उपाययोजना केलेली नसणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना"

---

## मा.मंत्री सार्व.आरोग्य आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१२/ प्र.क्र. १४१ / आरोग्य ३ दिनांक १७ जानेवारी २०१३ अन्वये मौजे अस्वली ता. डहाणू येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापनेस मान्यता मिळाली आहे. त्या अनुषंगाने सदर प्रा.आ. केंद्रासाठी जागा उपलब्धतेची कार्यवाही करण्यास सुरुवात झाली. प्रा.आ. केंद्र इमारत बांधकामासाठी श्री. नरेश कंकारिया रा. बोर्डी यांनी स्वत:च्या मालकीची जागा **सर्व्हे नं. २४९/१/४ मधील वरकस क्षेत्र १.६५.०० हे.आर.** दानपत्रान्वये देण्यास संमतीपत्र सादर केले. तद्नंतर दिनांक ०७ **फेब्रुवारी २०१९** रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र अस्वली येथील मुख्य इमारत व निवासस्थाने बांधकाम करणेसाठी रु. ७.७१ कोटी रक्कमेची आदिवासी उपयोजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात आले.

प्रा.आ.केंद्राच्या बांधकामासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या जागेची मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद यांच्या नावे करणेबाबतची प्रक्रिया करणेस तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे तसेच सदर ठिकाणी खाजगी किंवा गावठाण ची जागा उपलब्ध न झाल्यमुळे पंचायत समिती डहाणू येथील सर्वसाधारण सभेमधील ठराव करुन प्रा.आ. केंद्राची ईमारत नजिकच्या गावात मौजे जांबुगाव येथे वन विभागाच्या जागेमध्ये बांधकाम करणेबाबत मागणी करण्यात आली. त्यानुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये सदर प्रा.आ. केंद्र मौजे जांबुगाव येथे स्थलांतर करणेबाबत मंजूरी देण्यात आली. ग्रा. पं. जांबुगाव ने वन विभागाकडे पाठपुरावा केल्याने दिनांक **१५ जानेवारी २०२१** रोजी सर्व्हे क्र. संरक्षित वन स.नं ५१५ मधील ०.३४.६६ हेक्टर क्षेत्र बांधकामासाठी उपलब्ध करुन देण्यात आले. परंतु सदर

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, धिरज देशमुख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९४८ पुढीलप्रमाणे आहे :-**

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये विद्युत व स्थापत्य विभाग हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात असून वाढती विद्युत विषयक कामे व तंत्रज्ञानातील अद्यावतीकरण व त्याचा शासकीय कार्यालय व इमारतींमधील वाढता वापर पहाता मुख्य अभियंता (विद्युत) या पदाची पदसंख्या वाढविणे गरजेचे असून त्यासंदर्भात शासनाकडे वेळोवेळी मागणी झालेली असणे, मात्र शासनाने दि.०५/०२/२०२४ रोजीच्या निर्णयान्वये सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत शाखा स्थापत्य शाखेतील प्रादेशिक विभागाच्या अधिपत्याखाली आणण्याचा निर्णय घेणे, सदर निर्णय घेण्यापूर्वी उच्चाधिकार समिती व मंत्रिमंडळ यांची मान्यता घेतलेली नसणे, तद्नंतर चूक लपविण्यासाठी पुन्हा दि.०१/०४/२०२४ रोजी सुधारीत शासन निर्णय काढणे विद्युत विषयक कामांमध्ये त्रुटी राहिल्यास जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता असल्याने विद्युत कामाचे स्वरुप पहाता त्यांचे अंदाजपत्रके तयार करताना व तांत्रिक बाबी हाताळताना विशेषज्ञाची गरज असणे, मात्र सदर निर्णयामुळे विद्युत प्रकल्पामध्ये गंभीर स्वरुपाच्या त्रुटी राहून शासनाचे नुकसान होणार असणे, याअनुषंगाने दि.०५/०२/२०२४ रोजी मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई हे एकच पद अतिरिक्त ठरवून त्या पदावर कार्यरत मुख्य अभियंता (विद्युत) यांच्या सेवा उर्जा विभागात प्रत्यावर्तीत करण्यात येऊन त्यांना डावलून मर्जीतील अधिकाऱ्याला सदर पदावर नेमणूक देण्याकरिता सदर निर्णय घेतला असणे, याबाबत चौकशी करुन सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत शाखा ही स्थापत्य शाखेतील प्रादेशिक विभागाच्या अधिपत्याखाली आणण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

शासकीय इमारतींची वीजसंच मांडणी सुरक्षित राखणे तसेच त्यामध्ये दोष उत्पन्न झाल्यास तातडीने त्याचे निराकरण करणे जेणेकरुन शासनाची कोणतीही वित्तहानी तथा मनुष्यहानी होणार नाही हे सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे आद्य कर्तव्य आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असलेल्या विद्युत शाखेकरीता संपूर्ण राज्यभरात ०१ प्रादेशिक विभाग कार्यालय, ०५ मंडळ कार्यालये, २० विभागीय कार्यालये व ५८ उपविभागीय कार्यालये अशी एकूण ८४ कार्यालये सद्य:स्थितीत कार्यान्वित आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत शाखेमार्फत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये होत असलेल्या विलंबाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम विभागात मुख्य अभियंता (विद्युत) हे एकच पद असल्यामुळे अनेक प्रकरणात मान्यता मिळण्यासाठी प्रकरणे मुंबई येथील मुख्य अभियंता (विद्युत) यांच्या कार्यालयात सादर करण्यात येत होती व त्यामुळे विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे कामाची गती वाढण्यासाठी मुख्य अभियंता (विद्युत) यांचे अधिकार प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता (स्थापत्य) यांना देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर धोरणात्मक निर्णय फेब्रुवारी-२०२३ मध्येच घेतला होता व दरम्यानच्या काळात याबाबत ऊर्जा विभागाशी सल्लामसलत करण्यात आली असून त्यानंतर या निर्णयास मा.उपमुख्यमंत्री (ऊर्जा) यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर शासन निर्णय दि.०५/०२/२०२४ रोजी निर्गमित केलेला आहे. सदर निर्णयानुसार विद्युत शाखेचे नियंत्रक अधिकारी बदलून त्याऐवजी स्थापत्य शाखेच्या नियंत्रक अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली आहे.

कामात सुसुत्रता आणण्याकरीता प्रशासकीय व तांत्रिक कामांसाठी महसूल विभाग निहाय त्या त्या मुख्य अभियंता प्रादेशिक विभागांतर्गत विदयुत शाखेतील मंडळ/विभाग/उप विभागीय कार्यालये आणण्यासाठी तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका १९८४ मधील परिशिष्ट ३४ व ४२ नुसार सोपविण्यात आलेल्या कामांसाठी सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांना नियंत्रक अधिकारी नेमणे आवश्यक असल्यामुळे दि.०५/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करुन दि.०१/०४/२०२४ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

स्थापत्य व विद्युत कामांचे सनियंत्रण व समन्वय योग्यरित्या होऊन कामे विहित मुदतीत पूर्ण होण्याच्यादृष्टिने सदर निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णय घेताना विद्युत शाखा व त्याअंतर्गत काम करणारे अधिकारी / कर्मचारी यांचे स्थापत्य शाखेत समावेशन न करता विद्युत शाखा स्वतंत्रपणे पूर्ण क्षमतेने कार्यान्वित राहिल याची दक्षता शासनाने घेतलेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागात रस्ते, पूल व इमारती यांची कामे असतात. त्यात रस्ते व पुलांची कामे ही सर्वसाधारणपणे ७०% असतात व ३०% कामे ही केवळ इमारतींची असतात. त्या ३०% मधील केवळ २०% भाग विद्युतीकरणाचा असतो. म्हणजेच सर्वसाधारणपणे सार्वजनिक बांधकाम विभागाचा विचार केला तर केवळ ५% पेक्षा कमी कार्यभार हा विद्युत विभागाचा आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असलेल्या विद्युत शाखेकरीता संपूर्ण राज्यभरात ०१ प्रादेशिक विभाग कार्यालय, ०५ मंडळ कार्यालये, २० विभागीय कार्यालये व ५८ उपविभागीय कार्यालये अशी एकूण ८४ कार्यालये सद्य:स्थितीत कार्यान्वित आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत शाखेमार्फत करण्यात येणाऱ्या कामांमध्ये होत असलेल्या विलंबाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम विभागात मुख्य अभियंता (विद्युत) हे एकच पद असल्यामुळे अनेक प्रकरणात मान्यता मिळण्यासाठी प्रकरणे मुंबई येथील मुख्य अभियंता (विद्युत) यांच्या कार्यालयात सादर करण्यात येत होती व त्यामुळे विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे कामाची गती वाढण्यासाठी मुख्य अभियंता (विद्युत) यांचे अधिकार प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता (स्थापत्य) यांना देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर धोरणात्मक निर्णय फेब्रुवारी-२०२३ मध्येच घेतला होता व दरम्यानच्या काळात याबाबत ऊर्जा विभागाशी सल्लामसलत करण्यात आली असून त्यानंतर या निर्णयास मा.उपमुख्यमंत्री (ऊर्जा) यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर शासन निर्णय दि.०५/०२/२०२४ रोजी निर्गमित केलेला आहे. सदर निर्णयानुसार विद्युत शाखेचे नियंत्रक अधिकारी बदलून त्याऐवजी स्थापत्य शाखेच्या नियंत्रक अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली आहे.

कामात सुसुत्रता आणण्याकरीता प्रशासकीय व तांत्रिक कामांसाठी महसूल विभाग निहाय त्या त्या मुख्य अभियंता प्रादेशिक विभागांतर्गत विदयुत शाखेतील मंडळ/विभाग/उप विभागीय कार्यालये आणण्यासाठी तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका १९८४ मधील परिशिष्ट ३४ व ४२ नुसार सोपविण्यात आलेल्या कामांसाठी सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांना नियंत्रक अधिकारी नेमणे आवश्यक असल्यामुळे दि.०५/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करुन दि.०१/०४/२०२४ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

स्थापत्य व विद्युत कामांचे सनियंत्रण व समन्वय योग्यरित्या होऊन कामे विहित मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टिने सदर निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णय घेताना विद्युत शाखा व त्याअंतर्गत काम करणारे अधिकारी / कर्मचारी यांचे स्थापत्य शाखेत समावेशन न करता विद्युत शाखा स्वतंत्रपणे पूर्ण क्षमतेने कार्यान्वित राहिल याची दक्षता शासनाने घेतलेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागात रस्ते, पूल व इमारती यांची कामे असतात. त्यात रस्ते व पुलांची कामे ही सर्वसाधारणपणे ७०% असतात व ३०% कामे ही केवळ इमारतींची असतात. त्या ३०% मधील केवळ २०% भाग विद्युतीकरणाचा असतो. म्हणजेच सर्वसाधारणपणे सार्वजनिक बांधकाम विभागाचा विचार केला तर केवळ ५% पेक्षा कमी कार्यभार हा विद्युत विभागाचा आहे.

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, धिरज देशमुख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९४८ पुढीलप्रमाणे आहे :-**

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये विद्युत व स्थापत्य विभाग हा स्वातंत्रयपूर्व काळापासून अस्तित्वात असून वाढती विद्युत विषयक कामे व तंत्रज्ञानातील अद्यावतीकरण व त्याचा शासकीय कार्यालय व इमारतींमधील वाढता वापर पहाता मुख्य अभियंता (विद्युत) या पदाची पदसंख्या वाढविणे गरजेचे असून त्यासंदर्भात शासनाकडे वेळोवेळी मागणी झालेली असणे, मात्र शासनाने दि.०५/०२/२०२४ रोजीच्या निर्णयान्वये सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत शाखा स्थापत्य शाखेतील प्रादेशिक विभागाच्या अधिपत्याखाली आणण्याचा निर्णय घेणे, सदर निर्णय घेण्यापूर्वी उच्चाधिकार समिती व मंत्रिमंडळ यांची मान्यता घेतलेली नसणे, तद्नंतर चूक लपविण्यासाठी पुन्हा दि.०१/०४/२०२४ रोजी सुधारीत शासन निर्णय काढणे विद्युत विषयक कामांमध्ये त्रुटी राहिल्यास जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता असल्याने विद्युत कामाचे स्वरुप पहाता त्यांचे अंदाजपत्रके तयार करताना व तांत्रिक बाबी हाताळताना विशेषज्ञाची गरज असणे, मात्र सदर निर्णयामुळे विद्युत प्रकल्पामध्ये गंभीर स्वरुपाच्या त्रुटी राहून शासनाचे नुकसान होणार असणे, याअनुषंगाने दि.०५/०२/२०२४ रोजी मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई हे एकच पद अतिरिक्त ठरवून त्या पदावर कार्यरत मुख्य अभियंता (विद्युत) यांच्या सेवा उर्जा विभागात प्रत्यावर्तीत करण्यात येऊन त्यांना डावलून मर्जीतील अधिकाऱ्याला सदर पदावर नेमणूक देण्याकरिता सदर निर्णय घेतला असणे, याबाबत चौकशी करुन सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत शाखा ही स्थापत्य शाखेतील प्रादेशिक विभागाच्या अधिपत्याखाली आणण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

शासकीय इमारतींची वीजसंच मांडणी सुरक्षित राखणे तसेच त्यामध्ये दोष उत्पन्न झाल्यास तातडीने त्याचे निराकरण करणे जेणेकरुन शासनाची कोणतीही वित्तहानी तथा मनुष्यहानी होणार नाही हे सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे आद्य कर्तव्य आहे.

विद्युत विषयक कामांची अंदाजपत्रके तयार करणे व तांत्रिक बाबी हाताळणे याकरीता विद्युत शाखेची पदवी असलेले अधीक्षक अभियंता (विद्युत), कार्यकारी अभियंता (विद्युत), उप अभियंता (विद्युत) व सहायक अभियंता श्रेणी-२/शाखा अभियंता (विद्युत) या संवर्गातील अनुभवी अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत आहेत. सहायक अभियंता श्रेणी-२/शाखा अभियंता (विद्युत), उप अभियंता (विद्युत) या संवर्गातील अधिकाऱ्यांनी तयार केलेली अंदाजपत्रके कार्यकारी अभियंता (विद्युत) व अधीक्षक अभियंता (विद्युत) या संवर्गातील अनुभवी अधिकाऱ्यांमार्फत तपासली जात असल्यामुळे विद्युत प्रकल्पात त्रुटी राहण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि.०३/०२/२०२३ अन्वये ऊर्जा विभागातील मुख्य विद्युत निरिक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.संदिप अरविंद पाटील, मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. श्री.पाटील सदर पदाचा कार्यभार सांभाळत असताना दरम्यानच्या कालावधीत त्यांचे ऊर्जा विभागात समावेशन करण्याचा निर्णय स्थापत्य व विद्युत शाखेतील कामांचे संनियंत्रण व समन्वय योग्यरित्या होण्यासाठी व कामकाजात गतिमानता येण्याच्या दृष्टिने शासनाने घेतलेला आहे.

****************

लक्षवेधी सूचना क्रमांक- १४४

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

**श्री. अबू आजमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १४४ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील दोन कोटी १२ लाख ५५ हजार शालेय विद्यार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक असलेल्या आधार पडताळणीसाठी ३० मार्च ही तारीख असताना जवळपास एक कोटी ९४ लाख ६९ हजार विद्यार्थ्यांचेच आधार व्हेरिफिकेशन झाले असल्याने जवळपास १२ लाख मुले शासनामार्फत देण्यात येणाऱ्या दोन ड्रेस सह इतर योजना पासून वंचित राहणार असल्याची बाब एप्रिल च्या सुरुवातीस निदर्शनास येणे, यातील गंभीर बाब म्हणजे जवळपास पाच लाख १७ हजार २३२ विद्यार्थ्यांनी अद्याप आधार क्रमांक शिक्षण विभागाला उपलब्ध करून देण्यात न येणे, आधार व्हेरिफिकेशन नसल्यामुळे नव्या सत्रातील लाखो विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार व गणवेश देता येणार नसल्याने शालेय शिक्षण विभागाकडून आधार वेरिफिकेशन करिता सवलत देण्याबाबत शासन स्तरावर करण्यात आलेली वा येत असलेली कार्यवाही व उपाययोजना".

---

### श्री. दिपक केसरकर, मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन

राज्यामध्ये इ. १ ली ते १२ या इयत्तांमधून सुमारे २ कोटी १२ लक्ष विद्यार्थी विविध माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत आहेत. राज्यातील १०० टक्के मुलांचे आधारकार्ड नोंदणी करुन अशा आधारधारक मुलांची नोंद सरल प्रणालीअंतर्गत करण्यात येते.

सरल प्रणालीतील स्टुडंट पोर्टलमध्ये मुख्याध्यापकांमार्फत संबंधित शाळेत शिक्षण घेत असलेल्या सर्व मुलांच्या आधारबाबतची नोंद करण्यात येते व तद्नंतर आधार प्राधिकरणामार्फत (UIDAI) सदर माहितीची पडताळणी करून घेण्यात येते.

शालेय शिक्षण विभागाकडील विविध लाभांच्या योजनांचा लाभ घेण्याकरीता सर्व पात्र विद्यार्थ्यांचे आधार क्रमांकाची पडताळणी आवश्यक आहे. राज्यातील २,११,८१,२४८ विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाची पडताळणी करण्यात आली आहे. यामध्ये २,०८,४८०७७ एवढ्या विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक वैध ठरलेले आहेत. उर्वरीत ११,३४,९६० विद्यार्थ्यांपैकी ३,३३,१६१ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नाहीत. तसेच, उर्वरीत ८,०१,७९९ विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाच्या माहितीमध्ये विसंगती आढळून आलेली आहे. त्यामुळे त्यांची पडताळणी होत नाही.

विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाची पडताळणी न झाल्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजना अथव गणवेश अशा कोणत्याही योजनेपासून वंचित ठेवण्यात येत नाही. शासनाने शाळास्तरावर आधार पडताळणी, दुरुस्ती तसेच नविन आधार कार्ड विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गटसाधन केंद्रावर २ असे एकूण ८१६ आधार नोंदणी संच उपलब्ध करून दिलेले आहेत.

ज्या ठिकाणी बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या आधारबाबत किंवा नविन प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नाहीत अशा विद्यार्थ्यांबाबतची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहेत. एखाद्या शाळेत आधार पडताळणी न झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यास, इतर विभागाकडील (महिला व बालविकास) आधार नोंदणी संच उपलब्ध करून कार्यवाही करण्यात येत आहे. गट साधन केंद्रावर काही विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक अथवा इतर तपशिलाबाबत कोणतीही तांत्रिक अडचण असल्यास त्याकरीता आवश्यक दुरूस्ती अशी दोनही कामे गटस्तरावर सुरू आहेत.

*****************************

मुद्र. ०७८८ - २ ३ए.

ज्या ठिकाणी बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या आधारबाबत किंवा नविन प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नाहीत अशा विद्यार्थ्यांबाबतची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहेत. एखाद्या शाळेत आधार पडताळणी न झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यास, इतर विभागाकडील (महिला व बालविकास) आधार नोंदणी संच उपलब्ध करून कार्यवाही करण्यात येत आहे. गट साधन केंद्रावर काही विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक अथवा इतर तपशिलाबाबत कोणतीही तांत्रिक अडचण असल्यास त्याकरीता आवश्यक दुरूस्ती अशी दोनही कामे गटस्तरावर सुरू आहेत.

****************************

पुस्त. ०७०० - २ ३ग.

लक्षवेधी सूचना क्रमांक- १४४

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२४ चे पावसाळी अधिवेशन

**श्री. अबू आजमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १४४ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील दोन कोटी १२ लाख ५५ हजार शालेय विद्यार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी आवश्यक असलेल्या आधार पडताळणीसाठी ३० मार्च ही तारीख असताना जवळपास एक कोटी ९४ लाख ६९ हजार विद्यार्थ्यांचेच आधार व्हेरिफिकेशन झाले असल्याने जवळपास १२ लाख मुले शासनामार्फत देण्यात येणाऱ्या दोन ड्रेस सह इतर योजना पासून वंचित राहणार असल्याची बाब एप्रिल च्या सुरुवातीस निदर्शनास येणे, यातील गंभीर बाब म्हणजे जवळपास पाच लाख १७ हजार २३२ विद्यार्थ्यांनी अद्याप आधार क्रमांक शिक्षण विभागाला उपलब्ध करून देण्यात न येणे, आधार व्हेरिफिकेशन नसल्यामुळे नव्या सत्रातील लाखो विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार व गणवेश देता येणार नसल्याने शालेय शिक्षण विभागाकडून आधार वेरिफिकेशन करिता सवलत देण्याबाबत शासन स्तरावर करण्यात आलेली वा येत असलेली कार्यवाही व उपाययोजना".

---

### श्री. दिपक केसरकर, मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन

राज्यामध्ये इ. १ ली ते १२ या इयत्तांमधून सुमारे २ कोटी १२ लक्ष विद्यार्थी विविध माध्यमांच्या शाळांमधून शिक्षण घेत आहेत. राज्यातील १०० टक्के मुलांचे आधारकार्ड नोंदणी करुन अशा आधारधारक मुलांची नोंद सरल प्रणालीअंतर्गत करण्यात येते.

सरल प्रणालीतील स्टुडंट पोर्टलमध्ये मुख्याध्यापकांमार्फत संबंधित शाळेत शिक्षण घेत असलेल्या सर्व मुलांच्या आधारबाबतची नोंद करण्यात येते व तद्नंतर आधार प्राधिकरणामार्फत (UIDAI) सदर माहितीची पडताळणी करून घेण्यात येते.

शालेय शिक्षण विभागाकडील विविध लाभांच्या योजनांचा लाभ घेण्याकरीता सर्व पात्र विद्यार्थ्यांचे आधार क्रमांकाची पडताळणी आवश्यक आहे. राज्यातील २,११,८१,२४८ विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाची पडताळणी करण्यात आली आहे. यामध्ये २,०८,४८०७७ एवढ्या विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक वैध ठरलेले आहेत. उर्वरीत ११,३४,९६० विद्यार्थ्यांपैकी ३,३३,१६१ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नाहीत. तसेच, उर्वरीत ८,०१,७९९ विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाच्या माहितीमध्ये विसंगती आढळून आलेली आहे. त्यामुळे त्यांची पडताळणी होत नाही.

विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाची पडताळणी न झाल्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजना अथव गणवेश अशा कोणत्याही योजनेपासून वंचित ठेवण्यात येत नाही. शासनाने शाळास्तरावर आधार पडताळणी, दुरुस्ती तसेच नविन आधार कार्ड विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गटसाधन केंद्रावर २ असे एकूण ८१६ आधार नोंदणी संच उपलब्ध करून दिलेले आहेत.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

डॉ. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२७० पुढील प्रमाणे आहे :-

भारत हा कृषीप्रधान देश असूनही शालेय व माध्यमिक शिक्षणात कृषी विषय नाही याची खंत विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) २०१७ च्या अहवालात व्यक्त करणे, अन्य विद्याशाखांच्या तूलनेत कृषी शाखेत शिक्षण घेण्याचा कल कमीअसणे, कृषी अभ्यासक्रमाचा उद्देश लक्षात घेऊन शाळेत शेती शिकवल्याने कृषी स्वयंरोजगाराला चालना मिळण्यास मदत होणारअसणे, त्यामुळे राज्य सरकारने २०२१ मध्ये शालेय अभ्यासक्रमात कृषी विषय आणण्यासाठी महाराष्ट्र राज्यशिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (MSRTC) आणि महाराष्ट्र कृषी, शिक्षण आणि संशोधन परिषद (MCAER) यांना संयुक्तपणे अभ्यासक्रमाची रचना करण्यास सांगणे, त्यानुषंगाने पुढील शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शाळांच्या अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील पत्रकार परिषदेत केलेली असणे, याकरीता राज्यातील माध्यमिक व प्राथमिक शाळांमध्ये कृषी शिक्षणासाठी कृषी पदवी किंवा पदविका असलेल्यांच्या नियुक्ती करणे आवश्यक असणे, परंतू जे शिक्षक सद्या कार्यरत आहेत त्यांनाच एक महिन्याचे प्रशिक्षण देऊन कृषी शिक्षणासाठी त्यांचीच नियुक्ती करण्याचे शासनाच्या विचाराधीन असणे, कृषी महाविद्यालयात कृषी शिक्षण पूर्ण घेतलेल्यांना आपण प्राध्यापक म्हणून भरती करतो त्याप्रमाणे कृषी शिक्षक म्हणून कृषी पदवी किंवा पदविका असलेल्याची नियुक्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

श्री.दिपक केसरकर, मा.मंत्री शालेय शिक्षण यांचे निवेदन

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने भारतात कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशातील शेतीचे महत्व, कृषी क्षेत्रातील मानवी गुंतवणूक, शेतीचे लोकजीवनातील विशेष स्थान या सर्व बाबींचा विचार करता नव्या पिढीची नाळ कृषी क्षेत्राशी जोडण्यासाठी व कृषी क्षेत्राचा विस्तार होण्यासाठी कृषी अभ्यासक्रमाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात असणे आवश्यक झालेले आहे. असे निरीक्षण विद्यापीठ अनुदान आयोगानेही नोंदविलेले आहे.

शाळेत शेती शिकवल्याने कृषी स्वयंरोजगाराला चालना मिळेल तसेच कृषी आधारित व्यावसायिकतेचा पाया शालेय स्तरापासून घातला जाईल. या बाबी विचारात घेऊन मा.मंत्री (शालेय शिक्षण) व मा. मंत्री (कृषी) यांच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या संयुक्त बैठकीत शेती विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्यासाठी ६ सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीमध्ये, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे ०२ तज्ज्ञ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यातील ०२ तज्ज्ञ व महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे ०२ तज्ज्ञ समाविष्ट करण्यात आले. सहा सदस्यीय मुख्य समितीला सहाय्य करण्यासाठी कृषी महाविद्यालयातील १२ प्राध्यापकांची उपसमिती तयार करण्यात आली होती. सदर समितीमार्फत शालेय अभ्यासक्रमात शेती विषय समाविष्ट करण्यासाठी (इयत्ता, वयोगट, काठिन्यपातळी यांचा विचार करुन) इयत्तावार दोन प्रकारचें मसुदे तयार करण्यात आले आहेत.

१. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात एकात्मिक स्वरूपात समाविष्ट करावयाचे घटक.

२. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात इयत्ता नववी आणि इयत्ता दहावीसाठी स्वतंत्र विषय म्हणून समावेश करावयाचे घटक.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार होणाऱ्या नवीन अभ्यासक्रमामध्ये कृषी विषयाचा / आशयाचा समावेश करण्याबाबत (समितीमार्फत तयार केलेल्या मसुद्याचा आधार घेऊन) आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

शेतीचे सर्वांगीण महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात यावे यासाठी सद्यस्थितीत कृषि विषय शालेय अभ्यासक्रमात एकात्मिक पद्धतीने समाविष्ट करण्यात आलेला आहे. शालेय अभ्यासक्रमातील इतर सर्व विषयांच्या सहसंबंधातून शेतीचे महत्त्व, उपयोजन, व्यवसाय संधी, शेती विषयक जाणीव जागृती अशा पैलूंना स्पर्श करण्यात येत आहे.

इयत्ता १ली ते ८ वी च्या पाठ्यक्रमामध्ये कार्यानुभव/ कार्यशिक्षण विषयांतर्गत कृषि विषयातील आशय समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यामध्ये परसातील बागकाम, कुंडीतील लागवड, फळ प्रक्रिया, सुलभ शेती, मत्स्यव्यवसाय, शेतीपूरक व्यवसाय, पशुपक्षी संवर्धन यातील उपक्रमांचा समावेश आहे.

इयत्ता ९ वी व १० वी च्या स्तरावर सद्यस्थितीत कृषी संदर्भाने स्वतंत्र विषय सुरु नाही. तथापि, इयत्ता ९ वी व १० वी स्तरावर National Skill Qualification Framework (NSQF) अंतर्गत विविध कृषि अनुषंगिक विषय सुरु करण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार तयार करण्यात येणाऱ्या नवीन अभ्यासक्रमामध्ये सदर विषय हे व्यावसायिक विषय म्हणून स्वतंत्रपणे शिकविण्यात येतील.

सद्यस्थितीत इयत्ता ११ वी व १२ वी च्या स्तरावर कृषिविज्ञान व तंत्रज्ञान, पशुविज्ञान व तंत्रज्ञान तसेच अन्नशास्त्र व तंत्रज्ञान हे ३ स्वतंत्र विषय वैकल्पिक स्वरुपात सुरु आहेत.

राज्यात सद्यस्थितीत सुरु असलेल्या ११ वी १२ वी स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांऐवजी (NSQF) अंतर्गत कृषिविषयक विविध विषय Agricultural Group मध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. उदा.Dairy Farmer/Dairy Entrepreneur, Small Poultry Farmer, Organic Grower, Irrigation Service Technician, Floriculturist (Open Cultivation), Gardener इत्यादी. सदर विषय वैकल्पिक स्वरुपात विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत.

इयत्ता ८ वी पर्यंत कृषी स्वतंत्र विषय नसल्यामुळे त्याचे अध्यापनासाठी स्वतंत्र शिक्षक नियुक्त केले जात नाहीत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार इयत्ता सहावी पासून व्यावसायिक शिक्षण देणे अनिवार्य आहे. परंतु इयत्ता सहावीपासून आठवीपर्यंत विविध व्यवसायातील प्रकल्प करणे अपेक्षित आहे यासाठी नियमित शिक्षकांना प्रशिक्षण देऊन हे कार्य करणे अपेक्षित आहे.

राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांकरीता कोणत्या इयत्तेकरिता कृषी विषय शिकविण्यात येणार आहे हे निश्चित झाल्यानंतर, संचमान्यतेचे निकष, कृषी शिक्षकाकरीता आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व कृषी शिक्षकांची पदभरतीची कार्यपध्दती विहीत करण्यात येईल.

इयत्ता ११वी १२वी स्तरावर स्वतंत्र विषय सुरु असल्याने त्याठिकाणी कृषी अध्यापनासाठी पात्रताधारक शिक्षक नियुक्त केले जातात. त्यांसाठी आवश्यक अर्हता शासन निर्णय दिनांक २५.०२.२०१९ अन्वये विहित करण्यात आलेल्या आहेत.

---

शेतीचे सर्वांगीण महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात यावे यासाठी सद्यस्थितीत कृषि विषय शालेय अभ्यासक्रमात एकात्मिक पद्धतीने समाविष्ट करण्यात आलेला आहे. शालेय अभ्यासक्रमातील इतर सर्व विषयांच्या सहसंबंधातून शेतीचे महत्त्व, उपयोजन, व्यवसाय संधी, शेती विषयक जाणीव जागृती अशा पैलूंना स्पर्श करण्यात येत आहे.

इयत्ता १ली ते ८ वी च्या पाठ्यक्रमामध्ये कार्यानुभव/ कार्यशिक्षण विषयांतर्गत कृषि विषयातील आशय समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यामध्ये परसातील बागकाम, कुंडीतील लागवड, फळ प्रक्रिया, सुलभ शेती, मत्स्यव्यवसाय, शेतीपूरक व्यवसाय, पशुपक्षी संवर्धन यातील उपक्रमांचा समावेश आहे.

इयत्ता ९ वी व १० वी च्या स्तरावर सद्यस्थितीत कृषी संदर्भाने स्वतंत्र विषय सुरु नाही. तथापि, इयत्ता ९ वी व १० वी स्तरावर National Skill Qualification Framework (NSQF) अंतर्गत विविध कृषि अनुषंगिक विषय सुरु करण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार तयार करण्यात येणाऱ्या नवीन अभ्यासक्रमामध्ये सदर विषय हे व्यावसायिक विषय म्हणून स्वतंत्रपणे शिकविण्यात येतील.

सद्यस्थितीत इयत्ता ११ वी व १२ वी च्या स्तरावर कृषिविज्ञान व तंत्रज्ञान, पशुविज्ञान व तंत्रज्ञान तसेच अन्नशास्त्र व तंत्रज्ञान हे ३ स्वतंत्र विषय वैकल्पिक स्वरुपात सुरु आहेत.

राज्यात सद्यस्थितीत सुरु असलेल्या ११ वी १२ वी स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांऐवजी (NSQF) अंतर्गत कृषिविषयक विविध विषय Agricultural Group मध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. उदा.Dairy Farmer/Dairy Entrepreneur, Small Poultry Farmer, Organic Grower, Irrigation Service Technician, Floriculturist (Open Cultivation), Gardener इत्यादी. सदर विषय वैकल्पिक स्वरुपात विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत.

इयत्ता ८ वी पर्यंत कृषी स्वतंत्र विषय नसल्यामुळे त्याचे अध्यापनासाठी स्वतंत्र शिक्षक नियुक्त केले जात नाहीत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार इयत्ता सहावी पासून व्यावसायिक शिक्षण देणे अनिवार्य आहे. परंतु इयत्ता सहावीपासून आठवीपर्यंत विविध व्यवसायातील प्रकल्प करणे अपेक्षित आहे यासाठी नियमित शिक्षकांना प्रशिक्षण देऊन हे कार्य करणे अपेक्षित आहे.

राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांकरीता कोणत्या इयत्तेकरिता कृषी विषय शिकविण्यात येणार आहे हे निश्चित झाल्यानंतर, संचमान्यतेचे निकष, कृषी शिक्षकाकरीता आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व कृषी शिक्षकांची पदभरतीची कार्यपध्दती विहीत करण्यात येईल.

इयत्ता ११वी १२वी स्तरावर स्वतंत्र विषय सुरु असल्याने त्याठिकाणी कृषी अध्यापनासाठी पात्रताधारक शिक्षक नियुक्त केले जातात. त्यांसाठी आवश्यक अर्हता शासन निर्णय दिनांक २५.०२.२०१९ अन्वये विहित करण्यात आलेल्या आहेत.

---

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

डॉ. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२७० पुढील प्रमाणे आहे :-

भारत हा कृषीप्रधान देश असूनही शालेय व माध्यमिक शिक्षणात कृषी विषय नाही याची खंत विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) २०१७ च्या अहवालात व्यक्त करणे, अन्य विद्याशाखांच्या तूलनेत कृषी शाखेत शिक्षण घेण्याचा कल कमीअसणे, कृषी अभ्यासक्रमाचा उद्देश लक्षात घेऊन शाळेत शेती शिकवल्याने कृषी स्वयंरोजगाराला चालना मिळण्यास मदत होणारअसणे, त्यामुळे राज्य सरकारने २०२१ मध्ये शालेय अभ्यासक्रमात कृषी विषय आणण्यासाठी महाराष्ट्र राज्यशिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (MSRTC) आणि महाराष्ट्र कृषी, शिक्षण आणि संशोधन परिषद (MCAER) यांना संयुक्तपणे अभ्यासक्रमाची रचना करण्यास सांगणे, त्यानुषंगाने पुढील शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शाळांच्या अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील पत्रकार परिषदेत केलेली असणे, याकरीता राज्यातील माध्यमिक व प्राथमिक शाळांमध्ये कृषी शिक्षणासाठी कृषी पदवी किंवा पदविका असलेल्यांच्या नियुक्ती करणे आवश्यक असणे, परंतू जे शिक्षक सद्या कार्यरत आहेत त्यांनाच एक महिन्याचे प्रशिक्षण देऊन कृषी शिक्षणासाठी त्यांचीच नियुक्ती करण्याचे शासनाच्या विचाराधीन असणे, कृषी महाविद्यालयात कृषी शिक्षण पूर्ण घेतलेल्यांना आपण प्राध्यापक म्हणून भरती करतो त्याप्रमाणे कृषी शिक्षक म्हणून कृषी पदवी किंवा पदविका असलेल्याची नियुक्ती करण्याची आवश्यकता, याबावत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

श्री.दिपक केसरकर, मा.मंत्री शालेय शिक्षण यांचे निवेदन

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने भारतात कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशातील शेतीचे महत्व, कृषी क्षेत्रातील मानवी गुंतवणूक, शेतीचे लोकजीवनातील विशेष स्थान या सर्व बाबींचा विचार करता नव्या पिढीची नाळ कृषी क्षेत्राशी जोडण्यासाठी व कृषी क्षेत्राचा विस्तार होण्यासाठी कृषी अभ्यासक्रमाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात असणे आवश्यक झालेले आहे. असे निरीक्षण विद्यापीठ अनुदान आयोगानेही नोंदविलेले आहे.

शाळेत शेती शिकवल्याने कृषी स्वयंरोजगाराला चालना मिळेल तसेच कृषी आधारित व्यावसायिकतेचा पाया शालेय स्तरापासून घातला जाईल. या बाबी विचारात घेऊन मा.मंत्री (शालेय शिक्षण) व मा. मंत्री (कृषी) यांच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या संयुक्त बैठकीत शेती विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्यासाठी ६ सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीमध्ये, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे ०२ तज्ज्ञ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यातील ०२ तज्ज्ञ व महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे ०२ तज्ज्ञ समाविष्ट करण्यात आले. सहा सदस्यीय मुख्य समितीला सहाय्य करण्यासाठी कृषी महाविद्यालयातील १२ प्राध्यापकांची उपसमिती तयार करण्यात आली होती. सदर समितीमार्फत शालेय अभ्यासक्रमात शेती विषय समाविष्ट करण्यासाठी (इयत्ता, वयोगट, काठिन्यपातळी यांचा विचार करुन) इयत्तावार दोन प्रकारचें मसुदे तयार करण्यात आले आहेत.

१. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात एकात्मिक स्वरूपात समाविष्ट करावयाचे घटक.

२. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात इयत्ता नववी आणि इयत्ता दहावीसाठी स्वतंत्र विषय म्हणून समावेश करावयाचे घटक.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार होणाऱ्या नवीन अभ्यासक्रमामध्ये कृषी विषयाचा / आशयाचा समावेश करण्याबाबत (समितीमार्फत तयार केलेल्या मसुद्याचा आधार घेऊन) आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

लक्षवेधी सूचना क्र.९४६

महाराष्ट्र विधानसभा

२०२४ चे (पावसाळी) अधिवेशन

श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर),डॉ. विनय कोरे विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९४६ पुढीलप्रमाणे आहे.

" सन २०१६-१७ पासून दुर्बल वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पहिलीपासून इंग्रजी शाळांमध्ये दिली जाणारी आरटीई अंतर्गत ची २५% शालेय शुल्क परिपूर्ती मागील ०५ ते ०६ वर्षापासून प्रलंबित आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जवळपास १० हजार पेक्षा अधिक शाळा आर्थिक संकटात सापडल्या असून काही संस्था चालकांनी आत्महत्या सुद्धा केल्या आहेत. कोरोना काळातील फी चा दर १७८६० रु वरून अचानकपणे ०८ हजार रुपये करण्यात आला आहे. त्याबाबत कोणत्याही कारणाशिवाय ६० टक्के आरटीई शुल्क कपात करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील स्वयं अर्थसहित मराठी शाळांना अनुदानासह या शाळांमध्ये मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शिष्यवृत्ती, मध्यान्ह भोजन योजना या बाबींचा लाभ सरकारमार्फत देण्यात येत नाही. मागील पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेत विधान परिषदेमध्ये शाळांना अनुदान देण्यात यावे याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता परंतु त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

श्री. दिपक केसरकर, मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी राज्यात दिनांक १ एप्रिल २०१० पासून सुरू आहे. शिक्षण हक्क कायद्यातील कलम १२(१)(सी) नुसार दुर्बल व वंचित गटातील मुलांना राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार खाजगी विनाअनुदानित व खाजगी कायम विनाअनुदानित शाळांमध्ये (अल्पसंख्यांक वगळून) २५ टक्के राखी जागांवर प्रवेश देण्याची तरतूद आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२(२) नुसार आरटीई २५ प्रवेशीत विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपूर्ती शासनाने प्रतिवर्षी निश्चित केलेले दर व शाळांनी त्या-त्या वर्षी ठरविलेली फी यापैकी जे कमी असेल त्यानुसार पात्र शाळांना अदा करण्याकरीता शासनाकडुन प्राप्त झालेली रक्कम संचालनाकडुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सर्व यांना वितरीत केली जाते व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सर्व यांच्याकडून शाळांना वितरीत केली जाते.

सन २०१२-१३ मे सन २०२३-२४ या कालावधीतील RTE २५ % अंतर्गत राखीव जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती शुल्काची देय रक्कम रू. २८९६.७५ कोटी इतकी आहे.शासन दरवर्षी यासाठी काही निधी अर्थसंकल्पित करून वितरीत करते. तथापि, देय रक्कमेपेक्षा

अर्थसंकल्पित रक्कम कमी असल्याने दरवर्षी काही थकबाकी प्रलंबित राहत आहे.आतापर्यंत शासनाने रू.१०७३.७८ कोटी इतका निधी वितरीत केला असून, प्रलंबित शुल्काची रक्कम रू.१८२२.९७ कोटी इतकी आहे. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये यासाठी रू.१७०.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

कोरोना काळामध्ये आपत्कालीन परिस्थीमध्ये शाळा बंद असल्यामुळे शाळांचा होत असलेला नियमित खर्च कमी झाल्याने शासनाने अशा परिस्थितीमध्ये आरटीई २५ टक्के प्रतिपूर्तीची शाळांना देय असलेली फी १७६७०/- वरून ८ हजार रूपये कमी करण्यात आली. कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीनंतर शाळा नियमित सुरू झाल्यानंतर प्रतिपूर्तीची रक्कम दि.०६मार्च २०२३ नुसार १७६७०/- करण्यात आलेला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा व अनुदानित शाळांना मध्यान्ह भोजन योजना लाभ दिला जातो.तर मोफत गणवेश आणि मोफत पाठ्यपुस्तक योजना या योजनांचा लाभ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना केंद्र शासनाच्या निकषानुसार देण्यात येतो. स्वयंअर्थसहाय्यीत शाळांच्या बाबतीत अशी तरतुद करण्यात आलेली नाही.

**********

अर्थसंकल्पित रक्कम कमी असल्याने दरवर्षी काही थकबाकी प्रलंबित राहत आहे.आतापर्यंत शासनाने रू.१०७३.७८ कोटी इतका निधी वितरीत केला असून, प्रलंबित शुल्काची रक्कम रू.१८२२.९७ कोटी इतकी आहे. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये यासाठी रू.१७०.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

कोरोना काळामध्ये आपत्कालीन परिस्थीमध्ये शाळा बंद असल्यामुळे शाळांचा होत असलेला नियमित खर्च कमी झाल्याने शासनाने अशा परिस्थितीमध्ये आरटीई २५ टक्के प्रतिपूर्तीची शाळांना देय असलेली फी १७६७०/- वरून ८ हजार रूपये कमी करण्यात आली. कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीनंतर शाळा नियमित सुरू झाल्यानंतर प्रतिपूर्तीची रक्कम दि.०६मार्च २०२३ नुसार १७६७०/- करण्यात आलेला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा व अनुदानित शाळांना मध्यान्ह भोजन योजना लाभ दिला जातो.तर मोफत गणवेश आणि मोफत पाठ्यपुस्तक योजना या योजनांचा लाभ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना केंद्र शासनाच्या निकषानुसार देण्यात येतो. स्वयंअर्थसहाय्यीत शाळांच्या बाबतीत अशी तरतुद करण्यात आलेली नाही.

**********

लक्षवेधी सूचना क्र.९४६

महाराष्ट्र विधानसभा

२०२४ चे ( पावसाळी ) अधिवेशन

श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर),डॉ. विनय कोरे विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९४६ पुढीलप्रमाणे आहे.

" सन २०१६-१७ पासून दुर्बल वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पहिलीपासून इंग्रजी शाळांमध्ये दिली जाणारी आरटीई अंतर्गत ची २५% शालेय शुल्क परिपूर्ती मागील ०५ ते ०६ वर्षापासून प्रलंबित आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जवळपास १० हजार पेक्षा अधिक शाळा आर्थिक संकटात सापडल्या असून काही संस्था चालकांनी आत्महत्या सुद्धा केल्या आहेत. कोरोना काळातील फी चा दर १७८६० रु वरून अचानकपणे ०८ हजार रुपये करण्यात आला आहे. त्याबाबत कोणत्याही कारणाशिवाय ६० टक्के आरटीई शुल्क कपात करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील स्वयं अर्थसहित मराठी शाळांना अनुदानासह या शाळांमध्ये मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शिष्यवृत्ती, मध्यान्ह भोजन योजना या बाबींचा लाभ सरकारमार्फत देण्यात येत नाही. मागील पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेत विधान परिषदेमध्ये शाळांना अनुदान देण्यात यावे याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता परंतु त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

श्री. दिपक केसरकर, मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी राज्यात दिनांक १ एप्रिल २०१० पासून सुरू आहे. शिक्षण हक्क कायद्यातील कलम १२(१)(सी) नुसार दुर्बल व वंचित गटातील मुलांना राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार खाजगी विनाअनुदानित व खाजगी कायम विनाअनुदानित शाळांमध्ये (अल्पसंख्यांक वगळून) २५ टक्के राखी जागांवर प्रवेश देण्याची तरतूद आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२(२) नुसार आरटीई २५ प्रवेशीत विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपूर्ती शासनाने प्रतिवर्षी निश्चित केलेले दर व शाळांनी त्या-त्या वर्षी ठरविलेली फी यापैकी जे कमी असेल त्यानुसार पात्र शाळांना अदा करण्याकरीता शासनाकडुन प्राप्त झालेली रक्कम संचालनाकडुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सर्व यांना वितरीत केली जाते व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सर्व यांच्याकडून शाळांना वितरीत केली जाते.

सन २०१२-१३ मे सन २०२३-२४ या कालावधीतील RTE २५ % अंतर्गत राखीव जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती शुल्काची देय रक्कम रू. २८९६.७५ कोटी इतकी आहे.शासन दरवर्षी यासाठी काही निधी अर्थसंकल्पित करून वितरीत करते. तथापि, देय रक्कमेपेक्षा

लक्षवेधी सूचना क्र.१४७८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. राजेश पाडवी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४७८ पुढील प्रमाणे आहे :-**

"प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलींचा गळतीचे प्रमाण कमी करुन त्यांना त्यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढवणे आवश्यक असणे, मुलींचा गळतीचे प्रभाण मागासवर्गीय आदिवासी दुर्बल वर्गात अधिक असणे. तसेच मुलीच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टिकोन निराशा जनक असणे, मुलीचा पालकांना प्रोत्साहन देण्यासाठी कुटुंबाला हातभार म्हणून दुर्बल घटकांच्या मुलींना शाळेत नियमित येण्यासाठी उपस्थिती भत्ता ही योजना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी दिनांक ३ जानेवारी, १९९२ पासून शासनाकडून सुरु करणे, उपस्थिती भत्ता एक रुपया प्रतिदिन प्रति विद्यार्थिनी दिला जात असणे, सदर योजना १ ते ४ वर्गातील प्राथमिक मुलींसाठी असणे परंतु मागील ३० हून अधिक वर्षापासून महागाई गगनाला पोहोचणे त्यामुळे १ रुपये प्रतिदिन उपस्थिती भत्ता नगण्य वाटणे व सावित्रीच्या लेकीच्या उपस्थिती भत्ता नगण्य असून सरकार दरबारा कडून उपेक्षा होत असणे, सध्याची परिस्थिती बघता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले उपस्थिती भत्ता शासनाने सावित्रीच्या लेकींसाठी वाढवून देणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

श्री.दिपक केसरकर, मा.मंत्री शालेय शिक्षण यांचे निवेदन

इयत्ता १ ली ते ४ थी मधील प्राथमिक शाळेतील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी दिनांक १० जानेवारी, १९९२ च्या शासन निर्णयाव्दारे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील सर्व मुली व आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती/जमातीच्या दारिद्रय रेषेखालील मुलींना शाळेत नियमित उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन प्रत्येक मुलीमागे एक रुपया या दराने एकूण वर्षाच्या ७५ टक्के हजेरी असणाऱ्या मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता वार्षिक रु.२२० कमाल मर्यादेच्या अधीन राहुन देण्यात येत होता.

उपस्थिती भत्ता ही योजना जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत राबविण्यात येत होती. सदर योजना कालबाह्य झाली असल्याने दिनांक १३ मे,२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी केंद्र/राज्य पुरस्कृत मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठ्यपुस्तके योजना, मोफत गणेवश योजना, मानव विकास मिशनमार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना, मुलींना इयत्ता १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजना, मोफत एसटी बस प्रवास, मुलीचे वसतिगृह कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय इ. योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा परिणाम म्हणून सन २०२३-२४ मध्ये प्राथमिक शाळेतील मुलींच्या गळतीचे प्रमाण शून्यावर आलेले आहे.

---

२८e.

लक्षवेधी सूचना क्र.१६५५

# महाराष्ट्र विधानसभा

तृतीय (पावसाळी) अधिवेशन (जून-जुलै,२०२४)

**श्री.विनोद निकोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६५५ पुढीलप्रमाणे आहे:-**

" सन २०२३-२४ मध्ये समग्र शिक्षा अंतर्गत पालघर जिल्ह्यात एकूण ११ शाळा निर्माण करण्याचे शासनातर्फे निश्चित करण्यात आलेले असणे, त्यासाठी सुमारे १३ कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आलेली असणे, सदर कामांसाठी सन २०२३-२४ मध्ये या कालावधीत निविदा प्रसिद्धी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. सबंधित विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेली निविदा प्रक्रिया नियमानुसार किमान २१ दिवस उपलब्ध असणे आवश्यक असताना संबंधित संकेतस्थळावर फक्त ३ दिवस निविदा खुल्या दिसून येणे, त्यांनतर इच्छुक कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळालेली नसणे, तसेच प्राप्त झालेल्या निविदा तपासणी, छाननी व मंजुरी या प्रक्रियेत आवश्यक पारदर्शकता पाळली गेलेली नसणे, सदर निविदा ह्या ०.०१० टक्के इतक्या नगण्य दराने स्वीकृत करण्यात आल्या असणे, म्हणून मर्जीतले कंत्राटदार यांना काम मिळवुन देण्यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी नियमांचे उल्लंघन केलेले असणे, ई निविदा प्रक्रियेत अनेक गैरप्रकार दिसून येत असणे, म्हणुन वरील कामांची ई निवीदा प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने राबवणारे जबाबदार दोषी अधिकारी व कंत्राटदार यांची माहीती व तंत्रज्ञान विभाग तळमजला मंत्रालय मुंबई (NIC) यांचे मार्फत चौकशी व्हावी अशी मागणी सर्वसामन्यांनी करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## श्री. दिपक केसरकर, मा.मंत्री शालेय शिक्षण यांचे निवेदन

पालघर जिल्ह्यातील ११ शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत इमारतींची मोठी दुरुस्ती / नवीन बांधकाम या प्रयोजनासाठी सुमारे रु. १३.८० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यास शासन स्तरावरुन मंजूरी देण्यात आली. त्यानुसार सन २०२३-२४ मध्ये जिल्हा परिषद स्तरावरील प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेनंतर या सर्व कामांच्या मिळून शासनाच्या mahatenders.com या अधिकृत संकेतस्थळावर निविदा क्र.५,६ व ९ अन्वये या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. निविदा क्र.५ मध्ये २ कामांचा व निविदा क्र.६ मध्ये ८ कामांचा समावेश होता. या दोन्ही निविदांचा कालादधी दि.१८.०९.२०२३ ते दि.२४.०९.२०२३ असा ७ दिवसांचा होता. निविदा क्र.९ मध्ये उर्वरित १ कामाचा समावेश होता व त्याचा कालावधी दि.१०.०१.२०२४ ते दि.१६.०१.२०२४ असा ७ दिवसांचा होता. शासन निर्णय ग्राम विकास विभाग दि.३१.०८.२०२३ अन्वये अल्पकालावधीची ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्याचा कालावधी दि.३१.०३.२०२४ पर्यंत ७ दिवस निश्चित करण्यात आला होता. त्यानुसार या प्रकरणी कार्यवाही झाल्याचे दिसून येते.

प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, निविदा मागविणे, तपासणी व छाननी, तांत्रिक व त्यानंतर आर्थिक लिफाफे उघडणे, न्युनतम दर दर्शविणाऱ्या ठेकेदाराची निविदा स्वीकारुन त्यास नियमानुसार कार्यारंभ आदेश देणे इत्यादी सर्व आवश्यक सोपस्कार या प्रकरणी पार पाडले असल्याचे आढळून येते. त्यामूळे या संपुर्ण प्रक्रियेत गैरप्रकार अथवा अनियमितता झाली आहे असे म्हणता येणार नाही.

*************

## सन २०२४ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.मंगेश कुडाळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६८३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजे कांदिवली न.भू.क्र. ४६७ पै. मौजे चारकोप, न.भू.क्र.३/ अ/ १ पै. विश्वदिप, त्रिवेदी, सर्णेश, आदर्श सरकारी गृह.नि.सं. एस.आर.ए. मधील विकासक यांनी महाराष्ट्र शासन जमिन (कोरा केंद्र) जिल्हाधिकारी परवानगी न घेता सन २०१२ मध्ये एस.आर.ए. धर्मेश कन्स्ट्रक्शन या विकासकाने अनधिकृत बांधकाम केलेले असणे, बांधकाम करत असताना एस.आर.ए. धर्मेश कन्स्ट्रक्शन व साई कन्स्ट्रक्शन विकासकाने मोठ्या प्रमाणात जमिन गिळंकृत केल्याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. बां. (प.), मुंबई, मा.आयुक्त, बृ.म.पा., मा. प्रमुख अभियंता, विकास नियोजन, मुंबई, मा.सचिव, झो.पु.प्रा.बां. मा.स.आयुक्त, आर/दक्षिण विभाग, कांदिवली (प.) यांना सन २०१९ पर्यंत वारंवार तक्रारी करुनही त्याची दखल घेण्यात न येणे, झो.पु.प्रा. विभाग विकास नियोजन (D.P.) विभाग व धर्मेश कन्स्ट्रक्शन यांनी १९९१ डी.पी. प्लान मध्ये न.भु.क्र.३ /अ /१ मिळकतीत आरक्षित सरळ रेषेतील असलेला रस्ता वळवण्याची गरज असल्यास त्याची परवानगी न घेता कायदा व नियम डावलून सरळ रेषेतील जाणाऱ्या रस्त्यावर इमारतीच्या खड्याचे उत्खनन करुन बांधकाम करणे, सदरहू ६० फुटी रस्ता शासकीय मिळकतीवर धर्मेश कन्स्ट्रक्शनने शासकीय परवानगी शिवाय केल्याचे अहवालात नमूद असतानाही कागदोपत्री व्यवहार करुन विकासकाने नव्याने रस्ता वळवण्याची परवानगी घेतली. विकासकाकडून शासनाची फसवणूक होत असतानाही विकास नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून विकासकांवर कारवाई करण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

न.भू.क्र.३/अ/१ पैकी, मौजे चारकोप आणि न.भू.क्र.४६७ पैकी, मौजे कांदिवली येथील शासनाच्या जमिनीवरील (क्षे.१६०१६.२०चौ.मी.) विश्वदिप, त्रिवेणी आणि आदर्श एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठीची योजना दि.११/१०/२००५ रोजी स्विकृत होऊन दि.०७/०७/२००७ रोजी प्रथमतः आशयपत्र निर्गमित करण्यात आले. सदर योजना विकासक मे.धर्मेश कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेतील इमारतीचे बांधकाम करण्यास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.२६/१२/२००७ रोजीच्या पत्रान्वये, परवानगी दिलेली आहे. सदर योजनेमध्ये एकूण ७३९ झोपडीधारक असून या योजनेतील पुनर्वसन इमारतीकरीता दि.०२/०३/२०१६ व दि.१८.०८.२०१८ रोजी अंशतः भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे. अद्याप पर्यंत ३७८ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले असून उर्वरीत काम प्रगती पथावर आहे.

वरील योजनेमध्ये १८.३० मी. रुंदीचा विकास नियोजन रस्ता अंशत: (Set Back Area) अंतर्भूत असून सदर रस्त्यांचे सिमांकन (Demarcation) दि.०२/११/२०१० रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे. तसेच पुर्नसंरेखनानंतर (Realignment) सदर योजनेमधील १८.३० मी. रस्त्याचे सिमांकन (Demarcation) दि.१३.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे. त्याप्रमाणे योजनेचा अभिन्यांस तयार केलेला असून सदर योजनेमध्ये येत असलेल्या विकास नियोजन रस्त्याचे बांधकाम विकासकाने महानगरपालिकेच्या परवानगीने प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करुन महानगरपालिकेस हस्तांतरण करण्यासाठी दि.०१/१०/२०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेत अर्ज दाखल केलेला आहे.

उपरोक्त योजनेच्या लगत असलेल्या न.भू.क्र.४६७ (पैकी), ४६८ (पैकी), ४६९ (पैकी), ४७१/अ (पैकी), मोजे कांदिवली आणि न.भू.क्र.५५५, मौजे चारकोप, तालूका बोरीवली, भाब्रेकर नगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई या शासनाच्या मिळकती वरील (क्षे.६३८३.२७ चौ.मी.) सर्णेस एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झो.पु. योजनेस दि.१३.०९.२०२२ रोजी आशयपत्र प्रदान करण्यात आले आहे. सदर योजनेत एकूण ३०६ झोपडीधारक आहेत. सदर योजना विकासक मे.धर्मेश कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेसाठी महसूल व वन विभागाने दि.११/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

न.भू.क्र.३/ए/१ (पैकी), मौजे चारकोप, भाब्रेकर नगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील महाराष्ट्र शासनाच्या जमिनीवर श्री लक्ष्मी कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. या संस्थेसाठीची विकासक मे.साई कन्स्ट्रक्शन कंपनी, में. तन्ना इन्फ्रा डेव्हलपर एल.एल.पी. आणि मे. वि. डी. इन्फ्राटेक प्रा.लि. चे श्री.निकुंज हरेश संघवी यांमार्फत सदर झो.पु. योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेसाठी आशयपत्र दि.०१/१०/२०१४ रोजी व सुधारित आशयपत्र दि.२९/०७/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर योजनेमध्ये एकूण २४२ झोपडीधारक आहेत.

या योजनेत १८.३० मी. रुंदीचा विकास नियोजन रस्ता अंशत: (Set Back Area) अंर्तभुत आहे. सदर रस्त्याचे पुर्नसंरेखन (Realignment) केल्यानंतर या रस्त्याचे सिमांकन (Demarcation) दि.२०/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे. त्याप्रमाणे योजनेचा अभिन्यांस तयार केलेला असून या रस्त्याचे (Set Back Area) अधिमूल्य (प्रोरेटा चार्जेस) विकासकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे भरलेले आहे. तसेच सदर रस्त्याचा (Set Back Area) ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतलेला आहे.

-----*******-----

वरील योजनेमध्ये १८.३० मी. रुंदीचा विकास नियोजन रस्ता अंशत: (Set Back Area) अंतर्भूत असून सदर रस्त्यांचे सिमांकन (Demarcation) दि.०२/११/२०१० रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे. तसेच पुर्नसंरेखनानंतर (Realignment) सदर योजनेमधील १८.३० मी. रस्त्याचे सिमांकन (Demarcation) दि.१३.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे. त्याप्रमाणे योजनेचा अभिन्यांस तयार केलेला असून सदर योजनेमध्ये येत असलेल्या विकास नियोजन रस्त्याचे बांधकाम विकासकाने महानगरपालिकेच्या परवानगीने प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करुन महानगरपालिकेस हस्तांतरण करण्यासाठी दि.०१/१०/२०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेत अर्ज दाखल केलेला आहे.

उपरोक्त योजनेच्या लगत असलेल्या न.भू.क्र.४६७ (पैकी), ४६८ (पैकी), ४६९ (पैकी), ४७१/अ (पैकी), मोजे कांदिवली आणि न.भू.क्र.५५५, मौजे चारकोप, तालूका बोरीवली, भाब्रेकर नगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई या शासनाच्या मिळकती वरील (क्षे.६३८३.२७ चौ.मी.) सर्णेस एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झो.पु. योजनेस दि.१३.०९.२०२२ रोजी आशयपत्र प्रदान करण्यात आले आहे. सदर योजनेत एकूण ३०६ झोपडीधारक आहेत. सदर योजना विकासक मे.धर्मेश कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेसाठी महसूल व वन विभागाने दि.११/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

न.भू.क्र.३/ए/१ (पैकी), मौजे चारकोप, भाब्रेकर नगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील महाराष्ट्र शासनाच्या जमिनीवर श्री लक्ष्मी कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. या संस्थेसाठीची विकासक मे.साई कन्स्ट्रक्शन कंपनी, में. तन्ना इन्फ्रा डेव्हलपर एल.एल.पी. आणि मे. वि. डी. इन्फ्राटेक प्रा.लि. चे श्री.निकुंज हरेश संघवी यांमार्फत सदर झो.पु. योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेसाठी आशयपत्र दि.०१/१०/२०१४ रोजी व सुधारित आशयपत्र दि.२९/०७/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर योजनेमध्ये एकूण २४२ झोपडीधारक आहेत.

या योजनेत १८.३० मी. रुंदीचा विकास नियोजन रस्ता अंशत: (Set Back Area) अंर्तभुत आहे. सदर रस्त्याचे पुर्नसंरेखन (Realignment) केल्यानंतर या रस्त्याचे सिमांकन (Demarcation) दि.२०/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे. त्याप्रमाणे योजनेचा अभिन्यांस तयार केलेला असून या रस्त्याचे (Set Back Area) अधिमूल्य (प्रोरेटा चार्जेस) विकासकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे भरलेले आहे. तसेच सदर रस्त्याचा (Set Back Area) ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतलेला आहे.

-----*******-----

## सन २०२४ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.मंगेश कुडाळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६८३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजे कांदिवली न.भू.क्र. ४६७ पै. मौजे चारकोप, न.भू.क्र.३/ अ/ १ पै. विश्वदिप, त्रिवेदी, सर्णेश, आदर्श सरकारी गृह.नि.सं. एस.आर.ए. मधील विकासक यांनी महाराष्ट्र शासन जमिन (कोरा केंद्र) जिल्हाधिकारी परवानगी न घेता सन २०१२ मध्ये एस.आर.ए. धर्मेश कन्स्ट्रक्शन या विकासकाने अनधिकृत बांधकाम केलेले असणे, बांधकाम करत असताना एस.आर.ए. धर्मेश कन्स्ट्रक्शन व साई कन्स्ट्रक्शन विकासकाने मोठ्या प्रमाणात जमिन गिळंकृत केल्याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. बां. (प.), मुंबई, मा.आयुक्त, बृ.म.पा., मा. प्रमुख अभियंता, विकास नियोजन, मुंबई, मा.सचिव, झो.पु.प्रा.बां. मा.स.आयुक्त, आर/दक्षिण विभाग, कांदिवली (प.) यांना सन २०१९ पर्यंत वारंवार तक्रारी करुनही त्याची दखल घेण्यात न येणे, झो.पु.प्रा. विभाग विकास नियोजन (D.P.) विभाग व धर्मेश कन्स्ट्रक्शन यांनी १९९१ डी.पी. प्लान मध्ये न.भु.क्र.३ /अ /१ मिळकतीत आरक्षित सरळ रेषेतील असलेला रस्ता वळवण्याची गरज असल्यास त्याची परवानगी न घेता कायदा व नियम डावलून सरळ रेषेतील जाणाऱ्या रस्त्यावर इमारतीच्या खड्याचे उत्खनन करुन बांधकाम करणे, सदरहू ६० फुटी रस्ता शासकीय मिळकतीवर धर्मेश कन्स्ट्रक्शनने शासकीय परवानगी शिवाय केल्याचे अहवालात नमूद असतानाही कागदोपत्री व्यवहार करुन विकासकाने नव्याने रस्ता वळवण्याची परवानगी घेतली. विकासकाकडून शासनाची फसवणूक होत असतानाही विकास नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून विकासकांवर कारवाई करण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

न.भू.क्र.३/अ/१ पैकी, मौजे चारकोप आणि न.भू.क्र.४६७ पैकी, मौजे कांदिवली येथील शासनाच्या जमिनीवरील (क्षे.१६०१६.२०चौ.मी.) विश्वदिप, त्रिवेणी आणि आदर्श एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठीची योजना दि.११/१०/२००५ रोजी स्विकृत होऊन दि.०७/०७/२००७ रोजी प्रथमतः आशयपत्र निर्गमित करण्यात आले. सदर योजना विकासक मे.धर्मेश कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेतील इमारतीचे बांधकाम करण्यास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.२६/१२/२००७ रोजीच्या पत्रान्वये, परवानगी दिलेली आहे. सदर योजनेमध्ये एकूण ७३९ झोपडीधारक असून या योजनेतील पुनर्वसन इमारतीकरीता दि.०२/०३/२०१६ व दि.१८.०८.२०१८ रोजी अंशतः भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे. अद्याप पर्यंत ३७८ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले असून उर्वरीत काम प्रगती पथावर आहे.

गृह (बंदरे) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.७९१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती मंदा म्हात्रे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधासभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७९१ खालीलप्रमाणे आहे :-**

" देशातील दुसरा तसेच राज्यातील पहिला असा नवी मुंबईतील महत्वाकांक्षी मरिना प्रकल्प गेली ७ वर्षे पाठपूरावा करुनही सुरु करण्यात आलेला नसणे, सदरचे काम मे. स्वास्तिक इन्फ्रा लॉजिक प्रा.लि. या कंपनीस देण्यात आलेले असणे, परंतु सदर कंपनीची काम सुरू करण्याची दिरंगाई पाहता सदर कंपनी वेळकाढूपणा करत असल्याचे निदर्शनास येणे, सदर कंपनीला पाण्याच्या आतील कामांचे काम करण्याचा अनुभवही नसल्याची माहिती मिळणे, नवी मुंबईकरांना मरिना प्रकल्प उभारणीची प्रतीक्षा असताना अजूनही काम सुरु होत नसल्याने येथील नागरिक अनेक सोयी-सुविधांपासून वंचित राहणे, स्थानिक नागरिकांमध्ये असलेला नाराजीचा सूर, त्यामुळे सदर काम देण्यात आलेल्या मे. स्वस्तिक इनफ्रा लॉजिक प्रा. लि. या कंपनीला स्थगिती देण्यात येण्याची वारंवार होत असलेली मागणी, सीआरझेडसह इतर सर्व परवानग्या मिळूनही काम सुरू होत नसणे, काम जलद गतीने करण्याकरिता सदरचे काम नव्या कंपन्यांना देण्याची गरज असणे, अनेक मोठ्या कंपन्या सदरचे काम जलद पद्धतीने करू शकत असल्याने सदर मरीना प्रकल्पाच्या कामांची फेरनिविदा पुन्हा नव्याने काढण्याची आवश्यकता, नवी मुंबईत मरीना प्रकल्प उभारल्यास या शहराला अनन्य साधारण महत्व प्राप्त होऊन पर्यटनालाही चालना मिळणार तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याने यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

निवेदन

(श्री.संजय बनसोडे, मा. मंत्री, बंदरे)

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या (म.सा.मं.) संचालक मंडळाच्या दिनांक ०१/०७/२०१४ रोजी संपन्न झालेल्या ६७ व्या बैठकीत सीबीडी बेलापूर येथील सेक्टर-१५ येथे खाडीकिनारी सिडकोकडून मंजूर झालेल्या ८० मी. X २० मी. क्षेत्रावर प्रवासी जेट्टी व मरीना प्रकल्प उभारण्यासाठी सिडकोकडून कमाल कालावधीसाठी जागा हस्तांतरित करुन घेण्याच्या अटीवर मंडळाची मान्यता देण्यात आली. प्रकल्पाचा वाव लक्षात घेता, हे क्षेत्र अपुरे पडणार असल्याने सन २०१६ मध्ये महाराष्ट्र सागरी मंडळाला एकूण सुमारे ५ एकर इतके क्षेत्र उपलब्ध करुन देण्याबाबत सिडकोकडे मागणी करण्यात आली.

सिडकोने दि. २१.०२.२०१८ च्या पत्रान्वये मरीना व वॉटरफ्रन्ट विकास प्रकल्पासाठी ७.२५ एकर क्षेत्र वार्षिक रु. १/- नाममात्र भाडेपट्टयाने दीर्घ कालावधीसाठी देण्याचे मान्य केले आहे. दरम्यान, मरीना व वॉटरफ्रन्ट प्रकल्प निर्माण करण्यासाठी खाजगी विकासकाची निवड करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने दिनांक १२.७.२०१७ रोजी निविदा प्रसिध्द केल्या. त्यानुसार मे. स्वस्तिक इन्फ्रालॉजिक या लीड मेंबरच्या नावे महाराष्ट्र सागरी मंडळाच्या दिनांक ०२.११.२०१७ रोजीच्या पत्राव्दारे लेटर ऑफ अवार्ड देण्यात आले.

रोरा म|206. (750-7-24).

(व.प्रा.५)

ठाणे जिल्ह्यासाठी Coastal Zone Management Plan (CZMP) तयार होईपर्यंत कोणत्याही प्रकल्पाला पर्यावरणविषयक मंजूरी न देण्याबाबतचे आदेश असल्यामुळे, मरीना प्रकल्पासाठी पर्यावरण दाखल्यास विलंब झाला. CZMP ला केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाकडून दिनांक २८.०२.२०१९ च्या पत्रान्वये मान्यता प्राप्त झाली. त्यानंतर, मरीना प्रकल्पासाठी SEIAA यांच्याकडून दिनांक २०.०७.२०२० अन्वये पर्यावरणविषयक दाखला प्राप्त झालेला आहे. तद्नंतर महाराष्ट्र सागरी मंडळाने मागणी केल्याप्रमाणे सिडकोने प्लॉट क्र. १११A, क्षेत्र २३४९२.८१ चौ.मी. महाराष्ट्र सागरी मंडळाला देण्यासंदर्भात दिनांक २८.१०.२०२१ रोजी Revised Allotment Letter जारी केले.

नवी मुंबई इंटरनॅशनल मरीना प्रा. लि. (तत्कालीन मे. स्वस्तिक इन्फ्रा लॉजिक) कंपनीने दिनांक ०३.०३.२०२२ रोजीचे पत्रान्वये मरीना प्रकल्पाचे पहिल्या टप्प्याचे पाण्यातील क्षेत्रात (water area) काम सुरु करण्यासाठी Technical drawings/ lay out and details सादर करून काम सुरु करण्याची परवानगी मागितली होती.

पाण्यामध्ये करावयाच्या सागरी बांधकामाची सुरक्षितता आणि स्थिरता यांची खात्री करण्यासाठी लेआऊट/डिझाईन्सची इंडियन रजिस्टर ऑफ शिपींग (IRS) यांच्याकडून तपासणी करुन घेण्याबाबत महाराष्ट्र सागरी मंडळाचे दिनांक ०९.०७.२०२२ चे पत्रान्वये कंपनीला सूचित करण्यात आले होते. तथापि, IRS यांचेकडे मरीना संदर्भात स्वतःची धोरण/मानके नसल्यामुळे त्यांच्याकडून प्रतिसाद प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचे नवी मुंबई इंटरनॅशनल मरीना प्रा. लि. कंपनीने कळविल्यामुळे लेआउट डिझाईनची महाराष्ट्र सागरी मंडळाच्या पॅनलवरील नेव्हल ऑर्किटेक्टकडून तपासणी करुन घेऊन त्यांचा अहवाल सादर करण्याबाबत महाराष्ट्र सागरी मंडळाच्या दिनांक ०८.१२.२०२२ च्या पत्रान्वये कंपनीला सूचित करण्यात आले होते.

त्यानुसार, कंपनीने दिनांक ०९.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र सगारी मंडळाच्या पॅनलवरील Vector Marine & Offshore Technology या नेव्हल आर्किटेक्टने प्रमाणित केलेले मरीना लेआऊट व डिझाईन सादर केले आहेत.

तद्नंतर, सिडकोकडून महाराष्ट्र सागरी मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या २३४९२.८१ चौ.मी. इतक्या क्षेत्राची दिनांक ०८.०२.२०२४ रोजी पुन्हा अंतिम मोजणी होऊन, सिडको आणि महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्यामध्ये दिनांक ०८.०४.२०२४ रोजी करारनामा स्वाक्षांकित करण्यात आला आहे. आता, सदरचे क्षेत्र मरीना प्रकल्पाच्या उभारणीसाठी हस्तांतरित करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

*********

ठाणे जिल्ह्यासाठी Coastal Zone Management Plan (CZMP) तयार होईपर्यंत कोणत्याही प्रकल्पाला पर्यावरणविषयक मंजूरी न देण्याबाबतचे आदेश असल्यामुळे, मरीना प्रकल्पासाठी पर्यावरण दाखल्यास विलंब झाला. CZMP ला केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाकडून दिनांक २८.०२.२०१९ च्या पत्रान्वये मान्यता प्राप्त झाली. त्यानंतर, मरीना प्रकल्पासाठी SEIAA यांच्याकडून दिनांक २०.०७.२०२० अन्वये पर्यावरणविषयक दाखला प्राप्त झालेला आहे. तद्नंतर महाराष्ट्र सागरी मंडळाने मागणी केल्याप्रमाणे सिडकोने प्लॉट क्र. १११A, क्षेत्र २३४९२.८१ चौ.मी. महाराष्ट्र सागरी मंडळाला देण्यासंदर्भात दिनांक २८.१०.२०२१ रोजी Revised Allotment Letter जारी केले.

नवी मुंबई इंटरनॅशनल मरीना प्रा. लि. (तत्कालीन मे. स्वस्तिक इन्फ्रा लॉजिक) कंपनीने दिनांक ०३.०३.२०२२ रोजीचे पत्रान्वये मरीना प्रकल्पाचे पहिल्या टप्प्याचे पाण्यातील क्षेत्रात (water area) काम सुरु करण्यासाठी Technical drawings/ lay out and details सादर करून काम सुरु करण्याची परवानगी मागितली होती.

पाण्यामध्ये करावयाच्या सागरी बांधकामाची सुरक्षितता आणि स्थिरता यांची खात्री करण्यासाठी लेआऊट/डिझाईन्सची इंडियन रजिस्टर ऑफ शिपींग (IRS) यांच्याकडून तपासणी करुन घेण्याबाबत महाराष्ट्र सागरी मंडळाचे दिनांक ०९.०७.२०२२ चे पत्रान्वये कंपनीला सूचित करण्यात आले होते. तथापि, IRS यांचेकडे मरीना संदर्भात स्वतःची धोरण/मानके नसल्यामुळे त्यांच्याकडून प्रतिसाद प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचे नवी मुंबई इंटरनॅशनल मरीना प्रा. लि. कंपनीने कळविल्यामुळे लेआउट डिझाईनची महाराष्ट्र सागरी मंडळाच्या पॅनलवरील नेव्हल ऑर्किटेक्टकडून तपासणी करुन घेऊन त्यांचा अहवाल सादर करण्याबाबत महाराष्ट्र सागरी मंडळाच्या दिनांक ०८.१२.२०२२ च्या पत्रान्वये कंपनीला सूचित करण्यात आले होते.

त्यानुसार, कंपनीने दिनांक ०९.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र सगारी मंडळाच्या पॅनलवरील Vector Marine & Offshore Technology या नेव्हल आर्किटेक्टने प्रमाणित केलेले मरीना लेआऊट व डिझाईन सादर केले आहेत.

तद्नंतर, सिडकोकडून महाराष्ट्र सागरी मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या २३४९२.८१ चौ.मी. इतक्या क्षेत्राची दिनांक ०८.०२.२०२४ रोजी पुन्हा अंतिम मोजणी होऊन, सिडको आणि महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्यामध्ये दिनांक ०८.०४.२०२४ रोजी करारनामा स्वाक्षांकित करण्यात आला आहे. आता, सदरचे क्षेत्र मरीना प्रकल्पाच्या उभारणीसाठी हस्तांतरित करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

*********

३२४.

गृह (बंदरे) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.७९१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२४ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती मंदा म्हात्रे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधासभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७९१ खालीलप्रमाणे आहे :-**

" देशातील दुसरा तसेच राज्यातील पहिला असा नवी मुंबईतील महत्वाकांक्षी मरिना प्रकल्प गेली ७ वर्षे पाठपूरावा करुनही सुरु करण्यात आलेला नसणे, सदरचे काम मे. स्वास्तिक इन्फ्रा लॉजिक प्रा.लि. या कंपनीस देण्यात आलेले असणे, परंतु सदर कंपनीची काम सुरू करण्याची दिरंगाई पाहता सदर कंपनी वेळकाढूपणा करत असल्याचे निदर्शनास येणे, सदर कंपनीला पाण्याच्या आतील कामांचे काम करण्याचा अनुभवही नसल्याची माहिती मिळणे, नवी मुंबईकरांना मरिना प्रकल्प उभारणीची प्रतीक्षा असताना अजूनही काम सुरू होत नसल्याने येथील नागरिक अनेक सोयी-सुविधांपासून वंचित राहणे, स्थानिक नागरिकांमध्ये असलेला नाराजीचा सूर, त्यामुळे सदर काम देण्यात आलेल्या मे. स्वस्तिक इनफ्रा लॉजिक प्रा. लि. या कंपनीला स्थगिती देण्यात येण्याची वारंवार होत असलेली मागणी, सीआरझेडसह इतर सर्व परवानग्या मिळूनही काम सुरू होत नसणे, काम जलद गतीने करण्याकरिता सदरचे काम नव्या कंपन्यांना देण्याची गरज असणे, अनेक मोठ्या कंपन्या सदरचे काम जलद पद्धतीने करू शकत असल्याने सदर मरीना प्रकल्पाच्या कामांची फेरनिविदा पुन्हा नव्याने काढण्याची आवश्यकता, नवी मुंबईत मरीना प्रकल्प उभारल्यास या शहराला अनन्य साधारण महत्व प्राप्त होऊन पर्यटनालाही चालना मिळणार तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याने यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### निवेदन

(श्री.संजय बनसोडे, मा. मंत्री, बंदरे)

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या (म.सा.मं.) संचालक मंडळाच्या दिनांक ०१/०७/२०१४ रोजी संपन्न झालेल्या ६७ व्या बैठकीत सीबीडी बेलापूर येथील सेक्टर-१५ येथे खाडीकिनारी सिडकोकडून मंजूर झालेल्या ८० मी. X २० मी. क्षेत्रावर प्रवासी जेट्टी व मरीना प्रकल्प उभारण्यासाठी सिडकोकडून कमाल कालावधीसाठी जागा हस्तांतरित करुन घेण्याच्या अटीवर मंडळाची मान्यता देण्यात आली. प्रकल्पाचा वाव लक्षात घेता, हे क्षेत्र अपुरे पडणार असल्याने सन २०१६ मध्ये महाराष्ट्र सागरी मंडळाला एकूण सुमारे ५ एकर इतके क्षेत्र उपलब्ध करुन देण्याबाबत सिडकोकडे मागणी करण्यात आली.

सिडकोने दि. २१.०२.२०१८ च्या पत्रान्वये मरीना व वॉटरफ्रन्ट विकास प्रकल्पासाठी ७.२५ एकर क्षेत्र वार्षिक रु. १/- नाममात्र भाडेपट्टयाने दीर्घ कालावधीसाठी देण्याचे मान्य केले आहे. दरम्यान, मरीना व वॉटरफ्रन्ट प्रकल्प निर्माण करण्यासाठी खाजगी विकासकाची निवड करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने दिनांक १२.७.२०१७ रोजी निविदा प्रसिध्द केल्या. त्यानुसार मे. स्वस्तिक इन्फ्रालॉजिक या लीड मेंबरच्या नावे महाराष्ट्र सागरी मंडळाच्या दिनांक ०२.११.२०१७ रोजीच्या पत्राव्दारे लेटर ऑफ अवार्ड देण्यात आले.

शेरा म/206. (७50-7-24).

(ता.प.ा.५)